म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. १९११
सन १९२८

REFBK-0001168

श्रीः मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, ग्रंथालय
कविवर्य ... १५११ ... नों दि: २३।६।६०

मोरोपंतांचे समग्र ग्रंथ

अ. क्र. ११६५

# ४

# हरिवंश.

संपादक व प्रकाशक

रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर.

REFBK-0001168

मुद्रक

अच्युत चिंतामण भट.

'यशवंत'

छापखाना पुणें.

सन १९१४

हें पुस्तक रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर यांनी पुणें येथें अच्युत चिंतामण भट
ह्यांच्या ‘**यशवंत**’ छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें

# प्रस्तावना.

योजकस्तत्र दुर्लभः । .. सुभाषित

I have observed that a reader seldom peruses a book with pleasure till he knows whether the writer of it be a black or a fair man, or a mild or cholerie disposition, married or a bachlor, with other particulars of the like nature that conduce very much to the right understanding of an author.

—*Addison*

एखाद्या पुस्तकाचा लेखक काळा आहे की गोरा आहे, तो शांत स्वभावाचा आहे कीं रागीट आहे, विवाहित आहे कीं अविवाहित आहे हें समजल्याशिवाय व ग्रंथकाराचें म्हणणें बरोबर समजण्यास उपयोगीं पडणारी अशा च प्रकारची दुसरी माहिती मिळाल्याशिवाय तें पुस्तक वाचक क्वचित च आनदानें वाचतो, असें माझे पाहण्यात आलें आहे

**—ॲडिसन.**

पताच्या एका प्रबधावर अर्थद्योतक टीपा लिहिण्याचें काम मला कधीं कोणी सागतील ही कल्पना, रा. पराडकर याचे तत्सबधीं आग्रहाचें पत्र येईपर्यंत, मला येण्याचे काहीं च कारण नव्हतें, आणि जरी त्या पत्रानें त्याच्या या अवाढव्य कारखान्यात पतकाव्याचा एक नम्र आणि प्रेमळ भक्त या नात्यानें अल्पस्वल्प काम पतकरून काहीं मदत होण्यासारखी असल्यास करावी अशी प्रबळ इच्छा उत्पन्न झाली, तरी तिला आत्मविश्वासाचे साह्य मिळेना, आणि नकारार्थी उत्तर लिहिण्याचे तर कष्टप्रद वाटू लागलें. शेवटीं मालाच्या बरेंवाईटपणाची जबाबदारी सागकाम्या मजुरावर न पडता, त्यास काम सागणाऱ्या कारखानदाराच्या योजनेवर च सर्वस्वीं पडते या तत्वावर नजर देऊन, नेमून दिलेलें काम यथाशक्ति कसेंबसें एकदाचें सपविलें, आणि पुनरपि असल्या उद्योगावर आपली योजना

कोणी करणार नाहीं अशा दृढविश्वासावर स्वस्थ होतों, तों च या पुस्तकास प्रस्तावना हि लिहिण्याची कामगिरी माझ्यावर च लादण्याची संपादकांस बुद्धि झाली व ती हि सर्वंच पुस्तक छापून बाहेर पडण्याच्या सुमारास! टीपा लिहिण्याच्या वेळेस च ही सूचना झाली असती तर त्या दृष्टीनें पुस्तक वाचिलें असतें. दीड वर्षांपूर्वी हा ग्रंथ वाचताना ज्या कांहीं विशेष गोष्टी आढळल्या त्यांपैकीं कित्येकांच्या स्मरणपटलावर राहिलेल्या पुसट कल्पनांच्या साह्यानें अगदीं थोडक्या अवधींत हें अवघड उरकावयाचें आहे! त्यातल्या त्यांत एवढें बरें आहे कीं, "या पुस्तकाच्या वाचनास सहायकारी होईल अशी आटपशीर प्रस्तावना" लिहिण्यास संपादकाची अनुज्ञा आहे, त्यामुळें हें ओझें बरें च हलकें झालें आहे. तथापि अखेरपर्यंत मजल सुखरूपपणें मारण्यास

मूकं करोति वाचालं पंगु लंघयते गिरिं ।
यत्कृपा तमहं वंदे परमानंदमाधवम् ॥

---

# ग्रंथपरिचय.

१. नीलकंठ गोविंद चतुर्धर (चौधरी) कृत भारतभावदीपनामक हरिवंशावरील संस्कृत टीकेंतील पुढील अवतरण आहे:—

"इह खलु भगवान् पाराशर्यः परमकारुणिकः सकलसंसारानर्थसंकटात् जडान् उद्दिधीर्षुः सर्वश्रुतिरहस्यप्रकाशकं महाभारताख्यं इतिहासं प्रणिनाय तत्र शतं पर्वाणि तेषु अंतिमं पर्वत्रयं हरिवंशरूपं यथोक्तं अनुक्रमणिकाध्याये'—

हरिवंशस्ततः पर्वपुराणं खिलसंज्ञितम् ।
विष्णुपर्व शिशोश्चर्या विष्णोः कंसवधस्तथा ॥

भविष्यं पर्व चाप्युक्तं खिलेष्वेवाद्भुतं महत् ।
एतत् पर्वशतं पूर्णं व्यासेनोक्तं महात्मना ॥ इति ”

म्हणजे श्रीव्यासकृत शतपर्वमहाभारताचीं अखेरचीं तीन पर्वें तो ‘हरिवंश’ होय. हरिवंशानें महाभारत संपूर्ण होतें. मूळ संस्कृत हरिवंशाची ग्रंथसंख्या खालीं लिहिल्याप्रमाणें आहेः—

| पर्व | अध्यायसंख्या. | श्लोकसंख्या |
|---|---|---|
| १. हरिवंशाख्य | ५५ | ३१०४ |
| २. विष्ण्वाख्य | १२९ | ७७६८ |
| ३ भविष्याख्य | १३५ | ५११४ |
| | ३१९ | १५९८६ |

२. हल्लींच्या आवृत्तीच्या प्रथम खंडाच्या पहिल्या भागांत पंतलिखित पोथीचा नमुना दिला आहे, त्या आकाराचीं पोथीचीं पाठपोट १८२ पानें पंतकृत मराठी हरिवंशाचीं असून, ग्रंथाचे एकंदर अध्याय ५४, आणि आर्यासंख्या ५४४५ आहे सर्व पोथी अव्वल अखेर सुवाच्य लिहिलेली असून, कोठें कोठें मूळचा कांहीं मजकूर बदलून दुसरा घातला आहे. प्रत्येक पानाच्या दरेक बाजूस सरासरी १३।१४ आर्या लिहिलेल्या आहेत. कित्येक ठिकाणीं पंतानीं स्वतः टीपा लिहिल्या आहेत, व कांहीं कांहीं आर्यांच्या पंतलिखितत्वासंबंधानें आर्याभारताप्रमाणें च येथें हि संशय आहे. तसें च प्रत्येक अध्यायाचे शेवटीं “ इति श्रीहरिवंशेध्यायः ” असें लिहिलेलें आहे. सर्व पोथी पाहिली म्हणजे प्रथमतः आर्या कच्च्या खर्ड्यांवर लिहून नंतर त्यावरून पोथी लिहिली आहे अशी खात्री होते. पोथीचा कागद दौलताबादी जाड असून तो घोटून चांगला गुळगुळीत केलेला आहे, आणि त्यावर किंचित् लाल व पिवळा असा एक रंग दिलेला आहे. इतकी जुनी पोथी असतां यत्किंचित् सुद्धां तिला कसर वगैरे लागलेली नाहीं, पानें जीर्ण किंवा खराब झालेलीं नाहींत, यावरून पोथीकरितां कागद तयार

करण्यात अत्यंत खबरदारी घेतलेली दिसत आहे. पोथीचें लिहिणें काळजी-पूर्वक झालें आहे तरी कच्च्या खर्ड्यांवरून मजकुराची नकल करण्यात साह-जीक च थोड्या ठिकाणीं हस्तदोष झाल्याचें दृष्टीस पडतें. यमकप्रचुर काव्यांत समानाक्षरी शब्द बहुतेक ठिकाणीं वेदस्वरासारख्या उभ्या रेघा देऊन तोडून दाखविले असल्यानें ग्रंथ समजण्यास किंवा तो सटीप कर-ण्यास फार सुलभ झालें आहे. पंताच्या काव्यप्रकाशकांपैकीं ज्यास हें साधन उपलब्ध नव्हतें त्यास पंताचा हेतु बरोबर समजण्यास किती यातायात पडली असेल, आणि त्यास मिळालेल्या दुय्यम व म्हणून च अधिक अशुद्ध प्रतीवर च निर्वाह करावा लागल्यानें चांगल्या विद्वान्, उत्साही आणि मेहनती प्रकाशकाच्या हातून कित्येक ठिकाणीं पाठाचा व अर्थाचा किती विपर्यास झाला असेल याची कल्पना छापील प्रतीशीं पंतलिखित पोथी प्रत्यक्ष ताडून पाहणारास च बरोबर होईल. हस्तलिखित पोथीच्या मुखपृष्ठावर पुढील आर्या आहे —

> कवि म्हणति, 'कवन तेसें बहु उद्योगें हि धन जसें मिळतें
> जितुकें चि मिळायाचें अधिक मिळेना चि एक ही तिळ तें '

व अखेरच्या पृष्ठावर पुढील श्लोक आहेः—

> सजलजलदश्यामा ! रामा ! मनीं सुख वाटतें,
> चरित चि तुझें भावें गावें असें मज दाटतें.
> जनकतनयाकांता ! शांताकृते ! रघुनायका !
> पुरिव सदया ! कामा या माधवा ! वरदायका !.

३ मूळ संस्कृत ग्रंथाच्या सहा अध्यायांस व तीन श्लोकांस पंतकृत रूपांतराचें प्रमाण सरासरीनें अनुक्रमें एक अध्याय व एक आर्या असें पडतें. आर्याभारत तयार करण्याचे वेळीं पंतांनीं

> व्यासकृत महाभारत लक्ष ग्रंथ प्रसिद्ध हा भारी,
> आर्यावृत्तें रचितों, स्वल्पांत चि आणितों कथा सारी.

अशी प्रतिज्ञा केली होती, आणि ती च महाभारताच्या या हरिवंश-नामक अंतिम भागाच्या अखेरपर्यंत पाळिली आहे. कोणता हि प्रचंड उद्योग दीर्घकालानें जेव्हा संपण्याचे बेतात येतो, तेव्हां अखेर अखेर प्रारंभींचा उत्साह बहुधा कायम राहत नाहीं. तसा च प्रकार या ठिकाणीं हि झाला आहे आर्याभारतातिल पंताची तेजस्विता यांत काहीं कमी प्रमाणानें दृष्टीस पडते. असें आहे तरी,

सुकुमारबुद्धि वक्ते श्रोते जे त्यांसि कीर्तनश्रवण
व्हाया, स्वल्पा च्चि कथा लिहिन रसिकसाधुरंजनप्रवण.

यांत प्रगट केलेल्या हेतूप्रमाणें हरिवंशाची रचना करण्यांत पंतांनीं पूर्ण खबरदारी घेतलेली दिसून येते. पंताचा हरिवंश हा मूळ संस्कृताच्या तृतीयांशाएवढा आहे. मूळांत जरी कोणत्या हि कथेचें अगर उपाख्यानाचें फारसें विस्तृत असें वर्णन नाहीं तरी मूळग्रंथातील मजकुराची अवश्य तेवढी छाटाछाट करून अर्थहानि किंवा रसहानि बिलकुल होऊं न देता, संविधानक बिघडूं न देता, किंवा जरूर असा कोणता हि भाग न वगळतां पंतांनीं संपूर्ण ग्रंथ संक्षेपानें मराठींत आणिला आहे. ही मराठी प्रतिकृति वाचून इतिहास, सरस वर्णनप्रसंग, उत्प्रेक्षादि अलंकार, इत्यादिकासंबंधानें मूळ ग्रंथ वाचल्याचें श्रेय वाचकास येईल असें म्हणण्यास फारशी हरकत नाहीं; किंबहुना अनेक ठिकाणीं पंतकृत संक्षेप च मूळांतील विस्तारापेक्षा अधिक आल्हाद-दायक होईल असें आमच्या बुद्धीस वाटतें. संस्कृत काय किंवा मराठी काय महाभारत म्हणून जेवढ्या भागास बहुतेक समजण्यांत येते तो भाग वाचून संपल्यावर, हरिवंश हा ग्रंथ काव्यदृष्ट्या किंवा मनोरंजक कथाभाग या दृष्टीनें हि एकंदरीनें नीरस च वाटणार विशेषत: त्याचा आरंभींचा चौथाई भाग तर बरा च कंटाळवाणा असल्यानें ग्रंथ पुढें तसा च वाचत जाण्याचा धीर मराठी काव्यग्रंथाविषयीं पूर्ण अनास्था बाळगणाऱ्या आम्हा महाराष्ट्रीयांत थोड्यास च निघणार ! अशा कारणानें या काव्याची असावी तितकी

प्रसिद्धि नाहीं शिवाय या ग्रंथातील मुख्य कथाभाग श्रीधरांनीं आपल्या 'हरिविजय' या ग्रंथांत सोप्या भाषेनें व सरस वर्णिला असल्यानें आणि 'हरिविजय' आबालवृद्धांच्या नित्य परिचयांत असल्यानें पौराणिक इतिहासाकरितां हरिवंशाकडे धांव घेण्याचें कारण हि पडत नाहीं. तथापि हरिवंशांतील आरंभीं दिसून येणारा नीरसपणा पुढें पुढें कमी कमी च होत गेला आहे, आणि म्हणून मूळ ग्रंथास बरा च संक्षेप देण्यांत पंतांचें चातुर्य दिसून येऊन त्यांचे उपकार वाटतात. हरिविजयावरून मूळ हरिवंश चटकदार असेल असें अनुमान केल्यास तें अगदीं चुकीचें होईल. श्रीधरांनीं मूळांतून त्यांस अवश्य वाटला तेवढा च मुख्य कथानकाचा भाग घेऊन व भागवत, पद्मपुराण यांतील कथाविशेषांची त्यांत भर घालून आपल्या रसाळ वाणीनें तो खुलवून लिहिला आहे. पंतांच्या मूळ प्रतिज्ञेप्रमाणें त्यांना फक्त हरिवंश च संक्षेपानें मराठींत उतरावयाचा होता, इतर पुराणांची मदत घेण्यास त्यांस श्रीधरांचें स्वातंत्र्य नव्हतें, म्हणून केवळ रसपरिपाकाकरितां आपल्या पूर्वप्रतिज्ञात हेतूकडे दुर्लक्ष्य करणें हें त्यांस शक्य नव्हतें. तथापि आपल्या हेतूप्रमाणें त्यांनीं केलेला प्रयत्न फुकट गेला आहे असें मात्र समजण्याचें कारण नाहीं. त्यांनीं आपल्या अंगचें पुष्कळ कौशल्य खर्चून मूळ इमारतीची ही छोटेखानी प्रतिमा बरी च सुंदर करण्याची खटपट केली आहे. मूळ संस्कृत हरिवंश व पंतांचें काव्य यांतून तुलनेकरितां अनेक उतारे देऊन वरील अभिप्राय शाबीत करण्याचें काहीं विशेष कारण आहे असें नाहीं, शिवाय त्यामुळें हा लेख प्रमाणाबाहेर लांबेल हि. इतकें च सांगणें या ठिकाणीं पुरें आहे कीं, इतर संस्कृत काव्यें मराठींत आणतांना पंतांनीं जी संक्षेपाची पद्धत अमलांत आणली आहे, ती च पद्धत त्यांनीं येथें हि स्वीकारली आहे. मूळांत पदरची भर ("पदरची भर" म्हणजे मूळ ग्रंथांत नसलेल्या कल्पना, वर्णनविस्तार, प्रसंगविशेषीं मूळांतील भाषणांची वाढ) घालण्याचा बहुधा प्रयत्न केलेला नाहीं, त्यामुळें हा ग्रंथ आर्याभारताइतका सर्वांगसुंदर झाला नाहीं

४. पंताचे यजमान बाबूजी नाईक जोशी बारामतीकर याचे पुत्र 'श्रीपांडुरंगराय' यानीं 'प्रेमेंकरूनि असकृत्' सांगितल्यावरून, ज्यांत श्रीकृष्णचरित्र प्रमुखत्वानें वर्णिलें आहे असा हा हरिवंश पंतानीं महाभारताचें रूपांतर संपविल्यानंतर लिहिला. "शके १७०७ ते १७१० या मुदतींत पांडुरंगरावनाईक यांच्या सांगण्यावरून व नाइकांच्या मुलांत विभक्तपणाचे तंटे चालले असतांना पंतानीं घाईघाईनें हरिवंश लिहिला," असें रा. पांगारकर आपल्या मोरोपंती चरित्रांत म्हणतात. "पांडुरंगरावाचें लग्न इ. स. १७७३ सालीं झालें. तेव्हां तोंपर्यंत पंतांना एकादें काव्य करण्याविषयीं आग्रह करण्याइतका अधिकार व रसिकपणा त्यांचे अंगीं येण्याचा संभव दिसत नाहीं, कारण त्या काळीं मुलांचीं लग्नें बऱ्या च अल्पवयांत केलीं जात असत. म्हणून मोरोपंती हरिवंशाची रचना इ. स. १७७३ नंतरची असली पाहिजे," असें रा. भिडे (काव्यसंग्रहकार) म्हणतात, व दुसऱ्या एका पत्रावरून ते हरिवंशाची रचना १७८२ त म्ह. शके १७०३ मध्यें झाली असावी असें म्हणतात. या सर्व मतांची छाननी प्रो. परांजपे यानीं प्रस्तुत आवृत्तीच्या आर्याभारताच्या प्रस्तावनेंत (प्रस्तावनेचें पृष्ठ २९ पहा.) करून, शके १७०४ ते १७०९ च्या दरम्यान या ग्रंथास आरंभ होऊन समाप्ति हि झाली असावी असें सप्रमाण दाखविलें आहे. उपलब्ध प्रमाणावरून शके १७०८ च्या समाप्तीस च हा ग्रंथ समाप्त झाला असावा असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. प्रो. परांजपे यांच्या प्रस्तावनेंत सिद्ध केलेल्या गोष्टींवरून ग्रंथरचना बहुतेक तीन चार वर्षें चालली असावी. पंतांचा जन्मशक १६५१, तेव्हां त्यानीं आपल्या वयाच्या ५५व्या वर्षाच्या सुमारास हा ग्रंथ लिहिला असावा असें मानण्यास हरकत नाहीं. आर्यावृत्तांत संस्कृत काव्यें मराठींत संक्षेपानें आणण्याच्या कामीं पंतांचा उत्तम सराव झाल्यावर च या ग्रंथाची रचना झाली असल्यामुळें "हरिवंशांतील आर्यारचना आर्याभारताच्या च तोलाची आहे" असें रा. भिडे यानीं

म्हटलें आहे तें कांहीं अयथार्थ नाहीं. आपल्या वयाच्या सुमारे २५ व्या वर्षीं पंत कविता करूं लागले. त्या कामीं त्यांनीं १५।१६ वर्षे घालविल्यानंतर त्यांनीं आर्याभारताची रचना केली. त्या वेळीं पंताची कविताकन्या यौवनसंपन्न, सर्वालंकारयुक्त आणि संस्कृतवेषान्वित असल्यानें जशी दिवसेंदिवस अधिकाधिक युवजनमनोहारिणी दिसूं लागली, तशी जरी ती पुढें हरिवंशप्रसूतीच्या वेळीं दिसली नाहीं, तरी त्या वेळेच्या मानानें ती साधी परंतु अप्राकृत, प्रौढ पण मनोहर आणि 'साधु—रसिक—रंजन—प्रवण' बनली यांत शंका नाहीं

५. पंतकृत हरिवंशाचे पहिले आठ अध्याय केवळ वंशविस्तारवर्णनाचे आहेत. त्यांत जरी कवित्वप्रदर्शनास जागा नाहीं तरी ऐतिहासिक दृष्ट्या त्यांत पुष्कळ माहिती मिळण्याजोगी आहे. सूर्य—चंद्र—विस्तार आणि इक्ष्वाकु, त्रिशंकु, हरिश्चंद्र, गाधी, जमदग्नि, परशुराम, पुरूरवा, नहुष, ययाति, यदु, सहस्रार्जुन, सत्राजित, इत्यादि पुराणप्रसिद्ध पुरुषांची जन्मकथा या च भागांत असून, दुसऱ्या अध्यायांत पितरांची उत्पत्ति, माहात्म्य, गण व वंश याविषयीं बरी च हकीकत आलेली आहे. सातव्या अध्यायांत यादव—पांडव—वंशवर्णन आहे. दुसऱ्या अध्यायांतील ब्रह्मदत्त व चटका यांची कथा (७०—८९), अध्याय ५ यांतील १२ ते १८, व ७ व्या अध्यायांतील १५—१६ या आर्या, आठव्यांतील स्यमंतकोपाख्यान (५३—७७) व अक्रूरचरित्र (७८—१२०) हे भाग वाचनीय आहेत. नवव्यांत विष्णूचे दशावतार, और्वीमाया व काळनेमीवध या कथा असून, या अध्यायांतील फक्त ९ ते २० या आर्या च वाचून पाहिल्यास प्रत्येक अवतारकृत्य किती थोडक्यांत, सुलभ रीतीनें परंतु चटकदार लिहिलें आहे याची परीक्षा होईल. हा सर्व अध्याय आल्हादकारक आहे. दहाव्या अध्यायापासून श्रीकृष्णचरित्रास आरंभ झाला आहे. या ग्रंथाचा मुख्य हेतु कृष्णलीलावर्णनाचा असल्यानें जन्मापासूनचें सर्व कृष्णचरित्र यांत अखेर-

पर्यंत आणिलें आहे. अवतार-प्रयोजन, क्षत्रियरूपानें देवाचें पृथ्वीवर अवतरण, लवणासुरवध व मथुरानगरीची स्थापना, कंसाचा इतिहास, वसुदेव-देवकीकारागृहवास, देवकीगर्भनाश, राम-कृष्ण-जन्म, कृष्णाचें मथुरेस नंदगृहीं गमन, रामकृष्णाच्या बाळलीला, शकटासुरादिकांचा वध कालियामर्दन, रासक्रीडा, कृष्णनाशाविषयीं कंसाचे भगीरथ पण निष्फळ प्रयत्न व अखेर चाणूरादिकांसमवेत कंसवध, इतका इतिहास सतराव्या अध्यायाअखेर पुरा झाला आहे वर निर्दिष्ट केलेली या भागांतील काव्यरचना बऱ्या च श्रेष्ठ दर्जाची आहे. अठराव्या अध्यायापासून उत्तरकृष्णचरितास आरंभ झाला आहे. येथून बळराम व कृष्ण यांच्या मौंजिबंधना नंतरच्या सर्व लीलांचें वर्णन असून रुक्मिणीस्वयंवर, पारिजातकाख्यान, नरकासुर व निकुंभदैत्य यांचा वध, प्रद्युम्नविवाह, द्वारकानिवास, बाणासुराख्यान, अनिरुद्ध व उषा यांचा विवाह आणि हंसडिंभिकाख्यान इत्यादि भाविक लोकांच्या परिचयांतील कथा बऱ्या च विस्तृत वर्णिलेल्या आहेत. वरील सर्व कथानकें पंतांच्या नेहमींच्या कुशलतेनें लिहिलेलीं असल्यानें तीं फार मनोरंजक झालेलीं आहेत. अखेरच्या अध्यायांत त्रिपुरवधाची कथा ही वेदांतांतील सिद्धांताचें रूपक होय असें दाखवून ग्रंथसमाप्ति केली आहे

काव्यदृष्ट्या मूळग्रंथ किंवा पंतकृत त्याचें रूपांतर नीरस आहे असें वर लिहिलें आहे, त्यावरून ग्रंथ टाकाऊ आहे असें समजण्याचें नसून, आर्याभारताशीं तुलना केल्यास सहृदय वाचकास चटका लावून सोडण्यासारखी कविप्रतिभा त्यांत वारंवार दृग्गोचर होत नाहीं, एवढें च सांगण्याचा उद्देश आहे. पंतांनीं पदरचें कांहीं घालून त्यास विशेष सरसत्व आणिलेलें नाहीं. बाकी आर्यारचना व्याकरणादिदृष्ट्या बहुधा निर्दोष आहे.

८. पंतांच्या काव्याविषयीं अनुकूल प्रतिकूल मतांची छाननी कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं आपल्या निबंधमालेंत "मोरोपंताची कविता" या निबंधांत इतक्या उत्कृष्ट प्रकारें केली आहे कीं, त्या निबंधाच्या वाचनानें कोण-

त्या हि प्रकारच्या पूर्वग्रहाचा पूर्ण निरास होऊन पंताविषयीं आदर व त्यांच्या कवितेबद्दल भक्ति खात्रीनें उत्पन्न होईल, आणि पंताची कविता, निदान त्यांतील बरा च भाग वाचण्याची उत्सुकता उत्पन्न होऊन, ती पूर्ण करण्यांत घालविलेला आयुष्यांतील कांहीं काळ फार उपयुक्त प्रकारें खर्च झाला असें च प्रत्येकास वाटेल. हा निबंध ३०।३५ वर्षांपूर्वी लिहिण्यांत आला त्याच्या योगें व तत्पूर्वी प्रसिद्ध झालेल्या कै. बा. म. हंस यांच्या पंतावरील निबंधामुळें सुशिक्षित मंडळीचें लक्ष्य पंतकाव्याकडे लागलें असून त्याचा आस्वाद आज तीन पिढ्या लोक घेत आहेत, पंताची बहुतेक सर्व कविता हल्लीं छापून प्रसिद्ध झाली आहे; पण पूर्वोक्त निबंधांतील अभिप्राय बरोबर नाहींत असें म्हणण्याचें धाडस कोणी हि करीत नाहीं, इतकें च नव्हे तर, सुशिक्षितांत पंताविषयींचा आदर दिवसानुदिवस वाढत च चालला आहे. तेव्हां निदान सदरचे निबंध वाचण्याविषयीं मराठी भाषेच्या व काव्याच्या प्रत्येक अभिमान्यास आमची आग्रहपूर्वक विनंति आहे बाकी ज्यांस अधिक फुरसत असेल त्यांनीं रा. पांगारकर यांनीं लिहिलेलें पंताचें विस्तृत व रसाळ चरित्र अवश्य वाचावें. काव्यसंग्रहकारांनी प्रसिद्ध केलेल्या मोरोपंती काव्याच्या अनेक खंडांत जे प्रास्ताविक लेख लिहिले आहेत त्यांत हि महाराष्ट्रकवींत पंताची योग्यता केवढी आहे हें साधार दाखविलें आहे. वर निर्दिष्ट केलेल्या सर्व लेखांत पंताच्या काव्याचे गुण व दोष यांचें अगदीं निर्भीड रीतीनें विवेचन केलेलें आहे. रा. पांगारकरांच्या ग्रंथांत पंताविषयींच्या त्यांच्या भक्तीमुळें जरी क्वचित् ठिकाणीं झालेली तरफदारी अयथार्थ वाटली, तरी एकंदरीनें सदरहू चरित्रग्रंथ बरा च काळजी-पूर्वक लिहिलेला असून तो पंताच्या काव्याकडे अनेकांचें मन वळवील व रा. पांगारकरांच्या शिफारसीवरून जे कोणी पंताचें आर्याभारत, केका-वली, स्फुट काव्यें वगैरे वाचतील त्यांस आपल्या हातीं आनंदाचें एक सुंदर भांडार लागलें असें च वाटेल. वरील लेखांतून अवतरणें देऊन पंतकाव्याच्या

गुणदोषाची चिकित्सा येथें करीत बसणें म्हणजे निव्वळ चर्वितचर्वण होय. व सदरची चिकित्सा परिपूर्ण झालेली असल्यानें तींत आतां नवीन भर घालण्यासारखें हि कांहीं उरलेलें नाहीं. म्हणून वरील चरित्र व निबंध सर्वांनीं अवश्य वाचावे अशी पुन. एकदा विनति करून व प्रस्तुत पुस्तकांतील कांहीं विशेष गोष्टी वाचकासमोर मांडून आटोपतें घ्यावें हें बरें !

७. संस्कृतप्राकृतमिश्रित' मोठमोठ्या समासांनीं भरलेली व क्लिष्ट आणि श्लेषयुक्त अशी पंताची काव्यरचना बहुधा असते असा जो एक आरोप पंतकाव्यावर नेहमीं करण्यात येतो, तो किती खोटा आहे हें हा हरिवंश ग्रंथ वाचून कोणाच्या हि लक्ष्यांत येईल. एकंदर ५४४५ आर्यांत निर्णयसागरी प्रतीच्या टीपांच्या सहाय्यानें वाचतां वाचतां सहज न समजणाऱ्या अशा आर्या आम्हांस पन्नासावर आढळल्या नाहींत. थोडा-बहुत विचार केल्यावर यांपैकीं बऱ्या च मार्गाहून लागल्या. समाधानकारक न लागलेल्या आर्यांची संख्या ५ वर कांहीं अखेरपर्यंत गेली नाहीं. काव्य-संग्रहकारांनीं पुष्कळ मेहनत घेऊन ग्रंथ सुलभ केला नसता, तर सदरची संख्या चौपट झाली असती असें गृहीत धरलें तरी, सरासरीनें पंचवीस आर्यांत एक सरासरी कठीण व अडीचशें आर्यांत एक बरी च कठीण हें प्रमाण काव्यकाठिण्याचें कीं त्याच्या सुलभतेचें ? वरती सांगितलेल्या कठीण आर्यां-पैकीं कांहींचें टिपण खालीं दिलें आहे:—

| अनुक्रमांक | अध्याय | आर्या | अर्ध | ज्यामुळें आर्या समजण्यास कठीण झाली तो शब्द. |
|---|---|---|---|---|
| १ | ५ | २४ | उ. | |
| २ | ७ | ६१ | पू. | पात्रें |
| ३ | ७ | ७१ | उ. | वींचें ( वेंचे ). |
| ४ | १५ | २४ | पू. | खिंगें |
| ५ | ३१ | ५४ | उ. | थाक रवें |
| ६ | ३४ | ३५ | पू, | अंगुष्ठोदर......यव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | ३६ | ६२ | पू. | पहाड ( सला ). |
| ८ | ३६ | १०२ | उ. | वरवा. |
| ९ | ३७ | ३४ | उ. | निजा शाला हे. |
| १० | ४१ | १९ | पू. | हुला. |
| ११ | ४१ | १३६ | पू. उ. | ( पडुनि ) गळाठाकसीसमरसिकता. |
| १२ | ४१ | १५० | उ. | त्या मुनि मानी बाणा, इ० |
| १३ | ४४ | ३९ | पू उ | ख्वस असा अश्व काय मारित रे  यमारि तरे. |
| १४ | ४८ | १०४ | पू उ. | नदीपवनें. |
| १५ | ४८ | ३०३ | उ. | ज्याला=जीवत राहिला. |
| १६ | ५० | ९१ | पू. | देवकानरा. |
| १७ | ५२ | १४२ | उ. | गुरुच्छळ वी. |
| १८ | ५३ | ३० | उ. | भव दवना. |

कठीण आर्यांची ही यादी बहुतेक पूर्ण आहे. या यादींतील २–३–४–५–७–८–१०,१५ हीं स्थळें फक्त एकेका अपरिचित शब्दामुळें अवघड वाटलीं. न० १, ११ १६, १७ हीं निर्णयसागरी प्रतींत शब्द बरोबर न तोडिल्यानें अगर विरामचिन्हें बरोबर न दाखविल्यानें दुर्बोध झालीं होतीं. बाकीचीं स्थळें मात्र खरोखर दुर्बोध असल्यानें त्याचा अर्थ लावण्यास पुष्कळ खटपट पडली. न. १३ व १८ या आर्यांबद्दल अद्याप समाधान वाटत नाहीं. बाकीच्या आर्यांचा जो अर्थ टीपांत दिला आहे तो वाचकांनीं पाहून अभिप्राय कळविल्यास उपकार होतील वरील सर्व स्थळें हल्लींच्या आवृत्तींत अर्थद्योतक टीपांच्या मदतीनें पाहण्यात आल्यास दुर्बोध स्थळाचें अल्पप्रमाण प्रत्ययास येईल काठिण्याचा दोष अजिबाद उडविण्याचा आमचा मुळीं च हेतु नाहीं, तथापि तो दोष जितक्या तीव्र प्रमाणात लादला जातो तितक्या प्रमाणात तो लादणें किती वाजवी होईल हें सप्रमाण दाखविण्याचा आमचा हेतु आहे.

केसरी, विविधज्ञानविस्तार वगैरेंची भाषा ज्यास बरोबर समजते अशा कोणत्या हि महाराष्ट्रीयास पताची कविता कळण्यास मुळीं च कठीण नाहीं. त्याच्या कोठल्या हि शेंदीडशें आर्या काळजीपूर्वक वाचणारास तर पुढें अखेरपर्यंत अवघड असें विशेष काहीं च आढळणार नाहीं. पताच्या कित्येक काव्यात काहीं ठिकाणीं आढळून येणारा क्लिष्टपणा किंवा दुर्बोधत्व हरिवशात अत्यल्प प्रमाणात आहे. कोणतें हि पृष्ठ उघडून पाहिल्यास त्यातील सुलभपणा सर्वत्र दिसून येईल. या ग्रथाची भाषा साधी, सुदर, प्रौढ, अलकारयुक्त व नेटनेटकी अशी च आहे. पताची भाषा नेहमीं सस्कृत पद्धतीच्या वळणावर असते, तद्वत् येथें हि ती गेली आहे, परतु सस्कृत शब्दाचा किंवा मोठमोठ्या समासाचा भरणा या ग्रथात अगदी कमी आहे. ठिकठिकाणीं मनोहर दृष्टात, लोकोक्ति, पात्रानुरूप भाषणे, अर्थान्तरन्यास याही ती नटविलेली आहे. बोधकारक वचनानीं तर सर्व काव्य ओथबलेलें दृष्टीस पडते. शृगार, वीर व भक्ति या रसाचा उत्तम विकास या काव्यात झाला आहे. तात्पर्य, परिणत वयात लिहिलेला हा ग्रथ अनेक कारणानी एकदरींत चागला उतरला आहे, असें सामान्य वाचकास सुद्धा वाटेल असे आम्हास वाटते.

८. पतानीं स्वत काहीं ठिकाणीं अर्थद्योतक टीपा लिहिल्यानें किती मदत झाली आहे याबद्दल फक्त एक च उदाहरण देतों. बाराव्या अध्यातील ८४ वी आर्या पहा. या आर्येचा उत्तरार्ध काव्यसग्रहात,

पूर्ण, न जसा सुधाकर कविवाचा हीन काय गातात ?

असा छापला आहे, आणि “ कविवाचा=कवीच्या वाणी, हीन=नीचाला, हलकटाला, हें गातात याचें कर्म ’ अशा त्यावर टीपा दिल्या आहेत. यावरून काहीं च अर्थ होत नाहीं, किंवा काहीं तरी ओढाताणाने केल्यास तो समाधानकारक होत नाहीं हे सहज लक्ष्यात येईल. प्रस्तुत पुस्तकात या आर्येचा दिलेला अर्थ कसा समर्पक आहे हे हि तो पाहिल्यास ध्यानीं येईल. सदरची

आर्या बरोबर लागण्यास पतानीं सदर ठिकाणीं दिलेली "परपोषणें क्षीण होता यश चि होतें" ही टीप च सर्वांशी कारण झाली, आणि तिच्या धोरणानें या आर्यार्धाचीं विरामचिन्हें हि बरोबर दाखविता आलीं. ह्याप्रमाणें पताच्या टीपा अनेक ठिकाणीं अर्थबोध करण्यास सहाय्यभूत झाल्या आहेत.

त्याप्रमाणें च समानाक्षरीं यमकें पंतानीं अवश्य त्या ठिकाणीं शब्द वेगळाले तोडून दाखविल्याने अर्थबोध होण्यास फार सुलभ झाले आहे. निर्णयसागरी प्रत व हल्लींची प्रत ताडून पाहिल्यास अशीं स्थळें पुष्कळ च आढळतील. येथें फक्त ४।५ उदाहरणें देतो:—

| अध्याय | आर्या | निर्णयसागरी पाठ | हस्तलेखपाठ |
| --- | --- | --- | --- |
| ३. | ६३ | या हृदयीं हास्य सलतसें रुततें. | या हृदयीं हास्य सल तसें रुततें. |
| ५. | २४. | देहा दे श्रुतितत्क्षण, हरुनि, | देहा दे श्रुति तत्क्षण, इ०. |
| ८ | २१. | जीमूत. | जी मूत. |
| ८ | ११२. | अक्रूर क्षितिराष्ट्रक्षेम | अक्रूरस्थिति राष्ट्रक्षेम. |
| ११. | २३ | राहु तरे वा तीरीं. | राहुत रेवातीरीं. |

विरामचिन्हें देण्यात हल्लींची हस्तलिखित प्रत फार उपयुक्त झाली हें दाखविण्यास २।३ च उदाहरणें देतों:—

| अध्याय | आर्या | निर्णयसागरी प्रत | हस्तलिखित प्रत. |
| --- | --- | --- | --- |
| १. | ३९. | अभिषेचिला वसिष्ठें गेला, स्वर्गासि. | अभिषेचिला वसिष्ठें, गेला |
| २७. | १२९. | कवि रोधी मन का, जरि परमपुरुष निजसुखीं च न विरो, धी ? | कवि रोधी मन, का जरि परम-पुरुष निजसुखीं च न विरोधी? |
| ४८. | १०८. | नदीप वनें. | न दीप वनें. |

कच्च्या खर्ड्यावरून पक्की प्रत उतरल्यानंतर पतानीं काहीं ठिकाणीं नवीन आर्या, कित्येक ठिकाणीं नवीन सरस पाठ वगैरे घातले आहेत ते पुढें काहीं दिवसानीं दुसऱ्या वाचनाच्या वेळीं घातलेले असावेत, उ०, अध्याय

४९ यातील ६० व ६१ ह्या आर्या पूर्वींच्या प्रसिद्ध झालेल्या कोणत्या हि प्रतींत नाहींत. हस्तलिखित प्रतींत हि त्या मागाहून समासांत लिहून पुढील आर्यांचा अनुक्रमांक बदललेला आहे. अशीं आणखी बरीं च उदाहरणें देता येतील यावरून आपलीं काव्यें पुनःपुनः वाचून तीं सुधारण्याचा प्रयत्न पंत करीत असत असें स्पष्ट होतें. पंताची कविता लिहून तयार होता च तिजवरून त्याचे भक्त प्रती करून घेत, त्यांस मागाहून केलेली दुरुस्ती न समजल्यानें त्याच्या प्रती तशा च राहिलेल्या असाव्यात.

उपरिनिर्दिष्ट सर्व दोष हल्लींच्या आवृत्तीमुळें दूर झाले आहेत, म्हणून ही आवृत्ति काढण्यांत रा. पराडकर यांचे महाराष्ट्रभाषेच्या व काव्याच्या भक्तांवर बहुत उपकार झाले आहेत.

शुद्धलेखनाच्या हल्लींच्या पद्धतीप्रमाणें शब्दांचीं रूपें येऊन हि कांहीं कांहीं ठिकाणीं तीं कशीं भिन्न आढळून येतात हें खालील उदाहरणावरून कळून येईल.

| | | |
|---|---|---|
| जाऊन, घेऊन, | वगैरेबद्दल | जावून, घेवून, वगैरे. |
| मोठा, वडिल, | ,, | मोटा, वढिल, ,, |
| राजाला, आजाला, | ,, | राज्याला, आज्याला, ,, |
| झाला, शिरला, शिवेना, | ,, | जाला, सिरला, सिवेना, ,, |
| घेईल, नेईल, | ,, | घेयिल नेयिल, ,, |
| चार (४) जरि, तरि | ,, | च्यार (४) जन्हि तन्हि, ,, |

शिवाय यमकाच्या सोईसाठीं शबद्दल स, छबद्दल स, असले किरकोळ पण सहज कळण्यासारखे फेरफार केलेले आढळतात. पण असलीं किरकोळ स्थळ वजा केलीं म्हणजे व्याकरण, वाक्यरचना वगैरेसंबंधानें पंताच्या भाषेचें स्वरूप सर्वत्र अत्यंत शुद्ध आढळतें. त्यांची भाषा दरोबस्त भारदस्त आहे. नाहीं म्हणायला अध्याय ७, आर्या ७५।७६ येथील वर्णन अश्लील आहे. मूळ संस्कृतांत सदरचें वर्णन असें आहे:—

" कन्या त्रिगर्तराजस्य भर्ता वै शैशिरायणः ।
जिज्ञासां पौरुषे चक्रे न च स्कंदेऽथ पौरुषम् ॥ "

या त्रोटक वर्णनावर टीकाकारानें पौराणिक इतिहास बरोबर समजावा या हतून,

" त्रिगर्तराजस्य देवकस्य कन्या वृकदेवीति पूर्वेणान्वयः । तस्यैव त्रिगर्तराजस्य भर्ता पुरोहितः शैशिरायणो गार्ग्यः तदीयः शालो यादवपक्षीय. पुरोहितः कश्चित्तस्य पौरुषमस्ति न वेति जिज्ञासा परीक्षां चक्रे हस्तेन लिंगमभिमृष्टवान् । अथ अनतर गार्ग्यस्य पौरुष रेतो न चस्कंद दृढव्रतत्वात् तस्यानुत्थानात् । उत्थाने हि किंचिदपि रेतः स्कंदेदेव ततो गार्ग्यो नपुंसक इति शालनोक्त इत्यर्थः । यथोक्तं विष्णुपुराणे ' गार्ग्यं गोष्ठ्यां द्विजं शालः षढ इत्युक्तवान्यदा । यदूनां सन्निधौ सर्वे जहसुर्यादवास्तदा ' इति ।"

यावरून टीकाकारानें मूळाचा अर्थबोध होण्याकरिता जो इतिहास दिला आहे तो च पंतानीं रूपांतरात आणिला आहे असे होतें. पंतानीं मूळात आपल्या पदरचें कांहीं घातलेले नाहीं असें जें वर आम्हीं म्हटलें आहे, त्याचा अर्थ हि टीकाकारानें मूळ ग्रंथाच्या अर्थबोधाकरिता जी कांहीं अवांतर माहिती दिली आहे तिच्याबाहेर पंत फारसे गेलेले नाहींत, इतका च समजण्याचा आहे. अश्लील किंवा ग्राम्य शब्दाचा व दृष्टांताचा उपयोग कोठें कोठें पंतानी बिनदिक्कत केला आहे, उदाहरणार्थ, अ० ७, आर्या २० आणि अ० ४०, आर्या ४२ पहा. आठव्या अध्यायांतील १०७ व्या आर्येच्या उत्तरार्धांतील ' अर्थिमनीं ऐसा न जयंतजनक तोख रची ' या शब्दांनीं केवळ बह्वक्षरी यमक साधण्याकरिता च इंद्राला औदार्याचें प्रशंसापत्र मिळालेलें दिसतें. अ. १७ आ. १८ व अ. १९ आ. ८३ याचे उत्तरार्धं पाहिले म्हणजे हि केवळ यमकाकरितां गचाळ उपमा योजिलेल्या दिसतात. अशीं आणखी हि कांहीं ठिकाणें दाखविता येतील. तसें च पंताचीं कांहीं ठरींव यमकें वारंवार आगंतुकी करितांना पाहून त्यांच्या लोंचटपणाबद्दल

जवळ जवळ तिरस्कार वाटू लागतो. अनेकाक्षरी यमकाचा इतका फाजील सोस पतांस नसता तर त्याच्या काव्यांत मधूनमधून नजरेस पडणारे असले अप्रयोजक प्रकार बरेच कमी झाले असते, असो.

९. पाचव्या कलमांत प्रस्तुत ग्रथातील वाचनीय स्थळें थोडक्यात नमूद केलीं आहेत. ग्रथाचा उत्तरार्ध सर्व च चागला साधला आहे. तथापि अगदीं आरभापासून प्रत्येक अध्यायांतील मला रमणीय वाटलीं तीं स्थळें खालीं निर्दिष्ट केलीं आहेत. ही निवड अमुक एका गुणासबधानें केलेली नाहीं. कथातसौंदर्य रसाचा विकास, वर्णनाचा साधेपणा, बहारीच्या उपमा, अनुप्रास आणि यमकें याचें रचनाकौशल्य, हितोपदेश, पात्र व प्रसग यास अनुरूप भाषणें, स्वभावनिदर्शन, इत्यादि विविध गुणामुळें रसिकास हीं स्थळें हृदयगम वाटतील अशी उमेद आहे. यादी थोडी विस्तृत वाटेल, तथापि ज्यास सबध ग्रथ किंवा नुसता उत्तरार्ध सुद्धां वाचण्यास फुरसत नसेल त्यास सदरची निवड अनाठायीं वाटणार नाहीं, व पाहिजे असल्यास हीं स्थळें प्रथम पाहून मग सबध ग्रथ वाचावा अगर न वाचावा हें ठरविण्यास त्यास सोईचें होईल, आणि अशीं सर्व स्थळें मिळून ग्रथाचा ⅕ भाग होत असल्यानें तीं वाचण्यात घालविलेला वेळ किंवा श्रम वाया गेल्याचा दोष हि देण्यचें कारण पडणार नाहीं.

| अध्याय. | आर्या. | एकूण. |
|---|---|---|
| २. | ८-१०,४८,७६,८१,८९; | ७ |
| ३. | ६२-६४,८२; | ४ |
| ५. | ११-१८, | ८ |
| ७. | १५-१६,८६; | ३ |
| ८. | ७०,१०२,१०५; | ३ |
| ९. | ४०-४५,६२-६८,८५-८६,१२०, | |
| | १४०-१४७,१६७; | २५ |

| | | |
|---|---|---|
| १०. | २९,३७; | २ |
| ११. | ३,११-२५,२८-३०, | १९ |
| १२. | ६४-७३,८४; | ११ |
| १३. | ९,१७,२१-३९,६१-६३,७७-८६; | ३४ |
| १४. | ११,७०-७८; | १० |
| १५. | ५,१३-१८,३०,३३-५१,६३,९६; | २९ |
| १६. | ९६-१०४; | ९ |
| १७. | ३,१७,३२-३७,४५-४६,५४-५७,७४-७५; | १६ |
| १८. | ९-१३; | ५ |
| १९. | १६-१८,३३,४२; | ५ |
| २०. | ३,४१-४२,६४-६६,७४-७७,८७,९०; | १२ |
| २१. | २४, | १ |
| २२. | २३-२४,३३-३४,३७-४१,४६-५५,६५-६६,७२, ८७-९२; | २८ |
| २३. | १०३-१०५; | ३ |
| २४. | ८९-९१, | ३ |
| २५. | ९,३८; | २ |
| २६. | २०-२४,२७-८०; | ५९ |
| २७. | २,३१-३२,५५-६९,७८-१२०,१२३ १३०, | ६४ |
| ३०. | ७४,८५-९८; | १५ |
| ३१. | २-४, ८, ५३; | ५ |
| ३३. | ५१ | १ |
| ३५. | ३६-४४,५२-५३,५९-८०, | ३३ |
| ३६. | ३-४,१६-१८,३९-८४,८७-८८,९४-१०५, | ६५ |
| ३७. | ६२-७१, | १० |

| | | |
|---|---|---|
| ३८. | २८-१०७; हा सर्व अध्याय सोप्या भाषेचा उत्तम मासला आहे. | ८० |
| ४०. | २५-३१,४६-५१, | १३ |
| ४१. | ४८-५८,६२-६८,७८-८१,८३-८६,९९-१०६, १०१-१२९,१३६,१३८-१६४; | ८१ |
| ४२. | ४-८,२३-२५,११३, | ९ |
| ४३. | ५-११ १९-७२,९०,१०६,१११-११६; | ६९ |
| ४५. | २८,३०; | २ |
| ४७. | ६-१२,४८,५७-६१,६६-७३; | २१ |
| ४८. | १०५,११७,१३४-१४४,१४७,१६२,१८०, १८२,१९४-१९५,२१८,२२८,२३२,२४५, २४७,२५०,२६३,२६६-३०१,३३३-३५९, | ८९ |
| ४९. | ४-७,३४,७०-७२,७७-८२,१०२-१४५; | ५८ |
| ५०. | ३-११,४६-५२,५६-६४,८१-८७; | ३२ |
| ५१. | ३०-३४,७९-८८,१२३,१५२-१५८,१७६; | २४ |
| ५२. | ३५-३८,७२-७८,९८-१०९,१५७-१६०,१७४; | २७ |
| ५३. | १-११,३१; | १२ |
| ५४. | १-६४. वेदांतशास्त्राचा अभ्यास करणारांस हा अध्याय थोडक्यात उपयुक्त माहिती देणारा आहे. | ६४ |

एकूण बेरीज १०७२.

१०. मोरोपंती हरिवंश हा ग्रंथ वाचण्याचा प्रसंग रा० पराडकर यानीं हें काम माझ्या गळ्यांत बांधिलें नसतें तर कदाचित् मला मुळीं च आला नसता; कारण, या ग्रंथाची विशेष तारीफ कोणी केलेली नव्हती, आणि वाचण्यास सुरवात केली तेव्हां आरंभींचा भाग कंटाळवाणा वाट-

त्यानें पहिल्या अध्यायाच्या पुढें बरे च दिवस मजल हि गेली नाहीं; म्हणून, पूर्वीची मुळीं च ओळख नसतां माझ्यासारख्याकडे हें काम देण्यात आलें, तेव्हा हें पुस्तक वाचण्याचें वगैरे काम रा. पराडकर यांच्या अनेक विद्वान् साह्यकाऱ्यांत कोणी पत्करीना असें मला वाटलें. तथापि अगदीं निरुत्साहानें पत्करलेलें हें काम पुढें पुढें आनंददायक च होत गेलें, आणि मिळालेल्या आनंदाच्या मोबदल्यानें श्रमसाफल्य झालें, याबद्दल रा. पराडकर यांचा मी फार आभारी आहें. काव्यसंग्रहकारानीं टीपा वगैरे देण्यात केलेले परिश्रम अमूल्य आहेत. त्यांच्या श्रमाचा लाभ हल्लींची आवृत्ति तयार करितांना परोपरीनें झाला, ही गोष्ट स्पष्ट नमूद करून न ठेविल्यास कृतघ्नत्व पदरीं येईल.

कोल्हापूर
कपिलतीर्थ. }

गोविंद सखाराम सरदेसाई,
मावळकर.

# पंतलिखित हरिवंशांतील परलिखित आर्या

आर्याभारताप्रमाणें च हरिवंशांतील हि काहीं कांहीं संपूर्ण व अर्धवट आर्यांच्या पंतलिखितत्वासंबंधानें दृढ संशय आहे. आर्याभारतांतील परलिखित आर्यांना पोथीच्या सहाव्या पत्रापासून सुरुवात झाली असल्याचें त्याची जी छापील प्रतिमा त्यास जोडली आहे तीवरून उघड होत आहे. हरिवंशांतील परहस्ताक्षराला पोथीच्या ८२ व्या पत्राच्या दुसऱ्या पृष्ठाच्या आरंभीं उत्तरार्धाच्या तुटक चरणापासून प्रारंभ झाला असून, अशा आर्या हरिवंशांत किती व कोणत्या आहेत हें पुढील टाचणावरून कळून येईल:—**संपादक.**

**अध्याय २६ वा.** १६ उ० 'तें'पासून पुढें.

**अध्याय २८ वा.** १२० व १२१ (संशयित).

**अध्याय ३० वा** १० व ११.

**अध्याय ३५ वा.** ३७, ३८ व ३९

**अध्याय ३६ वा.** १८ (पूर्वार्धांतील पहिले दोन व उत्तरार्धांतील शेवटचा असे तीन 'ण' देवनागरी 'ण'); ५६ व ५७ ( अ' देवनागरी 'अ').

**अध्याय ३७ वा.** २२ व २३ (संशयित).

**अध्याय ३८ वा.** ४ ते ८

**अध्याय ४१ वा.** २६ ते २९. (२६ व्या आर्येंत पूर्वार्ध "धान जा त्यातें" पासून), ९० व ९१; ९५ (संशयित. लिहितांना हस्तकंपन फार झालें आहे).

**अध्याय ४७ वा.** ११ व १२ (संशयित).

**अध्याय ४८ वा.** ८९ ते ९१ ('अ' व ण देवनागरी.); १७० ते १७३, २१७ ते २१९, २८९ व २९०, ३१९ ते ३२१.

**अध्याय ४९ वा.** ४९ ते ५३ ('अ' 'ण' देवनागरी 'ण). ९२ ते ९४ ('ण' देवनागरी 'द्व' चें वळण अरूढ पण शुद्ध व प्रेक्षणीय). १०१ व १०२ ('अ' 'ण' देवनागरी; 'द' चे वळण कांहींसें 'द्व' सारखें);

११२ ते ११५; १२५ ते १२८ ('अ' देवनागरी); १३७ ते १४७ (फक्त १४६ व्या आर्यैतील 'अ' चालू; 'द्ध' वळण पूर्वोक्त).

**अध्याय ५० वा.** ७२ व ७३ ('अ' देवनागरी), ८० ते ८२ ('अ' 'ण' देवनागरी).

**अध्याय ५१ वा.** ३५ ते ४४ ('अ' व 'द्ध' वळण पूर्वोक्त), १०० ते १०६ ('अ' पूर्वोक्त). १४९ ते १५२ व १६७ ते १७१ ('अ' व 'द्ध' पूर्वोक्त), १८१ ते १८४ ('द्ध' पूर्वोक्त); १९१ ते १९५ ('अ' पूर्वोक्त), १९९ ('ण' व 'त्क' देवनागरी).

**अध्याय ५२ वा.** ३१ ते ३८; ६४ ते ६९ (शेवटल्या आर्यैत 'मुनिंद्र' असें अशुद्ध लिहिलें आहे); ८२, १३६ ते १३८ ('अ' पूर्वोक्त), १४४ ते १४६ ('अ' 'ण' 'द्ध' पूर्वोक्त), १५९, १६७ ते १७० ('अ' पूर्वोक्त व 'द्ध' चें वळण प्रेक्षणीय), १७७ ते १७९ ('अ' 'ण' वळण पूर्वोक्त; 'स्थ' चें वळण काहींसें 'स्छ'), २०० ते २०३ ('स्थ' 'अ' 'द्ध' वळण पूर्वोक्त), २१७ ते २१९; २२४ ते २२७ ('अ' 'द्ध' वळण पूर्वोक्त); २५८ व २५९, २८७ ते २९१ ('अ' नागरी, 'ह्रदीं' यांतील 'ह्' चें वळण '२ह्', 'द्र' चें वळण प्रेक्षणीय).

**अध्याय ५३ वा.** १८ (संशयित).

**अध्याय ५४ वा.** १९ ते २५ ('अ' 'ण' ठरीव)

एकूण हरिवंशाच्या ५४४६ * आर्यांपैकीं एकीचा काहीं भाग व १५७ संपूर्ण आर्या परलिखित आहेत.

---

* अध्याय २७ यांतील ३० व ३१ ह्या आर्यांची पुनरुक्ति पुढें त्याच अध्यायांत ७५ व ७६ ह्या ठिकाणीं झाली असल्यामुळें त्या वगळल्या तर संख्या ५४४४ होते. अर्थात् प्रस्तावनेंतील संख्या चुकली आहे.

# हरिवंश.

## विषयानुक्रमणिका.

**अध्याय १ ला ( पृष्ठांक १ ):**—प्रास्ताविक (१–९) –पांडुरंगराय (२) व मन्त्रभागवत ( ९ ) यांचा उल्लेख, इक्ष्वाकुवंशकथन ( १०–९३ ).

**अध्याय २ रा ( १२ ):**—जनमेजयाचे प्रश्नावरून वैशंपायन त्यास मार्कंडेयानें भीष्मास व त्यानें युधिष्ठिरास 'पितर-माहात्म्य' सांगितलें तें सांगतो (१-३), धर्माचा भीष्मास 'श्राद्ध पूर्वज कोण काय' असा प्रश्न (४-५); शंतनूच्या वरानें स्वाधीनमृत्यु झालेला भीष्म ( ६-१० ) बापास पितृतत्त्व विचारितो व त्याचे सांगण्यावरून तें मार्कंडेयाला पुसतो ( ११-१५ ), मार्कंडेयास सनत्कुमाराचें दर्शन व ते त्यास 'पितृतत्त्व' सांगतात ( १६-२३ ); देव विधीचा अवमान करतात ( २४ ); त्यांच्या ज्ञानाचा लोप ( २५ ); त्यास पुत्रांकडून प्रायश्चित्त (२६-२७); पुत्र त्यांस 'पुत्र' म्हणतात व तें रास्त ठरतें ( २८-३२ ), सप्तपितर ( ३३-३४ ); वैराजकन्या मेना इच्या अपर्णादि कन्या ( ३५-४० ), अग्निष्वात्तराच्या कन्येस शाप व उःशाप (४१-४५); इतर पितराच्या कन्या (४६-५३), योगपरिच्युत सप्तभरद्वाजपुत्रांचा कथारंभ (५४-५७), ब्रह्मदत्तवंश (५८-६२), भीष्मकृत उग्रायुधवध (६३-६९); चंटका ब्रह्मदत्तपुत्र सर्वसेनाचे डोळे फोडते (७०-८१) व राजाची विनंति नाकारून हि जाते ( ८२-८९ ).

**अध्याय ३ रा ( २२ )**—सात योगभ्रष्ट भरद्वाजपुत्र कौशिकसुत होऊन गार्ग्य गुरूची गाय श्राद्धार्थ मारतात ( १-९ ), गुरूस खोटें सांगतात ( १० ); सात हि व्याध होतात ( ११-१३ ), मग मृग ( १४-१६ ) व नतर चक्रवाक पक्षी ( १७-१८ ) व तदनंतर हंस होतात ( १९-२० ), पितृवर्तीच्या मनात राजा व्हावें असें येतें व कविखसृम दोघे त्याचे अमात्य होण्यास तयार होतात ( २१-२४ ), याबद्दल बाकीचे चौघे हंस या तिघावर रागावतात व

त्यांस सुमना हंस शाप व उःशाप देतो ( २५-३० ); हंसाची योगासक्तता पाहून खजिल झालेला विभ्राज राजा अणुहास राज्य देऊन ( ३१-३५ ) आपण ' या हंसापैकीं कोणी तरी आपला जनक होवो ' अशा इच्छेनें तेथें तपतो ( ३६-३८ ); स्वतंत्र हंस अणुहाच्या पोटीं ब्रह्मदत्त नामानें येतो व त्यास सर्व प्राण्यांच्या भाषा येतात व राज्य मिळतें, दुसरे दोघे कंडरीक व पांचाल ब्रह्मदत्तसखे होतात ( ३९-४६ ), बाकीचे चौघे त्या च कांपिल्यपुरांत अधनश्रोत्रियकुळांत जन्मले व हिमाचलाकडे निघाले ( ४७-५१ ); शोकाकुल पित्याला एक महार्थ श्लोक देऊन ब्रह्मदत्तनृपतीला तो ऐकविला असतां तो कल्याण करील इत्यादि म्हणाले ( ५२-५७ ), मुंगीला हासणाऱ्या ब्रह्मदत्तावर रुसलेली त्याची पत्नी सन्नति इच्या सांत्वनार्थ तो विष्णूपासून वर मिळवितो ( ५८-६८ ); प्रातःकाळीं ब्रह्मदत्त थाटानें चालला असतां ' तरि तुमचें मन कसें नव्हे जागें ? ' अशी सूचना केलेले श्लोक ब्राह्मणानें त्यास ऐकविले ( ६९-७६ ) व तें ऐकून राजा कंडरीक पांचाळांसह मोह पावला ( ७७-७९ ) आणि नंतर त्यानें ब्राह्मणास धन दिलें ( ८०-८३ ); पुत्राला राज्य देऊन वनांत जाणाऱ्या राजाला ' पूर्वी मारलेली गाय ती च मी तुम्हाला जागें करण्याकरितां रुसल्यें होत्यें ' इत्यादि सन्नति म्हणाली ( ८४-८७ ), सर्व तरले ( ८८ ), उपसंहार ( ८९ ).

**अध्याय ४ था ( ३१ )**:—सोमवंशकथन ( १-४४ ).—जन्हुकथा ( ६-१० ); ऋचीककथा ( ११-१७ ), रजिकथा—त्यास इंद्रपदप्राप्ति ( १८-२५ ), रजिपुत्राचा कुतर्कशास्त्रानें नाश ( २६-२९ ), क्षत्रवृद्ध व अनेना आणि तद्वंशज ( ३०-३१ ), काशीपति दिवोदासाची कथा—निकुंभगणेशप्रेषण—ओसाड वाराणसींत शंकर राहतात ( ३२-४४ ).

**अध्याय ५ वा ( ३६ )**—वंशकथन—पुढें नहुषययातीपासून थेट जनमेजयापर्यंत ( १-६ ), ययातीची जरा यदु वगैरे घेत नाहींत ( ७-१० ); पूरु घेतो ( ११ ), ययाति विषयसेवन यथेष्ट करून मग तरून जातो ( १२-१९ ).

**अध्याय ६ वा ( ४४ )**:—वंशवर्णन तुर्वसूपासून प्रचेतासुचेतापर्यंत ( १-९ ).

**अध्याय ७ वा (४१)**—यदुवंशवर्णन (१-८७):—सहस्रार्जुनाची कथा, त्यास वसिष्ठशाप व मृत्यु (६-२१), श्वफल्क व गांदिनी याची कथा (२९-३७); गार्ग्यकथा-त्याचा उपहास (७३-७७), त्याचें तप, वरप्राप्ति, कालयवनाची उत्पत्ति व मथुरेवर स्वारी (७८-८७).

**अध्याय ८ वा (५४)**—वंशवर्णन पुढें चालू (१-१२०)—ज्यामघ-कथा (८-१७); सत्राजितास सूर्यापासून स्यमंतकमणिप्राप्ति (५२-५९); प्रसेनास मारून मणि नेणाऱ्या सिंहास मारणाऱ्या व मणि घेऊन गेलेल्या जांबवंताशीं आपल्यावर सत्राजितानें घातलेला आळ टाळण्याकरितां प्रभु युद्ध करतात व जांबवतीसह मणि आणून सत्राजितास परत देतात (६०-७४); सत्राजित सत्यभामा कृष्णास देतो (७५-७७), अक्रूर याबद्दल रागावून शतधन्व्याकडून सत्राजितास मारवून मणि आपण घेतो (७८-८१), भामेच्या आग्रहावरून कृष्ण गजपुराहून येऊन शतधन्व्यावर स्वारी करून त्यास पळवितो (८२-९४), त्यास मारतो पण मणि मिळत नाहीं (९५-९७), 'तूं वंचन करितोस' असें म्हणून रागावून बळराम मिथिलेस जातो (९८-१०३), दुर्योधनास शिकवून तेथें आनंदात राहतो (१०४-१०५), मणि चोरणारा अक्रूर काशींत त्या मण्यापासून मिळणाऱ्या सुवर्णाचे योगानें अनेक यज्ञ करतो (१०६-१०८), बळराम व अक्रूर परत येतात (१०९-११२), कृष्ण गोड बोलून भर सभेंत अक्रूराकडून मणि सर्वांस दाखवितो (११५-१२०).

**अध्याय ९ वा (६६)**:—वैशंपायन जनमेजयास ईश्वरावतार कथन करतात (१-३), पुष्करनाभ, यज्ञवराह, नारसिंह, वामन, दत्तात्रेय, जामदग्न्य यांचे अवतार (४९), रामावतार (१०-२०), कृष्ण, व्यास, काल्कि (२१-२३); तारकामयसंग्राम व श्रीविष्णुकृत उत्पातशमन (२४-३१); असुरांची पुनर्युद्धार्थ तयारी (३२-४३), देवांची तयारी (४४-५७), आशीर्वाद (५८); वाद्यघोष (५९), परस्परांचें तुमुल युद्ध (६०-६६); असुरप्रेरित और्वीमायाकथा (६७-९०)—और्वमुनीची ऊरूपासून पुत्रोत्पत्ति (६७-७४), त्या और्वाग्नीस ब्रह्मा सिंधूंत स्थापितो (७५-८२), हिरण्यकशिपु वंशपरंपरेनें और्वी माया प्राप्त करून घेतो (८३-९०); चंद्रसाह्याय्यानें

वरुण औवीं माया शमवितो (९१-९८); भयानें पुनः सोडिलेल्या मायांचा अग्नि व वायु नाश करितात ( ९९-१०८ ); काळनेमि सर्व इंद्रादि देवांचा पराभव करून त्यांचीं स्थानें पटकावतो ( १०९-१३६ ), वैष्णवपदलिप्सु काळनेमीचें विष्णूशीं भाषण ( १३७-१४५ ); श्री विष्णूचें प्रत्युत्तर ( १४६-१४९ ); गरुडास पाडून काळनेमीनें विष्णूचा पराभव केला ( १५०-१५६ ); सुर-मुनींची विष्णूस प्रार्थना (१५७-१५९); विष्णू विश्वाकार वाढतो ( १६०-१६३ ) व काळ नेमीचें शिर चक्रानें उडवितो (१६४-१६६ ), त्याचें कबंध पाडून इतर असुरांचा संहार श्रीविष्णूनीं केला ( १६७-१६९ ); विष्णूचा जयजयकार ( १७०-१७२ ); विधिविनतीवरून प्रभून सर्व यथापूर्व केलें ( १७३-१७६ ) व मग तो वैकुंठलोकीं समाधिसुखांत राहिला ( १७७-१८१ ).

**अध्याय १० वा ( ८४ )**:—देवकार्यार्थ महानिद्रात्याग करण्यास सुर-मुनि प्रभूस प्रार्थितात ( १-४ ), उठलेल्या प्रभूस विधि भूमिभार हरण्याचा धर्म्य उपाय विचारितो ( ५-१४ ), मेरुशिखरावरील सभेंत क्षमा विष्णूस सर्वे-तिहासपूर्वक भारहरणार्थ विनवित्ये ( १५-३८ ), 'आम्हीं हें कार्य करतों' म्हणणाऱ्या ( ३९-४० ) देवांस ब्रह्मदेव शांतनुकथा ( ४३-५८ ) सांगून दैत्य-दानवांशानीं धृतराष्ट्राच्या पोटीं व देवांनीं पंडूच्या पोटीं येऊन ( ५९-६४ ) सर्व पृथ्वीवरील राजांसह महाकलह माजवून भूभार हरावा असें सुचविलें ( ६५-६७ ); पृथ्वी परत गेल्यावर ( ६८ ) ब्रह्मदेवाचे सांगण्यावरून सर्व देव पांचालकुरुयदुवंशांत अवतरले (६९-७२); 'या सर्वांस उत्तम गति मिळो' अशी देवाची प्रार्थना ब्रह्मदेवानें केली ( ७३ ); प्रभु वसुदेवकुळीं अवतरले ( **७४** ).

**अध्याय ११ वा ( ९२ )**.—नारदाचें प्रभूशीं संभाषण ( १-४७ ):—लवणासुर रामास युद्धार्थ आह्वानितो ( ८-२५ ), दूतास रामाचें उत्तर—शत्रु-घ्नाकडून लवणाचा वध व मथुरापुरीस्थापना ( २६-३५ ); त्या मथुरेस कंसादि म्हणजे च पूर्वजन्मींचे कालनेम्यादिक असुर राज्य करतात ( ३६-४४ ), देवानीं "पूतना, कालीय, जरासंध, बाणासुर इत्यादि मला माहीत आहेत व म्हणून ब्रह्मदेव सुचवील तेथें मी अवतरेन" असें नारदास प्रत्युत्तर केलें ( ४५-५१ ); नंद व वसुदेव हे कश्यपाचे अंशावतार व देवकी—यशोदा ह्या आदितीच्या अंश

होत, तस्मात् प्रभूनीं तेथें च अवतार घ्यावा' अशी ब्रह्मदेवाची प्रार्थना (५४-६१); प्रभूनें मेरूच्या 'पार्वती' गुहेंत स्वतेज स्थापिलें (६२-६३); नारद कंसाला भेटून 'देवकीच्या पोटचा आठवा गर्भ तुझा काळ, करितां जप,' असा हितमंत्र सांगतात (६४-७४); मनात घाबरलेला कंस नारदाचे पश्चात् त्याचा उपहास करून गर्भनाशादि तयारीस लागतो (७५-८०).

**अध्याय १२ वा (१००)**:—कंसाची गर्भनाशार्थ दक्षता (१-४); प्रभूचें उपायचिंतन (५-७), काळनेमीचे सहा 'षड्गर्भ' सुत—त्यांस ब्रह्मदेवाचा अवध्यतावर (८-११), त्यांस आजा हिरण्यकशिपु 'बापाकडून मराल' असा शाप देतो (१२-१५); जळगर्भगृहात राहिलेल्या त्या सुतांचे प्राण प्रभूनें आकर्षिले (१६-१७); "या सहांस देवक्युदरीं घाल, सातवा शेष देवक्युदरांतून रोहिणीच्या पोटीं व आठवा मी देवक्युदरीं, माझ्या जरा मागून यशोदेच्या पोटीं तू जन्म घे व मग आपणां दोघांचा गर्भव्यत्यास करूं, कंस तुला मारील तेव्हां तूं आकाशांत निसटून जा, तुझी कीर्ति होईल, मी वेळ साधून कंसास मारीन" असें प्रभु स्वयोगनिद्रेस म्हणाले व ती गुप्त झाली (१८-३५), देवकीचे सहा गर्भ कंस मारतो (३६), सातवा गर्भ योगमाया रोहिण्युदरात घालते (३७-४१), आठव्या गर्भास कंस फार टपतो (४२-४३); यशोदेच्या पोटीं योगमाया व देवकीच्या पोटीं प्रभु जन्मले (४४-४८), देवादिकांचा आनंद (४९-५२), चतुर्भुज मूर्ति पाहून वसुदेवाची प्रार्थना (५३-५६), 'नंदगृहीं जाऊन गर्भव्यत्यास कर' म्हणून प्रभूनीं सांगितल्यावरून (५७-५८) वसुदेवानें हळू च तसें केलें (५९-६२), 'मुलगी झाली' असें कंसास कळविलें (६३), तीस मारावयास आलेल्या कंसाची देवकी मनधरणी करते (६४-६६), शिळेवर आपटतां च महामाया आकाशात उडाली (६७-६९), व 'दुष्टा! तुझें पाप लक्षात ठेवून तुझें उष्ण रक्त सेवीन' अशी कोपोक्ति वदून अदृश्य झाली (७०-७५); देवकी व कंस परस्परांचें सांत्वन करतात (७६-७९) वसुदेव नंदास भेटून त्यास श्रीकृष्णाला प्राणापलीकडे हि जपण्यास सांगतो (८०-८९); नंद परत घरीं येतो (९०-९१).

**अध्याय १३ वा (१०९)**—नंदानें थोरल्याचें 'संकर्षण' व धाकट्याचें 'कृष्ण' नांव ठेविलें (१-२), कृष्णबाळाच्या पायाच्या धक्क्यानें गाडा उल-

टला ( २-१० ); पूतनावध ( ११-२० ); रामकृष्णांच्या बाललीला ( २१-२५ ); यशोदेनें उखळाला बांधलेला कृष्ण उखळासहवर्तमान यमलार्जुनवृक्ष पाडून स्वस्थ खेळतो ( २६-३४ ); तें वृत्त कळून घाबरलेल्या नंदयशोदेचें समाधान ( ३५-३९ ); 'दामोदर' नावाचा अर्थ ( ४० ); घाबरलेले वृद्ध ( ४१ ), सात वर्षांच्या रामकृष्णाच्या लीला (४२-४८), 'हा घोष बरा नाहीं' म्हणून त्यात दोष उत्पन्न करण्यास बळरामाची कृष्ण अनुमति मागतो ( ४९-५२ ), सर्वत्र लांडग्याची भयंकर पीडा झाल्याकारणानें ( ५३-५६ ) सर्व गोप वृंदावनांत वसति करते झाले ( ५७ ); वृंदावनवर्णन ( ५८-६३ ), रामकृष्णसंभाषण ( ६४- ६ ); कालियामर्दन ( ६७-९१ ) —प्रभूची क्रीडा व मोह ( ६७-८४ ), रामाची प्रार्थना ( ८५-८८ ), कालियामर्दन ( ८९-९१ ); कालियाचा यमुनेतून हकालपट्टी व त्यास वरदान ( ९२-९६ ), श्रीकृष्णाचें तटावर पुनरागमन व गोपाचा परमानंद ( ९७-१०१ ).

**अध्याय १४ वा (११९)**:–बळरामानें तालवनांत धेनुकासुर मारिला ( १-९ ), गोपाळांत शिरून खेळणाऱ्या प्रलंबासुरास बळराम मारतो (१०-२८); म्हणून 'बलदेव' हें नांव मिळतें ( २९ ); इंद्रपूजा करणाऱ्या ( ३०-३४ ) गोपांस कृष्ण, गाई, ब्राह्मण व गोवर्धनपर्वत यांची च पूजा करण्यास सांगतो (३५-४५ ), त्याप्रमाणें गोवर्धनपूजा गोप करतात (४६-५४); गोवर्धन संतुष्ट होतो (५५), गोपगोपींसह कृष्ण गोवर्धनास नजबी घालतो ( ५६-५९ ), गोप-गोपींचा आनंदी आनंद ( ६०-६३ ), अंतस इंद्र मेघास सर्व नंदव्रज बुडविण्यास आज्ञा करतो ( ६४-७० ), अतिवृष्टि ( ७१-७४ ), बाहूवर गोवर्धन सात अहोरात्र उचलून कृष्णानीं गोपसंरक्षण व इंद्रगर्वहरण केलें ( ७५-८२ ); इंद्रानें शरण येऊन कृष्णाची क्षमा याचिली (८३-९१) व मग कृष्णास अभिषेक केला ( ९२-९५ ); 'तूं उपेंद्र माझा धाकटा बंधु' 'माझ्या मुलास–अर्जुनास–यश दे' इत्यादि प्रार्थना इंद्र कृष्णास करितो ( ९६-१०१ ); कृष्णानीं तसें आश्वासन दिल्यावर शंकारहित इंद्र परत गेला ( १०२-१०५ ).

**अध्याय १५ वा ( १२८ )**:–'एवढीं अद्भुत कर्मे करणारा तूं कोण' असा गोपांचा कृष्णास प्रश्न ( १-६ ), 'मी तुमच्यांतला च एक' असें कृष्णोत्तर

( ७-१० ) ऐकून गोप लज्जित होतात ( ११ ); रासक्रीडा ( १२-१९ ); बैलाचें रूप घेतलेल्या अरिष्टासुराचा कृष्ण वध करितो ( २०-२८ ); कंस सर्व आप्तेष्टांस जमवून त्यांसमक्ष वसुदेवाची बहुत निंदा करून त्यास कृतघ्न ठरविती ( २९-५१); 'कंसराज चापोत्सव करणार आहे, त्या प्रसंगा मल्लयुद्धार्थ रामकृष्णासह ये' अशी नंदास आज्ञा करण्यास कंस अक्रूरास सांगतो ( ५२-५८ ), वसुदेवनिंदेनें सज्जनांस वाईट वाटलें ( ५९-६० ); अक्रूर आज्ञा मान्य करून निघाला ( ६१ ), कंसाचा आजा कंक त्यास 'तूं कुलकलंक आहेस, आमचा प्रभू नव्हेस, तुझें मरण जवळ आलें आहे' इत्यादि क्रोधानें बोलला ( ६२ ७२ ); कंस उठून गेला व सभा मोडली ( ७३-७४); अक्रूर निघाला ( ७५-७६ ); अक्रूरापूर्वीं च कंसानें पाठविलेल्या अश्वरूपी केशिदैत्याचा कृष्णकृत वध ( ७७-८६ ), 'तुला केशव नाव देतों; महाभारतयुद्धादि तुझे चमत्कार पाहून गाईन' असें भगवतास विनवून नारद परत गेला ( ८७ ९७ ), कृष्णासह गोप परतले ( ९८ ).

**अध्याय १६ वा (१३७)** —अक्रूर रामकृष्णांस प्रेमानें भेटला ( १-७ ), नंदसभेंत कंसाची आज्ञा सर्वांस कळवून व वसुदेवदेवकीस दर्शन देऊन 'कंसनाश करा' असें अक्रूर प्रभूस म्हणाला ( ८-१८ ), सर्व निघाले ( १९-२१ ), यमुनाह्रदांत स्नान करणाऱ्या अक्रूरास शेषलोकीं रामकृष्णदर्शन घडलें व वर यावें तर तेथें हि ते दिसत (२२-३२); 'तुमच्या वांचून जगांत दुसरें काय आश्चर्य आहे?' असें कृष्णास उत्तर करून सायंकाळीं त्यास मथुरेस घेऊन आला ( ३३-३९ ), 'दुष्ट कंस वसुदेवास छळतो, त्याचा आधीं बंदोबस्त करा,' अशी अक्रूराची कृष्णरामांस प्रार्थना ( ४०-४२ ), अक्रूराचें अनुमोदन घेऊन पुरदर्शनार्थ निघालेल्या रामकृष्णानीं कंसाच्या वस्त्रें न देणाऱ्या दुष्ट परिटास मारून तीं उत्तम वस्त्रें धारण केलीं ( ४३ ४९ ), मागितल्यावरून हारतुरे देणाऱ्या श्रीदामा मालाकारावर भगवान् प्रसन्न झाले ( ५०-५२ ); कुब्जेवर कृपा ( ५३-५४ ); कंसाच्या धनुर्गृहांत जाऊन धनुष्य मोडिलें ( ५५-५६ ), हें वृत्त रक्षकांनीं कंसास कळविलें ( ५७ ५९ ), चिंतातुर कंस रंगकोण तपासून चाणूरमुष्टिकांस बोलाविती ( ६०-६५ ), त्याच्याकडून भुजयुद्धांत रामकृष्णांना मारण्याचा पण करविला ( ६६-६९ ), 'नारदानें सांगितलेलें गुह्य च खरें, तूं दारांत

टला ( ३-१० ); पूतनावध ( ११-२० ); रामकृष्णांच्या बाललीला ( २१-२५ ); यशोदेनें उखळाला बांधलेला कृष्ण उखळासहवर्तमान यमलार्जुनवृक्ष पाडून स्वस्थ खेळतो ( २६-३४ ), तें वृत्त कळून घाबरलेल्या नंदयशोदेचें समाधान ( ३५-३९ ); 'दामोदर' नांवाचा अर्थ ( ४० ); घाबरलेले वृद्ध ( ४१ ), सात वर्षांच्या रामकृष्णांच्या लीला (४२-४८); 'हा घोष बरा नाहीं' म्हणून त्यात दोष उत्पन्न करण्यास बळरामाची कृष्ण अनुमति मागतो ( ४९-५२ ), सर्वत्र लांडग्यांची भयंकर पीडा झाल्याकारणानें ( ५३-५६ ) सर्व गोप वृंदावनात वसति करते झाले ( ५७ ), वृंदावनवर्णन ( ५८-६३ ), रामकृष्णसंभाषण ( ६४-६६ ); कालियामर्दन ( ६७-९१ ) —प्रभूची क्रीडा व मोह ( ६७-८४ ), रामाची प्रार्थना ( ८५-८८ ); कालियामर्दन ( ८९-९१ ), कालियाचा यमुनेतून हकालपट्टी व त्यास वरदान ( ९२-९६ ), श्रीकृष्णाचें तटावर पुनरागमन व गोपाचा परमानंद ( ९७-१०१ ).

**अध्याय १४ वा ( ११९ ):**-बळरामाने तालवनात धेनुकासुर मारिला ( १-९ ), गोपाळात शिरून खेळणाऱ्या प्रलंबासुरास बळराम मारतो (१०-२८); म्हणून 'बलदेव' हे नांव मिळतें ( २९ ); इंद्रपूजा करणाऱ्या ( ३०-३४ ) गोपांस कृष्ण, गाई, ब्राह्मण व गोवर्धनपर्वत यांची च पूजा करण्यास सांगतो (३५-४५ ), त्याप्रमाणें गोवर्धनपूजा गोप करतात (४६-५४), गोवर्धन संतुष्ट होतो ( ५५ ), गोपगोपींसह कृष्ण गोवर्धनास प्रदक्षिणा घालतो ( ५६-५९ ), गोप-गोपींचा आनंदी आनंद ( ६०-६३ ); अंतस इंद्र मेघांस सर्व नंदव्रज बुडविण्यास आज्ञा करतो ( ६४-७० ), अतिवृष्टि ( ७१-७४ ); बाहूवर गोवर्धन सात अहोरात्र उचलून कृष्णानीं गोपसंरक्षण व इंद्रगर्वहरण केलें ( ७५-८२ ), इंद्रानें शरण येऊन कृष्णाची क्षमा याचिली (८३-९१) व मग कृष्णास अभिषेक केला ( ९२-९५ ); 'तू उपेंद्र माझा धाकटा बंधु' 'माझ्या मुलास—अर्जुनास—यश दे' इत्यादि प्रार्थना इंद्र कृष्णास करितो ( ९६-१०१ ), कृष्णानीं तसें आश्वासन दिल्यावर शंकारहित इंद्र परत गेला ( १०२-१०५ ).

**अध्याय १५ वा ( १२८ ):**—'एवढीं अद्भुत कर्मे करणारा तूं कोण' असा गोपांचा कृष्णास प्रश्न ( १-६ ), 'मी तुमच्यांतला च एक' असें कृष्णोत्तर

( ७ १० ) ऐकून गोप लज्जित होतात ( ११ ); रासक्रीडा ( १२-१९ ); बैलाचें रूप घेतलेल्या अरिष्टासुराचा कृष्ण वध करितो ( २०-२८ ); कंस सर्व आप्तेष्टांस जमवून त्यासमक्ष वसुदेवाची बहुत निंदा करून त्यास कृतघ्न ठरविता ( २९-५१); 'कंसराज चापोत्सव करणार आहे, त्या प्रसंगीं मल्लयुद्धार्थ रामकृष्णासह ये' अशी नंदास आज्ञा करण्यास कंस अक्रूरास सांगतो ( ५२-५८ ); वसुदेवनिंदेनें सज्जनास वाईट वाटलें ( ५९-६० ); अक्रूर आज्ञा मान्य करून निघाला ( ६१ ), कंसाचा आजा कंक त्यास 'तूं कुलकलंक आहेस, आमचा प्रभू नव्हेस, तुझें मरण जवळ आलें आहे' इत्यादि क्रोधानें बोलला ( ६२-७२ ); कंस उठून गेला व सभा मोडली ( ७३-७४); अक्रूर निघाला ( ७५-७६ ); अक्रूरापूर्वीं च कंसानें पाठविलेल्या अश्वरूपी केशि दैत्याचा कृष्णाकडून वध ( ७७-८६ ), 'तुला केशव नांव देतों, महाभारतयुद्धादि तुझे चमत्कार पाहून येईन' असें भगवतास विनवून नारद परत गेला ( ८७ ९७ ); कृष्णासह गोप परतले ( ९८ ).

**अध्याय १६ वा (१३७)**—अक्रूर रामकृष्णांस प्रेमानें भेटला ( १-७ ), नंदसभेंत कंसाची आज्ञा सर्वांस कळवून व वसुदेवदेवकीस दर्शन देऊन 'कंसनाश करा' असें अक्रूर प्रभूस म्हणाला ( ८-१८ ), सर्व निघाले ( १९-२१ ), यमुनाहृदांत स्नान करणाऱ्या अक्रूरास शेषलोकीं रामकृष्णदर्शन घडलें व वर यावें तर तेथें हि ते दिसत (२२-३२), 'तुमच्या वांचून जगांत दुसरें काय आश्चर्य आहे?' असें कृष्णास उत्तर करून सायंकाळीं त्यास मथुरेस घेऊन आला ( ३३-३९ ); 'दुष्ट कंस वसुदेवास छळतो, त्याचा आधीं बंदोबस्त करा,' अशी अक्रूराची कृष्णरामांस प्रार्थना ( ४०-४२ ), अक्रूराचें अनुमोदन घेऊन पुरदर्शनार्थ निघालेल्या रामकृष्णांनीं कंसाच्या वस्त्र न देणाऱ्या दुष्ट परिटास मारून तीं उत्तम वस्त्र धारण केलीं ( ४३ ४९ ), मागितल्यावरून हारतुरें देणाऱ्या श्रीदामा मालाकारावर भगवान् प्रसन्न झाले ( ५०-५२ ); कुब्जेवर कृपा ( ५३-५४ ), कंसाच्या धनुर्गृहांत जाऊन धनुष्य मोडिलें ( ५५-५६ ), हें वृत्त रक्षकांनीं कंसास कळविलें ( ५७ ५९ ), चिंतातुर कंस रंगकोण तपासून चाणूरमुष्टिकांस बोलाविता ( ६०-६५ ), त्यांच्याकडून भुजयुद्धांत रामकृष्णांना मारण्याचा पण करविला ( ६६-६९ ), 'नारदानें सांगितलेलें गुह्य च खरें, तूं दारांत

कुवलयापीड हत्तीला ठेवून रामकृष्णाना चिरडून टाक; मी सर्व यादवांचा नाश करणार ’ इत्यादि प्रकारें कंस महाताला बोलला (७०-७७), नारदकथित गुह्य महात विचारतो (७८-८०); ‘ देवकीच्या पोटीं विष्णु येऊन तुला मारणार, करिता तिचें गर्भ मारून टाक, ’ ‘ तू वास्तविक उग्रसेनाचा पुत्र नसून द्रुमिळासुराचा पुत्र आहेस ’ इत्यादि गोष्टी कंसास नारदानें सांगितल्या (८१-८६); “ उग्रसेनाचें रूप घेऊन क्रीडार्थ गेलेल्या तुझ्या मातेशीं द्रुमिळासुरानें व्यभिचार केला,” असें कंसप्रश्नास नारदाचें उत्तर (८७-९४), अंकित होऊन तुझी माता त्यास रडती झाली (९५-९६), ‘ अमानुषसंगानें पातिव्रत्यभंग होत नाहीं ’ ‘ तुझ्या पोटीं महाप्रतापी कंस येईल ’ असें द्रुमिळाचें उत्तर (९७-१०१); ‘ मत्पतिवशात तव सुत तव मृत्यु ’ होईल असा तुझ्या मातेनें द्रुमिळास शाप दिल्यावर तो आकाशमार्गानें गेला (१०२-१०५), ‘ तुझी माता परत आली ’ (१०६), हे नारदकथित गुह्य सत्य आहे, करितां रामकृष्णनाशार्थ हे महाता! सिद्ध रहा अशी कंसासुराची त्यास आज्ञा (१०७-११०).

**अध्याय १७ वा (१४७)**:—सर्व महारंग भरला (१-५), कुवलयापीड हत्ती व चाणूरमुष्टिकादिक यांची योजना झाली (६-७), बळकृष्ण आले (८); मार्ग अडविणाऱ्या हत्तीस व महातादि हस्तिरक्षकांस कृष्णानें मारलें (९-२२); रामकृष्ण रंगांत आल्यावर कृष्ण चाणूराशीं व बळराम मुष्टिकाशीं भिडले (२३-२८), यादवांचे उद्गार (२९-३०), कृष्ण भुजयुद्धनीति सांगतो (३१-३७), कृष्णचाणूरयुद्ध व चाणूरवध (३८-४७); राममुष्टिकयुद्ध व मुष्टिकवध (४८-५१), यादव-वसुदेवदेवकी, वारयोषितादि रंगस्थाची स्थिति (५२-५७); संतप्त कंस ‘ गोपाना हांकून द्या व नंदवसुदेवाना शिक्षा करा ’ अशी भृत्यास आज्ञा करितो (५८-६२), सक्रोध होऊन कृष्णानें कंसाचा वध केला (६३-७०), रामानें सुनाम्यास मारलें (७१), कृष्णराम वसुदेवदेवक्यादिकांस भेटले (७२-७७).

**अध्याय १८ वा (१५४)**—कंसक्रिया (१), कंसमाता (२) व कृष्ण यांचा शोक (३); उग्रसेन कृष्णाचें अभिनंदन करून कंसाची क्रिया करण्यास प्रार्थितो (४-७), ‘ मी निमित्तमात्र, आतां तूंच राज्य कर ’

असा कृष्णाचा उग्रसेनास आग्रह ( ८-१७ ); उग्रसेनास राज्याभिषेक करून ( १९ ) कृष्णानें कंसाची उत्तरक्रिया केली ( २० ), मुंज होऊन रामकृष्णांनीं सांदीपनीकडे अध्ययन संपविलें ( २१-२४ ), गुरुदक्षिणार्थ सांदीपनीनें तिमिंगिलदैत्यानें हरून नेलेला स्वपुत्र सांगितल्यावरून कृष्णानें सागरांत व नंतर यमलोकांत जाऊन गुरुकुमार आणून गुरूस देऊन कृष्ण परत गेले ( २५-३४ ).

**अध्याय १९ वा (१५७):**—कंसवधू आपल्या बापास व मगधाधिपास कृष्णाच्या कागाळ्या सांगून त्याजकडून सर्व वृष्णिद्वेषी राजे जमवून मथुरेस वेढा घालवितात ( १-५ ); युद्ध जुंपलें ( ६-८ ); रामाचीं हल व मुसळ व कृष्णाचीं शार्ङ्गधनु व कौमोदकी इत्यादि आयुधें त्यास प्राप्त होतात ( ९-१२ ), रामानें पिटाळून लाविलेल्या आपल्या सैन्यास मगधपति चेव आणून उलटवितो ( १३-१८ ); कृष्णानें विरथ केलेल्या मगधेंद्राच्या साहाय्यास आलेल्या चित्रसेनकैशिकादिकांशीं रामकृष्णाचें युद्ध ( १९-२५ ), चित्रसेन, जरासंधादिक व रामकृष्णसात्यक्यादिक यांचें तुंबळ युद्ध ( २६-४३ ), रामजरासंधांचें प्रेक्षणीय गदायुद्ध, 'तुज जरासंध वध्य नव्हे' अशी आकाशवाणी रामानें ऐकल्यावर परस्पर राजे परत स्वदेशाप्रत जातात ( ४४-५३ ); असे अठरा वेढे यादवांनीं परतविले ( ५४ ), अठराव्या वेढ्याच्या वेळच्या सभेंत विकद्रु यादव पूर्वेतिहास सांगून निर्त्राण मथुरेस तारण्याविषयीं कृष्णास प्रार्थितो ( ५५-१०५ ) –पूर्वेतिहास —( ५९-९५ ):-हर्यश्वराजास राज्यप्राप्ति ( ५९-६६ ), त्याचा पुत्र यदु यास नागेंद्रानें पाताळीं नेऊन पांच कन्या अर्पून यादववंश प्रख्यात होईल असें सांगितलें ( ६७-७९ ), यदूंच्या चार पुत्रांचीं स्वतंत्र राज्यें ( ८०-८६ ); ज्येष्ठ पुत्र माधव यास मुख्य राज्यप्राप्ति झाली, त्याचा च हा यादववंश ( ८७-९५ )

**अध्याय २० वा (१६७):**—विकद्रूचें भाषण वसुदेवास फार मानवलें ( १ ),'मी दक्षिणदिशेस निघून जातों, म्हणजे तुमचें संकट टळेल' असें म्हणून कृष्ण रामासह दक्षिणेकडे गेले ( २-७ ), वाटेंत भेटलेल्या परशुरामास युक्ति सांगण्यास कृष्णानें विनविलें ( ८-१३ ); " तूं करवीर ताबडतोब सोडून मजबरोबर चला व मग यज्ञनगावरून क्रौंचपुर पाहून गोमंतपर्वतावर प्रगट

व्हा, तेथें ' चक्रमसळ ' ... करून नतर ' भारतीय युद्ध ' करवा, ' इत्यादिप्रकारें परशुरामाने सल्ला दिला ( १४-२६ ), परशुरामाच्या होमधेनूचें दिव्य दुग्ध पिऊन रामामार्गे बळकृष्ण गोमती आले ( २७-३० ), ' येथ तुमचीं शस्त्रें तुम्हांस प्राप्त होतील ' मी जाता, माझें स्मरण करा, म्हणजे विजयी व्हाल ' असें बोलून परशुराम गेला ( ३१-३३ ), एकदां वनशोभा पहात असतां वारुणीगंधानें आकर्षित ... बळराम कदंबकोटरातील वारुणी यथेष्ट प्याला ( ३४-३९ ); वारुणी साक्षात् प्रगट होऊन ' यापुढें मला तुमचा विरह न व्हावा ' असें प्रार्थिती झाली ( ४०-४२ ); कांति ( ४३ ) व श्री (४४) यांनी तशी च प्रार्थना केल्यावरून सर्वांचा च बळरामानें स्वीकार केला ( ४५ ) ... आणून गरुडानें हळु च आकाशांतून कृष्णशिरावर सोडला ( ४६-५० ); इतक्यांत जरासंध पाठलाग करीत आला व प्रथम पर्वत फोडावा असा त्यानें बेत केला, परंतु मागाहून त्याला आग लावण्यांत आली ( ५१-६० ), मग रामकृष्णांनीं खालीं उड्या टाकतांक्षणीं च पर्वत दडपला व आंतून जळधारा निघून सर्व आग विझली ( ६१-६५ ); गडबडलेल्या मागधसैन्यांत रामकृष्णांनीं हातानीं च गर्दी केली ( ६६-६८ ), स्मरण करतां च आलेल्या चक्रमुसळादिकानीं रामकृष्णांनीं मागधसैन्य पिटाळलें ( ६९-७३ ), जरासंधानें स्वसैन्यास उत्साह आणिला ( ७४-७८ ); कृष्णानें जरासंधाची चौकशी केली ( ७९ ), दरदराजाला रामानें मारला ( ८०-८१ ); रामानें जरासंधाचा गदायुद्धांत पराभव केल्यावर अठरावा जरासंध पळाला ( ८२-८७ ), चेदिपतीनें कृष्णाशीं स्नेहसख्य दर्शवून रामकृष्णांस करवीरास आणिलें ( ८८-९४ ); ' माझ्यापुढें लटपट चालणार नाहीं ' इत्यादि भाषण ( ९५-१०० ) करून एकदम युद्धास उठलेल्या करवीराधिपति शृगालाचा कृष्णानें वध केला ( १०१-१०२ ), शोकार्त शृगालस्त्री स्वपुत्र शक्रदेवासह कृष्णास शरण आली ( १०३-१०६ ); तिचें सांत्वन करून कृष्णानें ... ( ... ), मग रामकृष्ण परत आनंदानें मथुरेस येऊन सर्वांस भेटले ( ११२-११६ )

**अध्याय २१ वा ( १७७ )** –कृष्णानुमतें राम नंदयशोदादिकांस भेटला ( १-२ ); सहर्ष गोपांचे रामाशीं भाषण ( ३-५ ), ' चित्त व्रजीं च माझें '

असें रामाचें उत्तर ( ६-८ ); राम सर्वांना सुखवितो ( ९-१० ), वारुणी येथे हि रामास भेटली ( ११ ), रामाचें यमुनाकर्षण ( १२ ); जवळ बोलाविली असतां यमुना आली नाहीं ( १३ ), म्हणून रामानें नांगरानें तिला ओढिल्यावर तिची प्रार्थना ( १४-१७ ), 'तू येथेंच रहा' असा रामाचा वर, ( १८ ); गोपांचे प्रणाम ( १९ ), मथुरेस परत आलेल्या बलरामास कृष्णानें नंदयशोदादींचें कुशल विचारिलें ( २०-२२ ); रामाचें प्रेममय प्रत्युत्तर ( २३-३२ ), कृष्णाची स्थिति ( ३३ )

**अध्याय २२ वा** [ १८० ] –हेरानीं रुक्मिणीस्वयंवराची बातमी प्रभुस कळविली [ १-३ ], रामाला मागें ठेवून यादववीरांसह कृष्ण निघाला [ ४-५ ], कुंडिनपुरास स्वयंवरार्थ जमलेल्या अभिमानी राजांना गरुडाकडून पालथे पाडविले [ ६-८ ], मग विदर्भनगरींत गरुडासह आलेल्या प्रभूचा सत्कार [ ९-१० ], भीष्मकसभेत जरासंधानें 'कृष्ण विष्णूचा अवतार, महाप्रतापी आहे, तस्मात् विचार करून काय करणें तें करा' असा उपदेश केला [ ११-२४ ], शिशुपालानें जरासंधाच्या भाषणास अनुमति दिली [ २५-२७ ], 'कृष्ण कन्यार्थ आला आहे, युद्धार्थ आला नाहीं, तेव्हा त्याशीं कलह कशाला? सख्य करू' असा दंतवक्त्रानें सल्ला दिला [ २८-३६ ], 'कृष्णाशीं युद्ध करून मरून सुगति जोडावी, तथापि कलहत्रास कशाला?' असें शाल्व बोलला [ ३७-४१ ], कृष्णद्वेष्टया रुक्मीबद्दल घाबरलेला भीष्मक दंतवक्त्राचा सल्ला पसंत करतो [४२-४४], "कृष्णा! हें विदर्भ देशाचें राज्य तूं स्वीकार, म्हणजे 'अराजा' हा दोष तुला न लागतां इतर राजांचा मद हि हरण होईल," अशी क्रथकैशिकांची कृष्णास प्रार्थना [ ४५-५५ ], कृष्णानें अनुमति दिल्यावर क्रथकैशिकांनीं इंद्राकडून सर्व राजांनीं कृष्णाभिषेकार्थ येण्याची आज्ञा असलेल्या पत्रासह एक पत्रिका पाठवून आमंत्रिलें [ ५६-६२ ], पत्रिका वाचून 'नृप बहु वळले' [ ६३ ], तों च आकाशांत चित्रांगदानें 'कृष्ण हा इंद्राचा हि देव आहे; तस्मात् सुनीथ, रुक्मी, शाल्व व जरासंध या चवघांशिवाय इतर सर्व राजांना कृष्णाभिषेकार्थ विदर्भनगरास जावें' असा पुकारा केला [ ६४-६८ ]; भीष्मकप्रभृति राजे त्याप्रमाणें हजर झाले [ ६९-

७१ ]; इंद्रादिक देवगण आले [ ७२-७५ ]; सर्वांचें स्वागत करून त्यांच्या आगमनाची वार्ता कृष्णास कळविल्यावर जयजयकार झाला [ ७६-७८ ], प्रभूला लोकपाळांनीं अभिषेक केला [ ७९-८१ ], सर्वांची आज्ञा घेऊन कृष्ण –मागें गरुडासह–सिंहासनावर विराजमान झाला [ ८२-८५ ]; पूर्वींचे अपराध विसरण्याविषयीं कृष्णास कैशिकानें सर्वांतर्फे प्रार्थिलें [ ८६ ], 'रुचती क्षमा चि आम्हा' अशा प्रकारचें प्रत्युत्तर श्रीकृष्णानें केलें [ ८७-९३ ]; 'रुक्मी स्वयंवराच्या कामीं माझें कांहीं चालूं देत नाहीं' असें भीष्मक कृष्णास विनवितो [ ९४-९५ ], 'हें सर्व मिथ्या आहे व म्हणून च मी तुझ्याकडे आलों नाहीं' अशा आशयाचें श्रीकृष्णाचें उत्तर [ ९६-१०६ ], 'मी शरण आलों, मुलगी रुक्मी एकाला च देईल,' 'असें होता अनय नसे' असें भीष्मक कृष्णास म्हणतो [ १०७-१०९ ], 'रुक्मिणी विष्णूची स्त्री, ती योग्य स्थळीं च पडावी म्हणून हा गरुड आला आहे,' 'मी तर पूर्वीं च क्षमा केली आहे,' 'हे मला राज्य देणारे क्रथकैशिक पुढेंमागें दहा पिढ्यांपर्यंत मोक्षाचे अधिकारी होतील,' 'हे राजे हो! तुमचें कल्याण असो' 'मी आता परत जातों' असें कृष्णाचें भाषण [ ११०-१२४ ]; भगवत्स्वरूप दाखविलेला भीष्मक [ १२५ ] कृष्णगरुडास शरण आला [ १२६ ] व कृष्णाला पोंचविल्यावर कृष्ण मथुरेस परत आला [ १२७-१२८ ]; तेव्हां इंद्र परत गेला [ १२९ ].

**अध्याय २३ वा [ १९२ ]** भीष्मकानें सर्व राजांची प्रार्थना करून त्यांस बोलाविलें [१-२]; मागधसुनीथादिकांनीं भीष्मकाभिप्राय विचारिला [३]; "प्रभुसी स्पर्धा करणाऱ्या माझ्या रुक्मीपुढें माझें कांहीं चालत नाहीं' असें भीष्मकोत्तर [ ४-७ ], 'रुक्मी महाप्रतापी आहे, तथापि गार्ग्यपुत्र काळयवन कृष्णाला अवध्य आहे; तेव्हा त्याच्याकडून मथुरेवर स्वारी करवावी, अशी शाल्वाची सल्ला [ ८-१५ ] सर्वांस पसंत पडते [ १६ ]; "मी तुमचा नायक असता मला सोडतां; तथापि कृष्णाला न कळण्याकरितां आकाशगामी शाल्वानें दूत होऊन काळयवनाकडे जावें" असें सांगून जरासंध स्वपुराप्रत गेला [ १७-२३ ]; रुक्म्यादि खिन्न झाले [२४], 'कृष्ण वरीन' हा रुक्मिणीचा निश्चय; शाल्व काळयवनाकडे गेला [२५]; शाल्वाचा सत्कार करून काळयव-

नानें कार्य विचारलें [२६-३४], शाल्व 'चक्रमुसळ' युद्धांतील रामकृष्णांचा पराक्रम वर्णून, गार्ग्यपुत्र रुद्रवरोद्भव 'तूं यादवांना अवध्य आहेस; तर या वेळीं आम्हांस सहाय हो' असा जरासंधाचा निरोप काळयवनास सांगतो [ ३५-४५ ], 'ठीक आहे' म्हणून काळयवन शाल्वास पाठवून मागोमाग निघाला [४६-४९], 'कुशस्थळी लुटणाऱ्या रुक्म्याचा समाचार घेईन' असें गरुड प्रभूस म्हणाला [ ५०-५२ ], परत आलेला कृष्ण सर्वांस संतोषविता झाला [ ५३-५७ ]; कृष्णाला पायीं सामोरा जाणाऱ्या उग्रसेनाला राम राजचिन्हें धारण करण्याविषयीं आग्रह करतो [ ५८-६० ], 'कृष्ण विष्णु आहे' 'माझी यापुढें काय शोभा?' असें उग्रसेन उत्तर करितो [ ६१-६३ ]; 'कृष्णाला तूं पुजूं स्तवूं नको' असें उग्रसेनाशीं बोलत बळराम कृष्णाजवळ आले [ ६४-६५ ] व कृष्णपूजा करणाऱ्या उग्रसेनाचें निवारण करून 'तू राजचिन्हें धारण करून पुढें चाल' 'तुम्हां सर्वांना इंद्रानें ही वस्त्रभूषणें व द्रव्यदक्षिणा दिली आहे ती स्वीकारा' असें बोलून कृष्णानें सर्वांस सुखविलें [ ६६-७७ ]; 'परत आलेल्या गरुडास एकांतात भगवंतानीं मागधभयत्रस्त मथुरा सोडणे प्रशस्त' असें म्हटलें [ ७८-८१ ], 'द्वारका वसवावी' असें म्हणून गरुड आज्ञा घेऊन गेला [ ८२-८४ ]; 'मथुरा सोडून जाऊं' या कृष्णवचनास यादवांनीं अनुमति दिली [८५-८९], इतक्यांत मथुरेवर चाल करून आलेल्या काळयवनाकडे कृष्णानें साप घालून घट पाठविला [ ९०-९१ ]; तो मुंग्यानीं भरून त्यानें परत पाठविला तों मुंग्यानीं साप खाऊन टाकला [ ९२-९३ ], तें पाहून कृष्ण काळयवनाला झुलवित पळत सुटला [९४-९६], तों कृष्णाला त्यानें गांठले [ ९७ ]; देवापासून 'माझी निद्राभंग करणारा भस्म होवो' असा वर मिळालेला मुचुकुंद निजलेल्या गुहेंत कृष्ण लपून राहिला [ ९८-१०२ ]; मुचुकुंदाला कृष्ण समजून जागा करणारा काळयवन तत्क्षणीं भस्म झाला [ १०३-१०५ ]; निद्राभंगाबद्दल न रागावण्याविषयीं कृष्णानें मुचुकुंदास विनविलें [ १०६-१०८ ]; 'मी वसुदेवसुत कृष्ण' 'तूं त्रेतायुगीं निजलास तों कल्पारंभीं उठविला गेलास असें नारदाकडून मला कळलें,' असें भगवंतानीं मुचुकुंदाच्या प्रश्नास उत्तर दिलें [ १०९-११३ ], प्रभुवंदन करून हिमाचलीं जाऊन तप

करून मुचकुंद स्वर्गास गेला [ ११४-११६ ]; काळयवनाच्या सैन्यास कृष्णानें पिटाळून लाविलें [ ११७-११९ ]; स्वस्तिवाचनविधि करून [ १२० ] विश्वकर्म्याकडून सुरम्य कनकप्रासादमय द्वारका निर्माण केली [१२१-१२५], द्वारकेंत दारिद्र्याभाव [ १२६ १२८ ], द्वारकेंत देवसभा आणविली [१२९-१३० ]; सांदीपनीला पौरोहित्य, विकद्रूला साचिव्य, सात्यकीस सैनापत्य, दारुकास सारथ्य व उद्धव प्रमुखांस इतर कर्में कृष्णानें नेमून दिलीं [ १३१-१३३ ]; रामरेवतीविवाह [ १३४ ].

**अध्याय २४ वा ( २०४ ):—** शिशुपालाकरितां जरासंध रुक्मिणीला मागणी घालतो ( १-३ ) व अनेक कृष्णद्वेष्टे राजे जमा करतो ( ४-७ ); त्यांचा रुक्मी सन्मान करितो ( ८ ), लग्नोत्सवार्थ येऊन कुंडिनपुराबाहेर राहिलेल्या रामकृष्णाचें भीष्मक स्वागत करतो ( ९-११ ); देवीपूजेला आलेल्या रुक्मिणीचें कृष्ण हरण करितो ( १२-१६ ), अक्रूरसात्यक्यादींसह मागें ठेविलेल्या बळरामानें जरासंधादि राजे पिटाळून लाविले ( १७-२९ ), प्रतिज्ञा करून कृष्णाला मध्यें च गांठून त्याशीं घोर युद्ध करणारा रुक्मी व त्याचे सहायक राजे यांचा पराभव करून रुक्मीस कृष्णानें बाण मारून पाडला (३०-५०); रुक्मिणीच्या विनवणीवरून रुक्म्याला अभय देऊन कृष्ण व राम हि स्वपुराला परत आले ( ५१-५४ ), भग्नप्रतिज्ञ रुक्मी भोजकटीं राहिला ( ५५-५६ ), कृष्णरुक्मिणीविवाह ( ५७-५८ ), कृष्णाच्या आठ पट्टराण्या व सोळा सहस्र भार्या ( ५९-६९ ), रुक्मीकन्या स्वयंवरांत कृष्णपुत्र प्रद्युम्नास वरते (७०-७१), प्रद्युम्नास पुत्र ( ७२ ); रुक्मवतीविवाहानें रामरुक्मी व्याहीव्याही होतात ( ७३-७५ ); द्यूतांत तरी बळरामाला जिंकावा म्हणून रुक्मी रामाला द्यूताला बोलावतो ( ७६-७७ ), राम पुष्कळदा हरतो व रुक्मी दात विचकून रामाची थट्टा उडवितो ( ७८-८४ ), शेवटच्या पणात रामाला आलेला जय मिथ्या असें रुक्मी प्रतिपादतो ( ८५-८७ ), इतक्यांत रुक्मीविरुद्ध आकाशवाणी ऐकून सक्रोध राम रुक्मीप्रमुखांस ताडन करतो ( ८८-९२ ) व कृष्णास सर्व वर्तमान सांगतो ( ९३ ), तें ऐकून रुक्मिणी व यादव कष्टी होतात (९४-९६); रामकृष्ण द्वारकेस परत आले ( ९७ ); आपली कन्या हरण करणाऱ्या सात्वत

कारागृहांत ठेवल्याबद्दल रागावलेला बळराम सर्व हस्तिनापुर गंगत पालथ घालूं लागल्यावर दुर्योधन बळरामास शरण आला ( ९८-१०४ ).

**अध्याय २५ वा ( २१३ ):—** सर्वपीडक भूमिसुत नरकासुरानें इंद्रमातेचीं मणिकुंडलें हरण केल्यामुळें ( १-३ ) इंद्र नरकवधार्थ कृष्णास प्रार्थितो (४-६); प्रतिज्ञा करून ( ७ ) सत्यभामेसह ( ८ ) कृष्ण प्राग्ज्योतिषपुरी आला (९-१२); द्वारस्थ मुरुदैत्याला कृष्ण वधितो ( १३-१५ ), निसुंदासुराचा वध ( १६-२३ ), हयग्रीवाला मारून ( २४-२७ ) विरूपाक्षास कृष्ण मारितो ( २८ ); आठ लक्ष दानव मारून कृष्णानें नरकासुराशीं घोर युद्ध करून त्याला मारिलें ( २९-४३); नरकमाता भूमि इनें प्रार्थना केल्यावरून ( ४४-४५ ) नरकपुत्र भगदत्ताला राज्य देऊन ( ४६ ) मणिपर्वतादिक देऊन ( ४७ ) इंद्राकडे गेला ( ४८ ) व त्यानें इंद्रमातेस मणिकुंडलें दिलीं ( ४९-५० ), सत्यभामेस सासू शचीचा आशीर्वाद ( ५१ ), कृष्णभामेस वस्त्रभूषणें ( ५२ ), कृष्ण येताना पारिजातकवृक्ष आणितो ( ५३ ) व द्वारकेस परत येतो ( ५४ ).

**अध्याय २६ वा** [ २१८ ]—रुक्मिणीच्या व्रतसमाप्तीकरिता कृष्ण रैवतक पर्वता आला व दोघां पतिपत्नींनीं विप्रादि स्त्रीपुत्रांस द्रव्यवस्त्रभूषणें समर्पिलीं [ १-४ ], आपण दिलेलें पारिजातपुष्प रुक्मिणीनें धारण केल्यावर [ ५-७ ] नारदानें, 'हें सर्व वांछित देणारें पुष्प देवस्त्रियांना प्रिय आहे' 'या भाग्योत्कर्षाबद्दल सत्यभामा तुझा द्वेष करील' असें रुक्मिणीस सांगितलें [ ८-१९ ]; दासीकडून हें नारदोक्त श्रवण करून भामेनें वस्त्रें फाडून व दागिने फेकून राग मांडला [ २०-२४ ], भ्रांतपणानें नाना चेष्टा करणाऱ्या भामेच्या मंदिरात तिच्या सांत्वनार्थ प्रभु येऊन तिजवर चामर ढाळीत राहिले [ २५-३४ ], प्रभूकडे पाहून 'योग्य'' असें म्हणून भामा गप्प बसला [ ३५-३८ ], मग रडूं लागली [ ३९-४१ ], 'देवि तुझा किंकर मी' 'तुझ्या च ठायीं माझी प्रीति आहे' 'आज कां रागावलीस ?' असें कृष्णानें भामेस विचारिलें [ ४२-५५ ]; 'माझ्या ठायीं तुझा कपटस्नेह आहे—द्विधाभाव तू धरतोस; तेव्हां आतां मला तपाला जाण्याची आज्ञा दे' असें म्हणून भामा रडूं लागल्ये [ ५६-६६ ]; 'खरें कारण सांग' म्हणून कृष्णानें विचारिलें [ ६७-६८ ] तेव्हां

भामा गर्हिवरून म्हणाली, "तुझी सर्वांत लाडकी फक्त मी अशा डौलात होत्यें, परतु परवा नारदानें दिलेलें पारिजातपुष्प तूं आपल्या 'इष्टजनास' दिलेंस व नारदाचें भाषण ऐकून तुला गुदगुल्या होत होत्या. हा माझा अपमान पाहून मला मरणापरीस दुःख होणार नाहीं ? तूं गोडबोल्या, शठ, चोर आहेस" [ ६९-८८ ]; तिचें सांत्वन करणारा कृष्ण, "नारदानें च तें दिव्य पुष्प रुक्मिणीस दिलें, मी तुझ्या दारांत पारिजातक च आणून लावितों, मग काय ?" असें म्हणाला [ ८९-९४ ]; 'मग काय माझ्या हर्षाला पारावार च राहणार नाहीं' असें भामेनें म्हटल्यावर [ ९५-९६ ] कृष्णानें 'हा आणला च पारिजातक' असें म्हणून [ ९७ ] स्नानादि करून [ ९८ ] स्मरण करिता च आलेल्या नारदाची पूजा करून त्यास भोजन दिलें [ ९९-१०१ ], भामेला नारदाचा आशीर्वाद [ १०२ ]; भामाकृष्ण शेष सेवन करिताल [ १०३ ], 'इंद्राकडे शिवोत्सव आहे; मला जाण्याची आज्ञा द्यावी [ १०४-१०५ ], आमन्त्रणचिन्हरूप पुष्प मीं तुला पूर्वीं च दिलें [ १०६ ]; हा सर्वकामद पारिजात अदितीकरितां मुद्दाम कश्यपानें निर्मिला [ १०७-११२ ]; मग याला बांधून आदितीनें कश्यप, शचीनें इंद्र असा प्रतिदानें मला मिळाली; या पारिजाताचा महिमा किती वर्णावा ?" असें भाषण नारदानें केलें [ ११३-११७ ].

**अध्याय २७ वाः—[ २२८ ]:—** 'इंद्राला विनवून पारिजातक आण' अशी कृष्णाची नारदास विनंति [ १-९ ], "इंद्र प्राण देईल; पण पारिजातक देणार नाहीं [ १० ], समुद्रमंथनोद्भूत पारिजात पार्वतीच्या विनवणीवरून मंदरपर्वतीं शंकरानें स्थापला असतां [ ११-१३ ] शचीचें मिष करून इंद्रानें शंकराकडून पारिजातवन च करविलें [ १४-१७ ], तथे इतरांस प्रवेश नाहीं [ १८ ], जुन्या वृक्षांपेक्षां हे वृक्ष अधिक श्रेष्ठ [ १९-२० ]; या वनांत शिरणाऱ्या अंधकासुरास शंकरानें वधिलें [ २१-२२ ]; इंद्र हा देणार नाहीं [ २३ ]" असें नारद म्हणाला. 'मी इंद्राचा धाकटा बंधु प्रतिज्ञा करून चुकलों आहें; तरी इंद्रास पारिजात देण्याबद्दल प्रार्थावें; अन्यथा मी बलात्कारानें नेईन, असें स्वच्छ त्याला कळीव' असें कृष्णाचें उत्तर [ २४-३२ ], शिनीरोप झाल्यावर नारदानें कृष्णाचा निरोप इंद्रास सविस्तर सांगितला [ ३३-५१ ]; नारदास आसन देऊन 'माझ्यामागें हें सर्व तुझें च आहे' 'देवलोकींच्या वस्तु मनुष्यलोकीं नेल्यास

देव व मानव यांत भेद उरणार नाहीं, तेव्हां पारिजात मला देतां येत नाहीं' असें युक्तीनें कृष्णाला कळविण्याविषयीं इंद्र सांगतो (५२-६९); 'इंद्रा! कृष्णानें प्रतिज्ञा करून सामानें न मिळाल्यास युद्ध करून पारिजात नेण्याचा त्याचा निश्चय आहे, तेव्हा तूं तो त्यास दे' असें नारद इंद्रास सुचवितो (७०-७७); "मी निरपराध आहें: हा माझा अनुज कामवश होऊन अन्याय करण्यास तयार होत आहे; याला मीं वारंवार मदत केली आहे; 'युद्ध करीन' म्हणतो तर मी सिद्ध आहें; परंतु जिवंत आहे तोंवर पारिजाताचें पत्रार्ध हि देणार नाहीं, हा माझा निश्चय नारदा! तूं कृष्णाला कळीव," असें इंद्र बोलतो (७८-१०१), "ऐक! इंद्रा! कृष्ण सर्वेश्वर विष्णु आहे; रुक्मिणी चिच्छक्त्यंश आहे, पूर्वी अनेक अवतारीं यानें अद्भुत पराक्रम करून विश्वरक्षण केलें आहे; हा अनंतलीलानाटकी पारिजातक नेल्याशिवाय राहणार नाहीं, हें भविष्य मी तुला सांगतो. मुकाट्यानें पारिजात दे; युद्धाचा प्रसंग आणूं नको," असें इंद्राला नारद हित शिकवितो (१०२-१२३), "हा परमपुरुष असता तर थोडक्याकरितां अनर्थ करण्याची इच्छा न धरता; आतां काय होईल तो होवो," असा आपला निश्चय इंद्र नारदास जाणवितो (१२४-१३०), नारद द्वारकेस परत येतो (१३१).

**अध्याय २८ वा (२३९)**—परत आलेल्या नारदाला पुन्हां तो च निर्वाणीचा निरोप सांगून इंद्राकडे कृष्णानें पाठविलें (१-८), नारद पुन्हां इंद्रास बोधितो (९), 'मला न विचारतां तूं हें काय केलेंस' असें म्हणणाऱ्या बृहस्पतीस (१०-१२) इंद्रानें विचारल्यावरून (१३), 'कृष्णाशीं युद्ध न कर' असा विचार बृहस्पतीनें सांगितला (१४-१५), बृहस्पतीसमोर कश्यपानें 'या अहिल्याव्रतभंजक इंद्रास मनुष्यापासून भय असो' असा शाप दिला (१६-१९), 'मी कदाचित् येऊन कृष्णेंद्रयुद्ध वारीन' असें कश्यपानें म्हटल्याबरोबर बृहस्पतीनें 'अवश्य असें करा' असा आग्रह केला (२०-२२); 'कृष्णेंद्राचा समेट होईल' असें शंकरानीं सांगितल्यावर कश्यप स्वर्गास गेला (२३-२७); प्रद्युम्नाला घेऊन मृगयाभिषानें दारुकास मागें ठेवून गरुडारूढ कृष्ण नंदनवनांत आला (२८-३२); संरक्षक सैन्याला न जुमानितां पारिजात

उपटून कृष्णानें चालविला, हें वृत्त माळ्यानीं इंद्रास कळविलें ( ३३-३६ ), जयंतासह इंद्र कृष्णप्रद्युम्नांवर चालून आला ( ३७-३९ ), इंद्राला नमस्कार करून ( ४० ) त्याच्या प्रश्नास ( ४१ ) 'तुझ्या भावजयीच्या पुण्यकव्रता-करितां हा वृक्ष नेतों' असें कृष्णोत्तर ( ४१-४२ ), 'प्रतिज्ञेप्रमाणें माझ्याशीं युद्ध कर' असें इंद्रानें म्हटल्यावरून कृष्णेंद्र व जयंतप्रद्युम्न यांचें युद्ध सुरू झालें ( ४३ ५३ ), सात्यकि व भार्गवशिष्य प्रवर यांचें युद्ध ( ५४-६० ); प्रद्युम्न-जयंतयुद्ध ( ६१-६४ ); प्रवर सात्यकीला विकळ करितो ( ६५ ७२ ), गरुड प्रवराला उडवितो ( ७३-७५ ); पुन्हां वीर तयार झाले ( ७६-७९ ); इंद्र पुढें होऊन गरुडावर बाण टाकितो ( ८०-८२ ), गजेंद्रखगेंद्रयुद्धांत गजेंद्र बेशुद्ध होतो ( ८३ ९३ ); गरुडाचा पराक्रम ( ९४-९७ ); बळरामादिकांना 'उद्यां मी येतों' असें कळविण्यास कृष्णानें प्रद्युम्नास पाठविलें ( ९८-९९ ), प्रद्युम्न निरोप सांगून दारुकासह आला व भगवान् रथांत बसून पारियात्रपर्वतीं पारिजात रक्षण करीत राहिले ( १००-१०४ ), रवि-अस्त, व ऐरावत जखमी म्हणून युद्ध दुसऱ्या दिवसावर गेलें ( १०५-१०९ ); पारियात्राला वर देऊन ( ११० ) गंगेंत स्नान करून कृष्णानें शिवस्तुति केली ( १११-११९ ), शंकरानें कृष्णास सांगितलें कीं, " तुझे मनोरथ पूर्ण होतील, पारिजातक घेऊन जा, तुला मैनाकीं दिलेले वर फळतील; मी येथें 'बिल्वोदकेश्वर' व ही गंगा 'अविंध्या' नांव पावून राहून भक्तांना तारूं; षट्पुरांतील दानवांचा नाश तूं कर " ( १२०-१२७ ); शंकर गुप्त झाले ( १२८ ), पारियात्रास प्रभूचा वर ( १२९-१३३ )

**अध्याय २९ वा (२५१)**:—इंद्र व कृष्ण यांचे युद्ध ( १-१४ ), अदिति व कश्यप हे विधीच्या सांगण्यावरून मध्यें उभे राहिले ( १५-१६ ), त्यांना दोघांनीं नमस्कार केल्यावर युद्ध थांबलें, या 'प्रियसंगमन' नामक स्थळीं कृष्णेंद्रांचा समेट झाला व कृष्णाला पारिजात मिळाला ( १७-३१ ); सात्यकीला पुढें पाठवून हें विजयवृत्त सर्व यादवांना विदित करविल्यावर मोठ्या थाटानें प्रभावशाली पारिजातकासह कृष्ण द्वारकेस आला ( ३२-४५ ); सत्य-भामेचें पुण्यक व पारिजातकाला बांधलेल्या कृष्णपतीचें नारदास दान ( ४६-

-५२ ), नारदाचा प्रभुभामेशीं विनोद ( ५३-६० ); कृष्णाची सुटका—निष्क्रय ( ६१-६४ ), नारदास वरदान ( ६५-६८ ); पारिजातकाचें कौतुक ( ६९-७२ ); एका वर्षानंतर कृष्ण पारिजातक परत करतो ( ७३-७५ ); षट्पुरस्थ दानवनाशार्थ कृष्णानें इंद्रापासून प्रवरजयंत सहाय आणिले ( ७६-७९ ); 'पूर्वी उमेनें केलेलें हें पुण्यकव्रत अरुंधतीस सांगितलें तें मीं ऐकिलें, तें तुला सांगतों' असें नारदानें रुक्मिणीस सांगितलें 'तें मूळीं च पहावें' (८०-९५ ).

अध्याय ३० वा (२६० )—शंकरानें मारल्यावर उरलेले ( १ ) असुर तप करून ब्रह्मदेवाजवळ शंकराचा पराभव करण्याचें सामर्थ्य मागतात; विधि तें अशक्य म्हणून देत नाहीं ( २-४ ); 'मग रुद्रादि देवांपासून अवध्यता व पृथ्वीवर षट्पुरामध्यें वस्ती' असे वर त्यांनीं मागितले ( ५-१० ); 'सद्ब्राह्मणच्छल कराल तर नाश पावाल' असें बजावून हें सर्व ब्रह्मदेवानें असुरांस दिलें ( ११-१४ ); 'या जंबूमार्गी तीन दिवस धर्मानें वर्तेल तो ब्रह्मलोकाप्रत पावेल' असा शंकरानें हि असुरांस वर दिला ( १५-२२ ); याज्ञवल्क्यशिष्य ब्रह्मदत्त वसुदेवाकरवीं अश्वमेध करवितो ( २३-३१ ); निकुंभप्रमुख असुरानीं यज्ञांत सोम, कन्या इ० मागितलें ( ३२-३३ ); 'असुरांना यज्ञभाग नाहीं' असें वसुदेवोत्तर ( ३४-३६ ); असुर यज्ञवाट लुटतात ( ३७-३८ ), स्मरण करता च कृष्ण प्रद्युम्नास पुढ पाठवितो ( ३९-४२ ), तो मायावी कन्या निर्मितो, त्यांचें असुर हरण करितात ( ४३-४५ ); जरासंधशिशुपालादिक अनेक राजे सत्रार्थ जमलेले पाहून निकुंभास भेटून 'या राजांना त्या हरण करून आणिलेल्या कन्या देऊन टाक,' अशी नारदानें कळ लाविली (४६-५३); कन्यांच्या लोभानें पांडवांशिवाय सर्व राजे यादवांविरुद्ध निकुंभास मिळाले, इतक्यांत कृष्ण ससैन्य तेथें आला ( ५४-५९ ) व प्रद्युम्न, सात्यकि, पांडव, जयंत, प्रवर इत्यादिकांस स्थापून युद्धसिद्धता करविता झाला (६०-६८), असुर हि बाहेर आले—तें पाहून नारदाचे विचार ( ६९-७१ ); मागधादिकांसह युद्ध करणारा निकुंभ अनाधृष्टिकृतवर्मादि यादवांना मायेनें पळवून नेता झाला ( ७२-८१ ); खवळलेले कृष्णप्रद्युम्नादि यादव असंख्य असुरांचा वध करतात ( ८२-९१ ), प्रद्युम्नानें भीष्मकौरव, कर्णमागधरुक्मादि सर्वांना

मायामय गुहेंत कोंडून टाकिले ( ९२-९७ ), शिशुपालाला कोंडणार तों नंदी प्रगट होऊन प्रद्युम्नास शिवदत्तपाश देऊन 'आधीं नृप बांधावे, बांधिल्यावारे सर्व दैत्य सोडावे' अशी शिवाज्ञा कृष्णास हि कळविते (९८-१०५); प्रद्युम्नानें सर्वांस बांधून अनिरुद्धाच्या ताब्यांत दिले ( १०६ ), 'खुशाल निर्भय मनानें कर्म करा' असें मग ब्रह्मदत्तास सांगून प्रभु पुन्हा असुरक्षयार्थ सिद्ध झाले ( १०७-११० )

अध्याय ३१ वा ( २५० )—भिऊन पळणाऱ्या सर्व राजाना निकुंभानें चेव आणला ( १-५ ) असुरांचा संहार ( ६-८ ), निकुंभानें प्रवराला पाहून ( ९-१२ ) जयंताशीं युद्ध करताना च गुप्त होऊन तो कृष्णावर धावला ( १३-१६ ); इंद्र जयंताचें अभिनंदन करितो ( १७-२० ), निकुंभ एकदम उसळून गुप्तरूपानें कृष्णप्रद्युम्नादिकांस भयंकर ताडण करितो ( २१-२८ ), शंकरकृपेनें निकुंभ दिसू लागतो च त्यावर अर्जुनानें बाण सोडले ( २९-३१ ); आपले बाण फुकट जाण्याचें कारण अर्जुनानें विचारल्यावरून ( ३२ ) कृष्णानें "तीन रूपें धरणारा निकुंभ देवदानवाना अवध्य आहे, याचें द्वार शंकर रक्षितो; 'विप्र, विष्णु किंवा मी यांचें अप्रिय करील तर च हा मरेल; याचा तिसरा देह मीं नाशिला' असें शंकर म्हणाले," इत्यादि हकीकत अर्जुनास सांगितली ( ३३-३९ ), सर्व यादववीर त्या विचित्र षट्पुरगुहेंत शिरून त्यानीं निकुंभानें कोंडलेले यादव सोडविले ( ४०-४३ ), कृष्णाज्ञेवरून प्रद्युम्नानें हि कोंडलेले व अतएव सलज्ज झालेले राजे सोडून दिले ( ४४-४५ ), परस्पर कृष्णनिकुंभ युद्धांत मूर्च्छित होतात ( ४६-४८ ), कृष्णार्थ शोक ( ४९ ); सावध होऊन पुन्हां दोघे घोर युद्ध करतात ( ५०-५४ ), उपाय चालेना, तेव्हां आकाशवाणी झाल्यावरून कृष्णानें सुदर्शन सोडल्यावर निकुंभ मेला ( ५५-५७ ); सुरमुनींस आनंद ( ५८-५९ ), राजांस कन्यारत्नें व यादवांस दैत्यबाला ( ६०-६१ ) धर्माला वज्ररथादि व ब्रह्मदत्ताला षट्पुर ( ६२ ), अशीं कृष्णानें दिलीं; बिल्वोदकेश्वराचा उत्सव करून ( ६३ ), ब्रह्मदत्ताकरवीं थाटांत सत्रसमाप्ति केली ( ६४-६५ ), धन्यचरित ( ६६ ); कृष्ण द्वारकेस परत आला ( ६७ ).

अध्याय ३२ वा ( २७५ ):—रुद्रावांचून इतराना अवध्य असा असुर

अंधक नांवाचा सर्वतापक पुत्र दितीनें कश्यपापासून मागून घेतला ( १-१० ); इंद्राची तक्रार ऐकून ( ११-१२ ) कश्यपानें अंधकाला दाबण्याचा केलेला प्रयत्न व्यर्थ गेला ( १३-१४ ); अंधकाची पीडा व जुलूम ( १५-१८ ); 'नारदाकडून शंकराला कळवून हा कांटा काढावा,' अशी बृहस्पतीची युक्ति ( १९-२३ ), त्याप्रमाणें नारद शंकराकडे राहून तेथील मंदारपुष्पाची माला घालून अंधकास भेटला ( २४-२७ ), अंधकानं विचारल्यावरून "ही अद्भुत पुष्पें शंकराच्या 'स्वयंप्रभ' वनातील आहेत, हीं वांछित देणारीं असून कोणाला हि प्राप्त होणार नाहींत" असें नारदानें सांगितलें ( २८-३९ ). तेव्हां अंधक ससैन्य मंदारीं आला तों तो च त्याला भेटला (४०); त्याला 'तुझें वन मला सर्वांबध्याला दाखीव, नाहीं तर बलात्कारानें पाहीन' असा अंधकानें धाक घातला ( ४१-४५ ); गुप्त झालेल्या मंदाराचीं शृंगें उपटून अंधक चूर्ण करूं लागला ( ४६-४८ ) तों शंकराच्या प्रसादानें पुनःपुनः नवीं शिखरें उत्पन्न होऊं लागलीं, व दैत्याचा चूर करूं लागलीं ( ४९-५२ ), 'गुप्त राहून छळणें योग्य नाहीं, प्रगट हो' असें अंधक बोलला ( ५३-५४ ); तेव्हां शूलधारी शंकर प्रगट झाले—शंकरवर्णन ( ५५-५८ ), अंधकाला शूलानें जाळला ( ५९ ); मुनिसुर जयजयकारें गर्जले व सुखावले आणि शंकर मंदारीं अधिक च शोभूं लागले ( ६०—६६ ).

**अध्याय ३२ वा ( २८९ ):—**' श्रीकृष्णें वधिला दुसरा निकुंभ काय कसा ?" या जनमेजयाच्या प्रश्नास ( १ ) वैशंपायन उत्तर देतात ( २-७४ ):— एका महापर्वीं यादव पिंडारकास गेले ( १-४ ), इच्छावश सुगंधी सिंधूत कृष्ण-रामप्रमुख सर्व यादव सस्त्रीक नानाविध जलक्रीडा करितात ( ५-१५ ); त्यांत अप्सरा आल्यावर ( १६ ) विश्वकर्मनिर्मित सप्रासाद नौकेंत थाटमाटात राम-रेवती, कृष्णसत्यभामा, पार्थसुभद्रा इत्यादिक गाण्याचा अद्भुत रंग करितात ( १७-३२ ); नारद त्यांत मिसळून आपल्या गानहास्यानें सर्वांस सुखवितो ( ३३-३७ ); या अद्भुत रासाच्या शेवटीं अवभृथस्नानार्थ कृष्ण व राम दोन फळ्या करून समुद्रांत शिरतात ( ३८-४२ ); सर्व सिद्धता ठेवण्यास कृष्ण सागरास आज्ञापितो ( ४३-४६ ); मदमत्त यादव अनावर झालेले पाहून कृष्ण

त्याच्यासह बाहेर निघाला ( ४७-५४ ); नारदाला अनुलेपनादि देणें ( ५५ ); यादवांचें पानभोजन ( ५६-५९ ); 'छालिक्य' गान ( ६०-६२ ); 'हल्लीसक' नृत्य ( ६३-६४ ), रंभोर्वश्यादिकांचें अभिनयनैपुण्य ( ६५-६८ ); या छालिक्यादि गानानें सर्वांचा संतोष ( ६९-७३ ), देववधू परत जातात ( ७४ ).

**अध्याय ३४ वा ( २८८ )**–प्रद्युम्नकृत प्रभावतीहरणामुळें टपून बसलेला निकुंभ भानुमतीचें हरण करितो ( १-४ ), वसुदेवादिकांस तो दिसेना ( ५ ), तेव्हां त्याना प्रभूला कळविलें, प्रभु गरुडारूढ होऊन निकुंभाला गांठून त्याच्याचप्रमाणें तीन रूपें धरून युद्ध करूं लागले ( ६-८ ), त्यास प्रद्युम्नार्जुनाचें साहाय्य ( ९-१० ), मायावी निकुंभ भानुमतीसह गुप्त होऊन पळूं लागला व कृष्ण त्याचा पाठलाग करूं लागला ( ११-१५ ), पळतां पळतां उत्तरगोकर्ण लंघित असतां निकुंभ मूर्छित पडला व भानुमती प्रद्युम्नाचे हातीं आली ( १६-१८ ), तो पुनः सावध होऊन पळूं लागला व षट्पुरांत शिरला ( १९-२१ ), प्रद्युम्नाकडून मुलीस कृष्णानें घरीं पोंचविली ( २२ ), गदायुद्धांत प्रद्युम्नार्जुनांस निकुंभ मूर्छित करतो ( २३-२८ ), निकुंभ व कृष्ण परस्पर गदायुद्धांत मूर्छा पावतात ( २९-३६ ), अमृत शिंपडून इंद्रानें सावध केलेला कृष्ण ( ३७ ) निकुंभावर सुदर्शन उगारतो ( ३८ ), निकुंभाचें मायावी मूर्छित कलेवर ( ३९-४२ ), प्रद्युम्नानें माया ओळखल्यावर कलेवर गुप्त होतें ( ४३-४४ ), कृष्णार्जुनाचें हास्य ( ४५ ), निकुंभ मायेनें हजारों पार्थ व हजारों निकुंभ निर्मितो (४६-५०), कपटनिकुंभांचा नाश करून कृष्णानें खऱ्या पार्थाचें रक्षण केलें व खरा निकुंभ हि मारला (५१-५२), पार्थाला पडतांना प्रद्युम्नानें सावरिलें (५३), जयजयकार ( ५४-५५ ), कृष्ण द्वारकेस परत गेला ( ५६ ), नारदाची पूजा ( ५७ ), "भानुमती दुर्वासाच्या शापामुळें असुरकरांत सांपडली; परंतु माझ्या च विनवणीवरून दुर्वासानें ही निर्दोष राहील असा उःशाप दिला; तरी हिला सहदेवास द्यावी; ती पुत्रवती होईल," असें नारदाचें भाषण (५८-६५); त्याप्रमाणें सहदेवास भानुमती दिली ( ६६-६७ ).

**अध्याय ३५ वा ( २९४ )**:–वज्रनाभवधकथा जनमेजयानें विचारल्यावरून ( १ ) वैशंपायन सांगण्यास आरंभ करितो ( २-१९ ): —वज्रनाभ

ब्रह्मदेवापासून देवावध्यत्व व सर्वांना दुष्प्रवेश्य असें सर्वांगसुंदर वज्रपुर, शौरे वरद्वारा मिळवितो ( २-८ ); त्रैलोक्याधिपत्याचा अभिलाष करून ( ९ ) " मी हि कश्यपपुत्र, मला राज्य दे अथवा युद्धास उभा रहा," ( १०-११ ) असें इंद्रास तो म्हणाला, बृहस्पतीच्या सल्ल्यावरून " पिता कश्यप सत्र संपविल्यावर जसें सांगेल तसें करूं " असें इंद्रानें उत्तर केलें ( १२ ), 'मी सत्र संपल्यावर काय ती व्यवस्था करतों, तोंवर वज्रपुरांत स्वस्थ रहा,' असें कश्यपानें वज्रनाभास सांगितलें ( १३-१४ ), वज्रनाभ त्याप्रमाणें गेला ( १५ ), इंद्रानें कृष्णाला सांगितल्यावरून ( १६ ) 'हा अश्वमेध संपल्यावर या असुरवधाची युक्ति योजितों,' असें कृष्णाचें आश्वासन (१७ २०); इंद्र गेला ( २१ ); अश्वमेधांत आलेल्या भद्रनटाचें कौशल्य पाहून संतुष्ट झालेल्या ऋषींकडून त्यास सप्तद्वीपसंचारसामर्थ्य, अमरत्व व गुणाढ्यत्व इत्यादि वर मिळून तो त्यांचा लाभ घेता झाला ( २२-३२ ); द्वारकेस वारंवार येऊन तत्रस्थांना तो सुखवी ( ३३ ), इंद्र हंसांस म्हणाला, वज्रपुरांतील अंतःपुरवापींत क्रीडा करून वज्रनाभकन्या प्रभावती इला मोहून तिच्या ठिकाणीं प्रद्युम्नाविषयीं आसक्ति उत्पन्न करा; त्याला प्रभावतीचें वेड लावा; मग भद्रनटाचा वेष घेऊन तो वज्रपुरांत येईल व प्रभावतीचें युक्तीनें हरण करील, अशी कुशल योजना करा " ( ३४-४८ ), त्याप्रमाणें वज्रनाभास संतोषवून अंतःपुरांत प्रवेश करून त्या हंसांनीं दैत्यकन्यांशीं परिचय करून घेतला ( ४९ ५५ ); कथाकथन — कुशल हंसांपैकीं शुचिमुखी हंसीनें प्रभावतीजवळ प्रद्युम्नाची पुष्कळ स्तुति करून त्यास वरण्याविषयीं सुचविलें ( ५६-६८ ), 'माझा बाप कृष्णाचें वैर करितो, प्रद्युम्न येथें येण्याचा उपाय मला सांग, सखे! तूंच हें काम कर,' असें हंसीस प्रभावती बोलली ( ६९-७७ ), 'तुझें कार्य करीन, परंतु माझी कथाकुशलता तूं आपल्या बापास कळीव,' असें हंसी बोलली ( ७८-७९ ); हंसीच्या मागणीप्रमाणें प्रभावतीनें केलें (८०); अपूर्वश्रवणेच्छु ( ८१ ) वज्रनाभास हंसीनें मेरूवरील शिवसख्या व भद्रनट यांची माहिती दिली ( ८२-८६ ); भद्रनटास पहाण्याची वज्रनाभास इच्छा ( ८७-८८ ); " तूं सुगुणज्ञ, प्रभु हें कळता येतील आपण चि राज्या!" असें हंसीचें उत्तर ( ८९-९१ ); 'जा त्याला लवकर भेटीव'

असें वज्रनाभ बोलला ( ९२-९३ ); इंद्रकृष्णांस हंसानीं हें वृत्त कळविलें (९४); प्रभुभ'ज्ञेवरून प्रद्युम्नादि यादव भद्रनटादिकांचा वेष घेऊन वज्रपुरांत दाखल झाले (९५-९९)

**अध्याय २६ वा ( १०२ ):**—भद्रवेषधारी प्रद्युम्नाचा सत्कार व हर्षित असुराकडून वेषधारणार्थ अनर्घ्य मणिरत्नभूषणशस्त्रादिकांची प्राप्ति (१-५); जमलेल्या पौरासुरांपुढें रामायणांतील सीताविवाह, रावणवधादिक प्रसंग नटमंडळी करून दाखवितात (६-१३), संतुष्ट पौराकडून नानाभूषणादिप्राप्ति (१४-१८); पौरांच्या शिफारशीवरून वज्रनाभ या नटमंडळीस विश्वकर्मनिर्मित मंदिरात उतरवून सर्व साहित्य देऊन नाट्य पहावयास स्वतः बसला ( १९-२६ ); [illegible] पुरस्त्रिया बसविल्या ( २७ ), यादवानी रंभाभिसार नाटक करून दाखविलें ( २८ ३८ ), संतुष्ट प्रेक्षकांकडून वस्त्रभूषणादींची प्राप्ति ( ३९-४४), प्रद्युम्नाच्या भेटीचा संकेत हंसी प्रभावतीस कळविते ( ४५-५० ); प्रद्युम्न भ्रमररूपानें प्रभावतीच्या कर्णोत्पलांत राहिला ( ५१-५३ ); कामपीडित प्रभावतीचें हंसीशीं तद्विषयक भाषण ( ५४-६४ ), हंसीस कळवून प्रद्युम्न प्रगट होतो ( ६५-७० ), अधोमुख प्रभावतीस 'गांधर्वविवाहानुग्रह' करण्याविषयीं प्रद्युम्न प्रार्थितो ( ७१-७७ ); दोघांचा [illegible] प्रद्युम्नाचें प्रभावतीच्या महालात येणें व तिला सुख देणें (८१ ८९), नटस्त्रियांची गुणशोभा ( ९०-९१ ); इंगितानें प्रभावतीचें गौप्य ताडणाऱ्या तिच्या चुलत बहिणी चंद्रावती व गुणवती तिला प्रश्न करितात ( ९२-९५), " इच्छितपुरुषसंगप्राप्तीची विद्या मला दुर्वासानें शिकविली, तिच्यायोगानें सुरसुत प्रद्युम्नाचें प्रेम म्यां संपादन केलें [illegible] अशा प्रभावतीचें उत्तर ( ९६ १०२ ), 'प्रद्युम्नाच्या सल्ल्यानें तूं च आम्हांकरितां वर निवड' असें त्या दोघींनीं सांगितल्यावरून, गद व सांब यांची निवड करण्याचें ठरलें ( १०३-१०६ ); दुर्वासविद्येच्या सामर्थ्यानें गदसांबांस आणून चंद्रावतीगुणवती त्यांशीं गांधर्वविवाह करितात प्रद्युम्नगदसांब प्रभावतीचंद्रावतीगुणवतींना 'विचित्र सुरतें' रमवितात ( १०७-१११ ).

**अध्याय २७ वा (११२):**—प्रद्युम्नाचा वज्रपुरीं सुखनिवास (१-३), कश्यप इंद्राचा अधिकार कायम करतो (४-७); असंतुष्ट वज्रनाभ युद्धाची तयारी

करतो (८-९), हंसांची प्रद्युम्नास वज्रनाभवधाची सूचना (१०); हंसांच्या विनंतीवरून प्रभावत्यादींच्या भावी पुत्रास कृष्णेंद्रांकडून वर (११-१३); प्रभावतीस हंसकेतु, चंद्रावतीस चंद्रप्रभ व गुणवतीस गुणवान् असे 'जन्मीं च तरुण' पुत्र होतात (१४-१७); पुत्र असुरांच्या दृष्टीं पडतात (१८-१९); असुरपतीच्या आज्ञेवरून त्यांस धरणें येतें (२०-२२); भ्यालेल्या प्रभावत्यादि स्त्रियांस धीर देऊन प्रद्युम्न सल्ला विचारतो (२३-२८); प्रभावत्यादि तिघी प्रद्युम्नादि तिघांस तरवारी देऊन युद्धास अनुमति देतात (२९-३३); युद्धारंभ—इंद्रोपेंद्राचें प्रद्युम्नादिकांस सहाय—प्रवरजयंत मदतीस येतात (३४-४५); प्रद्युम्नाची माया, पराक्रम व वज्रनाभास मूर्छित करणें (४६-६१); सावध होऊन वज्रनाभ प्रद्युम्नास मूर्छित करतो (६२-६५); पांचजन्यनादानें जागृत झालेला प्रद्युम्न वज्रनाभास मारतो (६६-६८); इतर असुरांचा संहार (६९-७१); निकुंभ पळाला (७२); वज्रनाभाच्या राज्याचे चार भाग करून प्रद्युम्न-जयंतसांबगद यांच्या पुत्रांस देऊन त्यांस अभिषेक केला (७३-७६), इंद्र सर्वांचा सत्कार व रक्षण करण्यास जयंतास सांगतो (७७-८१); इंद्र व कृष्ण परतले व गदसांबादिक वज्रपुरीं राहिले (८२-८५).

**अध्याय ३८ वा (३२०):**—विश्वकर्मनिर्मित अनेकमणिरत्नकनकप्रासादादिपरिपूर्ण द्वारकेंत प्रभूंचें आगमन (१–१३), सर्वांच्या भेटी व सत्कार (१४-२४), नारदागमन (२५), जनमेजयाचे प्रश्नावरून वैशंपायन त्यास शंबरासुरवधकथा सांगतात —(२६–१०७).—शंबर कृष्णपुत्र प्रद्युम्नास पळवून (२६-३०), आपली स्त्री मायावती इच्या हवालीं करितो (३१), ती त्यास दाईहातीं वाढवित्ये (३२-३४), प्रद्युम्न तरुण होतो (३५), मायावतीची त्याकडे विषयदृष्टि (३६), प्रद्युम्नाचा क्रोध (३७-३८), 'मी तुझी प्रिया च आहें, माता नव्हे' इ०नातें मायावती त्यास स्पष्ट करून सांगते (३९-४३), मायावती त्यास मायाशस्त्रज्ञान व सुतेज देते (४४), प्रद्युम्नाची खोडी (४५); युद्धारंभ (४६), इंद्रादिकांचें आगमन (४७), द्वारपाळानें प्रश्न केल्यावरून इंद्र त्यास सर्व पूर्वकथा सांगतो कीं, शंकरानें पूर्वीं कामास भस्म केल्यावर, शरण आलेल्या कामपत्नीस 'तुझा पती पुढें प्रद्युम्न होईल, त्याचें

शंबर हरण करील, तूं कपटवेषानें शंबराची पत्नी होऊन प्रद्युम्नाचें संगोपन करून पुढें त्याजकडून शंबराचा वध करवून इच्छित लाभातें पाव' इत्यादि वर दिला; तस्मात् आज प्रद्युम्नास जय मिळणार (४८-६२); प्रद्युम्न शंबराचे शंभर सुत मारतो (६३-६४), शंबराचे अनुक्रमें केतुमाली (६५-६९), शत्रुहंता (७०), प्रतर्दन (७१-७७) या शंबरसचिवांचा प्रद्युम्नानें वध केला; सर्व शस्त्रास्त्रें निरुपयोगी ठरल्यावर दुर्गाप्रसादानें मिळालेला अतिभयंकर मुद्गर शंबरानें टाकण्यास घेतला (७८-८९); दुर्गास्तुति करून 'हा मुद्गर माझ्या वक्षःस्थळीं हाराप्रमाणें रहावो' असा वर प्रद्युम्नानें मिळविला (९०-९३); मुद्गराचा हार च झाला (९४-९६); वैष्णवास्त्राच्या योगानें प्रद्युम्न शंबरास वधितो (९७-१०१), सुरांची कुसुमवृष्टि (१०२-१०३); प्रद्युम्न मायावतीसह द्वारकेस येऊन सर्वांस हर्षवितो (१०४-१०७).

**अध्याय ३९ वा [२२९]**:—धन्योपाख्यान [१-३९]—बळदेवाह्निक [१], सांबजन्म [२], सांबाचा विद्याभ्यास [३], दुर्योधनयज्ञार्थ आलेला नृपसमूह कृष्णदर्शनास येतो [४-६], सर्वांचा सत्कार [७-८]; 'कृष्णा! तूं आश्चर्य व धन्य आहेस' या नारदोक्तीस कृष्णाचें उत्तर [९-११]; नारदाचें समाधान [१२]; 'हें गूढ भाषण काय' म्हणून राजानीं प्रश्न केल्यावरून कृष्णाज्ञेवरून नारद उत्तर देतो [१३-१५], "सुरनदींतील कूर्माला धन्य म्हटलें [१६-१७], त्यानें 'गंगा' [१८], तिनें 'सागर' [१९], त्यानें 'क्षिति' [२०], तिनें 'पर्वत' [२१], त्यानीं 'प्रजापति' [२२-२३], त्यानें 'वेद' [२४-२५], त्यानीं 'यज्ञ' [२६-२८], त्यानीं 'विष्णु' [२९-३३], अशी एकाहून अधिक धन्यपरंपरा लागली; त्याप्रमाणें विष्णूचा शोध करीत येथें येऊन तृप्ति पावलों" असें सांगून नारद गेला [३४-३८], धन्योपाख्यानमाहात्म्य [३९].

**अध्याय ४० वा [२३२]**:—'धर्माला कृष्णमाहात्म्य सांगण्याविषयी अर्जुनास भीष्माची आज्ञा [१] झाल्यावरून तो तें वर्णितो [२]; कृष्णाची सोमयज्ञदीक्षा [३]; एक ब्राह्मण आक्रोश करीत येऊन स्वपुत्ररक्षणार्थ कृष्णास प्रार्थितो [४-८]; कृष्णाचें ब्राह्मणरक्षणव्रत [९], अर्जुन तें काम

पतकरण्यास सिद्ध होतो [ १० ]; स्मितपूर्वक कृष्णानीं तें मान्य केलें [ ११-१२ ]. अर्जुन यादवांसह विप्राच्या गावीं गेला--इतक्यांत ब्राह्मणी प्रसूत होऊन पुत्र एकाएकी नाहींसा झाला व तें विप्रगृह शोकालय झालें [१३-१९]. आकाश आम्ही शरांनीं व्यापिलें परंतु व्यर्थ [ २०-२४ ], ब्राह्मण भग्नप्रतिज्ञ अर्जुनाची निर्भर्त्सना करितो [ २५-३१ ]; कृष्ण अर्जुनाचें सांत्वन करतो [ ३२-३३ ], अर्जुनविप्र यांना घेऊन कृष्ण स्वतः निघाले [ ३४-३५ ], सागरोल्लंघन [ ३६-४३ ], कैलासादि पर्वतांतून मार्गाक्रमण [ ४४-४६ ], दाट तम व चक्रानें त्याचा नाश [ ४७-५१ ], श्रीकृष्ण अद्भुतपुरुषाकारतेजांत शिरून विप्राचे चारी पुत्र त्यास आणून देतो [५२-५६ ], श्रीकृष्णाचें परत द्वारकेस येणें [५७]; ब्राह्मणाची पूजा व सत्कार [५८-६०], 'श्वेतद्वीपपति माझ्या भेटीकरितां विप्रपुत्र हरण करीत होता,' असें श्रीकृष्ण अर्जुनास सांगतो [ ६१-६२ ].

**अध्याय ४१ वा** [ ३१८ ] बळिपुत्र बाणास सहस्रबाहुत्व व स्वपुत्रत्व वरानें देऊन शंकरानें त्याच्याप्रीत्यर्थ 'शोणितपुर' वसवून त्यास पार्वतीपुत्र बनविलें व आंगें रक्षिलें ( १-९ ); बाणाचें राज्य, त्याचें ऐश्वर्य व श्रेष्ठता ( १०-१५ ); भुजकंडूशमनार्थ बाण शंकराची प्रार्थना करतो (१६-२१); 'तुझा ध्वजभंग होईल तेव्हां हा योग येईल' हें शंकरोत्तर ( २२-२३ ) बाणानें हर्षानें आपल्या कुभांड प्रधानास सांगितलें ( २४-२८ ), कुंभांड बाणास दोष देतो ( २९ ), ध्वजभंग व उल्कापात ( ३०-३१ ) पाहून कुंभांडाचा विषाद व आनंदित बाणाचें सुरासेवन ( ३२-३५ ); शंकराला मोहूं पाहणारी चित्रलेखा अप्सरा अंशानें कुंभांडसुता होत्ये ( ३६-४० ); शंकरपार्वतीक्रीडा पाहून मनांत ती वांछा धरणाऱ्या बाणसुता उषेस पार्वतीकडून इच्छितवरप्राप्ति ( ४१-४६ ), इच्छितसिद्धीची वाट पाहणारी उषा झुरून झुरून क्षीण झाली [ ४७-५० ]; सखींकडून वर्तमान कळल्यावरून घाबरलेल्या उषामातेनें वैद्यांना दाखवून उपाय केले [ ५१-५७ ]; चतुर नारींचा कयास [ ५८ ]; वराचें साफल्य व स्वप्नभोग [ ५९-६० ]; तज्जन्य विषाद [ ६१ ]; कुंभांडसुता उषेस 'झाली गोष्ट निष्पाप आहे' असें सांगून धीर देते [ ६२-६६ ]; उषेनें तीस उपाय विचारला [६७] व तिच्या सांगण्यावरून [६८] चित्र-

लेखेस इष्ट कामगिरी सांगितली [ ६९ ]; सात दिवसांची मुदत घेऊन [ ७०-७३ ] चित्रलेखेनें एका चित्रपटावर सर्व सुंदरांचीं चित्रें काढून स्वप्नप्राप्तपुरुष ओळखण्याकरितां तीं उषेस दाखविलीं [७४-७६]; अनिरुद्धाची ओळख पटल्यावर [ ७७ ] तो कृष्णपौत्र होय अशी कुलशीलाची माहिती उषेनें काढिली [ ७८-८१ ]; चित्रलेखेवरच अनिरुद्धास आणण्याचें काम सोंपविलें ( ८२ ); बरेच आढेवेढे घेतल्यावर उषेचा निर्धार पाहून चित्रलेखा द्वारकेस आली [ ८३-९० ]; नारदापासून चित्रलेखेस तामसीसुविद्याप्राप्ति [ ९१-९५ ]; विरही अनिरुद्धाच्या मंदिरात चित्रलेखेचा प्रवेश [ ९६-९८ ] व त्यास उषा-संतापनिवारणार्थ विनंति [ ९९-१०४ ], अनिरुद्धाची येण्यास अनुमति [ १०५-१०६ ] चित्रलेखा त्यास गुप्त रीतीनें नेत्ये [ १०७-११० ]; अनिरुद्ध-उषाभेट [ १११-११२ ]; पार्वतीप्रार्थना [ ११३-११४ ], दोघांचा गांधर्व-विवाह व प्रेमक्रीडा [ ११५-११६ ], गौपनस्फोट, युद्ध व असुरांचें कंदन [ ११७-१२१ ]; बाण व अनिरुद्ध यांचें घोर युद्ध [ १२२-१४२ ], बाणाची महोग्र शक्ति निष्फळ करून अनिरुद्ध त्यास मूर्छित करतो [ १४३-१४७ ] कुंभांडाच्या सूचनेवरून [ १४८ ] बाणानें मायेनें सर्व शर तोडून अनिरुद्धास वेष्टिलें [ १४९-१५० ]; 'हा दिव्य पुरुष दिसतो, जांवई होण्यास योग्य आहे,' असा कुंभांडाचा सल्ला [ १५१-१५७ ] बाणास पटून [ १५८ ], अनिरुद्धास बंधांत ठेवून बाण घरीं गेला [ १५९ ]; 'नारद कृष्णाला वार्ता कळवील' अशी अनिरुद्धाची अटकळ [ १६० ], दुःखित उषा व तिचें सांत्वन करण्याचा अनिरुद्धाचा प्रयत्न [ १६१-१६५ ].

**अध्याय ४२ वा [ ३५३ ]** —अनिरुद्धकृत दुर्गास्तव [ १-३ ], दुर्गा त्याचे बंध तोडिते, पण कृष्ण येईपर्यंत तसें च बळें च बद्ध राहण्यास सांगते [ ४-८ ], अनिरुद्धहरणामुळें द्वारवतींत शोक [ ९-१३ ], विपृथु [ १४ ], कृष्ण [ १५-१९ ], सात्यकि [ २० ], अनाधृष्टि व कृष्ण [ २१-२५ ], अक्रूर [२६-२९] यांचीं भिन्न मतें व सूचना; यादवसभेत नारदागमन व चिंतित यादवांस अनिरुद्धवृत्तांतकथन [ ३०-४१ ] नारदाच्या सूचनेवरून [ ४२ ] प्रभु गरुडाचें स्मरण करतात [ ४३ ]; गरुडाची स्तुति व साहाय्यार्थ प्रार्थना

[ ४४-४९ ], त्याचें उत्तर [ ५० ]; कृष्णरामादि निघाले [ ५१-५२ ]; शोणितपुराचें रक्षण करणाऱ्या आहवनीय अग्नीचें तेज [ ५३-५४ ], रामाची चिंता [ ५५ ], कृष्णाज्ञेवरून [ ५६ ] गरुड अग्नीचें शमन करतो [ ५७-५८ ], अंगिरापराभव [ ५९-६१ ]· कृष्णाचा शोणितपुरप्रवेश [ ६२-६३ ]; प्रमथाना कृष्ण पराभवितो [ ६४-६६ ], ज्वर भस्मानें रामाचा दाह करतो [ ६७-६९ ]; घाबरलेल्या संतप्त रामाचा दाह [ ७०-७१ ] कृष्ण आलिंगनानें शमवितो [ ७२-७३ ], कृष्णाचा हि दाह-ज्वर कृष्णदेहात शिरून उपद्रव करूं लागला [ ७७-७९ ], ज्वर शरण आला व त्यास कृष्णानें वर दिला [ ८०-८५ ], धूम पळणाऱ्या असुराना बाण व कुंभांड प्रोत्साहन देतात [ ८६-९० ]; श्रीहरिहरयुद्ध–नानास्त्रशस्त्रप्रयोग, त्रिपुरांतक शर सोडूं पहाणाऱ्या शिवास कृष्ण जृंभास्त्रानें मोहितो [ ९१-१०६ ], ब्रह्मा पृथ्वीस धीर देतो [ १०७-१०८ ], ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून ‘ आपण हरिहर एक ’ ही जाणीव होऊन शंकर युद्ध सोडतात व एकमेकांचें आलिंगन [ १०९-११३ ], स्वतःस घडलेलें हरिहरैक्यदर्शन ब्रह्मा नारदादींस सांगतो [ ११४-११८ ], मार्कंडेयाचें हरिहरस्तवन ( ११९ ).

**अध्याय ४३ वा ( ३६४ )** —कार्तिकस्वामीचें व कृष्णाचें घोर युद्ध ( १-११ ), नग्न कोटवीला पार्वतीनें मधें उभी करवून गुहास काढवून युद्ध थांबविलें ( १२-१७ ), बाणाची दर्पोक्ति ( १८-२० ), बाणकृष्णांचें तुंबळयुद्ध ( २१-३२ ), मूर्छित बाणास पाहून नारदाचें विकट हास्य ( ३३-३६ ); गरुडमयूरयुद्ध ( ३७ ), बाणाचा भंग ( ३८-४० ), शंकराज्ञेवरून नंदीनें बाणास दिव्यरथावर आरूढ केलें ( ४१-४४ ) व बाण ब्रह्मशिरोस्त्र टाकून अतुल युद्ध करूं लागला ( ४५ ); तें अस्त्र वारून कृष्णानें बाणाच्या भुजच्छेदनाची प्रतिज्ञा केली ( ४६-४९ ), नारदाचा हर्ष ( ५० ); कृष्ण चक्र सिद्ध करतो ( ५१-५२ ), शंकराचा कळवळा ( ५३ ), नग्ना कोटवीला गौरी पुनः पाठविते ( ५४ ); ‘ बाणास मारणार नाही; द्विभुज करीन ’ असें आश्वासन व ‘ जीवपुत्री हो ’ असा वर मिळवून उभा जाते ( ५६-५९ ), बाणाचा धिक्कार करून ( ६०-६१ ) चक्र सोडून बाणाचे भुज कृष्णानें खंडिले ( ६२-६४ ); रक्तार्द्र बाण पुनः

गर्जना करूं लागतां च ( ६५ ) चक्र उगारणाऱ्या कृष्णाला ( ६६ ) 'बाणास क्षमा करावी' अशी शंकराची विनंति ( ६७-६८ ), कृष्ण ती मान्य करून ( ६९-७० ) अनिरुद्धाकडे गेले ( ७१-७२ ), नंदीच्या शिकवणीवरून बाण शंकरापुढें नृत्य करतो ( ७३-७६ ), शंकर प्रसन्न होऊन त्यास निरनिराळे पांच वर देऊन आपल्या गणांत 'महाकाळ' हें नांव देऊन सामील करतात व त्याचा देह पीडारहित व अव्यंग करतात (७७-८७); कृष्णानें विचारल्यावरून ( ८८ ) अनिरुद्ध कन्यापुरात आहे असें नारद त्यास सांगतात (८९); चित्रलेखा सर्वांस अनिरुद्धाकडे घेऊन गेली ( ९० ); गरुडाला पाहतां च अनिरुद्धाचे नागपाश पुनः बाण झाले ( ९१ ), अनिरुद्धानें व उषेनें ( ९३ ) सर्वांस नमन केलें, इंद्रादिक नारदद्वारां कृष्णाचें अभिनंदन करतात ( ९४ ), कृष्णानें नारदास उलट अभिनंदन केलें ( ९५ ), नारदाच्या सूचनेवरून ( ९६ ) कृष्णानें कुंभांडाचे साहाय्यानें अनिरुद्धाचा विवाह करवून ( ९७ ९८ ) कुंभांडास शोणितपुरचें राज्य दिलें ( ९९ ); वरुणाकडे असलेल्या बाणाच्या गायी कुंभांड कृष्णाचें समर्पितो (१००-१०२), देव परतले ( १०३ ), ऊषा द्वारकेस पाठविला ( १०४ ), भामेची हि इच्छा पाहून वरुणाकडे कृष्णानें गायी मागितल्या ( १०५ १०६ ), वरुण युद्धांत पराभव पावतो ( १०७-१०९ ); 'मरेन, पण वचनभंग करून गायी देणार नाही' असा वरुणाचा निश्चय ( ११०-११२ ). कृष्णानें गायी वरुणाकडे च ठेविल्या ( ११४-११७ ); कृष्ण नारदादि ऋषि व इंद्रादि देव यांसह परत आले ( ११८-११९ ); इंद्र यदुसभेत कृष्णाचे पराक्रम व यश वर्णितो ( १२०-१२३ ); निरोप घेऊन इंद्र वगैरे स्वस्थानीं जातात ( १२४-१२५ ), आहुकाचे सूचनेवरून कुंभांडकन्या रामा व इतर ऊषासखी यांचे विवाह होऊन द्वारकेंत परमोत्सव होतो ( १२६-१३१ ).

**अध्याय ४४ वा ( ३७६ ):**—शौनकाच्या प्रश्नावरून ( १ ) सौति पाण्डववंश सांगतात ( २-१३ ):—तपोवनस्थ श्वेतवर्ण राजाचा मातृपरित्यक्त पैप्पलादिरक्षित 'अजपार्श्व' नांवाचा मुलगा ख्यात होतो ( २-११ ), ययातीचा पौरवांस वर ( १२-१३ ); शौनकानें प्रश्न केल्यावरून ( १४ ) सौति जनमेजयाची अश्वमेधकथा कथितो ( १५ ); व्यासाचें आगमन ( १६ ) व

'क्षत्रियक्षयाला कारण होणारा राजसूय धर्मादिकांनीं कां केला' असा व्यासांस जनमेजयाचा प्रश्न ( १७--२५ ), 'ते मोहाला बळी पडले; तूं असा पडून हयमेधाचा हट्ट धरिशील तर पुढें पृथ्वीवरील हयमेध थांबेल,' अशी व्यासांची आगाऊ सूचना ( २६-३१ ); 'काश्यप मात्र कलियुगीं हयमख करील' असें जनमेजयाचे प्रश्नास उत्तर देऊन व्यास जातात ( ३२-३४ ), भ्रान्त जनमेजयाचा अश्वमेध–इंद्र राजस्त्रीस भोगतो; ( ३५ ), राजाचा क्रोध–( ३६-३७ ); अध्वर्यूंचा खुलासा ( ३८-३९ ), 'आजपासून हयमेध बंद' ( ४० ) असा राजाचा शाप( ४१–४२ ), ब्राह्मणांस ( ४३-४६ ) व स्त्रीस हद्दपारी ( ४७-४८ ), 'ही तुझी स्त्री मूळची रंभा असल्यामुळें इंद्रास भोग्य होय व म्हणून यांत ही निर्दोष आहे,' असें विश्वावसु राजास सांगतो ( ४९-५७ ), राजा स्त्रीस परत घेतो ( ५८ ); मुनिवचनावर त्याचा विश्वास ( ५९ ); या कथेची फलश्रुति ( ६० ).

**अध्याय ४५ वा ( ३८१ )**—पुष्करोत्पत्तिकथा–सव्वीस अध्यायांचें विषय-कथन–( १ ३४ ).

**अध्याय ४६ वा ( ३८५ ):**—राजानें विचारल्यावरून वैशंपायन 'वाराहावतारकथा' सांगतात ( १-२ ), कल्पान्तर प्रभु सृष्टि रचतात व ती बुडते ( ३ ); वराहरूपानें पृथ्वीचा उद्धार ( ४-५ ); देवदैत्यांची व्यवस्था ( ६-७ ), पर्वत दैत्यांना देवाविरुद्ध चिथवितात ( ८-११ ), युद्धांत इंद्राचा पराभव ( १२-१३ ); प्रभूनें प्रगट होऊन हिरण्याक्षाचा वध केला ( १४-२१ ), देवांची पूर्वस्थानीं स्थापना ( २२-२३ ); आगलावेपणाबद्दल इंद्र पर्वताचे पंख तोडतो ( २४-२५ ), मैनाकपर्वत सुटून समुद्रांत दडतो ( २६ ); उपसंहार ( २७ ).

**अध्याय ४७ वा ( ३८७ ):**—वैशंपायन नारसिंहावतारकथा सांगतात ( १-२ ); हिरण्यकशिपूचें तप ( ३-४ ), त्यानें प्रसन्न झालेल्या ब्रह्मदेवाजवळून ( ४-५ ) सर्वावध्यत्व वर मिळविला ( ६-१३ ); 'वर भयंकर असला तरी योग्य काळीं हा दैत्य मृत्यु पावेल' असें आश्वासन ब्रह्मदेव मुनिदेवांस देतो ( १४-१७ ); हिरण्यकशिपु सर्व त्रिभुवन पादाक्रांत करतो ( १८-२० ); विष्णु देवांस अभय देतो ( २१-२२ ), विचार करून ( २३-२४ ) प्रभूनें नारसिंहरूप

धारण केलें व तो हिरण्यकशिपूच्या सभेत आला ( २५ ); हिरण्यकशिपूच्या-देवसेवित सभेचा थाट ( २६-३३ ); सभेंत नरहरि प्रगट होतो ( ३४-३५ ); प्रल्हाद ' त्यांत विश्व पहा ' असें पित्यास म्हणतो ( ३६ ), दैत्येश्वराचे आज्ञे-वरून ( ३७ ) सर्व असुर नरहरीवर तुटून पडतात ( ३८-३९ ); असुरपतीनें टाकिलेलीं शेंकडों अस्त्रें नरहरीनें गिळिलीं ( ४०-४९ ); महाशक्ति, जळवर्ष सर्व व्यर्थ होतात ( ५०-५२ ); दहन पेटला असतां इंद्र शमवितो ( ५३ ५६ ); सर्व असुरमाया फुकट गेल्या ( ५७-५८ ); उत्पात ( ५९-६१ ) व त्यांचें अनिष्ट फल ( ६२-६४ ), पृथ्वीचा कंप ( ६५-६८ ); देवांची प्रभूस प्रार्थना ( ६९-७१ ); प्रभूनें सर्वांचा पराभव करून हिरण्यकशिपूला नखानें विदारून मारिलें ( ७२-७९ ), सुरांचा जयजयकार ( ८०-८१ ), ब्रह्मा व विष्णु आपापल्या लोकाप्रत जातात ( ८२ ), नरहरिमूर्तिस्थापना ( ८३ ); उपसंहार ( ८४ ).

**अध्याय ४८ वा** ( **३९५** ):—वामनावतारकथारंभ ( १ ); बळीस अभिषेक ( २ ); सचिवांच्या हितोपदेशावरून ( ३ ) बळी त्रैलोक्य जिंकण्या-करता ससैन्य निघाला ( ४-५ ), बाण, मय, अनुल्हाद, वृत्र, बळी वगैरे मोठ-मोठे असुर युद्धार्थ सज्ज होतात ( ६-३४ ); उलट इंद्र हि असुरांशीं भिडण्यास निघाला ( ३५-४० ); वरुणकुबेरयमादिकांची तयारी ( ४१-४८ ), युद्धा-रंभींचा [illegible] युद्ध ( ५ -६४ ),

देवपराभवसूचक उत्पात ( ६५ ); समरयज्ञाचें वर्णन ( ६६ -७३ ), बाणसावित्र त्यांचें घोर युद्ध व सावित्राचा पराभव ( ७४ -७७ )- बाण इंद्रावर चालून जातो [ ७८ ]; बळ भुवाचा पराभव करतो [ ७९ -८१ ]; नमुचीकडून धरवसूचा पराभव होतो [ ८२—८६ ], त्वष्टा व मयासुर यांचें युद्ध, त्वष्ट्याचा पराभव [ ८७-९६ ], वायु व पुलोमा यांचें युद्ध—वायूचा पराक्रम [ ९७ १०७ ], हयग्रीव पूषास विरथ करतो [ १०८-१०९ ]; शंबरासुर भगांचा पराभव करतो [ ११०-११५ ]:—शंबराची माया [११६-१२२]; चंद्राकांचें सोमाशीं युद्ध—सोमाचें शिशिरास्त्र व पराक्रम [ १२३-१३३ ], विष्वक्सेनविरोचनयुद्ध [१३४-१३९]; कुजंभासुराचा पराक्रम [ १४०-१४५]; असिलोमा इंद्रास हात दाखवितो [ १४६-१५२ ]; वृत्राकडून अश्विनी-

कुमारांचा पराभव [ १५३-१५९ ], एकचक्र रणांत जिंकितो [ १६०-१६५ ]; रुद्र व बळासुर यांचें तुंबळ युद्ध [ १६६-१७५ ], रुद्र व राहु यांचें युद्ध [ १७६-१८२ ]; केशीचा पराक्रम [ १८३-१९० ]; वृषपर्वा निष्कंभूस पिटाळतो [ १९१-१९५ ]; काळाचें प्रल्हादाशीं युद्ध. शुक्र प्रल्हादाकरितां होमहवन करतो [ १९६-२०० ], यमाचें पलायन [ २०१-२१० ]; कुबेर व अनुह्राद यांचें तुंबळ युद्ध—एकमेकांवर बाणवृष्टि [ २११-२१९ ]; गदा, पर्वतशिखर यांहीं-करून युद्ध [ २२०-२२४ ], धनदमूर्छा [ २२५-२२७ ], अनुह्रादकुबेरांचें धीरोद्गार [ २२८-२३० ], अनुह्रादमूर्छा [ २३१-२३४ ]; परस्परांचें गदाक्षेपण [ २३५-२३७ ], कुबेर निसटतो [ २३८-२३९ ], वरुण व विप्रचित्ति यांचा झगडा [ २४०-२४२ ] वरुणावर परिघ [ २४३-२४७ ]; वरुणाच्या अस्त्राचा गरुडास्त्रानें परिहार [ २४८-२५२ ]; वरुण परतलो [ २५४-२५५ ]; समारुत अग्नि असुरांची फजिती करतो [ २५६-२६० ]; मयादिक अग्नीस शमवितात [ २६१ ], बृहस्पतीच्या प्रार्थनेवरून [ २६२ ] अग्नि पुन्हा असुरांस जाळतो [ २६३-२६४ ], प्रल्हादाच्या प्रार्थनेवरून [ २६५-२७१ ] बळि पुढें सरसावून घोर युद्ध करूं लागला [ २७२-२७८ ], देवांची प्रार्थना [ २७९ ] व इंद्राचें बळीशीं तुमुल युद्ध [ २८०-२९० ], आकाशवाणी झाल्यावरून इंद्र बळीवर वज्र न टाकतां परततो [ २९१-२९३ ]; बळीचा जयजयकार [ २९४-२९५ ]; इंद्रपदप्राप्ति व सुराज्य [ २९६-२९७ ], श्रीदेवी बळीस प्रेम संपादिते [ २९८-३०० ], इंद्र अदितीस [ ३०१ ] व ती त्यासह कश्यपास [ ३०२ ] व तो ब्रह्मदेवाला असे शरण गेले [ ३०३ ]; 'तप करून ईश्वराला तुमचा पुत्र करून घ्या ' [ ३०४-३०५ ] या ब्रह्मदेवाच्या सल्ल्याप्रमाणें कश्यपादींनीं तप करून [ ३०६-३०८ ] इष्ट वर मागितला [ ३०९-३१० ], प्रभूनें वर देऊन त्यास आश्वासन दिलें [ ३११-३१६ ], कश्यप परत आला [ ३१७ ]; अदितीस पुत्रप्राप्ति [ ३१८ ], देवांचा हर्ष [ ३१९-३२३ ], देवांनीं ' बळीपासून आमचें राज्य आम्हांस परत मिळवून द्यावें ' अशी या वामनाची प्रार्थना केली [ ३२४-३३० ], विष्णूच्या म्हणण्याप्रमाणें [ ३३१ ] देवगुरु या वामनशिष्याला बरोबर घेऊन बळीच्या अश्वमेधाला जातात [ ३३२-३३४ ]; यज्ञप्रयोगसंबंधीं चर्चेत वामन बटु जय संपादितो [ ३३५-३३८ ]; बळीचा संतोष [ ३३९-३४१ ];

वामन त्रिपादभूमि मागतो [ ३४२-३४३ ]; बळीचें आश्चर्य [३४४]; शुक्राचा बळीस इशारा [ ३४५-३४६ ]; बळीचा निश्चय[३४७-३४८ ], बळी दान सोडतो [ ३४९-३५२ ], मग त्रैलोक्याकार वाढून वामनानें बळीचें राज्य हरण करून इंद्रास दिलें [ ३५३-३५९ ], पाशबद्ध बळीस सुखानें राहण्यास पाताळांत स्थापिलें [ ३६०-३६३ ], नारदानुग्रहीत बळी 'नमोऽस्त्वनंतपतये' इत्यादि स्तुति करतो [ ३६४-३६५ ], दयार्द्र प्रभूंच्या आज्ञेवरून गरुड बळीस पाशमुक्त करून [ ३६६-३६७ ] 'येथें रहा; बडबड केल्यास डोकें उडेल' अशी प्रभूची आज्ञा कळवितो [ ३६८-३७० ]; बळीची मान्यता [ ३७१ ], 'विधिरहित यज्ञाचे भाग सेवून येथें च स्वस्थ प्रभुस्मरण करित सुखानें रहा' असें सांगून गरुड जातो [ ३७२-३७५ ], उपसंहार ( ३७६ ).

**अध्याय ४९ वा ( ४२७ ):**–कृष्णाच्या शिवाराधनेबद्दल जनमेजयाचा प्रश्न ( १-२ ), वैशंपायन हरिहर हे एक च आहेत असें म्हणून 'कैलासाचळयात्रा' सांगतात ( ३-८ ), 'तुमच्यासारखा पुत्र मला व्हावा' अशी रुक्मिणीची कृष्णास प्रार्थना ( ९-११ ), 'शिवाराधन करून तुझी इच्छा पूर्ण करीन' असें कृष्णाचें उत्तर ( १२-१७ ); प्रातःकाळीं यादवसभेंत श्रीकृष्णानीं 'मी कैलासाला जाणार, नरकादिअसुर मारले, आतां एक पौंडूक काय तो उरला, तरी फार सावध रहा, दारू पिऊं नका, वेशी उघड्या टाकूं नका, सदैव सज्ज रहा, पौंडूक केंव्हा घात करील याचा नेम नाहीं,' अशी कळकळीची इशारत दिली ( १८-३५ ); सात्यकीचें ( ३६-३७ ) व उद्धवाचें विनयपूर्वक उत्तर ( ३८ ), बळरामास कृष्णाची विनंति ( ३९-४० ) व त्याचें आश्वासन ( ४१-४२ ); प्रभु बदरीला जाऊन समाधि लावतात ( ४३-४८ ), इतक्यांत 'धरा, मारा, कोंडा, कुत्रे सोडा, मांसरक्त खा, विष्णुकृपेनें आपली इच्छा सफल होईल,' असे शब्द सिंहादि वन्यश्वापदांच्या गर्जनेंत मिसळून झालेल्या गलग्यामुळें प्रभूंनीं समाधि उतरली ( ४९-५६ ), व 'हें काय आहे' असें म्हणत विस्मित होतात तों च ते सर्व श्वापद व त्यांच्या मागें लागलेले पिशाच आश्रमांत भरून एक च कोलाहल झाला ( ५७-६५ ), 'हे पिशाच कोण? यांनीं च का माझी स्तुति केली?' असा विचार प्रभु करतात ( ६६-६८ ), तों च ते उग्र पिशाच रक्तमांस खातांत कृष्णाजवळ आले ( ६९-७३ ); 'मर्त्या! तूं कोण?' असा पिशाचांचा

सवाल (७४-७५); कृष्णाचें उत्तर:—मी यादव येथें शिवाराधनार्थ आला आहें; या पवित्र भूमीला भ्रष्ट करणारे तुम्ही कोण? (७६-८२); 'मर्त्या! एक: माझें नांव घंटाकर्ण. विष्णुद्वेष्ट्या मला श्रीशंकरानें श्रीविष्णूची च आराधना करण्यास सांगितलें व त्याप्रमाणें त्या द्वारकाधीश पूतनाकंसारीची मी आराधना करितों' असें म्हणून (८३-९७) घंटाकर्ण पिशाच्च एकमांसावर ताव देऊन ध्यानस्थ झाला (९८-१००), विष्णुस्तवन करता च प्रभुदर्शन त्यास झालें (१०१-१०८); समाधि उतरून बाहेर पाहतों तों समाधांत दिसलला च प्रभु (१०९-११०); मग नाचून हांसून प्रभूचें सर्व अवतारकृत्य गाता झाला (१११-१२०), प्रभूला ब्राह्मणशवाचा नैवेद्य पिशाचानें अर्पण केला (१२१-१२४), प्रेमळ भगवन्तानीं 'ब्राह्मणवध निंद्य आहे' वगैरे उपदेश त्यास केला (१२५-१३१) व त्याचें आंग स्पर्शून दिव्य केलें (१३२-१३५) व म्हणाले "आतां बंधूसह स्वर्गांत नांद व वर माग" (१३६-१३९); 'माझी कथा ऐकणारा मुक्त व्हावा' असा मागितलेला वर देऊन (१४०-१४२) प्रभूनें त्यास बोलवून स्वर्गांत धाडलें (१४३-१४५), ब्राह्मणास हि उठवून स्वस्थानीं पाठविलें (१४६-१४७); उपसंहार (१४८).

**अध्याय ५० वा [४४०]**:—मुनींना रात्रिवृत्त कळवून [१] प्रभु कैलासीं आले [२], कैलासवर्णन [३-१०], बारा वर्षं तपाचा संकल्प [१२-१३], तपारंभ [१४]; चक्रादि आयुधांची कृष्णसेवा [१५-१८]; प्रभूचे उग्र नियम [१९-२२], तप संपताना इंद्रादि देव दर्शनार्थ आले [२३-२७]; श्रीशंकर हि थाटांत आले [२८-३२]; देवांची हरिहरस्तुति [३३-३५]; श्रीकृष्णाची शिवस्तुति [३६-४२]; 'पुत्रार्थ तप करालां? तथापि मला मोहूं पाहिल्यामुळें मजकडून दग्ध झालेला काम तुझा पुत्र होईल' असें शंकर बोलतात [४३-५४] व शंकरकृष्णांचा अभेद वर्णून कृष्णस्तव करतात [५५-६४], सुरमुनींना हि या अभेदभावानें भक्ति करण्यास उपदेशतात [६५-७४]; रोमांचित होत्साते सर्व सुरमुनि हरिहरांना नमून स्तवितात [७५-७९] पुन्हां एकवार निर्भर कृष्णस्तवन करून व मुनींना तें च उपदेशून शंकर गुप्त होतात [८०-९५]; मुनि [९६] इंद्रादि देव [९७] परत स्वस्थानीं व भगवान् बदरीस येऊन राहिले [९८-९९]

**अध्याय ५१ वा [ ४४८ ]:**—कृष्णशत्रु पौंड्रक सर्व मांडलिकांस जमवून 'मला खरा वासुदेव म्हणा, त्या गवळ्याला मी चिरडून टाकीन, हें म्हणणें नाकबूल करणाऱ्यास जबर दंड द्यावा लागेल' असे दर्पोद्गार काढतो [ १-१२ ], [illegible] लागले [ १४ ], द्वंद्वां[illegible] [ [illegible] ]; नारदापाशीं पौंड्रक आपले पराक्रम वर्णून 'माझी कीर्ति त्रिभुवनांत पसरव, मी खरा वासुदेव आहें' इत्यादि बडबडतो [ १६-२९ ], 'असला वाचाळपणा नाशास कारण होईल' असें नारदाचें चोख प्रत्युत्तर [ ३०-३४ ] पौंड्रक संतापून [ ३५-३६ ] नारदास जाण्यास सांगतो [ ३७-३८ ]; नारद ही हकीकत बदरींत येऊन कृष्णाला सांगतो [ ३९-४० ], प्रभूचें नारदास आश्वासन [ ४१-४४ ], पौंड्रक चतुरंगदळासह द्वारकेवर रात्रौ घाला घालतो [ ४५-५३ ]; दिवट्या पेटवून यादववीर हि युद्धास तयार होतात [ ५४-५६ ], एकलव्यानें सर्व यादवांना पिटाळून लाविलें [ ५७-६४ ], पौंड्रकाच्या आज्ञेवरून द्वारकेच्या कोटास खणती लागते [ ६५-६७ ]; सात्यकि [ ६८-६९ ], बलराम [ ७० ], उद्धव [ ७१ ] वगैरे वीर सज्ज होऊन बाहेर पडतात, शत्रूंस पळवून लावून सात्यकि 'तो चोर कोठें आहे?' अशी गर्जना करूं लागला [ ७२-७८ ]; 'बच्चा, तूं फुकट मरशील, तो निर्लज्ज खोटा वासुदेव कोठें आहे?' असें म्हणून [ ७९-८३ ] सात्यकीवर बाण टाकतो; सात्यकि त्यास धिक्कारतो [ ८४-८८ ], एकमेक एकमेकांस तीव्र बाण हाणतात [ ८९-९० ], सात्यकि मूर्छित होतो [ ९१-९२ ], सावध होऊन सात्यकि पौंड्रकास विरथ करून मूर्छित करतो [ ९३-९७ ], परस्परांचें अद्भुत गदायुद्ध [ ९८-१०७ ] दोघे गदा टाकून घोर बाहुयुद्ध करतात [ १०८-११२ ]; एकलव्याचें धनुष्य राम तोडतो [ ११३-११४ ]; खड्ग व शक्ति छेदून एकलव्यास राम मूर्छित करतो [ ११५-११८ ], अठ्यायशीं हजार निषादांशीं राम एकटा कंदन करतो [ ११९-१२३ ]; राम व एकलव्य यांचें गदायुद्ध [ १२४-१२७ ]; सूर्योदयानंतर तर राम व एकलव्य आणि सात्यकि व पौंड्रक या जोड्या दुप्पट उत्साहानें गदायुद्ध करूं लागल्या [ १२८-१२९ ]; बदरीहून निघून कृष्ण या सैन्यांत मिळाले व सर्वांस धीर देऊन त्यांनीं आनंदविलें [ १३०-१३७ ]; कृष्णाला पाहतां च त्यावर चालून जाणाऱ्या पौंड्रकास सात्यकीचा प्रतिबंध [ १३८-१४१ ], कृष्णाज्ञेवरून

सात्यकि वाद सोडतो [ १४२-१४३ ], "तूं कपटी वासुदेव, 'तोतया' आहेस, चल युद्धास तयार हो" असें पौंड्रकाचें भाषण [ १४४-१५१ ], 'उगाच बड-बड कशाला? खऱ्याखोट्याचा निवाडा आतां च होईल' असें बोलून कृष्णानें युद्ध सुरू केलें [ १५२-१६० ], दोघांचें बाणयुद्ध [ १६१-१६४ ]; पौंड्रक विरथ होतो [ १६५-१६६ ]; खड्ग मोडल्यावर [ १६७-१६८ ] पौंड्रकानें टाकिलेला परिघ हि कृष्णानें तोडला [ १६९ ], भयंकर गर्जना करून मग पौंड्रकानें चक्र सोडलें [ १७०-१७२ ]; तें चक्र चुकवून कृष्णानें सुदर्शनानें पौंड्रकाचें शिर छेदिलें [ १७३-१८० ] व कृष्ण द्वारकेस परतला [ १८१ ]; एकलव्यरामयुद्ध [ १८२-१८३ ]; रामगदेला भिऊन एकलव्य पळतो [ १८४ १८५ ] व समुद्रांत दडतो [ १८६-१८७ ], तेव्हां राम परततो [ १८८ ], शैनेय हि विजयी होऊन येतो [ १८९ ], यादवसभा [ १९०-१९१ ]; कृष्णानें शंकरापासून मिळालेल्या वराची हकीकत सांगितली [ १९२-१९६ ]; यादवांचा आनंद [ १९७ ]; मग अंतःपुरांत जाऊन रुक्मिण्यादिकांस तें हर्षवृत्त कृष्णानें कळविलें [ १९८-२०३ ]

अध्याय ५२ वा ( ४६५ ):—जनमेजयानें हंसडिंभकांची कथा विचारली, ( १ ) तेव्हां वैशंपायन ती सांगतातः—शाल्वांतील ब्रह्मदत्त राजा व त्याचा ब्राह्मणमित्र 'मित्रसह' हे दोघे निपुत्रिक पुत्रप्राप्त्यर्थ ईशाराधन करीत होते ( २-६ ); राजाला दोन 'हंस व डिंभक' व मित्रसहाला 'जनार्दन' असे पुत्र प्राप्त झाले ( ७-९ ), जनार्दनाची सज्जनता ( १०-११ ); हंसडिंभकानी तप करून ( १२-१३ ) शंकरापासून पाशुपतादि अस्त्रें व समरविजयित्व संपादिलें ( १४-१८ ), मग घरीं येऊन सर्वांस भेटले ( १९-२० ); तिघे पुत्र सर्वांस सुखवितात ( २१ ), मृगया करतांना एकदां हंसडिंभक कश्यपकृत वैष्णवसत्राला गेले ( २२-२५ ), व 'आम्ही राजसूय करणार आहों, त्या वेळीं आपलीं अग्निहोत्रें घेऊन आमच्या शहरीं या' असें हंस त्या सत्रकर्त्या मुनींस म्हणाला ( २६-२९ ), मुनि 'बरें' म्हणाल्यावर हंसडिंभक तेथून गेले ( ३०-३१ ); दुर्वासाश्रमांत येऊन 'हें भूत कोण? गृहाश्रम यानीं कां सोडला?' ( ३२-३६ ), असें म्हणून दुर्वासाची त्यानीं मनसोक्त निंदा केली ( ३७-३९ ); हें पापकृत्य पाहून भयभीत जनार्दन ( ४०-४१ ) त्या राजपुत्रांस हटावतो ( ४२-४६ )

दुर्वासाची द्विधा मनःस्थिति ( ४७ ) होऊन, शिष्यांस व जनार्दनास देश सोडण्यास ( ४८-४९ ) सांगून त्या राजपुत्रांस त्यानें 'कृष्ण तुमचा नाश करील' असा शाप दिला ( ५०-५२ ), दुर्वासाची लंगोटी भिजल्या-नंतर ( ५३ ) त्या तापामुळें सर्व मुनि पळाले ( ५४ ); जनार्दन त्यास वारण्याचा यत्न करतो ( ५५ ); दुर्वासाची पुन शापोक्ति ( ५६-६० ). जनार्दनास दुर्वासाची प्रेमोक्ति ( ६१-६३ ); राजपुत्राचे अत्याचार ( ६४ ); जनार्दन परतला ( ६५ ) पांचशें मुनींसह दुर्वास कृष्णा-कडे आला ( ६६-७० ); पूजा करून येण्याचें कारण कृष्णानें विचारिलें ( ७१-७२ ); दुर्वासानें सर्व हकीकत सांगून मोठ्या कळवळ्यानें 'कृष्णा! तुला सर्व माहित असून कां विचारतोस? माझा ताप दूर करून दुष्टाचा नाश करून बीद राख' अशी प्रार्थना केली ( ७३-८७ ), कृष्णानें आश्वासन दिल्यावर ( ८८-९१ ) दुर्वासानें कृष्णाचें कल्याण चिंतिलें ( ९२-९३ ), कृष्णाच्या आग्र-हामुळें ( ९४ ) दुर्वासानीं सशिष्य भोजनादि सत्कार स्वीकारिला ( ९५-९६ ); हंसडिंभक आपल्या बापास राजसूय करण्याची मसलत देतात ( ९७ ); 'कृष्ण, भीष्म वगैरे जिवंत असताना राजसूय करणें साहसाचें होईल' असा जनार्द-नाचा सल्ला ( ९८-१०४ ); 'जा, आमच्यापुढें युद्धांत कोण टिकेल? कृष्णा-कडे जाऊन कराबद्दल मीठ घेऊन येण्यास त्याला फर्माव' अशी जनार्दनास हंसाची आज्ञा ( १०५-१०९ ); पेंचात पडलेला जनार्दन अक्रूराप्रमाणें कृष्ण-गुण मनात वर्णीत द्वारकेस येऊन कृष्णाप्रत पहाता झाला ( ११०-११६ ); याना वंदन करणें च योग्य आहे ( ११७-११८ ) असा विचार करून राम-कृष्णांस जनार्दनानें नमन केलें ( ११९-१२० ), दूत होता तथापि त्यास आसन देऊन कृष्णानें सर्वांचें कुशल पुसून अभय दिलें ( १२१-१२५ ); मग जनार्दनानें कष्टानें तो निरोप सांगितला ( १२६-१२७ ); कृष्णप्रमुख यादवांचें हास्य ( १२८ ); कृष्णाचा विनोदोद्गार ( १२९-१३० ), सलज्ज जनार्दन ( १३१ ); 'तरवारीनें च मी कर देण्यास येतों; युद्धाची जागा ठरवा' असा उलट जबाब सांगून ( १३२-१३५ ), कृष्ण जनार्दनास म्हणाले, "तूं भिवीक, तरी सात्यकीला तुझ्याबरोबर देतों" ( १३६-१३७ ); सात्यकीस कृष्णाची आज्ञा ( १३८-१३९ ); सात्यकीला नेऊन जनार्दनानें हंसास ( १४०-१४२ ) व डिंभास ( १४३ ) भेटविलें; कुशलप्रश्न झाल्यावर ( १४४ ) जनार्दनास

कृष्णदर्शनाची वार्ता हंसानें विचारिली ( १४५ ); 'त्या परम थोर प्रभूला पाहून मी धालों, तूं त्याच्याशीं वैर करून पाप जोडूं नकोस' अशी हंसाला जनार्दनाची विनवणी ( १४६-१५१ ); 'कृतघ्ना! चल चालता हो' असें हंसाचे कोधोद्गार ( १५२-१५५ ); 'कर कुठें आहे' असें सात्यकीस दटाविल्यावरून ( १५६ ) 'मूर्खा! थांब, तुला योग्य कर देण्याला कृष्ण येत आहे, घेण्याची जागा बोल' असें तेजस्वी उत्तर सात्यकि देतो (१५७-१६७); 'त्या गवळ्याला पुष्करदेशीं बोलाव,' असें उत्तर मत्त हंसाकडून मिळतें ( १६८-१७४ ), 'येथें च तुला मारला असता, पण मी दूत पडलों' असें म्हणून ( १७५-१७६ ) सात्यकीनें परत येऊन कृष्णाला वृत्त कळविलें ( १७७ ), कृष्ण सबळ युद्धार्थ निघाला ( १७८-१७९ ), हंसडिंभकांची तयारी ( १८०-१८१ ), इंद्रजेता विचक्र दैत्य हंसाचे मदतीस येतो ( १८२-१८६ ), पुष्करास सर्व जमले ( १८७-१८९ ), दारुण संग्राम ( १९०-१९२ ), जोड्याजोड्यांचीं युद्धें ( १९३-१९४ ), विचक्र व कृष्ण यांचें अतितुंबळ व चिकाटीचें युद्ध, विचक्र दग्ध होतो ( १९५-२०९ ); हंस व बळराम यांचें घोर व विस्मयजनक युद्ध (२१०-२१७); डिंभक व सात्यकि यांचें अंगावर रोमांच उभे करणारें धनुर्युद्ध ( २१८-२२७ ), वसुदेवोग्रसेनांना पिटाळून हिडिंबासुर त्यांस खाण्याकरतां मागें लागतो ( २२८-२३३ ); तें पाहून बळराम हिडिंबास लोळवून दूर फेंकतो ( २३४-२३८ ); सूर्यास्तामुळें युद्ध थाबतें ( २३९-२४१ ), एकवटून शरवर्षाव करणाऱ्या यादवांस हंस पिटाळून लावतो ( २४२-२४५ ); तेव्हां हंसकृष्ण व रामडिंभक या जोड्यांचें युद्ध जुंपतें ( २४६-२४८ ); शंकराकडून आपल्या भक्ताच्या—हंसडिंभकाच्या—मदतीस आलेल्या पिशाचद्वयास उचलून कैलासावर फेंकतो ( २४९-२५४ ), गर्वोक्ति वदून ( २५५-२५७ ) हंस कृष्णावर बाण टाकतो ( २५८ ); कृष्णाची तयारी ( २५९-२६० ); कृष्ण अग्न्यस्त्र सोडून हंसाला निवारण्यास आह्वान करतो ( २६१-२६५ ), परस्परांचे अस्त्रप्रयोग ( २६६-२७० ); श्रीकृष्णानें वैष्णवास्त्र योजितां च हंसानें भिऊन यमुनेच्या डोहांत बुडी दिली ( २७१-२७३ ), कृष्ण मागोमाग यमुनेंत शिरला ( २७४-२७७ ), हंसाला मारून कृष्ण वर निघाला ( २७८-२७९ ); मग कृष्णानें राजसूय केला ( २८० ); प्रभुविजय (२८१); डिंभक पुढें व मागें रामकृष्ण जातां जातां

डिंभकानें यमुनेंत उडी दिली (२८२-२८५); कृष्णास रागावून बोलतो (२८६); कृष्णाचें उत्तर (२८७) ऐकून पुन्हां व्यर्थ शोध केल्यावर (२८८) जीभ हसडून डिंभकानें जीव दिला (२८९); दोघां सच्छलकाचा असा नाश करून (२९० २९१) भगवान् चार दिवस गोवर्धनीं राहिले (२९२-२९३).

अध्याय ५३ वा (४८९):—रामकृष्णांस भेटण्याकरतां गोवर्धनास नंदप्रभृति-गोपगोपी आले (१-४); नमन होऊन (५-७) त्यांनीं कुशल-प्रश्न केले (८), नंद (९) व यशोदा यांचीं उत्तरें (१०-११), कृष्णाचा प्रेमळ धन्यवाद (१२-१४); परस्परालिंगनें (१५-१७); मग प्रभु पुष्करास आले (१८) व मुनींना सुचविते झाले (१९), ऋषींनीं नमन करून कृष्णाची स्तुति केली (२०-२७); माझें सज्जनपरित्राण हें ब्रीद च आहे असें कृष्णाचें आश्वासन (२८-३१); प्रभु द्वारकेस परतले (३२), त्यांचा सत्कार (३३ ३५), भारतमाहात्म्य (३६-३७); कथा पुढें (३८).

अध्याय ५४ वा (४९२)—जनमेजयाचा प्रश्न.—स्थूल, सूक्ष्म, कारण देहत्रयातील त्रिपुराचा, श्रवण, मनन व निदिध्यास हे तीन अक्ष असणाऱ्या त्र्यक्षानें-विद्वानानें कसा नाश केला तें सांगा (१-३), वैशंपायनाचें उत्तर व गूढाचें विवरण (४-५):—त्रिपुर-त्रिपुरस्थ कामक्रोधादिक असुर यांचे वर्णन (६-१८); शमादि देव शंकरास शरण जातात (१९-२२); त्यामुळे कामादि दानव पळून दडून बसतात (२३-२७); शमादि देव पुन्हां ईश्वरास शरण जातात (२८-३१), महादेवत्र्यक्ष म्हणजे बोध-असुरांस मथितो (३२-३६); असुर रात्रीं पळावतात (३७-३९); सूक्ष्मशरीरांत राहून अमरकंदप करणारा बोधशंकर स्तुतीला बळी पडून पराभव पावतो (४०-४६), मग त्रिशूळें त्यास ठोकविलें व महत्तत्त्वांत प्रवेश केला (४७-५०); पुन्हा उठलेल्या असुरांचा 'ध्यान' वीर्यानें पुन्हा नाश करून जाग्रत्स्वप्नसुषुप्त्यादि तीन हि पुर सद्विद्यारूप अस्त्रानें जाळून टाकिलीं (५१-६०); सद्धर्मानें च त्रिपुरदाह होतो असा भारताभिप्राय (६१-६४) उपसंहार (६५-६६).

नं.
ता.

श्रीगणेशाय नमः ।

## कविवर्यमोरोपंतविरचित

# हरिवंश.

( गीतिवृत्त. )

## अध्याय पहिला.

श्रीहरिगुरुतें नमुनि श्रीहरिवंशांत चित्त शिरकवितों,
इच्छुनि हें चि, वहाती भगवच्चरणीं स्वचित्तशिर कवि तों. १

१ 'हरिवंश' हें काव्य श्रीव्यासमुनिकृत महाभारतग्रंथाची वास्तविक पुरवणी आहे. पंताचे यजमान बाबूजी नाईक बारामतीकर यांचे पुत्र, व राघोबादादा पेशवे यांचे जामात पांडुरंगराव यांच्या प्रेरणेनें पंतांनीं हें शके १७०७।०८ च्या सुमारास रचिलें. यांत श्रीकृष्णचरित्र प्रमुखत्वेंकरून आलेलें आहे. पंतकृत '**मंत्रभागवत**' किंवा '**कृष्णविजय**' या उभय ग्रंथांत हि श्रीकृष्णचरित्रच वर्णिलें असून ते ग्रंथ यापेक्षां सरस असल्यानें तें च चरित्र या काव्यांत वाचण्याची लोकप्रवृत्ति साहजिक च कमी आहे, म्हणून पंतांच्या इतर काव्यग्रंथांप्रमाणें याची असावी तितकी प्रसिद्धि नाहीं. २. अर्थ.—श्री (श्रीयुत) [ ग्रंथारंभीं मंगलाचरणार्थ व निर्विघ्नपरिसमाप्तीकरितां ] [ माझे ] गुरु 'हरि' [ पंतांच्या चार गुरूंपैकीं एक ] यांस [ त्यांच्या आशीर्वादार्थ ] नमुनि [ मीं ] 'श्रीहरिवंश' काव्य लिहिण्याकडे मन लावितों; [ कारण, ] कवि तों ( शहाणे म्हणून जेवढे आहेत तेवढे ) भगवच्चरणीं स्वचित्तशिर अर्पण करितात, [ आणि ] माझी हि तीच इच्छा आहे.

श्रीपांडुरंगरायें असकृत्[1] प्रेमेंकरूनि सांगावें,
भगवन्निदेश[2] जाणुनि, सुयश यथाबुद्धि मग न कां गावें? २
भगवद्विभूतिरसिकप्रेरण[3] करवी सुकर्म उत्साहें,
साधुसभेंत बहु स्तुति सत्कीर्ति[4] पावे, कधीं न कुत्सा,[5] [6]हें. ३
श्रीनारदवाल्मीकिव्यासपराशरशुकादि सन्मुनि हो!
नमितों, हरिगुणकीर्तन भज इतराला हि हें चि जन्मुनि हो[7]. ४
वैशंपायनमुनिला सांगे श्रीव्यास सुज्ञराय कथा
जनमेजयासि तैसें तो, सौति हि शौनकासि आयकवी. ५
गंगेंत[8] स्वल्पें ही परिपूर्ण चि घट, न लेश मग मावे,
तद्विंदु सेविते ही तत्वज्ञ शंकरोन न गमावे. ६
सुकुमारबुद्धि[9] वक्ते श्रोते जे, त्यांसि कीर्तनश्रवण[10]
व्हाया, स्वल्पा चि कथा लिहिन रसिकसाधुरंजनप्रवण[11]. ७

---

१. वारवार. २ भगवताची च आज्ञा समजून. ३ भगवताचे च अंशरूप जे रसिकजन त्यांची प्रेरणा. ४. सत्कार. ५ निंदा. ६. अशा प्रेरणेनें केलेलें सुकर्म, ' पावे ' याचा कर्ता ( सज्जनप्रेरणेनें सत्कार्यास उत्तेजन मिळून तें कार्य सन्मानास पात्र होतें च होतें ) ७ होवो, वडो ८. समावार्थ —( हरिचरित्ररूपी अगाध गंगाजलांत ) स्वल्प ही (थोड्याशा जलानें) घट परिपूर्ण चि ( पूर्णपणें भरून निघतो ), भांड्याच्या मगदुराप्रमाणें त्यांत जलसंचय होतो व त्यापेक्षां एक थेंब हि त्यांत मग मावत नाहीं; म्ह० माझ्या सामर्थ्यानुसार मी हरिगुणकीर्तन करीत आहें, तें अल्प आहे, हा दोष माझ्या अल्पसामर्थ्याचा, तथापि गंगेचा बिंदु सेवन करणारे हे खऱ्या ज्ञान्यास संबंध गंगेस आपल्या जटामुकुटांत ठेवणाऱ्या शंकरापेक्षा उणे ( पवित्रपणांत कमी प्रतीचे ) वाटू नयेत, म्ह० हरिगुणवर्णनपर अशी माझी ही कृति केवळ अल्प आहे, म्हणून पवित्रपणांत ती हलक्या प्रतीची वाटण्याचें कारण नाहीं. ९. नाजुक बुद्धीचें, ज्यास विशेष मानसिक श्रम होत नाहींत असे [ श्रोते व वक्ते ]. १० वक्त्यांस कीर्तन व श्रोत्यास श्रवण ११. रसिक व सज्जन यांचें मनोरंजन करण्यांत दक्ष, किंवा, रसिकांचें साधु ( चांगलें ) रंजन करण्याविषयीं दक्ष. पहिला अर्थ सरस, रसिक व साधु या अगदीं भिन्नरुचि वर्गास सारखी च आनंददायी अशी पंतकाव्यरचना बहुतांशीं आहे.

स्वल्पा हि हरिकथा करि तृप्त हरिजना बुधा समग्रास,
ताता[1] होय भरविला बाळें एक हि सुधासम ग्रास. ८
'श्रीमंत्रभागवत' या नामानें ग्रंथ जो, तयांत करी
निजचरितांचा संग्रह, कांहीं येथें[2] हि करिल तो[3] चि हरी. ९
श्रीनारायण भगवान् विश्वाद्य अनादिनिधन[4] तो तात
विधिचा, त्यापासुनि मनु[5], शतरूपा[6], मुनि मरीचिमुख सातें[7]. १०
मनुचा सुत प्रियव्रत, दुसरा उत्तानपाद या नावें,
मानावें यश कविनीं ज्याचें, अमृतापरीस वानावें. ११
उत्तानपादपुत्र ध्रुव बाळपणीं च धरुनि सारा धी[8],
पावे उत्तम पद[9], कीं, वरदवरा श्रीवरासि आराधी. १२
श्लिष्टि ध्रुवसुत, त्याचा रिपुनामा ज्यापुढें नुरे अनय;
त्याचा 'मनु चाक्षुष' या नामें झाला प्रतापनिधि[10] तनय. १३
चाक्षुषमनुचा विश्वप्रख्यात ज्येष्ठ पुत्र तो अंग,
त्याचा सुत वेन, करी जो धर्मन्यायसेतुचा भंग. १४
त्यापासुनि पृथु राजा झाला, जो भूमिधेनुला दुहिता[11],
गंगा भगीरथाची, होय तयाची तसी च हे दुहिता[12]. १५
पृथुचा अंतर्धान[13], ख्यात हविर्धान होय हो! त्याला,
प्राचीनबर्हि तत्सुत, कवि म्हणति सुवृत्त[14] या, न मोत्याला. १६
तत्सुत दश प्रचेतस, तपनाधिक[15] तत्प्रताप तो मानें[16].

---

१. बाळें ताता भरविला (भरविलेला) एक हि ग्रास (घास) सुधासम (अमृतासारखा) होय. २. या हरिवंशकाव्यरचनेंत. ३. ज्यानें मजकडीं 'मन्त्रभागवत' लिहविलें तो च. ४. आदि अंत ज्यास नाहीं असा. ५. स्वायंभुव मनु. ६. मनुपत्नी. ७. मरीच्यादि सप्तर्षि. ८. उत्तम बुद्धि (सदिच्छा). ९. अढळपद. १०. शौर्यसागर. ११. पृथ्वीरूपी गाईचें दोहन करणारा. [ पृथुराजानें अनेक नवीन उपायांनीं पृथ्वी अत्यंत सुपीक केली ]. १२. कन्या. १३. विजिताश्व. ( इंद्रवरानें याला गुप्त होण्याची विद्या ठाऊक होती). १४. चांगल्या वर्तनाचा, [ पक्षीं ] गरगरीत, वाटोळें. १५. सूर्यापेक्षा. १६. प्रमाणानें.

सांत्वन करूनि, दिधली वृक्षसुता त्या दहांसि सोमानें. १७
पत्नी प्रचेतसांची वृक्षांची मारिषाभिधा कन्या,
पुत्र तिला जो झाला, 'दक्ष' असें म्हणति मुनि तया धन्या.१८
सृष्टि कराया केले जे पांच सहस्र पुत्र त्या दक्षें;
ते[2] दवडिले, करुनि सुविरक्त सकळ, नारदें महादक्षें. १९
पुत्र सहस्र पुन्हां ही दक्षें सृष्ट्यर्थ निर्मिले यत्नें,
ते हि ब्रह्म चि केले ब्रह्मसुतें ब्रह्मविच्छिरोरत्नें. २०
शापी नारदमुनिला, कल्पुनि सुतनाश होय तो कष्टी;
दक्ष मग जगत्प्रसवीं योग्यां निर्माण करि सुता षष्टी. २१
धर्मासि[7] दहा; तेरा विधिनें तो कश्यपासि दे कन्या,
सत्ताविस सोमाला, उरल्यां अन्य प्रजांकरां अन्या. २२
ज्येष्ठा मरीचिनंदन कश्यपमुनिची महासती भार्या,
अदिति प्रसवे द्वादश शक्रादि ख्यात पुत्र ती आर्या. २३
त्यांत विवस्वान्नामा आदित्य श्राद्धदेव मनु त्याला
संज्ञेपासुनि पुत्र प्रख्यात महाप्रतापनिधि झाला. २४
वैवस्वतमनुचे सुत इक्ष्वाकुप्रमुख नव, तथा अन्या

---

१ पृथ्वीवर वृक्षाची अतिशय दाटी झाल्यानें प्रचेतसानीं अग्नि व वायु याकरितां वृक्षाचा नाश चालविला, तेव्हां ओषधिपति चंद्रानें वृक्षकन्या वार्क्षी ( मारिषा ) ही सांत्वन करूनि ( मोठ्या मिनतवारीनें ) प्रचेतसास देवविली व वृक्षाचा नाश राहविला. २. नारदानें त्यास ब्रह्मोपदेश करून तपश्चर्येस पाठविले [ व त्यामुळें त्यानीं प्रजोत्पत्ति करावी हा जो दक्षाचा हेतु तो विफळ केला ] ३. ब्रह्मवेत्त्यांतील सर्वश्रेष्ठ जो नारद त्यानें ४. समजून. ५ प्रजोत्पत्तीला योग्य—ज्यांपासून पुढील सृष्टि खात्रीनें होईल अशा. ६. साठ. ७. दक्षानें या ६० कन्याची वांटणी केली ती अशी —ब्रह्मदेवाचा मानसपुत्र धर्मऋषि यास १०, कश्यपऋषीला १३, चंद्राला २७, अरिष्टनेमिऋषीस ४, भूतऋषीस २, कृशाश्वाला २, व अंगिराऋषीला २ ८. बाकीच्या दहा. ९. हस्तलिखित प्रतींत " प्रजाकारां " आहे, तो प्रमाद असावा. यांच्यापासून वंशविस्तार झाला म्हणून त्यास 'प्रजाकर' म्हटलें आहे.

कन्या पहिली च इळा नामें इष्टींत जन्मली धन्या.[1] २५
ती मित्रावरुणांशप्रभवा[2] यास्तव तयांकडे गेली,
'होसिल सुद्युम्न पुरुष' ऐशा सुवरें तिहीं सुखी केली. २६
फिरुनि मनुकडे येतां, सोमात्मज बुध पथीं मिळे, 'लाहें
[3]मत्संगमशर्म' म्हणे; चित्तीं बहु मानलें इळेला हें. २७
सुतरत्नातें आधीं, पुरुषत्वातें हि मग इळा पावे;
तीचा पुरूरवा सुत, ज्याचे गुण साधुनीं सदा गावे. २८
तो[4] मनु वसिष्ठवचनें सुद्युम्ना राज्य दे प्रतिष्ठानीं,
कन्याभावें नाहीं वरिला ज्येष्ठात्मज प्रतिष्ठानीं. २९
मनुचा इक्ष्वाकु तनय पहिला, दुसरा तनूज नाभाग,
धृष्ट तिजा, जाणावा चवथा शर्याति तो महाभाग. ३०
पंचम हि नरिष्यंत, प्रांशु हि सावा, तसा च नेदिष्ट
सप्तम, करूष अष्टम, नवम सुत पृषध्र, सर्व हे शिष्ट. ३१
नाभागाचा नंदन नृपसत्तम अंबरीष जाणावा;
धार्ष्टक[5]नाम क्षात्रीं मूळ, मनीं तो हि धृष्ट आणावा. ३२

---

१. यज्ञात (श्राद्धदेव मनूला संतति व्हावी म्हणून मित्रावरुणाची त्यानें प्रार्थना केली व संततिप्रीत्यर्थ केलेल्या यज्ञांत हि) 'इळा' कन्या त्यास झाली पुत्राचे ऐवजीं कन्या झाली म्हणून त्यास वाईट वाटलें, हें पाहून तिनें मित्रावरुणांची प्रार्थना केली व त्यांच्या वरानें ती पुरुषत्व पावून 'सुद्युम्न' या नावानें पुढें प्रसिद्ध झाली. २ मित्र व वरुण यांच्या कृपेनें (म्हणून त्यांच्या च अंशानें) उत्पन्न झालेली ३. मत्संगमशर्म लाहें=माझ्या समागमाचें सुख मिळीव. ४ "प्रतिष्ठानीं ज्येष्ठात्मज कन्याभावे वरिला नाहीं [म्हणून] तो मनु वसिष्ठ-वचनें सुद्युम्ना प्रतिष्ठानीं राज्य दे" असा अन्वय. प्रतिष्ठित लोकांनीं वडील मुलगा मूळचा कन्या असल्यानें राज्यास नाकबूल केला, यास्तव मनुराजानें वसिष्ठाच्या सांगण्यावरून मुख्य राज्यासनीं सुद्युम्नास (इळेला) न बसविता त्याला प्रतिष्ठान-नगरीचें राज्य दिलें. ५ धार्ष्टक नावाच्या क्षत्रिय कुळाचा मूळपुरुष.

पुत्र नरिष्यंताचे ते शकसंज्ञेकरूनियां ख्यात,
कारूष क्षत्रिय जे, हे जाणावे करूषकुळजात. ३३
त्या वैवस्वत मनुचा, जो म्यां कथिला तनूज नेदिष्ट
जनमेजया! तयाच्या पुत्रांतें वैश्यतेसि ने दिष्ट. ३४
प्रांशुतनय प्रजापति नामें शर्याति जो, तया आर्या
सुत आनर्त, सुकन्या कन्या, ती च्यवनसुमुनिची भार्या. ३५
आनर्ताचा रेव ख्यात, ककुद्मी तनूज रेवाचा,
देवूनि रेवतीतें, तो होय श्वशुर रामदेवाचा. ३६
दैवें पृषध्र शूद्र श्रीगुरुगोघातपातकें झाला.
इक्ष्वाकु मनुतनुज जो, होय महात्मा विकुक्षि हा त्याला. ३७
इक्ष्वाकुनें मृगांचें श्राद्ध करायासि मांस आणविलें,
केलें विकुक्षिनें शशभक्षण, गुरुनें नृपासि जाणविलें. ३८
त्यजिला विकुक्षि भूपें, झाला नामें 'शशाद' तो ख्यात,
अभिषेचिला वसिष्ठ, गेला स्वर्गासि जेधवां तात. ३९
विख्यात अयोध्यापति जो याचा सुत ककुत्स्थ हा भूप,
कुतुकें सुररिपुंदलनीं केला वाहन महेंद्र वृषरूप. ४०
त्याचा पुत्र अनेना, याचा पृथु, विष्टराश्व सुत याचा,
याचा आर्द्र सुत, नृपा! सुयशा युवनाश्व नंदन तयाचा. ४१

---

१. दिष्ट ( नशीब ) वैश्यतासि ( वैश्यपणाला ) ने ( नेई ): दुर्दैवानें त्यांना वैश्याचा धंदा पत्करावा लागला. २. शर्याति नावाचा प्रजापति ( वंशाचा मूळ पुरुष ) ३. आर्या० आदि० अ० ३, च्यवनोत्पत्तिकथा पहा. ४. बलरामाचा. ५. [ वाघ समजून याच्या हातून चुकून ] गुरूच्या गाईचा वध झाला होता, त्या पापामुळें. ६ श्राद्धाकरितां आणिलेल्या मांसातील देवपितृतर्पण होण्यापूर्वी विकुक्षीनें सशाचें मांस खाल्लें, ती गोष्ट गुरूनें राजाच्या नजरेस आणिली. ७- टाकिला, हद्दपार केला. ८. "ससा खाणारा" असा शब्दार्थ ९. देवांच्या शत्रूंचा फडशा उडविण्याच्या कामीं यानें इंद्राला बैलाचें रूप घ्यावयास लावून त्यास आपलें वाहन केलें होतें.

याचा श्रावस्त सुत, श्रावस्ती[1] निर्मिली पुरी जेणें,
याचा बृहदश्व तनुज, ज्याचें यश जाहलें कुळा लेणें[2]. ४२
यापासुनि झाला जो, तो कुवलाश्व प्रसिद्ध, बा राया !
उत्तंकमुनि तयातें योजी मधुपुत्र धुंधु[3] माराया. ४३
पुत्रशतासह जाउनि, तो राजा धुंधुराक्षसा मारीः
वारी परमोपद्रव, कुवलाश्व प्रभु बहु प्रजा तारी. ४४
धुंधुश्वासज्वलनें मेले, उरले शतांत सुत तीन,
ऐसे उपकारी, परि सुकुलज गर्वेंकरूनि उतती नें[4]. ४५
उत्तंकवरें शिरलें त्या भूपामाजि विष्णुचें धाम[5],
यास्तव या स्तवनार्हा[6] कुवलाश्वा 'धुंधुमार' हें नाम. ४६
पुत्र दृढाश्व तयाचा, त्याचा हर्यश्व वंशकर तनय,
त्याचा निकुंभ नंदन, त्याचा सुत संहताश्व तो संनय[7]. ४७
याचा प्रसेनजित् सुत, त्याचा युवनाश्व वरयशा[8] भूप,
त्याचा सुत मांधाता[9] सागरसा, अन्य सर्व ते कूप. ४८
याचा पुरुकुत्स तनय, दुसरा मुचुकुंद, जो सुरत्राता[10],
पुरुकुत्साचा पुत्र त्रसदस्यु असह्य तस्करव्राता[11]. ४९
या नर्मदासुताचा नंदन संभूत, त्या सुधन्वा, हो !
त्याचा सुत त्रिधन्वा राजा प्रख्यात तो, महाबाहो ! ५०

---

१ शरयूला मिळणाऱ्या रप्तीनदीच्या तीरावरील 'साहेतमाहेत' गांवाजवळ ही नगरी होती, असें विद्वान् शोधकांनी ठरविलें आहे. २ अलंकार. ३. हा मधु-कैठभ दैत्याचा मुलगा. वर्षांतून एकवेळ फक्त श्वास सोडून सर्वकाल हा तपश्चर्या करी, ब्रह्मदेवानें त्यास अवध्यत्व दिलें होतें. याचें राहण्याचें ठिकाण हल्लींचें कच्छचें रण, हें त्याच्या च श्वासामुळें ओसाड व वालुकामय झालेलें आहे. ४. उतू गेले नाहींत, फुगले (ताठले) नाहींत. ५ तेज. ६. स्तुतीस योग्य (पात्र) अशा. ७. नीतिमान् ८ उत्कृष्ट यश आहे ज्याचें तो. ९. आर्या० द्रोण० अ० ५, गीति ३२–४८ पहा १०. देवाचें [ त्याच्या शत्रूपासून ] रक्षण करणारा. ११. व्रात=समुदाय.

सुत याचा त्र्य्यारुण, सत्यव्रत तत्कुमार तो नामें,
पाणिग्रहमंत्रांला[1] विघ्न करी, परवधू हरी कामें. ५१
'जा चि श्वपाकसह[2] वस' तात नृप म्हणे, कुसूनुस त्यागी,
श्वपचस्थळनिकट[3] वसे, करि त्याची, त्या पुसून[4], सत्या गी[5]. ५२
जाय वना त्र्य्यारुण, बारा वर्षें न होय बा! वृष्टि,
त्या राजसुताधर्में दुष्काळें नाश पावली सृष्टी. ५३
सत्यव्रतदेशाच्या[6] निकट चि गाधिज कुटुंब सोडूनीं,
गेला त्या दुष्काळीं स्त्रीपुत्रस्नेहपाश तोडूनीं. ५४
शेषभरणार्थ[7] मुनिची भार्या एका सुता तदा विकिती[8],
सत्यव्रतें परि विकूं न दिला; ती आपदा वदावि किती? ५५
निजसुत गळीं विकाया माता बांधी, म्हणोनि 'गालव[9]' तो,
त्यजुनि अधर्मा, ज्ञाता धर्मासि उगा चि काय गा! लवतो[10]? ५६
मृग, महिष, वराह, वधुनि, ठेवी आणूनि आश्रमाजवळ,
गाधिजकुटुंब पोषी, जोडी यश बा बुधा! सुधाधवळ[11]. ५७
त्र्य्यारुण गेल्यावरि आपण चि करी वसिष्ठमुनि राज्य,
कीं द्वादशवर्षव्रत घडतां, पावेल योग्यता याज्य[12]. ५८
हें[13] नेणुनि सत्यव्रत, तो कल्पी राज्यलोभ हा दोष,
जन्हि बहु हितकर गुरुवर, तरि हि वसिष्ठीं स्वयें करी रोष. ५९

---

१ एका ब्राह्मणकन्येचें लग्न होत असतां कामवासनेनें उन्मत्त होऊन सत्यव्रतानें तिचें हरण केलें, या गोष्टीकडे अनुसंधान आहे २ श्व (कुत्र्याचा) पाक (शिजविणारे—मांस खाणारे) मांग, चांडाळ यांच्यांत वस्ती कर. ३ मांगवाड्या—(म्हारवड्या)—जवळ. ४. निरोप घेऊन ५ गी (वाणी—'चांडाळांत रहा' ही शापोक्ति) सत्या (खरी) करी. ६ राहण्याचें ठिकाण ७ इतरांच्या (एकास विकून बाकी राहिलेल्यांच्या) पोटास मिळावें म्हणून ८. विकण्यास तयार झाली, विकणार होती ९. गल (गळ्यांत) बधात् (बांधल्यानें) 'गालव' नांव पावला. १०. नम्र होतो—मान देतो. ११ अमृताप्रमाणें शुभ्र. १२ यज्ञ करणारा—यजमान १३ वसिष्ठ हा आपल्याकरितां च राज्य चालवित आहे हें.

कोठें मांस न मिळतां, क्रोधें, कामें क्षुधाभरें, तो हें
न करावें तें चि करी; कीं गुरुच्या धेनुतें वधी मोहें. ६०
अप्रोक्षितमांसाशन, दुसरा गुरुधेनुचा विनाश घडे,
तिसरा अतोष गुरुचा, यास्तव याचें ‘ त्रिशंकु ’ नाम पडे. ६१
गाधिज मख करुनि तया स्वर्गीं धाडी, जरी महादोषी;
कीं तो द्वादश वर्षं दुष्काळीं दीन दारसुत पोषी. ६२
सुत त्या त्रिशंकुचा तो भूप हरिश्चंद्र वर्णिती सुकवी,
ज्याची सुकीर्ति, गातां, आइकतां, नरकयातना चुकवी. ६३
त्याचा रोहित नंदन, चंदनपीयूषकिरणसमशील,
जो आपणा म्हणे, ‘ जरि जन रंजविशील, धन्य गमशील.’
रोहितपुत्र हरित नृप; हरिताचा म्हणति चंचु कविराजे,
जो सहज विषयलोभ त्यागुनि, अहि जेंवि कंचुकें विराजे. ६५
चंचुसुत विजय, त्याचा रुरुक, रुरुकपुत्र वृक महीपाळ,
वृकसुत बाहु, तयाचा सगर सकळशत्रुदर्दुरव्याळ. ६६
सगराच्या दोन वधू, असमंजस एक पुत्र पहिलोला,
साठ सहस्र दुजीला, ज्याची सप्रेम गाय महि लीला. ६७
सोडी सगर हयें; तया धरणीमध्यें प्रवेशवी शक्र,
कपिलमहामुनिसन्निध ठेवी बांधोनि तो महावक्र ६८
सगराज्ञेनें क्षितिला खणितां, झाले न लेश ही कष्टी,
चतुरून भस्म केले कपिलक्षोभें सहस्र ते षष्टी. ६९

---

१. भुकेनें व्याकुळ झाल्यामुळे. २. प्रोक्षण न केलले ( देवादिकास समर्पण न केलेले ), अपवित्र. ३. मांसभक्षण. ४ तीन शंकु ( पातकें ) त्याच्या हातून घडलीं, त्यामुळें त्याचें नाव ‘ त्रिशंकु ’ पडलें ५ चंदन व चंद्र यांच्या वृत्तीचा. (उभयतांचें शील तापपरिहार करणें हें आहे ) ६ प्रजाजन. ७ स्वभावजन्य ( सह=बरोबर, अर्थात् देहाबरोबर+ज=उत्पन्न झालेलें ) ८ कात ९ शत्रुरूपी बेडकांना सर्पाप्रमाणें असलेला. १०. अश्वमेधाचा घोडा ११. अत्यंत वाकडा, कपटी. १२. चौघांशिवाय. १३. साठ हजार.

सगराचा असमंजस, वंशकर तदीय अंशुमान् तनय,
नंदन दिलीप याचा, जेणें स्वर्गीं हि सोडिला न नय. ७०
जेंवि गुहातें वर्णिति या खट्वांगाभिधा दिलीपातें,
जेणें सुरांसि अतुला प्रीति तद्हितांचिया दिली पातें. ७१
जीवन मुहूर्त कळतां ये स्वर्गींहूनि भूप महिवर तो;
होय ब्रह्म ध्यानें; हें यश ऐकोनि साधु गहिंवरतो. ७२
या खट्वांगदिलीपप्रभुचा सुत तो भगीरथ ख्यात,
जो श्रीगंगा आणी क्षाळाया सर्वजगदघव्रात. ७३
'कन्या' गंगेसि म्हणे, म्हणवुनि 'भागीरथी' इची आह्मां
सज्जन हो ! धन्य, इच्या अमृता हि, यशा हि, करुनियां आ, व्हा.
ख्यात भगीरथपुत्र श्रुतनामा, श्रुततनूज नाभाग;
त्या अंबरीषजाचा भुज न म्हणे स्वाश्रिता जना, 'भाग'. ७५
त्या सिंधुद्वीप, तया अयुताजित्, सुत तयासि ऋतुपर्ण,
नळनृपतिचा सखा हा, निववी ज्याची सुकीर्ति जनकर्ण. ७६
ऋतुपर्णाहूनि पुढें झाला नृप जिष्णुचा सखा भारी,
नामें सुदास मारी असुरांतें, भी जयांसि जंभारी. ७७
पुत्र सुदासाचा तो नामें कल्माषपाद अतितेजा,
त्या तनय सर्वकर्मा, कर देती सर्व भूमिपति ते ज्या. ७८
याचा अनरण्य तनुज, अनरण्याचा हि पुत्र तो निघ्न,
अनमित्र रघु तयाचे, बाधों देती श्रितां न जे विघ्न. ७९
अनमित्रसुत दुलिदुह; [11]क्षेत्रीं कल्माषपादराज्याच्या

१. त्याच्या ( सुराच्या ) शत्रूच्या पातें ( पाडावानें, पराभवानें ). २ आयुष्य. (एक मुहूर्तभर आपलें आयुष्य आहे असें समजतां च ). ३. एकाग्र मन करून ब्रह्मस्वरूपीं लीन झाला ४. सर्व जगताच्या पापसमूहास नाहींसें करण्यास्तव. ५. नांव. ६ तोंड पसरून.( अमृतास पिऊन व यशानें भाविकपणें श्रवण करून ) ७. कष्टी हो. ८. इंद्राचा ९. इंद्र. १०. आश्रयास राहिलेल्यास. ११. " मैथुनास प्रवृत्त होतां च तू मरशील " असा या राजास शाप असल्यानें राजाच्या संमतीनें त्याची स्त्री मदयंती इच्या उदरीं वसिष्ठानें गर्भस्थापना केली.

अश्मक वसिष्ठवीर्यें, गाय यशा भूमि सादरा ज्याच्या. ८०
अश्मकसुत पूर्णक नृप, त्याचा शतरथ महायशा कथिला,
त्याचा पेलविल प्रभु, जेणें अरि सर्व संगरीं मथिला. ८१
त्याचा वृद्धाख्य नृपति, जेणें स्वयशें प्रहृष्ट[1] कवि केला,
ज्याच्या आज्ञेला वश सर्व जन, जसा सदश्व[2] कविकेला. ८२
विश्वसह तनय त्याचा, त्याचा सुत जिष्णुचा दिलीप गडी[3],
ज्यां प्रभुनें अनताची हरिली च, नता जना दिली पगडी[4]. ८३
प्रणता अहितातें ही लेश हि न दिलीपनंदन रघु सळी[5];
नमितां हि, आठवुनि अपकृति, हाडें नित्य मंदनर घुसळी. ८४
रघुचा सुत अज, याचा सुत दशरथ, हा हि शक्रसख राजा.
जो प्रभु शरा म्हणे, 'हो खलदलनें मित्र नृहरिनखरा, जा.' ८५
दशरथपुत्र श्रीपति राम, दुजा भरत वर्णिला कविनीं,
तिसरा लक्ष्मण, चवथा शत्रुघ्न, विनाशिती[6] तम च्छविनीं. ८६
श्रीरामाचा पुत्र ज्येष्ठ कुश, श्रेष्ठगुण दुजा लव तो,
ज्याची सुकीर्ति परिसुनि, अद्यापि सुधी समस्त ही लवतो. ८७
कुशसुत निषध, तया नळ, या नभ, त्या पुंडरीक सुत, याला
तो क्षेमपूर्वधन्वा[7], ज्याच्या सुयशें समस्त बुध धाला. ८८
जो क्षेमधन्वनंदन तो देवानीक; या अहीनगु हा

---

१. अतिसतुष्ट. ( कवींना गाण्यास उत्तम यश मिळालें म्हणजे त्यांना संतोष होणें साहजीक च आहे. ) २. चांगला घोडा ज्याप्रमाणें लगामाला वश असतो तसा. ३. सखा, स्नेही. ४. ज्या प्रभुनें अनताची (उद्दाम लोकांची) पगडी हरिली च ( खोड काढिली, अब्रू घेतली ) व नता जना ( शरणागतास ) पगडी दिली (बहुमान केला ). पगडी ( शिरोभूषण ) काढून घेण्यानें किंवा देण्यानें अनुक्रमें अनादर व आदर होतो. ५. छळी ६ आपल्या तेजानें अंधाराचा नाश करिती. ( पाप, अनीति वगैरे दुर्गुणांचा ज्याच्या क्षात्रतेजापुढें कांहीं च पगडा बसेना ). ७. ' क्षेम ' आहे पूर्वी ज्याच्या असा ' धन्वा ' म्ह० क्षेमधन्वा.

संभव[1]द सुधन्व्याचा; यदरिसें[2] सुखवसति दे मही न, गुहा.[2] ८९
सुत अनळ सुधन्व्याचा, अनळाचा उक्थ, वज्रनाभ तया,
तत्सुत शंख, तयाचा पुष्प, जयाच्या मनांत फार दया. ९०
पुष्पसुत अर्थसिद्धि क्षितिपति, तत्सुत सुदर्शन, तयास,
सुत अग्निवर्ण झाला, सर्व हि अरिराज करद[3] नत[3] यास. ९१
या अग्निवर्णनृपतिस सुत झाला शीघ्र, शीघ्रसुत मरु, तो
वास कलापद्वीपीं करि, जो ' वचन[4] हि ' म्हणे ' पैरा न रुतो.'
मरुचा तनुज बृहद्रथ. कथिला इक्ष्वाकुवंश हा लेश,
या कीर्तनें सुखी हो श्रीराम समस्तभूमिपालेश. ९३

---

# अध्याय दुसरा.

वैशंपायनमुनिला जनमेजयनृप पुसे ' पितरें[5] कवण ?
श्रवण घडो यांचें, हा यांच्या सुयशीं निवो पदप्रवर्ण[6].' १
मुनि सांगेः-पितरांचें माहात्म्य सकळ सनत्कुमारमुखें
ऐकुनि, मार्कंडेयें कथिलें जें जाह्नवीसुतासि[7] सुखें. २
भीष्में युधिष्ठिराला ऐकविलें, मीं तसें चि तुज आतां
कथितों, जें अमृताहुनि निववितसे क्षिप्र ऐकतां, गातां. ३
धर्म पुसे, ' बा ! आजा, पणजा, इत्यादि पितर हे नर, कीं

---

१. संभव ( जन्म ) द ( देणारा ) अर्थात् पिता. २. ज्याच्या शत्रूस मही सुखवसति ( सुखाने राहण्याचें ठिकाण–थारा ) न दे, गुहा दे. म्ह० ज्याच्या शत्रूस पृथ्वीवर उजळ माथ्यानें राहता येत नसल्यामुळें गुहेंत च लपून रहावें लागे. ३. करद (खंडणी देणारे) व नत (नमन असणारे). ४. शत्रूला दु शब्द सुद्धां बोलू नये असें म्हणणारा व त्याचप्रमाणें वागणारा होता. ५. देवयोनिपैकीं एक भेद ६ चरणीं लीन असा. ७. गंगापुत्र जो भीष्म त्यास.

वसती पुण्यें स्वर्गीं, कोणी पापेंकरूनि ते नरकीं. ४
कोणाच्या प्रीत्यर्थ श्राद्ध करिति लोक? फळद ते कवण?
पूर्वज कीं सुर? हे मज तव वदनें हो पितामहा! श्रवण.' ५
भीष्म म्हणे, "बा धर्मा! माझा शंतनु महायशा तात,
त्याचा महींतुनि निघे पिंडग्रहणार्थ साजिरा हात. ६
परि पितृकरीं न दिधला म्यां पिंड, कुशावरी च, कीं कांहीं
बौद्धायनादिसूत्रीं विधि वत्सा! अन्य देखिला नाहीं. ७
मज सुप्रसन्न होउनि गगनांतर्हित पिता म्हणे 'तनया!
स्वाधीनमृत्यु हो, बा! स्वर्धी हि करूं न जाणसी अनया. ८
रक्षिसिल धर्म, झालों सुप्रमुदित करुनि हे परीक्षा मीं;
सुयशीं च असो पुष्टिप्रीति, स्वांगीं जसी बरी क्षामीं. ९
वत्सा! माग, प्रेमें देतों, इच्छित असेल जें चित्त,
सत्पुत्राला द्यावें धर्मज्ञें सर्व आपुलें वित्त.' १०
ऐकोनि वचन ऐसें, मीं प्रेमें गहिवरोनि, हातातें
जोडुनि, 'पितृतत्व मला सांगा' हें बोलिलों स्वतातातें. ११
शंतनु म्हणे, 'प्रजापतिसंभव सुर सर्व पूज्य ते पितर
कल्पद्रुम भजकाचे, बा! स्वपितृपितामहादि हे इतर. १२
निजभक्तपूर्वजांतें उद्धरिते आद्यदेव पितर चि ते,
श्राद्धें प्रसंन होउनि बा! सर्वांचें हि सर्व हित रचिते. १३

---

१. श्रद्धेनें ज्या विधींत अर्पिलें जातें तें २. पिंड घेण्याकरिता शंतनूचा सुंदर हात भूमींतून वर आला खरा, पण मीं पिंड त्या हातीं न देतां दर्भांवर च दिला; कारण, बौधायनादिकांच्या आचारसूत्रांत याहून पिंडदानाचा निराळा विधि सांगितलेला नाहीं. ३ आकाशात गुप्त रूपानें असणारा. ४. इच्छामरणी. ५. जसी क्षामीं (रोडक्या माणसास) स्वांगीं (आपल्या अंगीं) पुष्टिप्रीति (लठ्ठ होण्याची आवड) बरी [तशी तुझी] सुयशीं च (चांगल्या कीर्तिसंबंधानें) पुष्टिप्रीति असो. ६. पितर कोण, त्यांचा अधिकार काय वगैरे माहिती. ७. प्रजापति (महादेव) आहे संभव (जनक) ज्यांचा ते. ८. आपल्या भक्ताच्या पूर्वजांना (अर्थात् मृतपितरांना).

पितृमाहात्म्य सवि[१]स्तर, पुण्य, मनोहर, यशस्कर, व्यक्त
पितृभक्ता तुज कथिल श्रीमार्कंडेय[२] परम पितृभक्त.' १४
ऐसें सांगुनि गेला उत्तमलोकासि तात; मग नमुनी
म्यां प्रार्थिला पितृयशश्रवणार्थ [३]ज्ञानभानुगगन मुनी. १५
श्रीमार्कंडेय म्हणे मज, "पितृमाहात्म्य ऐक शांतनवा!
योग्य रहस्यश्रवणा, जन्मापासूनि तूं, न शांत नवा. १६
बा! मीं पितृप्रसादें दीर्घायु जगीं महायशा समज,
अत्यद्भुत पितृभजनीं गुण, आलें सिंहपण शशास मज. १७
होतों मेरुवरनगीं बहु दुष्कर तप करीत मीं सुचिरें[४],
तेथें विमान आलें, सर्वविमानापरीस जें रुचिर. १८
त्यांत पुरुष अत्यद्भुत मीं अंगुष्ठप्रमाण बा! पाहें,
शमवी [५]शुचिरुचिनिधिचें दर्शन तत्काळ सर्वतापा हें. १९
म्यां साक्षान्नारायण मानुनि, वंदूनि, पूजिला भावें;
सांगे पुसतां, 'आपण योगींद्र सनत्कुमार या नावें. २०
तपलासि मज पहाया, मीं आलों तुज म्हणोनि भेटाया,
वत्सा! [६]जाणसि कैसा [६]स्वमनोरथसिंधुच्या न बेटा यां? २१
सुतप न घडलें, तरि च न ओळखिलें त्वां मला; असो, माग,
झालों प्रसन्न, वर घे; स्वमनोरथसिंधुच्या तटा [७]लाग.' २२
पुसिलें हें[८] चि तया म्यां; सांगे अत्यादरें कुमार मला,
हा त्या सुकथा पावुनि, शिव [९]जेंवि सुरापगा उमा, [९]रमला. २३

---

१ तपशिलवार. २ चिरजीवांपैकीं एक. ३. ज्ञानरूपी सूर्याचें ठिकाण, राहण्याची जागा. ४. दीर्घ काळ ५ पवित्रपणा व तेज याच्या सांठ्याचें. ६. या (मला सनत्कुमाराला) स्वमनो० (तुझ्या इच्छारूपी सिंधूंतील) बेटा (आश्रयस्थानाला) कैसा न जाणसि ?—मनोरथसमुद्रांत अनेक दिवस गटकळ्या खाणाऱ्या तुला त्यांतून सोडविणाऱ्या मला तू ओळखत कसा नाहींस? ७ कडेला ये; मनोरथ पूर्ण झाल्यानें आतां चिंता सोड. ८ पितृतत्त्व ९. जेंवि (जसा) सुरापगा (गंगेला) व उमा (पार्वतीला) पावुनि (मिळविल्यानें) शिव रमला (आनंद पावला) त्याप्रमाणें.

मुनि मज ऐसें सांगे, विधि निजभजनार्थ कारि सुरस्त्रंजन[1];
ते न तयाचें, सेवुनि विषय, सदा करिति आपुलें भजन[2]. २४
त्या अन्यायें झाला देवांवरि आत्मयोनिचा[3] कोप,
तेणें होय तयांच्या ज्ञानाचा एकदां[4] चि वा! लोप. २५
ज्ञानार्थ[5] सुर प्रार्थिति, नमुनि, निवेदुनि मनोव्यथा विधितें;
त्यांतें म्हणे प्रभु, 'करा, जा, प्रायश्चित्त जें, यथाविधि तें. २६
केलां[6] व्यभिचार तुम्हीं, या प्रायश्चित्त पुत्र कथितील,
त्यांचे उपदेशमहावज्र दुरितपर्वतांसि मथितील.' २७
प्रायश्चित्त पुसति सुर पुत्रांस स्वगुरुला जसे छात्र;
ते, कथुनि, 'पुत्र हो!' त्यां[7] म्हणति, म्हणुनि जाहले[8] व्यथापात्र.
स्वतनयकृतापमान प्रभुला सुर कथिति, करुनियां प्रणती;
कीं, "पुत्र आमुचे जे, ते आम्हां 'पुत्र हो!' असें म्हणती." २९
द्रुहिण[9] म्हणे, 'युक्त तुम्हां 'पुत्र' म्हणाति, ते वयें जरि लहान,
कीं ज्ञानद तात चि, या धर्मा जाणेल तो करिल 'हा[10]!' न. ३०
जन्मप्रद पितर तुम्हीं त्यांचे, हें स्पष्ट काय सांगावें?
ज्ञानप्रद ते तुमचे पितर, तयां नमुनि, मग न कां गावें?" ३१
विधिवचनें पुत्रांतें सुर म्हणती, 'आमुचे तुम्हीं पितर,
पूजूं तुम्हांसि आम्हीं, पूजितिल नरादि सर्व ही इतर.' ३२
गणसप्तक पितरांचें, मूर्त चतुष्टय[11] तयांत या नावें,

---

१ सुर (देवांचा) स्रजन (उत्पत्ति). २. तयाचें (ब्रह्मदेवाचें) भजन न करितां विषयासक्त होऊन नित्य स्वतःचें भजन करिति (ऐषआराममग्न झाले). ३ स्वयंभु ब्रह्मदेवाचा ४ एकदम ५. नष्टज्ञानप्राप्तीकरितां ६. तुम्हीं केलेल्या व्यभिचाराच्या (गीति २४ उत्तरार्धांत वर्णिलेल्या पापाच्या) क्षाळनार्थ तुमच्या उद्धाराचें कर्तव्य ज्यांवर पडतें असे तुमचे पुत्र तुम्हांस प्रायश्चित सांगतील. ७ सुरास. ८. कष्टी ९ ब्रह्मदेव १०. हाय हाय; शोक. ११. या सप्तांपैकीं पहिले चार मूर्तस्वरूप व बाकीचे अमूर्तस्वरूप.

सोमप, सुकाळ, सुस्वध, आंगिरस, असे तयांसि वानावें. ३३
वैराज आणि अग्निष्वात्त तथा बर्हिषद् असे तीन,
पितृगण अमूर्त हे, यां पावे पूजूनि देवपण दीन. ३४
वैराज्यांची मानस[1]कन्या मेना हिमाद्रिची भार्या,
मैनाकातें प्रसवे तो ही क्रौंचाभिधा नगा आर्या. ३५
कन्या तिची अपर्णा पहिली, दुसरी हि एकपर्णा हो!
बा! एकपाटला, यश यांचें पापघ्न अतिथिकर्णा हो. ३६
नाम अपर्णा पडलें कीं तप करितां न पर्ण ही खावें,
स्नेहें 'उं[2] मा' म्हणे जें माता, झाली 'उमा' चि ती नावें. ३७
ती होय एकपर्णा, खाय तपीं एक पर्ण जी देवी;
ती एकपाटला, हो! एक चि जी पाटला[3]कुसुम सेवी. ३८
होय महादेवातें, उग्र तप करुनि, उमा सती वरिती;
तैसी च एकपर्णा देहार्पण असितदेवला करि ती. ३९
नियमा जपली, तपली हिमगिरिची एकपाटला बाळा,
घाली योगाचार्या जैगीषव्यास आदरें माळा. ४०
अग्निष्वात्तांची ती अच्छोदानाम मानसी कन्या,
ती जनकातें नेणे, 'तात' म्हणे उपरिचरनृपा अन्या. ४१
त्या दोषें स्वर्गाहुनि पडतां, पितरांसि आपुल्या पाहे,
'रक्षा' म्हणे; तिस म्हणति 'कन्ये! तुज कर्म[4] भोगणें आहे. ४२
होसील उपरिचरवसुकन्या तूं मीनयोनि[5]जा, तनये!
मुनि[6]वीर्यें सुत होइल; फिरवाया भावि[7]कर्मपात न ये. ४३

---

१. मन संकल्पानें उत्पन्न केलेली. २. उ (अगे') मा (नको—आता अधिक तप करू नको) असें मातेनें म्हटल्यावरून 'उमा' हें नाव तिला मिळालें. ३. पाटलावेलीचें पुष्प. ४ प्रारब्धकर्म, पूर्वजन्मीं केलेल्या पापपुण्याप्रमाणें चालू जन्मीं उपभोग ५. मत्स्याच्या उदरातील. [मत्स्यगंधा नांवानें]. ६. पराशर-ऋषीच्या वीर्यापासून सुत व्यास ७. भाविकर्मपात फिरवाया न ये=विधिलिखित फिरविण्याचें सामर्थ्य कोणास हि नाहीं.

त्यावरि शांतनुभूपापासुनि हि प्रसवसील सुतयुगला;
फळ भोगविल्यावांचुनि कैसा गे! दोष राहतो उगला? ४४
इतुकें घडल्यावरि निजलोकांतें पावसील,' यापरि ते
वदले, ज्यांच्या भजनें होती जन पुण्यपूर्ण पापरिते. ४५
बर्हिषदांची कन्या ती नामेंकरुनि पीवरी, तीतें
श्रीशुक वरील, तरतिल त्याच्या गावूनि जीव रीतीतें. ४६
होणार कृष्ण, गौर, प्रभु, शंभु, असे तनूज कवि च्यार
शुकमुनिस, सुता कृत्वी, स्वर्मी न जिला रुचेल अविचार. ४७
ती अणुहाची महिषी, होईल ब्रह्मदत्त सुत तीस,
तत्कीर्ति म्हणेल, 'सुधे! वेड्ये! गर्वें कशास उततीस?' ४८
योगिसुता, योगवती, योगिवधू, सुमति, योगिजननी ती
कृत्वी; जीची गातिल सप्रेम समस्त साधुजन नीती. ४९
पितर सुकाळ, तयांची गोनाम्नी मानसी सुता बा! गा!
ती हि शुकाची पत्नी दुसरी, हें जाण तूं महाभागा! ५०
आंगिरसांची कन्या, नाम यशोदा तिचें, दिली पतिला,
जो विश्वसहा त्याला, झाला सुत राजवर दिलीप तिला. ५१
सुस्वधनाम पितर जे, त्यांची ही मानसी सुता विरजा,
त्या नहुषाची पत्नी, देवर्षींचें भयें लवे शिर ज्या. ५२

१ विचित्रवीर्य व चित्रांगद या पुत्रद्वयाला. २. दोष (पापकर्म) फळ भोगविल्यावाचून उगला (स्वस्थ) बसावयाचा नाहीं ३ पुण्यानें भरलेले व पापानें रहित असे. ४ वास्तविक पहातां श्रीशुक हा बाळब्रह्मचारी, तेव्हा हें संभवत नाहीं, परंतु भागवतांत ९ व्या स्कंधीं असें सांगितलें आहे कीं, शुकानें आपल्या पित्यास पुत्रविरह न व्हावा, म्हणून वनांत जातांना छायापुत्र निर्माण केला व ही संतति त्याच्यापासून च झाली आहे—निर्णय०. ५ प्राणिमात्र. ६. उत्तम वर्तनाला. ७. राणी. ८. "अगे खुळे सुधे! तू गर्वानें उगी च ताठू नकोस," असें कृत्वीची कीर्ति सुधेला (अमृताला) म्हणेल—कृत्वीकीर्ति सुधाकीर्तीपेक्षां उज्वल होय. ९. प्रसिद्ध अशा १० ज्या (नहुषास) भयानें देवर्षींचें (सप्तर्षींचें) शिर (मस्तक) लवे (वांकें). यानें सप्तर्षींना आपल्या वाहनास लाविलें होतें.

सोमपनाम पितर जे तत्कन्या होय नर्मदा साची,
पुरुकुत्साची भार्या, देणारी नित्य शर्म दासांची. ५३
अद्भुत योगपरिच्युतसप्तभरद्वाजपुत्रसिद्धकथा,
ती हि कुमारप्रभुच्या वदनें आली मदीयकर्णपथा. ५४
मज दिव्यदृष्टि देउनि मुनि झाला गुप्त, त्या सुधावर्षे
ग्लानि न आली, गेलीं अष्टादश दिवस[ स ]म बुधा! वर्षे." ५५
भीष्म म्हणे, 'वद सदया! ती हि भरद्वाजसुतकथा पिहितां;
यद्यपि रहस्य, सांगुनि करिति नताच्या सुधी तथापि हिता.'
श्रीमार्कंडेय म्हणे, 'योगापासूनि पावले पात
पुत्र भरद्वाजाचे, ते कौशिकपुत्र जाहले सात. ५७
त्यामध्यें सप्तम जो समवर्ती, ब्रह्मदत्त तो राजा,
कांपिल्यपुरीं नांदे, पुत्र अणुहनृपतिचा, सखा माजा.' ५८
भीष्म म्हणे, "धर्मा! या पूरुकुळीं ब्रह्मदत्त तो, माजा
आजा प्रतीप होता ज्या काळीं, तेधवां चि हा राजा. ५९
नामें वैभ्राज नृपति अणुहपिता ब्रह्मदत्तसुत झाला,
'विष्वक्सेन' असें त्या राज्यानें नाम ठेविलें त्याला. ६०
बुध म्हणति पूजनीया जीतें, ती पक्षिणी दुज्या बाळीं
कोपोनि सर्वसेना अंध करि, युधिष्ठिरा! धरापाळा! ६१
त्या ब्रह्मदत्तवंशीं भल्लाटाचा कुबुद्धि सुत राया!
त्या उग्रायुध मारी, ज्यातें शकले न शत्रु उतराया. ६२

१. कल्याण. २. भक्ताला. [ पंतानीं येथें चतुर्थीच्या ऐवजी षष्ठी योजिली आहे. हें संस्कृत पद्धतीचें अनुकरण आहे ]. ३ योगभ्रष्ट अशा सात भरद्वाजपुत्रांस सिद्धि प्राप्त झाली ती कथा ४ सनत्कुमाराच्या ५ माझ्या कानावर, ऐकण्यांत. ६. त्या ज्ञानरूपी अमृताच्या वर्षावानें मला ग्लानि न येतां [ त्याच्याजवळ अध्ययनात गेलेलीं ] तीं अठरा वर्षे मला अठरा दिवसांसारखीं वाटलीं—मला कधीं हि थकवा—कटाळा वाटला नाहीं ७ गुप्त—पंत. गूढ ८. सर्वत्र सारखा वागणारा ९ सन्मान देण्यास योग्य. १०. दुसऱ्या सर्वसेन नामक मुलास ११. पराभव करण्यास.

उग्रायुध हा पौरव, अजमीढकुळांत जन्मला भारी,
नीपा पांचाळेशा जो पृषतपिता महारणीं मारी. ६३
मजसीं गाठि न, तोंवरि विधिची होती च पाठ वीरा या;
दूतमुखें खळ सांगुनि तातोपरमीं च पाठवी, राया! ६४
कीं, 'एक रत्नभोक्ता मीं च, तुझी माय कामिनीरत्न
प्रेषीं शीघ्र मजकडे; वांचाया अन्य तुज नसे यत्न.' ६५
त्या संदेशें आला अत्यंत, तसा कधीं न, राग मला;
मानधना घात यशोनाशीं, न च निजवधीं, नरा गमला. ६६
बळ सिद्ध करवितां, मज वदले द्विज सचिव, 'बा! दशाह रहा;
अरि अति दारुण, शोकाशौच्याचा काळ ही दशाहर हा.' ६७
म्यां तातपारलौकिक करुनि, मग रणांत मारिला अरि तो.
परितोष परा देतो खळ, आपण चि स्वघात बा! करितो. ६८
उग्रायुध मेल्यावरि कांपिल्यपुरांत पृषत ये, राहे
मिळती पितृप्रसादें विजयश्री, कीर्ति; बा! न येरा हे." ६९
धर्म पुसे, 'कोप असा कां आला त्या विचित्र चेटकेला!

---

१ विधिची (सुदैवाची) पाठ (आश्रय) २. दुष्ट उग्रायुध. ३. तात (बापाच्या) उपरमीं (मरणीं), बाप मरतां च ४ माय (सत्यवती) कामिनीरत्न (अत्युत्तम स्त्री). ५ अमूदार मनुष्याला ६. मी सैन्याची तयारी करूं लागलों तेव्हां गुरु आदिकरून ब्राह्मण व मंत्री मला म्हणाले, "बाबा! दहा दिवस थांब." [पितृमरणाचें दहा दिवस सुतक होतें म्हणून]. ७ अरि अति दारुण [आहे]. [शिवाय] हा काळ ही (दहा दिवस) शोक [व] अशौच्याचा (सुतकाचा) [असल्यानें तो] दशाहर (चांगली स्थिति हरण करणारा) [आहे]; म्ह० तू दुःखानें होरपळला आहेस, शिवाय तुला अशौच आहे; अशा वेळीं तसल्या उग्र शत्रूशीं युद्ध करण्यासारखी तुझ्या मनाची स्थिति हि नाहीं. म्हणून, हे दहा दिवस जाऊं देत, मग युद्ध कर. ८ बापाची उत्तरक्रिया. ९. आपल्या घातानें आपल्या शत्रूस आनंदवितो. १०. ६१०या गीतींतील 'पक्षिणी' (चिमणी) तिला.

अधत्वें नृपपुत्र व्यर्थ, विषें जेंवि दुग्धघट, केला.' ७०
भीष्म म्हणे, " ऐक नृपा !; संवाद सुखें सदा करायाची
ती पक्षिणी प्रियसखी होती त्या ब्रह्मदत्तरायाची. ७१
केला अंध नृपतनय, कारण कथितों नृपा ! तुला याचें,
त्या नृपगृहांत होतें स्थान पिल्याचें तिच्या कुलायाचें. ७२
निजनृपपुत्रार्थ फळद्वय अमृतस्वादु नित्य ती आणी,
नानादेशादिकथा सांगे, बोले मनोहरा वाणी. ७३
नें गमे नृपा पळ, दिसा गेली ती पक्षिणी जरि चराया.
सांजे येउनि भेटे, बोले, सुख होय त्या तरि च राया. ७४
धात्री खेळवि नित्यापरि तो खगबाळ मृदुशरीर गडी;
नृपपुत्र एकदा त्या दृढ मुष्टीनें बळें धरी, रगडी. ७५
सोडवितां सोडीना, कर्मविपाका न बाळ तो भ्याला.
ज्ञाते केवळ शिशुला किंवा 'दृढमुष्टि' म्हणति लोभ्याला. ७६
राजा धावुनि येवुनि दे त्या वक्षस्थळीं पँद पिल्याला;
मृत जाणुनि सर्वांगीं शोकातें, ज्ञानवान्, तदपि व्याला. ७७
साश्रु सखीसुतघातें धात्रीतें शोकतप्ततनु गांजी,
कीं ती च आपणाला, अन्यायें प्राप्ति होय अनुगां जी. ७८
तों चि फळद्वय घेउनि आली राजर्षिची अनव्याली,
सुत मृत पाहुनि खवळे, घांतीं योजी जसें मन व्याली. ७९
शोकें रडली, पडली; किति वर्णावा महाविलाप तिचा ?
नेत्रें फोडुनि करी अंध स्वसुतघ्न सुत ईलापतिचा. ८०

१. घरट्याचें २. आपल्या व राजाच्या पुत्रांसाठीं ३. अमृतासारखें गोड. ४. चैन पडत नसे. ५ प्रारब्धकर्मांच्या परिणामास ६ घट्ट धरितो मूठ जो तो. ७ वक्षःस्थळीं ( हृदयाशीं ) पद ( स्थान ) दे=उराशीं धरिता झाला. ८ आपल्या परिवाराची जी गति ती च आपली असें समजून. ९ अनव्य ( नवी नव्हे ती-जुनी ) आलि ( मैत्रीण ) १० व्याली ( नागीण ) जसें मन घातीं ( सूड उगविण्याच्या कामीं ) योजी ( लावी ) तसें. ११. आपल्या मुलास ठार मारणारा. १२. इला ( पृथ्वी ) पति ( राजा ).

भूपासि म्हणे, 'रे! श्रितविश्वस्तारक्षणें पतन नरकीं;
नेणसि भूतदयेनें विधिलोकीं जोडिती वतन नरें कीं?' ८१
विप्रिय करूनि जावूं लागे, तों ब्रह्मदत्त सुखगीतें
विनवी, तें परिसावें, ज्याच्या होतें अनंत सुख गीतें. ८२
'सखि! अखिलखिन्नताहरसुगुणे! मधुवाणि! पूजनीये! तें
सख्य त्यजुनि न जावें, जें कामा स्वर्गभूजनीं येतें. ८३
त्यजिला म्यां सत्य, तुवां त्यागाचा खेद; जाहलें नीट,
सखि! बहुतां दिवसांचें प्रेम, तयाचा धरूं नको वीट. ८४
वस निजगृहीं; वदत जा शब्द सुधामिश्र; मीं न कोपरत;
तूं आपणा करूं मजला हि सुधामीं श्रमी नको; परत.' ८५
ऐकुनि भूपवचन हें, गगनगता ती म्हणे, 'अगा राया!
झालें विप्रिय, यास्तव जात्यें सोडूनि मीं अगारा या. ८६
अप्रियकारिजनाचा अणुमात्र धरूं नये चि विश्वास,
तुज म्यां, त्वां मज, पाहुनि सोडावे दीर्घ उष्ण निश्वास. ८७
जेथें विरोध तेथें न वसावें, त्यजुनि नीतिची पदवी,'
ऐसें त्या चटकेला तद्हृदयस्थ प्रभु स्वयें वदवी. ८८
तेथुनि गेली च खगी, देउनि मित्रात्मजासि अंधपण;
त्यांचें सख्य निरुपम चि होतें; सरला ऋणानुबंध पण." ८९

---

१ श्रित (आश्रयास असलेला) विश्वस्त (विश्वास ठेवून स्वस्थ बसलेला) अरक्षणें (अशाचें संरक्षण न केल्यानें). २. नर (लोक) भूतदयेनें (प्राणिमात्रावर दया करून) विधिलोकीं (ब्रह्मलोकांत) वतन (कायमची जागा—मिरासदारी) जोडिती (संपादन करितात) [हें] नेणसि कीं? (जाणत नाहींस काय?). ३. अनिष्ट. ४. [त्या] चांगल्या चिमणीला. ५. अखिल खिन्नता नाहींशी करणारे आहेत सुगुण जिचे अशी तूं ६. स्वर्ग व भू (पृथ्वी)—येथील लोकांत ७ नीट जाहलें—जशास तसें झालें असल्यानें आतां उभयतांनीं हि झाल्या गोष्टी विसराव्यात हें बरें. ८. गोड. ९. रागावलेला. १० आकाशांत उडालेली. ११ आपण एकमेकांकडे पाहून पश्चात्तापयुक्त किंवा क्रोधयुक्त दीर्घश्वास सोडावे; यापलीकडे उभयतांचा कोणत्या हि प्रकारचा निकट संबंध आतां होणें नाहीं. १२. मार्ग, रस्ता.

# अध्याय तिसरा.

गांगेय म्हणे, "श्राद्धीं आहे सर्व प्रतिष्ठित स्पष्ट;
श्राद्धें धर्म, श्राद्धें ज्ञान, श्राद्धें निवारतीं कष्ट. १
बा! श्राद्ध, धर्मपीडे[2] करुनि हि, करितां, जया फळा पात्र
झाले द्विज, तें घे: दे मज जें[3] अवधान काय हें मात्र. २
ते[4] वाग्दुष्ट, क्रोधन, हिंस्र, पिशुन, कवि, तथा खसृम सावा,
सप्तम पितृवर्ती, हे कौशिकसुत, ज्यांत[5] दुर्गुण नसावा. ३
पहिल्या जन्मीं योगभ्रष्ट भरद्वाजपुत्र हे धर्मा!
मग कौशिकसुत झाले, शर्म कसे पावतील ते शर्मा? ४
गार्ग्यगुरुगृहीं होते. गुरु सांगे त्यांसि धेनु रक्षाया,
ते[7] झाले क्षुधित, म्हणति, 'मारावी हे यथेष्ट भक्षाया' ५
दोघे कविखसृम म्हणति, 'करितां हें कर्म मूढ हो! काय?
हाय! स्वगुरूची हे माता कीं रे! वधूं नये गाय.' ६
वाग्दुष्टादिक चौघे जेव्हां आटोपती न दोघांस,
तो घांस, व्याघ्र चि ते[8] कीं सिकताभस्मसेतु ओघांस. ७

---

१ साठलेलें २ अधर्म आचरून हि ३ जें काय (जें काहीं) अवधान (लक्ष्य) मात्र (तेवढें मात्र) मज दे=फक्त मी जें सांगत आहें तिकडे मात्र तुझें सर्व लक्ष्य असू दे ४. कांहीं नांवांचे अर्थ —पिशुन=चहाडखोर कवि=परलोकभय मानणारा; खसृम=आकाशांत गमन करण्याची वृत्ति आहे ज्याची असा, म्ह० उन्नत विचाराचा, पितृवर्ती=पितरांस पूज्य मानणारा ५. वास्तविक पहातां त्याच्यात दुर्गुण नसणें हें स्वाभाविक होतें, परतु इ० ६ शापलेले. ७ वाग्दुष्टादि चौघे. ८. ते (कवि व खसृम) ओघास (चौघांच्या दुष्ट प्रवृत्तीस) वाळू व भस्म (राख) याचे बांध झाले, पाण्याच्या ओघास जसा वाळूचा व राखेचा ढीग अडथळा करू शकत नाहीं, तसा त्या चौघांच्या गोवध करण्याच्या दुष्ट इच्छेस त्या दोघाचो हरकत निरुपयोगी झाली.

पितृवर्ती त्यांसि म्हणे, ‘ जरि मति गुरुगोवधें चि हरिखावी;
पितरांच्या उद्देशें मारुनि हे, श्राद्ध करुनि, तरि खावी. ८
हें करितां गाईला धर्म; तुम्हां हि न अधर्म बाधेल,
संकल्प करा, प्रोक्षा, ‘श्राद्ध’ म्हणा, यांत इष्ट साधेल.’ ९
त्या पितृवर्तिमतानें तैसें चि करूनि कर्म, ते नमुनी,
‘ घ्या वत्स, गाय वधिली शार्दूळें,’ कथिति गुरुसि हें श्रमुनी. १०
वंचन, मिथ्या भाषण केलें; गुरुला खरें चि तें वाटे,
सप्त व्याध दशार्णी झाले ते, आयु जेधवां आटे. ११
त्या तैशा हि श्राद्धें जातिस्मर सप्त बंधु कवि झाले,
बापा! पितृप्रसादें त्या व्याधपणीं हि बोध न विझाले. १२
लोभानृतवर्जित, निजधर्मनिरत, ते स्वमातृपितृभक्त,
जें प्राणधारणोचित, तितुकें चि करिति विचारशमसक्त. १३
जननीजनकोपरमीं ते व्याध त्यजुनियां स्वचापातें,
देह अनशनें त्यागुनि, झाले मृग; परिस नवल बापा! तें. १४
ते सप्त हि जातिस्मर कालंजरपर्वतीं नृपा! तपले,
जळपानवर्जनव्रत धरुनि, हरिण रात्रिंदिन तेंया जपले. १५
असति उमटलीं मृगपदचिन्हें कालंजराचिया खडकीं,
तपुनि त्यजिति शरीरें, कार्य करुनि पथिकें जन जसीं मडकीं. १६
मग सप्त जळद्वीपीं जातिस्मर चक्रवाक ते पक्षी,
मज मुनि सांगे, त्यां विधिनंदन, जो दिव्यदृष्टिनें लक्षी. १७

---

१ जर गुरूच्या गाईला मारून तुमच्या मनास आनंद होणार आहे. २. पुण्य ३ वाघानें ४ दुःख झालेसें दाखवून. ५ फसवणूक ६. दशार्णदेशांत ७. जेव्हां आयुष्य सपलें तेव्हां. ८. पूर्वजन्माचें स्मरण असणारे. ९. त्याचें ज्ञान नष्ट झाले नाहीं. १० विचार व शांतपणा यांनीं युक्त. ११ कांहीं न खातां. १२. त्या व्रताला. १३ वाटसरू लोक मडक्यांत स्वयपाक करून काम होता च तीं मडकीं जशीं टाकून देतात त्याप्रमाणें. १४ त्या ( मार्कंडेयाला ) विधिनंदन (सनत्कुमार) [ सांगे ].

ते चक्रवाक नामें निस्पृह, निर्मम, तिजा हि तो क्षांत,
निर्द्वंद्व, निष्परिग्रह, निर्वृति, निर्भृत; मराळ ते शांत. १८

मानससरोवरीं मग जातिस्मर सप्त हंस ते होती,
प्रकटे पुनरपि हृदयीं, जें पहिलें ज्ञानरूप, तें ज्योति. १९

सुमना, शुचिवाक्, शुद्ध हि, पंचम हि, च्छिद्रदर्शन हि, गावे
घेसे, सुनेत्र सावा, सप्तम हंस स्वतंत्र या नावें. २०

पौरव विभ्राज नृपति सांतःपुर मानसीं सरीं राहे,
पहिला पितृवर्ती जो, तो हंसत्वीं स्वतंत्र त्या पाहे. २१

'आपण यापरि राजा व्हावें, उपवास करुनि, मीं श्रमलों;
पडुनि तपोव्यसनीं च व्यर्थ, विषयसुख न भोगितां, भ्रमलों. २२

पदरीं असेल तप, तरि तेणें प्रतिबंध न घडतां, तूर्ण
व्हावा माझ्या हृदयीं संभवला राज्यकाम हा पूर्ण.' २३

'आम्हीं हि अमात्य तुझे होवूं,' कविखसृम म्हणति, कीं भ्रमले.
गमले चवघां हंसां भ्रष्ट तिघे दुष्ट, बहु मनीं श्रमले. २४

तें ऐकुनियां झाला शुचिवाक् सक्रोध हंस जो दुसरा,
'एक नृप, सचिव दोघे व्हा, सेवा थिल्लरें, त्यजुनि सुसरा.' २५

न वदति मराळ चवघे योगभ्रष्टां तिघांसवें, रुसले;
कीं अमृतसागरातें सोडुनि, विषसागरीं बळें घुसले. २६

---

१ ते [ चक्रवाक होते हें खरें, पण शांतवृत्तीसंबधें पहाता ] शांत मराळ ( हंस ) [ होते ] 'मराळसे शांत (=हंसाप्रमाणें शांत ) हा पाठ अधिक सरळ झाला असता —निर्णय० २. पुरुवंशामधील. ३ अंतःपुरासह (स्त्रियांसह) ४ पूर्वजन्मींचा जो पितृवर्ती व हंसांचा हंसरूपी 'स्वतंत्र' तो त्या राजाला पहाता झाला. ५ तपाच्या दगदगांत ६ सत्वर ७ उत्पन्न झालेला ८ योगापेक्षां विषयसुख गोड वाटूं लागलें म्हणून त्यांना भ्रम झाला ९ चवघा ( बाकीच्या चौघांस ) [ ते ] तिघे भ्रष्ट ( योगभ्रष्ट ) [ आणि म्हणून ] दुष्ट [ पापी ] गमले व त्यामुळें ते चौघे मनांत कष्टी झाले. १०. डबकें. ११. चांगल्या सरोवरास.

प्रार्थिति चवघांसि तिघे, 'योगभ्रंश[1] स्ववधात हें कळलें,
चळलें मन'[2] म्हणति, 'करा करुणा, आहे तसें च कीं मळलें.'
सर्वानुमतें सुमना हंस म्हणे त्या तिघांसि 'परिसा, रे!
करितों शापांत; तुम्हीं व्हाल तसे चि, भ्रमाल, परि सारे. २८
व्हाल मनुष्य, रुतातें सत्वांच्या हा[3] स्वतंत्र जाणेल.
पुनरपि पितृप्रसादें तुमच्या हृदयांत योग बाणेल. २९
ऐकाल तुम्हीं विप्रापासुनि निजवृत्तगर्भित[4] श्लोक,
शोक भ्रम नाशेल, क्षिप्र चि पावाल नित्य[5] जो लोक.' ३०
ऐसें झाल्यावरि, ते हंस तपें शोषिति स्वकायातें,
लाजे निजविषयित्वें[6] राजा विभ्राज पाहतां यांतें. ३१
निर्वेद[7] मनीं झाला कीं, 'खग ही योगसक्त हे धन्य!
अन्य व्यर्थ चि जन्मुनि, मीं नर राजा हि पंडितंमन्य[8]. ३२
मीं विषयास चि भुललों, खग ही न स्पर्शती असारा ज्या[9],'
हें चिंतित जाय पुरा, झाला निर्वेद हा असा राज्या. ३३
विभ्राजपुत्र नामें अणुह, सदा सूक्ष्मधर्मरति[10] तो कीं,
त्यातें कृत्वी कन्या शुक दे, सर्वांसि पूज्य जो लोकीं. ३४
अणुहासि राज्य देउनि, राजा त्या मानसा सरा गेला,
रमलें विषयीं, भ्रमलें, यास्तव जो मानसास रागेला[11] ३५
तो संकल्प करि तपीं कीं, 'हे योगी मराळ धन्यतम,
हो जनक आपणाला या सप्तांतील[12] एक अन्यतम. ३६

---

१ योगभ्रष्ट होणें हें आत्मघातक आहे हें २. मनांत आल्याप्रमाणें 'राजा' व 'अमात्य' ३ हा 'स्वतंत्र' सत्वांच्या (प्राणिमात्राच्या) रुतातें (भाषेला) जाणेल. ४ स्वतःचा वृत्तांत ज्यात गोंविलेला आहे असा ५ शाश्वत. ६. आपल्या विषयीपणानें ७ खेद ८. शहाणपणाची घमेंड बाळगणारा ९. खोट्या [विषयास]. १०. सूक्ष्म धर्मावर प्रेम असलेला. ११ मन विषयांत भ्रमानें रमतें म्हणून त्याला मनाचा राग आला १२. या सातांपैकी कोणी हि एक

होईन योगिसुत तरि, योगी ही न करितां [1]लवायास,
कीं नलगे योगिसुता तातेतर गुरु पदीं लवायास.' ३७
त्या नृपतितपस्तेजें [2]विभ्राजित होय, यामुळें दुसरें
धरिलें 'वैभ्राज' असें नाम प्रख्यात मानसें सुसरें. ३८
[3]त्या चि सरीं तनु सोडुनि, झाले संकल्पित स्वगति घेते,
जपुन, तपुन, [4]अपुनर्भवकरयोगभ्रष्ट जे खग तिघे, ते. ३९
हंस स्वतंत्रनामा अणुहसुत ब्रह्मदत्तनामानें
झाला बाभ्रव्यात्मज पंचम पांचाळ [5]भोगकामानें. ४०
जो सात्रा तो झाला वत्सात्मज कंडरीक या नावें:
यांचें चरित्र रसिकें ऐकावें, सुकविनें हि वानावें. ४१
पांचाळ [6]श्रोत्रियसुत ऋग्वेदी सुमति सर्वधर्मज्ञ,
तो [7]आचार्यत्व करी कीं श्रौतस्मार्तकर्ममर्मज्ञ. ४२
[8]अध्वर्यु यजुर्वेदी श्रोत्रियसुत कंडरीक तो; यांसीं
त्या अणुहसुतनृपासीं बहु [9]सख्य, जसें चि दुग्धतोयांसीं. ४३
ते [10]ग्राम्यधर्मसुनिरत झाले, कीं कामवश तिघे हि कवी,
धर्मार्थकामपटुता त्यांत श्राद्धक्रिया चि ती शिकवी. ४४
तो ब्रह्मदत्त योगी सर्व प्राण्यांचिया रुता समजे;
गुण जोडिती तिघे ही, स्वच्छ क्षीराब्धिच्या [11]उंलासम जे. ४५
राज्य सुतासि अणुह दे, [12]परमपद हि आपणासि योगानें;
प्राज्य सुख, सुकृत, सत्कविवृंदा स्वयशाचिया हि तो गानें. ४६

---

१. लव+आयास=थोडे सुद्धां श्रम २ शोभिवत. ३. त्याच सरोवरांत देह त्याग करून ते तिघे मनात आणलेली गति ( राजा व अमात्य होण्याची ) घेते झाले. ४. पुनर्जन्म चुकविणाऱ्या योगापासून भ्रष्ट झालेले ५ विषयोपभोगाच्या इच्छेनें. ६. वेदवेत्त्या ब्राह्मणाचा पुत्र ७ वेदाध्यापनाचें काम. ८. यज्ञांतील मुख्य ब्राह्मण ९ दुधाचें व पाण्याचें जसें सख्य असतें तद्वत् १० गौण प्रतीच्या [ संसाराच्या ] गोष्टींत निमग्न. ११. फेसासारखे. १२. मुक्तावस्था.

त्या ब्रह्मदत्तनरवरवर्यांची देवलात्मजा आर्या
नामें सन्नति, योगें दुर्धर्षा, ती महासती भार्या. ४७
जे शेष हंस चवघे योगसुधासेवनें सदा धाले,
त्या कांपिल्यपुरांत चि अधनश्रोत्रियकुळांत ते झाले. ४८
धृतिमान्, सुमना, विद्वान्; नामें श्रोत्रिय, कुमार चवथा, रे!
तो होय तत्वदर्शी, ज्याच्या ज्ञानापुढें न भव थारे. ४९
योगी पहात होते संगत्यागास आपल्या सवड,
यांच्चित्ता योग तसा, जैसा, पथिकास तापल्यास वड. ५०
हे तों अधन चि; न गणिति सुसमृद्धा जिष्णुच्या अगारा जे,
ते हि विचारसमुदयीं गेले चि हिमाचळा अगा! राजे. ५१
समयीं निघोनि जातां, मागति आज्ञा नमूनि ताताते,
तो रडत म्हणे, 'सुत हो! करितां सहसा चि सर्व घाताते. ५२
वृद्धांचा त्याग तुम्हां उचित नव्हे, उचित होय अत्याग;
पितृपरिपालन न करुनि जातां, न गणुनि मनांत अत्याग.' ५३
योगी म्हणती, 'ताता! हे अस्मत्कथित उत्तम श्लोक,
जा, ब्रह्मदत्तनृपतिस ऐकिव; तो होय उत्तमश्लोक. ५४
तुज सुप्रसन्न होउनि सामात्य ब्रह्मदत्त धनदानें
सुखविल बहु, सुखवावें देवुनि निधिदान जेंवि धनदानें.' ५५
ऐसें वदुनि महार्थ श्लोक कथिति निजमुखें तदा ज्ञाते,
गुरुतें पूजुनि, वंदुनि, गेले घेउनि सुखें तदाज्ञा ते. ५६
यापरि चवघे योगी, पावोनि ज्ञान, जाहले मुक्त;
श्रीमार्कंडेयाचें कथिलें तुज हें युधिष्ठिरा! उक्त. ५७

१ जिचें तेज सहन होण्यास कठिण होतें अशी. २ तत्त्वज्ञान (खरें ज्ञान) झालें असल्यानें संसारबंधन यांच्यापुढें टिकत नसे ३. संसाराचा त्याग करण्यास. ४. [चांगल्या] विचाराचा चांगला उदय होता च. ५ योग्य वेळीं. ६. मोठा अपराध ७ उत्तम कीर्ति ज्याची असा ८ कुबेराचे नऊ निधि, त्याचें दान ९ मोठा [गूढ] अर्थ आहे ज्यांत असे. १० भाषण.

ता ब्रह्मदत्त राजा दयितेसीं उपवनीं करि क्रीडा;
ती योगज्ञा सन्नति पतिविषयित्वें मनीं धरि व्रीडा. ५८
तों कामार्त पिपीलिक विनवी पसरूनि दीनसा आस्य,
कोपे पिपीलिका; करि जाणोनि ब्रह्मदत्त तो हास्य. ५९
योगें मनांत समेजे, जें यावें हास्यसें वदे मुंगी,
दाटूनि करी रुसवा: स्पर्शे न जळा, न अन्न ती हुंगी. ६०
विनवी भूप परोपरि, जोडी सौमार्थ हात रुसलीला,
बहु आपुल्या सुरांच्या दावी सुवदान्य हा तरुस लीला. ६१
सन्नति म्हणे, 'अकस्मात् कां आलें हास्य? हेतु सांग मला.'
कथितें अनृत गणुनि वदे, 'हा जन उपहास्य आजि कां गमला?
कळतें तुज मर्त्याला योगज्ञानाविना कसें रुत तें?
प्रत्ययें चि वांचविल मज, या हृदयीं हास्य सलं तसें रुततें.' ६३
बहु विनवि, परि स्वल्प हि जळ कीं भरवावयासि अन्न तिला
न ब्रह्मदत्त शकला, थकला पसरूनि पदर सन्नतिला. ६४
श्रीकरिवरवरदा त्या वरदात्या शरण जाय, जायेतें
ध्याया प्रसन्न करुनि, क्षाळाया सर्व हायें ज्या येतें. ६५
बैसे एकाग्रमनें ध्यान धरुनि भूप सों अहोरात्रें,
पूर्वाभ्यासें झाला निष्कंप स्थाणुसा चि तो गात्रें. ६६

१ पतीच्या विषयीपणानें त्या योग जाणणाऱ्या स्त्रीला मनात लाज वाटे. २. येण्यासारखें जें मुंगी बोलली तें योगबलानें ती सन्नति मनांत समजली २—

[राजा] आपल्या बहु लीला दाखवी. दयितेचा कोप घालविण्याकरितां तिचे वाटतील ते मनोरथ पुरविण्यास तो तयार झाला. ५. 'प्राण्याची भाषा मला समजते,' असें जें त्यानें तिला सांगितलें, तें त्याचें सांगणें. ६ थट्टा करण्यास योग्य ७. प्रतीति. ८. शल्य. ९ श्रीविष्णूस. १० दुःख—पंत. ११. सदा दिवस व रात्री. १२. झाडाच्या खोडासारखा. १३. शरीरानें.

होय प्रसन्न भगवान्, देउनि दर्शन म्हणे, 'कृपा केली,
जो,[1] पावसिल शिव,उद्यां करिसिल तूं सुगतिसीं नृपा! केली.' ६७
वर देउनि वरदेश्वर अंतर्हित होय; भूप तो हर्षे.
प्रभु चातकीं मयूरीं घनसा, भक्तीं दयामृतें वर्षे. ६८
तो योगिपिता, राज्या सामात्या ऐकवावया श्लोक,
पाहत होता समय, ग्रहपतिचा[2] उदय बा! जसा कोकें.[3] ६९
प्रातःकाळीं मज्जन सज्जनमत नृप सरोवरांत करी,
होय प्रहृष्ट, देहीं सामात्य सुवस्त्रभूषणांसि धरी. ७०
बैसे नृप कनकरथीं, चालति वेष्टुनि तयासि भव्य[5] जन,
धरि रश्मि[6] कंडरीक, प्रियसख पांचाळ चामर[7] व्यजन. ७१
अति उत्सवें प्रवेशे नगरीं जो भूप उत्तमश्लोक,
'हा समय,' म्हणे, भेटे, आयकवी विप्र उत्तम श्लोक. ७२
'द्विज ते झाले सप्त व्याध दशार्णांत पापभोगानें,
कालंजरीं नगीं मग मृग, तेथें त्यजुनि देह योगानें. ७३
ते चि शरद्वीपीं त्या योगबळें चक्रवाकनाम खग,
मानससरोवरीं बहु दुश्चर तप करुनि ते चि हंस, मग. ७४
त्यांतील कुरुक्षेत्रीं श्रुतिपारग[9] विप्र जाहले च्यार,
त्यांहीं तो पथ धरिला, विषयरतजनासि दूर जो फार. ७५
त्या सातांतील तिघे[10] विषयीं गुंतोनि राहिलां मागें,
भ्रंशें[11] विशीर्ण[12] झालां, तरि तुमचें मन कसें नव्हे जागें?' ७६

---

१. हे राजा' तुझें कल्याण होईल व उद्यां तू सुगति [अशी जी सद्गति] तिच्याशीं क्रीडा करिशील २ ग्रहाचा अधिपति जो सूर्य त्याचा ३ चक्रवाक. [हा पक्षी सूर्योदयाची अत्यंत आतुरतेनें वाट पहात असतो, हें सुप्रसिद्ध आहे]. ४. चांगल्या लोकास मान्य. ५. मोठे अर्थात् सरदार वगैरे ६. लगाम. ७. चवरी, मोरचेल. ८. पक्षा. ९. वेदवेत्ते. १०. तुम्ही तिघे. ११. योगभ्रष्ट झाल्यानें १२. क्षीणपुण्य.

'सप्त व्याधा' ऐसे श्लोक श्रोतिय म्हणे जसा, तो हे
कर्णी पडतां चि नृपति, पांचाळ हि, कंडरीक ही, मोहे. ७७
त्या कंडरीकहस्तांतुनि रश्मिसह चि धृतें प्रतोद गळे,
पांचाळविधृतवालव्यजन हि; न जनांसि तें रहस्य कळे. ७८
योगभ्रंश स्मरतां, मोह तिघांला हि होय दोन घडी,
पटुला हि स्वपटाची विसकटली कठिन काय हो! न घडी?
राजा मुहूर्तमात्रें सचिवांसह सावधान जों होय,
प्राकृत वहु गडबडले, वारा घालूनि सिंचिती तोय. ८०
सावध होउनि चित्तीं स्मरती त्या मानसा, स्वयोगास;
बहु निंदिति, बहु मानिति, ते सुज्ञ तिघे स्वकर्मभोगास. ८१
चुकल्या जनांसि कोणीं सांगुनि निजहितपथासि जो लावी,
धनदें ही उपकृतिसीं त्याच्या निजसंपदा न तोलावी. ८२
असकृत् 'पुरे' म्हणे तों देती त्या ब्राह्मणासि सुधन तिघे,
देउँनि संपत्ति, अधनविप्राशीतें चि, करुनि बुध नति, घे. ८३
मग पुत्राला विधिनें अभिषेक करूनि, राज्य देऊन,
जाय वनातें; त्या तें, सुख शीतार्तासि जेंवि दे ऊन. ८४
ती सन्नति पतिस म्हणे, 'बुद्धि तुझी विषयसेवनें मळली.

---

१. हे ज्या मूळ श्लोकातले आरंभींचे शब्द आहेत ते श्लोक –" सप्त व्याधा दशार्णेषु मृगा. कालंजरे गिरौ । चक्रवाकाः शरद्वीपे हंसा. सरसि मानसे ॥ तेभिजाताः कुरुक्षेत्रे ब्राह्मणा· वेदपारगा. । प्रस्थिता दीर्घमध्वानं यूयं किमवसीदथ ॥. ब्राह्मण जेवावयास बसण्यापूर्वी सदरहू मंत्र म्हणतात–निर्णय०. २. [ हातात ] धरलेला चाबूक. ३. पांचाळानें धरलेली चवरी. ४. मर्म, कारण. ५. सामान्य लोक. ६. [ आपल्या हातून योगभ्रष्ट होण्यासारखें पूर्वजन्मीं पातक झाल्यानें ] स्वकर्मभोगास बहु निंदिति, [ आणि स्वकर्मभोगापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं अतएव तो सर्वबलिष्ठ आहे हें समजून त्यास ] बहु मानिति. ७. बुध [ आपली ] संपत्ति देउनि व नति ( नमस्कार ) करुनि अधन ( दरिद्री पण सच्छील ) विप्राच्या आशीर्वादातें चि घे. ८. थंडीनें पीडलेल्यास.

रुसल्यें यास्तव चि, खरी जरि हि पिपीलिकैरुतज्ञता कळली.
योगाभ्यासीं च धरुनि आत्मसुखप्राप्तिकाम लागावें,
म्हणुनि तुज च्छळिलें, हें समजुनि कविनीं न कां मला गावें?"
गाय म्हणति ती, प्रसवे ज्या देवल जनक विप्र सन्नतितें,
गाती प्रेमें होउनि साधु रसिकजन कवि प्रसन्न तितें. ८७
ते, ब्रह्मदत्त वसुधापाळक, पांचाळ, कंडरीक, तिघे,
तरले पितृप्रसादें, मोहांतुनि जन असा चि सर्व निघे." ८८
श्राद्धाचा महिमा हा अत्यद्भुत भीष्म सर्व आयकवी,
सादर नादरतमृगापरि परिसे साधु धर्मराय कवी. ८९

---

# अध्याय चौथा.

श्रीसूर्याचा लिहिला, श्रीसोमाचा हि लिहितसें वंश;
जेथें स्वयें प्रकटला तो प्रभु, ज्याचे झषादि हे अंश. १
ब्रह्मयाचा सुत अत्रि, प्राशुनियां वायुतें जसा भोगी,
दिव्यें त्रिसहस्राब्द स्वच्छ तप करी प्रजार्थ तो योगी. २
त्या मुनिच्या शुचि तेजें झाला विश्वासि पुत्र सोम हित,
तद्वीर्यें गुरुदाराकुक्ष्युद्भव बुध, बुधांसि जो महित. ३
होय इळेच्या पोटीं पुत्र बुधाचा पुरूरवा राजा,

---

१. मुंगीची भाषा समजण्याची कला. २. जनक देवल विप्र ज्या सन्नतितें प्रसवे ती गाय ( पूर्वी त्या सातांनीं मारून खाल्लेली ) म्हणति; म्ह० देवलकन्या सन्नति ती च ती पूर्वींची गाय होय ३ जनकाची किंवा गुरूची कृपा झाल्यानें. ४. श्रीविष्णु. ( कृष्णरूपानें ). ५. मत्स्यकूर्म इत्यादि ज्याचे अवतार तो. ६. साप. ७. देवांचीं तीन हजार वर्षें, (देवांचें एक वर्ष=मनुष्यांचीं ३६० वर्षें). ८ जगाला सुखकर असा ९. बृहस्पतीच्या तारानामक भार्येला चंद्रापासून बुध झाला, तो पंडितांस मान्य असा होता

याची झाली होती विधिशापेंकरुनि उर्वशी भाजा[1]. ४
तत्सुत आयु, अमावसु, विश्वायु, तथा श्रुतायु या नावें,
ज्यांसि दृढायु, वनायु, शतायु, म्हणुनि सत्सभेंत वानावें. ५
शुचिशील[2] अमावसुच्या सद्वंशीं जन्हु अतियशा[3] झाला,
गंगा म्हणे, 'वरावें मज राज्या!' तें न आवडे त्याला. ६
ती तें बुडवूं पाहे सत्र, म्हणुनि तो महातपा प्याला;
मी, होय सुता, जोडी जे उद्धरितें स्वहात पाप्याला. ७
'गंगा, गंगा' म्हणतां उद्धरिती अमित जी महापापी,
युवनाश्व 'मानुषी हो' ऐसें त्या देवसिंधुला शापी. ८
अर्धें निजस्वरूपें युवनाश्वाची च होय ती कन्या
कावेरीसिंधु वरी जन्हुनृपातें, कळों न दे धन्या. ९
जन्हुकुळज कुशिक तपे, व्हावा सुत शक्रसम अशा भावें,
भ्याला आपण चि सुरप, झाला तत्पुत्र गाधि या नावें. १०
सत्यवती निजकन्या देऊनि ऋचीकभार्गवा, गाधी
साधी पुण्ययशातें, दवडी होता मनांत जो आधी. ११

---

१ भार्या, बायको २. पवित्र स्वभावाच्या अशा [illegible] मान् ४ गंगेच्या इच्छेप्रमाणे जन्हु राजा तिला वरीना, म्हणून ती त्याचा यज्ञमंडप बुडविण्याच्या खटपटीस लागली, तेव्हां राजानें तिला पिऊन टाकिलें ५ गंगा म्याली व जन्हुची मुलगी झाली, जे स्वहात (गंगेचे हात) पाप्याला उद्धरितें (उद्धरणारे) [ते ती त्या राजाला] जोडी (ती राजाला शरण आली). ६. जी (गंगा) अमित [जे] महापापी [त्याना] उद्धरिती (उद्धार करिते) ७. गंगेनें आपल्या च अर्ध्या अंशानें कावेरीचें रूप धारण केलें व ती जन्हूची भार्या झाली. ८ त्याच्या तपानें पुत्र होऊन तो इंद्रपद बळकावील या भीतीनें इंद्र आपण होऊन च गाधि या नावानें त्याचा पुत्र झाला. ९. ऋचीक भार्गवानें गाधिराजाजवळ त्याची कन्या सत्यवती इचें पाणिग्रहण करण्याची इच्छा प्रकट केली, तेव्हां राजकन्या असल्या दरिद्र्यास देण्यास राजाचें मन तयार होईना; पण शापभयास्तव त्याला स्पष्ट 'नाहीं' हि म्हणवेना, तथापि भार्गवाच्या सामर्थ्याबद्दल त्याची खात्री होतां च मनांतील आधि (व्यथा, चिंता) दवडी (टाकून देऊन) ती कन्या त्यानें भार्गवास दिली.

व्हावा पुत्र स्नीस, श्वश्रूस[1]; करी ऋचीक दोन चरु[2],
कीं तो सर्व पुरविता स्वाश्रितजनकाम जैंवि कल्पतरु. १२
माता कन्येचा घे, दे त्या कन्येसि आपल्या चरुतें;
समजे, समर्थ मुनि जो नौकांचा[3] ध्यावया न जें तरु[3], तें. १३
स्नीस मुनि म्हणे, 'झाला चरुचा व्यत्यास[4], उग्र सुत पाहें,
त्वन्मातेला होइल फळ यांचें[5] विप्र शांत, सुतपा, हें.' १४
सत्यवती पतिस म्हणे, 'पुत्र नको उग्र, पौत्र हो, स्वामी!'
'पुत्र[6] तसा पौत्र' म्हणे मुनि, 'दिधला मान तव वचा या मीं.' १५
झाला जमदग्नि तिला, त्याला सुत परशुराम अतितेजा,
गेले लयासि पावुनि, दुर्वृत्त असंख्य भूमिपति ते, ज्या. १६
गाधिज विश्वामित्र ब्राह्मण झाला तपोनि धीरा ज्या,
बहु मानिती वसिष्ठप्रमुख सकळ ही तपोनिधी राज्या. १७
नंदन पुरूरव्याचा आयु, तया नहुष, वृद्धशर्मा, हो!
रंभ, रजि, अनेना, हे म्हणति कविजनासि 'पात्र शर्मा हो.' १८
पंचशत सुत प्रसवे ख्यात असा तो महासमर्थ रजी,
कीर्ति भुजबळें तेणें मेळविली त्रिभुवनीं, परांस न जी. १९
युद्ध उपस्थित होतां, सुर, असुर हि, पुसति विधिसि कीं, 'आजि तें
जयधन मिळेल कोणा?' प्रभु सांगे, 'प्रार्थितील जे रजितें.' २०
प्रार्थिति ते रजिला, तो त्यांसि म्हणे, 'मीं सहाय, अरि त्यांचा,
इंद्र मला करित्यांचा सत्य शपथ करुनि, कीं न करित्यांचा.' २१
तें श्रवण करुनि असुर 'प्रह्लाद चि इंद्र आमुचा' म्हणती;

१. सासूस [ क्षत्रियगुणसपन्न ] व स्नीस [ शांत, सुतपा विप्र ] असे मुलगे व्हावे या हेतूनें २ भाताचे बळी ३ कल्पवृक्ष ४ अदलाबदल. ५. व्यत्यासाचें. ६. पौत्र हा पुत्राचा च आत्मा; तेव्हा, पुत्र काय किंवा पौत्र काय, सारखा च; म्हणून तुझ्या म्हणण्याप्रमाणें च कां होईना, असा ऋचीकाचा अभिप्राय-निर्णय० ७. जी कीर्ति दुसऱ्यास न [ मिळणारी ती ] ८. मला जे इंद्र करतील त्यांचा मी मित्र व साधकर्ता आणि न करतील त्यांचा मी शत्रु.

त्या रजिला इंद्रत्वें स्वीकारिति देव, करुनियां प्रणती. २२
दितिदनुज[1]मृगकुळाचें मथन करायासि रजि[2] तरस्वि निघे;
वधुनि अवध्य, जय रणीं आपण, देवांसि अजित[3] रक्षुनि, घे. २३
शक्र म्हणे, 'इंद्रपण स्पष्ट तुजकडे स्वयें चि आलें कीं,
मी लेक, बाप तूं, बा! स्नेह असों दे सदैव या लेंकीं.' २४
निज[4]वंचन समजे, रजिराज महाशय[5] महायशा साहे,
'आहे यांत हि अद्भुत यश,' ऐसें तो स्वमानसीं पाहे. २५
रजिमागें सुत रजिचे अनुभविती इंद्रपद महाबळ, 'हा!'[6]
बळहा[7] म्हणे मनीं, मी बहुत चि त्यांसीं[8] करावया कळहा. २६
इंद्र गुरुसि बहु विनवी, स्वपदप्राप्त्यर्थ बहु पाय धरी,
तो, ज्यांत धर्म ईश्वर नाहीं, ऐसें कुतर्कशास्त्र[9] करी. २७
त्या शास्त्रें रजिचे सुत मोहुनि केले महापदभ्रष्ट[10],
कीं लागले म्हणाया 'ईश्वर; धर्म हि, नसे,' असें स्पष्ट. २८
यावांचुनि जिंकाया शकता देवेश न रजितनयातें*,
एकवटोनि हि करिते सर्व हि सुर, असुर, नर, जित नयांतें. २९
आयुसुत अनेना जो, याच्या वंशांत पुरुष जे झाले
तच्छित्रातें ही अरि पाहुनि, हरितें ससे तसे भ्याले. ३०
जो क्षत्रवृद्ध[11], याच्या वंशीं गृत्समद, शुनक हे विप्र,
धन्वंतरि हि अवतरे, यद्भजनें रोग नाशती क्षिप्र. ३१
धन्वंतरिच्या वंशीं झाला काशीपती दिवोदास,
पावुनि ज्यास कवि निवे, तृषित जन जसा नदा शिवोदास[12]. ३२
[13]वसतां स्वगृहीं निंदी, मानुनि जगदीश्वरा भणग मेना;

१. दैत्यदानवरूपी मृगकुळाचें २ रजि हा च तरस ३ सदा विजयी (रजि). ४. आपल्यास [इंद्रानें] फसविलें [हें तो] मनात समजला ५ मोठ्या दिलदार मनाचा ६ हाय! हाय! ७ इंद्र. ८. रजिपुत्रांसीं ९ नास्तिकमत १० इंद्रपदापासून भ्रष्ट. ११ वृद्धशर्मा १२. चांगल्या पाण्याच्या [नदास] १३. जगदीश्वर (शंकर) आपल्या घरीं (सासुरवाडीस) राहिलेला पाहून तो भणग (दरिद्री) मानुनि [पार्वतीची आई] त्याला निंदी. * रजितनयांतें (?)

प्रभुला उमा म्हणे, 'न्या मजला; माहेर हें, पण गमेना.' ३३
'वाराणसींत जावें,' ऐसें प्रभु आपुल्या मनीं पाहे,
परि तेथें तेजस्वी भूप दिवोदास नांदतो आहे ३४
प्रभु योजी कार्यातें साधी ऐसी मनांत युक्ति पुरी.
सांगे स्वयें निकुंभा शून्या[१] चि करावयासि मुक्तिधुरी[२]. ३५
जाय निकुंभ गणेश[३], स्वप्नीं भेटोनि नापितासि[४] कवी,
कार्याची युक्ति बळें, जेंवि विनविल्याविना पिता, सिकवी. ३६
तो प्रतिमास्थान करी प्रार्थुनि मनुजेश्वरासि वारीक[५],
पौर वहाती पेढे, लाडू, नारळ, सदन्न, खारीक. ३७
केला जो जो, त्या त्या नवसासि गणेश देव तो पावे,
पौर म्हणति, 'हा ईश्वर, धन काय? प्राण यासि ओपावे.' ३८
तो हि दिवोदास मनीं, यश परिसुनि, पुत्रकामना आणी;
गणपतिला पूजाया, विनवाया, नित्य पाठवी राणी. ३९
पौरांचे पुरवाया नवस, न दोली[६] गणेश्वरें वाणी,
वाराणस्यधिपतिची केवळ अपमानिली सती राणी[७]. ४०
राजा कोपे, भंगी पूजास्थळ मूर्ति ही, जसा पापी;
'वाराणसी पुरी हो शून्या,' ऐसें निकुंभ तो शापी. ४१
पौर समस्त पळाले, होवुनि उद्विग्नचित्त शापानें,
काशीच्युत नृप झाला गणनाथातिक्रमोग्रपापानें[८]. ४२
वाराणसींत मग जगदंबेसह विश्वनायक विराजे,
ज्याचे पूजिति, वर्णिति, चिंतिति मुक्त्यर्थ पाय कविराजे. ४३

---

१ बेमालूम २. काशी. ३. गणाचा स्वामी (निकुंभ). ४ ह्या न्हाव्याचें नांव 'कुंडक' असें आहे. ५. तो वारीक (न्हावी) दिवोदासराजाची प्रार्थना करून मूर्तीस देऊळ बांधिता झाला. ६. वाण, कमताई ७ राणीचा मात्र नवस त्यानें पुरविला नाहीं. ८ गणनाथ (निकुंभ) त्याचा अतिक्रम (अपमान) हें च उग्र पाप त्यामुळें

देवी म्हणे, 'नको हें[1], अन्यत्र चि वसतिरोचि[3] पुरीव सेवे,'
देव म्हणे, 'इतरत्र न मज पळ हि, त्यजुनि शुचि पुरी, वसवे.' ४८

---

## अध्याय पांचवा.

नहुषाचे, ख्यात, यतिप्रमुख, कविस्तुत, सुधी, तनय सा जे,
त्यांतिल ययाति दुसरा राज्यपदीं बसुनि तो सनय साजे. १
स्त्री त्यासि देवयानी शुक्रसुता प्राप्त होय मानवती,
दुसरी वृषपर्वसुता शर्मिष्ठा, जीस साधु मानवती. २
सुत यदु, तुर्वसु, दोघे त्या शुक्रस्नेहसिंधुसुसरीचे,
द्रुह्यु, अनु, पूरु, नामक पुत्र तिघे सद्गुणाढ्य दुसरीचे. ३
दिव्य रथ दिला होता सख्यार्थ ययातिकारणें हरिनें,
ज्याच्या चक्रनिनादश्रवणें व्हावें भयार्तधी अरिनें. ४
त्या विजयद्रथरत्नीं बैसोनि ययातिकुलज अंयंत
समरीं करीत आले ख्यात जरासंधभूपपर्यंत. ५
वधुनि जरासंधातें, भीमें रथरत्न तें दिलें कृष्णा,
ज्याच्या कीर्तिसुधेनें पीतां निःशेष शमविली तृष्णा. ६
यदुसि ययाति म्हणे, 'दे निजयौवन, हे जरा मम यदो! घे,
सेवूनि विषय, देईन[10]; संरक्षूं[11] बोलिला समय दोघे.' ७

---

१. ही ओसाड नगरी २ राहण्याची आवड. ३. तावडतोब. 'स्वयमेव' या संस्कृताचें अपभ्रष्ट रूप—निर्णय०. ४. अभिमानी. ५. दैत्यगुरु शुक्राच्या स्नेहरूपी समुद्रातल्या सुसरीचे (देवयानीचे) ६ इंद्रानें. ७ चाकाचा आवाज ऐकिल्यानें. ८. भयानें गांगरून गेली बुद्धि ज्यांची ९. शत्रूचा नाश. १० यौवन परत देईन ११. उभयतां मिळून ठरलेली शपथ पाळूं; माझे मनोरथ तू पुरीव व मी हि काम होता च तुझें तारुण्य तुला परत देण्याचें वचन देतों.

गुरुसि यदु म्हणे, 'आहें नित्य अतिथ्यर्थसाधनीं सक्त;
नलगे जरा; इणें जो वरिला जन, तो न सत्क्रियाशक्त.'
स्वाज्ञाभंगें पावे बहु तेजस्वी ययाति तो ताप,
यदुला 'अराजपदभाक् तव संतति हो,' असा चि दे शाप. ९
प्रिय न करिती च, घेउनि तुर्वसुमुख पुत्र ते जरा, याचें;
शापी त्यांस हि; कैसें लंघन साहेल तेज रायाचें? १०
पूरु जरा घे, भोगी नृप बहु मानूनि रुचिर विषयांतें,
परि तृप्त नव्हे, तापे; जाणे, सेवूनि सुचिर, विष यांतें. ११
बहु विपयसेवन जसें, स्रोत तसें मानवा न वाहवितें;
न शमे स्मर विषयातें पावोनि, शिखी नवा नवा हवितें. १२
जें पृथ्वीवरि धान्यस्वर्णमणिपशुस्त्रिया असें कांहीं,
तें सर्व हि एकाच्या तृप्तिस पर्याप्त सर्वथा नाहीं. १३
जेव्हां कर्में, वचनें, चित्तें, भूतीं न पापभाव करी;
तेव्हां चि निश्चयानें शुद्धब्रह्मात्मतेसि जीव वरी. १४
अन्यापासुनि भी ना, यापासुनि भी न जेथवां अन्य,
द्वेष न करी, न इच्छी, तेव्हां चि ब्रह्म होतसे धन्य. १५
जी दुस्त्यजा कुमतिहीं, जीर्णाची ही न जी जिरे लेश,
जो प्राणांतिक गद, ती तृष्णा त्यजित्यासि सर्व सुख देश. १६
जीर्णाचे केश जिरंति, जीर्णाचे जिरंति सर्व ही दंत,

---

१. याचकांच्या इच्छा पुरविण्याच्या कामीं २ अंगीकृत व्रत चालविण्यास समर्थ. ३. राज्यपद न भोगणारी ४. तुर्वसु आदिकरून तिघे (पूरुशिवाय बाकीचे) ५. अवज्ञा ६ जलप्रवाहात सापडलेला मनुष्य सुद्धां विषयोपभोगाच्या प्रवाहात सांपडलेल्या माणसासारखा वहातांस लागत नाहीं नवीन नवीन आहुती टाकल्यानें अग्नि जसा शांत न होता उलटा प्रदीप्त होतो, त्याप्रमाणें च विषयोपभोगानें कामेच्छा तृप्त न होता ती अधिकाधिक प्रबल च होत जाते ७ पुरेसे. ८. प्राणि शुद्ध होत जातो, परब्रह्मस्वरूपास पावतो. ९ [व] जी जीर्णाची हि (वृद्धजनांची सुद्धां) लेश न जिरे (अणुमात्र कमी होत नाहीं). [तसें च] जो (जी तृष्णा) प्राणांतिक गद (रोग) [होय] १०. केस गळतात व दांत पडतात.

परि जीर्णाच्या जीवितधनवांच्छा ज्या तयां नसे अंत. १७
कामसुख असे लोकीं, दिव्यें[1] महत् सुख हि, जें असे भोग्य,
तृष्णानाशसुखाच्या[2] सोळाव्या हि न कळेसि तें योग्यें. १८
यापरि ययाति राजा विषय त्यागूनि गाय या गाथा[3],
सस्त्रीक[4] तपोनि सुगति पावे, मुनिवृंद डोलवी माथा. १९
राजर्षिसत्तमाहीं याच्या यदुमुख्य पंच तनयांहीं,
जेंवि तपनकिरणाहीं, व्यापिलि सर्वा हि भूमि सनयीं[5]हीं. २०
पूरुतनय प्रवीर क्षितिपति, याचा मनस्यु सुत राजा,
त्याचा अभयद वदला स्वजना, 'सद्गति तुम्हांसि सुतरां[6], जा.'
अभयदपुत्र सुधन्वा, तत्तनय सुबाहु नाम भूपाळ,
तत्सुत रौद्राश्वनृपति, जो शत्रूंचा नृमूर्तिमान्[7] काळ. २२
त्यासि सुत दशार्णयुप्रमुख दश यशस्विवर्य, दश कन्या
भद्राप्रमुखा दिधल्या एका विप्रा प्रभाकरा धन्या. २३
राहुप्रहारमूर्च्छित रवि पावे पतन, होय विप्रभ[8], यां[9]
नें[10] पडों दे हा, देहा दे द्युति तत्क्षण, हरूनि विप्र भयां २४
विप्रा प्रभाकराच्या अतिरमणीया प्रभादि दश ज्या, या
स्वस्त्यात्रेयाख्य ऋषि प्रसवुनि पावति विशुद्ध यश जाया. २५
कक्षेयुचा सभानर, तत्सुत कालानलाख्य वरतेजा[11];
त्याचा सृंजयनामक, कर देती, जे नरेंद्र पर, ते ज्या. २६
याचा पुरंजय तनुज, जनमेजय तत्तनूज बा राया!
यासि महाशाल, तया महामना क्षम निजांसि ताराया. २७

---

१ स्वर्गीय. २. तृष्णा टाकिल्यानें होणाऱ्या सुखाच्या सोळाव्या कळेसि (हिश्यासी) न तें योग्य (तें तोडीचें-बरोबरीचें नव्हे). ३ वेदांत नसलेली अशी धर्मविषयक किंवा परमार्थपर कविता-निर्णय ४ स्त्रियासह. ५ नीतिमान् अशा [तनयांहीं] ६. सुलभ ७ मनुष्यदेहधारी यम ८ निस्तेज. ९ यां (रविला). १०. हा (प्रभाकर) पडों न दे, विप्र भया हरूनि तत्क्षण देहा (रविच्या देहाला) द्युति दे. ११ श्रेष्ठ पराक्रमी.

पुत्र ज्येष्ठ उशीनर याचा, दुसरा तितिक्षु जाणावा,
सुत शिबि उशीनराचा, कविनीं जो कीर्तनांत आणावा. २८
झाला तितिक्षुपासुनि पुत्र उषद्रथ, नृपाळ तो भारी,
त्या फेन पुत्र, त्याला सुतपा, जो शत्रुदार[1]शोभारी. २९
सुतप्याचा पुत्र बळि, प्रभु झाला जो प्रसिद्ध सुतलेश[2],
त्या दीर्घतमा मुनि दे, जे साधुगुणें उणे न सुत लेश. ३०
पांच सुदेष्णाकुक्षिज बळिचे, त्यांमाजि पुत्र जो अंग,
त्याचा दधिवाहन सुत, दिविरथ या, ज्या रणीं नसे भंग. ३१
याचा धर्मरथ, तया चित्ररथ, तयासि देवरथ झाला,
तो लोमपाद, शांता निजकन्या दशरथें[3] दिली ज्याला. ३२
त्या ऋष्यशृंगमुनिच्या चतुरंगाभिध सुत प्रसादानें,
जो, चातकांसि जैसा नीरद, दे याचका तसा दानें. ३३
चतुरंगपुत्र पृथुल प्रसवे चंपासि, तत्पुरी चंपा,
पंपा[4] पापासि जसी, जी शत्रूंच्या बळांसि दे कंपा. ३४
चंपासि पुत्र झाला नामें हर्यंग पूर्णभद्रवरें,
ऐरावत आणुनि दे वैभांडकि[5] ज्यासि सिद्धमंत्रकरें[6]. ३५
हर्यंगाचा नंदन भद्ररथ ख्यात तो महत्कर्मा,
भद्ररथाचा पुत्र हि विख्यात महायशा बृहत्कर्मा. ३६
तत्सुत बृहद्भ सुधी, त्याचा सुत तो बृहन्मना सुकवी,
त्याचा जयद्रथ, तया दृढरथ, जो स्वाहितानने[7] सुकवी. ३७
याचा हि विश्वजित् सुत, याचा सुत कर्ण, तत्सुत विकर्ण,
याचे शत सुत, ज्यांच्या सुयशें धाले समस्तकविकर्ण. ३८
बृहद्भपुत्र कथिला राजा नामें बृहन्मना; याची

---

१. शत्रूंच्या बायकांच्या शोभेचा (अर्थात् सौभाग्यशोभेचा) शत्रू=शत्रूचा नाश करणारा २. सुतल (पाताल)+ईश (अधिपति) ३ दत्तक दिली–निर्णय०. ४. विरही रामाच्या सहवासानें ह्या सरोवराला पावनत्व आलें ५ विभांडक-पुत्र ऋष्यशृंग ६. सिद्धमंत्ररूपी हातानें. ७. आपल्या शत्रूंचीं तोंडें

सत्वी भार्या प्रसवे विजया, जैसी प्रभाकरा प्राची. ३९
विजयाचा धृति, याचा पुत्र धृतव्रत, तयासि सुत राया!
प्रख्यात सत्यकर्मा झाला निजपूर्वजांसि उतराया. ४०
तत्सुत अधिरथ पाळी त्या सांपडल्या शिशूसि, हा सूत,
जो साधु म्हणे 'अर्थी वदन मदन्यापुढें न वासूत.' ४१
त्या कर्णाचा आत्मज वृषसेन, तदीय पुत्र वृषनामा,
हे पुरुष अंगवंशीं, ज्यांच्या सीमा नसे चि शुचि धामा. ४२
जनमेजया! नृपाळा! जेथें झालासि तूं महाभागा!
वंशा ऋचेयुच्या त्या आइक आतां यशस्करा बा! गा! ४३
भार्या ऋचेयुची जी ज्वलनाख्या तक्षकात्मजा व्याली,
ती, 'मतिनार' म्हणति कवि ज्या, त्या राजर्षितें सती व्याली.४४
तत्पुत्र तंसु, अप्रतिरथ, अणिक सुबाहु, हे तिघे, अन्या
धन्या मांधात्याची माता गौरी महासती कन्या. ४५
अप्रतिरथसुत कण्व, द्विज मेधातिथि तदीय सुत बा! रे!
याच्या वशीं जे, ते काण्वायन विप्र जाहले सारे. ४६
तंसुसुत सुरोध नृपति, याची उपदानवी सती जाया
प्रसवे दुष्यंतातें, वरूनि वर वरी शकुंतला ज्या या. ४७
दुष्यंतपुत्र नागायुतबळ तो भरत; विजय तत्तनय,
ज्याच्या भयें न सोडी कोणही, होवूनि भाग्यमत्त, नय. ४८
त्याचा काशिक, याचा दीर्घतपा सुत, तया जसा पहिला
धन्वंतरि होय पुन्हां, जो भगवान् पक्षिपति गदा अहिला. ४९
तत्पुत्र केतुमान् नृप, तत्पुत्र हि भीमरथ महातेजा,
तत्पुत्र दिवोदास, 'प्रथमसम चि' म्हणति कवि पहाते ज्या. ५०

---

१ पूर्वदिशा. २ उद्धरण्यास ३ त्या प्रख्यात कर्णास ४ तेजाला म्ह० यशाला
५ प्रथम दुष्यंताकडून वरदान घेऊन ६ दशसहस्र हत्तींची शक्ति अंगीं असणारा.
७ मागें अ० ४।३१ पहा ८ जो भगवान् [ धन्वतरी ] रोगरूपी सर्पाला गरुड होय
९ पहिल्या दिवोदासासारखा [कीर्तिमान्] मागें अ० ४।३२ पहा.

पुत्र दिवोदासाचा जो, नामें तो प्रतर्दन ख्यात;
तत्पुत्र वत्सनामा, हा होय अलर्कनृपतिचा तात. ५१
आयु[1] अलर्कासि विपुळ लोपामुद्राप्रसादपात्रास,
त्याचा सुनीथ, याचा क्षेम्य, पराचा नसे चि या त्रास. ५२
क्षेम्यसुत केतुमान् नृप, त्यापासुनि वर्षकेतु सुत होय,
त्याचा सुत विभु, ज्याचें यश जैसें स्वर्गसिंधुचें तोय. ५३
या आनर्त, तया सुकुमार, तया सत्यकेतु जाणावा.
आतां चित्तीं सुजनीं वितथसुतसुहोत्रवंश आणावा. ५४
तत्तनुज बृहन्नामा, तन्नंदन तीन, एक अजमीढ,
दुसरा द्विमीढनामा, तिसरा नामें प्रसिद्ध पुरुमीढ. ५५
अजमीढपुत्र जह्नुप्रभु, याचा पुत्र अजक जयशाली,
पुत्र बलाकाश्व तया, ख्याति जयाची जगत्त्रयीं झाली. ५६
त्या कुशिक, गाधि तत्सुत, या विश्वामित्र, पुत्र ते ज्याचे
प्रख्यात देवरातप्रमुख रविसमान राशि तेज्याचे. ५७
अजमीढाचा दुसरा वंश असा, सुत सुशांति या नावें,
त्या पुरुजाति, तयाला बाह्याश्व, जया महेंद्र मानावें. ५८
त्या मुद्गलप्रमुख सुत पंच, तयां ग्राम होय पचाल,
ब्रह्मर्षि मुद्गलात्मज, षंडरींस[3] म्हणे, 'मला न वंचाल.' ५९
याचा वध्र्यश्व तनय, मिथुनें[4] तया मेनकोदरीं झालें,
पुत्र दिवोदास, सुता होय अहल्या, जिला सुयश आलें. ६०
होय शरद्वत्पत्नी [5]हे, झाला सुत इला शतानंद,
त्याचा सत्यधृति तनय होय[6] सुरस्त्रीविलोकनें मंद. ६१
आलिंगिली बळें, परि जालपदी अप्सरा सुटोनि पळे,

---

१ लोपामुद्रेच्या कृपेस पात्र झालेल्या या अलर्कास [ त्या कृपेमुळें ] विपुल आयुष्य होतें. २ मूळ पाठ–**चाय** (?) ३. तो कामक्रोधादि षड्रिपूंस म्हणे, 'तुम्ही मला फसविण्यास समर्थ होणार नाहीं' ४ मुलगा व मुलगी असें जुळें ५ ही (अहल्या) ६ देवस्त्री (अप्सरा) पाहून मद ( वेडा–कामवश ) झाला.

तद्रेत शरस्तंबीं,[1] मार्गें लागोनि धांवतां हि, गळे. ६२
होय मिथुन तत्काळ चि, न धरी रेतासि जरि हि ती देवी,
मृगयागत शांतनुनृप परिपाळी, नाम 'कृप' 'कृपी' ठेवी. ६३
रौद्राश्वाचा नंदन कक्षेयु, तयाचिया कुळीं झाला
काळानळ, तत्सुत जो सृंजय, सुत होय पंचजन त्याला. ६४
सुत सोमदत्त त्याचा, त्याचा सहदेव सुत महाभाग,
तत्पुत्र सोमक, म्हणे संसारीं निजजना 'न' हा 'भाग.' ६५
सोमकसुत जंतु, तया पुत्र शत, कनिष्ठ तो पृषत राजा,
त्या द्रुपद पुत्र, धृष्टद्युम्नपिता, धृष्टकेतुचा आजा. ६६
तिसरी अजमीढाची तपली पुत्रार्थ धूमिनी भार्या;
करि अग्निहोत्रसेवा अयुताब्द[2] कुशांवरी निजे आर्या. ६७
सुत अजमीढापासुनि झाला त्या धूमिनीस, तो ऋक्ष;
तत्पुत्र संवरण, जो देवांचा[3] आठवूं न दे वृक्ष. ६८
त्याचा सुत कुरु, जेणें पुण्य कुरुक्षेत्र निर्मिलें ख्यात;
पुत्र सुधन्वा, दुसरा त्यास परीक्षित् सुधी जसा तात. ६९
तनुज सुधन्व्याचा तो राजा नामें सुहोत्र कविगीत,[4]
याचा च्यवन सुत, तया कृतयज्ञ गुणें सदैव अविगीत.[5] ७०
त्याचा पुत्र उपरिचरवसु, याचा सुत बृहद्रथ प्रथित,
तत्सुत कुशाग्र, याचा वृषभ नृपति, जो करी अरि व्यथित. ७१
त्या पुष्पवान् सुत, तया सत्याहित, तयासि पुत्र तो ऊर्ज,
वेची परोपकाराकरितां सर्वस्व जो, जसा भूर्ज.[6] ७२
ऊर्जाचा सुत संभवनामा, हा प्रसवला जरासंधा,[7]

---

१ दर्भांच्या समुदायात २ दहा हजार वर्षेंपर्यंत. ३ ज्याच्या औदार्यामुळें कल्पवृक्षाची आठवण हि कोणास होत नसे ४. कवींनीं वर्णिलेला. ५. अनिंद्य. प्रसिद्ध. ६ वृक्षविशेष (पूर्वी भूर्जपत्रावर नखानें, काड्यानें किंवा सुईच्या अग्रानें कोरून लिहित असत). ७. आर्या० सभा० १।७१—८६ पहा.

ज्यांची सर्वक्षत्रियविजयीं न च पावली जरा संधा[1]. ७३
त्याचा सहदेव, तया पुत्र उदायु प्रसिद्ध भूभर्ता,
त्याचा श्रुतकर्मा सुत, जो स्वजनातें म्हणे, ‘सुखें वर्ता.’ ७४
कुरुचा पुत्र परीक्षित्, तत्सुत जनमेजय प्रवीरनुत[2],
त्या भीमसेन नामें, श्रुतसेन, तसा चि उग्रसेन सुत. ७५
दुसरी याची भार्या प्रसवे सुरथासि, सुरथ ही राज्या !
पावे विदूरथातें, मिरवी वसुधा सदैव हीरां[3] ज्या. ७६
नंदन विदूरथाचा ऋक्ष प्रख्यात हा दुजा जाण,
दोघे ऋक्ष परीक्षित् तव वंशीं, हें असें मनीं आण. ७७
तैसे चि भीमसेन त्वद्वंशीं या तिघे असें समज,
जनमेजय दोघे वा ! होय भ्रम वंश वर्णितां न मज. ७८
या दुसऱ्या ऋक्षाचा नंदन जो भीमसेन, या तनय
होय प्रतीप, ज्याच्या राष्ट्रांत पुरुष नसे चि हातनय[4]. ७९
तीन प्रतीपनंदन शंतनु, देवापि, बाल्हिक, प्रथित;
शंतनुसुत देवव्रत, ज्याचें यश साधुमंडळीं कथित. ८०
गंगेपासुनि झाला शंतनुचा पुत्र भीष्म हा पहिला,
दुसरा पाळी काळीकुक्षिभव[5] विचित्रवीर्य या महिला. ८१
झाले विचित्रवीर्यक्षेत्रीं[6] सत्कीर्तिभाजन तिघे ते
धृतराष्ट्र पांडु विदुर व्यासापासूनि, राजनति घेते. ८२
शत सुत धृतराष्ट्राचे; जो दुर्योधन, तयांत तो ज्येष्ठ,
अर्जुन पांडुनृपाचा, अभिमन्यु तदीय सुत गुणश्रेष्ठ. ८३

---

१. “सर्व क्षत्रियांवर जय मिळवीन” अशी ज्याची संधा (प्रतिज्ञा) जरा (जीर्णत्व—म्ह० भंग) पावली नाही. २. मोठमोठ्या वीर पुरुषांनीं स्तविलेला. ३. हीर=हिरा ४. हात (टाकिला आहे) नय (नीति) ज्यानें असा म्ह० अनीतिमान्. ५ काळी (सत्यवती)+कुक्षिभव (पोटा जन्मलेला). ६ विचित्रवीर्याच्या बायकांच्या पोटीं व्यासापासून सत्कीर्तिपात्र व मांडलिक राजापासून नति (नमस्कार—सत्कार) घेणारे धृतराष्ट्रादि तिघे पुत्र झाले.

अभिमन्युचा परीक्षित्त्व तातें, ख्यात वंश पौरव हा,
झालासि यांत बा ! तूं जनमेजय, यंश सुधांशुगौर वहा. ८४

---

# अध्याय सहावा.

तुर्वसुचा वह्नि तनुज, त्याचा गोभानु पुत्र अतितेजा,
तत्पुत्र त्रैसानु, स्तविति वहु कवींद्र साधुमति ते ज्या. १
त्रैसानुचा करंधम, तत्पुत्र मरुत्त, या कुळीं धन्य,
ज्यां पूर्वी तुज कथिला जो आविक्षित मरुत्त, तो अन्य. २
जाला मरुत्त हा निजकर्मविपाकें[2] अपुत्र, या सुहितां[3]
सद्बुद्धि[3] संमताख्या, संवर्ता दक्षिणार्थ[4] दे, दुहिता. ३
जें यज्ञांत मिळालें, ज्ञाता संवर्त तो पुरोधा[5] तें
कन्यारत्न समर्पी पूरुकुळींच्या नृपा सुरोधातें. ४
सुत समतेसि झाला दुष्यंत सुरोधनृपतिपासून,
योग्या सुता मिळाली कण्वाची पुण्यकीर्ति या सून. ५
पूरुनृपाच्या वंशीं तुर्वसुचा वंश हा असा सिरला,
यमुनासरिदोघ[6] जसा सुरसरिदोघीं, तसा नृपा ! जिरला. ६
द्रुह्युतनय सेतु, तया झाला अंगारनाम सुत, यास
नृप यौवनाश्व मारी, त्यांसी रण होय पंचँ नवँ[7] मास. ७
गांधारतनय याचा, देश हि गांधार, यांत जे वाजी

---

[illegible] अत्यंत कांतिमान् हा. २ स्वतःच्या पूर्वार्जित कर्मांच्या फळामुळें. ३. समतेचीं विशेषणें सुहिता=खरें हित जाणणारी. ४ यज्ञांत पुरोहितास द्यावयाच्या दक्षिणेऐवजीं ५ पुरोहित. ६. यमुनानदीचा ओघ ज्याप्रमाणें सुरसरित् (देवनदी गंगा) इच्या ओघांत मिळून गेलेला आहे त्याप्रमाणें. ७. चवदा.

म्हणति भटांसि, 'करुनि रणमख[1] आम्हांसह सुलोक सेवा जी!'
अनुचा धर्म, तयाचा धृतनामा पुत्र, या दुदुह, याला
जो पुत्र, तो प्रचेता नाम, सुचेता असे तनय झाला. ९

# अध्याय सातवा.

यदुचा प्रथम सहस्रद, दुसरा नंदन पयोद मूर्त नय[2],
तिसरा क्रोष्टा, चवथा नील हि, अंजिक हि पांचवा तनय. १
नंदन सहस्रदाचे हैहय, हय, वेणुहय, असे तीन;
सुत सुमति हैहयाचा, सच्चरणीं धर्मनेत्र तो लीन. २
याचा कीर्ति, तयाचा साहंज तनूज, सद्गुणीं खचिली
ऐसी लोकख्याता तेणें साहंजनी पुरी रचिली. ३
साहंजसुत महिष्मान्, तेणें माहिष्मती पुरी केली,
अमरावतींत सुरसे जींत करिति पौरजन सुखें केली. ४
ख्यात महिष्मन्नंदन भद्रश्रेण्य, प्रतापवान् भर्ता
वाराणसीपुरीचा, याचा दुर्दम तनूज कुळकर्ता[3]. ५
दुर्दमसुत कनकाभिध, याचा कृतवीर्यनाम सुत पहिला,
याचा अर्जुन योगी भोगी द्वीपासमेत या महिला[4]. ६
हा अर्जुन आराधी वर्षायुत अत्रिनंदना दत्ता,
मुनिदत्तवरें याची सप्तद्वीपांत अद्भुता सत्ता. ७
ज्याच्या तेजें क्षत्रिय तेजस्वी संगरांत करपावे,
'प्रकटावे भुज दशशत समर्थी,' हा प्रथम भव्य वर पावे. ८

१. रणयज्ञ करून (लढाईंत आमच्यावर स्वार होऊन) आम्हांसह स्वर्ग मिळवा, रणांगणीं पतन पावल्यास उभयतांस हि स्वर्ग मिळेल, असें जणू काय जाणून च ते मोठ्या उत्सुकतेनें लढाईंत शिरण्यास उद्युक्त असत, असा भाव. २. मूर्तिमत नीति. ३. कुळदीपक. ४. सप्तद्वीपा वसुंधरेला.

'शिरतां चित्त अधर्मीं वारावें आपणासि साधूनीं,
धर्में प्रजानुरंजन, युद्धें सर्वा हि भूमि साधूनीं. ९
जिंकुनि बहु समरांतें, मारूनि सहस्रशः स्वरिपु, अंत
व्हावा अधिकापासुनि,' घे वर हे च्यार, सांगती संत. १०
द्वीपीं द्वीपीं शत शत, यज्ञ करी सप्तशत असे भूप;
ज्यांत सुवर्णें चि रची पात्रें, वेदी, तसे चि ते यूप. ११
ज्याचा प्रताप परनृपकटकीं, दव जेंवि काननीं पेटे,
सप्तद्वीपस्थजना जो रक्षणदक्ष सर्वदा भेटे. १२
होय सहस्रार्जुन तो आपण चि क्षेत्रपाळ, पशुपाळ,
नष्टद्रव्यत्व नसे; ज्याच्या राज्यांत नित्य सुखकाळ. १३
कंटकवर्जित पंचाशीतिसहस्राब्द जो करी राज्य;
दे स्वप्रजांसि अर्जुन अर्जुन सुख नित्य निरुपम प्राज्य. १४
सोडी बाहुसहस्रें आलिंगुनि करुनियां सुखक्रीडा,
रेवा होय पतिप्रति जातां बहु शंकिता धृतव्रीडा. १५
क्रीडे तें सिंधु म्हणे, 'करितो मन्मथन, सत्य मंदर हा'
शक्र हि म्हणों शकेना, मग कोण म्हणेल यासि, 'मंद ! रहा'?

---

१ आपल्याहून अधिक पराक्रमी अशा वीरापासून २ यज्ञद्रव्यें ठेवण्याची जागा ३ यज्ञस्तंभ ४ शेताचें पालन करणारा ५ द्रव्य नाहींसें होणें ६ [शत्रु-रूपी] कंटकरहित ७ पंचायशीं हजार वर्षें. ८ मिळवून ९ [सहस्रार्जुन रेवेला स्नान वगैरे करितांना] आपल्या हजार बाहूंनीं आलिंगन देऊन व मनसोक्त जलक्रीडा करून [नंतर] सोडी, [त्यामुळें] पतिप्रति (समुद्राकडे) जातांना रेवा (नर्मदानदी) बहुत साशंक व लज्जायुक्त होई (आपल्या पतीकडे जातांना मध्यें च परपुरुषानें आपल्यास यथेच्छ उपभोगिल्यानें साहजिक च तिला भय व लज्जा वाटूं लागली). १० सहस्रार्जुनाची जलक्रीडा सुरू झाली कीं, सिंधूला (समुद्र किंवा नर्मदा नदी इला) पूर्वीं अमृतमंथनप्रसंगीं मंदरपर्वतानें आपलें मथन केलें तो च प्रसंग पुनः आला, असें वाटून त्याचा थरकांप होई ११. स्वस्थ बैस.

लंकेशातें बांधी, मानूनि पुलस्त्यवचन मग सोडी,[1]
मागे सप्तद्वीपज्वलन, म्हणे, 'घे, स्पृहा तुझी थोडी.'[2] १७
सप्तद्वीपांत दहन पेटे, त्या[3] कार्तवीर्य हा रक्षी,
तो श्रीवसिष्ठमुनिचें आश्रमवन, इतर वन तैसें भक्षी. १८
कोपोनि वसिष्ठ म्हणे, 'तुज इतर कोण जाळविल यातें?
मत्ता! समरीं नेयिल तुज भार्गवराम काळविलयातें.' १९
या चक्रवर्तिचित्ता, ऐसें शापुनि, न ताप आपव दे,
कीं 'दत्तदत्त वर जो पहिला, त्या हा सहाय शाप' वदे. २०
मग सर्वरत्नभोक्ता अर्जुन वधिला रणांत भृगुरामें,
लोपविलें तेजानें तेज, जसें दीपधाम रविधामें. २१
याचे सुत शत होते, मेले युद्धांत, राहिले पंच;
त्यांतिल जो विजयध्वज, तो विजयश्रीविलासिनीमंच. २२
विजयध्वजराज्याचा सुत नामें तालजंघ, सुत या जे,
ते तालजंघसंज्ञक, त्यांचे बहुसंज्ञ वंशभव राजे. २३
यदुसुत पयोद, तत्सुत मधु, या शत सुत, तयांत वशाकर
वृषण, तयाच्या वंशीं झाले ते सर्व वृष्णिनामधर. २४
क्रोष्टा यदुसुत तिसरा, याची प्रथमा महासती भार्या,
ती गांधारी प्रसवे, पुत्रा अनमित्रनामका आर्या. २५
दुसरी माद्री, तीचा ज्येष्ठ युधाजित् सुधींस सत्कार्य,
सुत अन्य देवमीढुष, ज्यासि निजापरिस इष्ट सत्कार्य. २६
ज्येष्ठ युधाजिन्नंदन वृष्णि, जया सर्व वर्णिती संत;

१. पुलस्त्य हा रावणाचा आजा. २. इच्छा (मागणें). ३. त्या (असीला). ४. वाकीच्या आश्रमवनाप्रमाणें. ५. वसिष्ठ. ६. मागें ७ वी गीति पहा. ७. दिव्याचें तेज. ८. विजयलक्ष्मीरूपी विलासिनीला मंचकाप्रमाणें (क्रीडास्थानाप्रमाणें) असलेला. ९. अनेक नावांचे. १०. उत्पन्न झालेले. ११. बुद्धिमंतांस पूज्याई=सत्कार करण्यास योग्य. १२. ज्याला सज्जनांचें कार्य स्वकार्याहून आवडे.

दुसरा अंधक, ज्याचें यश गौरीसूनुचा जसा दंत. २७
पुत्र श्वफल्क, चित्रक, दोघे त्या वृष्णिचे, वसे पहिला
जेथें, अवर्षभय कीं रोगभय कधीं सिवेचिना महिला. २८
बा! काशिराजदेशीं घन वर्षे तीन लेश वर्षेना,
आराधिला परोपरि, परि हरिवाहन मनांत हर्षेना. २९
परिसुनि यश, श्वफल्का परमार्चित करुनि, आपुल्या देशीं
तो काशिराज वसवी, जो मग्न निजप्रजांसह क्लेशीं. ३०
तत्काळ वृष्टि झाली, साधूहुनि कोण पर महितकाय?
सद्भक्तां सुलभ अमृत, तेथें तें वर्ष परमहित काय? ३१
त्या जेंवि ऋष्यशृंगा दे शांता लोमपाद तो सुहिता,
काशीश हा श्वफल्का अर्पी पूजूनि गांदिनी दुहिता. ३२
विप्रांसि नित्य गाई दे, यास्तव 'गांदिनी' तिचें नाम,
ती होती गर्भस्था, तेव्हांपासूनि हा तिचा काम. ३३
बहु वर्षे मातेच्या उदरीं होती करूनि वसतीस,
तात म्हणे, 'निघ बाहिर; कां गर्भीं श्रम वरूनि वसतीस?' ३४
पोटांतूनि म्हणे, 'जरि देसिल द्यायासि नित्य गोदानें.
तरि गर्भवास सोडुनि ताता! बाहिर निघेन मोदानें' ३५
तो तात म्हणे, 'धन्ये! कन्ये! दाखीव वदन, ये, गाई!
जितुक्या इच्छिसि, तितुक्या वत्से! विप्रांसि नित्य दे गाई.'
तो काशिराज करिता झाला तत्काम हा असा मान्य,
मग तत्काळ उपजली, ऐसा महिमा तिचा असामान्य. ३७

---

१ गणपतीचा. २ दांत (शुभ्रपणासंबंधीं) ३ अनावृष्टिभय. ४. इंद्र. ५. उत्तम रीतीनें सत्कृत ६. पूज्य आहे देह ज्याचा तो. ७. उत्तम भक्तांना अमृत सुद्धां सुलभ रीतीनें मिळतें, तर तेथें तें वर्ष (पाऊस) परमहित काय? किंवा तें परमहित वर्ष काय (कोणत्या झाडाचा पाला)? ८. 'अग+आइ' याचें पंतकृत संक्षिप्त रूप-निर्णय०.

दाता, यज्वा[1], वीर, श्रुतवान्[2], अतिथिप्रिय, प्रथम तनय,
अक्रूर गांदिनीचा स्वप्नीं ही न रुचला जया अनय. ३८
याचे प्रख्यात उपासंगादिक बहुल वर्णिले अनुज,
भगिनी सुंदर्याख्या, देवतनुज[3] भासती, न हे मनुज. ३९
अक्रूराचे दोघे, यांत तनूज प्रसेन हा पहिला,
उपदेव पुत्र दुसरा, गमती ते दस्र पातले महिला. ४०
क्रोष्ट्याचा तिसरा सुत, जो नामें देवमीढुष ख्यात,
प्राणेश अश्मकीचा, सूराचा हा महायशा तात ४१
सूराचा वसुदेव ज्येष्ठ तनय, तदभिधा[4] असी दुसरी
आनकदुंदुभि[5], जीणें अरितनु वाळोनि जाहली उसरी[6]. ४२
हा जन्मतां सुरांहीं आनक दुंदुभि नभांत वाजविले,
वर कुसुमवृष्टि केली, जयजयकारें दिगंत गाजविले. ४३
सुत देवभाग दुसरा, तिसरा देवश्रवा अशा नावें,
चवथा श्रीसूराचा पुत्र अनाधृष्टि, ज्या जगें गावें. ४४
कनवक पंचम, सावा वत्सावान् अनवें[7], गृंजिम, श्याम,
नवम शमीक, दशम जो ' गंडूष ' असें असे तया नाम ४५
पृथुकीर्ति पृथा तिसरी ती श्रुतदेवा श्रुतश्रवा धन्या,
राजोत्तराधिदेवी[8] सूराच्या पांच वीरसू[9] कन्या. ४६
कुंत्यनृपापासूनि श्रुतदेवेला तनूज जो झाला,
विधिनें विप्रानुमतें 'अगृह' असें नाम ठेविलें त्याला. ४७
श्रुतकीर्ति वृद्धशर्मक्षितिपतिपासुनि वरा सुता पावे,
तो दंतवक्त्र, ज्याच्या स्मरणें हि सदा परासु तापावे. ४८
झाला श्रुतश्रवेचा पुत्र कनककशिपु, जो अमरकाळ.

---

१ यज्ञकर्ता २ विद्वान्–वेदज्ञ. ३. अश्विनीकुमार. ४ त्याचें नाव. ५ वसुदेवाचें हें दुसरें नांव पडण्याचें कारण पुढील गीतींत पहा. ६. वाळलेली भाजी. ७. अनव=नवे नव्हेत ते म्ह० सहावा व नववा यांचे दरम्यानचे अर्थात् सातवा व आठवा. ८ राजाधिदेवि–**पंत.** ९. वीरपुत्रांस प्रसवणाऱ्या.

रावण दुसऱ्या जन्मीं होय, तिसरियांत तो चि शिशुपाळ. ४९
दे सूर कुंतिभोजा अनपत्या आपुल्या सख्यास पृथा,
कीं देय पदार्थ असुनि न दिला तरि साधु म्हणति 'सख्य वृथा'. ५०
पांडुनृप पृथेसि वरी; जिणिते[1] पीयूषमाधुरी तीचे
सुत धर्म, भीम, अर्जुन, जे क्रीडानिलय[2] साधुरीतीचे. ५१
क्रोष्ट्याचा प्रथम तनय अनमित्र, तदीय पुत्र शिनिनामा,
त्या सत्यक, या सात्यकि युयुधान, प्रेष्ठ[3] जो घनश्यामा. ५२
युयुधानाळा झाला सुत, तो नामें असंग बोलावा;
त्या भूमि, त्या युगंधर, हा तातासीं गुणाढ्य तोलावा. ५३
प्रसवे ज्या सत्पुत्रा बहु पुण्यें देवभाग उद्धव हा
पंडितमुकुटमणि, म्हणे निजवंशा, 'यश सुधांशुशुद्ध वहा.' ५४
देवश्रवा प्रसवला ज्या, हा शत्रुघ्न, आपुल्या हातें
बाळपणीं च त्यजिला तो कांहीं कारणें वनीं तातें. ५५
पाळी निषादपाळ[4], प्रेम करी जेंवि औरसीं तोकीं;
तो एकलव्यनामा नैषादि ख्यात होय या लोकीं. ५६
वत्सावान् स्वभ्राता अनपत्य, तया दयानिधानानें
वसुदेवानें औरस कौशिक नंदन दिला विधानानें[5]. ५७
सुत च्यार चारुदेष्णप्रमुख समर्पूनि सुखविला चुलता.
सकृपप्रवरप्रभुनें[6], नातरि गंडूष आधिनें[7] डुलता. ५८
चित्तीं शमीक निंदी भोजत्वातें[8], निघोनियां जाय,
भेटे युधिष्ठिरा, तो या मामाचे शिरीं धरी पाय. ५९
यांचे[9] शत्रु विमर्दुनि, याकरवीं राजसूय तो करवी;

---

१. जिकणारे. २. क्रीडेचें ठिकाण ३. अत्यंत प्रिय ४ भिल्लांचा राजा. ५ दत्तविधानानें. ६. कृपावंतांतील सर्वश्रेष्ठ अशा. ७ अनपत्यत्वामुळें त्याच्या मनाला फार खेद झाला असता. (डुलता=वांकता). ८. भोजत्व=एका देशाचें राज्य; (सार्वभौमत्व नव्हे) ९ शमीकाचे.

साधुश्रितासि किति हें? यांचें आपण म्हणेल तोक रवी. ६०
वसुदेवाच्या जाया ज्या या पात्रें महाप्रशा चवदा,
कश्यपभार्या आर्या अदिति जसी काय, त्या तशा च अका. ६१
ज्येष्ठा बाल्हिककन्या दयिता सर्वांत रोहिणी जाया,
प्रथम प्रसवे पुत्रा, म्हणती ' बळराम ' शुद्धधी ज्या या. ६२
सारण, दुर्दम, वामन, शठ, पिंडारक, उशीनर, श्वभ्र;
जे ख्यात आठ दिग्गज, ते या आठांपुढें बळें दभ्रें. ६३
चित्रा नवमी मुनिच्या शापें पोटासि अप्सरा आली,
ती गर्भवास भोगुनि, हें त्यजितां देह, चिंतिती झाली. ६४
' धिक्कार मला मूढा, हतभाग्या एक मीं, दुजी नाहीं;
जन्मुनि हि वृष्णिवंशीं भगवल्लीला न पाहिल्या काहीं. ' ६५
यापरि पश्चात्तसा कीं ' संसारांत हा महा तोटा, '
चित्रा, आली होती ज्या, त्या पहिल्या पुन्हां हि ये पोटा. ६६
चित्रा ती च सुभद्रा, विजयवधू, रोहिणीसुता दशमी,
अभिमन्युतें प्रसवली, म्हणतों, ' न परेसि ये इचें यश, ' मीं. ६७
वसुदेवतनुज झाला जीच्या उदरीं महायशा शौरी,
त्या देवकीस गाती प्रेमरसाच्या भरें बरें गौरी. ६८
रामापासुनि झाला जो नंदन रेवतीस हा निशठ,
ज्या तेजस्विप्रवरा न भजुनि, बहु पावले चि हानि शठ. ६९
सुत सत्यकेतु तिसरा, जो सत्याच्या अधीन, अन्या या
अक्रूरस्त्री प्रसवे; हा कवि शिवला कधीं न अन्याया. ७०
शांति, विजय, हे दोघे सद्गुणनिधि पुत्र शांतिदेवीचे;

---

१. [प्रत्यक्ष] सूर्य सुद्धा स्वत:ला साधुश्रितांचें मूल म्हणेल व त्यांत आनंद पावेल. २. पात्रत्वानें. (विशेषणाचा भाववाचकाप्रमाणें उपयोग केलेला संस्कृतमध्यें आढळतो). ३. अल्प ४ भगवताच्या अवतारलीला. ५. कृष्ण.

हे अधिक, चंद्र वरिचेवरि कीं सोडुनि कांति दे, [1]वेचे.
तो वृकदेव, गद हि तो, शुभलक्ष्मीं प्रसवली सुनामा ज्या;
शूर म्हणे, 'पुत्रवती धन्या लोकत्रयीं सुना माज्या.' ७२
अंगावहपुत्रातें वृकदेवी प्रसवली, इचा तात
देवक; गार्ग्य पुरोहित ज्याचा, यच्चरित साधु गातात. ७३
या गार्ग्याच्या स्त्रीचा होता यादवपुरोहित भ्राता;
तो हांसे गार्ग्यातें वृष्णिसभेमाजि, बाळसा ताता. ७४
तल्लिंग हालवी हा हातें फेडुनि दहांत धोत्रास,
[2]तदनुत्थानें श्याल 'क्लीब,' म्हणे, बा! धरी न तो त्रास. ७५
तो योगींद्र जितेंद्रिय गार्ग्य विकारा न पावला कांहीं;
बहु वृष्णि हांसले, तो हंस चि उपहासिला बलाकांहीं. ७६
गार्ग्यांसि हांसले ते [3]अनुमोदुनि सर्व यादव श्याली,
क्रोध धरी तच्चित्ता, बा! जेंवि [4]ग्राह [5]यांद [6]वश्याला. ७७

१. ह्या आर्येतील अखेरचा शब्द मूळ प्रतींत 'वेचे' असा आहे, परंतु **पंतां**च्या नेहमींच्या यमकपद्धतीचा विचार केला तर 'वीचे' हा शब्द पाहिजे असून नजरचुकीनें 'वेचे' असें लिहिलें गेलें असावें, असा संभव दिसतो 'वीचे' असा पाठ धरून अर्थ.— चंद्रकांति वरचेवर कमी होते म्हणून त्या कांतीवर उपजीविका करणाऱ्या वीचे (चकोरपक्ष्याचे) हे (शांति–विजय) अधिक (जास्त आवडते होते—कारण त्याची कांति कधीं हि कमी होत नसे) 'वेचे' असा पाठ धरून अर्थ.–(१) चंद्रकांति वरचेवर कमीजास्ती होते, म्हणून चंद्र याच्यापेक्षा कमी योग्यतेचा, हे अधिक वेचे (वेचा=मोल, किंमत), हे चंद्रापेक्षां अधिक मोलाचे होत. (२). वेचे=कमी होई चंद्र कांति सोडून देतो आणि [आकारानें] कमी होतो, येथें 'वेचे' हा शब्द 'वेचे' असा वाचला पाहिजे 'वीचि' या पाठानें अर्थ सरस व यमक युक्त होतें; 'वेचे' या पाठानें अर्थाची ओढाताण करावी लागते. २ तें न उठल्यामुळें (चेतना न पावल्यानें) ३ श्यालाच्या म्हणण्याप्रमाणें त्याचें क्लीबत्व खरें समजून (मान्य करून). ४ मगर. ५ लहान जलचर. ६. तावडींत सांपडलेल्या.

मुष्टि अयश्चूर्ण गिळुनि, तप करि तो गार्ग्य अब्द बारा, हो!
शंभुप्रभुसि म्हणे हा, 'लोकीं न क्लीबशब्द बा! राहो.' ७८
त्या गार्ग्यातें द्वादशवर्षांतीं देवदेव हर पावे,
प्रभुवर 'वर माग' म्हणे, यत्स्मरणें सर्व ताप हरपावे. ७९
मागे, 'यादवभीतिप्रद आत्मज आपणा इलावर हो.'
गार्ग्याचा काम जसा, तैसा चि प्रभुवरें दिला वर हो! ८०
रुद्राच्या आज्ञेनें गोपस्त्रीवेषधारिणी भार्या
तद्धैर्यें तेज धरी, गोपाली अप्सरा चि ये कार्या. ८१
प्रसवुनि अलिसप्रभसुत, गेली टाकूनि अप्सरा देवी;
अनपत्य यवनराज प्रेमें स्वांत पुरीं तया ठेवी. ८२
तो काळयवननामा यवनेश्वर, हरवरप्रभव, भारी
रणकाम धरूनि पुसे विप्रांतें, योग्य वीर रणकारी. ८३
त्याला, 'यदुकुल परम प्रबळ,' असें नारद स्वयें कळवी;
ज्यां प्रिय कलिसूचन, हें व्यसन चि, परि तें न यशा मळवी.
रणकामें काळयवन क्षितिपति मथुरापुरीसि घेराया,
अक्षौहिणी स्वसेना घेउनि, अत्युग्र तो निघे, राया! ८५
'आलों, व्हा सिद्ध,' असें सांगाया पाठवी पुढें दूत;

---

१ लोखंडाचा कीस २. पृथ्वीपति ३. त्या गार्ग्याचें तेज (वीर्य) गर्भाशयांत धारण करण्यास त्याची स्त्री समर्थ नव्हती, म्हणून शंकराच्या आज्ञेनें गोपालीनामक अप्सरेनें गोपस्त्रीवेषधारण करून तें धारण केलें व तें वीर्यधारणकार्य तिनें तडीस नेलें. ४ अलिसप्रभनामक यवनाधिपतीचा मुलगा कालयवन, गार्ग्यवीर्यापासून गोपालीच्या पोटीं झालेल्या मुलास या यवनपतीनें सांभाळिलें होतें ५. शंकराच्या वरानें जन्मलेला ६. ज्या नारदाला कलहाची सूचना करणें (कळ लावणें) ही सवय च होती; परंतु त्या कृतीनें त्याच्या कीर्तीला कालिमा मात्र लागला नाहीं. कारण, त्यांत त्याचा हेतु नेहमीं लोककल्याणाचा च असे. ७ संग्राम करण्याची इच्छा करणारा.

उसळे[1] अनावर अशुचितैलकटाहीं नृपा! जसा ऊत. ८६
कृष्णमतें यदु म्हणती, ' क्षम कोणी प्रभुवरापुढें[2] नसती,
मथुरा त्यजुनि करावी पारावारीं[3] कुशस्थळीं वसती.' ८७

---

# अध्याय आठवा.

क्रोष्ट्याचा वृजिनीवान्, पुत्र तयाचा धरावरा[4]! स्वाही,
त्याचा रुशङ्कु सुत, जो रचितान्यायां[5], जसा परा, स्वा ही. १
बहु मख करितां, झाला चित्ररथ रुशङ्कुला, तयाला ही
शशबिंदु होय, होतीं[6] दुर्जन चिंतुनि मनीं जया लाही. २
त्या शशबिंदु नृपाला झाला सुत, तो पृथुश्रवा साचा
राजा भर्ता हर्ता सर्वार्थि[7]क्षितिसुरप्रवासाचा. ३
याचा नंदन चंदनशील हरी भजकताप अंतर तो,
तत्सुत सुयज्ञ, ज्यातें म्हणती, ' यज्ञीं च ' सर्व संत ' रतो.' ४
जो पुत्र सुयज्ञाचा, आख्या जनमेजया! उश तयाची,
'स्वाग्राहुनि बहु तीक्ष्णा' म्हणउनि मति, वर्णिती कुश[8] तयाची.
तत्सुत शिनेयुनामा; तत्पुत्र मरुत्त, यास जो झाला,

---

१. तेलाच्या कढईत वाईट तेलाला ऊत येऊन जसें तें उसळतें त्याचप्रमाणें तो उसळत होता २. शंकराच्या वरप्रभावापुढें. ३ पलीकडच्या तीरीं. ४. हे जनमेजय राजा! ५. रचितान्यायां (अपराध्यास); शत्रूकडील अपराध्यास ज्याप्रमाणें तो वागवी त्याप्रमाणें च तो स्वपक्षाच्या अपराध्यांस हि [कडकपणानें] वागवी. ६. त्याच्या स्मरणानें दुर्जनाची लाही होत असे—म्ह० दुर्जन भीतीनें करपून जात. ७. सर्व अर्थि (याचक) क्षितिसुर (ब्राह्मण) प्रवासाचा (याचकवृत्तीसाठीं करावयाच्या पायपिटीचा) हर्ता (हरण करणारा), ज्याच्या औदार्यामुळें ब्राह्मणास भिक्षावृत्तीसाठीं प्रवास करावा लागला नाहीं. ८. 'कुशाग्रबुद्धि' म्हणजे च तीक्ष्ण; पण कुशाची बुद्धि तीहून हि तीक्ष्ण.

कंबलबर्हिष नृप तो; होय तनूद्भव[1] शतप्रसव त्याला. ६
त्या रुक्मकवच झाला; त्यासि पराजित्; तयासि पांच; नृपा!
राजा दे[2] हरि पालित पुत्र विदेहाधिपा करूनि कृपा. ७
रुक्मेषु भूप झाला, तदनुज पृथुरुक्म, तो तदनुसारी,
हे दोघे जो, ज्यामघ मध्यम, उडविति[3] तयासि अविचारी. ८
भ्रात्याहीं घालविलें, तें हित मानूनि, राजसुत पाला,
फळ, मूळ, कंद सेउनि, करिता झाला वनांत सुतपाला. ९
द्रवले परमर्षि, तिहीं विजयावह रथ तया दिला वर हो!
ज्यांचें वाक्य न बदले, वदले ते ज्यामघा, 'इलावर हो.' १०
मग अन्य देश जिंकी, एकाकी तरि महाजया लाहे,
साहे न पर तयातें, नृप शुक्तिमतीपुरींत तो राहे. ११
विप्रवरें परसेना लवली, अन्यास न लवती. हो! ती;
त्या ज्यामघ भूपाळा शैब्या भार्या चि बलवती होती. १२
जरि अनपत्य ज्यामघ, शैब्यात्रासें[4] न पावला अन्यां,
युद्धीं पर नृप जिंकुनि आणी त्याची वरावया कन्या. १३
'कोणाची कन्या? कां घेउनि आलां?' असें पुसे शैब्या,
सांगे 'तव स्नुषा हे,' कीं[5] तो तत्काळ पावला क्लैब्या. १४
शैब्या म्हणे, 'स्नुषा हे कैसी? हो! पुत्र मज नसे झाला.'
भ्याला ज्यामघ बोले, 'होइल तुज तनुज, आणिली त्याला.' १५
त्या[6] नवरीच्या सुतपें ती पुत्र विदर्भ परिणता पावे;

---

१ मुलगा. २ हरि व पालित असे दोघे विदेहाधिपास दत्तक दिले. ३ हाकलून घालवून देते झाले. ४. शैब्येना त्याला इतका धाक होता कीं, तिला मूल होत नव्हतें तरी दुसरी स्त्री करण्याची त्याची छाती झाली नाहीं. ५. शैब्येच्या प्रश्नानें तो इतका गागरला कीं, जणू काय तो नपुसक च झाला अशा प्रकारचें उत्तर त्यानें दिलें. ६. त्या नवरीच्या तपश्चर्येनें ती परिणता (म्हातारी शैब्या) विदर्भ [नावाचा] पुत्र पावे [याचें कारण] प्रपचात [ज्यामघासारखे] भले पुरुष रिण न वारूनि (पुत्र झाल्याखेरीज पितरांच्या ऋणांतून मनुष्य मुक्त होत नाहीं यास्तव) न तापावे ज्यामघ पितृऋणांतून मुक्त व्हावा, म्हणून च त्याला पुत्र झाला, हा भाव

कीं, संसारांत भले पुरुष न, वारूनि न रिण, तापावे. १६  
शैब्यापुत्र विदर्भ प्रेमें त्या राजकन्यकेसि वरी,  
तत्पुत्र ऋथ, कैशिक, तिसरा तो लोमपादनाम धरी. १७  
त्या लोमपाद धरणीपतिला जो पुत्र होय तो बभ्रू ;  
या आहृति, त्या कौशिक, ज्यावरि[१] वक्रा अरातिची न भ्रू. १८  
कौशिकसुत चेदि, नृपति झाले याच्या कुळांत ते चैद्य;  
अन्य हि विदर्भसुत, तो भीमनृपति, परगदांसि[२] जो वैद्य. १९  
भीमाचा कुंति तनुज; याचा रणधृष्ट[३] धृष्ट, यास तिघे  
यांतिल दशार्ह, 'यद्गुण[४]' म्हणति जन श्रुतिस, 'दोष नासति, घे.'  
पुत्र दशार्हाचा तो व्योमा, त्याचा हि तनय जीमूत,  
तन्नीतिरीति[५] तो, कीं आणी, करितां चि अनय, जो मूत. २१  
त्या बृहति, भीमरथ त्या, नररथ दशरथ तया तनय शकुनी,  
ज्याच्या भयें खळजन हि साधु चि[६], न करावया अनय शकुनी.  
त्या शकुनिचा तनय जो, श्री, कीर्ति, बळें तया वरि करंभा[७],  
त्या तैसी म्हणतों परि पावे न शुका, भया वरिक, रंभा[८]. २३  
पुत्र करंभनृपाचा जो, म्हणती 'देवरात' यासि कवी,

---

१ ज्यावर शत्रूची भिवई वाकडी होत नसे—ज्याकडे वक्रदृष्टि करण्याची त्याच्या शत्रूची छाती नसे २ शत्रूरूपी रोगांस वैद्यासारखा नाहींसा करणारा ३. रणशूर ४. याच्या गुणश्रवणानें पाप नाहींसें होतें असें लोक समजत असत. ५ अनय (अपराध) करिता चि जो मूत आणी (अपराध्याचा थरकाप होई) अशी त्याची न्याय करण्याची रीति होती. ६ अनय करावया न शकुनी (असमर्थ होत्साते) साधु चि [झाले]. ७ तया करभा श्री व कीर्ति बळें (बळजोरीनें) वरि (वरित्या झाल्या) ८ रभा त्या (श्री व कीर्ति) तैसी (सारखी) म्हणतों (म्हणालों असतों,) परि ती [रंभा] शुका न पावे, भया वरिक पावे (रंभेला श्री व कीर्ति यांच्याप्रमाणें शुकाला अनुकूल करून घेतां आलें नाहीं म्हणून च मी त्यांच्याशीं तिची बरोबरी करीत नाहीं)

बहु रंजन प्रजांचें हरि, जाणों दे वरा, तया सिकवी. २४
देवक्षत्र तयाचा; त्याचा मधु, पुत्र मरुवसा यास,
त्यासि पुरुद्वान्, बहु हित जो, जैसा देवतरु वसायास. २५
होय पुरुद्वंताचा मधु भद्रवतीतनूज, हा अन्य,
राया! याचें कीर्तन करिता जो, तो हि होतसे धन्य. २६
त्या चि पुरुद्वंताची स्त्री ऐक्ष्वाकी सती, तिच्या पोटा
आला तो सत्वान् सुत, तन्महिमा साधु वर्णिती मोटा. २७
याच्या पुत्रासि म्हणति सात्वत विख्यात अर्थिसंतान;
ज्यामघवंशश्रवणें श्रोत्याला प्राप्त होय संतान. २८
सात्वतसुत भजमान, क्षितिपति देवावृध द्वितीय तथा,
अंधक, वृष्णि चतुर्थ, श्रोत्या ज्यांची करी कृतार्थ कथा. २९
भजमानाच्या सृंजयकन्या दोघीजणी नृपा भार्या,
जी बाह्यकाभिधा ती पहिली, उपबाह्यका दुजी आर्या. ३०
पुत्र क्रमिक्रमणादिक पहिलीचे, श्रितजनीं महाकृप ते;
दुसरीचे अयुताजित्प्रमुख प्रख्यात वर्णिले, नृपते! ३१
देवावृध गुणवत्सुत पावाया नर्मदातटीं तपला;
तप लाजे इतरांचें, कीं यमनियमांसि फार तो जपला. ३२
भार तपश्चर्येचा बहु होतां, ती मनीं म्हणे रेवा,
'सुगुण सुत प्रसवेसी जाया कैसी मिळेल या देवा?' ३३
उचिता न परा, वास्तव देणारी शर्मदान दीनांतें,
लावी त्यासीं, सुखी होउनि, ती नर्मदा नदी नातें. ३४

---

१ भगवान्—पंत. जणू काय प्रजांचें रंजन करावयाची विद्या खुद्द परमेश्वरानें आशीर्वादपूर्वक त्याला शिकविली होती (म्हणून च त्या विद्येंत तो परिपूर्ण होता). २ मूळ पाठ—वंशांचे ते. ३ याचकांचा कल्पवृक्ष ४. योगसाधनांस. ५. प्रसवेल अशी ६. राजाला. ७. अन्वयार्थ—दीनांतें शर्मदान (सुखदान) देणारी ती नर्मदा नदी, परा न उचिता (इतरास योग्य नव्हती) वास्तव सुखी होउनि (ती) त्यासीं [ देवावृधासीं ] नातें लावी.

सुत होय नर्मदेला, जो समरीं बहु परांसि वसु कुटी,
परि पाहिली ललाटीं[1] ज्याच्या कोणी कधीं हि न भ्रुकुटी. ३५
देवावृध देवांसीं सम, वसु श्रेष्ठ तो मनुष्यांत;
दे[2] ब्रह्मलोक बहुतां ज्याचें धनु, पूज्य जें धनुष्यांत. ३६
अंधक ज्यांतें प्रसवे, त्यांमध्यें ज्येष्ठ पुत्र तो कुकुर,
ज्याच्या स्वच्छसुवृत्ता[3] हृदया, वदना, बहु स्तवी मुकुर[4]. ३७
त्याचा धृष्णु, तयाचा जो सुत नामें कपोतरोमा, तो
संतानासि[5] म्हणे, 'तूं किति? दुसरा ही तपो, तरो! मातो.' ३८
त्याचा तैत्तिरि, त्याचा पुत्र पुनर्वसु महायशा कथिला;
तत्सुत अभिजित, पाहति[6] कवि ज्या, अन्या, जसें रुप्या कथिला.
परमसभाग्या प्रसवे अभिजिन्नरनाथ आहुका[7] राया,
मागुनि घेती देशाधिप देशद्रव्य साहुकारा[8] यां. ४०
जी अभिजित्कन्या, ती साजे देवीस आहुकी आली;[9]
झाली अवतिराज्ञी, न गुणांची जीस वाहुकी[10] आली. ४१
आहुकनंदन दोघे, ते 'देवक' 'उग्रसेन' या नावें,

---

१. त्याच्या कपाळाला रागाच्या आठ्या कधीं कोणाच्या दृष्टीस पडल्या नाहीत. २ त्याच्या धनुष्यापासून मृत्यु आल्यानें पुष्कळास ब्रह्मलोकप्राप्ति झाली. ३ शुद्ध व सद्धर्मशील ४ आरसा ५ [तो] संतानानामक कल्पवृक्षास म्हणे, 'अरे! तुझ्या औदार्याचा माझ्यापुढें काय पाड? हे तरो (वृक्षा)! पाहिजे तर दुसरा कोणता हि तपश्चर्या करून मातो (वैभवयुक्त होऊं दे); परंतु माझी बरोबरी करण्यास तो समर्थ होणार नाहीं' ६ ज्या. (अभिजिता) व अन्या (इतर राजाना) कवि (शहाणे लोक) जसें [अनुक्रमें] रुप्या व कथिला पाहति [तसें पाहती], त्याची रुप्याशीं व इतरांची कथिलाशीं तुलना करीत. ७ अभिजित् नरनाथ परमसभाग्या आहुका राया प्रसवे, असा अन्वय. ८ या साहुकारा (आहुक सावकाराकडून) देशाधिप (मांडलिक राजे) देशरूपी द्रव्य मागुनि घेती, म्ह० सार्वभौम आहुकाच्या कृपेनें च मांडलिक राजे खंडणीरूप व्याज देऊन आपापल्या राज्यांवर राहिले. ९. लक्ष्मादेवीस भेत्रीण शोभण्यासारखी होती. १०. कमतरता—निर्णय०.

रूपप्रताप अद्भुत पाहुनियां ज्यांसि देव मानावें. ४२
देवक निजभुजतेजें सर्व करी[1] परपुरप्रभाव ढिला;
त्या देववत्प्रमुख सुत चवघे झाले सुरप्रभा वढिला[2]. ४३
देवकि हि शांतिदेवा, वृकदेवा, देवरक्षिता कन्या,
श्रीदेवा, उपदेवा, होय सुनामा हि सातवी धन्या. ४४
या सप्त सुता दिधल्या वसुदेवा देवकें वरज्ञानें[3],
द्यावीं कन्यादानें सुगुणाढ्याकारणें[4] वरज्ञानें[5]. ४५
नव उग्रसेनपुत्र, ज्येष्ठ तयांमाजि दुष्टधी कंस,
ज्या पापें[6] कुकुरकुळीं केला सन्नीतिकीर्तिचा ध्वंस. ४६
या कंसा, कंसवती, सुतनु, तथा राष्ट्रपालिका, कंका,
पांच सुता कथिल्या; हा वंश श्रवणें विनाशितो पंकां[7]. ४७
भजमानसुत विदूरथ, तत्सुत राजाधिदेव, यास शमी,
तत्पुत्र प्रतिपूर्व क्षत्र[8], जया सर्व वर्णिती दशांमी[9]. ४८
प्रतिपूर्व क्षत्राचा जो नंदन, भूप तो स्वयंभोज;
त्या हृदिक, सुयश ज्याचें सेविति कवि मधुप जेंवि अंभोज. ४९
हृदिकाचा कृतवर्मा, हा अंधकवंश वंशवृद्धिकर;
जे श्रवणधारणातें करिती, फळ उक्त पावती च नर. ५०
क्रोष्टयाची गांधारी स्त्री, तीचा पुत्र साधु, जनमित्र,
साधुपुराणज्ञांहीं कथिला नामेंकरूनि अनमित्र. ५१
अनमित्राचा सुत जो, नाम तयाचें नृपोत्तमा ! निघ्न;
त्याचे प्रसेन सत्राजित् सुत परविजयसिद्धिचे विघ्नें[10]. ५२
सत्राजित सूर्याचा प्रियसख, तो सिंधुच्या तटीं राय

१. शत्रूच्या राजधानीचा मोठेपणा पोकळ (फोल) करून टाकी २. देवाप्रमाणे तेज ज्याचें अशा वडिलास ३. श्रेष्ठ आहे ज्ञान ज्याचें अशा त्यानें ४ सद्गुणमंडितास ५ योग्य वर कोणता हें जाणणारानें. ६. पापानें (कंसानें) ७. पापरूपी कर्दमास. ८. प्रति आहे पूर्वी ज्याच्या असा क्षत्र म्ह० प्रतिक्षत्र ९ अनुभवी, वृद्ध. १०. शत्रूच्या विजयाला विघातक; शत्रूंचा जय न होऊं देणारे.

स्नानोपस्थानार्थ[1] प्रातःकाळीं च एकदा जाय. ५३
रवि भेटे, परि न दिसे, कीं तेजोमंडळांत तो मग्न;
सत्राजित विनवी, 'निजचक्षु न व्हावें विलोकितां भग्न.' ५४
कंठांतुनि स्यमंतकमणितें काढूनियां करी दूर,
सत्राजिता सख्याला तेव्हां लागे दिसावया सूर[2]. ५५
प्रेमें मुहूर्त गोष्टी कथुनि सखा सूर्य जावया लागे,
कौस्तुभसम स्यमंतकमणि सत्राजित सखा सख्या मागे. ५६
दिवसकर[3] सुहृत्कंठीं स्वविभूषण निजकरें चि बांधी तें;
सख्य विमळ, मग होइल देतां घेतां न हर्ष कां धीतें? ५७
येतां पुरीं जन म्हणति, 'दुसरा कोठूनि पातला अर्क?'
तेजोमंडळ पाहुनि, करिति प्रेक्षक अनेक ते तर्क. ५८
प्रसवे कांचन तो मणि; तेथें काळीं यथेष्ट घन वर्षे,
व्याधिभय नसे, ऐसा अद्भुत महिमा; समस्त जन हर्षे. ५९
मागे गोविंद प्रभु, परि मणि सत्राजितें तया न दिला;
शक्त हि न हरि हरि, जसा घटज न पी, करुनियां दया, नदिला.
जेणें दिला प्रसेना मणि, न दिला सत्यबंधुला[4] हरिला,
वधुनि प्रसेन हरिनें[5], तो मणि मृगयेंत बा नृपा! हरिला. ६१
मणितें हरि[6] हरि, वाटे, सह्य[7] अनय पशुस ही न रानींच्या[8];
उत्तम भूषण योग्य प्रभुस चि, न पचे चि तें नरा नीच्या. ६२
गहनीं मर्दुनि हरितें त्या, जो अत्यंत भासुर[9] मणी, या
घे जांबवान्, निजबिळा[10] तो ऋक्षप जाय बा! सुरमणीया. ६३
'मागितला मणि न दिला, कृष्ण चि झाला स्वबंधुचा काळ[11],'
आळ प्रभुवरि घाली सत्राजित तो असा, जसा बाळ. ६४

१ उपस्थान=सेवा, पूजा २. सूर्य ३ अगस्ति ४. खराखरा जो बधु प्रभु श्रीकृष्ण त्याला ५. सिंहानें. ६ काढून घेई. ७ पशूना हि अन्याय पाहवत नाहीं असें मला (कवीला) वाटतें. ८ अरण्यात ९ तेजस्वी १० आपल्या गुहेला. ११. प्राण घेणारा.

तें ऐकुनि कृष्ण निघे, घेउनि बळभद्र पौर, शोधाया;
पाहे प्रसेन मृत, हरि करि चरित पुढें कवींस तो धाया. ६५
मग ऋक्षपतिबिळातें जाय प्रभु, त[1]त्पदांसि उमगीत;
ज्या पावाया गाती सत्कीर्तिग्रथित साधु धु[2]म गीत. ६६
जातां चि बिळद्वारीं, धात्रीची स्पष्ट उक्ति आयकिली;
सर्व[3]निधिकपाटांची सांपडली निर्धनासि काय किली. ६७
'रोदन करूं नको, बा वत्सा! सुकुमारका! उगा, परिस;
मारी वनीं प्रसेना हरि जो, त्या तात जांबवान् हरिस ६८
वधुनि, जयातें घेउनि आला, गरुडासि देउनि व्रीडा,
तो हा तुझा स्यमंतकनामा सन्मणि पहा, करीं क्रीडा.' ६९
स्थापुनि बलभद्रसह स्वजनातें, ऋक्षपतिबिलद्वारीं
[4]एकाकी देव शिरे, स्वगुण कवींच्या जसा मिलद्वारीं. ७०
ऋक्षपतीसीं हरि करि भुजयुद्ध बिळांत दिवस एकविस,
हरिहरिभक्तचरित तें अपरिमित चि, वर्णितां नये कविस. ७१
बहु दिवस बिळद्वारीं राहुनि. पाहुनि सचिंत वाटेतें,
[5]प्रभु मृत मानुनि परते रामप्रभु, मत चि कविस वाटे तें. ७२
ऋक्षेंद्रातें जिंकुनि, सांत्वुनि, मणिसहित मेळवी [6]रमणी;
द्वारवतीप्रति सुखवी हा, अद्भुत करुनि खेळ, वीरमणी. ७३
यादवसभेंत बैसुनि, तेथें सत्राजितासि आणउनि
मणि दे, स्यमंतकाचा, जांबवतीचा हि, लाभ जाणउनी. ७४

---

१. त्याचा मार्ग काढात २ जोरानें—सडकून ३ वाटेल त्या खजिन्यास चालणारी ४ कवींच्या (ज्ञात्यांच्या) मिलद्वारीं (एकवटलेल्या समुदायांत) जसा स्वगुण (कृष्णाचा गुण) एकाकी (अनन्य) शिरे (कृष्णचरित्रांत अनेक प्रसंग आहेत, त्यांतलें अनुकरणीय तात्पर्य काढून तें जसें शहाण्यांच्या मनांत ठसतें), [तद्वत्] देव एकाएकी ऋक्षपतिबिलद्वारीं शिरे, हा सान्वयार्थ—निर्णय० ५ कृष्णप्रभुसारख्यास ज्यापासून मृत्यु आला त्याच्याशीं झगडा करणें केवळ आत्मघाताचें च कृत्य होय असें समजून बलराम मागें परतला, हें योग्य च झालें ६. जाम्बवती.

अनृता अभिशापाचा प्रभुनें केला जनांत परिहार,
प्रभुदूषणापराधें सत्राजित करि मनांत परि हा रे. ७५
सत्राजितासि भार्या दश, सुत शत, भंगकार तो पहिला,
कन्यांत सत्यभामा सुगुणवती, जीस वर्णिती महिला. ७६
'करिल क्षमा प्रभु कसा?' ऐसें चिंती सदैव अपराधी,
दे त्यासि सत्यभामा, सुचली सत्राजितासि न परी धी. ७७
सत्राजितासि मागत होता अक्रूर सत्यभामा ती,
मग आपणा न देतां मानी झाली च सत्य भा माती. ७८
तैसा चि सुवर्णार्थी इच्छित होता स्यमंतकाला ही,
चित्तीं जपे कराया त्याचा तो जेंवि अंत कालाही. ७९
मग तो शतधन्व्याला सत्राजिद्वधकुमंत्र आयकवी,
रात्रौ सुप्तासि वधुनि मणि ने; दैवासि करिल काय कवी? ८०
मणि शतधन्व्यापासुनि घेउनियां, तो असें तया सिकवी,
'हें न तुवां प्रकटावें, नासिन मीं आलिया भयासि कवी.' ८१
'झाले दग्ध पृथासुत,' हे ऐकुनि परमतापदा वार्ता,
गेले होते अंधाप्रति, जे प्रभु अमृत पापदावार्ता. ८२
करि तुच्छ तातघातीं नागीचें तामसत्व रागेली,
भामा प्रभुसि कथाया, त्यागुनि निजधाम सत्वरा, गेली. ८३
प्रभुसि गजपुरीं भेटे, कृष्ण म्हणे, 'हा श्रम प्रिये! कां गे!?'
'तात वधुनि मणि नेला शतधनुनें,' पतिस ती असें सांगे. ८४

---

१. खोट्या आळाचा. २ र र (रडें). ३. दुसरी बुद्धि—अन्य युक्ति. ४. आपल्या तेजाची माती झाली असें त्यानें [illegible] ७ तुझ्यावर संकट आल्यास मी युक्तीनें त्याचा नाश करीन. ८. पाप (दुर्योधनादि दुष्ट) हा च कोणी वणवा त्यानें त्रस्त झालेल्या (पांडवास) जे प्रभु (राम व कृष्ण) अमृत (पाणी) [ते] अंधाप्रति (धृतराष्ट्राकडे) गेले होते. ९. सताप.

'हा! रविसख! हा! वत्सळ! हा! तात!' असें म्हणे, रडे भामा;
ज्या माथा कर जोडी, तो हि म्हणे स्त्रीप्रियार्थ 'हा मामा!'
अश्रु पुसुनि समजावी स्त्रीस, म्हणे, 'देवि! लोक अस्थिर हा'.
दे[1] जळ, सात्यकिस म्हणे, 'तूं संस्काराचयासि अस्थि रहा.'८६
स्वपुरा साग्रज पावे, योजुनि खळकंदन[2], देव वेगानें;
नें[3] म्हणितलें चि यशाच्या ज्याच्या, 'वरपद न देववे,' गानें.
मग कृष्ण म्हणे, 'न्यायें मणि यावा आमुच्या चि तो कार्या,
सिंहें प्रसेन, सत्राजित शतधनुनें हि, मारिला, आर्या[4]!     ८८
बैस रथावरि; मारूं, सुखवाया स्वजन विप्र, भोजातें[5];
मिळतो स्यमंतक, यशोराशि हि गातिल कवि प्रभो! ज्यातें.'
होउनि सिद्ध, प्रभु ते गांठिति माराबयासि भोजातें,
झटला परि अरिहरिच्या गजसा साहे न पाप[6] ओजातें.     ९०
अक्रूरें होगॅलितां[7] न तया भोजाधमास भांडवलें;
उरलें तें चि न पदरीं, ज्या[8] हा व्यवहार होय भांडवलें.     ९१
होती एका दिवशीं शतयोजनधावनक्षमा[9] अश्वा,
तीवरि चढुनि पळाला, टिकला सिंहापुढें कधीं न श्वा.     ९२
मिथिलेजवळ चि घोडी सोडी असु, पळुनि जाय शत गावें;
कोण असा पटु ज्याचें यश वंचूनि[10] या यश तेंगावें?     ९३
शतधन्वा पत्ति[11] पळे, कीं तो प्रभुनीं पंथांत[12] मेळविला,

---

१ पांडव लाक्षागृहांत जळाले अशा समजुतीनें श्रीकृष्णानीं त्याना तिलांजली दिली. २. शतधन्व्याचा वध. ३. ज्या प्रभूच्या यशोगायनानें "मुक्ति मिळणार नाहीं" असें कधीं हि म्हटलें नाहीं. ४. हे बलरामदादा! ५. शतधन्व्याला. ६. पाप (दुष्ट भोज) हरिच्या ओजातें (वीर्यातें) न साहे. ७ सोडिलें असता. ८. ज्या [अक्रूरसाह्यरूपी] भांडवलें हा व्यवहार (कृष्णाशीं युद्ध) होय (त्यानें आरंभिला होता) तें चि त्याच्या पदरीं न उरलें. ९. शंभर योजनें धावण्यास समर्थ अशी. १०. लोकास फसवून ज्याचें यश टिकेल असा हुशार कोण आहे? ११. पादचारी. १२. रस्त्यावर (भूमीवर) आणिला.

जाणा आरे आखु, अजित ओतुं[1], तिहीं कौतुकार्थ खेळविला. —
श्रीकृष्ण बळासि म्हणे, ‘आर्या ! तूं या रथीं रहा, अरिला
वधुनि मणि आणितों मीं, यमपाशाहीं अराति तो वरिला.[2]’ ९५
वदुनि असें चक्रधर प्रभु होय पदाति, पाठिला लागे;
चक्रें तच्छिर खंडी; दे मुक्ति बळें चि, जन्हि न तो मागे. ९६
तारी त्या हि, पळाला जो शतधन्वा पदाति खटपटुनीं,
[3]नें म्हणावें प्रभुचक्रा देत्या उत्तमपदा ‘तिखट’ पटुनीं. ९७
तच्छक्ति[4] अरिपुढें किति? सोसील श्येननख कसें चिमणी?
परतुनि बळासि सांगे, ‘आर्या! अरिजवळि तो नसे चि मणी.’
ज्याची[5] कळविति लोकीं, देउनि वरि हाक विप्र तारकता,
त्यांचा[6] ठाईं कल्पी हळधर, जरि हा कवि, प्रतारकता. ९९
असकृत् ‘धिक्’ शब्द करुनि कृष्णातें बळ म्हणे, ‘असें छद्म
पद्मच्छदायताक्षा[7] ! करिसि तरि त्यागिलें तुझें सद्म. १००
जा तूं कुशस्थळीतें, मीं तों नाहीं च येत, जा चि कसा,
सुख काय? तुला झाला तव पृथु नेत्रांत राम हा चिकसा[8] ! १०१
न प्रिय मीं, प्रिय मणि तुज, जा, घे, कां नांदणें नसो सवें ते?
हें वंचन वंधु म्हणुनि सोसितसें, अन्यथा न सोसवतें.’ १०२
यापरि वदला, रुसला, प्रणतां हि त्यजुनि जाय: मिथिला जे,
तत्पतितें[11] बळ भेटे, त्या तिथिला सर्व पर्वतिथि लाजे. १०३

---

१. मांजर २ मृत्यूनें त्याला पछाडलें. ३ मोक्षपद देणाऱ्या सुदर्शनास [illegible]ाण्यानीं तिखट (तीक्ष्ण, घातक) म्हणू नये. ४. तच्छक्तिपुढें अरि किति ?’ [illegible]ना पाठ अधिक योग्य झाला असता. ५ तारण्याची इच्छा व शक्ति. ६. हळधर [illegible]े (शहाणा) असून हि कृष्णाच्या अगीं प्रतारकता (कपटाचरण) कल्पी. [illegible] कमलपत्राप्रमाणें दीर्घ आहेत डोळे ज्याचे अशा ’ ८ चिकाप्रमाणें (त्रासदायक). वेगळें. १० [illegible] ११ ज्या दिवशीं मिथिलाधिपतीची (बहुलाश्वाची) व बळरामाची गांठ पडली तो दिवस फार च पुण्यकारक, असा भाव.

मैथिलभक्तापासुनि पावे पूजा सदा नवनवा, हो !
'सद्गह अधिक,' बळ म्हणे, 'गर्व सुरांचें कदा न वनें वाहो.'
दुर्योधन मिथिलेंत प्रभुपासीं तेधवां गदा सिकला;
पिकें लाजे बहुलाश्वा, श्रीरामा गुरुसि आम्र ही पिकला. १०५
मणि चोरुनि अक्रूर स्वजनसह पळे, कुशस्थळी सोडी,
दीक्षाकवच धरी तो अतिपटु, वाराणसी पुरी जोडी. १०६
बहु यज्ञ प्रारंभी, पुष्कळ मणिलब्ध कनक तो खर्ची;
कवि म्हणती, 'अर्थिमनीं ऐसा न जयंतजनक तोख रची.' १०७
या जन 'दानपति' म्हणति, होता काशींत साठ वत्सर हा;
जाणों त्या शंभु म्हणे, 'स्वस्थ करित रुद्रपाठ, वत्स ! रहा.'
श्रीकृष्णोद्धवयादववीराहीं झटुनि, करुनियां साम,
बहु यत्नें समजावुनि, मिथिलेहुनि नमुनि आणिला राम. १०९
जरि मणि चोरूनि पळे, शतधन्वकरें प्रियाजनक मारी,
अक्रूरासि उपेक्षी केशव, कीं ज्ञातिभेदभय भारी ११०
अक्रूर साधु गेला, तेंव्हांपासुनि न वर्षला शक्र,
राष्ट्र परम कृश झालें; सत्यक्तीं दैव कां नव्हे वक्र? १११
'अक्रूरस्थिति राष्ट्रक्षेम,' असें स्पष्ट तत्व जाणून,
कुकुरांधक सर्व यथापूर्व स्थापिति पुरींत आणून. ११२
दानपति द्वारवतीमाजि सिरे तो चि वृत्रहा वर्षे;

---

१ सज्जनांचें घर. २. नदनवन. ३. उभयतांची सगत एकमेकास इतकी सुखावह झाली की पिक (कोकिळ) व आम्र याचें परस्पर प्रेमजन्य सुख त्यापुढें फिकें पडलें, असा भाव. आम्र—आश्रयास पिक—आश्रितापासून सुख काय होणार? पण येथें राम (गुरु) व जनक (शिष्य) यास परस्परांपासून अत्यंत सुख झालें. ४. यज्ञदीक्षारूपी कवच, (यज्ञ करण्यात गुंतलेल्या दीक्षितास कोणता क्षत्रिय मारील?) ५ मण्यापासून मिळालेलें. (स्यमंतक मणी रोज ६४००० तोळे सोनें प्रसवत असे) ६. इंद्र ७. जातींत दुफळी उत्पन्न होण्याची भीति ८ सज्जनानीं टाकिलेल्यावर. ९. अक्रूराचें वास्तव्य.

साधुपुरुषसत्कारें जाणों बहु विष्णुपदें[1] तदा हर्षे. ११३
धन्यत्व दानपतिनें श्रीकृष्णास स्वसा दिली लाहे;
बळकृष्णभक्त यांची रुढुंचनसाध्वसादि[2] लीला हे. ११४
ज्यातें स्मरुनि, म्हणितलें पावुनि बाधा, कदा न पतितें हा!'
बोले सभेंत मधुर, न दावुनि बा! धाक, दानपतितें हा. ११५
'साधो! दानपते! जो शतधनुनें मणि तुला दिला आहे,
तो या सभेंत दाखव, पाहों रामादि वांच्छिती बा! हे. ११६
मणि आहे चि; इतरथा[3] ज्यांत कनकवेदियूप[4] सवघड ते
होउनि, तुज सुजनवरा! कैसे वाराणसींत सर्व[5] घडते?' ११७
सर्वनिरतां[6] सवभोक्ता सद्गुरु वक्रा करील कां स्वभू?
अणिमादिसिद्धिनाथा मणि मागतया सुखें चि दे बभ्रु[7]. ११८
अक्रूरीं द्रवला प्रभु, पाहुनि तें साधुशील वत्सल तो,
जो केवळ लोभी, तो प्रभुहृदयीं लोहकीलवत्[8] सलतो. ११९
श्रीकृष्णें दिधला मणि बाधुनि अक्रूर अर्कसा साजे;
त्याच्या प्रभुप्रियत्वें पाहों न शकति मुखाकडे राजे. १२०

---

# अध्याय नववा.

जनमेजय मुनिस पुसे, 'बा वैशंपायना! जगत्कर्ता,
परमपुरुष, विष्णु प्रभु कां नरता पावला, रमाभर्ता?' १
मुनि सांगे:—भूपाळा! पावतसे ग्लानि जेधवां धर्म,
तेव्हां प्रभु अवतरतो, द्याया धर्मावनें[9] जगा शर्म. २

---

१. आकाश (वामनावतारीं विष्णूनें एका पावलानें आकाश व्यापिलें, यावरून आकाशाला 'विष्णुपद' म्हणतात) २. क्रोध, वचना व भीति इत्यादि ३ अन्यथा; तसें नसतें तर. ४. सुवर्णाच्या वेदी व यूप (स्तंभ) [करण्याचें काम] सुलभ होऊन इ०. ५. यज्ञ ६. यज्ञ करण्यामध्यें अत्यंत तत्पर अशा दानपतीवर यज्ञभोक्ता श्रीहरि वाकडी दृष्टि कां करील? ७. अक्रूराचें नांव. ८. लोखंडाच्या खिळ्याप्रमाणें. ९. धर्मरक्षण करून.

अवतार अमित हरिचे झाले, होतिल हि साधु ताराया,
माराया पाप असुर, कांहीं वर्णिन; ऐक वा राया! ३
मधुकैटभघ्न 'पुष्करनाभ' सदवतार विष्णुचा पहिला;
दुसरा 'यज्ञवराह,' प्रभु दंष्ट्रेनें चि उद्धरी महिला. ४
प्रभु 'नारसिंह' होउनि, गहनांतुनि[1] ये धरावरा! तिसरा,
कनककशिपुरिपु, पाहुनि ज्या 'मार्गे' म्हणति सुर[2], 'अराति! सरा?'
चवथा 'वामननाम' न या मन विसरो सरोजनेत्रास,
ज्याच्या श्रवणें चि सरे सर्व, न म्हणतां 'सरो' जनें, त्रास. ६
'दत्तात्रेय' प्रभुचा अवतार ज्ञानमार्ग चालविता,
भक्ततम दिगंतातें त्याच्या सुयशासमेत घालविता. ७
तैसा चि 'जामदग्न्य' प्रभुचा अवतार अर्जुनाराती[3];
यद्गुज म्हणति, 'सम चि खळवध गंगास्नान, वर्जुंना राती.[4]' ८
ज्याचा भरी खळांच्या रक्तौघेंकरुनि परशु कासार,
ज्या समर तेंवि, जेंवि श्रीहरिचे सुगुण परें[5] शुका सार. ९
'श्रीराम' द्युमणिकुळीं[6] झाला, जाणुनि दशास्य आधि जगा,
ज्यातें दिव्यास्त्रें दे, नेउनि मखरक्षणार्थ, गाधिज गा! १०
गौतमभार्या आर्या झाली पंकांसि[7] जेंवि वश गाय,
ती उद्धरी, ज्याचें कविवर वाल्मीकि भव्य यश गाय. ११
श्रीजनकसुता वरिली, भंगुनियां चंद्रचूडचापातें,
जें तेज परशुरामीं हरिलें लीळेकरूनि बापा! तें. १२
रक्षाया मातेचें वांच्छित, तैसें चि सत्य ताताचें,
राज्य त्यजिलें; भय बहु अयशाचें जेंवि नरकपाताचें. १३
प्रभुचें आर्तत्राण चि, आयकिलें अन्य न व्यसन कानें,
ज्याचें भावें गावें यश संतत धन्य नव्य सनकानें. १४

---

१. अत्यत अवघड अशा ठिकाणांतून (खांबांतून) २. देव हो म्याले–**पंत.** ३. सहस्रार्जुनाचा शत्रु. ४ [आम्ही] राती (रात्री) वर्जुंना (वर्जिणार नाहीं) म्ह. आम्ही रात्रीं देखील अरिवध करू. ५. श्रेष्ठ. ६. सूर्यवंशीं. ७. चिखलास [पक्षीं] पापास.

सुगळ[1] कपीश्वर केला, वधुनि अतिप्रबळ पापकर वाळी;
खगमृग[2]मनोहर, जरि हि खरतरशरधर सचाप करवाळी[3]. १५
ज्याच्या चरणरजांहीं श्रीदेवी भूषवी सदा कबरी[4],
शबरी तो बहुमानी, बा! गति दे तीस जानकीश बरी. १६
कपिमैत्री[5], दशरथसखगृध्राची पुत्रवत् क्रिया, केली.
यापरि जगद्गुरु करी, संपादाया जगत्प्रिया, केली. १७
करवी सेतु समुद्रीं, दशमुख मारूनि सोडवी रमणी;
करि, हरिसख होउनि, यश बहु अमृताहूनि गोड वीरमणी. १८
करि रंजन प्रजांचें प्रभु एकादशसहस्रवत्सर हा;
वत्स[6] रहावी पीतां; वदलें पुरविजित[7] हंसवत् सर[8] 'हा!' १९
नेले पौर विमानीं वाहोनि, मनुष्यनायका! यश तें
श्रीरामाचें वर्णिल वदनांच्या परम पटु हि काय शतें? २०
झाला वसुदेवाचा नंदन, मथुरेंत 'कृष्ण' अवतारी,
मारी नररूपासुर, सुर भक्त महाविभूति[9]धव तारी. २१
अवतरला जीवांवरि परम कराया अनुग्रह 'व्यास,'[10]
ज्याच्या भगवान् घेतो, पावक होउनि, अनुग्र हव्यांस. २२
ज्या ध्याया नृप झाले वनवासी, वातभुक्, जटी, वल्की,
तो प्रभु होणार पुढें कल्पांतीं यवनवनशिखी 'कल्की.' २३

---

१. सुग्रीव. २. पक्षी व पशु यांस आनददायक ३ तरवार धारण करणारा. ४ वेणी (केंस); लक्ष्मी आपल्या केंसानीं त्याच्या पायावरील धूळ झाडून काढिते ५ वानरांचें सख्यत्व संपादून ६. [ रामनाम ] पीतां ( स्तनपान करित असता ) वत्स ( बाळकाला ) रहावी (, स्तनपान सोडण्यास लावी ). स्तनपानापेक्षा रामनामामृत बाळकाला गोड वाटे ७ स्वच्छ, अगाध पुर साकेत, श्रीनिवासपद्मसम गृहें, गृहीं शुद्धयशोभूषित—पंत. ८. मानस—पंत पुरविजित हंसवत् सर 'हा!' वदलें—रामकीर्तीनें उज्वल व परमहंसानीं भरलेल्या अयोध्येला पाहून [ स्वत कडे कमीपणा आल्यानें ] मानससरोवराला वाईट वाटलें ९. महामायापति; विष्णु. १०. श्रीमद्व्यास.

पूर्वीं भगवान् वज्री[1] वृत्रा असुरासि संगरीं मारी,
त्याउपरि 'तारकामयनामा' संग्राम जाहला भारी. २४
तेथें असुर अमरवरपरिभव झाले महीवरा! करिते;
तेज हरुनि, सुर त्यांहीं केले, कविनीं जसे वराक, रिते. २५
लोकेश[2] शरण गेले वरदा नारायणा शरण्यातें;
निःश्रीकासि[3] श्रीप्रद जो, जेंवि वसंत[4]घन अरण्यातें. २६
अंगार[5]वृष्टि, उल्काशनिपात, महा[6]तमोहत ज्योती,
उत्पात होत होते, प्रलयीं जनमेजया! जसे होती. २७
तेव्हां संश्रितवत्सल कृष्ण श्रीवत्सलक्षण स्वामी
प्रकटे हृदयांत, म्हणे, 'देवगणा त्यजिन न क्षण स्वाँ[7] मीं.' २८
परिभवगरळ भ्रमवी, श्रमवी, तें दर्शना[8]गदें वमवी,
शमवी उत्पात प्रभु, निजरूपीं देवहृन्मनें रमवी. २९
'जय! जय!' म्हणे सुरसभा, प्रांजलि होउनि करी बहु प्रणती,
जीचा तुरवी भगवद्दृष्टिसुधावृष्टि एक हि व्रण ती. ३०
विष्णु म्हणे, 'सुर हो! म्यां समरीं शमवूनि कंप दात्यांतें,
दिधली तुम्हांसि, तुमची लेश हि न जिरेल संपदा त्यांतें.' ३१
असुरवर सत्यसंध प्रभुची ऐकुनि असी प्रतिज्ञा, ते
युद्धाध्वरीं[9] च सादर होउनि धरिती असिप्रति ज्ञाते. ३२
अद्भुत रथ कनकमय द्वादशशतहस्तविस्तृत मयाचा,
वर्णप्रकाश राया! साक्षाद्दीप्ताग्निराशिसम याचा. ३३
वाहति परम भयंकर विपुलबळ सहस्र आंस[10]विल यातें,
वरिली परें जयाची जेणें जावी च आस विलयातें. ३४

---

१. इंद्र. २ इंद्रादिक अष्टदिशाचे स्वामी. ३ निर्धनास. ४. वसंतऋतूंतील मेघ. ५ निखाऱ्यांचा पाऊस, नक्षत्रें आणि दगड यांची वृष्टि. ६. प्रबल अंधकारानें नष्ट झालेलीं [नक्षत्रादि] तेजें. ७ स्वकीय. ८ दर्शनरूपी औषधानें ९. संग्रामरूपी यज्ञ करण्यांत च औत्सुक्य दाखवून. १० अस्त्रें.

आयस[1]वायसकेतु प्राज्यांजननीळसारसा[2]राचा
एक क्रोश जयाचा विस्तार, असा शतांग[3] तारा[4]चा. ३५
बहुबळ सहस्र वाहत होते जनमेजया! तयाशि खर;
पाहोनि अंजनाच्या लाजावें अद्रिचें जया शिखर. ३६
भव्य हयग्रीवाचें प्रबळहयसहस्रयुक्त रथरत्न,
ठाके गदी विरोचन, ज्यासि नको सुरवधार्थ बहु यत्न; ३७
द्वादशहययुक्तरथीं अत्युग्र अरिष्ट असुर तो चढला;
बहु चापधर वराह, प्रखर खर क्रोधवह्निनें कढला. ३८
सुत विप्रचित्तिचा जो श्वेताभिध, तो रणा उभा राहे,
वीरवरिष्ठ अरिष्ट श्रीबलिसुत भूमिधरशिला वाहे. ३९
धांवे किशोरनामा इकडे तिकडे, गमे किशोर चि तो,
मुनि म्हणति,'बहु करुनि जड गडबड,जय काय रे शिशो! रचितो?'
ओष्ठेक्षणदशनायुध मुखयोधी सुरवधार्थ राहु निघे,
चित्तीं मनोरथें[10] जय असुरव्यूहापुढें चि राहुनि घे. ४१
हयगजवराहसिंहर्क्ष्यो[11]ष्ट्रक्षखरोष्ट्रमेघपक्षिगत,
पवनीं कितेक चढले, किति पत्ति, नसे जयां रथादि मत. ४२
असुर अनेकायुधधर गर्जन[12] तर्जन रणांगणीं करिती,
वाटे त्यांसि, पडेल स्वारंभा[13] सगरक्रिया न फिरती. ४३
झाले सिद्ध महाबळ वसु, रुद्रादित्य, अश्विनीतनय,
त्यजिला न धर्म ज्यांहीं विजयाचा हेतु, कीर्तिचा, न नय. ४४
नरकीं न बुडायास्तव ज्यातें अंजलि रची पतित राया!

---

१. लोखंडाचा कावळा आहे ध्वजावर ज्याच्या. २ [ साराचा=] दृढतर-**पंत.** दाट काजळाच्या अगदी काळ्या अर्काचा. ३ रथ-**पंत.** ४ असुरनामविशेष. ५. पर्वतशिला ६. मूल ७ मूर्ख ८ ओंठ, डोळे व दांत हीं च आहेत आयुधें ज्याचीं असा ९. तोंडानें युद्ध करणारा. १० तो मनांत जयाचे मांडे खात होता. ११. ऋक्ष (अस्वल) गत (-वर स्वार झालेले ) १२ धमकावणी. १३. आपण आरंभिलेलें युद्धकर्म फुकट जाणार नाहीं.

त्या सेतुंसि[१] धरुनि निघे शत्रुसमुद्रीं शचीपति[२] तराया. ४५
बैसे पांडुरवर्णीं नागीं ऐरावतीं महातेजा,
मानिति, हिमगिरिशिखरीं चढला भास्कर, असें पहाते ज्या.
स्वरथ स्वसव्यपार्श्वीं चालवि, सांगोनि मातलीला हो!
शक्र म्हणे, 'दंडातें खळसेना फार मातली लाहो.' ४७
गाती गंधर्व पुढें, नृत्य करिति अप्सरा सुरमणीया,
स्तविति कवितिलक सन्मुनि; परमोत्साहें निघे सुरमणी या
यमदंडमुद्गरातें[३] घेउनि येउनि, सकोप पर[४]जाया
लागे सुरसेनाग्रग[५] भगवान् समरीं, लयासि पर जाया. ४९
मूर्तिधरचतुःसागरगुप्त[६], खळवधीं कधीं नव्हे करुण,
तो काळपाश कवळुनि आला भगवान् महायशा वरुण. ५०
आला असुरवधार्थी धनपति, दर[७]पद्मसह, गदापाणी,
यद्यश यक्षगणा दे बळ, जेंवि विषूचिका[८]गदा पाणी. ५१
सुरसेनेतें रक्षिति निजदिग्गत[९] लोकपाळ हे चवघे,
ऊर्ध्वदिशासंगोपन भगवान् रवि, तो हि रोहिणीधव, घे. ५२
जगदायु वायु भगवान् सजळकण प्रबळवेगवान् वाहे,
आहे कोण असा, हा होतां प्रतिकूळ, यासि जो साहे? ५३
बहुदर्प सर्प दारुणविष ते, भेदूनियां तनुत्राण[१०],
प्राण त्रिदशारींचे घ्याया झाले स्वयें महाबाण. ५४
बा! पर्वत सर्व तयां देवां झाले सख्यापरि सहाय,
म्हणवाया असुरांतें ताडुनि तरुनीं सुरांपरिस 'हाय!' ५५
गरुडीं बैसोनि धरी प्रभु चक्रप्रमुखआयुध रणीं तें,
जें दे रक्त अरींचें, आपण सेवूनि आयु, धरणीतें. ५६

---

१. विष्णुरूपी सेतू (आश्रय) २ देवश्रेष्ठ इंद्र. ३ गदेसारखें एक आयुध. ४. परजण्यास (फिरविण्यास) ५. अग्रग=पुढील भागीं असलेला ६ गुप्त (रक्षिलेला) ७. [दर=] शंख–**पंत.** ८. मोडशीच्या रोगास ९. आपापल्या दिशेस उभे राहिलेले इंद्रादि दिक्पाल. १० कवच.

शुचि जन्मुनि सन्मुनि जे,स्तविति,म्हणति,'विजय विष्णु लाहो'ते
अनुगामी देवांचे गण 'जय जय!' वदत विष्णुला होते. ५७
देवांसि 'स्वस्ति असो,' हें वदला अंगिरा[1] तया काळीं,
दैत्यांसि 'स्वस्ति असो,' शुक्र म्हणे, भंग जरि असे भाळीं[2].५८
देवांकडे सुवाद्यें वादक दैत्यांकडे हि वाजविती,
गाजविती ब्रह्मांड, प्रबळ भट प्रलयमेघ लाजविती. ५९
मग मिसळले सुरासुर, अद्भुत जनमेजया! कडाखा तो,
वाटे, काळ भुकेला साखरसा अद्रिचा कडा खातो. ६०
त्यांची मारामारी भारी, देती न पाय हे मागें,
तें[3] पाविजेल वाटे शस्त्रज्वलनें अपाय हेमागें ६१
असुरांहीं मेळविला जय, सुर समरांगणांत भंगून,
गतमद सक्षत न वदति, न पळति ते; काय मूकपंगून[4]? ६२
बळ भंगितां परांहीं, भंगी त्यांचें हि सैन्य मघवा तें,
भंगावें गंगेच्या[5] जैसें उग्र हि समस्त अघ वातें. ६३
केले सुर, दैत्यांच्या पाशांहीं जे निबद्ध, ते मुक्त;
किति कपटपाश वज्रा? काय सदुक्ता असाधुचें उक्त? ६४
मोहूनि तामसास्त्रें, राहे सुरपति मुहूर्त हा निःसुर[6],
वधिति परस्पर पाहुनि, तें कौतुक न गणिति स्वहानि सुर.६५
झाले सुर, परसेनासागर न म्हणुनि 'अगाधसा', धसले,
त्या मोहित दैत्यांतें तोडिति राया! अगा! धसाधस ते. ६६
और्वी[7] माया[8] योजुनि, शमवी ती तामसी सहासि मय;
तप्त सुर म्हणति शक्रा, 'कल्पांताहुनि उणा न हा समय.' ६७

---

१ बृहस्पति २ ललाटीं (नशीबांत) जरी भग (अपजय) लिहिलेला होता तरी ३ त्या वेळीं शस्त्रप्रहारामुळें उत्पन्न झालेला अग्नि मेरुपर्वतास ( सोन्याच्या पर्वतास) देखील अपाय करील असें वाटलें. ४ मुके व पांगळे यांहून उणे. ५. गंगेवरून आलेल्या वाऱ्यानें ६. स्तब्ध, स्वस्थ. ७ और्वऋषीनें उत्पन्न केलेली अग्नि. मय माया ( शक्ति). ८. हंसून, सहज लीलेनें.

सुरपति म्हणे, 'जलेशा! शमिव ज्वलनासि वृष्टिनें, वरुणा!
सुर भस्म चि होतिल कीं! काय पहातोसि बा! करीं करुणा.'
वरुण म्हणेः—भृगुवंशज और्व सदा ब्रह्मचर्यपर-माहित.
होता समजुनि तें चि व्रत तो तेजस्विवर्य परम हित. ६९
लोकांसि तपस्तेजें बहु तप्त करी, चळे कदा न मुनी;
त्यासि हिरण्यकशिपुसह विनविति तापस असें, पदा नमुनी.
'बा! ब्रह्मचर्य वरें[2], परि संततिविच्छेद यांत हा दोष;
स्त्रीपाणिग्रहण करीं, संतानें पूर्वजांसि हो तोष.' ७१
क्षोभे और्वमुनि, म्हणे, "याहुनि गुण अधिक काय संतानीं?
तरि कां व्यर्थ नियमिला इंद्रियसमुदाय काय संतानीं? ७२
अधिक म्हणुनि जरि आतां गातां, मुनि हो! सुखें अपत्या गा;
[3]तें स्त्रीवांचुन चि असो मज, कां म्हणतां तुम्हीं, 'तप त्यागा'"?
बहुधा तो प्रतिपादी, 'गुरु धर्म ब्रह्मचर्य,' हें कथन,
मग अग्निरूप पुत्र प्रकट करी, करुनि ऊरुचें[4] मथन. ७४
तो और्व अंतकानळ, न शकति कोणीं तयासि देखाया,
तातासि म्हणे, 'क्षुधिता मजला आज्ञा जगासि दे खाया.' ७५
तों चि ब्रह्मा तेथें येउनि और्वा मुनीश्वरासि वदे,
'बा! आवरीं स्वतेजा, त्रस्ता विश्वा मुनीश्वरा! शिव दे. ७६
मीं या त्वत्पुत्रातें देतों सुस्थळ तसें चि भक्षाया,
रक्षाया विश्वातें, शमिव जगद्ग्रसनकर्मदक्षा या.' ७७
और्व म्हणे, 'भगवंता! देसी स्थळ कोण? काय सेवाया?
झालों मीं धन्य जगीं, द्यावें तेजोनुरूप देवा! या.' ७८
देव म्हणे, 'वडवेचें[5] वदन जसें, तेंवि सिंधुचें वदन,
तेथें स्वस्थ वसावें, म्यां त्वत्पुत्रासि तें दिलें सदन. ७९
तें अन्न दिलें, तेथें जें भूवरिल प्रवेशतें तोय;

---

१ ब्रह्मचर्यासंबंधें फार प्रसिद्ध २ श्रेष्ठ [आहे] ३ शरीर ४ मांडीचें.
५ घोडीचें (घोडीपासून सूर्यवीर्यानें वडवानळ उत्पन्न झाला, अशी ही कथा आहे).

स्थळ माझें, हवि माझें, याचा स्वकवळ तसें चि हें होय. ८०
स्थितिकाळ[1] असे जोंवरि, तोंवरि दोघे जगासि या रक्षूं,
लक्षूं उगे चि, येतां समय युगांतीं समस्त ही भक्षूं.' ८१
हें मान्य करुनि, सिरला तो और्वानळ पयोधिच्या वदनीं,
ठेउनि निजप्रभेतें जनकीं सुतपःसमृद्धिच्या सदनीं. ८२
विधि गेला स्वस्थाना, ते ही पावोनि अभयदान मुनी;
त्या कनककशिपु विनवी, मागें राहोनि, अभयदा नमुनी. ८३
"भगवंता ! शिष्य तुझा, त्वत्पुत्राचा हि जाण मीं छात्र,
आलों शरण, चरण हे धरिले, करुणेसि मज करीं पात्र. ८४
म्यां, 'अद्भुतप्रताप प्रभु तूं' ऐसें यथार्थ जाणून,
त्यजिलें न पदाराधन, तप, दारा, धन, मनांत आणून. ८५
यावरि जरि पावेन च्छात्र तुझा मीं पराभवें कष्ट,
तरि और्वा ! गुरुवर्या ! जाण पराभव तुझा चि तो स्पष्ट." ८६
और्व वदे, 'दैत्येंद्रा ! झालों मीं धन्य कीं गुरुपणातें
देतोसि मला, बापा ! तरि माझ्या ऐक तूं उरुं पणातें. ८७
माझ्या तेजापासुनि वत्सा ! तूं लेश भय न पाव कसा;
सुतनिर्मित मायाग्नि[3] हि, तुज दिधला रुद्रनयनपावकसा. ८८
तूं जोंवरि, तोंवरि हें अद्भ्यस्त्र प्राज्य वीर्य वाहेल;
राहेल त्वद्वशीं, तेजस्वी ही न यासि साहेल.' ८९
दैत्येंद्र अग्निमाया साधुनि, वंदूनि मुनिवरा, गेला,
जो अतुळकीर्ति कविवरि, म्हणतां 'त्वत्कीर्ति पुनिव[4],' रागेला.
ते हे अरीसें[5] दितिजें मेळविली, भजुनि शमिवरा[6], खाया;
दे विधु सहाय, मज जरि म्हणसि, 'अमर, सजुनि शमिव राखाया[7].
दोघे तव प्रसादें शमवूं या और्वदत्तमायेतें;

---

१ जगाच्या अस्तित्वाचा मुदत २ मोठ्या. ३ और्वी माया. ४ पौर्णिमा (त्याच्या कीर्तीस पौर्णिमेची उपमा दिल्यानें त्याला राग आला). ५ अरीस खाया—**पंत** ६ यतिश्रेष्ठाला. ७ अमर राखाया—**पंत.**

यावें विधुच्या हि मना हें, माझ्या देवसत्तमा ! येतें.' ९२
शक्र म्हणे, 'बा सोमा ! हो मायाप्रशमनार्थ तूं सिद्ध;
वरुणापुढें, तुजपुढें, होयील न और्ववह्नि हा इद्ध[1]. ९३
होउनि विमुख रणीं, हे आम्हीं सुर सर्व अपयशें मळतों,
पळतों, स्वपदापासुनि गळतों, और्वानळाननीं जळतों.' ९४
या वचनें वरुणासह मायाशमनार्थ शीघ्र इंदु निघे,
स्वजनव्यसनप्रशमीं न प्रकटुनि तेज, न शुचि[2] निंदुनि घे. ९५
सोडी सोम जया, तें झालें सर्वांसि शैत्य कांपवितें;
निजतेजें जिंकीना युगपत्[3], जिंकूनि दैत्य, कां पवितें? ९६
जळवर्षे हिमवर्षे, युगपत् सर्वत्र हुडहुडी भारी,
मारी[4] तसी च शिरली, अतिविकळा होय परचमू सारी. ९७
पडलें, रडलें, हृदयीं 'हा !' म्हणत, समस्त सैन्य पाशीतें[5];
पाशानीं बद्ध करी, देउनि बहु दुःख दैन्य, पाशी तें. ९८
मग अगनग बहु पाडी, तोडी, नाडी रणीं अरींस मय;
भ्रमवी, गमवी ऐसें, कीं आला आपल्या करीं समय[6] ९९
देवबळीं[7] शिरुनि, करिति अमित गज, व्याघ्र, लांडगे, हरि खा॰
सुरमायेतें हि म्हणे हे असुरांची[8] हि, 'सांड गे ! हरिखा.' १००
सुर सर्व निष्प्रयत्न व्याकुळ झाला, म्हणोनि 'हा !' ढवला[9];
एक चि न महामायापति, अजित प्रभु म्हणोनि, हालवला. १०१
देवासुरयुद्धकुतुक देखत होता गदाधर स्वामी,
चित्तांत म्हणे, 'किति हे ? रक्षितसें, दमुनि षड्रिपु[11], स्वां[12] मीं.'
मयामाया शमवाया, देउनि बहुमानदान वायूतें
प्रेषी अग्निस हि प्रभु, जो करिता पान दानवायूतें[13]. १०२

१. प्रदीप्त २. सकट ३. एकदम (दैत्यांचा पराजय करून इंद्राच्या वज्राला हि लाजविलें) ४. महामारी. ५ वरुण. ६ काळ—पंत. ७ देवसैन्यांत ८ असुरमाया सुरमायेस म्हणाली, "अगे ! आतां हर्ष साड (सोड)" ९ स्थानभ्रष्ट करवला. १०. असुर. ११ [कामक्रोधादि] षड्रिपु. १२. स्वजनास. १३ दानवाच्या आयुष्यास.

झाले होते जे बहु देवांच्या परिभवें सखेद मुनी,
त्यांतें बहु हर्षविती अनिळानळ[1] परबळा सखे दमुनी· १०४
त्या मारुतदहनांहीं केली ती भस्म पार्वतीमायां[2],
प्रभुदृष्टि करि तयांवरि, पुत्रावरि जेंवि पार्वती माया १०५
मारुतसखा[3] सख्याला, हरुनि परांचें, अगाध बळ दे हा[3],
प्रभुसि म्हणे, 'तुज साहो स्वानुकृति क्षण अगा धवळदेहा[4]!
भागहरें[5] घेत होते साप चि हे असुर पाप डास मज;
जरि[6] असुवृत्त सखे हे सस्फोट अपथ्य पापडा समज[6]' १०७
ऐसें चिंतुनि होउनि वायुसख क्रुद्ध, खळजना भाजी,
ती च मिळे दासांतें विजयश्रीकीर्ति जळजनाभा जी. १०८
यापरि विजयी होतां, भंगुनि दैत्यांसि, अग्निपवमान
ये काळनेमि; सोसिल कां स्वजनाचा समर्थ अवमान? १०९
तो शतभुज, शतमस्तक, शतमुख, शतशस्त्र, उच्च पर्वतसा,

---

१. वायु व अग्नि हे उभयतां मित्र. २. मयासुर-माया (पर्वतसदृशी). ३. शत्रूचें अगाध बल (सैन्य) हरुनि हा मारुतसखा (अग्नि) सख्याला (वायूला) अगाध बळ दे. ४. धवळदेहा (शंकरा)! स्वानुकृति (संहार करण्याच्या तुझ्या कृतीचें अनुकरण) तुला क्षणभर सहन होवो, [शंकर हा लयकर्ता आहे] आम्हीं उभयतां शत्रुसंहार करीत आहों, यामुळें तुझ्या कामांत हात घातल्याबद्दल तुला राग न येवो ५. यज्ञभागाचें हरण करणारे ६. जरि हे (दैत्य] असुवृत्त (दुर्वर्तनी–पक्षीं–वाटोळे नव्हेत असे) [तरी हि] सस्फोट (अंगावर फोड आलेले) [व] अपथ्य (अहितकर) पापडा (पापडाला) सखे (मित्र, समशील) समज. हे दैत्य पापडासारखे सस्फोट व अपथ्य असल्यानें जरी ते आकारानें वाटोळे नाहींत तरीं सुद्धां ते पापडाप्रमाणें च आहेत. दैत्य व पापड यांत साम्य, 'सस्फोट' व 'अपथ्य' यांत, व वैषम्य, फक्त पापड 'सुवृत्त' (वाटोळ्या आकाराचे) व दैत्य हे 'असुवृत्त' अर्थात् दुष्ट, यांत दाखविलें आहे. बाकी उभयतां सारखे च अपथ्यकारक विस्तवावर भाजल्यानें पापडाला फोड येतात, इकडे देवांच्या अस्त्रांपासून उत्पन्न झालेल्या अग्नीनें दैत्यांचीं शरीरें भाजून त्यांवर फोड आलेले होते.

धृतबहुभूषण, भीषण, कटुभाषण, मूर्तिमंत गर्व तसा. ११०
भगवान् त्रिविक्रम जसा, स्पष्ट तसा काळनेमि ही वाटे,
दाटे त्रैलोक्यांत, त्रासें उर पाहतां तया फाटे. १११
भ्याले निर्जर[2], वदले, 'आम्हां नेतो चि काळनेमि लया,
नेमिल[3] अतितेजस्वी हा काळातें, न काळ नेमिल या.' ११२
जे मयतारखरादिक केले शक्रादिकीं रणीं भग्न,
भग्न व्यसनीं होते, आले शक्रें करूनि ते नग्न. ११३
त्याचा प्रताप मोटा, त्या दैत्यचमूस ही नसे तोटा,
ते म्हणती, 'रथ लोटा, हूं! मारा, शक्र हा महाखोटा.' ११४
असुरांची भासे कृतपरभंगा[6] ती रविप्रभा[7] सेना,
सुरजन जडां क्षम, जसा श्रितगंगातीर[8] विप्र, भासेना. ११५
दैत्यांच्या देवांच्या गांठि नृपा! घातली अनीकांहीं,
त्यांहीं मारामारी करितां, भय न धरिलें मनीं कांहीं. ११६
पीडिति, भंगति, न लवति, असुर असे पडुनि उसळले शतदा,
बा! त्यांत आपणांत न पाहे वैषम्य[9] मुसळ लेश तदा. ११७
त्या काळनेमिचे खळ आश्रित बहु उसळले, परं[10] सखा ते
पावति नं, सुर न तुच्छ मानिति, कंटक जसे पणस खाते[11].
होते करीत तुतुमुल समर अमरदैत्य वीर ते गाढे,
तों क्रुद्ध युद्धलालस कालसखा कालनेमि तो वाढे. ११९
त्याचे गगनीं भरले उग्रत्वें हांसते भुज गरा जे.

---

१. भरून जाई. २. देव ३. आशेंत (ताब्यांत) ठेवील. ४. म्यानाबाहेर काढिलेलीं अशीं ५ काळनेमिचा—**पंत.** ६ केला आहे शत्रुपराभव जिनें अशी. ७. सूर्यासारखी तेजस्वी. ८ गंगातीरस्थ ब्राह्मण जसा जडांस (अज्ञान्यांस) क्षम (प्रभावशाली) असा वाटत नाहीं, तसा सुरजन (देवमंडळ) जडां (असुरांस) क्षम (स्वतःशीं युद्ध करण्यास समर्थ) वाटेना. ९. भेद, अंतर, निराळेपणा (मुसळाची व त्यांची कृति सारखी च दिसूं लागली, हें तात्पर्य). १०. परंतु त्यांस आपल्या मित्राजवळ जाता आलें नाहीं. ११. फणस खाणारे.

गमति, वमति असिमिषविष, काळे पंचास्य ते भुजंगराजे. १२०
निर्मी[2] घर्म घनांतें त्याचा ज्वाळासहस्र निश्वास,
विश्वास त्रासप्रद पळवी पळ वीर तो स्वविश्वास[3]. १२१
फिरला अघें[4] सुरांवरि पुत्र कनककशिपुचा न, मेरु च तो;
बहुभुजमस्तक ऐसा आकार नवा तया, गमे, रुचतो. १२२
त्याच्या ऊरूंच्या चि त्रिदशांचें सर्व तेंवि बळ वातें
बा! उडविलें दिगंतीं, त्यावरि उठतां चि, जेंवि पळवा[5], तें. १२३
नग उडवुनि सुर रगडी, त्यांचें[6] श्रमवि न धनुष्य पावुल तें,
वज्र सचेतन असतें, तरि तदुर भयें मनुष्यपा[7]! उलतें. १२४
गगनीं निर्जर-मस्तक खड्गांहीं उडविले, जसे चेंडू,
हें ग्राह्य सुवीरचरित, अरसिक केंडील[8] तरि सुखें केंडू. १२५
चूर्ण चि कितिकांसि करी, सहसा हाणोनि मस्तकीं मुष्टी,
मांसें श्वापदसंघा, विजयें स्वजनासि दे महातुष्टी. १२६
ऐरावतीं चळेना तिळ हि, असा काळनेमिनें खिळिला[9];
मोहें भगवान् वज्री[10], बा! बाळक अजगरें तसा, गिळिला. १२७
निर्व्यापार[11] चि केला वरुण करायासि नाश हि सकून,

---

१. कालनेमीचे गगन व्यापणारे हात आपल्या उग्रपणानें विषास हासणारे ( तुच्छ मानणारे ) [ हे जणू काय ] पाच तोंडाचे [ हाताच्या पाच बोटास हाताचीं तोंडें म्हटलें आहे ] महाभुजग च, ते काळ्या रंगाचें असि (तरवार) मिष (रूपीं) विष [ तरवारीचा रंग काळा असतो, म्हणून तिला त्या पांच तोंडांतून गळणाऱ्या विषाची उपमा दिली आहे ] वमति ( ओकतात ), [ असें ] गमति ( दिसले ). २. त्याच्या श्वासोच्छ्वासरूप क्रोधाग्नीनें मेघांस देखील घाम फुटला. ३ स्वजन-विश्वास—**पंत.** ४ पूर्वार्जित पापामुळें. ५. वाळलेला पाला. ६. देवांच्या धनुष्यानें त्या काळनेमीच्या पावलाला सुद्धां श्रम दिले नाहींत—त्याच्या पायाला सुद्धां धक्का लागला नाहीं. ७. राजा जनमेजया! ८. तुच्छ मानील. ९. जागच्या जागीं न हालेसा केला. १०. इंद्र ११. स्तब्ध.

वा ! घेतलें तयाचें, परिभव देवून, पाश हिसकून. १२८
[2]अरिपरिघाहत होवुनि, धनद बहु करी तदा विलापातें;
खद्योतगण तयाला त्यांच्या कोणें न दाविला [3]पातें? १२९
धावी यमें परां जी, ती च तयाला रणीं दशा दे हा;
जाय पळुनि रक्षाया भगवान्, जोडून कर यशां[4], देहा. १३०
देहचतुष्टय घेउनि दिक्पाळांचें स्वयें चि कर्म करी;
तो [5]तत्प्रताप ते हरि, यमवरुणकुबेर जेंवि धर्मकरी. १३१
सुचवी राहु तया कीं सोमार्कांचें हि तें पद न राहो;
तो तें चि करुनि म्हणे, 'स्वरिपूंचें नत पहा वदन, राहो !' १३२
[6]देवमुखींचा अग्नि स्वमुखीं, [7]स्ववशीं च वायु हि स्थापी,
सेवोंसि सिंधु लावी, तेजें त्रैलोक्य तो असें व्यापी. १३३
[8]परमेष्ठिस्थानस्थित तो स्तविला, धरुनि कंप, देवानीं;
वा ! तत्प्रसादकामुक सर्व हि तच्छक्तिसंपदे वानी. १३४
त्यासि [10]असात्विककर्में सत्य, श्रुति, धर्म, न क्षमा सेवी;
तैसी च पांचवी श्री जी श्रीनारायणाश्रया देवी. १३५
कोपुनि म्हणे, "न कां हे पांच चि? जरि आपणा सकळ वळले;
[11]पश्चात्तापें, 'न वळों,' करुनि अशा या पणास, कळवळले." १३६

---

१. वरुणास्त्र २ शत्रूच्या आयुधानें तडाका बसलेला ३ परिघाच्या कोणत्या पातें (पतनानें-आधातानें) त्याच्या डोळ्यापुढें काजवे चमकले नाहींत? ४. यशाची आशा सोडून. ५. त्याचा प्रताप हा च सिंह व इंद्रादि दिक्पाल हे घामाघुम झालेले हत्ती. ६ अग्नि हा देवाचें मुख होय ७ आपल्या कह्यात. ८. ब्रह्मदेवाच्या पदावर बसलेला. ९ कालनेमी. १० पापयुक्त कर्मांमुळें असात्विक=राजस आणि तामस. ११. कालनेमीला आपण अनुकूल झालों नाहीं यामुळें तो कोपाविष्ट झाला, हें ऐकून ह्या पांचांची पांचावर धारण बसली. आणि 'न वळों' (आम्हीं त्याला वश नाहीं च होणार) असल्या या पणास करुनि ते पश्चात्तापें कळवळले—झक मारिली आणि या पचायतींत आपण पडलों असें त्यांस वाटूं लागलें.

'वैष्णवपद ही घ्यावें, टाकावा शत्रुशेष[1] खाणून,'
आणून स्वमनीं हें दैत्य निघे स्वल्प कार्य जाणून. १३७
गेला वैकुंठीं तों गरुडावरि आपणासि मिरवीत
प्रभु होता करकमळें कवळुनि कौमोदकीस[2] फिरवीत. १३८
मदनशतरुचिर, कमलच्छदननयन[3], परमशुचि, यशःसदन,
रदनरुचिजितामृतकर[4], सिद्ध कराया सुरद्विषत्कदन[5]. १३९
तो दैत्य प्रभुसि म्हणे, "रे विष्णो! दितिजदनुजकुलकाला!
त्वत्स्मरणें[6] कीं सर्व स्वपर सदा पोषितात पुलकाला. १४०
त्वां मधुकैटभ वधिले, तो हि हिरण्याक्ष आमुचा चुलता,
जनक कनककशिपु हि कीं, या शोकें अन्य[7] जन उरीं उलता. १४१
गाती ज्या सुवदान्या[8] सन्मान्या, सुकवि सर्वदा बळिला,
छळिला सर्वस्व हरुनि, लाजविसी कपटसिंधु तूं कळिला. १४२
जो भंगितो तडागा, 'हो[9] मार्गींच्या' म्हणेल 'हानि वडा,'
दात्याचा उच्छेदक, कवि म्हणती, 'सम[10] पदार्थ हा निवडा.' १४३
तुज वधुनि, त्वत्पक्षीं जे रुद्रादित्यवसु रहातात,
त्यांसि रडवितों, यावरि न कधीं म्हणतील असुर 'हा! तात!'
सर्वां ही देवींचे उद्धरितों[11] स्पष्ट आजि सीमंत,
स्वहृदयशल्योद्धारें[12] मातें म्हणतील 'धन्य' धीमंत." १४५
ऐसें बहुत चि वदला देवाहित काळनेमि तो हरितें,

१ शिल्लक उरलेला शत्रु (विष्णु). २. ह्या नांवाच्या गदेला. ३. कमलपत्राप्रमाणें नेत्र असणारा. ४. दांताच्या तेजानें [ शुभ्रपणामुळें ] जिंकिला आहे अमृतकर ( चंद्र ) ज्यानें असा विष्णु. ५. देवांच्या शत्रूंचा नाश. ६. तुझ्या स्मरणानें स्वजन [आनंदानें] व परजन (शत्रु) [भीतीनें] रोमांचित होतात ७. [ मजखेरीज ] दुसरा एखादा. ८ अत्यंत उदार अशा. ९ 'रस्त्यांवरील सावली करणाऱ्या वडाचा नाश होवो' असें म्हणणारा. १०. हा (हे) पदार्थ (तीन प्रकारचे लोक) सम निवडा ( सारखे च समजा ). ११. भांग विसकटितों ( पतींना ठार करून देवस्त्रियांना वैधव्य आणितों ). १२. स्वजनांच्या हृदयातील कांटा काढिल्यानें.

अरिहृदय ही वसाया जो करि, दवडुनि दूर मोह, रितें १४६
तैं म्हणति सुरी, 'द्रवसिल, तरि हे न वियोग देतिल कपाळीं;
सति! जो प्रताप तव, तो उदया रवि यो; गदे! तिलक पाळीं.'
श्रीविष्णु म्हणे, 'अधमा! वध मागें त्यांचिया चि दोषानें,
आजि तसा चि तुझा ही, मन्मन न विटाळिलें चि रोषानें. १४८
धर्मन्यायातिक्रम करुनि भलतसें चि वर्तसी, वदसी,
मंद सीमातिग झाला, मदसि श्रीची खळासि दे न दसी.' १४९
शांतिक्षांतिनिलय हा, सर्वत्र हि सम, दयालु, गा राया!
प्रेमळ, भक्तजित प्रभु, वांच्छी तो समद या लुटाराया १५०
शतभुज नानायुधधर शत्रु म्हणे प्रभुसि, 'जीवितारक्षीं;'
वर्षी सायक हाणी, कीं क्षोभे देवदव न त्या कक्षीं. १५१
मयतारप्रमुख असुर होते जे काळनेमिच्या पक्षीं,
ते शस्त्रवृष्टि करिती सर्वाहितमर्दनक्रियादक्षीं. १५२
ताडी महागदेनें सहसा गांठूनि दैत्य गरुडास,
अतिचित्र गमे, देतो तो अहि लक्षूनि मुख्य अरु डास. १५३
क्षितिवरि उतरे, होय व्यथित गरुड, परम विस्मया पावे;

---

१. जो (हरि) मोह (अज्ञान) दूर दवडुनि अरिहृदय [स्वत: ग] वसाया रितें करी. २ तेव्हा सुरस्त्रिया कौमोदकी गदेस म्हणतात:—तू कृपा करशील तर हे (देव) आमच्या नशिबीं वियोगजन्य दुःख येऊ देणार नाहींत, म्हणून हे सति! तुझा प्रताप-रवि उदय पावो आणि आमच्या सौभाग्यतिलकाचें रक्षण करो. ३. त्याचा (असुरांचा) आजपर्यंत जो वध झाला तो त्याच्या च पापकर्मानें होय. ४. तुझी मस्ती मर्यादेबाहेर गेली, [परतु] माझी तरवार तुझ्यासारख्या दुष्टास वैभवाची एक दशी (अल्प भाग) सुद्धा लाभू देणार नाहीं. ५. मत्त काळनेमी ६. या (विष्णूस) लुटावयास. ७. कारण विष्णुरूपी वणवा त्या काळनेमीरूपी गवतावर (कक्षीं) न क्षोभे. ८. यच्चयावत् शत्रूंचें मर्दन करण्यास दक्ष अशा विष्णूवर. ९. तो अहि (काळनेमी) मुख्य अरु (मर्म) लक्षूनि डास देतो, म्हणजे गरुडास साप चावतो, हें अतिविचित्र गमे. १०. मर्म—पंत.

चित्तीं श्रीविष्णु म्हणे, 'या तेजें देव कां न तापावे?' १५४
तों ताडिति शस्त्रानीं त्या व्यसनीं देव ढेंकुळानीं[1] कीं,
ऐका कवि हो! तेज श्रीदितिच्या केवढें[2] कुळांनीकीं. १५५
ते शत्रु प्रभुवरि बहु शस्त्रोपळलोष्ट[3] वर्षले, शमला[4]
प्रभु मानुनि, त्यां झाला, परि हें वदतां न हर्ष लेश मला. १५६
तेव्हां सुरमुनि वदले, "जय! जय! मधुसूदना! अगाधवळा!
लाजवितें त्वद्यश कीं चंद्रा, दुग्धार्णवा, अगा! धवळा. १५७
कनकाक्ष, कनककशिपु हि, वधिला जो समरपर महाकाय,
जगदीश्वरा! तयांहुनि तेजस्वी अमर[6] परम हा काय[7]? १५८
शीघ्र जयार्थ कराया युद्ध कसावी रमावरा! कास.
म्हणसिल तूं यश मिळतां शुद्ध कसा वीर 'मीं' वराकास?"
मेला श्रीविष्णु असें वैकुंठस्थानकाम हा मानी,
दुंरव ऐकविल जना वैकुंठस्था न कां महामानी? १६०
सिंहरव असुर करिती, प्रकटिति बहु नादसंपदे वाद्यें,
तों चि उठोनि उडविला परहर्ष स्वजनकंप देवांद्यें. १६१
कोंडीं[11] न माय ऐसा सगरुडसत्रिदशहर्ष विभु वाढे;
बहु वाढले विभुभुज हि, जे खरपरमदगदांतकर[12] काढे. १६२
बळिसर्वस्व हराया पूर्वी वाढे नृपा! जसा काय,
प्रभु काळनेमिजीवनहरणास्तव वाढवी तसा काय. १६३
मुक्त करि करिवरातें सहसा जेणें वधूनि नक्रातें,
शक्रातें पद द्याया, अरिवरि हरि धरि तया स्वचक्रातें. १६४
परशस्त्र यशें व्हावें यत्सुयशा नत, जसें पया तक्रें;

---

१ देवांची शस्त्रवृष्टि असुरास मातीच्या ढेकळांच्या वर्षावासारखी वाटली. २. दैत्यकुळाच्या सैन्याचे भर्गीं. ३ उपळ (दगड) [व] लोष्ट (ढेकळें). ४. थंड पडला, पराजित झाला. ५ 'चंद्रा' व 'दुग्धार्णवा' यांचें विशेषण ६. हा अमर काय? ७. नाहीं—पंत. ८ नीच काळनेमीस ९ शंखध्वनि. १०. विष्णूनें. ११ ब्रह्मांडांत. १२. क्रूर शत्रूच्या गर्वरूपी रोगाचा नाश करणारे.

ज्याच्या भयें धरावें सरळपण, त्यजुनि वक्रता, वक्रें.　　　१६५
पावावें परहृतपद पुनरपि ज्याच्या अनुग्रहें शक्रें,
प्रभु काळनेमिमस्तकभुज खंडी त्या महाप्रभें चक्रें.　　　१६६
होतां विशाखतरुसा[1] तैसा चि उभा नृपा! परकबंध[2]:
जाणों[3] अतिविस्मित तो कीं हरिला सुदृढ ही नरकबंध[3].　　१६७
त्यातें, सरोनि मागें, धांवुनि वेगें, उरस्थळें ताडी,
पाडी गरुड क्षितिवरि, गिरिशिखरें तो हि भूमि ही फाडी. १६८
म्हणती इतर हि भगवद्भुजपरवशकाय[5] असुर 'हा! तात!'
वधिले सर्व, प्रभुसीं विटत्यांचे[6] काय असु रहातात?　　१६९
सुर मुनि सर्व स्तविती, अंजलि जोडूनि, देवदेवास;
जीवासि यद्यशाचा 'भवभय सोडूनि दे' वदे वास[7].　　　१७०
स्तविति नमुनि समुनि सुर प्रभुच्या शस्त्रांस, मग रुंडनळास[8];
स्तवितिल कवितिलक हि कां परमदकळिच्या[9] हि न गरुडनळास[9]?
नाचति वराप्सरा बहु, सुमधुर गंधर्वराज यश गाती;
देवानीं कुसुमाहीं पुजिली श्रीमूर्ति भक्तवशगा ती　　　१७२
तेथें ब्रह्मर्षिसह ब्रह्मा येवूनि विष्णुतें विनवी,

---

१. शाखारहित वृक्षासारखा. २. शत्रूचें (कालनेमीचें) धड ३. अशा दुष्टाचा अतिबळकट असा नरकबंध नाहींसा केला, याचें आश्चर्य वाटून च जणू काय तो कबंध (तें धड) तटस्थ उभा राहिला. मस्तक तुटल्यावर धड खालीं न पडतां तसें च उभें राहिलें यावर ही उत्प्रेक्षा केली आहे. दुष्टास परमेश्वराच्या हातून मृत्यु आल्यानें तो मुक्त झाला. ४ तो कबंध ५. भगवताच्या हातीं सांपडले होते देह ज्यांचे ते; (हें व 'इतर हि' हीं दोन्हीं 'असुर' याचीं विशेषणें) ६. विटणाऱ्यांचे, कटाळा करणाऱ्यांचे. ७ गंध. ८. रुद्र (रोषरूपी) अग्नीस. ९. नलापुढें कलीचें कांहीं चाललें नाहीं या कथेवर अनुसंधान आहे.

'पावो भवत्प्रसादें सुश्री मल्लोक, जिष्णु तेंवि. नवी. १७३
ती ती दिशा करावी प्रभुनें शक्रादिलोकपाधीना,
द्यावा अभयवर, पुन्हां जेणें याला पराधि बाधीना.' १७४
प्रभु सर्व सुरांसि म्हणे, 'सर्व यथापूर्व चालवा धर्म,
समयीं स्मरतां, प्रकटुनि देइन, पीडा हरूनि, मीं शर्म. १७५
स्वस्वपदीं स्वस्थ रहा, सप्रेम मनांत आठवीत मला;
होयिल मति अतिहृष्टा, करितां मत्कीर्ति पाठ वीतमला.' १७६
ऐसें शिकवुनि विधिसह गेला श्रीविष्णु सत्यलोकातें;
त्या होय प्रभुदर्शन, जननीदर्शन जसें चि तोकातें. १७७
सप्रेम सत्यलोकीं पूजिति लक्ष्मीवरा ऋषि तराया;
केले तृप्त प्रभुनें, जे होते दर्शना तृषित, राया! १७८
हा सत्यलोक करितो स्वस्थितिनें धन्य मेरुशैलास,
वैकुंठलोक यांत चि, अत्यद्भुत जाण तो हि कैलास. १७९
विश्वगुरु ब्रह्मश ब्राह्मणकृतपूजनासि घेवून,
सेवून स्तुति, गेला वैकुंठीं, स्वसुखयोग देवून. १८०
गरुडातें शस्त्रांतें देव विसर्जुनि, समाधिसुख भोगी;
तें श्रीपतिप्रसादें अनुभविति ज्ञानभक्तिरत योगी. १८१

---

# अध्याय दहावा.

सुकविजन 'महानिद्रा' त्रिजगद्गुरुच्या समाधिला म्हणती,
ने करुनि कृतत्रेताद्वापरपर्यंत काळ हा क्षण ती. १
द्वापरयुगपर्यंतीं प्रभुतें प्रार्थिति महर्षि जवळील,
कीं करुनि देवकार्य, स्वयशें लोकत्रयासि धवळील. २

१ इंद्र २. विमळा–**पंत.** ३ स्वतः मेरुपर्वतावर असल्यानें. ४ शुभ्र करील, भरून टाकील.

ते मुनि ऐसें वदले, करुनि स्तुति, पुंडरीकनयनातें,
कीं, 'ऊठ देवदेवा! सुरकार्यार्थ त्यजूनि शयनातें. ३
आला द्रुहिण सुरसहित, सुरस हित तुझें सदुक्त सेवाया,
सुखवीं नयनें उघडुनि, दर्शन देवूनि, वासुदेवा! या.' ४
जगदीश योगनिद्रा त्यजुनि उठे, कार्यभय पुसे विधिला
नमुनि समुनि तो कळवी सुरकार्य असें तया दयानिधिला. ५
'भुवनें मुदितें केलीं त्वां देवा! पुंडरीकनयना! हीं,
प्रभुच्या पदप्रसाद देल्यापासूनि लेश भय नाहीं. ६
विप्रादि सकळ वर्ण स्वर्णपटा! वर्तती नयें धर्में;
व्याधि नसे, मग कैंचा मृत्यु? सदा पावती प्रजा शर्में ७
वर्तति धर्में चि सदा, न च करिति अधर्म सर्वथा राजे;
प्रेमें प्रजा प्रजांशी रक्षिति, सुगुणासि सर्व धारा जे. ८
सर्वसहा प्रजांच्या भारें हे फार दडपली लाजे,
ते चि इलां, भूतानें महिलेला कष्ट झडपलीला जे. ९
नगरीं नगरीं राजे, त्यांचीं सुमहाबळें बळें कोटी;
मोटी पीडा होती हे या विश्वंभरेसि, तों खोटी. १०
अतिभारें पावतसे कष्ट सुदु सह सदा नव धरा जे,
ते होतिल दूर कसे, जगदीशा! पावतां न वध राजे? ११
आली प्रथम मजकडे दुःख कथाया धरा भराक्रांता,
श्रांता झाली, न बुडो नौकासी सागरीं, रमाकांता! १२
हे सावधान धर्मीं; वध पावावा असावधानाहीं,
देवा! उपाय यांच्या, ज्यांत अधर्म न, असा वधा नाहीं. १३

---

१. ब्रह्मदेव. २ कामात आलेलें संकट. ३ पुढें सांगितल्याप्रमाणें ४ सुवर्ण—वर्ण—वस्त्रा' (पीतांबरधारे') ५ [आपल्या] संतती प्रमाणें. ६ सर्व सहन करणारी (पृथ्वी) ७ हिला [पक्षीं] पृथ्वी. ८. पिशाच्चानें [पक्षीं] प्राणिमात्रामुळें. ९. बायकोला [पक्षीं] पृथ्वीला भूतानें झडपलीला महिलेला जे कष्ट ते चि इला [होती] १०. सुदुःसह, कठिण

धर्मोच्छेद न होतां, भूभारावह नरेंद्र माराया
योजावा मंत्र, करुनि सदुपाय, क्षिप्र भूमि ताराया.' १४

श्रीविश्वंभर, विधिच्या वदनें जो अर्थ हा निघाला, या
ऐकुनि निघे, महिमनीं हर्ष, करुनि भारहानि, घालाया. १५

गरुडस्कंधारूढ प्रभुवर वैकुंठलोक सोडून
विधिसह निघे, सुरमुनि स्तविति बहु समस्त हस्त जोडून. १६

आहे सुमेरुशिखरीं अद्भुतरूपा सभा परागम्या,
तींत श्रीमूर्ति वसे, जीपरि लोकत्रयीं नसे रम्या. १७

ब्रह्मप्रेरित मारुत चित्र करी सागरापरि सभा जी,
क्षिति विनवि तया, ज्याचें तेज बहु निर्वावि नता, अरिस भाजी.

"नारायणा! शरण्या! वरदा! विश्वंभरा! बुधाधारा!
आल्यें शरण तुला मीं, कीं कीर्ति तुझी खरी सुधाधारा. १९

आलासि करित तूं चि प्रभुवर्य, करुनि दया मंदवनातें;
झालासि दवानळ, जें अहितांचें घन, तया मदवनातें. २०

सिंधूंत बुडेन चि मीं, जरि नाहीं भार दूर हा केला;
आर्ताच्या, भीताच्या, देतात चि हाक शूर हाकेला. २१

सुर हो! पूर्वीं कर्ण प्रभुचे एकार्णवीं मळां व्याले,
त्याचे दोघे असुर प्रकट महाबळ महातनू झाले. २२

मृदुचें 'मधु,' कठिनाचें 'कैटभ,' हें नाम हा करी धाता;
ते दोघे अतिदारुण, कीं याच्या चि प्रवर्तले घाता. २३

तेव्हां या धात्यानें या श्रीहरिला स्वशत्रु ते कथिले;

१. मसलत, उपाय २ शत्रूंस अगम्य ३ सागरापरि (अफाट) जी सभा [ती] चित्र (तटस्थ) करी ४. माझ्या रक्षणास. ५. जें अहितांचें (दुष्टांचें) घन (अति दाट) त्या मदरूपी वनाला दावानळ (वणवा) झालास ६ प्रलयकाळीं सर्व जलमय होऊन समुद्र एकवटला असतांना. ७. [कानातल्या] मळास. ८. महादेवाच्या.

सुचिर भुजरण करुनि, मति मोहुनि, मागोनि वर रणीं मथिले.
त्याच्या मेदें रचिल्यें, यास्तव मज 'मेदिनी' असें नाव;
मीं या प्रभुप्रसादें लोकांची जाहल्यें असें नाव. २५
यावरि वराहरूपें हा प्रभु माझ्या करी समुद्धारा;
कीं या स्मरतां चि, मिळे त्या अत्यार्तो करीस मुद्धारा. २६
आहे माझें ठावें तें मार्कंडेयमुनिवरा हरण;
दंष्ट्राग्रें मज काढी, कनकाक्षासीं हि करि वराह रण. २७
होवुनि वामन हा मन बळिचें हरि मजसमेत सुर हो! तें
जाणतसा, जें स्मरतां सर्व प्रेमाश्रुसिक्त उर होतें २८
सांप्रत मीं भारार्ता, मज द्यावें अभय या चि नाथानें,
त्यागुनि निजजननीस्तन इतरें शिशुवुद्धि याचिना थानें. २९
पूर्वीं असी च पीडा झाली, तीतें हि परशुराम हरी,
प्रभु एकवीस वेळां सुर हो! प्रकटूनि अतुळधाम हरी. ३०
मग मज तातश्राद्धीं तो भगवान् कश्यपास दे हातें,
मळिना चि भेटल्यें मीं सुर हो! त्या सत्तपा सदेहातें. ३१
कश्यप म्हणे मला,'गे! कां रक्तें भरुनि आंग आलीस?
दुर्गंधा, दुःस्पृश्या, वैतरणीची सखी च झालीस' ३२
सुर हो! वदल्यें, 'वधिले रामें मत्पति अनेक, विधवा हे;
माझें चित्त स्वामी! दुःख सुदुःसह अनेकविध वाहे. ३३
सुखशोभा स्त्री दैवें पतिच्या शोकीं न घातली लाहे,

१ "तुम्हा उभयतास माझ्या हातून मरण असावें" असा वर विष्णूनें त्यांज-कडून मिळविला होता २. चांगल्या प्रकारच्या उद्धारास (वर काढण्यास). ३. गजेंद्रास. ४. मुद् (आनंदाची) धारा. ५ 'थानें' याचें विशेषण. ६ मूर्तिमत उत्तम तपाला. ७ नरकमार्गांतील नदी. ८. परशुरामानें. ९. दैवें (दुर्दैवें) पतिच्या शोकीं (पतिनिधनाच्या शोकात) घातली (घातलेली) स्त्री सुख [व] शोभा (मंगलशोभा) न लाहे (लाभे).

मीं साधु सदा हृदयीं प्रभुची घोकीन घातलीलो हे.' ३४
सकरुण कश्यपमुनि मज मनुच्या अर्पुनि करांत हा निरवी,
मच्छोकहानि सुर हो ! मनु करि, जसि अंधकारहानि रवी. ३५
मनुवंशीं बहु झाले मज भर्ते साधु अमर हो ! राजे,
पुसति पहाति परांसीं नित्य करायासि समर होरा जे. ३६
जी एका पतिपासुनि पावे पत्यंतरा जनीं, ती तें
सुख मानू वेश्यां; मीं विटल्यें अत्यंत राजनीतीतें. ३७
सुर हो ! म्हणा तुम्हीं मजविषयीं या प्रभुसि, 'भक्तकल्पतरो !
शरणागता मही हे आर्ता; हो फार भार अल्प, तरो.'" ३८
तें वाक्य श्रवण करुनि, सुरविधितें बोलिले असें, 'आर्या !
आम्हां सर्वांतें दे आज्ञा क्षितिच्या करावया कार्या. ३९
नरलोकीं देवांचे जावे झाडूनि अंश; यश मोंया
थोडें ब्रह्मांड गमे, भूभर नाहीं च संशय शमाया.' ४०
द्रुहिण म्हणे, "सुर हो ! हा तुमचा निश्चय भला मला रुचला;
सुचला धराभरापहविधि, वांटुनि कार्यभाग घ्या, उचला. ४१
हें पूर्वीं च उमजलों, कीं झाला भार फार हा महिला,
यासि उपाय अमर हो ! म्यां बरवा योजिला असे पहिला. ४२
पूर्वसमुद्रतटीं मीं कश्यपमुनिसीं सुखें कथा कथित
बसलों होतों, ज्यांत श्रवणप्रिय अर्थ, जे श्रुतिप्रथितें. ४३
सादर सुकथाकथनीं सागरसुरसिंधुसंगमीं होतों,
गर्जे, लहरी सोडी, बहु पावे स्वास्थ्यभंग मीं हो ! तों. ४४
बसलों जेथें, तेथें आल्या वाढोनि बाढें लाटा कीं;

१ निजपतिनाशकारिणी लीला-**पंत** २. स्वाधीन करी ३. सुमुहूर्तें ४ दुसऱ्या पतीस ५ त्या वेश्येस पाहिजे तर तें पत्यतर गोड वाटो ६ यच्चयावत्. ७ मारण्यास ८. पृथ्वीचा भार नाहींसा करण्याचें काम. ९ प्रथमपासून. १०. वेदांत कथन केलेले. ११ मोठ्या

'शांतोसि!' असें वदलों, न म्हणोनि 'स्वमद वाढला टाकीं.'
'शांतोसि' असें वदतां तनु झाला आवरूनि तो लहरी,
त्याच्या अतिवृद्धीतें माझा तो क्रोधगर्भ बोल हरी. ४६
राजश्रीधर सागर गंगेसह मेघवायु घेवून,
मर्यादेतें बुडवुन, ठाके माझ्या समीप येवून. ४७
'शांतोसि' असें आधीं, मग वदलों त्यासि "राजरूपानें
आलासि सागरा! जरि, यावें भेटीस जेंवि भूपानें, ४८
तरि होसिल राजा चि, क्षितितें परिपाळिसील, हे गंगा
तव भार्या भरतकुळीं, जा, इच्या पावसील तू संगा. ४९
'शांतोसि' असें वदतां तनुतेतें पावलासि, म्हणवून
'शांतनु' असें समुद्रा! घेसिल तूं कुरुकुळांत म्हणवून." ५०
कर जोडुनि सिंधु वदे, पावुनि गंगेसमेत तापातें,
'पर्वस्वभावकृत हें उद्धतपण, पात्र मीं न शापातें. ५१
शरणागत रक्षावा, प्रार्थितसें करुनि मीं पेंसा, दास;
मजवरि करीं सकरुणा! या ही गंगेवरि प्रसादास.' ५२
मीं वदलों, 'भय न धरीं, करिसिल यश कुरुकुळांत जन्मुनि तें,
जें गातां, आयिकतां, सकळा ही हर्षतील सन्मुनितें. ५३
वसुशापें स्वर्गच्युत झाले आहेत, ते इच्या पोटीं
येतील, मुक्त होतिल, ज्यांचीं चरितें सुरप्रियें मोटीं. ५४
हें सुरकार्य करुनि, तूं, संतति ही वाढवूनियां कुरुची,

---

१. शांत आहेस. ( समुद्र मर्यादातिक्रम करीत असतां त्यास 'तू शांत आहेस' असें उपहासानें म्हटलें आहे ) २ लहान. ३. माझ्या क्रोधयुक्त भाषणानें त्याची वाढ खुटली. ४. पूर्णिमा व अमावास्या या दोन तिथी महिन्याचे दोन भाग—शुक्ल व कृष्णपक्ष हे—सांधतात, जोडतात, म्हणून त्यांस 'पर्व' असें म्हणतात ह्या वेळा समुद्राच्या भरती—ओहटीच्या आहेत ५. हात जोडून, अंजलि करून.

पावसिल स्वगति पुन्हां, सुरुचि असो तुज सदा, नसो कुरुची.'
ऐसें ऐकुनि झाला सागर कुरुच्या कुळांत शांतनु, ती
देवनदी तज्जाया, जीची करितात सर्व शांत नुती. ५६
गंगागर्भीं वसले होते शापेंकरूनि[1] जे तप्त,
अष्टम भीष्माख्य असे नरलोकीं, मुक्त जाहले सप्त. ५७
शांतनुचा दुसरा सुत, तो भूप विचित्रवीर्य या नावें,
धृतराष्ट्र पांडु त्याचे, कविनीं ज्यांचें चरित्र वानावें. ५८
'गांधारी' या नामें धृतराष्ट्राची असे सती भार्या;
स्पष्ट विपक्ष[2] प्रसवो हे, देवांच्या करावया कार्या. ५९
पांडु नृपाच्या, कुंती, माद्री, दोघी महासती भार्या;
त्या पक्ष प्रसवोत त्रिदशांचा[3], सुमति, सुव्रता, आर्या. ६०
त्या दोघां राज्यांचे सुत, कलि करितिल ससेन; दायाद[4]
या भावा वैर करुनि आश्रय जैसें वसे नदा याद. ६१
इकडे तिकडे मिळतिल राजे, करितिल महासमरयज्ञ;
मरतिल सर्व प्रेक्षकदृष्टिसि देउनि मेहा[5], समरयज्ञ[6] ६२
जाळिल रुद्रांशें[7] तयां निजतिल जे शेष घोरतर रसाप[8];
भस्म करि कृतागस्का[9] विषदहनें जेंवि घोरतर साप. ६३
धर्मांश पृथा, माद्री, यांच्या ठायीं जपोनि योजावा;
गांधारीच्या पोटीं, जो कलि कलहैकमूळ[10], तो जावा. ६४

---

१. पहिले सात वसु जन्माला येता च गंगेनें जलांत बुडविले होते. २. शत्रूचा पक्ष ( दैत्यदानवांश ). ३ देवांचा. ४. जैसें नदा आश्रय करुनि याद ( जलचर ) वसे [ तैसें ] दायाद ( भाऊबंदकी ) या भावा ( हेतूला ) आश्रय करुनि वैर वसे. ५ उत्सवातें—पंत. ६. सम+रय ( वेग )+ज्ञ ( आवेश वगैरेंत जोडीचे, बरोबरीचे ). ७. अश्वत्थामा. ८. रसा ( पृथ्वी )+प ( पालक ) =राजे ९ केला आहे अपराध ज्यानें त्यास ( सर्पास दुखविणारास ). १०. कलहाचा मु य पाया जो कलीचा अंश ( दुर्योधन ).

या दोघां पक्षांतें भजतिल वसुधार्थ सर्व ही राजे,
रणधर्मांतिदृढत्वें[1] पोषूं देती न गर्व हीरा जे. ६५
त्यां योजिला नृपांच्या सदुपाय यशोनिधानें[2] हा निधना;
व्हावी क्षितिच्या भारा, त्यांच्या धर्माभिधा[3] न हानि धना. ६६
तूं स्वस्थानासि धरे! जा, काहीं काळ, धरुनि सत्वें[4], रहा;
हितकर उपाय सुचला, सुखविल तुज ताप हरुनि सत्वर हा.”
विधिवदनें मर्त्यांचा भावी ऐकोनि न वध रागेली;
स्त्रीहृदय सत्य निर्दय; उत्सव पावोनि नव, धरा गेली. ६८
मग धाता देवांतें स्वस्वांशें अवतरावया योजी,
जें[5] कवि म्हणति, ‘विभागा आपुलिया, भव तरावया, यो जी!’
विधिचें वचन यशस्कर घे शेष, नर हि पुराण जो ऋषि तें;
अश्यादि सर्व सुर ते घेती, घ्यावें जसें अमृत तृषितें. ७०
अवतरले देवांचे सर्व धराभर हरावया अंश;
भरिला पांचाळांचा, कुरुचा, यदुचा, नृपा! तिहीं वंश. ७१
बहुबळ, बहुगुण, यज्वे[6], पुण्यव्रत, जन्मले यश कराया,
वा! ज्यापुढें पर तसे, पक्षिपतिपुढें जसे मशक, राया! ७२
करुनि सुरांतें आज्ञा, विधि हें जगदीश्वरासि वदला हो!
‘त्वत्पदसंश्रित सुरजन, हतपरजन[7] ही, यथार्ह[8] पद लाहो.’ ७३
यश करि ययातिवंशज वसुदेवकुळीं मुकुंद जन्मुनि, तें
ऐक, नृपा! तुज कथितों, प्राणाधिक जें शुकादिसन्मुनितें.”

---

१ कठीणपणानें (दारुण व भयकर स्थितीनें) २ ठेवा. ३. धर्म नांवाच्या [धनाला] ४ धैर्य ५. घालाची योजना. ६. यज्ञकर्ते. ७. मारलेले शत्रूकडील लोक. ८. योग्य.

# अध्याय अकरावा.

अंशावतरण झालें असतां ये सुरसभेंत नारद या,
ज्याची जडजीवा[1] ही दावी संसारसिंधुपार[2] दया. १
देवर्षि म्हणे प्रभुला, "जगदीशा ! तव यशें निचे दीन;
काहीं कार्य स्वमुखें त्वल्लीलापरवशें[3] निवेदीन. २
देवांशांहीं न दिसे जो भूभरवार या विनाश मला;[4]
कीं व्यजनसहस्रें[5] ही न पयोधर वारयाविना शमला. ३
ऐकुनि विश्व, सुकविकुळ गावुनि, मंगळ कथा तव, तरावें;
नारायणा ! तुजविना नर ही अक्षम; तुवां अवतरावें. ४
रक्षाया, भक्षाया, वा ! अनिळ क्षम जसा अनळसहित,
नरसहित तसा प्रभु तूं आर्तांचें साधिता अनळस हित. ५
त्वां दैत्य तारकामय संग्रामीं मारिले परतरा[6] ! जे,
ते झाले म्हणणारे 'मागें' शक्रास ही 'परत'[7] राजे. ६
पूर्वी यमुनातीरीं होता मधु परम उग्र दानव हा,
मधुवनवासी ज्याच्या त्रासें म्हणती अमर्त्यमानव[8] 'हा !' ७
त्याचा पुत्र सुदारुण, जो नामें विश्वनायका ! 'लवण,'
जो घे द्विजरक्त, म्हणे, 'दुसरें याहूनि काय कालवण?' ८
ज्या अतिमदमत्ताला स्वप्नीं ही ठावुकें नसे लवणें;
जिंगजिग केले नरसुर, गजहरि शरभें जसे, तसे लवणें. ९
त्या दुष्टें त्या दुष्टा दशवदनाचा विनाश[9] आठविला,
युद्धार्थ दूत दाडुनि साकेतीं[10] प्रभुकडे चि पाठविला. १०

---

१. अज्ञानी प्राण्यास सुद्धां २. पैलतीर. ३. तुझ्या लीला [ गाण्यात ] आधीन झालेल्या. ४. जो भूभरवार या देवांशांहीं मला विनाश न दिसे. ( केवळ देवांकडून च सर्व भूमिभार उतरेल असें मला वाटत नाहीं ) ५. वाऱ्याशिवाय. ६. अत्यंत श्रेष्ठ अशा ! ७. नम्र होणें. ८. देव आणि मनुष्यें. ९ मृत्यु (-चा प्रकार) अवलंबिला. रावणाप्रमाणें स्वतःवर मरण ओढवून घेतलें. १०. अयोध्येस.

" रामा! तूं भूप कसा? कीं तव देशासमीप मीं आहें
शत्रु प्रसिद्ध हीं, तव राज्य प्राण हि हरावया पाहें.   ११
निजदेशसमीपस्थित बळदर्पित जो, तयासि कविराजे
न च वांचों देति; असें न करी जो, तत्प्रताप न विराजे.   १२
जो, शुभ निजप्रजांचें, देशाची वृद्धि, इच्छितो राजा,
तेणें पर जिंकावे; न उपेक्षावें कदापि या काजा.   १३
अभिषेकें जों ओले अलक शिरीं, तों चि आर्य, आधीं तें
वारूनि, प्रकृतींचें रंजन जें, करिति कार्य आधीं तें.   १४
प्रथम स्वेंद्रियजेता तो नृप सर्वां हि पात्र होय जया,
प्रणति, करिति शत्रु, म्हणति कवि, 'राज्यश्रीनिवासतोयज' या.
'सम्यग्वर्तावें' हा काम स्वमनांत जो धरी धन्य,
उपदेशिता हित अहित गुरु त्याला लोकसम न नसे अन्य.   १६
व्यसनातें स्पर्शेना, धर्मीं रत नित्य, जो बळज्येष्ठ,
सामंतापासुनि तो भय पावेना कधीं नृपश्रेष्ठ.   १७
शत्रूतें हर्षविती सेवुनि विषयांसि, वृद्धि जीं धरिती,
तीं इंद्रियें सहजरिपु, विपुलश्रमहेतु हानितें करिती.   १८
त्वां स्त्रीकरितां वधिला लंकेश्वर अर्थिकल्पनग मोहें;
जरि हि महत् कर्म दिसे, मज, तें वि परा हि, युक्त न गमो हें.   १९
वनवास, जटावल्कलधारण, आहार तो सदा वन्य,
त्यांत वहुप्राणिवध, श्रवण न केला असा व्रती अन्य.   २०
साधूंचा तो म्हणतो ' लव हि न कळवीन तत्रिता,' काय,
जी अमित जीवहत्या केली, मळवी न ती व्रता काय?   २१
वधिले राक्षस, गातिल साधु असा तूं धरूं नको गर्व;

१ सुख २ राज्याभिषेकजलानें ३ क्षेम ४ प्रजाजनांचें ५. राज्यलक्ष्मीचें ठिकाण जें कमल तें, राज्यलक्ष्मीचे अधिष्ठान. ६ [ साम्यक्= ] चांगल्या रीतीनें. ७. लोकांसारखा (लोकमताप्रमाणें हिताहित सांगणारें अन्य साधन नाहीं). ८. अतिशय श्रमास कारण.

त्वां या कर्मे आश्रमवासी विस्पष्ट दूषिले सर्व. २२
रावण धन्य त्रिजगीं, कीं झाला रणमखांत हा हुत, रे!
[२]राहुत रेवातीरीं, युद्धीं विच्छिन्न[३]मूर्धबाहु तरे. २३
'विधिहत दशमुख वधिला म्यां,' हे जरि तव मनीं [४]महाहंता,
तरि ये, [५]युद्धांत तुझा मी देतों निजजनीं महा हंता. २४
जरि धैर्य असेल मनीं, धर्मीं निष्ठा, भुजांत बळ पूर्ण,
तरि मजसीं युद्ध करीं, हो वज्रें अचळ तेंवि शतचूर्ण." २५
वदला दूत, शिकविलें जैसें लवणें अशेष [६]मंदेशें,
स्मित केलें श्रीरामें अशांच्यें त्या तशा हि [७]संदेशें. २६
ज्याचें यश विश्वा 'हो धन्य' असें, हरुनि [८]दुस्तराघ, वदे,
तो उत्तर, [९]गुणलिपिनें फुगवाया सुकविपुस्त, राघव दे. २७
"दूता! निंदिति कुलटा साध्वीतें, साधुतें हि जे विट, ते,
[१०]जन अनघ कसे होते? निंदक जरि 'हाय!' म्हणुनि हे विटते.
जे साधु सत्पथीं स्थित, ते वाङ्मात्रें न दूषिले जाती,
[११]माती कोठें न मदें खळ घेती करुनि आपुली माती. २९
आत्मश्लाघी जे, ते अति नीच; तयांवरि प्रहारा मीं
न करीन [१२]पुन्हां; अस्थिर[१३] पण पळमात्र हि असो न हा [१३]रामीं.
वत्सा! शत्रुघ्ना! त्या माराया मधुवनांत चोरा जा;
तो देश तुझा, तेथें संपादुनि विजय तूं चि हो राजा. ३१
वत्सा! जयसूचक हा सुखवाया दूत, होय [१४]सत्कार्य,

---

१. [ त्यांचीं मनें ] दूषित केलीं २ राहोत (?) ३. मूर्धा=मस्तक ४. मोठा अभिमान—गर्व. ५ युद्धांत तुझा हता ( मारणारा ) मी निजजनीं महा (उत्सवास, आनंदास). देतों ६ मूर्खशिरोमण्यानें ७. ऐकण्यास अयोग्य अशा निरोपानें ८ दुर्धर पातक ९. गुणलेखनानें ( वर्णनानें ) १०. जरि हे निंदक 'हाय!' म्हणून विटते ( निंदा करण्यास कंटाळते ) [ तरि ] जन अनघ ( पापरहित ) कसे होते? ( निंदकाच्या निंदेनें पाप कमी होतें असा समज आहे; 'निंदकाचें घर असावें शेजारी,' हे सुप्रसिद्ध अभंग पहा ). ११ मावती. १२. एकदां रावणावर प्रहार झाला आहे. १३ हा पण ( प्रतिज्ञा ) रामीं अस्थिर नसो. १४. सत्कार करण्यास योग्य.

दूता ! शत्रुघ्नातें ने, मारुनि अरिस, करिल सत्कार्य." ३२
गेला शत्रुघ्न प्रभु, गांठी त्या मधुवनांत लवणातें;
हरदत्त शूळ[1] नसतां मारी; तत्तेज[2] सह्य कवणातें? ३३
होता स्थळ दुश्चरिता, जैंवि पुर क्षोणितळ मळा, लवण[3]
वधिला, जीवांसि म्हणे जो ग्रीष्मतसा चि 'तळमळा' लवण[4].
मथुरापुरी वसविली शत्रुघ्नें मधुवनीं, जसी अलका,
तेथें कंस वसे, गुरु तेजें, शीळें[5]करूनि जो हलका. ३५
हा उग्रसेनसुत, जो त्वां वधिला काळनेमि तो पहिला[6],
अहिला साधु म्हणवि तो; या भीती भू, विटा जसी महिला.
असुर हयग्रीवाभिध तो केशी, विदित, यासि हय[7]माया[8];
भयमायालेश नसे; बहु हि बहु गमे प्रजार्ति न यमा या. ३७
बळिसुत अरिष्ट जो, तो पीडा गायींस बैलसा रचितो;
नाम 'अरिष्ट' चि याचें, खळ वृषभाकार शैलसा[9] रचि तो. ३८
रिष्ट दितितनुज झाला नाग[10], करायासि कुंवलया[11] पीडा;
बहुबळ तो दुष्ट, जया भीती दिग्गज हि कुंवलयापीडा[12]. ३९
जो दैत्य लंबनामा, सांप्रत तो चि 'प्रलंब' नामानें,
भांडीर[13]वटीं वसतो अत्युग्र प्राणिघातकामानें. ४०

---

१. हा शूल लवणासुराच्या पित्याला शंकरानें दिला होता व 'हा ज्याला मारशील त्याचें भस्म होईल' असा त्याला वर हि दिला होता. २. त्या शूलाचें तेज—प्रभाव. ३ जैंवि पुर ( नदीचा लोंढा ) [ व ] क्षोणितळ ( पृथ्वीचा पृष्ठभाग ) हे मळा ( गाळाला ) स्थळ [ होतात ] म्ह० गाळ जसा त्यात सांचतो त्याप्रमाणे लवण हा दुश्चरिता ( दुर्वर्तनाला ) स्थळ ( ठाणें ) होता दुर्वर्तनाचा सर्व ओघ लवणाकडे वळून त्याच्या ठिकाणी सांठून राहिला होता. ४. कडक उन्हाळा ज्याप्रमाणें प्राणिमात्रास तळमळावयास लावितो त्याप्रमाणें लवण लोकांस तळमळायास लावी. ५. शीलानें, आचरणानें. ६. पूर्वजन्मींचा ७ घोड्याचें रूप धारण करण्याची कला. ८. [माया=] दया—पंत. ९. पर्वतासारखा बळकट. १०. हत्ती. ११. भूमंडळास. १२. ह्या नांवाच्या कंसाच्या हत्तीस. १३. ह्या नावाच्या वडावर.

खरनामा जो धेनुक खररूपी तो अरण्य ताळांचें
वसवितसे, उग्रत्व स्वीकारुनि सिंहसर्पकाळांचें. ४१
[१]संकोचले फुगवितां न वराहकिशोर जे मदें गल्ल,
चाणूरमुष्टिकाभिध झाले आहेत ते महामल्ल. ४२
जे मय तार असुर, ते नरकाचे [२]जाहले पुरोगामी,
म्हणतों, 'यांच्या नाशें या नेत्रांची स्पृहा पुरो,' गा! मीं. ४३
करितां मानुषलोकीं, पाताळीं, सागरीं हि, हे वास,
हेवा सत्पुरुषांसीं करिते, भीती न अन्य देवास." ४४
देव म्हणे, 'देवर्षे! त्वां कथिले असुर हे मला कळले;
जे निर्दय गोब्राह्मणसाधुद्वेषातिपातकें मळले. ४५
चळली, मळली, कळली बळिकन्या ते हि पूतना मातें;
जीच्या ऐकुनि वचकति, बहु काळाचे हि दूत नामातें. ४६
जाणतसें गरुडभयें कालिय यमुना[३]ह्रदीं दडाला जो,
कां त्या न सर्व [४]सत्वालंघ्यास हिमाद्रिचा कडा लाजो? ४७
वीर जरासंध गिरि[५]व्रजवासी ठावुका मला आहे.
प्राग्ज्योतिषपति नरक हि, ज्याच्या तेजा न शक्र ही साहे. ४८
[६]श्रीकंठप्रियभक्त, स्कंदप्रतिमप्रताप, जो राहे
शोणितपुरीं, सुदुर्जय [७]दशशतभुज बाण ठावुका आहे. ४९
त्या मुख्य महाभारतयुद्धमहायज्ञसिद्धिचा [८]कर्ता,
हर्ता भूभाराचा, विश्वाचा मीं च जाणता भर्ता. ५०
देवज्येष्ठ ब्रह्मा सांगेल कुळस्थळ स्वयें युक्त,
मीं अवतरेन तेथें; मज मत याचें तुझें तसें उक्त.' ५१

---

१ जे वराहकिशोर मदें गल्ल ( गाल ) फुगवितां न संकोचले ( संकोच पावले ). २ नरकासुराचे पुढारी [ सरदार ] ३ डोहांत. ४. प्राणिमात्रास ओलांडण्यास अशक्य अशा [ त्या कालियास ]. ५ मगधदेशाची त्या वेळची राजधानी. ६. शंकर. ७. हजार हाताचा ८. पूर्तता करणारा.

द्रुहिण म्हणे, "मधुर प्रभुवच चि, न मधुखंड[1]पायसां गावें.
अमृत हि न असें. प्रभुला आज्ञेस्तव, नमुनि पाय, सांगावें. ५२
'त्वां प्रभुनें यदुवंशीं वसुदेवाच्या गृहीं अवतरावें,
भर हरुनि यश करावें; विश्वें गावुनि कथा तव तरावें. ५३
वसुदेव तो चि कश्यप, जगदीशा! देवकी अदिति होय,
जी सुरभि रोहिणी ती, तत्पुत्रत्वीं असे सकळ सोय. ५४
पूर्वी कश्यपमुनिनें नेल्या यज्ञार्थ धेनु वरुणाच्या,
त्याच्या हरूनि[2] विधिनें[3] सुधिषयसंपत्ति जेंवि तरुणाच्या. ५५
यज्ञोत्तर[4] देतां त्यां[5] अदिति हि, सुरभि हि, म्हणे[6], 'नको[7], पावा,
'सांगा' म्हणे वरुण, 'हा नायिकता आर्य, कां न कोपावा?'[8] ५६
त्या 'होसिल गोप' असें, वरुणा होवुनि सहाय, शापावें;
घडलें हें सुत होउनि हृष्ट करीं तूं महायशा! पावें. ५७
ज्यां[9] अंशें धेनुहरण, तेणें तो गोप 'नंद' या नावें,
तैसी च ती यशोदा तद्भार्या अदिति, सत्य मानावें. ५८
वसुदेवगृहीं व्हावें, नंदगृहीं गोकुळांत वाढावें,
वसुधेच्या हृदयींचें त्वां कंसाद्यसुरशल्य[10] काढावें. ५९
मथुरासमीप सुश्री[11] गोवर्धन पुण्यनग असे, वन हा
बहुरम्य पोषितो, कीं ज्याचें म्हणवी सुरां असेवन[12] हा!' ६०
देवी गोपी, त्यांसीं करिसिल जगद्धितहेतुकेलीला[13],
म्हणतिल, 'समाधिसीं च' व्यासादिक शिष्ट, 'हे तुके लीला.'[14]"

---

१. खडीसाखर २ हिरोला. ३ दुर्दैवानें. ४. यज्ञ आटपल्यावर ५. कश्यपाला ६ 'अदिति' व 'सुरभि' या प्रत्येकाचें क्रियापद. ७ देऊ नका. ८ वरुण [ब्रह्मदेवास] म्हणे, "आर्य (कश्यप) नायकितां (धेनु परत देण्याची गोष्ट ऐकेना तेव्हां) हा (मी वरुण) का न कोपावा, सांगा" ९ ज्या कश्यपाशानें. [कश्यपानें दोन अंशानें नंद व वसुदेव असे दोन अवतार धारण केले]. १० कंस आदिकरून असुररूपी कांटा. ११. अति सुंदर. १२ [कंसभयामुळें] १३ जगाच्या कल्याणाला कारणीभूत अशा क्रीडेला. १४ तोलाची होई, बरोबरी पावे.

ऐसें विनवुनि, आज्ञा घेवुनि, सामर विधि स्वयें गेला;
श्रीशें मेरुगुहेंत श्रीमूर्तिन्यास[1] मग सुखें केला. ६२
गुह्या, इतरागम्या, मेरुगुहा, 'पार्वती' तिचें नाम,
जींत श्रीश्रीकांत स्थापी तें गुप्त आपुलें धाम. ६३
'अवतरले देवांश, प्रभुनें ही घेतलें मनावरतें,'
देवर्षि म्हणे, 'भिववूं, दैत्याचें कटक जें अनावर, तें.' ६४
मथुरोपवनीं आला, चित्तीं कार्यार्थ सर्व आठविला,
कंसा 'भेटाय ये,' ऐसा मुनिनें निरोप पाठविला. ६५
जाय उपवनीं कंस, स्वर्णासन, पाय नमुनि, दे हातें;
मणिकनकांहीं पूजी; त्या समुचित काय न मुनिदेहातें? ६६
नारद म्हणे, "जयास्तव[3] उचित नव्हे जीव संसरायातें,
म्यां तीर्थांचें सेवन करिजेतें नित्य कंसराया! तें. ६७
मेरुवरि निरखिली, जी कविनीं श्रुति तेंवि सुरसभा गावी,
जींत न बुद्धि युगायुत पीतां गांधर्वसुरस[4] भागावी. ६८
तेथुनि धावुनि आलों हित सांगायासि, तें परिस; मजला,
विष्णुप्रमुखसुरांचा मंत्र परम गुह्य तो, परि समजला. ६९
स्मर, मारिलासि हरिनें पहिला[6] तूं काळनेमि, कंसा! तें;
सांप्रत हि तुज वधाया वदले सुर सुरशिरोवतंसातें. ७०
जी काय 'देवकी' या अभिधानें तव लघु स्वसा आहे,
तीच्या पोटासि तुझा काळ श्रीपाळ यावया पाहे. ७१
देवादिकांसि दिधले त्वां जे, ते आठवूनि कष्ट महा,
प्रभु पुत्र देवकीचा होणार त्वद्वधार्थ अष्टम हा. ७२

---

१ स्वरूपत्याग २. तेज. ३ ज्या [तीर्थाटना-]मुळें जीव संसारांत (जन्म-मरणरूप भवचक्रांत) गोते खाण्यास उचित होत नाहीं (ज्यामुळें जीव संसार-मुक्त होतो). ४. गंधर्वांचें गायन ५. वेत. ६. पूर्वजन्मींचा. ७. देवश्रेष्ठ विष्णूला.

शकसिल तरि यत्न करीं; पण होणारासि कोण परिहरितो?
वधिलासि पूर्वजन्मीं; होय[1] तुज श्लाघ्य मृत्यु परि हरि तो. ७३
प्रीति बहु तुझा ठायीं, यास्तव आलों स्वयें चि सांगाया;
बा! करवेल उपेक्षा कळतां होणार हानि कां गा! या?[2]" ७४
मुनि जातां बहु हांसे कंस, म्हणे, "पटु न विप्र हा कांहीं,
भिवंवितसे मज; भीतो हस्तीच्या सिंह काय हाकाहीं? ७५
दाखवितो अरिहरिच्या[3] मज कीं हो! कलहकेलि विप्र[4] भया!
हा कंस काय कांतर? पाहुनि होतील देव विप्रभ[5] या. ७६
केशी, प्रलंब, धेनुक, कालिय इत्यादि जे, मदाज्ञा ते
जाणुनि सर्वत्र कदन करुत, हरुत देवतामदा ज्ञाते. ७७
सांगा 'तृप्तिस, अर्भकगर्भकवळ[7] गिळुनि पूतने! लाहें,
मारीचरित[8] प्रकटीं, विलयासि अपूत[9] पूत नेला, हें.' ७८
गर्भांपासुनि कथिलें मुनिनें मज भय, म्हणोनि गर्भांतें
नाहीं च करा, जैसा जुरवी दावाग्नि शुष्क दर्भांतें." ७९
बाहेरि धैर्य, परि भयचिंताभारें, करूनि 'आ,' वांके;
कंसप्रियकर[10] करिती बहुजीवक्षय, धरूनि[11] आंवांके. ८०

---

१. तो हरि तुज मृत्यु ( काळ ) परि श्लाघ्य होय २ मला नारदाला. ३. शत्रू जो विष्णु त्याच्या किंवा [उपहास्यतेनें] शत्रूरूपी माकडाच्या. ४. कलह ही च क्रीडा ज्याची असा ब्राह्मण (नारद). ५ भित्रा. ६ निस्तेज. ७. लहान मुलांच्या गर्भांचे घांस. ८. महामारीचें [उग्र] कर्तृत्व ९. पवित्र अपवित्र, भलाबुरा. १०. कंसाचें प्रिय करणारे ११. अवसान ( सामर्थ्य ) आपल्या अंगीं आहे असें समजून.

# अध्याय बारावा.

कंस म्हणे सचिवांतें, 'अभिगुप्ता[1] देवकी सदा राहो,
अंतःपुर वसुदेवा कारागृह न कळतां[2] सदारा[3] हो. १
सर्व प्रथमापासुनि मारावे गर्भ, आठवा[4] काय?
स्त्रीचा किति? या कार्यी विसरुनि, निज ही न आठवा काय.[5] २
टपत रहा; व्हाल[6] तुम्हीं न, करुनि जप तुच्छ, कां समस्त बक?
भिरवाल मौक्तिकांचे जातीच्या गुच्छकांसम स्तबक.'[7] ३
बहु यत्न देवकीच्या गर्भविनाशार्थ मांडिला कंसें,
तें जाणिलें सकळ कविमानसमानसकृतालयें[8] हंसें. ४
अंतर्हित[9] विष्णु म्हणे, 'मारावे गर्भ न, पर[10] मारिल; यां[11]
केंचा विचार? हा म्यां घ्यावा आतां चि न परमारि[12] लया. ५

१ चहूंकडे सुरक्षित ठेविलेली अशी; सक्त कैदेंत. २ त्याच्या लक्ष्यांत न येईल अशा प्रकारें ३ बायकोसह ('वसुदेवा'चें विशेषण) ४. फक्त आठव्या-चा च कां? तर पहिल्यापासून च सर्वांचा नाश करावा, असा भाव ५ या कामाकडे दुर्लक्ष्य करून आपल्या देहाची सुद्धां आठवण ठेवूं नका, मग स्त्रीचा (देवकीचा) [काय] किति? म्ह० देवकीच्या देहाची पर्वा कशाला? स्वतःच्या प्राणाकडे सुद्धा तुम्ही पाहूं नका—देवकीचें काय होईल याची तर मुळीं च काळजी करूं नका ६. जप तुच्छ करूनि तुम्हीं समस्त बक का न व्हाल? (माझ्याकरिता तुम्हीं बकवृत्ति धारण करून योग्याच्या ध्यानास सुद्धां मागें टाकाल, अशी मला खात्री आहे, योगी सुद्धां ध्यानास जपणार नाहीं इतक्या काळजीनें तुम्हीं माझ्या कार्याचें ध्यान राखाल) ७ जातीच्या (जाईच्या) गुच्छांप्रमाणें [सुंदर] मोत्याच्या गुच्छास [आपल्या देहावर घालून] मिरवाल, तुम्हाला या कार्यप्रीत्यर्थ मोत्यांचे सुंदर हार बक्षिस मिळतील. ८ सुज्ञजनाचें मानस हें च कोणी मानस (—सरोवर) [त्या ठिकाणीं] केला आहे वास ज्या हंसानें म्ह० विष्णूनें ९ गुप्त झालेला. १०. परंतु. ११. ह्यां कशाला. १२. मोठा शत्रु.

हा सप्त वधिल, तेव्हां व्हावें त्यां गर्भ आठवा; याला
कोण उपाय?' असें जों लागे सर्वज्ञ आठवायाला, ६
तों पाताळीं गेलें प्रभुमन, तेथें उपाय आढळला;
न कधीं हि आ[1]धिवातें अत्यद्भुत सत्वमेरु हा ढळला. ७
या काळनेमिचे सुत, ते सा[2] 'षड्गर्भ' हें तयां नाम;
पितृता[3]तासि न भजले जरि पुरवाया समर्थ तो काम. ८
दुष्कर तप करुनि सुचिर, आराधन आत्म[4]योनिचें करिती;
होय प्रसन्न धाता, षड्गर्भ नमूनि वर असा वरिती:- ९
'सुर, सर्प, यक्ष, राक्षस, दानव, मानव, महर्षि, अवधूत,
गंधर्व, सिद्ध, चारण, हे देवा! आपणासि न वधूत.' १०
त्या षड्गर्भांतें तो विधि देवुनि इच्छिलया वरा गेला;
मा[5]नी आजा कोपे, सुसु[6]तीं ही काय हा न रागेला? ११
कनककशिपु हें वदला, 'खळ हो! घडलें तुम्हांसि अ[7]त्याग;
मत्स्नेह तुम्हीं त्यजिला; मीं कां तुमचा करीन न त्याग? १२
विधिनें अवध्यतावर दिधला, तुमच्या मनांत हा गर्व,
घ्या शापदान, तातापासुनि पावाल मृत्युला सर्व. १३
हा काळनेमि होवुनि भोजकुळीं भूप कंस मारील,
वारील प्रभुशापा, कोण असा जो तुम्हांसि तारील?' १४
ऐसा कनककशिपुनें पूर्वीं कोपें दिला जयां शाप,
बाप ब्रह्म[8]याचा तें स्मरला, त्यां भोगवावया पाप. १५
प्रभु पाताळीं गेला, जळगर्भगृहांत राहिले होते,
षड्गर्भनाम दानव, देवोपम सर्व पाहिले हो! ते. १६
त्या सुतांत शिरोनि, प्रभु तत्प्राणेश्वरांसि आकर्षी,
ज्याचें गातो बा! तो अत्यद्भुत सच्चरित्र नाकर्षी. १७

---

१ मनोव्यधारूप वायूनें. २ सहा ३ बापाच्या बापास (हिरण्यकशिपूस). ४. ब्रह्मदेवाचें ५ अभिमानी ६ चांगल्या पुत्रावर (प्रल्हादावर). ७. अत्यंत मोठा अपराध. ८. नारद.

त्यातें प्रभु निद्रेच्या हस्तीं देवुनि म्हणे, " न हालावें,
माये ! देवक्युदरीं त्वां हे सा वेळ जीव घालावे. १८
मारील कंस ज्यातें, तो या देहांत जीव शिरवावा;
सप्तम अनंत नेवुनि रोहिण्युदरीं, प्रभाव मिरवावा. १९
त्यावरि देवक्युदरीं होइन मीं गर्भ अष्टम; 'नमो' हें
म्हणतिल सर्व; कवींचें अणु हि न पावेल कष्ट मन मोहें. २०
नंदप्रिया यशोदा देवी जी, तूं हि हो तिची दुहिता,
त्वद्भक्त भद्र पावो, भजुनि जसें दुग्ध सुरभिचा दुहिता. २१
जनु अष्टमींत माझें; तव जनु जेव्हां, असो तदा नवमी;
प्रकट निशीथीं होइन, देइन सुजनासि सुख सदा नव मीं. २२
मज्जन्म प्रथम असो, मग जन्म तुझें क्षणें असो, माये !
तापहरत्व तव यशीं नित्य वसो, जें कधीं न सोमा ये. २३
गर्भव्यत्यास करूं, कौतुक कांहीं नवें चि योजावें;
नंदप्रियेकडे म्यां, मोहाया दुष्ट कंस तो, जावें. २४
तूं देवकीकडे जा, माये! मोहावयासि कंसातें,
जिंकील काय खोटा बळकट मोटा हि काक हंसातें? २५
उचलिल कंस शिळेवरि तुजला, मारावयासि आपटुन,
सुटुन नभीं शिरसिल तूं, तव कोट्यंश हि पाप हा पटु न. २६
मद्वर्णसदृशवर्णा हो रामाननसमानना, माये !
स्मरत्याच्या कामा, तूं होउनि सुरतरुसमाननामा, ये. २७
कौमारव्रत धरिसिल, तुजवरि अभिषेक करिल मघवा, गे!
दैन्य नुरेल तुजपुढें, जैसें गंगेपुढें न अघ वागे. २८
'भगिनी' म्हणेल, देइल तुज सुरपति विंध्यपर्वतीं स्थान,
ध्यान त्वच्चरणांचें धरुनि, बहुत पावतिल समाधान. २९

---

१. शेष. २ दूध काढणारा ३. जन्म ४ मध्यरात्रीं ५ अलटापालट ६. माझ्या रंगाची ( निळ्या वर्णाची ). ७ राममुखासारख्या मुखाची ८. कल्पतरूच्या नांवलौकिकाची.

दानव शुंभनिशुंभ त्वच्छलें पावतील सुगतीस,
त्वत्कीर्ति म्हणेल अमरवल्लिस, 'गर्वे कशास फुगतीस?' ३०
उपयांचना[१] तुझी जी होइल सर्वां जनांसि सुरभी ती.
भीतील तुझ्या हि सकळ, माझ्या आज्ञेसि जेंवि सुर भीती. ३१
सिद्धि, श्री, धृति, कीर्ति, ही, विद्या, सन्नति, प्रभा, संध्या,
ऐसीं नामें जपतिल जे, त्यांची प्रार्थना नसो वंध्या. ३२
स्तवितिल तुज जे भावें, त्यांला सर्वस्व भक्ति अर्पीन,
दर्पी[२] नम्र नव्हे जो, त्यास चि अमृतें कधीं न तर्पीन. ३३
होईन कंसाचा मीं वरद करद गोपे[३], कोप काढाया
पाहेन समय, निद्रे! तेज हरिन, करिन चूर्ण गाढा[४] या." ३४
ऐसें स्वयोगनिद्रादेवीसीं देवदेव तो बोले,
मग होय गुप्त; ती ही, जी देती प्रभुपराङ्मुखा झोले[५]. ३५
त्यावरि समयविशेषीं गर्भ धरी देवकी सती सात;
कंस उपजतां चि करी षड्गर्भांचा शिळातळीं घात. ३६
मग गर्भ देवकीचा रोहिण्युदरांत सातवा घाली,
करि नवल योगमाया, कंसाद्यखिळांसि मोहिती झाली. ३७
निजगर्भपतन कळलें, निद्रेनें तों चि घातली भूल;
मग उठुनि अर्धरात्रीं, पाहे ती देवकी न तें मूल. ३८
स्वप्न क्षणभरि वाटे, परि सर्व प्रसवचिन्ह देहांत;
साश्रु मुहूर्त व्यथिता होय, न उदरांत गर्भ, गेहांत[६]. ३९
तत्काळ रोहिणीच्या केलें तेज प्रविष्ट उदरीं तें,
व्हाया प्रसाद ज्याचा, मुनि भजति हिमालयादिसुदरींतें. ४०
त्या रोहिणीस माया अघटितघटनापटुत्व[७] आयकवी;
नायक विश्वाचा स्तवि जिस, वर्णिल तच्चरित्र काय कवी? ४१

---

१ प्रार्थना २ गर्विष्ठ ३ वर देणारा मी कर देणारा गवळी होईन. ४ खोल मनाच्या प्रकृतीच्या ५ गोते खाण्यास लाविते ६. न गेहांत (घरांत) ७ न घडलेलें घडवून आणण्याचें सामर्थ्य.

त्या सप्तमगर्भांच्या अनुदिन शोधांत कंस जों आहे,
तों अष्टमगर्भातें त्या च गडदर्डांत देवकी वाहे. ४२
कंस म्हणे, 'रक्षा या तरि, होवुनि सर्व दास चि, वसा रे!'
त्या अष्टमगर्भातें बहु जपती सर्वदा सचिव सारे. ४३
यत्प्रियमखांत दीक्षित कलिता[1]जिनशृंगदर्भ वासवसे,
निजभक्तजनहितार्थ स्वीकारुनि तो हि गर्भवास वसे. ४४
जेव्हां गर्भ धरी परा[2]विद्येची देवकी प्रिया आली,
तेव्हां चि यशोदेच्या पोटीं ती अद्भुत[3]क्रिया आली. ४५
देवककन्या प्रभुतें, दीप करायासि अच्छवि[4], प्रसवे;
ज्याच्या पदपद्माची लाविति चित्तासि अच्छ विप्र स[5]र्वे. ४६
रात्रि जयंती[6], अभिजि[7]न्नक्षत्र हि, अर्धरात्रसमयांत
विजयमुहूर्तें, प्रकटे प्रभु; सद्गुण[8] सर्व या चि सम यांत. ४७
जन्म जयांत प्रभुचें, तो भाद्रपदा[9]ख्य आठवा मास,
हर्षउनि म्हणे, 'मुनि हो! घ्या बहु, गेलें न आठवा मास[10].' ४८
करपद्में कुसुमांच्या वर्षे, स्तवनें मुखें हि, साजविलीं;
बहु शक्रादिसुरांहीं तेव्हां वाद्यें स्वयें च वाजविलीं. ४९
गंधर्व करिति गानें प्रभुसेवा, अप्सरा हि नृत्यानें,
भृत्यानें पूजावा स्वामी स्वस्वा[11]धिकारकृत्यानें. ५०

---

१. धारण केलेलीं आहेत मृगचर्म, शिंग व दर्भ ज्यानीं असे. २ ब्रह्मविद्या-**पंत.** ३ योगनिद्रा. ४ तेजोहीन ५. सवय ६. श्रावण वद्य अष्टमीस मध्यरात्रीं रोहिणी नक्षत्राच्या उदयकाळास 'जयंती' म्हणतात ७ हा आठवा मुहूर्त, मध्यान्हाच्या पूर्वी २४ मिनिटे व नंतर २४ मिनिटें इतका अवधि 'अभिजित्' हें नक्षत्राचें नाव आहे ८. सर्व सद्गुण याचिसम (याच्यासारखे) यांत [च]=या प्रभूसारखा सर्वगुणसंपन्न दुसरा कोणी नाहीं त्याच्यासारखा तो च गुणवान्. ९ उत्तरहिंदुस्थानांतले महिने कृष्णपक्षादि असल्यामुळें त्या गणण्यानें कृष्णाष्टमी भाद्रपदांत येते. १० मांस. ११ आपापल्या अधिकारपरत्वें आलेल्या कर्तव्यानें

बहु हर्ष, सज्जनांचे बहुबहु फुगवूनि काय, कोंदे हा;
कवि म्हणति, 'जसें आतां, सुख जीवांच्या न आयकों देहा.'[1]
आनंद न खळहृदया,[2] कीं तो घन, पात्र पालथें वा! तें,
दूषी सुख, दोषातें वमुनि, सुरस जेंवि पाल थेंबातें.[3] ५२
वसुदेव असें पाहे, अत्यद्भुत तेज कोंदलें धामीं;
झाला पुत्र चतुर्भुज, भगवान् श्रीवत्सलक्षण स्वामी. ५३
त्या दिव्यलक्षणातें अवलोकुनि नित्यनवसुधामातें,[4]
तो आपणा हि विसरे केवळ वसुदेव न वसुधामातें.[5] ५४
स्तवुनि म्हणे, 'सुखधामा! अद्भुतधामा! नवांबुदश्यामा!
आच्छादीं या रूपा, साहेना कंस कीं तुझ्या नामा. ५५
वा मानाथा! भीतों कंसा अत्यंतनिर्दया वामा;[6]
यामागें सा वधिले ज्येष्ठ तुझे; शत्रु हा, नव्हे मामा.' ५६
देव म्हणे, 'तात! तूं जरि या भीतोसि फार कंसातें,
ने नंदगृहीं; न्यावें कूपांतुनि मानसीं च हंसातें. ५७
जा शीघ्र, यशोदेच्या शयनीं ठेवुनि मला, तिची धन्या
कन्या घेवुनि ये, जें तेज तिचें, सह्य तें नव्हे अन्या.' ५८
प्रभु वसुदेवासि असें, करुनि बहु व्रजजनीं दया,[7] सिकवी;
आच्छादी निजरूप, ध्याती, गाती सदा जयासि कवी. ५९
निजमित्रनंदसदनीं स्थापाया गुप्त सर्ववसुदेव,[8]
गेला शंकित धांवत तो मार्गी होत खर्व वसुदेव.[9] ६०
पावे हा तों प्रकटी निद्रादेवी व्रजीं प्रसव-लीला,[10]

१ मागें ऐकिले नाहीं व पुढें इतःपर कधीं हि ऐकणार नाहीं, म्हणजे श्लोकांत प्राप्त होणारें सुख सर्वोत्कृष्ट होय २ खलहृदय ३ पालीनें विषबिंदुनें जसें दूषावें–**पंत.** ४. नित्य नवीन सुंदर तेज [ धारण करणाऱ्या ] त्याला ५ द्रव्य आणि गृह ह्यांतें ६. वाम (वाकड्या) मार्गानें जाणाऱ्या ७ व्रजवासी जनांत प्रकट होऊन परमेश्वरानें त्याजवर कृपा केली. ८ सर्व संपत्तीचा स्वामी (कृष्ण) ९ वामन–**पंत.** खर्व होत=लपत लपत. १० जन्म.

अन्याची काय कथा? न कळों दे सुत सुता प्रसवलीला.[1] ६१
अतिदुर्लभ सर्वस्वें,[2] न समजों देतां, अदभ्रभागेला[3]
देवुनि आपण चि, तिची घेवुनि तनया सदभ्रभा[4] गेला. ६२
आणुनि निजजायेच्या शयनीं ठेवी असी[5] महातनया,
आपण चि 'सुता झाली' हें सांगे त्या असीमहातनया.[6] ६३
आला घालूनि उडी खळ तो कार्तस्वरासनावरुनीं.[7]
त्यातें भगिनी विनवी बहु, शोकार्तस्वरास नावरुनीं. ६४
ती भगिनी त्यासि म्हणे, "न वधीं, कंसा! रहा, यशा, पावें;
धर्मे तुज न[8] म्हणाया करितां संसार 'हाय!' शापावें. ६५
बा! हे कन्या मज दे, वधिले त्वां, त्यजुनियां दया, सुत सा;
कुळजाच्या हृदया पळ कोप असावा नृपा! पया उतसा." ६६
धिक्कारी खळ, त्याचा वांच्छी तळतळुनि देवकी नाश,
अत्युग्र निर्दयहृदय कंस चि, ऐसा न देव कीनाश.[9] ६७
[10]जीणें अमृत, म्हणाया बहु अपरा 'धा,' विनाशिले वरिती,
त्या दुष्टें आपटिली बा! अपराधाविना शिलेवरि ती. ६८
आपटितां चि उसळली, जैसी विद्युल्लता महामाया;
झाली दिव्याकृति, तें नभ बहु[11] टांचें जिच्या महा माया. ६९
गंधर्वराज गाती, नृत्य प्रेमें वराप्सरा करिती,
सुर मुनि जीतें स्तविती, बोले चिच्छक्ति हसुनि यापरि ती. ७०

---

१ प्रसवलीला (बाळंतिणीला) मुलगा [अगर] मुलगी [झाली हें] कळों न दे २. मूर्तिमत ऐश्वर्य च असा कृष्ण ३ महाभागेला–**पंत.** ४. घन-श्यामा–**पंत.** ५. या प्रकाराची–**पंत.** ६ निःसीम त्यक्तन्यायातें–**पंत.** ७ सुवर्णासनावरून ८ संसार करितां 'हाय' म्हणाया न शापावें–अन्वय ९. यम १०. ज्या भगवतीनें रणीं विनाशिले बहु अमृत अपरा जना 'धा' म्हणाया वरितां–**पंत.** बहु अपरा (स्वपक्षीयास) धा (तृप्त व्हा) म्हणाया जीणें (ज्या योगमायेनें) विनाशिले (मारले) [दानवादि शत्रु] अमृत (मोक्ष) वरिती (लाभती). ११. जिच्या महा (तेजाला) माया (मावण्यास) बहु टांचें (संकुचित, लहान)

'कंसा! मला शिळेवरि, सहसा त्वां त्यजुनि धर्म, आपटिलें,
हें सुतव्याळीतें पापा! पुच्छीं पदें चि थापटिलें. ७१
दुष्टा! रुष्टा! मीं या विसरेन अघा कदापि देवी न,
तव अंतकाळ ये तों अपराध तुझा मनांत ठेवीन. ७२
तुज शत्रु तुझा पाडिल, जेंवि पतन पन्नगासि दे वीनें[2];
दृढतर तनु हि नखांनीं चिरुनि, तुझें उष्ण रक्त सेवीन.' ७३
ऐसें बोलुनि, हांसुनि, गेली चिच्छक्ति भगवती आर्या.
यादवकुळपूज्या ती आली, रक्षूनि केशवा, कार्या. ७४
होय अदृश्या देवी, पश्चात्तप्ता मती हि कंसाची;
जेंवि बकाची वंचुनि हानि कराया न शकुनि हंसाची. ७५
भगिनीतें नमुनि म्हणे, 'शोक मुलांचा करूं नको, पावें;
काळें निमित्त केलों, न च मदघ मनीं धरूं न कोपावें. ७६
म्हणति उपाय मरणहर आहे कथिला परें[3] स्वसे! नाहीं;
काळकृत न जाणुनि जडें[4] वदती मथिला पर स्वसेनाहीं.' ७७
'बा! सत्य वदसि, सर्व हि काळकृत चि,' देवकी असें बोले;
आधीं त्याचे पदरें, मग डोळे आपले पुसी ओले. ७८
होवुनि दीन स्वगृहा गेला, पावुनि भयास, खेदास;
हतदर्प सर्पसा तो. न रुचति कोणी तया सखे, दास. ७९
वसुदेव नंद भेटे, परि कळवी, जें दिला सुत, न यां तें,
ऐके व्रजीं प्रसवली निजजाया रोहिणी सुतनयातें[6]. ८०
कंसाला वार्षिक कर सख्रीसुत नंद जाय अर्पाया,
'शीघ्र व्रजासि जा,' हे शौरि[7] कथी, भिवुनि शत्रुसर्पा या. ८१
"करिसी निजा जसी हे तूं परिपाळूनि जनक सानंदा,
माजी प्रजा[8] करीं बा!, स्वपर म्हणो साधुजन कसा नंदा!" ८२
या तेंवि रौहिणेया, 'ताता!' म्हणतां म्हणोनि 'ओ,' घांस

१ निजलेल्या नागिणीला. २. गरुड ३ परतु. ४ मद बुद्धीचे, अज्ञानी ५. नंदाला. ६ बळरामाला. ७ वसुदेव. ८ संतति-मूल.

दोघांस स्वमुखींचा दे, समवृद्धिद[1] समुद्र ओघांस[2]. ८३
याचा जैसा धर्म, तूं त्याचा ही न काय गा! तात?
पूर्ण न, जसा सुधाकर कविवाचां[3], हीनकाय, गातात. ८४
संस्कार जातकर्मप्रभृति करावा, न अंतरावा, गा!
तूं रोहिणी यशोदा, सावध, न करूनि अंतरा[4], वागा. ८५
पुत्रमुख पहावें हें चित्तांत असे, नसे परि कपाळीं;
सुतसुख घे, दे मजला घनसम[5] सुवदान्य तूं वरिक[6] पाळीं. ८६
वृंदावनीं उपद्रव दिसती, यास्तव करूं नको घोषं[7],
तेथें केशी आहे, तो सर्वानिष्ट मूर्तिमान् दोष. ८७
वृष, वत्स, सर्प, पक्षी, कंटक, हें सर्वदा सख्या! लक्षीं;
रक्षीं शिशु; यत्न असो बहु निधिसंरक्षणीं जसा यक्षीं[8]. ८८
झालें कार्य, कर दिला, ऊठ सख्या! त्यजुनि सेविल्या तल्पा[9];
जा स्वव्रजासि सस्त्रीसुत, नंदा! रात्रि राहिली स्वल्पा." ८९
हें ऐकुनि वसुदेवा भिजवी निघतां स्वनेत्रतोयानीं
शिबिकेंत स्त्रीपुत्र स्थापुनि, बैसे स्वयें हि तो यानीं. ९०
देहीं प्राण शिराया, शिरला त्या स्वव्रजीं असा नंद;
ज्याचा प्रवेश होतां, तेथें कोणीं नसे असानंद[10]. ९१

---

१ समान वाढ करणारा. २ [ समुद्रास मिळणाऱ्या लहानमोठ्या ] नद्यांस. ३. परपोषणें क्षीण होतां यश चि होतें—**पंत.** कविवाचा जसा हीनकाय ( क्षीण शरीराचा ) सुधाकर ( चंद्र ) गातात [तसा] पूर्ण (सुधाकर) न (वर्णीत नाहींत ) देव चंद्राच्या अमृतमय कला खाऊन अमर होतात आणि या परोपकारानें क्षीण झालेला चंद्र कविस्तुतीस पात्र होतो ४. [ दोघास वागविण्यात ] भेद न करितां. ५. मेघ एका रूपानें पाण्याचा स्वीकार करून रूपांतरानें तें च दसपट परत करितात, त्याप्रमाणें ६ वरिक ७ गोवळवाडा—निर्णय० ८ यक्ष=धनपति कुबेराच्या खजिन्याचा सरक्षक ९. शयनाला, आसनाला. १० असतुष्ट.

# अध्याय तेरावा.

नंद महाभाग, जसा चातक[1] चंद्रा तसा, जया सेवी,
'संकर्षण' ऐसें हें त्या नाम ज्येष्ठ नंदना ठेवी. १
मग नाम 'कृष्ण' ऐसें, बहु आशी देत, दे कनिष्ठातें;
जें अक्षय लक्षयशःसुखराशी दे तदेकनिष्ठातें. २
कोणा एका समयीं शकटतळीं[2] सुप्त कृष्ण सोडून,
यमुनेसि जाय गोपी[3], स्नानें घ्यायासि पुण्य जोडून. ३
प्रभु जागा होय, स्तन, मंजुळ रोदन करूनियां, मागे,
त्या शकटातें बाळकलीलाचलदंघ्रिपद्म तो लागे[4]. ४
शकट उडोनि क्षितिवरि पडलें तत्काळ पालथें बा! तें;
श्रुति म्हणति, 'या जलधिच्या कोटि हि कवि काय गाळ थेंबातें[5]?'
येउनि, पाहुनि शकट न्युब्ज[6], म्हणे माय, 'हाय! हाय! कसा,
शिशु वांचविला देवा!? वधिता मज विरह सविषसायकसा.
गायी आणुनि, जाणुनि, वदला शतवार तो हि 'हा!' नंद,
स्तनपानसक्त पुत्र प्रेक्षुनि पावे अपार आनंद. ७
नंदादि गोप म्हणती, 'नवल उलथला उगा चि गाडा, यां[7],
आला वात न, झाला मत्तवृषभकलह ही न, पाडाया. ८
गोपशिशु म्हणति, 'पलिसा, ललता हलिनें चि झालिला पाय;
गाला उलोनि पलला, सलव खलें, नवल कलितसा काय?' ९
सांचें शिशुकथित म्हणुनि न गमे त्या बल्लवांसि, परि सांचें;

---

१ 'चकोर' म्हणण्याबद्दल 'चातक' म्हटलें आहे. २. गाड्याखालीं ३ यशोदा ४. बालकानें साहजिक हालविलेला तो पाय त्या गाड्याला लागला. ५. कोटि हि कवि या जलधिच्या (दयासागराच्या) थेंबातें गाळ काय? ६. पालथा. ७ 'पाडाया' याचें कर्म. ८ या आर्येंत 'र' व 'ड' अक्षरांबद्दल बोबडे बोलाचें 'ल' अक्षर आहे ९ सांचें परि शिशुकथित म्हणुनि बल्लवांसि सांचें न गमे—**पंत.**

जैंवि[1] विरक्तें देतां, परिसपण मृषा जडासि परिसाचें १०
कुमति बकाची अनुजा, कंसाची ठाकुकी जगा धात्री;
जी पक्षिणी[2] महोग्रा,[3] ती ये घोषांत पूतना रात्री. ११
स्पष्ट महामारीची प्राणिप्राणापहारिणी आली,
जन सर्व सुप्त पाहुनि, विभुपार्श्वीं वेषधारिणी[4] आली. १२
घात करुनि बाळांचा, बहु देणारी प्रजेसि तापा जी,
पापा जीवघ्नी[5] ती मातासी ईश्वरासि या पाजी. १३
लावी ओढ[6] बहु, जसा विषया जीव, स्तना न तो सोडी;
गोडी मोठी दावी, थानें दोन्हीं हि सेवटीं तोडी. १४
प्रमुदित व्हाया संतीं अंतीं दुष्टा म्हणोनि 'हा!' रडली;
पडतां मोठ्यानें ती, जेंवि घनघटा,[7] तसी च आरडली. १५
घोषीं सर्वांचा ही सुखनिद्राभंग ती करी, राया!
नंदादि गोप भीती, पाहुनि उग्रा इच्या शरीरा या. १६
आश्चर्य करिति गोपी, 'मेली पडली असी कसि अगायी!
भीतिल मुलें पहातां, पाहोत महोग्र हें शव न गायी.' १७
जन म्हणति, 'काय फळ तुज ऐशा जीवा! अरे पशो! देहें?'
नंद म्हणे, 'कळलें, तरी सांग मला काय गे यशोदे! हें?' १८
'जाल्यें आतां जागी कृष्णासह आयकोनि हाकेला;
इतुकें जाणें, विघ्न[8] त्रिजगत्पतिनें चि दूर हा केला.' १९
चित्तीं कृष्णाकरितां कंसापासूनि नंद तो भ्याला;
कीं याला प्राणाधिक पुत्र सदा, वित्त जेंवि लोभ्याला. २०
संकर्षणकृष्ण प्रभु लागति अतिरम्यवदन रांगाया,

---

१ बिरक्तें [ परिस ] देतां, जैंवि [ त्या ] परिसाचें परिसपण जडासि ( मूर्खाला ) मृषा ( खोटें ) [ गमे ]. २. दाई ३. भयकर गिधाडीण ४ [ सुंदर स्त्री– ] वेष धारण करणारी ५. जीवांस मारणारी. ६ ओढा–ममता. ७. मेघसमूह. ८. विघ्न. संस्कृतांत 'विघ्न' पुल्लिंगी शब्द आहे

करिति अरितिमिररवि ते यश सद्गुणवृंदपद[1] नरां गाया. २१
हांसति, बहु हांसविती, परम मधुर वदति बोबडे बोल,
वाजविति पर्णवाद्य[2] श्रुतिसुख, जन करिति सर्व ही लोलें[3]. २२
पंकिलें[4] सर्वांग, म्हणुनि ठकवूनि बळें धरूनि आणावे,
न्हाणावे, तों पंकें भरले पहिल्यापरीस जाणावे. २३
संकटभय दाखवितां म्हणती, 'दाखीव वागुलाला,' तें
गोरज[5] चि इष्ट, न बुका; मग वळतिल काय बा! गुळालातें?
नावरति रोहिणीला, ते नंदाला हि तनय नावरती;
अतिवत्सळा यशोदा येवूं[6] दे पक्ष्म न नयनावरती. २५
कोपुनि म्हणे यशोदा, "किति हुडकावास? किति धरावास?
न पुरे निजगृह, अंगण, गोष्ठ[7], बहु रुचे तुला परावास[8]. २६
अतिचपळा रामासीं मिळतां तूं केंवि आवरावास?
जो वायुसीं मिळाला, तो कोण म्हणेल, 'आवरा वास'? २७
कृष्णा! तूं बहुपूर्व[9] नावरसि अनावरा! सदा मानें,
मीं उखळासीं करित्यें बद्ध तुज अनावरास दामानें[10]." २८
ऐसें म्हणुनि यशोदा उखळीं दामें स्वभाग्य बांधी तें;
बा! त्या हितैषिणीच्या[11] बंधन अवघड गमेल कां धीतें? २९
प्रभुवर ही घे धात्रीहस्तें प्रेमेंकरूनि बांधून;
तद्यश ऐकुनि, गाबुनि, 'मज' जीवा अघ म्हणेल कां 'धू' न?
बांधोनि, 'शक्त अससिल, तरि आतां जा,' असें यशोदा त्या
बोलुनि, मग गृहकृत्या जाय, दटावूनियां यशोदात्या. ३१

---

१. सद्गुणसमुच्चयाचें निवासस्थान. २. पिपाणी. ३. लोलुप. ४. चिखलानें—शेणानें भरलेलें. ५. गाईचें शेण. ६. डोळ्याचें पातें हि न लवूं देतां त्या बालकांवर एकसारखी नजर ठेवित होती. ७ गोठा. ८. दुसऱ्याचें घर. ९. 'बहु' आहे पूर्वी ज्याच्या अशा 'मानें' म्ह० बहुमानें. १०. दाव्यानें. ११. कल्याण इच्छिणारीच्या.

तीं गोपी जगदीशा कृष्णा नेणे चि, जैंवि अंध नगा[1];
गंध[2] नगा देवांच्या ज्याचा करि त्या तशास बंधन गा! ३२
बद्ध हि देव उखळ ने ओढुनि, यमळार्जुनांत[3] अडकवि तें,
पाडी पळांत तरु ते, यद्यश पुरुषार्थ सर्व तडक वितें. ३३
सुविशाळ द्रुम पडले, उखळासीं बद्ध कृष्ण तो यांत
अक्षत निर्भय[4] खेळे, जैंवि मकरपोत[5] सिंधुतोयांत. ३४
पतितद्रुमांत उखळीं बद्ध व्रजपतिकुमार पाहून,
यमुनागत गोपी तें कथिति यशोदेसि शीघ्र वाहून. ३५
'पंडितमानिनि[6]! मूढे! पडल्यां यमळार्जुनांत सांपडला,
उखळासीं बांधावा काय तनय? मतिस मोह कां पडला?' ३६
'हाय!' म्हणत, माय निघे, जायँ पळत, पाय मृदुल जरि कायँ[7],
रडुनि, गळां पडुनि पळांमाजि सुताचा स्व आर्द्र करि काय. ३७
'नवसासि पावणारे ऐसे तरु पावले कसें पतन?'
नंदादि गोप म्हणती, 'झाला शिशु अंतकाननीं[8] जतन.' ३८
नंद म्हणे, 'गे जाये! बांधावा काय तनय दाव्यानें?
होता चि घडविला कीं कोपानें अनय, जैंवि दाव्यानें.[9]' ३९
दामें उदरीं बांधी गोपी जगदीश्वरा स्वतनयातें,
तेव्हांपासुनि राया! 'दामोदर' म्हणति सर्व जन यातें. ४०
वृद्ध म्हणति, 'मूढ खरे गोप, उपेक्षा करूं नये, करितों;
उत्पात तीन झाले, जावें अन्यत्र शीघ्र यावरि तों.' ४१

१ अलकाराला. २ ज्याच्या अपरिमित औदार्याचा केवळ अल्पस्वल्प अंश च देवांच्या नगा (कल्पवृक्षाला) [मिळालेला आहे] त्या तशास [ती] बंधन करी. ३ नारदशापानें वृक्ष झालेले कुबेरपुत्र ४ तावडतोब. ५ सुसरीचें पोर. ६. स्वतःस शहाणी समजणारे 'वेड्ये' ७ यशोदेचे पाय नाजुक असले म्हणून काय झालें? त्या प्रसगीं ती पळत च गेली ८. काळाच्या तोंडांतुन वांचला. ९ कोपानें अनय घडविला होता चि कीं=तुझ्या रागानें अनर्थ घडत होता, पण थोडक्यांत चुकलें.

संकर्षण, दामोदर, झाले तेथें चि सप्त वर्षांचे,
जे दुर्जनदुःखांचे, साधूंच्या मुख्य हेतु हर्षांचे. ४२
त्रिजगद्रक्षक दोघे प्रभु झाले वत्सरक्षक वनांत,
ज्यांचे न शकति सद्गुण आणाया सुकविलक्ष कवनांत. ४३
श्वेतश्यामलमूर्ति, श्रुतिनुत, पूरक सदा सदिच्छांचे,
माथां अवतंस[1] करिति ते प्रभु पल्लव मयूरपिच्छांचे. ४४
शुचिनीलपीतपटधर वनमाळी धरिति हार गुंजांचे,
धातुतिलकधर,[2] भोक्ते जे नित्य अमूल्यरत्नपुंजांचे. ४५
रज्जु उपवीत[3] करिती, धरिती प्रभु शिक्यकरकवेत्रांतें;[4]
दासी सिद्ध उपासिति नित्य हि ज्यां पद्मपत्रनेत्रांतें. ४६
होउनि गोपशिशुसखे प्रभु चारुनि काय वत्स भागावे?
खेळ करिति ताराया, 'जे' म्हणति शुकादिसत्सभा 'गावे.' ४७
वाजविति वेणु, शृंगें, तुंबीवाद्यें मनोहरस्वानें,[5]
माधुर्यें मोहावा बहु जन, तस्कर जसा परस्वानें.[6] ४८
ऐसी क्रीडा करितां श्रीकृष्ण निजाग्रजा म्हणे, 'आर्या!
हे भू न रुचे, रसिका जेंवि प्रक्षीणयौवना[7] भार्या. ४९
नाहींत लता, पादप, विपुल सलिल, गवत ही नसे उरलें;
झुरलें पक्षिश्वापदकुळ, या सौभाग्य भूमिचें पुरलें.[8] ५०
वृंदावनासि जावें, श्रीचें गोवर्धनाद्रि तो भवन;
यमुनेची अति शुचिता, उचिता क्रीडेसि तें सुशोभ वन. ५१
वृंदावनासि जाया सत्वर, येथुनि निघोनि, हा घोष,
येइल तुझ्या विचारा जरि, तरि उत्पन्न करिन मीं दोष.' ५२
ज्येष्ठानुमतें कृष्णें घोषीं पीडा करावया, शूर

---

१ तुरा २. गेरूच्या रंगाचा तिलक धारण करणारे. ३ जानव्याप्रमाणें धारण करिती ४. शिंकें, पाण्याचें भांडें ( मडकें ) व काठी यांना धारण करिती. करक= कमंडलु. ५ मंजुळ आवाज ज्यांचा अशीं. ६. परद्रव्यानें. ७ उतार वय झालेली स्त्री. ८. पुरें झालें—संपलें.

ती गोपी जगदीशा कृष्णा नेणे चि, जेंवि अंध नगा;
गंध नगा देवांच्या ज्याचा करि त्या तशास बंधन गां! ३२
बद्ध हि देव उखळ ने ओढुनि, यमळार्जुनांत अडकवि तें;
पाडी पळांत तरु ते, यद्यश पुरुषार्थ सर्व तर्डक चितें. ३३
सुविशाळ द्रुम पडले, उखळासीं बद्ध कृष्ण तो यांत
अक्षत निर्भय खेळे, जेंवि मकरपोत सिंधुतोयांत. ३४
पतितद्रुमांत उखळीं बद्ध व्रजपतिकुमार पाहून,
यमुनागत गोपी तें कथिति यशोदेसि शीघ्र वाहून. ३५
'पंडितमानिनि! मूढे! पडल्यां यमळार्जुनांत सांपडला,
उखळासीं बांधावा काय तनय? मतिस मोह कां पडला?' ३६
'हाय!' म्हणत, माय निघे, जायँ पळत, पाय मृदुल जरि कायँ,
रडुनि, गळां पडुनि पळांमाजि सुताचा स्व आर्द्र करि काय. ३७
'नवसासि पावणारे ऐसे तरु पावले कसें पतन?'
नंदादि गोप म्हणती, 'झाला शिशु अंतकाननीं जतन.' ३८
नंद म्हणे, 'गे जाये! बांधावा काय तनय दाव्यानें?
होता चि घडविला कीं कोपानें अनय, जेंवि दाव्यानें.' ३९
दामें उदरीं बांधी गोपी जगदीश्वरा स्वतनयातें,
तेव्हांपासुनि राया! 'दामोदर' म्हणति सर्व जन यातें. ४०
वृद्ध म्हणति, 'मूढ खरे गोप, उपेक्षा करूं नये, करितों;
उत्पात तीन झाले, जावें अन्यत्र शीघ्र यावरि तों.' ४१

---

१ अलकाराला. २ ज्याच्या अपरिमित औदार्याचा केवळ अल्पस्वल्प अंश च दे [illegible] (कल्पवृक्षाला) [मिळालेला आहे] त्या तशास [ती] बंधन करी. ३ नारदशापानें वृक्ष झालेले कुबेरपुत्र. ४ तावडतोब. ५. सुसरीचें पोर. ६ स्वतःस शहाणी समजणारे 'वेड्ये' ७ यशोदेचे पाय नाजुक असले म्हणून काय झालें? त्या प्रसंगीं ती पळत च गेली. ८ काळाच्या तोंडांतून वांचला. ९ कोपानें अनय घडविला होता चि कीं=तुझ्या रागानें अनर्थ घडत होता; पण थोडक्यांत चुकलें.

संकर्षण, दामोदर, झाले तेथें चि सप्त वर्षांचे,
जे दुर्जनदुःखांचे, साधूंच्या मुख्य हेतु हर्षांचे. ४२
त्रिजगद्रक्षक दोघे प्रभु झाले वत्सरक्षक वनांत,
ज्यांचे न शकति सद्गुण आणाया सुकविलक्ष कवनांत. ४३
श्वेतश्यामलमूर्ति, श्रुतिनुत, पूरक सदा सदिच्छांचे,
माथां अवतंस करिति ते प्रभु पल्लव मयूरपिच्छांचे. ४४
शुचिनीलपीतपटधर वनमाळी धरिति हार गुंजांचे,
धातुतिलकधर, भोक्ते जे नित्य अमूल्यरत्नपुंजांचे. ४५
रज्जु उपवीत करिती, धरिती प्रभु शिक्यकरकवेत्रांतें;
दासी सिद्ध उपासिति नित्य हि ज्यां पद्मपत्रनेत्रांतें. ४६
होउनि गोपशिशुसखे प्रभु चारुनि काय वत्स भागावे?
खेळ करिति ताराया, 'जे' म्हणति शुकादिसत्सभा 'गावे.' ४७
वाजविति वेणु, शृंगें, तुंबीवाद्यें मनोहरस्वानें,
माधुर्यें मोहावा बहु जन, तस्कर जसा परस्वानें. ४८
ऐसी क्रीडा करितां श्रीकृष्ण निजाग्रजा म्हणे, 'आर्या!
हे भू न रुचे, रसिका जेंवि प्रक्षीणयौवना भार्या. ४९
नाहींत लता, पादप, विपुल सलिल, गवत ही नसे उरलें;
झुरलें पक्षिश्वापदकुळ, या सौभाग्य भूमिचें पुरलें. ५०
वृंदावनासि जावें, श्रीचें गोवर्धनाद्रि तो भवन;
यमुनेची अति शुचिता, उचिता क्रीडेसि तें सुशोभ वन. ५१
वृंदावनासि जाया सत्वर, येथुनि निघोनि, हा घोष,
येइल तुझ्या विचारा जरि, तरि उत्पन्न करिन मीं दोष.' ५२
ज्येष्ठानुमतें कृष्णें घोषीं पीडा करावया, शूर

१. तुरा. २. गेरूच्या रंगाचा तिलक धारण करणारे. ३. जानव्याप्रमाणें धारण करिती. ४ शिंकें, पाण्याचें भांडें ( मडकें ) व काठी याना धारण करिती. करक= कमंडलु. ५ मंजुळ आवाज ज्यांचा अशीं. ६. परद्रव्यानें. ७. उतार वय झालेली स्त्री. ८. पुरें झालें—संपलें.

निजतनुरोमापासुनि केले उत्पन्न वृकें[1] बहु क्रूर. ५३
गोप म्हणति, 'या देशीं कोठें नावास लांडगे[*] होते;
आम्हां भ्यावे, जैसे दोष हरिजना, न दांडगे हो ! ते. ५४
हे काय वृक? व्याघ्र चि; वृक तों चोरूनि हरि लहानातें;
पडतां गांठि मृगासीं, हरिचें[2] तें स्पष्ट हरिल हा नातें. ५५
वधिल्या गायी; हरिले वत्स; उडविलीं मुलें; मनीं कांहीं
भय चि नसे; बुडवावा न वृकांच्या घोष कां अनीकांहीं?' ५६
तळमळले, शिशुपशुवध गोपाळांच्या मनांत कां न सले?
पूर्वस्थान त्यागुनि सर्व हि वृंदावनांत ते वसले. ५७
तो घोष अर्धविधुसा[3], मध्यें विस्तार एक योजन, हो !
आर्यंत तद्विगुण[4], म्हणे जो, 'जैन सुर, करुनि सुरस भोजन, हो.[5]'
वृंदावनांत घोषा जें सुख, शक्रा न नंदनवनीं तें;
कीं त्या पुष्टि पदरजें प्रभु दे, या[6] जेंवि नंद नवनीतें. ५९
वृंदावनांत परमोदार सकळतापहर जसा पहिला,
ये मेघश्याम[7] तसा काळ हि निववावया तया महिला. ६०
व्हावें चि धन्य अंजळिभरि अर्पुनि अंबु ज्या सदाश्रारा[8],
किति घनभाग्य वदों? जो वर्षे बहु तच्छिरीं सदा धारा. ६१
उद्धार करिति, पुष्पें सेवुनि, ते देव वनकदंबांचे,
जे वत्सळवर सुगतिप्रद भक्तिज्ञानधनकदंबांचे[9]. ६२
ज्यांचें ध्यान ठसाया, सेवन बहुजन्म करिति उटजांचें;
ते पुष्पें धरिति शिरीं, वर्णावें भाग्य काय कुटज्यांचें ! ६३
राम म्हणे प्रभुसि, 'पहा ! मेघातें स्वतनुवर्णचोरातें,

१. लांडगे. २. या वृकातील एक हि वृक मृगेंद्रसा चि—**पंत.** ३. अर्धचंद्राकार ४. लाव ५ जन सुरस भोजन करुनि सुर हो. (येथील भोजनाची गोडी स्वर्गातील भोजनाप्रमाणें होती, असा भाव). ६ कृष्णास. ७. मेघश्याम कृष्ण [राक्षसाचा संहार करून ] व मेघश्याम काळ (पर्जन्यकाळ) [मेघवृष्टि करून ]. ८. सज्जनाच्या आश्रयास. ९. कदंब=समूह, मंडळ. * येथें 'लागडे' असें चुकून लिहिलें गेलें आहे.

तूं भक्तांतें, तैसा नाचवितो हर्षवूनि मोरांतें. ६४
कृष्णा! या त्वन्निद्राकरकाळीं[1] त्वत्तनूपम व्योम;
वा! तूं जसा, तसा चि स्पष्ट अविज्ञात वसतसे सोम.' ६५
इत्यादि बहु प्रेमें प्रभुसीं संकर्षण स्वयें बोले,
तो लेश चि रस कथिला; न जयासीं वा बुधा! सुधा तोले.
अप्रणतांची ढाळी[2], पाळी नत शत्रुची हि जो पगडी[3],
रामावांचुनि गेला गहना, घवूनि धनु गोपगडी. ६७
करि कृष्ण लोकसिद्ध[4] क्रीडा सप्रेम गोपवाळांसीं,
जेणें बोलों हि नये बहु शक्रप्रमुखलोकपाळांसीं. ६८
भांडीरवट प्रभुनें श्रितसुखद स्वसम देखिला, राया!
कृष्णा, गोपगणा, सुख गायींच्या बहुत दे खिलारा या. ६९
चंद्रकपदक[5] कुशळ जो द्रष्ट्यांचा अक्षिताप[6] देवडाया,
तो स्वक्रीडांसि करी, विश्वाचा रक्षिता, पद वडा या[7]. ७०
जो नारदा म्हणे, 'जें तप्त जग, करिन निरामय मुने! तें,'
क्रीडुनि भांडीरवटीं, तो गेला खळविराम[8] यमुनेतें. ७१
प्रभु योजनविस्तारा पाहे फणिशक्रनंदना[9] डोहा,
चित्तांत म्हणे, 'कालिय यमुनाहित[10] कां न मंद नाडो हा? ७२
अपराध[11] करुनि, पावुनि गरुडापासुनि भयास, हा सर्प
सागर सोडुनि शिरला या सूर्यसुता-ह्रदीं[12] महादर्प. ७३
सौभरितेजें[13] वश हा नोहे, जरि गरुड बहु जपे यातें;
मर्दुनि विष शमवावें, जेणें केली नदी अपेया[14], तें. ७४

१. तुझ्या योगनिद्रासमयीं अर्थात् प्रलयकालीं [अतिवृष्टि झाल्यानें]. २. पाडी, उडवी. ३. [लक्षणेने] मान, बोज ४. लोकप्रसिद्ध. ५. मोराच्या पिसांच्या डोळ्याचें पदक. ६. डोळ्याचा ताप हरण करण्यास. ७ या वडास आपल्या खेळण्याचें ठिकाण करी. ८ दुष्टाचा काळ. ९. सर्परूपी इंद्राच्या नंदना (क्रीडास्थानास). १०. यमुनेचा शत्रु. ११. कालियानें गरुडाचा नियत भक्ष्य खाल्ला, हा त्याचा अपराध १२ यमुनेच्या डोहांत. १३. त्या डोहाशेजारी न येण्याबद्दल सौभरिऋषीची गरुडास सक्त ताकीद होती. १४. पिण्यास अयोग्य.

या डोहावरुनि उडुनि जातां ही पक्षिकाय करपावे!
मजवांचुनि इतराचा अत्युग्र विषासि काय कर[1] पावे? ७५
भस्म करिति जीवां ते याच्या गरळाग्नि पाप सचिवांचे[2];
साहेल कोण अन्य प्राशुनि विष? आद्यतापस[3] चि वांचे.' ७६
प्रभु करुनि विचार असा तीरकदंबीं[4] प्रवीरवर वेघे,
जो, खळ मथुनि, श्रुतिमुनिरचित स्तव सर्वकाळ बरवे घे. ७७
दारुण दुष्ट दमाया, घाली डोहांत तो उडी सहसा;
जीवांचे कामादरि करितो नाहीं च जो कुडीसह[5] सा. ७८
कालिय गरळज्वाळा, जगदीशें टाकितां उडी वमला;
जाणों तन्मद चि म्हणे प्रभुतें कीं, 'दुष्ट मीं; उडीव मला.' ७९
ज्यांच्या[6] ध्यानें अमृतें तैसें, असतां हि न वय, वांचावे,
प्रभुच्या पुत्रसचिवसह कालिय कडकडुनि अवयवां चावे. ८०
बहुभोगिभोगबंधन[7] देहीं तैसें चि दे वसों गा! तें;
कुतुकें विषविकळांच्या[8] घे लीलामनुजदेव[9] सोंगातें. ८१
विषवीर्यवेग सर्व हि आपण चि श्रीमनोहरें हरिला,
न्हदतीरीं तरि[10] च उभे टाकुनि, शिशु, पशु हि, पाहती हरिला.
हें वर्तमान कळविति नंदयशोदादिकांसि गोपगडी;
उघडे चि धांवले जन; शोकांत सुचेल काय हो! पगडी? ८२

---

१ 'कर पावणें=हात पोंचणें, आपल्या कह्यात आणण्यास समर्थ असणें. २. अनुचराचे. ३ महादेव ४ डोहाच्या आसपासचे सारे वृक्ष करपून गेले असतां हा कदंबवृक्ष तसा च प्रफुल्लित राहिला होता याचें कारण, गरुडाच्या हातून त्याजवर पूर्वीं अमृतबिंदु पडला होता. ५. तो परमेश्वर षड्रिपूंचा नाश करितो, इतकें च नव्हे तर, पुनर्जन्माची भीती हि नष्ट करितो, अर्थात् मोक्ष देतो. ६. ज्यांच्या (अवयवांच्या) ध्यानें [ जैसें ] अमृतें तैसें [ इतरें हि ] वय न असता हि ( आयुष्य संपलें असता हि ) वांचावें ७. अनेक सर्पांच्या वेटोळ्यांचें बंधन. ८. विषानें व्याकुळ झालेल्यांच्या. ९. लीलेनें मनुष्यरूप धारण करणारा. १०. म्हणून च.

एकामें चि, मृगांच्या ज्या ग्रीष्मीं निर्जळीं द्वस्थानीं,
व्याकुळ रामेतर ते बहु केले त्या तशा अवस्थानीं. ८५
त्रिर्त्तीं राम म्हणे, "हा बहु वाढविला व्रजांत कां घोळ?
'हा! हा!' चि जपति कीं हे जन, शोकजळें करूनि आंघोळ.
स्पष्ट मरेल यशोदा, नंद हि, मानूनि सत्य पाकांत;
माकांत प्रभु कां हा होवूं देतो व्रजांत आकांत?" ८६
मग जगदीशासि म्हणे, 'बा कृष्णा! राहिलासि कां उगला?
कालिय तुच्छ दमावा; चावुनि, वेष्टुनि, तुला मदें फुगला. ८७
अहिबंधांतुनि मुक्त, स्वजना या दावया महा, बा! हो.
मान पुरे या व्याळा, या ही आद्या वया, महाबाहो!' ८८
रामप्रबोधित प्रभु मूर्ति खळव्याळबंधनीं फुगवी;
सुटुनि मग, दंश, देहीं तत्कृत जे, देव शतगुणें उगवी. ८९
त्या पंचमस्तकाच्या देव शिरीं स्वैर मध्यमीं नाचे;
त्याचे विकळ असु, जसे पल्वलबकसघममध्यमीनाचे. ९०
त्या प्रभुनें नृत्य शिरीं करुनि, फणी सविषरक्त ओकविला;
ओकं विलासा श्रीच्या जो देता वर्णितां चि 'ओ' कविला. ९१
मग होवुनि विमद म्हणे, 'मी शरणागत असें,' असें व्याळ,

---

१ उन्हाळ्यात निर्जल अरण्यांत मृगांच्या ज्या अवस्था [होतात] तसल्या अवस्थांनी ते रामेतर (बळरामाखेरीज बाकीचे प्राणी) एकामें चि (सरसकट) बहु व्याकुळ केले. २. पाक (पुत्र)+अन. ३ आद्या वया (तुझ्या पहिल्या—लहान—वयाला) [व] या व्याळा [दिलास इतका] मान पुरे या प्रचंड सर्पाला मारून टाकण्यास तुला (जगदीश्वरास) मुळीं च वेळ वास्तविक नको, परंतु एवढ्याशा लहान मुलानें एवढ्या बड्या धुडास तत्क्षणी च चिरडावें, हें मनुष्यरूप धारण करणाऱ्या तुला त्या रूपाला अनुसरून बरोबर नाहीं असें वाटत असलें, तर इतका वेळ त्याचा मुलाजा राखिलास हे पुष्कळ झालें, यात त्याचा पुष्कळ मान राखिलास, असें माझ्या बुद्धीला वाटतें. ४ मरून काढी. ५. डबक्यांतील बकसमुदायाच्या तडाक्यांत सांपडलेल्या माशाचे ६ स्थान.

'पाळ प्रभुवर्या! मज, चुकला तरि योग्य रक्षणा बाळ.' ९२
ऐकुनि बहु दीनवचन, कालिय होतां चि घाबरा, उतरे;
देव म्हणे, 'गेला कीं मद? येणें जो, न हा बरा उत, रे! ९३
येथें राहों चि नको, शीघ्र सपरिवार सागरा जा गा!
याया शांति, जगद्धित सद्गुणनिधि शेष नागराजा गा. ९४
जो परदुःसहतेजा[1] अहिकुळ, पावक जसें यवस[2], खातो;
त्वच्छिर मत्पदलांच्छित पाहुनि, होइल सदा तव सखा तो. ९५
कळवी, 'अहिताचें ही करितों, मज शरण आलिया, हित मीं.'
गेला, वंदुनि तरला, पावुनियां दृढ कालिया हि, तमीं[3]. ९६
श्रीकृष्ण तटीं येतां, गोप स्तविती, प्रदक्षिणा करिती;
धरिती पाय किति सुधी, पूज्या श्रीमूर्ति, धाकुली जरि ती. ९७
नमुनि म्हणति, 'नंदा! वा! तूं धन्य, उणा न कश्यपाहून,
तव सुत विष्णु समजलों, यां कालियकाळ वश्य पाहून[4]. ९८
गोपाळ सत्य आम्हीं पोषितसों व्यर्थ काय गाबाळ[5].
ज्ञान नसे लेश हि; हा कृष्ण महद्भूत, काय गा! बाळ? ९९
शकति जयाचे पटु ही वर्णाया बाहुबळ न वेद मुनी,
तो हा व्रजपति रक्षिल आम्हां, ऐसे चि खळ नवे दमुनी.' १००
ऐसें वदले गोप, प्रमुदित होउनि निजस्थळा आले,
व्यालेशदमनचरितें[6] हे, सुर न सुधारसें तसे धाले. १०१

---

१ शत्रूस आहे दु:सह तेज ज्याचें असा गरुड. २ गवत. ३ अज्ञानांधकारांत. ४ या (कृष्णाला) कालियरूपी कृतांत वश्य [आहे असें] पाहून. ५ आम्ही सत्य गाबाळ गोपाळ (खरोखरी च, गचाळ गुराखी), व्यर्थ काय (शरीर) पोषितसों (फक्त खायाला काळ आहों) ६ सर्पश्रेष्ठ कालियाच्या पराभवाच्या हकीकतीनें.

# अध्याय चवदावा.

श्रीरामकृष्ण गोधन गोपाळांसह सलील चारीत,
तालवनातें गेले, स्वपदरजें स्थिरचरांसि तारीत. १
तेथें रामासि म्हणे नरलीलश्रीनिवास, 'वास मज,
ताळफळांचा रुचला गोपांसह, वीरवासवा! समज. २
आर्या! दे पक्क फळें आम्हां भक्षावयासि ताळांचीं,'
हास्य करुनि राम म्हणे, 'पुरवावी आळ शीघ्र बाळांची.' ३
पाडुनि ताळतरुफळें गोपाळांतें यथेष्ट दे खाया,
त्या शब्दें धावुनि ये खरतनु धेनुक सरोष देखाया. ४
लात्ता हाणी सहसा स्वामिकडे करुनि गांड गाढव या;
तो ये गुरु वरुनि कुमति, नर्तक, निर्लज्ज, दांडगा, ढवया. ५
ते च धरी दृढ त्याचे तो प्रभु निजजनमयूरघन पाय;
ताळद्रुमीं झुगारी गरगर फिरवूनि राम अनपाय. ६
जो स्वज्ञातींत म्हणे, 'वज्रधरास हि रणीं दुरासद मी,'
राम प्रभु ताळवनीं त्या ज्ञातींसह दुरासदास दमी. ७
श्रीरामें वधिले ते, उग्रत्वें गरळगुरु चि रासभ जे;
त्यांपासुनि सर्व हि जन त्या तालवनास सुरुचिरास भजे. ८
भांडीरवटाप्रति मग येउनि, करिती परोपरि क्रीडा,
प्रभुबाळचरित्रसुखें पावति निर्गुणसमाधि हि व्रीडा. ९
गोपाळवेष घेवुनि गोपाळांत प्रलंब ये, राज्या!

---

१. मनुष्याच्या लीला करणारा श्रीनिवास. २ वीरेंद्रा 'वीरश्रेष्ठा' ३. इच्छा. ४. गर्दभरूपधारी ५ ढव्याला गुरुत्वें वरुनि आला—पंत. ६ अपायरहित, सुरक्षित. ७. धेनुकासुर. ८ जिंकण्यास कठिण ९. गरळाचे अध्यापक, गरळास [ उग्रत्वाची] दीक्षा देणारे गुरुजी, विषाहून प्रखर—जाज्वल्य—असे—निर्णय १०. तेव्हांपासून. ११. सर्वश्रेष्ठ आनंददायी समाधि

प्रभुवधकाम खळ धरी, व्हावें रोम हि न वक्र येरा ज्या. १०
दानवकृत्रिम कळलें श्रीकृष्णाला चि तत्क्षणीं अजि ! तें;
हरिणाक्रीडननामक खेळ प्रारंभिला अजें अजितें. ११
त्या रामाहुनि रामानुज दुःसह आपणा असें समजे;
उडती, क्रीडा करिती ते जोड्यानें, वयें बळें सम जे. १२
श्रीकृष्ण उडों लागे राया ! श्रीदामनाम गोपासीं;
प्रभुसीं खळ, तुळसीच्या भांगेचें रोप जेंवि रोपासीं. १३
बहुशत गोपद्वंद्वें ठिकती हरिणांसमान सह, राया !
खेळ तसा अर्थ इतर पशु बाळांचें न मानस हराया. १४
श्रीकृष्णें श्रीदामा, बळभद्रें हि प्रलंब हारविला.
खद्योत झटुनि, तेजें जिंकुनि, म्हणवील काय 'हा ! रविला ?
श्रीकृष्णातें क्रीडाविजित श्रीदाम गोप तो वाहे,
इतरपराजित इतरा, कीं मर्यादा असी च हे आहे. १६
वाहे तो हि क्रीडानिर्जित असुर प्रलंब रामातें;
चित्तांत म्हणे, 'भाग्यें सांपडला शत्रु हा बरा मातें.' १७
[3]ज्यापावेतों जावें त्या भांडीरद्रुमासि सोडून,
असुर पळत जाय पुढें, जैसा तस्कर महार्थ जोडून. १८
भारी होय बळ, म्हणे, 'कळला क्रीडेंत न मज; लाखोटा
जैसा अनर्थगर्भित घातक, आतां चि समजला खोटा.' १९
बळभर वाहों न शके, मायामय गोपदेह खर्व तसा;
तो याकरितां, हरितां करि तांतड, होय विंध्यपर्वतसा. २०
गगनीं शिरे, पळे तो स्कंधीं वाहोनि रोहिणीतनया;
प्रेक्षक म्हणती रामा 'पूर्णसुधांशु,' प्रलंब जो, 'घन' या. २१

---

१. केंस सुद्धा. २ जिकणारास पराजितानें खांद्यावर बसवून घेऊन अमुक एका ठिकाणापर्यंत जावें, असा त्या खेळाचा नियम (मर्यादा) होता. ३. ज्या वृक्षापर्यंत. ४ [illegible] ५ [illegible] त्यांतील अनर्थकर मजकूर दृष्टीस पडेपर्यंत जसें, त्याचें कांहीं वाटत नाहीं तद्वत्.

काय नवल तरि जरि अरिभय धरिलें सर्वगोपतोकांहीं ?
राया ! बळ हि गडबडे, पावुनि बळधैर्यलोप तो कांहीं. २२
अनुजासि म्हणे, 'कृष्णा ! गोप नव्हे, दैत्य हा मला हरितो;
याला काय करावें ? तुच्छ शरीरें धराधरा[1] करितो.' २३
कृष्ण म्हणे, 'आर्या ! तूं जगदीश्वर कीं, स्वतत्व आठीव,
काठी[2] वह्न्यर्कांची[3] त्वन्मूर्ति; लया खळासि पाठीव.' २४
या भगवदुक्तिनें बा ! प्रकटे सत्यस्वरूपबोध मनीं;
शलभ असुर, निजबोध[4] ज्वलन चि, उपदेश होय तो धमनी. २५
मस्तक त्या असुराच्या देहीं, हाणोनि मुष्टि, शिरकविला;
प्रभु डोलवावयाला लावी, देवूनि तुष्टि, शिर कविला. २६
स्रवला रक्ता, पविहत नग जंवि[5] जळा, सगैरिका[6] यम ही
वचकावा अत्युग्रा, तो कांपवि पडुनि वैरिकाय मही. २७
श्रीकृष्णातें भेटे तो, यापरि मर्दुनि प्रलंबातें,
स्तवन करिति गोप अमर; कोणा हि म्हणों न दे 'अलं' बा ! तें. २८
तेव्हां 'बलदेव' असें देवानीं यासि ठेविलें नाम;
काम स्वजपपरांचे[7] पुरवी हें, दे वरिष्ठ जें धाम. २९
याउपरि शरत्काळ प्रिय फळ देवूनि काम पुरवाया,
यद्योगें जीवन[8] शुचि, तो ये प्रभुसा[9] चि पंक नुरवाया. ३०
तो शक्रोत्सवलालस गोपातें गोपवेष अज पाहे,
जो म्हणतो, 'मीं च परम, इतर[10] हितरसद[11] नव्हेत, न जपा हे.' ३१
त्यांसि पुसे प्रभु, 'करितां काय ?' असें, वायुतें हि जो वळवी;
व्रजपूज्य वृद्ध गोप स्वाचारप्राप्त[12]धर्म तो कळवी. ३२

---

१ पर्वताला. २. आधार—**पंत.** ३ अग्नि व सूर्य याची. (त्याच्या तेजास तू कारण आहेस, असा भाव). चित्रक व रुई याची—निर्णय ४ आत्मस्वरूपाची—तत्त्वाची—ओळख. ५ कावेनें रंगलेल्या; लाल झालेल्या. ६ पुरें ७ आपला जप करण्यांत तत्पर त्यांचें ८. पाणी ९ अधिकारी पुरुषाप्रमाणें [पक्षीं] कृष्णासारखा. १० इतर देव. ११ हितकर रस देणारे. १२ कुळपरंपरेनें आलेला आचार.

'सुरपति शक्र, तयाचे आज्ञाकर मेघ, तत्कृपादृष्टी
वृष्टि प्रवर्तवी, स्थिति[1] या योगेंकरुनि पावती सृष्टी. ३३
उत्सव तत्प्रीत्यर्थ प्रतिवर्षीं आदरें यथाशक्ती
करितों, अन्य हि करिती त्रिजगत्पतिची हिताबहा भक्ती.' ३४
कृष्ण म्हणे, "गो, ब्राह्मण, गोवर्धन हि त्यजूनि, शक्रमहा[2]
करितां, काय म्हणावें? मज याचा वीट; नीट न क्रम हा. ३५
ज्याची जी वृत्ति[3] असे, त्याची ती देवता, तिची सेवा;
जे वाद सांगतिल, ते सांगोत, भजों नये परा देवा. ३६
गाई, गिरि, गहनें हे गोपजना वृत्ति, देवता हे या;
उत्सव ईचा चि करा; बाळाला माय काय हो! हेया[4]? ३७
म्यां ऐसें आयकिलें कीं, 'सिंह, व्याघ्र, गज, वृक, व्याळ,
या रूपें गिरि रक्षिति वन, होती तदहिता[5] जना काळ.' ३८
म्हणुनि ज्ञान महा ही, ज्यांत नसे स्वहितबोध, न महा तें.
घ्या सर्व दोहे[6], मारा मेध्य[7] पशु, करा स्वगोधनमहातें. ३९
न क्षोभो गोवर्धननग, याकरितां करा नगमहातें;
गज वश जों तों चि भलें; वांचावें काय हो! मग[8] महातें? ४०
गोवृषवत्स हि न्हाणा, चारा चारा स्वयें बरा हिरवा;
मिरवा करुनि अळंकृत, गान करित, गिरिसभोंवते फिरवा. ४१
मिष्टान्नें परमान्नें ब्राह्मण पूजूनि आदरें तर्पा;
दर्पा सोडुनि पाणी, वस्त्र अळंकार दक्षिणा अर्पा. ४२
अन्न गिरिस, गाईंस हि, बहु नगगत मर्कटांसि ओपावें;
नमुनि म्हणावें, 'चुकलों पूजा बहु दिवस, बा! न कोपावें.' ४३
देवाहीं पूजावा शक्र सुखें, कीं, स्ववृत्तिचा कर्ता;
गोपाहीं गोवर्धन पूजावा, हा चि आमुचा भर्ता. ४४

---

१. समाधान. २ इंद्रोत्सवाला ३ धंदा, पोटभरण्याचें साधन ४ त्याज्य ५. वनाचें अहित करणाऱ्या. ६ एकदर दूध. ७. यज्ञीय, यज्ञात मारावयास योग्य असा. ८. गज वश नसतां.

मीं तों करवीन बळें गोयज्ञें, व्रजहितार्थ हें उक्त
स्वीकाराल प्रेमें वडिलपणें, तरि तुम्हां असे युक्त." ४५
वृद्ध म्हणति, 'बा कृष्णा! तुज वश देवूनि सर्व हे मन, गा!
मानितसों, वानितसों, तव शब्दा, गणुनि खर्व हेमनगा. ४६
तूं नाथ आमुचा, बा! सादर तव उक्तिला चि कान, मन.
तव न वय अल्प असतें, सर्व हि करितों तुला न कां नमन? ४७
जन्मापासुनि बापा! कृष्णा! अत्यद्भुतें तुझीं कर्में;
शर्में व्रज तव तेजें पावे, भट[2] जेंवि अशानिच्या[3] वर्में. ' ४८
केला त्या गोपानीं, प्रभुनें कथिला तसा चि, तो यज्ञ;
कृष्ण तसा पशुपांला, तृषितांसि जसा वनांत तोयज्ञ[4]. ४९
करिती त्रीं[5] दिवसांचा मग गोळा सर्व दोह तोषानें;
केलीं रससंपन्नें अन्नें एकत्र मिळुनि घोषानें. ५०
पूजुनि विप्रजनातें, म्हणती वाढूनि अन्नपायस, 'खा;'
आग्रह करि गोप सकळ, जेंवि सख्याला धरून पाय सखा. ५१
पूजुनि, करुनि अळंकृत गोधन, चारूनि शुद्ध अन्न तया,
आपण वंदुनि, म्हणति स्वजनातें, 'व्हा समस्त सन्नत या.' ५२
पूजुनि, अन्न निवेदुनि, करिती गोवर्धना नगा नमनें;
तें घे नगरूप प्रभु, त्याचें वरिजेल कां न गान मनें? ५३
धरुनि बृहद्वपु[6], दर्शन दे देव, रहावयास विश्वास;
काय अशक्य तया, जो रचितो लीलेकरूनि विश्वास? ५४
'बल्लव हो! गोवर्धन मीं झालों सुप्रसन्न यज्ञानें,
भजनें ज्ञानें इष्ट चि माझ्या होइल, अनिष्ट अज्ञानें. ५५
ऐसें बोले, घाली अत्याश्चर्यांत गोपगोपींतें;
इतरांपरि आपण ही कर्णांहीं अमृत तेंवि तो पी तें. ५६
ते जेंवि गोपगोपीजन, आपण आपणा करी नमन,

१. गायाप्रीत्यर्थ केलेला यज्ञ. २ योद्धे ३. वज्राच्या चिलखतानें ४.
पाण्याच्या ठिकाणाची माहिती असणारा. ५ तीन ६ मोठें शरीर

स्मरतां, आंगें धावुनि, निववी रक्षूनि जो करीनमन.[1] ५७
प्रभु गोपजनासि म्हणे, 'चाल्ं गोवर्धनाद्रि उजवा, या;'
करिती तैसें चि, जसें सांगे श्रीकृष्ण, जन्म उजवाया.[2] ५८
गाजत, वाजत, साजत, त्या गोधनगोपगोपिकांसहित
गिरितें प्रदक्षिण करी, कविरूपां आम्र जो पिकांस हितें.[3] ५९
गोपी सुस्वर गाती, वाजविती रामकृष्ण मुरलीला,[4]
वेड चि लाविति सन्मुनिमतिला सुसमाधिमाजि मुरलीला. ६०
आला व्रजासि, यापरि करवुनि गिरियज्ञ, अज्ञ ताराया,
ज्याच्या पद्प्रसादें ब्रह्मादि कवींतें तज्ज्ञता[6] राया! ६१
कोणी गोवर्धननगरूपवचन आठवूनि कर जोडी;
'गोडी मखशेषाची' किति म्हणती, 'बहु; सुधारसीं थोडी.'
कोणी बहु प्रशंसा श्रीकृष्णाची पुनःपुन्हा करिती;
कोणी वर्णिति नंद, प्रीति यशोदायशीं किती धरिती. ६३
राया! ऐसा स्वर्गीं कळतां चि स्वोत्सवाक्रियालोप,
कोप त्रिदशेंद्र मनीं धरुनि म्हणे, 'फार मातले गोप' ६४
कृतदोषा[7] घोषाचा करिल चि तो नरवरा! गमे घांस;
ऐसें त्यांला सांगे, कल्पांत हि कठिन ज्यां न मेघांस. ६५
"मीं प्रभु, मद्भक्त तुम्हीं, कीं मज देतां निजेंत 'ओ,' घन हो!
जेंवि नसे गंगेचा, खंडित मत्कीर्तिचा हि ओघ न हो. ६६
गोप करिति, वश होउनि दामोदरबाळबुद्धिस, द्वेष,
शुचिभाव आंत नसतां, कैसी देयील शुद्धि सद्वेष[8]? ६७
लंघूनि मन्महांतें[9], करिती जे मत्त पर्वतमहातें,
कां म्हणवील न त्यांला, करुनि अकल्याण, सर्व तमें[10] 'हा!' तें?

१ गजेंद्राचें मन. २. सफळ करण्याकरितां ३. जो आम्र कविरूपा पिकांस हित —पंत. ४. निमग्न झालेल्या ५ ज्ञानी जनांत ६. ज्ञानपूर्णता. ७. पापी, अपराधी. ८. सुंदर पोषाख. ९. माझ्याप्रीत्यर्थ करावयाच्या यज्ञातें. १०. अज्ञान, पाप.

जा, सर्व नंदगोपव्रज बुडवा, सप्तरात्र वर्षोन;
हर्षोन प्रोक्त करा, वर्ष नसो प्रलयकाल[1]वर्षोन. ६९
आलों हा मीं हि; सरीमागें अधिका करा सरी घन हो!
तुमच्या पे[2]टळीं रविच्या पळ एका ही करास रीघ न हो." ७०
घन सोडिति व्रजावरि वे[3]णुनृकरिकरसमा सदा धारा;
सत्य जडात्मे ते कीं न गणिति कांहीं च त्या सदाधारा. ७१
वर्णू चपळा मीं, कीं म्हणविति ताडूनि 'हाय!' गारा ज्या,
कीं उरवी न वन पवन तो चि? कथूं काय काय? गा राज्या!
होय जळमय क्षितितळ, किति तळले घारगे तसे फुगले,
थंडावले, न चळती, न वदति, सुसमाधिरततसे उगले. ७३
गोवत्स, गोप, गोपी, लाविति भगवन्मुखाकडे दृष्टी,
वृद्धाची चिंतासी अधिक चि वाढे क्षणक्षणीं वृष्टी. ७४
क्षोभोनि पुलोम्याचा जें[5] वर्षे तीव्र तोय जामाता;
प्रभुची जी वत्सलता, त्या व्यसनीं होय ती व्रजा माता. ७५
छ[6]त्राकापरि धरिला गोवर्धनगिरि स[7]लील वामकरें;
श्रीशें गजवरवरदें शरणागतदीनसर्वकामकरें. ७६
छत्र चि नग, तद्दं[8]ड चि तो प्रभुचा मेघनील भुज गमला;
जन्हि भू[9]धर, चंद्रधवल[10], वाटे ऐसा न रम्य भु[11]जग मला. ७७
प[12]द हि निघों दे जवळुनि तो वदनांतुनि हि 'हा!' न वामकर,
प्रभुचा बाहु मज गमे बा! अत्यद्भुत चि हा नवा मकर. ७८

---

१ प्रलयकालीन वृष्टीहून उणी २ समूहाच्या आवरणात. ३. वेणु (वेळू) +नृ+करि (मनुष्य व हत्ती)+कर (हात—सोंड)+सम (सारखी) ४ सज्जनाच्या आश्रयदात्यास ५. इंद्र ६. कुत्र्याच्या मुताच्या छत्रीप्रमाणें ७ सहज, लीलेनें. ८. छत्रीची काठी ९ पृथ्वी धारण करणारा. १० चंद्राप्रमाणें पांढरा शुभ्र. ११. शेष. १२ मकरानें कोणाचा पाय धरला तर त्याला तो हालू देत नाहीं; तथापि त्यानें पकडलेल्या माणसाच्या तोंडून "हाय! हाय!" असे दुःखोद्गार बाहेर पडतात, परंतु ह्या कृष्णरूपी अद्भुत मकरानें कोणाचा पाय तर हालू दिला नाहीं च, पण कोणाला 'हाय!' हि म्हणू दिलें नाहीं, असा भावार्थ.

सप्त अहोरात्रें तो गोवर्धन वामकरतळीं धरिला,
तदधस्थळीं व्रज सकळ रक्षुनि, मद सर्व जिष्णुचा हरिला. ७९
भग्नप्रतिज्ञ होय स्वर्गाप्रति जाय पाकशासन गा!
चित्ररथासि म्हणे, 'बा! हे वीणा, मुरज हा, कशास? ने गा.'
घन ओसरले, पडलें उष्ण, यथापूर्व गगन पाहून,
सर्व निघाले बाहिर, नगमूळीं सप्तरात्र राहून. ८१
व्रज वसविला प्रथम, मग नग, होता ज्या स्थळीं जसा पहिला;
महिला प्रभुभुज बहु सुख दे, त्या हि सहस्रमस्तका अहिला. ८२
गोकुळरक्षणकर्मे बहु विस्मित, विमर्द देववर झाला;
ऐरावतीं मग बसुनि सविनय विनवावया प्रभुसि आला. ८३
होता एकांतस्थित गोवर्धननगशिळातळीं विष्णु,
गज सोडुनि, कर जोडुनि, तेथें सव्रीड भेटला जिष्णु. ८४
"बा! गोपांचा आला, लोपवितां स्वमहभाग, राग मला;
कैंचा विवेक? वध्य व्रज हा कारुण्यसागरा! गमला. ८५
काळ हि पाहों न शके त्वच्चरणाश्रितजनाकडे वक्र;
नक्रग्रस्तद्विपवरवरदा! हा काय तुजपुढें शक्र? ८६
तरि च असें अत्यद्भुत चरित; असे सर्व तेज सांगातें,
कां गा! तें तुज सोडिल? रविचें रविच्या त्यजी न आंगातें.
सर्वां लोकांवरि बहु उच्च असे ब्रह्मलोक, याहून
गोलोक उच्च; वदतों ऐकुनि विधिकथित हें, न पाहून. ८८
तूं आलासि कराया या जैसा काय धन्यवर देशा,
हा त्वत्प्रियार्थ आला गोलोक, नव्हे चि अन्य, वरदेशा! ८९
गोलोक रक्षिला त्वां, हां हीं, वारूनि मोहरोगातें;
जें बहु कारुण्य तुझें, लेश मजकडे हि मोहरो गा! तें ९०

१. गाऊ नकोस, [कारण ह्या वेळीं माझ्या मनाला स्वस्थता नाहीं] २. ऊन्ह. ३. नष्टगर्व. ४. आपल्या उत्सवाचा भाग ५. महादेवानें सांगितलेले. ६. जसा काय, जणु काय. ७. धन्यश्रेष्ठ. ८. ह्या इंद्र हि. ९. तोंड करो, सन्मुख होवो.

विधिची, गोलोकींच्या गायींची, प्रार्थना तुला बा ! हे
कीं, 'इंद्र, आत्मरक्षण करिता, व्हावासि तूं,' असी आहे." ९१
ऐसें प्रार्थुनि, जाणुनि वळल्या हृदयांसि विश्वजनकाच्या,
अभिषेक करि प्रेमें कलशा हीं शक्र शुद्धकनकाच्या. ९२
गोलोकींच्या गायी करिती अभिषेक आत्मदुग्धानीं,
'गोविंद' नाम ठेविति, जपुनि तरावें जयासि मुग्धानीं. ९३
सामृतजलधारांहीं वर्षति घन, सुर वरप्रसूनाहीं,
स्तविति मुनि, देवकीस हि म्हणती, 'ऐसी वरप्रसू नाहीं.' ९४
अभिषेकजलकणार्द्रे, वाढे सुख पुण्य, जाय अघ, वातें;
ऐक, नृपा ! जें वदला प्रभुतें अभिषेक करुनि मघवा, तें:-९५
"मदुपरि इंद्र प्रभु तूं गायींनीं स्थापिलासि गोलोकीं;
कवि तुज 'उपेंद्र' म्हणतिल, भिजरसनेनें हि नाम हें घोकीं.
गायींचा इंद्र म्हणुनि 'गोविंद' प्रभुवरा ! तुझें नाम;
धाम स्वसुखाचें, हें जपतां पुरवील सर्व ही काम. ९७
मीं अदितिचा तनूज, ज्येष्ठ तुझा बंधु हें प्रथम नातें
रक्षावें त्वां प्रभुनें, होवूं द्यावें न सव्यथ मनातें. ९८
त्वत्ताताची भगिनी नामें 'कुंती' 'पृथा,' तिच्या पोटीं
मत्सुत अर्जुननामा, द्यावीं साधुनि तया यशें मोटीं. ९९
सत्य करीं, 'ईश्वरसा होइल मत्सुत' सभेंत वदलों, हें;
कीं स्पर्शमणिस्पर्शें बा ! पावावें च उच्च पद लोहें. १००
शलभातें दहन तसा, तेजें कंसादिखळजना भाजीं;
दे मत्तनयासि यशें, भारतयुद्धांत जळजनाभा ! जीं." १०१

---

१. आत्मरक्षण (आमचें रक्षण) करिता (करणारा) इंद्र [हे कृष्णा !] तू व्हावासि, यापुढें आमचा इंद्र त्वां व्हावे. (पुढें ९६ गीति पहा) २. हृदय वळलें असें जाणून; भगवंताचा राग जाऊन मनोवृत्ति प्रसन्न झालेली पाहून. ३ चांगल्या फुलानीं. ४. उत्तम पुत्र प्रसवणारी ५. भिजलेल्या ('वातें' याचें विशेषण). ६ [मीं] घोकीं. ७. दुःखी. ८. खरें नाव 'पृथा'; दत्तक नाव 'कुंती'. ९. परिसाच्या स्पर्शानें.

भगवान् म्हणे, 'महेंद्रा ! करिन तसें सर्व, तूं जसें वदसी;
तवसुतयशःपट वितत[1] होयील, झडेल एक ही न दर्शी[2]. १०२
उतरीन[3] मीं पराचा, होवुनि तवपुत्रभृत्यसा, रंचें,
दूत हि, सूत हि होयिन; किंबहुना करिन कृत्य सारें च. १०३
सर्व हि सुत कुंतीचे मीं, होउनि वज्रकवच, रक्षीन;
लक्षीन प्राणतसे, होयिन तद्रातिसर्पपक्षीन.' १०४
हृदयांत सलत होती, 'स्वातिक्रम देव आठवीना कीं,'
हे शंका हरुनि, प्रभु मधुर वदुनि हरिस पाठवी नाकीं. १०५

---

# अध्याय पंधरावा.

गोप म्हणति, 'कृष्णा ! हा व्रज, आजि सनाथ, धरुनि नग, यातें
तूं वांचविता, पणें यश जें, शतवार करुनि न गया तें. १
बा ! सप्त अहोरात्रें वामकरें एकरूप नग धरिला;
न च धरवेल कुसुम ही; श्रम तिळ हि तुझ्या न या भुजें वरिला. २
या अत्यद्भुतकर्में देवांचा देव तूं असें गमतें;
गोपांत जन्म, गायी चारिसि, पणें चि बहु मन भ्रमतें ! ३
जन्मापासूनि तुझीं जीं जीं, तीं तीं अमानुषें कर्में
शर्में देतीं; झाले धन्य त्वत्संभवें, जसें धर्में. ४
तूं कोण? गोपसा कां? बा ! गायी चारितोसि कां गा ! या?
आंगा या आलें हें कर्म कसें? योग्य तूं चि सांगाया. ५
रुद्रांतिल, मरुतांतिल, तूं वसुगंधर्वदनुज यांतिल कीं ?
अतितेजा नसतां, भय परदारांच्या सिरेल कां तिलकीं ?' ६

---

१ विस्तृत २ दशी, शेवट, अल्पांश. ३ गर्व उतरीन—खडीन. ४. त्यांच्या शत्रुरूप सर्पांना गरुडासारखा. ५ 'मीं देवाची अमर्यादा केली ही गोष्ट त्याच्या मनांतून गेली कीं नाहीं' ही इंद्राची शंका हरुनि. ६. गयेची यात्रा. ७. एकसारखा.

कृष्ण म्हणे, "रुद्रमरुत्प्रमुखांतिल म्हणतसा, असना तं;
पुसतांत काय, जाणुनि नंदसुत, ज्ञाति हें असें नातें ? ७
आग्रह जाणायाचा जरि वढिल तुम्हीं मनांत आणाल,
तरि परिसा, सत्य पुढें सर्व विशेषेंकरूनि जाणाल. ८
हा ज्ञातिबंधु कृष्ण श्लाघ्य असे, आपणा अहो आर्य !
जरि वाटेल, तरि परिज्ञानें चि अवश्य काय हो कार्य ? ९
'स्वज्ञातिबंधु, कृष्ण, श्लाघ्य, अजपाळसुत,' असें मात्र
जाणा, म्हणा, असेन स्वजना जरि मीं अनुग्रहा पात्र." १०
यापरि परिसुनि सुनिपुणगुणवच, न च लेश बोलतां, गोप
लज्जित होउनि गेले, कीं न उठो आग्रहें मनीं कोप. ११
याउपरि शरत्काळीं गोपींसीं प्रभु सुखें करी रास:
एका हि अनेक करुनि निजयोगें आपुल्या शरीरास. १२
प्रभुवेणुचा अनाहत होवूनि कधीं हि न रव रागेला,
ती आली च, जिच्या हा कर्णद्वारांत नरवरा ! गेला. १३
गुरुजनसंकोच, पतित्रास, सुतस्नेहबंध तोडून,
सोडून स्नानाशन, जाती निजधर्मसेतु मोडून. १४
गोपसुता ही उचिता श्री, श्रीकर वेणुधर करी रासीं;
सुरतरु करिल बरोबरि न प्रभुपदरेणुधरकरीरासीं १५
स्वस्कंधीं गोपीभुज, गोपीस्कंधीं प्रभु स्वभुज ठेवी;
नाचे, गाय; तयांसीं रासीं पाहोनि लाजती देवी. १६
गोपी कौतुक करिती, करि जें प्रभु हा, तदेव तानाहीं;
कोणी असी, न जोडी त्या समयीं हात, देचता नाहीं. १७
श्रीपतिचा गोपींसीं तो अत्यद्भुत रसें असा रास,
त्यजुनि समाधि शिव हि ये, यावें सोडुनि जसें असारास. १८

१. ज्ञातिबांधव २. एका पुरुषाबरोबर अनेक स्त्रियांची जी क्रीडा ती रासक्रीडा. ३. अपमान केलेला असा. ४. प्रभूच्या पायाची धूळ धारण करणाऱ्या करीरवृक्षासी. ५. तें च. ६. ताना मारून, गाऊन. ७. खोट्यास, निःसत्त्वास. * भय.

प्रभुनें बल्लव[1]कन्या केल्या क्रीडा करूनि बहु धन्या;
यद्यपि होत्या वन्या[2], न गुणवती त्रिभुवनीं तशा अन्या. १९
पापवरिष्ठ[3] अरिष्ट[4] व्रज पीडाया प्रदोषसमयांत
आला, उग्रत्व जसें कळिच्या ठायीं, तया चि सम यांत. २०
क्रोधमदांध असुर तो आकारें गिरितसा चि, वृषभ[5]ारी
गोगर्भ चढुनि पाडी, शून्य करी गोष्ठ, वत्स[6]वृषभारी. २१
तळ[7]शब्दें सिंहरवें तो व्रजविघ्ना तया खळा हटकी;
सर्वा हि शक्ति ज्याच्या श्रीपदनखचंद्रशक्तिच्या बटकी. २२
या मधुकैटभकांचनकशिपुमहायुद्धकोविदा राया!
कुक्षिप्रति लक्षुनि ये, शृंगाहीं दुष्ट तो विदाराया २३
धावुनि समीप येतां, त्याचीं त्या गोपकन्यकाखिंगें[8]
दोनीं दों हस्तानीं धरिलीं रगडूनि पविदृढें सिंगें. २४
गरुडें जसा धरावा उग्रविष मदांध सर्प झडपून,
धरिला, श्रीपद देवुनि त्याच्या शृंगांतरांत[9] दडपून. २५
लीलेनें चि खळ असुर वृषभ जलक्लिन्न[10]पटतसा पिळिला;
खिळिला स्थळीं च, न चळों दिधला, शिशु जेंवि अजगरें गिळिला.
सव्य विषाण[11] तयाचें उपडुनि, तेणें चि, वा नृपा! शैल
वज्रधरें वज्रानें जैसा, तैसा चि ताडिला बैल. २७
केला असा मुकुंदें तो वृषभ अरिष्ट असुरहित, राया!
मुनिसे प्रभुहत झाले संसारीं योग्य असुर हि तराया. २८
अरि मथुनि, प्रभु वाढों लागे घोषांत अनळसम हा, तें
तेज भिववि कंसा, जें द्याया साधूंसि अनळस महातें[12]. २९
तो कंस, पूतनादिस्वासांचा वध मनांत आणून,

१ गोपकन्या २ वनांत राहणाऱ्या (गावढळ) ३ अति दुष्ट ४ ह्या नांवाचा असुर ५. लठ्ठ व बळकट बैल. ६ वासरांचा व बैलाचा शत्रु (चढुनि अर्थात् 'गायींवर') ७ टाळ्या पिटून ८ गोपकन्यकाकामुक (कृष्णानें). षिङ्ग (कामुक)—खिङ्ग—खिंग. ९. शिंगांच्या मध्यें १०. क्लिन्न (भिजलेलें) पट (वस्त्र). ११. शिंग. १२ उत्सवातें—पंत.

तळमळ करि खल; कळ[1] पळ न पडे त्या, कृष्ण काळ जाणून.
तेणें निशीथकाळीं[2] निजतातप्रमुख भोज झाडून
आणविले, यादव ही वसुदेवप्रभृति, दूत धाडून. ३१
आणविले उठवुनियां जे अक्रूरादि मुख्य वाहून;
राहून उगें क्षणभरि कंस वदे त्यांकडे चि पाहूनः- ३२
"ऐका हो! सर्व तुम्हीं बुध, धर्म न्याय जाणतां, कथितां,
व्यथितांतें सुख देतां, राज्याचे भक्त, दुर्जना मथितां. ३३
माझे भक्त तुम्हीं कीं, जऱ्हि मच्चित्तानुरूप[3] वर्ततसा,
तऱ्हि हा उपेक्षिला कां मदनर्थ, जसा स्वमार्गगर्त[4], तसा? ३४
सुत नंदा गोपाचा म्हणउनि कृष्णाभिध व्रजीं आहे,
मूळें खंडुनि माझीं, शेखीं[5] माराचया मला पाहे. ३५
नेला सुत वसुदेवें, कारण माझें असावधानपण;
याणें जैसा केला, करिल अरि इतर असा वधा न पण. ३६
[6]ती नंदसुता ऐसें खट्वांगवनांत नारदें कथिलें,
सुत रामकृष्ण याचे, माझें बळ मुख्य तें जिहीं मथिलें. ३७
भक्षुनि मदन्न, मद्वधकाम पशु असो कृतघ्न; हा नर कीं.
[7]वसुदेव कां म्हणेना? सर्व हि म्हणतो कृतघ्न 'हा'! नरकीं.
माझा पूर्वभवींचा[8] मृत्यु सुराधीश विष्णु, तो हा या
वसुदेवाचा सुत, बहु जाणे कपटें परासि मोहाया. ३९
दैत्येश्वर कनककशिपु वधिला याणें नृसिंह होवून;
केला बळि हि पदच्युत वामनरूपें पणांत गोवून. ४०
तेलघृतांचे उरती अनळीं [9]केले जसे न थेंब हुत,

---

१. चैन २. मध्यरात्रीं ३. माझ्यावरील मूर्त संकट, माझा घातक. ४. गर्त= खळगा. ५. शेवटीं ६ शिळेवर आपटलेली. ७. सर्व च कृतघ्न लोक नरकात "हाय! हाय!" म्हणतात, तर वसुदेव हि कां म्हणेना? मी वसुदेवाची जी व्यवस्था आतां करणार तीमुळें त्यास क्लेश झाले तर होईनात का? तो त्यास पात्र च आहे, असा भाव. ८. पूर्वजन्मींचा. ९. टाकलेले.

रुद्रास्त्रीं त्रिपुरासुर नेले येणें चि यमपथें बहुत. ४१
एणें चि कचद्वारें ती मृतसंजीविनी हि उडवीली; १
नररूपें पंक्तिवदनसंततिसंपत्ति सर्व बुडवीली. ४२
मंथनश्रम करवुनियां, स्त्रीरूपें करगता सुधा हरिली;
सांप्रत हि मद्वधेच्छा या रूपें दितिकुळाहितें धरिली. ४३
ज्याच्या माथां वैसे काक तयाचीं च लोचनें फोडी,
हा वसुदेव खळ तसा, स्वाश्रयनाशीं च या असे गोडी. ४४
निजपार्श्वीं च सदा ही मांडवितों या खळास मीं पाट!
ताट स्वच्छ कनकमय, याचा, माझा जसा, तसा थाट! ४५
देतों सुविभूषण मीं, उष्णीष प्रिय परि स्व सेला, हो!
कीं सुख पतिसत्कारें अनुदिन नानापरि स्वसेला हो. ४६
मीं पोषुनि बहु देतों, दिधलें इतुकें न शर्म मत्तातें;
केलें अहित चि, अहिनें जेंवि पयःपान, कर्म मत्ता! तें. ४७
मज मारुनि, मथुरापति सुत हो, हे कामना तुझी गूढा;
हें काय? हा! कृतघ्ना! यादव केले सलज्ज, हा! मूढा! ४८
वांचायाची इच्छा धरुनि रणीं मजपुढें उभा राहे,
साहे प्रहार ऐसा, मूर्खा! विश्वांत कोण रे! आहे? ४९
आहें समर्थ हा मीं माराया तुज पळांत अधमातें;
विप्रस्त्रीवृद्धांचा न घडो, घडला नसे चि वध मातें" ५०
ऐसी सत्पुरुषाची बहुत चि खळ कंस तो करी गर्हा;
साधूंला ऐकाया, बहु वर्णाया हि मज, नव्हे अर्हा. ५१
मग अक्रूरासि म्हणे, "दानपते! तूं सुकीर्ति साधुनि घे;
परकार्यार्थ तसा निजकार्यार्थ न, उद्यमांत साधु निघे. ५२
जा सत्वर व्रजातें, आजि च सर्वार्थिकामदा! ज्ञात्या!

---

१. पळवून नेली, नाहींशी केली २ रावण. ३ मथन=समुद्रमथन ४. मोहिनीचें रूप घेऊन. ५ दैत्याच्या शत्रूनें. ६ शिरोभूषण. ७. माझ्या बापानें. ८ गुप्त, मनातली. ९. निंदा १०. योग्य.

नंदासि आण, सांगुनि 'ये कर घेवुनि' असी मदाज्ञा त्या. ५३
ते रामकृष्ण दोघे वसुदेवाचे कुमार आणावे;
भुजयुद्धगुण तयांचे म्यां राज्यानें समक्ष जाणावे. ५४
या दोघां मल्लांसीं[1] दोघे करितील युद्ध ते भाचे,
सुचमत्कार पहावे म्यां प्रभुनें जेंवि उद्धतेभाचे[2]. ५५
होयील प्रीति मला त्यांच्या मथुरापुरींत आगमनीं;
वचन न करितां[3], निग्रह[4] करिन प्रभु मीं, धरूनि आग[5] मनीं. ५६
जरि तूं हि या कृतघ्नें वसुदेवें भेदिला[6] न अससील,
करिशील कार्य तरि, या हृदयांत प्राणसा चि वससील. ५७
गोपांतें 'चापोत्सव[7] राजा करितो,' असें चि जाणीव;
वाणी वद गोड, बुधा! दुग्धादिरस प्रभूत आणीव." ५८
ऐकुनि दुरुक्ति, शौरि स्वस्थ मनीं, साधुशांति परिसा[8] हे;
याघी[9] च विकृति तत्क्षण, बाळाची माय वांति परि साहे. ५९
बहुत चि सत्पुरुषातें खळ निंदी, जेंवि काक हंसातें;
धिक्कार करिति सज्जन, कर्णीं ठेवूनि हस्त, कंसातें. ६०
अक्रूर करी मान्य; प्रभुदर्शन सर चि, तो तृषित साच;
तत्काळ निघे, जाणे सर्व हि सर्वज्ञ हा ऋषि तसा च. ६१
कंसें, सत्पुरुषातें निंदूनि, अनंत जोडितां पंक
कंकें[10] न्यायें, धर्में, बोले, आजा म्हणोनि निःशंक. ६२
"कंसा! संसारीं तों सन्निंदेसारिखें नसे पाप;
ताप श्रवणा देती असदुक्तें; जीभ नावरे, काय. ६३
अत्युग्र तूं कुजाता, उतरेल तुझ्या न कालकूट कसा[11];
बुध म्हणती, 'कंसास हि भो! भगवन्! दक्षकाळ[12]! कूट[13] कसा.'

---

१. चाणूर व मुष्टिक नावाच्या २ मस्त हत्तीचे ३ आज्ञा मानली नाहींस तर ४ दंड, शासन ५ अपराध (मदाज्ञालंघनाचा) ६ फितूर केलेला ७. धनुर्यज्ञ. ८ सरोवर. ९ पाप १० कंसाचा आजा (कोणी पणजा असें हि म्हणतात) ११. तोडीला, बरोबरीला. १२. हे शंकरा! १३ मार दे.

होयिल कुलज परमकटुभाषी, बहु दुखविला, तथापि कसा?
तूं[1] कोण? भोज वदता मधुरा श्रुतिबहुमता कथा पिकसा. ६५
कां गांजिसि शौरीतें? पुत्र पळवितां हि हा नव्हे दोषी,
असतें चि प्रेम अविटें[2], रक्षी सर्व हि पिता, सुता पोषी. ६६
धर्मन्याय चि बोलों आम्हीं, स्वपरीं हि अहित न, रिपूस;
खळ हि सुत रुचे, सत्य न वाटे जरि, निजपित्यासि तरि पूस.
साधुद्वेष्टा, धर्मन्यायच्युत, भाग्यमत्त, बाळा[3]! या
स्वज्ञाति यादवांतें तूं यावरि नससि योग्य पाळाया ६८
आम्हीं स्नेह त्यजिला जो होता आजवरि; पुरे कष्ट;
नष्टश्री, मर्यादाभ्रष्ट, प्रभु आमचा न तूं स्पष्ट. ६९
सर्वां हि यादवांचा कंसा! तूं जाहलासि अपराधी;
'चुकलों,' म्हण वसुदेवा, सार्धीं आधीं, करीं न अपराधी. ७०
यांतें[4] सहाय घेवुनि, कृष्णांच्या[5] सांत्वनासि जा निलया,
मानिल यादववर्य प्रेमें तुजला हि, जेंवि मानिल या. ७१
भय आलें जवळ, कवळ करिल चि; उत्पात बहुत होतात.
बा! तनुजशोकदहनामाजि तुझा व्यर्थ न हुत हो तात." ७२
हें ऐकुनि कंस उठुनि गेला, रुचला न बोध आज्याचा;
हा, ज्याचा अंग पिता, त्या होय सखा चि वेनराज्याचा. ७३
जातां कंस उठोनि, स्नेहभय त्यजुनि जन[6] घरा गेला,
सर्वांसमाज तसा न च तो वसुदेव अनघ रागेला. ७४
अक्रूर पहाया त्या प्रभुतें जाय व्रजासि लवकरि तो;
ज्याच्या पदपद्माचा भस्म चि दुःखव्रजा[7]सि लव करितो. ७५

१. तू जर भोजकुलोत्पन्न असतास तर कोकिळासारखा मधुर बोलतास, म्हणून तुझ्या कर्णकटु भाषणानें तुझ्या कुलाविषयीं मला संशय येतो, असा भाव. २. न विटणारें, कमी न होणारें ३. मूढा! ४ वसुदेवास. ५. हस्तलिखित प्रतींत 'कंसाच्या' असा शब्द आहे. परंतु संदर्भावरून तो 'कृष्णाच्या असा पाहिजे. ही कवीची नजरचूक होय. ६. कंसाहूत-**पंत.** कंसानें बोलावून आणलेले. ७. व्रज=समुदाय.

अक्रूर धन्य, गावा त्यां भाग्योत्कर्ष काय हो ! याचा ?
सूचवि भुजदृक्स्फुरण[१] प्रभुला यत्संगलाभ होयाचा. ७६
जे जे मनोरथद्रुम[२], ते ते झाले जरी हि अवकेशी[३],
तरि अक्रूराआधीं प्रेषी तो दुष्ट अस्तिधव[४] केशी. ७७
केशी बाधे, सिंहें जेंवि वहु करिव्रजासि बाधावें,
गोप म्हणति, 'कृष्णा ! ये रक्ष लवकरि व्रजासि, बा ! धावें.' ७८
जाल्या होत्या गायी, गोपी पाहूनि वहु भयातुर, गा !
देवुनि अभय तयांतें, हटकी[५] खळकाळभुज[६] तया तुरगा[७]. ७९
भंगाया ये पसरुनि मुख, पिंजारुनि अयाल[८], यां न्याया[९],
अन्याय चि तो; कैंचें तेजें[१०] सुहीरक अयां[११] लया न्याया? ८०
न गणी तोटा पापी, तो टापा पीतपटविभुसि[१२] हाणी;
प्रभुचें तेज, तसें चि न खळधृष्टपण हि वदों शके वाणी. ८१
जो इंद्रनीळसन्मणिदीप्तींचा स्वच्छ सव्य भुज गाभा[१३],
त्या केशिमुखीं घाली कुतुकी[१४] जगदीश भव्यभुजगाभा[१५]. ८२
ज्याच्या ध्यानस्पर्शें मुनि होवुनि पूर्णकाम नाचावे,
त्या भव्यभुजा खळ तो, धरुनि मनीं चूर्णकामना, चावे. ८३
ते चावितां गळाले सर्व हि, जिन्हिं अशनिचे सखे दांत;
भलतें चि कर्म करितां, मलिनमति पडेल कां न खेदांत? ८४
भुज आंत सिरुनि फुगला, खळदेह, चिर्बुड[१६] जसा, तसा उलला.
मुक्त चि झाला, म्हणवुनि कवि या प्रभुच्या चि सद्गुणा भुलला.
प्रभुचा भुज तो बोध चि, त्या असुरा मोक्ष दे हयाकारा;

---

१. बाहु व नेत्र ह्यांचें हलणें २ कृष्णाला मारण्याबद्दलचे कंसाचे अनेक बेत व प्रयत्न. ३ वध्य—पंत. ४. कस—पंत. जरासंधदुहिता 'अस्ति' ही कंसाची स्त्री. ५. केशीला ६ दुष्टांना काळासारखे आहेत बाहु ज्याचे असा कृष्ण ७ त्या अश्वरूपी केशीला. ८ आयाळ, मानेवरील केंस. ९ न्यायमूर्ति कृष्णास १०. बळ, शक्ति ११. लोखंडास (घणास) १२ पीतांबरधारी देवास १३. आंतला भाग, उत्तम भाग १४. अद्भुत लीला करणारा. १५. प्रचंड सर्पाप्रमाणें कांति ज्याची तो. १६. शेंदाड.

जों मोह, तों कवि म्हणति, जों रुचिर हि अजर[1] देह, या कारा.[2]
केशिवधें हर्ष प्रभु देता झाला अनंत घोषातें;
त्यावरि नारद भेटे, पावुनि चित्तीं अपार तोषातें. ८७
देवर्षि म्हणे, "अजिता! तूं कीं तो त्र्यंबकप्रभु, जयाला
साधाया[3] क्षम होते, इतरांचे लक्ष ही न भुज याला. ८८
वधितीं न अवध्या या शस्त्रें वज्रादि कोटि केशीतें,
अरिचा प्रताप तेजें तव, कीं, रविच्या न तो टिके शीतें. ८९
वधिला केशी, केला त्वां प्रभुनें पूर्ण सुरसभाकाम;
यास्तव 'केशव' ऐसें म्यां कृष्णा! ठेविलें तुझें नाम. ९०
दृष्टि निवाली, निवविन कंसवधरसें हि या निवालीला,
मीं काय? वा यशस्विप्रवरा! तव बहुमता[4] शिवा लीला. ९१
पाहेन महाभारतसमरमखातें तव प्रसादानें,
तेणें मज हर्ष जसा, अधना निधिच्या नसे तसा दानें. ९२
रचितात शक्रलोकीं रम्य स्थानें नृपांसि नांदाया,
वीरें[5] स्वर्गा न करिल इंद्रें, पिता पुत्र पात्र कां दाया[6]? ९३
ध्वज उभविले सुरांहीं, आतां चि स्वर्गमार्ग शोभविला;
सिद्ध विमानें केलीं बहु देवस्त्रीसमूह लोभविला. ९४
वर्णिन गर्जुन अर्जुन सारे[7] चमत्कार फार पोसील;
जोसी लक्ष न गणितिल[8], कीं सारथि तू अनंत होसील. ९५
मीं सुस्वर[9] वीणारी वीणा रीतिज्ञें[10] वाजवूनि सुखें
गायिन तव नव चरितें, न वच[11] रितें एक ही निघेल मुखें."
ऐसें बोलुनि, आज्ञा घेवुनि, गेला सुरर्षि हर्षानें,

---

१ जरारहित. २ कैदखाना ३ जिंकण्यास ४. अति आवडती, मान्य. ५. इंद्र वीर ( वीरांना ) स्वर्गा पात्र का न करील? ६ वडिलोपार्जित मालमत्तेस. ७ उत्तम ( मोठमोठे ) ८ लक्ष जोसी ( ज्योतिषी ) गणना करण्यास असमर्थ होतील. ९ उत्तम स्वर असणारी १० वीणा वाजविण्यात कुशल [ असा मीं ]. ११. वायफळ

जो तापत्रय शमवि, प्रभुच्या चरितामृतासि वर्षोन. १७
गोप व्रजांत गेले, करुनि पुढें केशवासि आनंदें;
आलिंगिला प्रमोदें विजयी श्रीकृष्ण पुत्र हा नंदें. १८

# अध्याय सोळावा.

पावे व्रजासि बभ्रु[1] स्मरत[2] नुरवित्या[3] नतांपदा[3] सांजे[4].
श्रीपदरेणु धरि शिरीं, स्पर्शों देती न ताप दासां जे. १
भगवत्पदें विलोकुनि वंदी प्रेमें पथीं, गहिंवरून,
जेथें श्रीपदमुद्रा घडिघडि लोळे, नुठे महिवरून. २
आला व्रजीं अयपवनपरवशगति[5] साधुकाय[6] कापुस तो,
ज्यात्यासि पुसे नंदा[7], क्षुधित जसा अन्नदायका पुसतो. ३
जें बहु दुर्लभ दर्शन शक्रप्रमुखांचिया हि गोष्ठीतें[8],
तो दानपति विलोकी ब्रह्म घनश्याम नंदगोष्ठीं[9] तें. ४
रोमांचित होय प्रभु भक्त निजप्रेममत्त पाहून;
कां गांदिनी[10] म्हणेना, 'तप गुरु कोठें न मत्तपाहून'? ५
अक्रूर भक्त परम, प्रेमळ गमला, तसा हरिसमोर
हर्षें नाचे, न गणी कांहीं च अधिक घनापरिस मोर. ६
त्या रामकृष्ण भेटुनि बहु सत्कारिति पितृव्यतुल्यातें,
प्रभु सत्कृति पूर्ण करी, जें गंगा, करिल काय कुल्या[11] तें? ७
सर्व मनोरथ फळले, झाला अक्रूर साधु सानंद;

---

१. अक्रूर २. स्मरण करीत. ३. शरणागताच्या दुःखाचें हरण करणाऱ्यास. ४. सायंकाळीं ५. अय (सुदैव-) रूप वायूच्या सर्वस्वीं अधीन आहे गति (चाल, वेग) ज्याची असा, सुदैवरूपी वाऱ्यावर वाहत येणारा. ६ साधु जो अक्रूर त्याचा देह ७ नंद कोठें आहे असें. ८. सभेतें. ९. नंदाच्या गोठ्यांत. १०. अक्रूरमाता. ११. ओहोळ; ओढा

गेला सभेंत, भेटे, पूजी प्रेमेंकरूनि या नंद. ८
नंदसभेंत समग्र व्रजवासी गोप वृद्ध आणवुनीं,
कंसें स्वमुखें केली जी आज्ञा, ती तयांसि जाणवुनीं, ९
रामातें कृष्णातें दानपति म्हणे, ' तुम्हां न्हायाला
आलों; उद्यां रथावरि बसुनि, धनुर्मह चला पहायाला. १०
मथुरापुरी पहाल, स्वजनाचा सर्व ताप शमवाल,
भ्रमवाल शत्रुचित्त, श्रमवाल न बाहु, साधु रमवाल. ११
वसुदेवा कंस, तसा गांजी पापां[1] न देव कीनाश;
पावति, करुनि विषाचें मिळतां बा! पान देवकी नाश. १२
सत्पुत्र तुम्हीं असतां, बाधावा ताप काय तातातें?
जें पुत्र प्रसवुनि सुख पावावें, पावली न माता तें. १३
बा! पाजिलें, अपत्यें प्रसवुनि, अद्यापि पय न थानाहीं!
कां न भवदरि[2]वधूंच्या न्हाव्या, पावोनि भय, नथा[3] नाहीं? १४
या श्रीमुखचंद्रांहीं तोंषावी[4] देवकी चकोरी ती,
जवळि[5] असोनि न दर्शन, हे नयनांची धरूं नको रीती. १५
तुमची स्वजन घनाची नित्य पहातात वाट चातकसे,
रक्षा धांवुनि, होवूं द्याल, न देवूनि हात, घात कसे? १६
धरिला गोवर्धननग, दमिला कालियफणी महाकाय,
वधिला प्रलंब, धेनुक, वृष, केशी; कठिन हें मह[6]ा काय?' १७
ऐसें प्रभुला कळवी, ज्याच्या विश्वांत न क्रिया मांती[7],
बळ, कृष्ण, बभ्रु, यांला वदतां झाली क्षण त्रियामा[8] ती. १८
प्रातःकाळीं गोरसपात्रें शकटीं रचूनि, नंदातें

---

१. पापी जनांस. २ तुमच्या अरिभार्यांच्या—पंत. ३ नथा नाहीं का न न्हाव्या ( त्या विधवा का न व्हाव्या? ) ४. संतुष्ट करावी. ५ दोनी डोळे, अगदीं जवळ असून जशी त्याची भेट कधीं हि होत नाहीं तसें करूं नका ६. तेजास—पंत. ७. मावती. ८. रात्र

घेवुनि गोप निघाले, कर द्याया [1]कुमतिवल्लिकंदातें. १९
अक्रूर स्वरथावरि कर देवुनि रामकृष्ण बसवी ते,
दासातें मोक्षपदीं जे प्रभु करुणा करूनि बसवीते. २०
प्रभुनें सांगुनि रथ तो, सत्वर सोडूनि घोष, हाकविला;
गोपींची गोष्टि वदे व्यास न, मग काय दोष हा [3]कविला? २१
यमुनाह्रदासमीप स्थापुनि रथ, दानपति म्हणे, 'स्नान
करुनि ह्रदांत, करिन श्रीशेषाचें मग क्षण ध्यान.
तोंवरि रथ, हे वाजी, मणिकांचनभूषणें, पहा, रक्षा.' २२
ऐसें सांगे तो त्या निजनाथा विश्वरक्षणीं दक्षा. २३
'ये सत्वर तुजवांचुनि आम्हीं दोघे हि बा! नसों शक्त,'
भक्तप्रवरासि असें कृष्ण म्हणे [4]सदवनार्थ जो [5]व्यक्त. २४
करितां डोहीं मज्जन सज्जन अक्रूर भव्य तोयांत,
देखे स्पष्ट [6]रसातळ, अत्यद्भुत नागलोक तो यांत. २५
तेथें सहस्रमस्तक शेष पयःफेनधवळ तो पाहे;
ज्याच्या समीप ससचिव वासुकि जोडूनि कर उभा आहे. २६
ज्या [7]वीजितांत सविनय चामरकर कंबलाश्वतर नाग,
करितात स्तुतिपूजन भक्त, तयांवरि अपार अनुराग, २७
त्याच्या [8]उत्संगावरि [9]कनकनिभांबर नवांबुदश्याम
पाहे श्रीवत्सांक प्रभु, धामांचें हि जें [10]महाधाम २८
[11]पाहे शेष प्रभुच्या जवळ धवळमूर्ति रामसा च कवी;
प्रभु भक्तमोह पळवी, कळवी निजतत्व, [12]तामसां [13]चकवी. २९

१. खंडणी २. दुर्बुद्धिरूप वेलीच्या कांद्याला ३. अक्रूरानें श्रीकृष्णाला मथुरेला नेल्यावेळीं गोपींनीं जो शोक केला, त्याचें वर्णन हरिवंशांत व्यासांनीं केलेलें नाहीं, मग मीं हि तें केलें नाहीं, याबद्दल मी दोषास पात्र नाहीं. ४ सज्जनांच्या रक्षणाकरितां. ५. देहधारी, दृश्य ६. पाताळ ७ वारा घालीत होते. ८ अंगावर. ९. सुवर्णकांतिवस्त्र–(पीतांबर)–धारी. १०. तेजाचें मुख्य स्थान (खजिना) ११. अक्रूर 'पाहे' याचा कर्ता. १२. तमोगुणी माणसाला मोहांत घाली.

रामातें, कृष्णातें, लागे जों ओळखोनि बोलाया,
प्रभु निजतेजें स्तंभित[1] करि मुख, बोलों न दे चि लोला[2] या. ३०
उन्मज्जन[3] करुनि नृपा ! पाहे, तों असति निजरथीं दोघे,
मज्जन करितां, पुनरपि पहिलें दर्शन तसें चि बा ! तो घे. ३१
पाहुनि आश्चर्य निघे बाहिर अक्रूर, ये रथाजवळ;
प्राशी नेत्रयुगें तो अमृताचे रामकृष्ण हे कवळ[4]. ३२
कृष्ण म्हणे, 'दानपते ! त्वां भागवतह्रदांत[5] बा ! काय
आश्चर्य देखिलें? तव[6] दिसतो चिन्हें तसा चि हा काय.' ३३
साधु अमितदक्षिण[7] तो वदला, 'बा पुष्करेक्षणा ! कांहीं
तुजवांचुनि आश्चर्य त्रैलोक्यामाजि लेश ही नाहीं. ३४
तेथें जें आश्चर्य, प्रस्फुट येथें हि तें च बा ! पाहें;
बहुभाग्यें अनुभवितों, होय विषय उक्तिच्या न मापा हें. ३५
आश्चर्यासीं पडली गांठि, न करितां हि बा ! महायास;
बोलों बहु काय ? चला आश्चर्य चि मधुपुरीं पहायास. ३६
मथुरापुरीस जावें तोंवरि जों सर्व लोक भासविता
अस्तनगातें नाहीं गेला, करें[10] आवरूनि, हा सविता.' ३७
ऐसें प्रार्थुनि नंद प्रमुखसकळगोपसह चि दोघांतें
घेवुनि गेला सांजे, द्याया मथुरेसि महें[11], चिदोघांतें[12]. ३८
रक्तदिवाकरकाळीं[13] स्वगृहीं मथुरापुरींत ने त्यांतें,
पूजुनि अक्रूर असें हित सांगे सर्वलोकनेत्यांतें[14]:— ३९

---

१. स्तब्ध, कुंठित. २ [बोलण्याविषयीं] उत्सुकास. ३ पाण्याबाहेर (वर) येऊन. ४. घास (घोंट) ५. भगवतानें युक्त अशा डोहांत. ६ चिन्हें (बाह्य चिन्हावरून) हा तव काय (देह) तसा चि (आश्चर्यचकित) दिसतो. ७ अत्यंत सरळ असा; साधा ८. शब्दांनीं अप्रमेय (अवर्णनीय) ९. प्रकाशित करणारा, १०. किरण (प्रकाश). ११. उत्सव—**पंत.** १२. चैतन्याच्या (ज्ञानाच्या) ओघास (रामकृष्णांस) १३. सूर्य लाल असतो त्या वेळीं (सायंकाळीं). १४. नेत्यांतें=नियंत्यांस.

"वसुदेवगृहासि तुम्हीं जऱ्हि तनय, तऱ्ही न तनयसम जावें;
कंसाचें मन भजतें[1] अत्यंत अधर्म अनय, समजावें. ४०
वृद्धा वसुदेवाला निष्कृप नृप कंस करितसे जाच,
'जा च' म्हणतसे; रात्रौ[2] त्या कंटककोटिभरित सेजा चें. ४१
भेटों[3] असें, न लागे दुःखाचा त्या जयाउपरि वारा;
वारों[4] प्रथम प्रभु हो! तेजें भोजाधमा कुपरिवारा."
भगवान् म्हणे, "अतर्कित जावूं, पुरराजमार्ग बा! पाहूं;
कंसगृह हि अवलोकूं, तू जरि म्हणसील काय बापा! 'हूं.'[5]"
ऐसें ऐकुनि, कृष्णप्रभुचे चित्तें नमूनियां पाय,
राय ज्ञात्यांचा तो प्रमुदित होवुनि नृपाकडे जाय. ४४
लब्धानुमोदन प्रभु, जैसे बंधनविमुक्त करिवर, ते
पुरदर्शना निघाले, उत्सुक ज्यांचे प्रताप अरि[6]वरते. ४५
राजपथीं त्या प्रभुनीं वस्त्रार्थ प्रार्थिला रजकें[7] राया!
ज्यांच्या चरणांचें क्षम सर्वेच्छितपूर्तितें रज कराया. ४६
ज्याच्या प्रियार्थ वांटिति दुर्लभ सर्वस्व, परि टपापां[8] तें;
त्यांतें निंदुनि जोडी कंसाचा दुष्ट परिट पापांतें. ४७
खळ रंगकारें[9] रजक न, धिक्कार करूनि, तिळ हि कोमेला[10];
प्रभुच्या तळप्रहारें सहसा मस्तक फुटोनि, तो मेला. ४८
आवडलीं वैर[11] वस्त्रें घेवुनि, तेथुनि पुढें मग निघाले;
निर्भयराजपथीं ते, गजवरगहनीं जसे हरि, रिघाले. ४९
ज्यांची सत्कीर्ति अमरधेनूंच्या लाज दे खिलारा, या
प्रभुनीं माळाकार श्रीदामा साधु देखिला राया! ५०

---

१ सेवितें २. त्यास त्या रात्रीं म्हणजे कांट्यानीं भरलेल्या बिछान्यावर निजण्याची शिक्षा भोगण्याच्या वेळा च भासतात ३ ज्या भेटीनंतर वसुदेवास किंचित हि त्रास होणार नाहीं अशाप्रकारें भेटा. ४. निवारण करा. ५. तुझें अनुमोदन असेल तर ६ शत्रूंवर [ जाण्यास ] ७ परीट. ८. पटापट ९. रंगारी. १०. लज्जित झाला. ११. उचीं, सुदर.

श्रीदाम्याला म्हणती, ‘ आम्हांला हार, हे तुरे, गजरे,
दे माळाकारा ! तूं; वेष यथायोग्य आमुचे सज रे ! ’ ५०
तो पुष्पभूषणांहीं भूषवि दोघांचिया हि वरदेहा,
भगवान् प्रसन्न होवुनि, जेणें बहु वित्तलाभ, वर दे हा. ५२
मग कुब्जा मागितल्या दे जगदीशांसि अंगरागा[1], ती
केली ऋजु[2], झाली गुण, बांछुनियां कामसंगरा, गाती[3]. ५३
देवुनि कामवर[4], प्रभु नर्म[5] करुनि, पुसुनि सानुरागेला[6],
तेथुनि साग्रज भगवान् मग कंसाच्या धनुर्गृहा गेला. ५४
जें सर्वासुरपूजित, सुविशाळ, धनुष्य तें यशोधामें[7]
रामें त्र्यंबकधनुसें, तत्काळ ध्वंसिलें घनश्यामें. ५५
कांपविली मथुरा निजनादें त्या भंगतां धनुष्यानें,
कंसासि कळविलें तें आयुधगृहरक्षका मनुष्यानें. ५६
‘ आले गोप अतर्कित, वर्णें सितकृष्ण[8], ते वयें बाळ,
गुरुचाप भंगिला तो कृष्णें, गरुडें जसा महाव्याळ. ५७
गेला बाळ ध्वंसुनि चापातें, जेंवि नाग[9] खांबातें;
श्रीरामभुजीं बळ जें, या बाळभुजीं नसेल कां बा ! तें? ५८
गेले कोठें, न कळे, पडले आहेत दोन ते तुकडे,
धावत सांगाया मी आलों तुज भोजवंशकेतुकडे[10].’ ५९
कंस म्हणे त्या आयुधगृहरक्षकपुरुषासि, ‘ जा निघ रे ! ’
आपण जाय गृहीं; वरि धृष्ट, जळें लोण्यसा[11] मनीं विघरे. ६०
चिंता हृदयांत करी, ‘ भगिनीचे व्यर्थ मारिले सुत सा;
यत्नें दुर्वैधि[12] न शमे, तैलाचा सिंपिला जळें उतसा. ६१

---

१ उटणीं, सुगधी द्रव्ये २. सरळ. ३. गुण गाती झाली—**पंत.** ४ इच्छित वर. ५ क्रीडा. ६. अनुरक्त झालेल्या [ कुब्जेला ]. ७. ‘ रामें किंवा ‘ घनश्यामें ’ यांचें विशेषण ८ एक गोरा व एक काळा. ९. हत्ती. १० केतु=श्रेष्ठ पुरुष. १०. वरून (दिसण्यांत) धीट ११. ढेंकळासारखा विरघळला. १२ कपाळीं असलेलें विधि-दुर्लिखित.

रक्षकपुरुषसमक्ष च्वंसुनि वरधनु, न भी वयें बाळ;
बहुधा नारदवाक्य न मिथ्या, माझा खरा चि हा काळ. ६२
अथवा करिन चि अरिचा हरिचा वंचूनि घात अंतकसा.'
ऐसें चिंतुनि पाहे, कीं रचिला रंगकोण मंचकसा. ६३
भृत्यांसि म्हणे, 'शास्त्रीं साहित्य असेल जें जसें उक्त,
कल्पा करीषराशिप्रमुख, धनुर्मह उद्यां, रहा युक्त.' ६४
स्वस्थ नव्हे कंस, सिरे तद्धृदयीं मृत्युभीतिचा भल्ल;
चाणूरमुष्टिकाभिध जे, ते गेहांत आणवी मल्ल. ६५
त्यांसि म्हणे, 'उपकार स्मरत जरि असाल, तरि तुम्हीं आर्य
व्हाया अनृण, करा या स्वप्रभुचें, पण करूनि, हें कार्य. ६६
मारा रंगांत उद्यां भुजयुद्धीं रामकृष्ण हे मद्री;
यांहीं मथुरा अहिता मज, सर्पाहीं जशी च हेमदरी.' ६७
चाणूर मूढ, कंस हि; ऐकवि पण चित्ततुष्टिकर हा या;
तो ही प्रभुच्या वैरें इच्छी न स्वासु मुष्टिक रहाया. ६८
अत्यद्भुतप्रतापीं प्रभुच्या नव्हतें चि लेश गूढपण,
तरि तद्वधार्थ करवी कंस, करिति ते हि मल्ल मूढ पण. ६९
'मीं सर्वस्वें तुमचा; कार्यार्थ व्यर्थ हो न हा मात्र.'
वदुनि असें, ते प्रेषुनि, आणविला त्या खळें महामात्र. ७०
त्यासि म्हणे, 'स्थापावा रंगद्वारीं च कुवलयापीड,
येतां बळ कृष्ण, गजें, द्याया मद्रत्नसुवलया, पीड. ७१
वसुदेवसुत करावे त्वां, प्रेरुनि नागें, पिष्ट चिरडून;
बुडतील सर्व यादव, कीं त्यजिति प्राण इष्ट चि, रडून. ७२

---

१ रंगमंडपाचा कोपरा मंचकासारखा तयार केला किंवा नाहीं हें पाहूं लागला ,२. तयार करा ३ गोंवऱ्याचा ढीग वगैरे. ४ तयार ५. भाला. ६ ज्याप्रमाणें सुवर्णानें भरलेली गुहा सर्पांच्या योगानें घातक होते, त्याप्रमाणें ही मथुरानगरी या उभयतांमुळें मला घातक झाली आहे ७. महात. ८. ह्या नांवाचा कंसाचा मदमस्त हत्ती. ९. माझ्या रत्नजडित कड्याला. १०. हत्ती.

कृष्ण प्रथम वधावा, मग यादव कृष्णपक्ष मद्रिपु रे!
किति मद्बळापुढें हे? पविवेग सहावया न अद्रि पुरे. ७३
मद्रिपु कृष्ण, तयाच्या पक्षीं खळ उग्रसेन हा मंद;
त्यजिला म्यां, त्यागावा उन्मूलन करुनि विषलताकंद. ७४
मत्कृत यादवनिधनें सर्व तुम्हीं हृष्ट उग्रसे नाचा.
माझे रिपु यादव, मीं यादवरिपु, न सुत उग्रसेनाचा. ७५
हा अल्पवीर्य मानुष, ऐशापासूनि मीं महातेजा
होइन कसा असा? रे! नर सुर ही कांपती पहाते ज्या. ७६
गुह्य विधिसुतें कथिलें, तरि च हिरुनि या पदा महामात्रा!
भोगितसें मीं; माझी शक्ति असि परा गदा महामात्रा.' ७७
त्यासि महामात्र म्हणे, 'न असी बहुधा कुलीनजननीती;
चुकली असें म्हणावें, तरि तव बहु धाकुली न जननी ती. ७८
राज्या! कुलस्त्रिया ज्या, स्पर्शों देती न पर शरीरा या;
जें प्राकृतां हि न करी, तें त्वज्जननी कसें करी राया!? ७९
गुह्य विधिसुतें कथिलें तें ऐकावें, असें मला गमतें;
अश्रद्धेय तसें हें अत्याश्चर्य, प्रभो! मन भ्रमतें.' ८०
कंस म्हणे, "नारदमुनि, धन्य कराया मज, स्वयें आला,
त्याला मत्कृतसत्कृतियोगें आनंद फारसा झाला. ८१
वदला मग मज ऐसें, 'कंसा! आलों तुझें हित कराया;
हो सावधान, हृदयीं स्थापीं तूं मद्वचा हितकरा या. ८२
मेरुवरि सुरसभेतें गेलों, ऐकोनि देवमंत्रास,
आलों धांवत चि तुझा दूर कराया विनाशसंत्रास. ८३
होणार देवकीचा अष्टम सुत अजित विष्णु बा राया!
ताराया स्वजनातें, द्वेषें तुज सानुगांसि माराया. ८४

१ कृष्णाच्या बाजूचे २. रुद्र—पंत. ३ नारदानें ४ प्रबल असा ५. ती तव जननी बहु धाकुली (असमंजस) न ६. परपुरुष. ७ साधारण प्रतीची स्त्री. ८. विश्वास न बसण्यासारखें. ९. सत्कृति=सत्कार, आदरातिथ्य. १०. त्वत्पक्षीयांसह.

यास्तव यत्न करूनि, प्रथमापासूनि देवकीगर्भ
त्वां छेदावे, जेंवि स्वहितानुष्ठानतत्परें दर्भ. ८५
हा उग्रसेन न पिता, तात तुझा सौभपाळक द्रुमिळ;[1]
त्याच्या चि तूं मतासीं, व्हायासि सफळ मनोरथद्रु[2], मिळ.' ८६
किंचिद्रोषसमन्वित होवुनि वदलों मुनीस, 'सांग मला
माझी माता कुलजा, व्यभिचार तसीस कार्य कां गमला?' ८७
मुनि सांगे, "घेवूनि स्वसख्या क्रीडावया तुझी माय
स्त्रीधर्मवती[3] असतां, रम्यवनीं यामुनीं नगीं जाय. ८८
सौभपति द्रुमिळ असुर भाविबळें[4] त्या चि पर्वतीं आला,
झाला स्मरवश, भुलवी त्याला तव मातृभा[5] जसी हाला[6]. ८९
चित्तीं तो असुर म्हणे, 'निःसंशय उर्वशी च हे परमा,
कीं श्री; यावी येथें वैकुंठ त्यजुनि, परि कधीं न रमा.' ९०
सूतासि म्हणे, 'येथें रथ रक्षुनि तूं उभा असा चि रहा;
जातों त्या युवतिकडे, न शकें चि इच्या सहावया विरहा.' ९१
ऐसें म्हणुनि निघे तो, आचमन करी, धरी मग ध्यान;
तों 'उग्रसेनभूपत्नी' ऐसें जाहलें तया ज्ञान. ९२
कळतां तत्व म्हणे, 'हे स्वकराला निजवधूसमा यावी.'
घे उग्रसेनरूप, स्वमनीं तो वंचकला[7] न मायावी. ९३
वांछित, घालुनि गाढि छंदें त्या रम्यमूर्तिसह, साधी;
तव मातेची शंके सुरतगुरुत्वें[8] करूनि सहसा धी. ९४
'जंबुक असोनि, कपटें भ्रमवाया जाहलासि काळविट,'
ती त्यासि म्हणे, 'वद रे! तूं कोण सतीव्रतैककाळ विट[9]? ९५
[10]न कसा तनुमृत्पात्रा तुज चि अनाचार हा तडा गमला?

१. एक दानव. २. द्रु=वृक्ष. ३ रजस्वला. ४. होणाऱ्या दुर्दैवप्रभावानें. ५. भा=कांति, सौंदर्य. ६. दारू, मद्य ७. कपटानें. ८. गुरुत्व=तीव्र वेग ९. पातिव्रत्याचा काळ असा जार. १० अनाचार हा शरीररूपी मडक्याचा भंग करणारा आहे, हें तुझ्या कसें लक्ष्यांत आलें नाहीं?

त्वां लाविला कसा रे पापा ! लावूनि हात, डाग मला ?' ९६
त्वन्मातेसि म्हणे तो, "सौभपति द्रुमिळनाम दानव मीं;
मूढे ! पंडितमानिनि ! कां कोपसि ? विष चि होय मान वर्मी[1]. ९७
वद, कोणतीस नाहीं घडला व्यभिचार ? मानुषी योषा[2]
या तों अमानुषांच्या संयोगानें न पावती दोषा. ९८
गे ! चित्तचंचळत्वें स्वांप्न[3] व्यभिचार घडतसे स्पष्ट,
तेंवि अमानुषसंगें होय स्त्रीरत्न न व्रतभ्रष्ट[5].  ९९
सुरसंकाश[4]सुतांतें व्यभिचारें प्रसवल्या स्त्रिया असती;
झाल्या अमानुषपुरुषसंगें लोकांत कोणत्या असती ? १००
त्वां 'कोण' असें पुसिलें, यास्तव तुज पुत्र 'कंस' या नावें
होयिल महाप्रतापी, कविनीं ज्याचें चरित्र वानावें." १०१
त्वन्माता त्यासि म्हणे, 'हा ! धूधा ! वर तुझा जळो, पापा !
सर्वा स्त्रिया कसा रे ! निंदिसि ? दुर्वृत्त पात्र तूं शापा. १०२
आहेत नीचवृत्ता, किति सद्वृत्ता स्त्रिया अरे मूढा !
काय अरुंधत्याद्या विश्वांत महापतिव्रता गूढा[6] ? १०३
मत्पतिवंशीं होयिल तव सुत तव मृत्यु, घे खळा ! शाप;
ताप प्राप्त तुज असो, कोणास पचेल पामरा ! पाप ?' १०४
ऐसा घेवुनि शाप द्रुमिळ स्वस्यंदनोत्तमीं चढला,
आकाशपथें गेला, भ्रमला खळ वेदशास्त्र ही पढला. १०५
अतिदीना त्वन्माता, संगें घेवूनि तापल्या[7] आली,
मथुरेसि, पूर्वकर्मा[8] हृदयीं निंदीत आपल्या, आली." १०६
कथुनि असें, मुनि वीणा वाजवित क्रमुनियां नभा गेला,
हें सत्य; उग्रसेना मीं त्या ही नावडें नभागेला[9]. १०७
बलवीर्यादिगुणांहीं भिन्न चि मीं, उग्रसेनसुत नोहें;

---

१ मानातें ओकून टाक-**पंत.** २. योषा=स्त्रिया. ३ स्वप्नांतील. ४ सकाश=सारखा ५. भ्रष्ट, व्यभिचारिणी. ६ गुप्त, अप्रसिद्ध. ७ दुःखानें पोळलेल्या सख्या. ८. पूर्वजन्मींच्या कर्मविपाकाला. ९. दैवहीना-**पंत.**

खीस न म्हणता काय, 'प्रेमोचितें पुत्ररत्न सुतनो! हें'? १०८
मुनिनें कथिलें सत्य, प्रत्यय आला, मजप्रति ज्ञाती
न भजति; केली साची करणें लागे मज प्रतिज्ञा ती. १०९
यास्तव सिद्ध समाजद्वारीं च पहात कृष्ण राम रहा;
येतां चि करी ढकलुनि मार चि, दोघे म्हणोत पामर 'हा!'"

---

## अध्याय सतरावा.

दुसरे दिवसीं राज्या! पौरांहीं हर्ष बहु मनीं धरिला
समर पहाया, येवुनि शीघ्र महारंग सर्व ही भरिला. १
त्या त्या मंचीं ते ते विप्रादि समग्र जन सुखें बसले;
जेंवि विमानांत अमरगंधर्वादिक, तसे समुल्लसले. २
वरमंच वेगळाले विप्रादिस्त्रीजनें हि शोभविले;
वेश्यांच्या मंचांहीं बहु कामी मधुपसे चि लोभविले. ३
उपरिगृहीं राजवधू, जेथें अतिरम्य जवनिका; राज्या!
देवी च करिति भजनें, प्रिय न सहाती च लव निकारा ज्या. ४
प्राङ्मुख कांचनमंचीं इंदु तसा भोजनायक विराजे;
बसले स्वोचितमंचीं रत्नांबररम्यकाय कविराजे. ५
प्रथम कुवलयापीड द्विरद द्वारापुढें उभा करवी.
मग मंचीं कंस बसे. न गमे चि प्राकृतांसि तो न रवी; ६

---

१ याचा कर्ता 'उग्रसेन.' २. मूळ पाठ–**प्रेमास्पद.** ३. हे सुदति! ४. सर्वयादववध–**पंत.** ५. समाद्वारीं. ६. हत्ती. ७. नागरिकानीं. ८. शोभले. ९. अमराप्रमाणें. १० वरल्या मजल्यावर. ११. पडदे. १२. भजनें देवी च करिति= सेवकजन त्याची व्यवस्था राणीप्रमाणें च ठेवीत होते. १३ अपमानास. १४. पूर्वेकडे तोंड करून. १५. रत्नजडित वस्त्रांमुळें सुंदर दिसत होते देह ज्यांचे असे. १६. धर्मनीतिज्ञ पंडित–**पंत.**

मग राजमल्ल आले चाणूरप्रमुख ते महाकाय;
पाहुनि जन म्हणति, 'अहो! अतिभीषणरूप हें पहा काय!' ७
वाजत गाजत आले बळकृष्ण नियुद्ध[1]लालस द्वारीं,
ज्यांची पावत आली बहु बहुमानास चाल सद्द्वारीं[2]. ८
रोधी द्वार गजानें, दे त्यांसि महात वाट न विरोधी;
कीं, शोकीं वृष्णींची, पाहुनि बळकृष्णपाटन[3], विरो[4] धी. ९
प्रभुवरि जेव्हां प्रेरी तो तरुणा सिंधुरा महामात्र,
सर्व म्हणति 'हा!', न म्हणे, जन्हि करुणासिंधु राम, हा मात्र.
प्रभु चित्तांत म्हणे, 're कंसा! जरि वांछितोसि वध माजा,
तरि सानुग सामात्य स्वान्यायें तूं लयासि अधमा! जा.' ११
जो म्हणणारा शका, 'अपयश होयिल, धरूं नको पविला,'
प्रभुनें येतां तो खळ, तळशब्द[6] पुढें करून, कोपविला. १२
घनसा गर्जे, गांठी, कुंडलित पुढें करी कर करूनीं;
सर्पातें गरुड तसा, त्यातें भगवान् धरी करकरूनी. १३
रगडुनि, धरुनि उरासीं शुंडा. दंतांतरीं चिकटला हो!
नाग म्हणे, 'मरणातें, अरि सांपडला भला निकट, लाहो.' १४
दंतांतरांतुनि निघुनि, चरणांत गजाचिया मग दडाला;
बहु यत्न करि धराया; परि सांपडतो कसा प्रभु जडाला? १५
शुंडेपासूनि सुटे, करितां दंतप्रहार ही चुकवी;
प्रबळा हि सांपडेना तो प्रभु, कामादिका जसा सुकवी. १६
प्रभु पाडी तोंडघसीं, फरफर ओढी धरूनि पुच्छातें;
शतवार सव्य दक्षिण फिरवी, करि घावरें चि तुच्छातें. १७
वात जसा मेघातें, प्रभु नागातें तसा चि हेलांळी;

---

१ कुस्तीचे शोकी. २. साधुसमाजीं—**पंत.** ३. पाटन=फाडणें, चुराडा. ४ वुडो, विरून (विरघळून) जावो. ५ हत्तीला ६ [चिडविण्यासाठीं टाळी वाजवून. ७. मुरडलेली. ८ सोंड. ९. मरणातें लाहो—**पंत.** १०. हेलकावे देरें, घुसळी.

कवि म्हणती, 'साधुसभाकर्णींची युद्धकेलि हे बाळी.' १८
आधीं बाळक्रीडा करुनि क्षण, मग मनांत वध आणी;
देवुनि चरण ललाटीं, उपडी तत्काळ दंत अरिपाणी. १९
नगनिर्गतभुजगातें गरुड तसा पुच्छ धरुनि बळ ताणी;
त्याच्या दंतें चि तया दुष्टातें मस्तकीं च हरि हाणी. २०
हगला, मुतला, भ्रमला, वमला रक्तप्रवाह भडभड तो;
गजपक तसा चि वधिला; कोल्हा हरि दूर तों चि बडबडतो.
स्थूळ बहिर्द्वाराचे उपडुनि बळकृष्ण घेति खांब करीं;
गजपादरक्षक वधिति; गमति प्रभु सिंह, ते न कां बकरीं? २२
किति म्हणति, 'रामकृष्ण प्रभु घेवुनि अशनिचे सखे दांत,
रंगीं सिरले दोघे वीरवर, अखेद ते सखेदांत.' २३
रामप्रभु होय पुढें, कृष्णप्रभु दंतधर तयामागें;
अवलोकिले परजनें ते, बर्हीं पक्षिपति जसे नागें. २४
श्रीरामकृष्ण पाहुनि, पावे बहु कंसमति विषादास;
यादव न भीति मला, रुद्राचे जेंवि अतिविषा दास. २५
रंगीं प्रवेशले प्रभु ते दोघे दस्रसे रुचिरकाय;
जनदृष्टि म्हणे, 'भाग्यें प्राशीन असे चि हे सुचिर काय?' २६
समजे कंस बहु तदा रामीं कृष्णीं प्रजानुरागा या;
कोपोनि मनांत म्हणे, 'रे मदरिगुणव्रजा! जुरा गाया.' २७
निःशब्द रंग करवुनि कंस म्हणे, 'लेश न धरितां भीड,
कृष्णासीं चाणूरा! रामासीं तूं हि मुष्टिका! भीड.' २८
चाणूर प्रभुवर ये भंगाया, जेंवि पर्वत पविवर;
याचें बळ किति? पावे कनककशिपुचें हि सर्व तप विवरं. २९
तेव्हां म्हणती वृद्ध, स्त्री, शिशु, नंदादि सर्व बल्लव 'हा!'

---

१. कानातील बाळी २ चक्रपाणी ३ नग=पर्वत+निर्गत=बाहेर निघालेला. ४. महात. ५. दुःखी सभासदांत. ६ मोर व गरुड ७ अश्विनीकुमाराप्रमाणें. ८. व्रज=समुदाय. ९ बिळांत जाई (नष्ट होई)

'पल्लव हा, कंटक हा, बा कृष्णा ! यश, वधूनि मल्ल, वहा.' ३०
यदु म्हणति, 'उग्रसेन स्वच्छगुण स्पष्ट हंस, हा तनय
श्लाघ्य नव्हे या, केवळ मलिन जसा काक कंस हा तनय.' ३१
कृष्ण म्हणे, "जन हो ! मीं बाळ, वयें अधिक मल्ल हा आहे;
जाणे धर्म प्रभु जो, तुल्यांचें बाहुयुद्ध तो पाहे. ३२
या गिरिसीं हि भिडेन, न दूषीन नियुद्धधर्म मीं कांहीं;
'शस्त्रहता स्वर्ग जसा' सुज्ञ म्हणति, 'भुजहता तसा नाहीं.'
शस्त्ररणीं ती सिद्धि, प्रतिभट व्हाया परासु ताडावा;
भुजयुद्धीं सिद्धि असी कीं, प्रतियोद्धा झटोनि पाडावा. ३४
भुजयुद्ध अवैर, तया स्पष्ट कराया सवैर हा पाहे,
निग्रह पावेल रणीं, धर्म कधीं न च अतिक्रमा साहे. ३५
याणें, 'निजप्रताप चि रंगीं व्हावा,' धरूनि हा हेत,
मल्लनिपातानंतर वधिले, वृद्धांसि विदित आहेत. ३६
रंगीं प्रतापकामें मल्लांचा घात करविता कर्ता,
तो वध्य; अशा दुष्टां दमिता सुकृती खरा धराभर्ता." ३७
ऐसें वदोनि, विभुनें हस्तीं धरिला सलील चाणूर,
कीं गगनगतामरमुनिचित्तीं, 'प्रभु परवधूंत आणू रँ.' ३८
मग मल्लशास्त्र सर्व हि धन्य कराया, करि प्रभु क्रीडा;
त्या भुजयुद्धा उपमा योजुनि, बहु पावले कवि व्रीडा. ३९
युद्धचमत्कारशत प्रकटुनि परमल्लमानसें भिववी;
प्रभु वृष्णिविप्रनंदप्रमुखसकळसाधुलोचनें निववी ४०
सकळा मंचांत महाहर्षभरें 'साधु! कृष्ण! साधु!' असे
बहु साधुवाद उठले, ते खळहृदयासि सोसतील कसे? ४१
कंस प्रस्विन्नवदन तूर्यांतें सव्यपाणिनें वारी,

---

१. सोडिली आहे नीति ज्यानें असा. २. कुस्तीचे नियम. ३ गतप्राण ४. शासनकर्ता ५. राजा. ६ गगनगत=आकाशस्थ ७. रडें, रट ८. घामानें भरलें आहे तोंड ज्याचें असा. ९ वाद्यांतें.

तों अमित देवतूर्यें राया ! गगनांत वाजलीं भारी. ४२
सप्तर्षि नभीं वदले, ' मार कसा यासि, होय दानव हा;
[1]क्रीडारसप्रवाहीं वा भक्तमयूरतोयदा ! न वहीं. ' ४३
प्रभु कांहीं अधिक बळ प्रकटी, तों कंप भूमिला घडला;
मंच सकळ डगमगले, कंसमुकुटमणि गळोनियां पडला ! ४४
लववुनि चाणूरातें बाहूनीं, जानुनें उरीं ताडी;
हाणूनि मुष्टि माथां, नेत्रें बाहेर तत्क्षणीं पाडी. ४५
लोचनपिंड सबंधन कनकाच्या जेंवि लोंबती घांटा;
प्रभुनें क्षितिहृदयींचा तो उपडुनि काढिला असा कांटा. ४६
हतचाणूरशरीरें होय महारंग स[2]न्निरुद्ध; तसा
हा काय? प्रभुनामें नुरती कामादि परम उद्धत सा. ४७
रामें मुष्टिक धरिला, गज सिंहें, सिंह जेंवि शर[3]भानें,
ज्याच्या [4]तेजश्रवणें सोडावे तत्क्षणीं च पर [5]भानें. ४८
जो निजजनहृदयींचें नाहींसें जाणतो सलें कराया,
त्या प्रभुनें ही धरिला, मल्ल [6]अतिप्राण तो सलैंक राया ! ४९
नगशृंगोपम गुरु परि उचलुनि रंगांत परम नीच, पळें
फिरवुनि शतगुण, चुरिला, बहुत दिला कंप परमनीं चपळें.
करि मुष्टिनें चि मुष्टिकशिर चूर्ण चि देव [7]असितवासा जो;
बळ तो बळ, खळ तो खळ, कोण म्हणो 'जेंवि असि तवा साजो'?
प्रभुनीं भुजप्रतापें निर्मल समाजवाट जो केला,
तो होय भीमदर्शन, गोपांचा धीर तत्क्षणीं गेला. ५२

---

१ खेळांत च गुंतू नकोस—नुसत्या हुलकावण्या च दाखवीत बसू नकोस. २ व्याप्त ३. सिंहास हि मारणारा असा प्राणिविशेष. ४ ज्या बळरामाचा पराक्रम ऐकून च शत्रुनें देहभाव विसरावें. ५. शल्य, कांटा ६ महाबलाढ्य. ७; या नांवाचा. ८ जड ९. काळें वस्त्र धारण करणारा बळराम. १० सभास्थान; रंग. ११. दिसण्यांत भयकर.

जेंवि वनोद्देशीं वधुनि मत्त द्विरदांसि हरि, तसा रंग
वश सोग्रज कृष्ण करी; पर गमले भीतिभरित सारंग[2]. ५३
स्तन देवकीसतीचे स्रवती बहु दुग्ध धरुनि पान्हा, ते
झाले प्रेमजळभरें अभिषेकें शंभुसे चि वा! न्हाते. ५४
झाला सुतविजयसुखें वृद्ध हि वसुदेव तरुणसा राया!
पुत्रप्रताप तापा पटु, आंधारासि अरुण, साराया. ५५
सप्रेम वारमुख्या[3] अवलोकिति रामकृष्णवदनातें,
जेंवि शतच्छदलातें भृंगी; सौभाग्य ये न मदना तें. ५६
किंबहुना सर्व स्त्रीपुरुष पुरुषरत्न शौरितनुजांहीं
निपट भुलविले; वरिली तेव्हां अनिमेषता चि मनुजांहीं. ५७
बहु अपकर्षें अयशें कंस प्रस्विन्नभाळतळ मळला;
हृदयांत करुनि दीप्त द्वेषक्रोधाग्नि बाळ[6] तळमळला. ५८
भृत्यांतें कंस म्हणे, 'काय पहातां उगे चि? हूं! गाढा,
घ्या यष्टि, वनेचर हे या रंगांतूनि या क्षणीं काढा. ५९
हे विकृत पापदर्शन न पाहावे गोप, कोप मज आला;
सर्वस्व हरुनि, गवळी राज्याबाहेर सर्व ही घाला. ६०
नंद स्वामिद्रोही, कपटी लोकांत याअसा थोडा;
खोडा चि उचित, परि हा वृद्ध म्हणुनि लोहशृंखळा जोडा. ६१
वसुदेव हि दुर्वृत्त, स्वामिविनाशैककाम[10] हा निवटा[11];
स्वाहितभूताश्रय[12] जो, त्या तो योग्या चि होय हानि वटा.' ६२
ऐसी आज्ञा करितां, प्रभु कोपें त्या खळाकडे पाहे,

---

१. उद्देश=प्रदेश. २ हरिण. ३. श्रेष्ठ वेश्या. ४ कमळातें. ५. पापण्या न लवणें हा गुण. ६ घोरासारखा अज्ञ. ७ चीत करा ८. विद्रूप. ९ अशुभ आहे दर्शन ज्याचें असे. १० धन्याचा नाश व्हावा ही च केवळ ज्याची इच्छा असा. ११. समूळ नाहींसा करा. १२. आपल्यास अनिष्ट असें भूत आहे ज्यावर असा (वटवृक्ष).

न पित्याचा, नंदाचा, परम अधिक्षेप आपला साहे. ६३
ज्ञातिव्यथा विसंज्ञा निजमाता देवकी सती लक्षी,
रंगांतूनि उडे प्रभु हरिसा किंवा जसा महापक्षी. ६४
उडतां न पाहिला हो! तो काळ जसा करावया कवळ;
मंचावरि पौराहीं प्रभु कंसाच्या चि देखिला जवळ. ६५
कंसाला वाटे, प्रभु आकाशांतूनि पातला काय!
उडवुनि मुकुट, कच धरुनि, रंगीं ढकलूनि घातला काय. ६६
मंचावरूनि भूवरि पाडुनि, टाकी उडी तयाचवरी;
भगवत्क्षोभें पावे छत्रासह तत्क्षणीं लया चवरी. ६७
उद्धरितां, तीर्थपदें प्रभुनें टाकूनि वरि उडी, दमुनी,
रोमांचिततनु म्हणती, 'केलों तांदुळ चि कीं उडीद,' मुनी. ६८
प्रभु केश धरुनि जेव्हां त्या रंगीं कंसदेह आकर्षी,
'श्रीकृष्णो जयति' असें म्हणुनि, करी गाननृत्य नाकर्षी. ६९
जे दुःखित होते, त्या मित्रांतें द्यावयासि हरिखातें,
प्रभु कंसदेह ओढी; निर्मी रंगीं विशाळ परिखातें. ७०
राम वधी, दुर्मिळतनुज कंसप्रियमित्र जो सुनामा, या;
त्यां तदसु म्हणति जाणों, 'याच्या याउपरि सोसुना माया.' ७१
मारुनि अरितें असकृद्दंश करि तया जसें चि सापातें,
तापातें हरुनि, प्रभु साग्रज भेटे नमूनि बापातें. ७२
मग देवकी स्वमाता, करुनि महाशत्रुवधउपाय, नतें
रामें कृष्णें नमिली; दुःखशमन नमन जें उपायन तें. ७३
आलिंगी निजनंदन, शिर हुंगी, प्रेमभव सदश्रु तिचें

---

१. दुर्भाषणानें केलेला अपमान. २ बेशुद्धि ३ तीर्थ (भागीरथी) आहे पदीं ज्याच्या. ४ रोमांचिततनु मुनि म्हणती–**पंत** ५. उडदाला तांदुळाच्या योग्यतेचा केला. ६. मूळ पाठ–**कीं मूग हा.** ७ खदकांतें ८. रामातें–**पंत.** ९. भेट, नजराणा. १०. प्रेमानें उत्पन्न झालेले.

अभिषेकीं, निवुनि सुखें निववो तें योगिनुत[1] पद श्रुतिचें. ७४
जे अंधकदमनाचे[2], करूनि सदरिदलन[3] पाठ, वीर गडी,
त्यांचे भुज ती माता, परमर्दनकष्ट[4] आठवी, रगडी. ७५
आनंदविले प्रभुनीं वंदुनि, भेटुनि, यथानय ज्ञाती.
विश्वासि अक्षयसुगतिदा ये कोण्हा कथा न यज्ञा ती. ७६
कर जोडुनि कुशळ पुसति सर्वां ही नम्रकाय जीर्णांतें[5];
म्हणति, 'तुम्हीं गुरु, आम्हीं शिशु, हें उपचार[6] काय जी! नातें?'

## अध्याय अठरावा.

कंसस्त्रिया, मिळुनियां आलिंगुनियां मृता इलापातें[7],
मगधपतिसुता करिती शोकार्ता बहुविधा विलापातें. १
तन्माता हि बहु रडे, पतिस म्हणे, 'शोक दूर सारा, जा;
कृष्णप्रभुची आज्ञा घ्या, हो संस्कारपात्र[8] हा राजा.' २
यादवसभेंत कृष्णप्रभुस हि म्हणवी दयासुरस 'हाय!'
असुरत्रास तुराया करित चि आले जया सुर सहाय. ३
त्या उग्रसेन विनवी, 'झाला पापें चि हा तनय नाहीं[9];
न पहाया ऐसा खळ, जोडावे विधिस हात, नयनाहीं. ४
यश वाढविलें अद्भुतः केलें, निवटूनि दुष्ट, सत्कार्य.
सज्जनसभेंत[10] होसिल सुकविकृतस्तवनतुष्ट, सत्कार्य. ५
कंससचिव कंसाचें सर्वस्व त्वत्पदीं वहातील,
मजसह तपोवनीं मृगसह मद्भार्या स्नुषा रहातील. ६
विज्ञाप्य[11] तुज प्रभुला हें चि असे कीं, घडो क्रिया उचिता,

१ योग्यानीं स्तविलेला व वेदाचें महादैवत असा कृष्ण. २ शंकराचे. ३. सज्जनांच्या शत्रूंचें मर्दन करण्याच्या कामीं अगदीं तरबेज होऊन. ४. शत्रूंचें मर्दन करण्यांत पडलेले कष्ट ५. वयोवृद्ध माणसांना. ६. औपचारिक. ७ पृथ्वीपति कंसातें. ८ संस्कार—प्रेताची उत्तरक्रिया. ९. नाहींसा, नष्ट १०. सज्जनसभेंत सत्कार्य होसिल—पंत. ११ विज्ञापना, विनति.

प्राप्ता तव प्रसादें हो त्या प्रेतासि केशवा! शुचिता.' ७
श्रीकृष्ण म्हणे, 'वदसी या काळीं होय जें उचित, राज्या!
व्हाव्या दोघांच्या ही, योग्या अंत्यक्रिया शुचितरा[1] ज्या. ८
तूं सत्कुळज, ज्ञाता, ताता! तुज सर्व ठावुकें आहे;
कर्में काळें[2] होती, जाती प्राणी अशेष ही बा! हे. ९
दीनानुग्रहकारक, शक्रसम पराक्रमी, बहु ज्ञाते,
दाते भूपति झाले, नेले काळें चिरायु ही बा! ते. १०
बा! मीं निमित्त[3]मात्र, स्पष्ट जसा खड्ग जाण; हा तनय
कर्माधीनें काळें संहरिला हा[4]तधर्म हा[5]तनय. ११
राजा! राज्य मज नको, त्वत्सुत वधिला न राज्यकामानें;
ठावा तुज, हा दंडावांचुनि वळता कधीं न सामानें. १२
लोकहितार्थ, यशोर्थ, स्वकुळाचा काळ मारिला कंस;
वायस काय सहाय सहृदया? बहुमान्य सद्गुणी हंस. १३
गोपसह जसी यमुनातीरीं गोवर्धनीं वनीं केली,
गोवृंदांत [6]वनेचर करिन प्रेमें तसी च मीं केली. १४
चित्तीं व्यथा नसेल, प्रेमा मजवरि असेल जरि साचा,
राज्यपदा योग तुझा तरि हो, लोहा जसा चि परिसाचा. १५
राज्य तुझें तूं चि करीं, न करावा त्वां नकार बा ज्ञात्या!
मान्या आम्हांसि तुझ्या, ज्या वेदाच्या, जशा च आज्ञा त्या.
चित्तीं असेल करणें मत्प्रिय, तरि तूं चि पूज्य राज्य करीं;
द्यावें [7]भव्यार्थ पद श्रेष्ठाच्या, वह्निच्या चि [8]आज्य, [9]करीं.' १७
तो उग्रसेन लाजे, मूक चि होवुनि अधोवदन राहे;
बुध म्हणति, 'प्रभुकीर्ति च मुक्तिवधू, तुज [10]बंधो, वद, नरा! हे.'
प्रभु राज्य उग्रसेना, आपण अभिषेक करुनि, दे हातें;

---

१. शुचि व अशुचि ह्याच्या २ कालास अनुसरून. ३ केवळ कारणीभूत. ४. हात=त्यक्त, सोडिलेला. ५. यादव-पंत. ६ वनात राहणारा मी. ७. कल्याण होण्यासाठीं. ८ तूप. ९. हातीं. १०. वश (अनुकूल) होवो.

जगदुद्धारार्थ करी कारुण्य प्रकट, धरुनि देहातें. १९
मग जगदीश्वर करवी कंसाची उत्तरक्रिया सारी;
बहु धनराशि तशा ही अहितकराच्या [1]मनःप्रिया [2]सारी. २०
[3]आनकदुंदुभि दोघां पुत्रांच्या आदरें करी मुंजी;
मग गेले सांदीपनि मुनिची धन्या करावया [4]पुंजी. २१
ते [5]सांग वेद सिकले स्वल्पाकाळें चि आद्य [6]कवि ज्यारीं;
तो ही सुज्ञ समजला, प्रेमें सांगे चि पाठ, [7]न [7]विचारी. २२
सकळा विद्या पढवी तो [8]काश्य द्विज अवंतिपुरवासी,
उपदेशातें सादर सेविति ते, हरिण जेंवि [9]सुरवासी २३
[10]गुरु चंद्रसूर्य [10]मानी, तो पर्वदिनीं स्वयें असें पाहे
कीं, पूजक ते, [11]त्यांहीं एक श्रीविष्णु पूजिला [11]आहे. २४
पाय धरुनि बहु विनयें प्रार्थुनि परमादरें, महाभागा!
बा! गा! [12]कृतविद्य [13]प्रभुशिष्य गुरुसि म्हणाति, 'दक्षिणा मागा.'
श्रीगुरु म्हणे, "प्रभासीं [14]तिमिनें सुत सागरांत हरिला जो,
तो द्या, तुमच्या सुयशें, [15]मंदार म्हणति 'उदार,' परि लाजो."
आज्ञा घेवुनि गुरुसुत आणाया कृष्ण सागरा गेला,

---

१. मनकामना पुरविण्यासाठीं. २ खर्च करी, सपवी. ३ वसुदेव. मूळांत २१ वी आर्या २२ वी, व २२ वी २१ वी आहे, परंतु संदर्भानें पाहिल्यास, येथें जो अनुक्रम ठेविला आहे तो च प्रशस्त आहे असें दिसून येईल. ४ साठा, गुरूच्या ज्ञानाचा खजिना. (उत्तम शिष्य मिळाल्यावाचून गुरूचें ज्ञान निरुपयोगी च म्हणावयाचें ) ५. षडंगांसह ६ आदिनारायणाचे अवतार. ७ प्रश्न करून त्यांची परीक्षा घेण्याची त्याला अवश्यकता च वाटली नाहीं. ८. सांदीपनि ९. मधुर ध्वनीला. १०. सांदीपनि रामकृष्णास चंद्रसूर्य च समजे ११ प्रत्यक्ष चंद्रसूर्य च विष्णुरूपी कृष्णाची पूजा करितात असें पाहिलें १२. पुरी केली आहे विद्या ज्यानीं ते. १३. प्रभु—महाप्रतापी—पण शिष्यवृत्ति धारण केलेले असे—निर्णय०. १४. ह्या नांवाच्या असुरानें. १५. लोक मंदाराला उदार म्हणतात, पण तो हि तुमच्या यशापुढें लाजेल, असा भाव.

सिरतां जळांत भेटे तो कीं प्रभु, गणुनि आंग, रागेला. २७
मणिहीं पूजुनि चरण, प्रभुसि म्हणे, 'हरुत तापतिमिरा हे;'
सांगे, 'गुरुसुतहर तो मजमध्यें असुर पाप तिमि राहे.' २८
सिंधूक्त श्रवण करुनि कृष्ण म्हणे, 'दुर्जना! न वंच जना.'
बुडकुनि सागरजठरीं प्रभुवर मारी क्षणांत पंचजना. २९
प्रभुवर कृष्ण विदारुनि उदर स्वाचार्यशत्रुचें पाहे,
गुरुसुत न सांपडे, मग शंख करीं पांचजन्य तो वाहे. ३०
संयमनीप्रति जावुनि मग, कृष्णें पांचजन्य वाजविला,
कांपविला यमलोक, स्पष्ट ब्रह्मांडगोळ गाजविला. ३१
यम पूजी, कर जोडी, कार्यार्थ तयासि सर्व जाणविला;
आज्ञा करुनि प्रभुनें त्याकरवीं गुरुकुमार आणविला. ३२
स्वरथीं वाहुनि, आणुनि, सुतरत्न स्वगुरुला निवेदूनें,
वंदी साग्रज भगवान्; प्रभु हि निवे, जेंवि तो निवे दूनें. ३३
गुरुतें गुरुपत्नीतें वंदुनि, करुनि प्रदक्षिण, भ्राते
आले स्वपुरीं, नेले चूर्णीचीं आदरूनियां चा! ते. ३४

---

# अध्याय एकोणिसावा.

कंसवधू ज्या अस्तिप्राप्त्यभिधा मगधराजकन्या, या
भेटुनि ताता, कथिती प्रभुच्या न्याया करूनि अन्याया. १
तो सम्राट् कन्याहीं, कर्णे कुमंत्रें भरून, कोपविला,
जो हरिस म्हणायाचा, 'गर्वें हस्तीं धरूं नको पविला.' २
जे अवनत प्रतापें, जे मित्र, शांति, ते करी गोळा;

१. मीं च गुरुपुत्र लपविला असा माझा अपराध मनांत आणून. २ ह्या नांवाच्या असुराला. ३. यमपुरीप्रत. ४ अर्पण करून. ५. [पुत्रशोकानें] दुःखी [काश्य]. ६ यादवानीं. ७. अस्ति व प्राप्ति नांवाच्या कंसस्त्रिया. ८. न्याय्य गोष्ट अन्याय्य असें दाखवून. ९. वाईट सल्ला सांगून. १०. इंद्राला. ११. नम्र झालेले.

अक्षौहिणी तयाच्या ठळक चहूंआंगळ्या[1] नृपा ! सोळा. ३
कौरव, विराट, रुक्मी, भीष्मक, मद्रेश, चैद्य, भगदत्त,
वृष्णिद्वेषी राजे सर्व मिळाले तयासि बळमत्त. ४
राजा ! राजगृहेश्वर वेढी मथुरापुरीस कोपानें,
ऐसी वदे प्रतिज्ञा, 'शत्रुशिरांचीं करीन सोपानें[2].' ५
बळ[3] पाहुनि कृष्ण म्हणे, 'भैर आर्या[4] ! अहितशासना सत्य.
जो आधि गद[5] चि, होवूं सुखवाया महि, तशास नासत्य[6].' ६
बहुतांचें तेज हरी अल्प हि यादवसमूह आवेशें;
कीं, एकें हि दिनकरें होतात द्युतिविहीन आवे[7] शें. ७
रथ थडकले रथासीं, नागासीं नाग, तुरग तुरगासीं;
यादव गांठि परांसीं घालिति, जैसे मयूर उरगांसीं[8]. ८
प्रभु रामकृष्ण सुरथीं बसुनि निघाले सहर्ष बाहेर;
नारद म्हणे निजनयनयुगळातें, 'रण यथेष्ट वा ! हेरें[9].' ९
ते स्वायुधें पुराणें स्मरले प्रभु, तों चि अद्भुतें च्यारी
गगनांतूनि उतरलीं, ख्यातें सर्वायुधांत जीं भारी. १०
सांवर्तकनामक हळ[10], अद्भुत सौनंद मुसळ तें आलें;
झालें राममनःप्रिय, पाहुनि राक्षसपिशाचबळें[11] धालें[12]. ११
शार्ङ्गधनु प्रभुहस्ता ती ही कौमोदकी गदा पावे,
जीणें दितिदनुज्यांचे बहु वज्रासह्य ढीग दापावे[13]. १२
ओढुनि हळें हयरथद्विप, मुसळेंकरुनि राम चूर करी;
बहु वधिले, भ्याले बहु; दीन हरिपुढें जरी हि शूर करी. १३
जाय न[14] कथिलें[15] माथिलें बहुत बळ महाबळें हळें मुसळें;
गेलें मगधपतिकडे, जाणों प्रभु अदय म्हणुनि तें रुसलें. १४

१. चार अधिक २. पायऱ्या. ३ सैन्य. ४. उत्साहयुक्त हो ५. जो जरासंध हा रोग च. ६. अश्विनीकुमार. ७ कुंभाराच्या शेंकडों भट्ट्या ८ सर्पांशीं. ९ पहा. १०. नांगर. ११. बळ=समूह १२. [ बळरामानें शत्रुसंहार केला म्हणजे आपली चंगळ उडेल हें मनांत येऊन ] आनंद पावले. १३. दडपावे. १४. सांगतां येणार नाहीं [ इतकें ], अगणित.

मगधपति म्हणे, ‘ भट हो ! देतां पावोनि खेद पाठ कसे ?
होतां पात्र अपुण्यापयशांसि [१]चुकोनि वेदपाठकसे. १५
युद्धीं जय, मृत्यु हि वर, शस्त्रधराला न लाभ यापरता;
यादव अल्प, तुम्हीं बहु, न धरि क्षत्रिय भला भया, परता. १६
[२]किं रणकुतुक तरि पहा, मीं वधितों रामकृष्णगोपांतें;
नाहीं दुर्घट कांहीं माझ्या वज्रप्रचंड [३]रोपांतें.’ १७
ती सेना मगधेश्वरवचन तसें आयकोन उलटे, [४]तें
सोसे न यदुचमूचें, साध्वीचें तेज जेंवि कुलटेतें. १८
तों सुरहर्षद गरुडध्वज[५]लक्षणनिजरथस्थ कंसारी
गांठी मगधेंद्रातें, यत्स्मरणें धन्य होय संसारी. १९
ताडुनि अष्टशरांहीं, पंचशरांहीं वधूनि सूतातें,
हय वधुनि, विरथ करि हरि अरितें प्रभु, शरभ जेंवि भूतातें. २०
व्यसनीं मागध पडतां, त्या कैशिक चित्रसेन रक्षाया
विंधिति बहु बाणांहीं त्रिभुवनसंरक्षणैकदक्षा या. २१
कैशिक तीं बाणांहीं रामातें ही महारणीं ताडी;
रामप्रभु तत्कार्मुक भल्लें छेदूनि तत्क्षणीं पाडी. २२
मग चित्रसेन, मागध, कैशिक, यांतें शरव्रजें हाणी,
ते हि तिघे रामातें बाणगणें ताडिती धनुष्पाणी. २३
तीं तीं नाराचांहीं ताडी केशव तिघांसि, बा राया !
पांचांहीं पांचांहीं बळ हि रणीं, सर्व गर्व वाराया. २४
छेदुनि धनु विरथ करी राम प्रभुवर्य चित्रसेनातें;
[६]प्रेक्षकजन देवांसीं लाविति, होवूनि चित्रसे, [६]नातें. २५

---

१ [स्वकर्तव्य] चुकून—पक्षीं—[म्हणताना उच्चार वगैरे] चुकून. २. युद्ध म्हणजे काय व कसले असतें तें पाहण्याची इच्छा असेल तर ३. बाणांस. ४. तें वचन—पंत. ५. लक्षण=चिन्ह [असलेला] ६ तो युद्धचमत्कार पहाताना प्रेक्षकजनांच्या डोळ्यांच्या पापण्या सुद्धां लवल्या नाहींत. देव हि अनिमेषलोचन, म्हणून नातें.

तो चित्रसेन धांवे रामावरि धरुनि गुरु गदा हातें,
जें होतें देवांचें वृंद नभीं, बोलिलें तदा ' हा ! ' तें. २६
राम गदा छेदुनि, अरि माराया कारणें विशिख सोडी;
तों यांच्या[1] चापातें वीर जरासंध तत्क्षणीं तोडी. २७
धरुनि गदा, मग मगधक्षितिपति राया ! करि त्वरा भारी,
च्यारी रामरथींचे अतिजवन[2] तुरंग तत्क्षणीं मारी. २८
रामावरि ही धांवे करुनि गदेनें प्रहार माराया,
स्वरथावरुनि बळ प्रभु उतरे घेवूनि मुसळ, बा राया ! २९
नृपरक्षणार्थ सत्वर अन्यरथीं चित्रसेन तो बसला,
बहुसैन्यासह सहसा दोघांत महारणांगणीं घसला. ३०
झाला निजबळपरिवृत[3] मगधपति जसा, तसा चि बा ! राम;
आला शक्र पहाया रण, सोडुनि नंदनाख्य आराम[4]. ३१
इकडे तिकडे केले वाद्यध्वनि सिंहनाद उत्साहें,
युद्ध मरणपर्व[5] चि, परि सुकाव्मत पावले न कुत्सा[6] हें. ३२
झांकुनि रवि न दिसों दे एक मुहूर्त प्रवृद्ध[7] रज काहीं,
शुचि शोणितसेकांहीं[8] केलें अंबर, जसें चि रजकांहीं. ३३
आहुक, बभ्रु, शिनि, असे यदुवीर, पुढें करुनि रामातें,
परसेनेच्या दक्षिणपक्षांच्या[9] करिति ते विरामातें. ३४
जो शल्य, शाल्व, मागध, चेदिपति इहीं सुरक्षिला पक्ष,
त्यातें रगडित सुटले यादव रामादि ते महादक्ष. ३५
कंक, श्वफल्क, सात्यकि, इत्यादिक वृष्णिवीर जे भव्य,
कृष्णातें करुनि पुढें, अर्धबळें पक्ष मर्दिती सव्य[10]. ३६
ज्या पक्षातें रक्षिति भीष्मक, रुक्मी, तसे चि नृप अन्य;
त्यातें रगडित सुटले, कमळवनातें जसे चि गज वन्य. ३७

१. बळरामाच्या. २. मोठे वेगवान् ३. आपल्या सैन्यानें वेढिलेला. ४. उपवन. ५. मरणाचा पर्वकाळ. ६. निंदा, उपहास. ७. दाट धूळ. ८. रक्तवृष्टीनें. ९. आकाश [ पक्षीं ] वस्त्र. १०. उजव्या बाजच्या. ११. आत्मानें

आहुक, भीष्मक, करिती, तैसे चि क्राथ, शौरि, हे युद्ध;
गद, चेदिराज, रुक्मी, कृष्ण, जसे नाग[1] कीं हरि क्रुद्ध. ३८
वृत्र जसा शक्रासीं, रामासीं मगधपति करी समर;
जाणों मदांध वन्य द्विरद म्हणे जिष्णुच्या करीसे 'मर'! ३९
'स्पर्शो न रुक्मिणीतें दुःख,' असें कृष्ण मानसीं आणी;
म्हणोनि रक्तें, न वधी रुक्म्यातें शार्ङ्गकर गदापाणी. ४०
बा! द्वंद्वयुद्ध जें जें, तें तें देवांगनावशीकरण[2];
गुरु म्हणति,'इतर[3] मख बहु खटखट,झट भटवरा! न; शीक रण.'
लक्ष[4]वधीं एक उठे, उठले शतशः कबंधें[5] नाचाया;
स्वःस्त्री[6]भुजबंध भटा, संबंध परा न बंधनाचा या. ४२
केलें अत्यद्भुत नरसिंहाहीं युद्ध नर्दमानाहीं[7],
ज्यांत रुधिरप्रवाहा आणि उणें मांसकर्दमा नाहीं. ४३
विरथ करी राम प्रभु, बहु शर वर्षुनि, रणीं जरासंधा;
तो मागध हि बळातें, ज्याची न च पावली जरा संधा[8]. ४४
होवुनि विरथ, क्रोधें करिति गदायुद्ध, शुद्ध राया! तें,
दोघे ही स्वजनाच्या हृदयींचें शल्य उद्धरायातें[9]. ४५
युद्ध न करिती सर्व हि भट, सादर लागले पहायास;
न गडबडे मागध, जरि सत्ताविस दिवस तो महायास. ४६
विंध्यासि जसी अशनी[10], करिल अनंतासि परगदा काय?
साहे बळप्रहारा नृप, मुनिचा जेंवि खरगदा[11] काय. ४७
राम गदायुद्धीं त्या मगधेंद्राचा विशेष[12] बा! पाहे,

---

१. ऐरावतास २. उत्तम वीरांना देवांगना वरितात, म्हणून त्या वश होण्यासारख्या शौर्यानें ते लढत होते, असा भावार्थ. ३. रणयज्ञाखेरीज इतर यज्ञांत खटपट (त्रास) फार, [फलप्राप्ती हि] झट न (लवकर नाहीं), म्हणून हे वीरा! तू रणयज्ञ शीक ४. एक लाख योद्धे मेले म्हणजे ५. धडें ६. स्वर्गांगनांच्या भुजांचे बंधन (आलिंगन) ७. गर्जना करणारांनीं. ८ प्रतिज्ञा [जरा न पावली—जीर्ण झाली नाहीं]. ९. उपटून काढण्यासाठीं १०. वीज. ११. भयंकर (तीव्र) रोगाला. १२. निपुणता, कौशल्य.

त्यातें आप्तजन म्हणति, 'तव भुज विजयी असोत बापा! हे.'
कोप म्हणे प्रभुसि, 'गदा सोडुनि सौनंद मुसळ घे,' राया!
'सिंह करीस, तसा तूं या मगधेंद्रास उसळ घेराया.' ४९
घेवुनि मुसळ उसळला रामप्रभु, होय तों नभोवाणी,
'तुज वध्य नव्हे, याचा मृत्यु असे अन्य, हें मनीं आणी. ५०
पावेल अचिरकाळें यदुवीरा! मागधेंद्र हा मरण,'
ऐसें ऐकुनि झाला तो नृप विमना[1], करी न राम रण. ५१
वीर जरासंधाचे विंशति[2] अक्षौहिणी नृपा! मेले;
उरले नृप ते तेथुनि मगधेंद्रासह निजस्थळा गेले. ५२
श्रीकृष्णाश्रित यादव जय पावुनि, निजपुरींत हर्षानें
करितां प्रवेश, पौरस्त्री पूजिति पुष्पलाजवर्षानें[3]. ५३
पुनरपि सहाय घेवुनि सेना तितुकी च आणिते राजे,
रण करि मागध; देती भंग चि ते, पांच आणि तेरा[4] जे. ५४
खवळविती निजजनका त्या वारंवार लाडक्या कन्या;
'धन्या[5] त्यांसि मही म्हणे, मोडिति बोटें भटस्त्रिया[6] अन्या. ५५
युद्धोद्योग करि पुन्हा बार्हद्रथ राजसिंह अठरावा;
चित्तीं म्हणे, 'मजपुढें आतां तों कंसकाळ न ठरावा.' ५६
'आला मगधेंद्र' असें ऐकुनि, पावोनि फार संत्रास,
ते रामकृष्ण घेवुनि यादव करिती हितार्थ मंत्रास. ५७
तेव्हां विकद्रु यादव कृष्णासि म्हणे, "कथा परिस बा! हे;
म्यां श्रीव्यासमुनिमुखें निजवंशख्याति परिशिली आहे. ५८
पूर्वी हर्यश्वाभिध होता इक्ष्वाकुसुत, घनश्यामा!
त्याचा ज्येष्ठ भ्राता राज्य करी, स्वजनचित्तविश्रामा! ५९
मधुदैत्यसुता, रूपें अप्रतिमा, 'मधुमती' तिचें नाम,

---

१. खिन्न २ बीस ३ लाजा=लाह्या. ४. अठरा वेळ ते (रामकृष्ण) [illegible] (पराजय करितें झाले) ५. दुष्टक्षात्रयभार हलका झाल्यानें. ६. पति-पुत्रादिकांस रणांत मृत्यु आल्यामुळें.

हर्यश्व तिणें वरिला, रतिनें अत्यादरें जसा काम. ६०
राज्यपदाच्या लोभें त्यजिला हर्यश्व भक्त हि ज्येष्ठें;
स्त्री ने त्यासि पितृगृहा, बोधुनि बोधें हितावहें श्रेष्ठें. ६१
त्यासि मधु म्हणे 'मधुवन मात्र निराळें करूनि, हें राज्य
म्यां तुज सर्व दिलें, घे आनर्तविषय धनावह प्राज्य. ६२
अरिनिग्रहार्थ तुजला होइल मत्सुत सहाय हा लवण;
वक्र तुजकडे पाहे. आहे ऐसा धरातळीं कवण? ६३
वंश तुझा सोमाच्या वंशीं करिल प्रवेश; सुज्ञानें
हें मी भविष्य जाणें, जाणावें जेंवि अन्य सुज्ञानें.' ६४
राज्यचुत जामाता, त्याचा सत्कार हा असा केला;
गत्यर्थ तप कराया, मग मधु लवणार्णवासि तो गेला. ६५
दिव्यगिरिवरीं वसवी पुर तो हर्यश्व, देवपुरसम तें;
आनर्तराष्ट्र वाढे त्याचें, जन म्हणति 'नाकसम गमतें.' ६६
हर्यश्वपुत्र योगें होवूनि ययातिपुत्र यदु झाला,
कीं, अमृत मधुमतीच्या दावी तिळमात्र गर्व न दुंधाला. ६७
हर्यश्वाचा एक चि दुंदुभिनिस्वन कुमार यदुनामा,
जो सर्वराजलक्षणसंपन्न स्थान अद्भुता धामा. ६८
हर्यश्व अयुतवर्षें राज्य करुनि पावला सुगति, कृष्णा!
ज्या साधुच्या मनीं न स्वल्पा ही राहिली विषयतृष्णा. ६९
यदुराजा राज्य करी, धर्मन्यायें प्रजा सुखी झाली;
झाली तद्राष्ट्रमही, जाणों अमृतार्णवांत ती न्हाली. ७०
सिंधूंत जळक्रीडा यदु दयितांसह करावया गेला,

---

१. वडिलभावानें. २. वगळून. ३ विषय=देश ४. दुसऱ्या कोणत्या हि. ५. सद्गतीकारणें. ६. योगबलानें. ७ स्वर्गींच्या अमृताला सोडून मधुमतीच्या पोटीं येऊन तिच्या दुग्धपानानें तो संतुष्ट झाला म्हणून. ८. नगाऱ्यासारखा गंभीर आवाजाचा.

तो हरुनि धूमवर्णें भुजगेंद्रें आपुल्या पुरीं नेला. ७१
सिंधूदरांत पुर तें, ज्यांत फणिगृहें सुवर्णरत्नमयें;
यदु चित्तांत म्हणे, 'हें रचिलें बहुधा करूनि यत्न मयें.' ७२
तो रत्नप्रासादीं बैसविला मणिमयासनीं राजा,
पुजिला पतिनें, भुजगी मग म्हणतिल कां न 'यास नीराजा'?
तो धूमवर्ण बोले, "राज्या! हर्यश्वनंदना! परिस,
निर्वाचिल तव वंश सदा बहु साधुजनास नंदनापरिस. ७४
'यादव' हें नाम तुझा पावेल सुवंश, यांत तनयशतें
देवर्षिपन्नगांचीं होतिल, गातील साधुजन यश तें. ७५
जी यौवनाश्वभगिनी माझी प्राणप्रिया, इच्या पोटीं
आहेत पांच कन्या, ज्यांच्या भाळीं नृपा! यशें मोटीं. ७६
या विधिनें तुज देतों, होतिल पांचांसि पांच सुतरत्नें,
प्रेमें प्रतिपाळाव्या मत्कन्या त्वां वरूनि बहुयत्नें. ७७
होतील कामरूपी, उदकीं संचार ते हि करितील,
हरितील स्वजनमनें, त्या सर्वांतें सुकीर्ति वरितील." ७८
यदु हर्षें, स्वीकारी स्त्रीरत्नें पांच आणि पांच वर;
कृष्णा! असें यशाचें मान्य करीना सभाग्य कां चेवर? ७९
स्वपुरीं मुचुकुंद तनुज होय, दुजा पद्मवर्ण या नावें;
माधव, सारस, हरित, ख्यात, सुरांहीं जयांसि वानावें. ८०
ते सुत म्हणति, 'तरुणता आंगीं आली, मनीं हुरुप राज्या!
आज्ञा संपादूं त्या स्वमुखें करिसील तूं गुरु परा ज्या.' ८१
अंजलि करुनि विनवितां विनयें सुत पावले तदाज्ञा तेः
कथिल्या योग्य स्थानीं रचिते झाले पुरें तदा ज्ञाते. ८२
मुचुकुंद नर्मदेच्या तीरीं माहिष्मती पुरी वसवी,
तींत प्रजा तसी तो, मखरांत प्रियवधू तसी, बसवी. ८३

---

१. भुजगपतीनें २. ओंवाळा. ३. प्राजापत्यनामक विवाहविधीनें. ४. चवरी, बहुमानद्योतक चिन्ह. ५. अवघड ६. शहरें.

जो पद्मवर्ण यदुसुत बुधपद्माकरसहस्रकर वीर,
तो साधु सह्यपृष्ठीं वसवी अत्यंत रम्य करवीर. ८४
वेणादक्षिणभागीं क्रौंचपुर श्रेष्ठ सारसें रचिलें,
मणिनीं पदक तसें, तें कृष्णा! प्रासादवरशतें खचिलें. ८५
हरितोदकीं समुद्रीं रत्नद्वीपीं वसोनियां, हरितें
केलें राज्य, जयातें रत्नवणिक भजति, सुर जसे हरितें. ८६
माधव सुत सर्वांत ज्येष्ठ, तयाला स्वराज्यपद ओपी
यदु नृप; देह त्यजुनि स्वर्गीं सुरगीत आत्मयश तो पी. ८७
माधवनंदन सत्वत, सत्वतसुत भीम भूप राज्य करी,
तेव्हां शत्रुघ्न प्रभु होय हरि, मदांध लवण तो हि करी. ८८
छेदुनि मधुवन, मधुरा शत्रुघ्नें निर्मिली, भली भरिली;
अवतारोपरमीं ती भीमें मधुकन्यकान्वयें हरिली. ८९
कुश राजा, युवराजा लव जेव्हां, तेधवां करी राज्य
मथुरेंत भीमनंदन अंधक नृप, ज्यांत सद्गुण प्राज्य. ९०
अंधकसुत तो रेवत, त्याचा सुत रैवताचळीं झाला
तो ऋक्ष, ऋक्षसुत जो 'रैवत' हें नाम ठेविलें त्याला. ९१
रैवतनृपनंदन जो, तो नामें विश्वगर्भ, त्या भार्या
होत्या तिघी, प्रसवल्या चवघां पुत्रांसि केशवा! आर्या. ९२
वसु, बभ्रु, सुषेण तिघे; चवथा सुत तो सभाक्ष, घननीला!
वसुसुत वसुदेव, जगीं जेणें शुचिकीर्तिलाभ जननीला. ९३
शूरापरनामा वसु वसुदेवाउपरि, गुणवती धन्या
कुंती, श्रुतश्रवा, या नावांच्या प्रसवला सती कन्या. ९४
यादववंश असा हा, कृष्णा! तूं श्रेष्ठ यांत आलास;

---

१. ज्ञाते हे च कोणी कमलसमुदाय त्यास प्रफुल्लित करणारा सूर्य. २ सह्याद्रीच्या पठारावर. ३ मोठमोठ्या अशा शेंकडों राजवाड्यानीं. ४. हिरव्या रंगाचें पाणी असलेल्या ५ रामावताराच्या समाप्तीच्या वेळीं ६. मधुमतीच्या वंशांत उत्पन्न झालेल्यानें. ७ वसुदेवाच्या पाठीमागून

साक्षाज्जसा स्वयंभू, आम्हांस प्राप्त नाथ झालास. ९५
बा देवकीसुता! हा वंश पराभूति पावला मागें,
व्यसनांत उद्धरावा, संरक्षावा, तुवां महाभागें. ९६
चढला सर्व नृपांच्या माथां सांप्रत बळी जरासंध,
आम्हां प्रताप याचा, गंधगजाचा[1] जसा गजां गंध. ९७
आम्हीं वश तव मतिला, शक्राच्या जेंवि सर्व ही अमर,
आहेस क्षम तूं ही साग्रज अरिसीं करावया समर. ९८
परि एक दिन हि कृष्णा! साहेल न हे पुरी निरोधातें[2];
वांचेल कसी अबळा, प्रबळासीं करुनियां विरोधातें? ९९
बा! सोसिले पुरीनें संग्रामनिरोध, केशवा! सतरा;
म्हणत्ये, 'सोडुनि मातें, स्वीकारुनि अन्यदेशवास, तरा'. १००
तृणकाष्ठधान्यसंग्रह सरला, बहु पौर पावले पीडा;
नित्य उपद्रव होतां, त्यजिती पक्षी हि आपुल्या नीडा[3]. १०१
प्राकार[4] जीर्ण खचला, झाली लंघ्या भरोनि परिखा[5] ती,
असतां यथास्थिता[6], दशशत ही अक्षौहिणींस परि खाती.
पहिला राजा[7] पडला, राज्य नवें आमुचें, बळी[8] अहित,
संग्रामविमर्द[9] सदा, हें राष्ट्र बुडेल या जनासहित. १०३
जन होतील व्याकुळ यावरि मथुरापुरीं निरोधानें,
म्हणतील, 'यादवांच्या सर्व बुडालों महाविरोधानें.' १०४
मोठें संकट आलें, मूळ विरोधासि तूं चि बा! आधीं
आम्हांसि आपणासह संरक्षुनि, कीर्ति केशवा! साधीं." १०५

---

१. ज्याच्या मदाचा गंध इतर गजांना सहन होत नाहीं, तो गंधगज २. वेढ्यास ३. घरट्याला. ४. कोट, तट ५. खंदक ६. पहिल्यासारखी चांगली. ७ कंस. ८. शत्रू [ पडला ] प्रबळ. ९ युद्धाची गर्दी.

# अध्याय विसावा.

वसुदेव म्हणे, ‘ कृष्णा ! वदला धीमान् विकद्रु हें युक्त,
याचें कविमहित हित, श्रीसुरगुरुचें जसें, तसें उक्त.’ १
कृष्ण म्हणे, ‘ वडिलांची सल्ला बहु मानली मना उक्ती;
या संकटीं तराया ऐका, जी सूचली मला युक्ती. २
नीति[1] असी कीं, अबळें प्रबळासि रणीं कधीं न हटकावें;
दैवें विरोध घडतां, बळहीनें त्यजुनि मान सटकावें[2]. ३
साग्रज निघोनि जातों मीं येथुनि, दक्षिणापथा[3] धरितों;
पूर्वजकृतकरवीरक्रौंचपुरविलोकनें सुखें वरितों. ४
मानी मागध राजा आम्हांमागें ससैन्य लागेल,
ऐसें करितां तुमचें मानस चिंताभरें न भागेल. ५
जीवित संरक्षाया बहु भीरु अशक्त जन जसा पळतो,
जरि शक्तिमान्, पलायन करितो, वंचावया महाबळ तो.’ ६
मंत्र असा करुनि प्रभु साग्रज मथुरापुरीस सोडून
दक्षिण दिशेसि गेला, सुखवाया स्वजन विजय जोडून. ७
प्रभु कामरूप गेले, लंघुनि राष्ट्रें अनेक, करवीरा;
वेणातीरतरुतळीं देखति ते क्षत्रियांतकरवीरा[4]. ८
साग्रज विभु नमुनि म्हणे, ‘ भगवंता ! भासतोसि तूं राम,
या मर्त्यांत असें म्यां कोठें ही देखिलें नसे धाम. ९
दुष्ट क्षत्रिय मारुनि, दिधली त्वां कश्यपासि भू दान;
सागर[5] सारुनि केलें, शुचि रम्य वसावया नव स्थान. १०
वसुदेवात्मज आम्हीं, मथुरा पुर आमुचें; भय मुने ! तें

---

१. राजनीतीचें धोरण. २. पळावें, निसटून जावें. ३. दक्षिणेकडील दिशेला (महाराष्ट्राकडे). ४ क्षत्रियाचा अंत करणाऱ्या वीराला (परशुरामाला). ५. बाण मारून समुद्र मागें हटवून कोंकणपट्टी निर्माण केली.

बहु पावलें, निघालों; नातरि पळ सोडितों न यमुनेतें. ११
कंस महाखळ वधिला, म्हणुनि जरासंध सासरा याचा
करितो कलह, विरोध न बा ! हा भवबंधसा सरायाचा. १२
विरथ अशस्त्र तुजकडे आलों विजयार्थ, सांग मंत्रासें;
झाले संगर सतरा, बहु यादव पावले चि संत्रास.' १३
राम म्हणे, "तूं विष्णु प्रभुसत्तम; भूमिभार वाराया,
अवतरलासि, मुकुंदा ! संसारीं सर्व साधु ताराया. १४
घ्याया यश मज पुससी; नातरि बहु लंघितासि कां गांवें ?
म्यां तुज सर्वज्ञातें पुसिलें कर्तव्य कां न सांगावें ? १५
करवीरपुरीं आहे अत्युग्र सृगाळ वासुदेव ! खळ;
याणें यादव वधिले, येथें सांप्रत वसों नये चि पळ. १६
यज्ञनगीं च रहाया, वेणेतें बाहुनीं तरुनि, जावें,
एक निशा चोरवनीं मग, आश्रय करुनियां तरु, निजावें. १७
पडतो अद्रिवरुनि तो खड्गंगेचा प्रवाह पाहूनीं
नेयिन पथें तुम्हां मीं, चालेन पुढें समीप राहूनीं. १८
मग वानप्रस्थांचें मंडळ विभु हो ! पहा महाशुचि तें,
स्वीकारूं प्रेमभरें त्यांहीं केलीं सभाजनें उचितें. १९
दाखविन प्रभु हो ! मग बहु रम्य क्रौंचपुर, जयामाजी
राजा महाकपि वसे, आहे त्या साधुवरि दया माजी. २०
या यदुकुलजनृपातें काम नसे येथवां पहायाचें,
आनड्डहमहातीर्थीं आहे माझ्या मनीं रहायाचें. २१
तेथुनि, यदुनंदन हो ! गोमंता त्या महानगा जावें;
तेथें वसुनि, कराया जलधरगर्जित लहान, गाजावें. २२

---

१ संसारबंधनासारखा २ युक्तीस. ३. मोठेपणा ४ गाव—चार कोस ५ समुदाय किंवा राहण्याचें ठिकाण. ६ अर्पिलेली पूजनें ( सत्कार ) ७. तेथें राहून मेघगर्जना लहान कराया ( कमी प्रतीची होण्याकरिता ) गाजावें; तुमचा यशोदुंदुभी मेघगर्जनेपेक्षा हि दूरवर जाईल असें करावें.

येइल माधव, होयिल पर्वतयुद्धीं[1] अशक्त, यादव हो!
तेथें प्रताप तुमचा परबळकक्षा[2]चिया क्षया दैव[3] हो. २३
समयीं हळ, मुसळ, गदा, चक्र, महास्त्रें करांत येतील,
देतील प्राज्य विजय, अहितांचें तेज हरुनि घेतील. २४
'चक्रमुसळ' या नामें संग्राम अतिप्रसिद्ध तो भावी[4],
ती फुलल्यां पळसांची अटवीसी युद्धभूमि शोभावी. २५
यावरि भारतनामा अत्यद्भुत समरयज्ञ करवाल,
बहु भटकोटि[5] खपवितिल शर खगवरसम[6] रयें[7], करवाल[8]. २६
हे होमधेनु माझी, ईचें पय अमृत होय, हें सेवा,"
ऐसें सांगुनि अर्पी, तर्पी[9] त्या साग्रजा महादेवीं[10]. २७
त्या दिव्यदुग्धपानें धाले, बळदर्पपूर्ण[11] ते झाले;
गेले उक्त मार्गें गोमंतीं, राम त्यांपुढें चाले. २८
ते, जेंवि रामलक्ष्मण नेले सिद्धाश्रमासि गाधिभवें[12],
या मुनिनें हे, ज्यांहीं तुरवावा जेंवि लेश आधि[13] भवें[14]. २९
पुष्पितफलितानेकद्रुमवल्लिवनोवृतीं[15] नगीं चढले,
जे गुरुपाशीं कार्मुकवेद अखिलखलबलक्षया पढले. ३०
भार्गव म्हणे, 'महीधर रामा! कृष्णा! वरप्रभा[16] वर हा,
शस्त्रें येतिल, येथें सुप्रकट करा वरप्रभाव[17], रहा. ३१
शूर्पारकासि[18] जातां, रणमख आरंभितां स्मरा मातें;
पावाल विजय; जें यश, गेलें सोडून या न रामा तें.' ३२
अशीर्वादाहीं त्या दोघांतें वर्धवूनि, तो राम

१. मनीमी काव्याच्या लढाईत. २ कक्ष=गवत ३ वणवा. ४ पुढें होणारा. ५ कोटि=समुदाय. ६ गरुडाप्रमाणें ७ वेगश ८. तरवार. ९. तृप्त करी. १० मोठ्या देवास (कृष्णास) ११. शक्ति व उत्साह यानीं पूर्ण १२. गाधिजानें, विश्वामित्रानें १३. मनोव्यथा. १४ ईश्वर—पंत. १५. —वनानीं व्याप्त. १६. श्रेष्ठ सौंदर्याचा. १७ उत्कृष्ट सामर्थ्य किंवा वराचा प्रभाव. १८. कोंकणांत.

स्वस्थानातें गेला, ज्याचें जयहेतु[1] संगरीं नाम. ३३
गोमंताच्या शिखरीं रम्य वन पहात एकला राम
संचरोनि[2] कदंबतळीं बैसे पावावयासि विश्राम. ३४
मंद, सुगंध, सुशीतळ मारुत वीजी[3] सुखार्थ देवास,
तों त्या प्रभुच्या नाकीं मद्याचा बहु मनोज्ञ[4] ये वास. ३५
तत्काळ वारुणीची[5] स्मृति, तृष्णा, प्राप्त माधवा[6] होय,
ये त्यांत वारुणी, जें होतें त्या वृक्षकोटरीं तोय. ३६
गंधें शोधुनि, भगवान् बलभद्र कदंबकोटरीं पाहे;
तों आपणा प्रिया जी, स्वच्छा ती वारुणी सुरा आहे. ३७
प्राशी परमप्रेमें, तों आला देवनायका मद या;
चित्तांत वारुणीनें केली मानी प्रसन्न राम दया. ३८
प्रकटे कदंबवृक्षीं यास्तव 'कादंबरी' पडे नाम;
जरि मत्त होय, तरि बहु तो विश्वाधार शोभला राम. ३९
तों वारुणी प्रकटली, मूर्तिमती श्री, शशिप्रिया कांती,
त्या प्रभुसि भेटल्या, बा! सुजनासि जशा दया, क्षमा, शांती.
ती वारुणी[7] म्हणे, 'मीं तव विरहें फार जाहल्यें आर्ता;
केला शोध बहु तुझा, परि कोठें ही न ऐकिली वार्ता. ४१
करुणें वरुणें तातें कथिलें हें स्थान, पावल्यें देवा;
हे वारुणी न विरहा पावो यावरि, घडो तुझी सेवा.' ४२
कांति हि म्हणे, 'मजकडे व्हाया मत्कामपूर्ति हेरा[8], हो!
तुमची च समालिंगुनि चंद्राधिक रम्य मूर्ति हे[9] राहो.' ४३
श्री हि म्हणे 'अभिरामा! रामा! घे नीलवस्त्रयुग, देवा!
हें आदिपद्म[10]कुंडल, हार, मुकुट; मीं हि करिन तव सेवा.' ४४

---

१. जय होण्याला साधन २ [इकडेतिकडे] फिरून मग ३ वारा घाली. ४. सुंदर, मनोहर ५ दारूची ६. बळरामाला. ७. ही वरुणकन्या शेषाची स्त्री; बळराम हा शेषावतार. ८. प्रेमानें पहा. ९. मीं (कांति). १०. आदिपद्म नांवाचें कुंडल.

स्वीकारूनि अळंकृति[1], होय श्रीकांतिवारुणीयुक्त;
शोभे गोमंतीं प्रभु राम, जसा चंद्र राहुनें मुक्त. ४५
प्रभु राम कृष्ण बोलत बसले असतां नगीं, गरुडपक्षी,
प्रभुचें किरीट घेवुनि येतां, गगनांतुनि प्रभुसि लक्षी. ४६
दिव्यस्वाद्भुतशयनीं दुग्धसमुद्रीं सुखें रमाभर्ता
निजला असतां, असुर[2] प्रभुचें हि किरीट जाहला हर्ता. ४७
तो प्रभुकिरीटतस्कर वैरोचन, निजबळीं मिळुनि पळतां,
भगवद्भक्त खगाधिप गांठी त्या अरिस सागरीं, कळतां[3]. ४८
युद्ध करुनि, पर भंगुनि, येतां स्कंधीं किरीट वाहून,
हर्षें, गोमंताच्या शिखरीं सहसा[4] स्वनाथ पाहून. ४९
न वदुनि, नभांतुनि हळू च सोडुनि सुकिरीट लेववी राया[5]!
गुण घे, रामासि कथी, मानवला[6] वासुदेव वीरा या. ५०
तों शोध करूनि चैरद्वारें[7], आक्रमित मग धरा[8], जवन[9]
चतुरंग सैन्य घेवुनि, आला गौजवित मगधराज वन. ५१
सेनासिंधु विलोकुनि कृष्ण म्हणे, 'न त्वरा करीं, आर्या!
आधीं पाहूं, राहूं स्वस्थ, करूं सिद्ध योजिल्या कार्या.' ५२
सिंधुप्रतिमा सेना त्या गोमंताचळासि घेरी तीं;
घेरी तीव्रभयें ये, प्राणिगण पैरासुची[11] च घे रीती. ५३
मागध म्हणे, 'घनाहीं[12], टंकाहीं[13] हा महीध्र[14] फोडावा;
गोप वधावे; हें[15] किति? कीं प्राणी एक ही न सोडावा. ५४
जैसा वर्षाकाळीं नीरद आच्छादितात नीराहीं,
धीराहीं झांकावा शस्त्राहीं नग तसा चि वीराहीं. ५५

---

१. अलंकार. २. विरोचनपुत्र बळी. ३. शोध लागतां च. ४. अकस्मात्, एकाएकीं ५. गरुडाचें शहाणपण त्याच्या ध्यानात आलें ६. संतुष्ट झालेला ७. दूतांकडून ८. पृथ्वी. ९. वेगवान् ( जरासंध ). १० दणाणून टाकीत. ११. मेलेल्यांची. १२ लोहमुद्गरानी. १३. टाक्यानी. १४. पर्वत. १५. हें ( गोपवध-कार्य ) किति (काय मातब्बरीचें)? हें अगदी स्वल्प, सोपें काम आहे.

त्या सद्यश सर्व, चहूंकडुनि खणा, नग कराल हा नाहीं;[1]
पसरावें गुरुनीं हीं यास,[2] न कां मग करा ल्हानाहीं ?' ५६
चेदिपति म्हणे, ' इंधनभार[3] रचावे सहस्रशतकोटी,
लावावा अग्नि, नृपा ! हे युक्ति असे जयावहा[4] मोटी. ' ५७
आलें मनास तें, मग नग पेटविला चहूंकडुन; राज्या !
डसला काळाहि[5] तया, लागति हरिगुणगहूं कडु नरा ज्या.[6]
मारुत भेटे, पेटे दहन गहनसह[7] नगासि जाळाया,
टाळाया[8] प्रभु पडु, परि हर्षों दे मगधभूमिपाळा या. ५९
सहसा व्याळश्वापदशतकाळ[9] ज्वाळ धडकले वरते,
व्याघ्रगजमृगेंद्रांचें राहों देती न धड कलेवर[10] ते. ६०
बळदेव म्हणे, ' कृष्णा ! अस्मदपयश[11] चि जगांत नगदाहें,[12]
साहों परकृत्य न हळ, न मुसळ मम, तव न चक्र, न गदा, हें.
अर्धक्रोश क्षत्रिय सरले दहनातितस जे मागें,
शरदंबुदसा[13] टाकी, त्यांत उडी, वरुनि राम तो रागें. ६२
सजळघनप्रभ[14] कृष्णप्रभु हि उडी त्या नगावरुनि घाली,
ज्यापासुनि किर्ति, विमद देवांचे व्हावया तरु, निघाली. ६३
रामाच्या, कृष्णाच्या चरणाहीं दडपला महाशिखरी[15]
धरणींत शिरे, राया ! बहु जळधारा चहूंकडे विखरी. ६४
प्रभुभारें श्रमला नग, लवला, न्हाला म्हणोनि घामानें;
शमला दहन जळानें त्यांच्या चि, जसा त्रिताप नामानें. ६५
' मारूं चि, धरूं चि, ' असें जे आधीं मत्त वीर बडबडले,

१. नाहींसा. २ यशास—**पंत.** ३ इंधन=शुष्क काष्ठ. ४ जय साधून देणारी. ५. काळसर्प. ६. विषारी साप चावलेल्या मनुष्यास गहू खाण्यास दिले असतां कडू लागतात. ७. गहन=वन. ८. ' हां हां ' म्हणतां ९ शतकाल=शेंकडों यमांप्रमाणें. १०. शरीर ११. आमची अपकीर्ति. १२. पर्वताच्या जळण्यानें. १३ शरदृतूतील मेघाप्रमाणें ( गोरा ) १४. जलपूर्ण घनाप्रमाणें कांति ज्याची असा श्यामवर्ण. १५. मोठा पर्वत.

येतां उडी प्रभूंची, श्येनांची चेटक तेंवि, गडबडले. ६६
क्षोभविति परव्यूहा आंत शिरुनि, जेंवि सागरा मकर;
हरिकर हरिति अरिशिरें, तैसे चि, धरूनि राग, रामकर. ६७
प्रभु रामकृष्ण यांच्या हस्ताहुनि अधिक काय करवाळ?
जे, पर्वत पिष्ट करुनि, म्हणणारे पविस, 'हाय कर, वाळ!'
देवुनि बहुमान प्रभु आधीं त्या संगरांत बाहूंतें
आठविती, मग जाणों पुसती त्या, 'चक्रमुसळ बाहूं तें?' ६९
तीं भेटलीं करांतें, स्वामीतें भृत्य तेंवि, हातेरें,
चक्रगदाहळमुसळें करिति परांचें पळांत मातेरें. ७०
राम प्रभुवर समरीं हयगतरथगत, पदाति शूर करी,
त्यांचीं वृंदें स्वहळें आढुनि, मुसळें क्षणांत चूर करी. ७१
कृष्ण प्रभुवर खंडी परनर, हरि करिसमूह, चक्रानें;
चूर चि करी गदेनें, करिजे वज्रें जसें चि शक्रानें. ७२
मांसांच्या पंकातें, रक्तांच्या त्या रणांत ओघांतें,
करिते झाले; भ्याले बहुत हि हतशेष वीर दोघांतें. ७३
भिवुनि जरासंधाच्या जवळ सकळ वीर जाहले गोळा,
तो त्यांसि म्हणे, "परता, व्हा धन्य, रणांगणीं पडा, लोळा.
वेडे हो! पावाचे क्षत्रिय सदनांत काय हे मरण?
द्यावें न गेहबेगड रे! गडबडुनि, त्यजूनि हेमरण. ७५
सुहयीं, सुरथीं, सुगजीं बैसुनि, दोघां पदाति गोपांतें
भीतां? धिक्कार असो तुमच्या या खड्गचापरोपांतें! ७६
पळत्यातें पाहुनियां म्हणती कीं देवमुनि सहास 'मर.'
मी वधितों गोपांतें, येथें चि रहा, पहा महासमर." ७७

---

१. चिमण्या. २. झुकून जा. ३. हत्यारें. ४. पादचारी, पायदळ. ५ मारून उरलेले. ६. सुवर्णरूपी समरांगण सोडून बेगडरूपी घर न द्यावें क्षत्रियानें घरांत अंथरुणावर मरणें अमर्दां अयोग्य; त्याला रणांगणीं च मृत्यु यशस्कर. ७ रोप=बाण. ८. तिरस्कारानें हसून.

धर्में[1] स्मरुनि परतली ती सुक्षत्रियचमू महावेगा;
तत्कदन प्रभु करिती, तें न त्रिदशांसें[2] ही पहावे गा! ७८
कृष्ण म्हणे, "क्षत्रिय हो! कंसाचा श्वशुर येत कां नाहीं?
वधें[3] पाहत नयनाहीं बसला; 'हा हा!' हि घेतें कां नाहीं?" ७९
तें ऐकुनि, रामावरि ये देता भीति परमना दरद,
ज्याचे 'करकर' ऐसा प्रकट करिति उग्र परम नाद रदे. ८०
रामानें दरद, हळें समरीं ओढुनि, आणिला जवळ;
ताडुनि माथां मुसळें काळाबाळासि[6] तो दिला कवळ. ८१
दरदनृपवधें होय क्रुद्ध जरासंध, तो करी लगट;
प्रभु बळभद्र हि उसळे, वाटे काळ चि तया करील गट. ८२
राम जरासंध नृपा! करिते झाले तदा गदायुद्ध,
शुद्धज्ञान[7] व्यासस्वामी वदला, जसे करी[8] क्रुद्ध. ८३
सुदती[9] सुविरक्तांहीं, तेंवि न गणिल्या[10] महागदा त्यांहीं;
तें प्रेक्षकां रणकुतुक विपुळ दिलें, जन्हि महाग दात्यांहीं. ८४
वारी[11] गगनोक्ति[12], वधू पाहे जेव्हां महाभुज गदीन[13],
होय विभुपुढें अरि, ज्यापरि विपतिपुढें महाभुजग दीन. ८५
हतशेष बळ पळे, हो! पाहुनि परिभूत मागधा त्या तें,
नृप म्हणति मनीं, 'मर; कर वर तप; सामर्थ्य माग धात्यातें.'
राजा[14] मागध पावे भंगा अष्टादशा असा मान्यां;
करुनि[15] दुरभिमानें, तो नेला, कष्टा दशा असामान्यां. ८७

१ क्षत्रियधर्म. २ देवांस. ३. सैन्यनाश. ४. ऐकून
बाळाला ७ निर्मल ज्ञानवान् जो सिद्धपुरुष व्यास यानें वर्णिलें आहे. ८. हत्ती. ९. सुंदर स्त्रिया. १०. जुमानिल्या. ११ निवारण करी, न करू देई १२ आकाशवाणी १३. गदाधरश्रेष्ठ (बळराम) पक्षिपति गरुडापुढें १४. असा मागधराजा अष्टादश भंगा पावे, तो दुरभिमानें कष्टादशा असामान्या मान्या करुनि गेला—**पंत**—अठरा वेळां पराभूत झाला तरी दुरभिमान न टाकता असाधारण दुर्दशा हि पत्करून परत गेला; [पण प्रभूस शरण आला नाहीं].

भेटे प्रभुला निजबळसह येवुनि चेदिराज [1]दमघोष;
आलिंगूनि म्हणे, "बा कृष्णा! मजवरि नसो चि तव रोष. ८८
तव पितृभगिनीभर्ता मीं, माझा [2]दयित तूं घनश्यामा!
रामा! बा! माझ्या [3]हा वळला नाहीं हितावहा [4]सामा. ८९
झाला भग्न, पळाला, परि यावज्जीव गांठि वैरा या;
करिल उपाय तुम्हांला अन्य हि [5]काळाननांत वैराया. ९०
हे सुरथ तुम्हांकरितां केले, यांवरि बसा, नका राहूं;
जाऊं करवीरपुरा; शीघ्र म्हणा, न करितां नकारा, 'हूं.'" ९१
केशव म्हणे, 'निवविले बा! त्वां व्यसनांत तापले काय;
अमृतघन चि ते, भेटति [6]जे [7]कष्टदशेंत आपले [6]काय. ९२
बा! सर्व यादवांच्या सर्वां आप्तांत [8]आप्त तूं पहिला;
झालों सनाथ, होवूं पक्षिपति च [9]मागधाद्यरात्यहिला.' ९३
ऐसें बोले प्रभु, मग चेदीश्वरदत्तशुभरथीं चढला,
आला करवीरा, तों कोपें राजा शृगाळ तो [10]कढलों. ९४
बैसुनि रविदत्ताद्भुतरथरत्नीं ये शृगाळ अविचारी;
[11]निजपुरधर्षण [11]मानी, किमपि हिताहित मनांत न विचारी. ९५
तो प्रभुसि म्हणे, 'कृष्णा! गोमंतीं साग्रजें तुवां कर्म
केलें, तें न मजपुढें होइल, [12]शतकोटिचें असो [12]वर्म. ९६
मूर्ख [13]अनायक राजे, त्यांच्या दुर्बळ बळांत तें घडलें;

---

१ वसुदेवाची धाकटी बहिण श्रुतश्रवा तिचा हा नवरा व शिशुपालाचा बाप. २. आवडता. ३ हा जरासंध. ४. सामोपचाराच्या मसलतीस. ५. मृत्युमुखात अपायां, ठार मारण्यास्तव. ६ जे काय आपले—पंत. ७. संकटकाळीं ८ सर्वश्रेष्ठ हितकर्ता. ९. मागधादि जे अराति ( शत्रु ) ते च कोणी सर्प त्याना २०. तप्त झाला. ११. आपल्या नगराला वेढण्यास्तव हे लोक आले आहेत असें तो समजला. १२. शतकोटि ( वज्र ) त्याचें जरि तुझ्या अंगांत वर्म ( चिलखत ) असलें तरी. १३. योग्य म्होरक्या ( सेनापति ) ज्यांस मिळाला नव्हता असे.

त्या दीनघातपापें व्यसन असें हें तुझ्या गळां पडलें. ९७
आतां जासिल कोठें ? ठाक मजपुढें करूनि शुद्ध रण;
करितों सर्वनृपहृद्‌यशल्याचें एक मीं च उद्धरण. ९८
दोघे चि करूं रण; मीं घेत नसें, तूं हि घे न, सेनेतें;
तेज स्वामिभुजांत चि, अन्यत्र अरिस लया नसे नेतें. ९९
मीं वासुदेव, तूं ही, दोघांतुनि एकला उरो जन, गा !
कोणीतरी अधिष्ठो देववधूंच्या सुखें उरोजनगा.' १००
'कुलज, वयें अधिक, म्हणुनि राज्या ! प्रथम प्रहार तूं चि करीं,'
ऐसें त्यासि म्हणोनि, त्रिजगन्नायक धरी स्वचक्र करीं. १०१
शस्त्रसमूहें झांकी अन्याय चि तो शृगाल यां न्याया,
हरि हरि अरिशिर चक्रें; श्रम काय हरिस मृगा लया न्याया?
यादवसिंहें मथितां वळभाग्यमदांध तो इलापकरी,
बहुविध त्याची भार्या आर्या पद्मावती विलाप करी. १०३
'झालासि दुरभिमानें केवळ तूं स्वपरघातकर, वीरा !
या प्रभुसख्यें घडता मजसह शोकीं न पात करवीरा.' १०४
निज शक्रदेव सुत त्या शरणागतवत्सळापुढें ठेवी,
ती अश्रुमुखी दीना येवुनि पद्मावती महादेवी. १०५
अंजलि करूनि म्हणे, 'जो केला दंडें विशुद्ध हांतनय,
श्रीकृष्णा ! शरण तुला आला त्याचा अनाथ हा तनय.' १०६
प्रभुनें बाळापत्या देवी समजाविली बरि द्रवुनीं;
करुणाघन कां छाया न करिल, बहु तापतां दरिद्र उनीं ? १०७

---

१ दुर्बळ सैन्याचा पराभव केल्यामुळें प्रबळ शत्रुचा हि पराभव करितां येईल अशा खोट्या कल्पनेनें व घमेंडीनें माझ्यावर स्वारी करण्याचें हें संकट त्वां आपल्यावर ओढून घेतलें. २. निष्कपट, धर्म्य ३. केवळ धन्याच्या मनगटांतील जोर च शत्रुनाशास उपयोगीं पडतो. ४. वसुदेवाचा नातलग. ५. उपभोग. ६. स्तनरूपी पर्वताग्रत. ७. कृष्णाला. ८ कृष्णापुढें. ९. पट्टराणी. १०. अन्यायी (शृगाल). ११. लहान आहे मूल जिचें ती.

कृष्ण म्हणे, 'दांवे! उगा, गेला या दुर्जनासह चि रोष;
झालों प्रकृतिस्थ[1], तुझा बांधव मीं; तुजकडे नसे दोष. १०८
सति! शक्रदेव त्याचा तैसा माझा हि पुत्र हा होय;
अभय दिलें, अभिषेक हि करितों घेवूनि निजकरीं तोय. १०९
म्यां अभय दिलें, हें तूं स्वमुखें सचिवादिकांसि जाणीव;
अभिषेकार्थ सुताच्या सति! सर्व प्रकृति[2] शीघ्र आणीव.' ११०
मेळविले पौर सचिव, केला अभिषेक शक्रदेवातें;
कृष्णें प्रयाण केलें, ज्याचें भय अरिस चैक्र[3] दे वातें. १११
दमघोषसहित आले मथुरेप्रति रामकृष्ण जयशाली,
ते घन त्या सुक्षेत्रीं[4] पिकवाया हर्षधर्मनयशाली[5]. ११२
आला यादवनागरसमुदाय, करूनि साज[6], सामोरा;
त्याला वळ कृष्ण तसा, अतिहर्षद मेघ वा! जसा मोरा. ११३
पौरस्त्रिया तयांवरि पुष्पांच्या करिति वृष्टि लाज्यांच्या;
म्हणती सुकवि, 'प्रभुमुखचंद्रचकोरी च' दृष्टि ला ज्यांच्या[7].
वंदिति वसुदेवातें, मातेतें, त्या हि उग्रसेनातें,
येना तें प्रेम परा, सत्य करिति विश्वबंधु ते नातें. ११५
वसले त्या मथुरेंत प्रभु होवुनि उग्रसेनवशवर्ती[8];
प्रभुमूर्तिपुढें न मिरवि रवि विधु, मिरवील काय यश वर्ती[9]?

---

# अध्याय एकविसावा.

कृष्णानुमतें गोपप्रेम स्मरुनि व्रजासि बळ गेला,
नंदयशोदागोपीगोपांचा स्वप्नसा विरह केला. १
गोपांत गोपवेष स्वीकारुनि राम तो, जसा पहिला,

---

१. मूळच्या [ शांत ] स्वभावाचा २ प्रजाजन. ३. सुदर्शन [ केवळ ] वातें भय दे. ४. सुपीक जमीनींत ( मथुरेंत ). ५. हर्षादि शाली ( भातें–धान्यें ) ६. थाटमाट करून. ७. ज्या स्त्रियांच्या ८. उग्रसेनाच्या आज्ञेंत वागणारे. ९. दिव्याची वात.

राहे, पाहे क्रीडास्थानें, बहु हर्षची व्रजीं महिला[1]. २
रामातें गोप म्हणति, "आम्हीं बा यादवेश्वरा! धन्य
धन्य स्नेहें तुझिया, लोकांत सभाग्य जन नसे अन्य. ३
अठरा वेळ बुडविला, होयिल न विमान[3] कां मगधराजा?
भगवंत तुम्हीं म्हणतां निहतांसि[4], 'विमान कामग[5] धरा, जा.'
झालों हृष्ट सबांधव, बा रामा! अधन जन जसा निधिनें;
वाटे लिहिलें भाग्य त्रिदशललाटीं नसे असें विधिनें." ५
राम म्हणे, "पाहें स्वप्राण तसे गोप मीं. न यादवसे.
चित्त व्रजीं च माझें, जेंवि समुद्रांत मीनयाद[6], वसे. ६
विसरेन कसें पालनलालन? जाल न मनांतुनि स्पष्ट.
वाढविल्यांतें न भजे धर्मज्ञ हि कोण हो! असा नष्ट? ७
येतें प्रथम 'यशोदे!' 'रोहिणि!,' 'देवकि!' असें मग मुखातें;
कीं आम्हीं पुत्र इचे, इजपासुनि पावलों बहु सुखातें." ८
पहिल्यापरी च सर्व व्यवहार प्रभुवर व्रजांत करी,
नंदादि गोप गोपी सर्व यशोदादि ज्या, तदाधि[7] हरी. ९
बहु गोपगोपिकार्पित उचित शुचि नया पदार्थ आवडती;
बा! भेटि आणिली जी, त्या श्रीगंगाधरासि[8] कावड ती. १०
रामातें भेटाया, भेटुनि गोपांसि, वारुणी आली;
जैसी गोमंतीं[9] ती प्रभुनें येथें हि सेविली आली. ११
बळभद्र म्हणे, 'यमुने! स्नान करिन आजि; तूं चि ये जवळ.
गंगेनें तेंवि तुझा हृद भक्तुनें मुहूर्त हो धवळ.' १२
पाचारिली न आली यमुना, समजोनि मत्त रामातें.
जो प्रभु म्हणतो, 'जाया मायाभ्रम[10] जन्मभूमि गा मातें.' १३

---

१ स्त्रिया २. गोंधळ. ३. हरला आहे गर्व ज्याचा तो ४. मारलेल्यांस.
५ बसणाराच्या इच्छेप्रमाणें जाणारें ६ मासे व इतर जलजंतु ७. त्यांची काळजी
८ रामेश्वर शंकरास. ९ मागें अ० २०, गीति ३४–४५ पहा. १०. जन्माला कारणीभूत असा मायामोह.

आज्ञेसि अनादरितां, राम हळें रविसुतेसि आकर्षी.
तें चरित मधुर गाउनि, नाचे गगनांगणांत नाकर्षी. १४
पाय धरुनि ती प्रार्थी, " कवि जें वात्सल्य गात असती, तें
प्रकटीं, रामा ! झाला मजला, जो दंड होय असतीतें[1]. १५
स्वपंथत्याग[2], अमार्गग्रहण[3], व्यवहार होय हा उलटा;
नेणें जडप्रकृति[4] मी; प्रभुनें तों ओढिल्यें जसी कुलटा. १६
मज हांसतिल शरण्या[5] सर्वा ही सागरंगमा[6] ' जातों '
म्हणतो, आजि स्वामी ! त्वां करितां राग, रंग[7] माजा तों." १७
सोडुनि राम म्हणे, ' गे ! तूं या वृंदावनीं असी च रहा;
गातिल सर्व मज तुज हि; दिधला म्यां वरदनायकें वर हा.'
तें अत्यद्भुत यमुनाकर्षण पाहोनि, ते बुधारामा[8]
करिति प्रणाम सर्व व्रजवासी त्या हळायुधा रामा. १९
गेला बळ मथुरेतें, कांहीं काळ व्रजांत राहूनीं;
सोडी स्वासन कृष्णप्रभु, दूरुनि अग्रजासि पाहूनीं. २०
आलिंगिति रामाचे सुचिर रुचिर वृष्णिनंदना भुज, गा !
बहु सुख; न सुटे चि मिठी, ती जैसी भेटि चंदना भुजगा. २१
' आहे कसी यशोदा ?' कृष्ण पुसे, ' बा ! असे कसा नंद ?
ग्रीष्मीं असेल कैसा आराम[9] विभो ! असेक सानंद ?' २२
राम म्हणे, " बा ! होता व्रजसह विरहाधिनें असानंद[10],
जेंवि चकोर विलोकुनि चंद्रा, आतां असे असा नंद. २३
मज पाहतां चि, धावुनि, माय यशोदा बळें गळां पडली.
घडली भेटि युगशतें जाणों, रडवूनि ती मला रडली. २४
काष्ठमय[11] वृषभ, हय, गज, रांवे, पांवे, शिकीं, विट्या, गोट्या,

१ कुलटेला. २ योग्य मार्ग सोडणें. ३ आयोग्य मार्गाचा स्वीकार ४. जल-पूर्ण, मदबुद्धि ( श्लेष आहे ) ५ आश्रयदात्या [ मला ]. ६ सागराला मिळ-णाऱ्या [ नद्या ] ७ शोभा, अब्रू, तेज ८ सज्जनांच्या विसाव्यास ९. ज्यावर जलसिंचन नाहीं तो आराम ( बाग ) सानद ( प्रफुल्लित ) कसा असेल ? १० दुःखी, कष्टी. ११ लांकडी.

राहे, पाहे क्रीडास्थानें, बहु हर्षवी व्रजीं महिला ॥ २ ॥
रामातें गोप म्हणति, "आम्हीं बा यादवेश्वरा! धन्य
धन्य स्नेहें तुझिया, लोकांत सभाग्य जन नसे अन्य. ॥ ३ ॥
अठरा वेळ बुडविला, होथिल न विमान कां मगधराजा?
भगवंत तुम्हीं म्हणतां निर्हतांसि, 'विमान कामग धरा, जा.'
झालों हृष्ट सबांधव, बा रामा! अधन जन जसा निधिनें;
बाटे लिहिलें भाग्य त्रिदशललाटीं नसे असें विधिनें." ॥ ५ ॥
राम म्हणे, "पाहें स्वप्राण तसे गोप मीं. न यादवसे.
चित्त व्रजीं च माझें, जेंवि समुद्रांत मीनयाद, वसे. ॥ ६ ॥
विसरेन कसें पालनलालन? जाल न मनांतुनि स्पष्ट.
वाढवित्यांतें न भजे धर्मज्ञ हि कोण हो! असा नष्ट? ॥ ७ ॥
येतें प्रथम 'यशोदे!' 'रोहिणि!,' 'देवकि!' असें मग मुखातें;
कीं आम्हीं पुत्र इचे, इजपासुनि पावलों बहु सुखातें." ॥ ८ ॥
पहिल्यापरी च सर्व व्यवहार प्रभुवर व्रजांत करी;
नंदादि गोप गोपी सर्व यशोदादि ज्या, तदाधि हरी. ॥ ९ ॥
बहु गोपगोपिकार्पित उचित शुचि तया पदार्थ आवडती;
बा! भेटि आणिली जी, त्या श्रीगंगाधरासि कावड ती. ॥ १० ॥
रामातें भेटाया, भेटुनि गोपांसि, वारुणी आली;
जैसी गोमंतीं ती प्रभुनें येथें हि सेविली आली. ॥ ११ ॥
बळभद्र म्हणे, 'यमुने! स्नान करिन आजि; तूं चि ये जवळ.
गंगेनें तेंवि तुझा ह्रद मत्तनुनें मुहूर्त हो धवळ.' ॥ १२ ॥
पाचारिली न आली यमुना, समजोनि मत्त रामातें.
जो प्रभु म्हणतो, 'जाया मोंसाश्रम जन्मभूमि गा मातें.' ॥ १३ ॥

---

१ स्त्रिया २ गांवढळ ३ हरला आहे गर्व ज्याचा तो. ४ मारलेल्यास. ५ बसणाराच्या इच्छेप्रमाणें जाणारें ६. मासे व इतर जळजतु ७ त्याची काळजी ८ रामेश्वर शंकरास ९. मागें अ० २०, गीति ३४–४५ पहा १० जन्माला कारणीभूत असा मायामोह.

आज्ञेसि अनादरितां, राम हळें रविसुतेसि आकर्षी.
तें चरित मधुर गाउनि, नाचे गगनांगणांत नाकर्षी. १४
पाय धरुनि ती प्रार्थी, "कवि जें वात्सल्य गात असती, तें
प्रकटीं, रामा! झाला मजला, जो दंड होय असतीतें[1]. १५
स्वपंथत्याग[2], अमार्गग्रहण[3], व्यवहार होय हा उलटा;
नेणें जडप्रकृति[4] मी; प्रभुनें तों ओढिल्यें जसी कुलटा. १६
मज हांसतिल शरण्या[5] सर्वा ही सागरंगमा[6]. 'जातों'
म्हणतो, आजि स्वामी! त्वां करितां राग, रंगं[7] माजा तों." १७
सोडुनि राम म्हणे, 'गे! तूं या वृंदावनीं असी च रहा;
गातिल सर्व मज तुज हि; दिधला म्यां वरदनायकें वर हा.'
तें अत्यद्भुत यमुनाकर्षण पाहोनि, ते बुधारामा[8]
करिति प्रणाम सर्व व्रजवासी त्या हळायुधा रामा. १९
गेला बळ मथुरेतें, काहीं काळ व्रजांत राहूनीं,
सोडी स्वासन कृष्णप्रभु, दुरुनि अग्रजासि पाहूनीं. २०
आलिंगिति रामाचे सुचिर रुचिर वृष्णिनंदना भुज, गा!
बहु सुख; न सुटे चि मिठी, ती जैसी भेटि चंदना भुजगा. २१
'आहे कसी यशोदा?' कृष्ण पुसे, 'बा! असे कसा नंद?
ग्रीष्मीं असेल कैसा आराम विभो! असेक सानंद[9]?' २२
राम म्हणे, "बा! होता व्रजसह विरहाधिनें[10] असानंद;
जेंवि चकोर विलोकुनि चंद्रा, आतां असे असा नंद. २३
मज पाहतां चि, धावुनि, माय यशोदा बळें गळां पडली.
घडली भेटि युगशतें जाणों; रडवूनि ती मला रडली. २४
काष्ठमय[11] वृषभ, हय, गज, रांचे, पांवे, शिकीं, चिट्या, गोट्या,

---

१ कुलटेला २ योग्य मार्ग सोडणें ३ आयोग्य मार्गाचा स्वीकार. ४. जलपूर्ण, मदबुद्धि (श्लेष आहे) ५ आश्रयदात्या [मला]. ६ सागराला मिळणाऱ्या [नद्या] ७ शोभा, अभ्रू, तेज. ८ सज्जनांच्या विसांव्यास ९. ज्यावर जलसिंचन नाहीं तो आराम (बाग) सानंद (प्रफुल्लित) कसा असेल? १० दुःखी, कष्टी. ११ लांकडी

रक्षुनि, लक्षुनि, आहे, कृपण जसा वित्तरक्षणा मोट्या. २५
'कृष्णा! कृष्णा! कृष्णा! कृष्णा! कृष्णा!' असें चि वा! म्हणती;
तुजवांचुन वांचु नये; भेटायास्तव चि वांचली पण ती. २६
हंबरल्या, पान्हेल्या, पाहुनि, लाहुनि सुखा महा[1] गायी.
त्या पावल्या सुकाळा, जाणों क्रमुनि[2] प्रजा महागायी[2]. २७
जरि भेटतों न मीं, तरि राज्यें ही पावते न गोप महा.
कृष्णा! स्पष्ट[3] खगोपम गमले शुचिभाव ते नगोपम[3] हा[3]. २८
वदल्या गोपी, 'हा जन अकपटमति, साधु न रुसविल यातें.
दारुण विरहदवानळ नेवू न प्रेमतरुस विलयातें. २९
गोपींचे वेणूच्या असती भरले च कान नादानें,
त्या देती आशींचीं[4] बहु गाळींचीं[4] हि कानना दानें. ३०
जीं केलीं, व्रजवासीं[5] गाती त्या त्यां चि साधु चरितांतें.
गृहकृत्यासि विसरल्या; बहुत चि, न सरेल, कथन करितां तें. ३१
सर्वत्र कुशळ त्यांचें, ज्यांचें तूं कुशळ इच्छिसी, कृष्णा!
सर्वां हि स्वजनाची, स्मरतां सप्रेम, पुरविसी तृष्णा." ३२
इत्यादि अग्रजोक्त श्रवण करुनि बहु मनांत आठविलें,
प्रभुनें प्रेम चि पुष्कळ, पावाया[6] आपणांसि[6], पाठविलें. ३३

---

# अध्याय बाविसावा.

चार[7] प्रभुला कथिती, 'जो भीष्मक भूप कुंडिनीं राहे,
त्याची रूपगुणखनि[8] श्रीतैसी[9] रुक्मिणी सुता आहे. १

---

१. आनदाला २. दुष्काळ भोगून. ३ शुचिभाव ( शुद्धप्रेमपूर्ण ) ते ( गोप ) पक्ष्यांसारखे व [ त्यास आश्रय देणारा ] हा ( बळराम ) पर्वतासारखा स्पष्ट ( खरोखर ) भासले. ४. मागील सुखाच्या आठवणीनें आशीर्वाद व त्या सुस्वभावामुळें गालिप्रदान. ५. व्रजवासांतील चरितांतें. ६. आत्मरूप होण्याकरितां. ७. हेर, दूत. ८. खनि=खाण. ९. लक्ष्मीसारखी.

त्रैलोक्यसुंदरीच्या लोभें आले कितेक, येतात,
नृप चतुरंग[१]बळभरें विपुळें धरणीस कंप देतात. २
होणार आजपासुनि तिसरे दिवसीं तिचा स्वयंवर, हो!
सर्वां हि सेवकांला वाटे निजनाथ रुक्मिणीवर हो.' ३
ऐकुनि देव निघे, ज्या सुयशाहुनि अमृत सुरस भासेना;
घे यादववीरांची, मुदिता[२] व्हायासि सुरसभा, सेना. ४
प्रभु यदुराज्या[३]सि म्हणे, 'रामसह स्वस्थ तूं रहा, राज्या!
तो हा आर्य, विसंबे विजयश्री निमिष ही न हारीं[४] ज्या.' ५
कुंडिनपुरासि पावे, पाहे रंगीं वरासनीं राजे,
अत्यभिमानी प्रत्युत्थान[५] न देणार ईश्वराला जे. ६
प्रभु गरुडातें स्मरला, तों तो तत्काळ पत्रिपति[६] आला,
पक्षपवनवेगें ते अभिमानी न्युब्ज[७] पाडिता झाला. ७
नगराबाहेर महारंगस्थानीं[८] खगेंद्र ये राया!
उडविल अचळ हि, पाडिल तो प्रभु कां नृपजना न येरा या?
कृष्ण म्हणे, 'पक्षींद्रा! आम्हीं आलों स्वयंवर पहाया,
जावूं विदर्भनगरीं, प्रथम पुढें चाल तूं द्रुत[९], रहाया.' ९
ऐसें प्रभुवर बोले, तो ऋथकैशिकपुरासि मग गेला,
वैदर्भें, रम्यगृहीं स्थापुनि, सत्कार योग्य बहु केला. १०
येतां गरुडसहाय प्रभु, राजे म्हणति सर्व ही 'हाय!'
भीष्मकसभेंत करिती मंत्र असा कीं, 'पुढें किजे काय?' ११
तेजस्वी मगधेश्वर राजसभेमाजि तो वदे हरिसा[१०],
"परिसो भीष्मक राजा, वचन तुम्हीं सर्व भूप हो! परिसा. १२
यादवबळ गरुडसहित आला कन्येसि कृष्ण साधाया,

---

१ गज, रथ, अश्व आणि पदाति यास चतुरंग सैन्य म्हणतात. २ आनंदित ३. उग्रसेनास. ४ बळरामरूपीं तिच्या गळ्यातील या पुष्पहारास ५ आदरसत्कारार्थ उठून उभें राहणें वगैरे ६ पक्षिराज ७ पालथे, तोंडघशी ८. माडवांत ९. लवकर. १० सिंहासारखा, (गंभीर स्वरानें).

न चुकेल परबळा हा, घनपटला जेंवि वात, बाधाया. १३
होते पैत्ती[1] दोघे गोमंतीं रामकृष्ण, जें कांहीं
करिते झाले, नृप हो ! तें काय तुम्हांसि ठावुकें नाहीं ? १४
गरुडीं बसेल जेव्हां, सबळ उभा संगरासि राहेल,
पाहेल याकडे नृप कोण, रणांत प्रताप साहेल ? १५
ज्ञानिमुखें ऐकतसों, "पूर्वीं हा कृष्ण जाहला घोंणी,[2]
एकार्णवीं बुडाली, तीं दंष्ट्रेनें चि उद्धरी क्षोणी.[3] १६
दैत्य हिरण्याक्ष महाबळ त्यातें तेधवां चि हा मारी;
कनककशिपुकाळ नृहरि होय, जसा अंधकघ्न कामारी.[4] १७
वामन होवुनि, घाली पाताळीं बळिस, करुनि बंधन, हा.
हरि याबांचुनि विसरे पळ हि, जसा यष्टिरहित अंध, न 'हा !'[5]
'हा चि सहस्रार्जुनघनपवन[6] परशुराम,' सांगती संत,
'दशरथसुत होवुनि करि दशवदनाचा रणांत हा अंत.' १९
प्रख्यात तारकामयसंग्रामीं[7] षोडशार्धभुज[8] झाला,
गरुडीं बैसुनि, घाली दैत्यबळीं हा चि भूप हो! घाला. २०
दिव्य सुदर्शनचक्रें हा चि प्रभु काळनेमिला खपवी,
जय पावता न समरीं, ज्यावरि करुनि प्रहार लाख, पवी. २१
वसुदेवपुत्र होवुनि सांप्रत ही पूतनादि बहु मथिले,
चाणूर, मुष्टिक, द्विप,[9] कंस हि; याचे प्रताप शत कथिले. २२
हा विष्णुप्रभु, नृप हो ! कैसा वाहेल गरुड अन्यास ?
करवील प्राणांचा किंवा समरांत शस्त्रसंन्यास.[10] २३
करुनि विचार करावें, जें काय मनास मानलें करणें;

---

१. पादचारी. २. रानडुकर. ३. पृथ्वी. ४. शंकर. ५. इंद्र 'हा !' न विसरे; म्हणजे, या कृष्णाचा आधार नसता तर त्याला 'हाय !' म्हणावें लागतें. ६. कार्तवीर्य-रूपी मेघाला [विसकटून टाकणारा] वारा ७ तारा (बृहस्पतिभार्या) ही आमयवत (रोगवत्—विनाशहेतु) झाली ज्या संग्रामांत असें जें देवदानवांचें दारुण युद्ध त्यांत. ८. अष्टभुज. ९. कुवलयापीड हत्ती. १०. संन्यास=त्याग.

आटेल शौरि[1]चा शरवर्षीं न घनासमान लेंके रणें." २४
शिशुपाळ म्हणे, "नृप हो! मगधेश्वर सत्य बोलतो, यश या
द्यावें, मरु[2]कूपींचें येइल कुणिच्या न खोलें[3] तोय शयां[4]. २५
गोमंतरण स्मरला, कथन करितसे तयास्तव[5] नेयाचें;
मगधेश्वर चि न, काळ हि करिल चि, पावुनि भया, स्तवन याचें.
येतां गरुड, गति कसी झाली? कांपोनि पावलों पतन.
कृष्ण चढेल खगेंद्रीं, तेव्हां समरीं म्हणाल कां 'वर्त[6]!' न?" २७
तों दंतवक्र बोले, "नृप हो! माझें हि आयका उक्त.
आलों स्वयंवरातें आम्हीं, तैसा चि कृष्ण, हें युक्त. २८
आम्हां वयो[7]धिकांतें न गणुनि, बाळें जनार्दनें स्वैर[8]
कंस, असावध असतां वधिला, यास्तव चि लागलें वैर. २९
साग्रज कृष्ण पळाला, तेव्हां आम्हीं हि लागलों मागें.
गोमंतदाह केला, कीं घडलें कर्म तें तसें रागें. ३०
जेथें जेथें दर्शन, तेथें तेथें हि कळि कशाला हो!?
कृष्णासीं सख्य करूं, नृप हो! हितबोध हा यश लाहो. ३१
कन्यार्थ कृष्ण कुंडिननगरा आला असे, न कळहातें.
मागिल न आठवील प्रभु; निश्चय[9], विसरला सकळ हा तें. ३२
प्राकृतनर अपकार स्मरतो, हा तों सुरप्रवर होय,
तापविलें ही पुनरपि शीतळ होतें च कीं जड हि तोय. ३३
देवीं, ईर्ष्या, मत्सर, हे बालिश बुद्धि सर्वथा नसती.
हा तों देवांचा ही देव, दयाशांतिसुक्षमावसती[10]. ३४
हा, 'आपण विष्णु' असें कळवाया गरुडसह असे आला;
युद्धाकरितां सेना घ्यावी न लगे चि सर्वथा याला ३५

---

१. कृष्ण २. मारवाडांतील खोल विहरींचें. ३. कुकरपुरुष कुणी—पंत. हात सडून गेलेल्या पुरुषाच्या. ४. हाताला. ५. मुत्सद्दीगिरीचें ६. हाय! हाय! ७. वयानें वडिलांतें ८ आपण होऊन. ९ [हा] निश्चय [समजा]. १०. वसती=राहण्याचें ठिकाण.

हा प्रीत्यर्थें[1] चि आला, यास्तव या स्तवनपूजनें अर्हा[2]
कृष्णा करूं प्रसन्न, स्तुति करितिल साधु, अन्यथा गर्हा[3]." ३६
शाल्व म्हणे, "राजे हो! म्हणती त्यातें चि जाणते ज्याला,
जो क्षत्रिय संरक्षी[4], न विसंबुनि चाप बाण, तेज्याला. ३७
कां कृष्णाला भीतां? करणें वांचोनि काय संधानें[5]?
न क्षत्रियें त्यजावी चापलता[6], जेंवि यष्टि अंधानें. ३८
अवतरला विष्णु क्षितिभरपरिहारार्थ, हें मला कळतें.
आम्हां मारिल समर्थी; यश, शस्त्र त्यजुनि वंदितां, मळतें. ३९
कृष्णाच्या शस्त्राहीं समरांत मरोनि सुगति जोडावी.
निश्चय हा, 'आयु असे, तों मरण नसे चि;' भीति सोडावी. ४०
वरिल जयासि, तयाची कन्या, सिद्धांत होय हा शुद्ध.
कलहत्रास कशाला? कृष्ण न आला करावया युद्ध." ४१
भीष्मक हृदयांत वदे, 'कृष्णद्वेषी, महोग्र, हा तनय,
रुक्मी वांचेल कसा? भद्र न पावे कदापि हा तनय. ४२
जरि भार्गवास्त्ररक्षित रुक्मी बलवान् प्रचंड होय, तरी
प्रभुबळ, याची शक्ति, स्पष्ट गमे, जेंवि सिंधुतोय, तरी[7].' ४३
'जें दंतवक्र वदला, तें चि करावें,' असें मनीं आणी,
भीष्मक जाय गृहातें, ज्याला रुचती न नाचणीं गाणीं. ४४
क्रथनाम स्वभ्राता, त्यासीं सुविचार करुनियां, राजा
तो कैशिक कृष्णातें प्रार्थी, तारावया पिता आजा. ४५
नमुनि प्रभुला, सक्रथ कैशिकराजा म्हणे अगाधा[8] त्या,
"लक्ष्मीकांता! शांता! प्रभुवर्या! वत्सळा! अगा धात्या[9]! ४६
जगदीशा! श्रीकृष्णा! आली अस्मत्कुळासि पावनता;
तव आगमनें झाले परितृप्त पितर; असा चि पाव नता. ४७

१ प्रेम राखण्याच्या हेतूनें. २. मान्य अशा. ३. निंदा. ४. जीवंत राहिला
५. तह करून, सलोख्यानें. ६ धनुष्य. ७ नौका ८. खोल बुद्धीच्या.
९ जगत्कर्त्या!

वा! आजि पूर्वजांचा झाला उद्धार; धन्य वासर हा;
पर्व असें न पर; म्हणे तुलसीगंधा न अन्य वास "रहा."[१] ४८
हें राज्य तुझें चि, तुझ्या चरणावरि वाहतों, महाबाहो!
अभिषिक्त विदर्भपुरीं, या राष्ट्रा द्यावया महा, बा! हो. ४९
तुज राज्य, जगन्नाथा! तुळसीचें ग्राह्य जेंवि वा! दळ तें.
स्पर्शमणि सुवर्ण चि करि, जरि भंगायासि लोह आदळतें. ५०
आम्हीं जें केलें, तें कोणी भूप न समर्थ मोडाया.
मगधेश्वर अरि हि तुला न करील उशीर हस्त जोडाया. ५१
मूर्धाभिषिक्त राजे आम्हीं सिंहासनस्थ रंगांत;
इतरांत राजमंडळ मान्य, जसें उत्तमांग[२] अंगांत. ५२
'कृष्ण अराजा कैसा येयिल या राजमंडळीं? आला
जरि, तरि बसेल नीच स्थानीं, कीं राजपद नसे त्याला.' ५३
ऐसें तुज लोकाधिपवंद्यातें मागधादि वदला जो,
तो सर्व नृपति, पाहुनि तव अभिषेक, त्यजूनि मद लाजो. ५४
अधिवासन[३] आजि करीं, हें भद्रासन[४] उद्यां चि साजीव.
राजेंद्रत्वें, देवा! कृष्णा! राजे समस्त लाजीव." ५५
ऐसें क्रथ कैशिक नृप विनविति, तें मान्य करि, न मन मोडी.
तातासि अपत्याची, प्रभुसि नताची तथापरिस गोडी. ५६
कृष्णाभिषेकवार्ता दूतमुखें ऐकतां चि गडबडले,
'मूर्धाभिषिक्त आपण,' या गर्वें जे सभेंत बडबडले. ५७
दीन, उदासीन हि, किति नृप झाले जे, तयांकडे बापा!
क्रथ कैशिक पाठविती पत्र, तयांच्या हरावया तापा. ५८
पत्रीं लिहिलें ऐसें कीं, "कृष्ण सुपात्र, राज्य ओपावें,
पूज्यातिक्रमदोषें[५] स्वकुळीं धर्में नये न कोपावें. ५९

---

१ ज्याप्रमाणें अन्य वासाचें तुलसीगंधापुढें माहात्म्य राहत नाहीं तद्वत्. २. मस्तक. ३ स्थापन. ४ सिंहासन ५ सन्माननीयाचा अपमान करण्याच्या पापानें

आम्हीं भ्राते कळवित होतों जों अर्थ हा असा यांस,
तों शक्रें पाठविलें नव आसन, केशवा वसायास. ६०
पुरुहूतदूत आला, लेख हि घेवूनि, यांत आज्ञा ती
मान्या करितील न जे, त्यांचे म्हणतील सर्व 'हा!' ज्ञाती. ६१
यास्तव अभिषेकावा केशव आम्हीं तुम्हीं अघ सराया,
या प्रभुपदप्रसादें उच्चपदावरुनि ही न घसराया." ६२
ऐकुनि पत्रार्थ असा, भ्याले भगवद्विरोधपापातें,
नृप बहु वळले, समजुनि शक्राज्ञाभंग हेतु शापातें. ६३
तों गगनीं चित्रांगद बोले, "नृप हो! त्रिलोकपति शक्र
आज्ञा करितो; 'कृष्णप्रभुसीं व्हा ऋजु, न सर्वथा वक्र. ६४
अभिषेक करा प्रभुला, करितां प्राणक्षयार्थ कां दावा?
प्रभुसीं सख्य करुनि, निजराष्ट्रीं सुखरूप सर्व नांदावा. ६५
राजे देव नरांचे, राजांचे देव सुर, मनीं आणा.
देव सुरांचा मघवा, मघव्याचा देव कृष्ण, हें जाणा. ६६
राजेंद्र कृष्ण व्हाया, अभिषेकीं नृप तुम्हीं च अधिकारी.
क्रथकैशिकांसि आज्ञा केली, त्यां मंडळी मिळो सारी. ६७
रंगीं, सुनीथ, रुक्मी, शाल्व, जरासंध, भूप हे चवघे
राहोत; विदर्भपुरा जा अभिषेकार्थ नृपति हो! अवघे.'" ६८
सुरपतिची चित्रांगदकथिता ऐकोनि भूप आज्ञा ते,
पुसुनि, निघाले हर्षें, जो मागध राजराज, या ज्ञाते. ६९
भीष्मक नृप करुनि पुढें, सकटक ते भूप कुंडिनाहून
गेले, हर्षित झाले, क्रथकैशिकपुर सुरम्य पाहून. ७०
सेना घेवुनि गेला भीष्मक नृप, खिन्न बहु मनीं परि तो,
कीं, रुक्मी ज्येष्ठ सुत द्वेष श्रीकृष्णविष्णुचा करितो. ७१
बसुनि विमानीं, गगनीं भरले गंधर्व, अप्सरा, अमर,
कमळ विदर्भपुर गमे, मधु मधुसूदन, सुधीजन भ्रमर. ७२

१ मतलब. २ कृष्णास-पंत. ३. पुरुहूत=इंद्र. ४. सरळ.

सुरदुंदुभि बहु गर्जत होते, तैसे चि सुरकरी घनसे,
सुकुसुमवृष्टिपताका म्हणती उष्णासि, 'उरकें, रीघ नसे.' ७३
तों, बैसोनि विमानीं, गगनीं सहलोकपाळ ये शक्र,
बा! ज्यापुढें न उरले जंभ, नमुचि, पाक, वृत्र, जे वक्र. ७४
मोठा विस्मय झाला, म्हणति मनीं भीष्मकादि ते राय,
'हा यदुवराभिषेकास्तव आजि स्वर्ग उतरला काय?' ७५
कैशिक येवूनि पुढें, घेवुनि, गेला पुरांत, ते राजे,
बसवी सभेंत, घालित होते मथुरापुरीस घेरा जे. ७६
प्रभुतें, 'आला सुरपति, राजसमाज हि,' असें निवेदून,
आणिति सभेंत ते क्रथकैशिक, ज्याच्या यशें निवे दून. ७७
श्रीमूर्तितें विलोकुनि, 'जय! जय!' म्हणती अशेष हर्षानें.
अभिषेक करिति विधिनें सुर, नर, घन जेंवि तोयवर्षानें. ७८
निधिसंभव अष्ट कलश धरुनि करीं, लोकपाळ ते अष्ट
प्रभुवरि अभिषेक करिति, साधूंचे सर्व नाशले कष्ट. ७९
प्रभुच्या अभिषेकोत्सवसमयीं जन सर्व ही नृपा! धन्य;
अद्यापि धन्य गाते, आयिकते, ते अधन्य जे अन्य. ८०
मुकुटादि विभूषाहीं मग सर्वस्वजनकुळकळंकारी
होय अळंकृत भगवान्, त्रिभुवन जो निजयशें अळंकारी. ८१
पूजुनि भूदेवांतें, नरदेवांतें सुरत्नकनकाहीं,
भूषवि, जरि हि न वरिती भक्तिविना मुक्ति साधुजन कांहीं. ८२
त्यांची आज्ञा घेवुनि, बैसे भद्रासनीं कमळपाणी.
'राजेंद्रः श्रीकृष्णो जयति,' असी वदति देवनर वाणी. ८३

---

१. देवांचे हत्ती. २ बाहेर निघ. ३. दुःखित. ४. ज्यांतून कुबेराचे अष्टनिधि उत्पन्न झाले ते. ५ कळक=पाप+अरि=शत्रु, पाप नाहींसें करणारे. ६ ब्राह्मणाला. ७. अन्वयः—जरि हि साधुजन भक्तिविना मुक्ति (निर्गुण मुक्ति) कांहीं (कोणत्या हि प्रकारें, मुळीं च, बिलकूल,) न वरिती, [तरी अशा निरिच्छ व निष्काम भक्तांना हि कृष्ण] भूषवि (अलंकारानीं सजविता झाला)—निर्णय०.

प्रभुच्या दक्षिण पार्श्वीं[1] गरुड, सकळ वृष्णिजन वसे वामीं.
साधुजन म्हणे, 'सोडिन या पायांची कधीं न सेवा मी.' ८४
[2]वालव्यजनच्छत्रालंकृत सिंहासनस्थ राज्यांचा
इंद्र विराजे; त्यांचा सर्व हि पुरुषार्थ, नाथ हा ज्यांचा ८५
कैशिक विनवि प्रभुला, "राजेंद्रा! प्रार्थितात हे राजे,
'अपराध नाठवावे, केले, मानुनि मनुष्य तुज, बा! जे.'" ८६
त्यातें श्रीकृष्ण म्हणे, 'शब्द न निघती मदाननें लटिकें.
बा कैशिका! समज तूं, एक दिन हि वैर मन्मनीं न टिके. ८७
सुक्षत्रिय जे, त्यांचा रण करणें होय मुख्य हा धर्म;
होणें विमुख अधर्म; स्वल्प हि तेणें जगीं नसे शर्म. ८८
नृप हो! निजधर्म तुम्हीं केला, अपराध एक ही नाहीं.
म्लान न व्हावें, उपवनवृक्षाही जेंवि सेकहीनाहीं[3]. ८९
नृप हो! अभिमुख[4] मेले, आतां त्यांचा करूं नका शोक.
व्हावे जीव मरावे येथें, नृप हो! असा चि हा लोक. ९०
जें गेलें तें गेलें, सुक्षत्रिय पावले शुभ गतीतें.
जी सुभगा[5] देवस्त्री, आवडले परम ते सुभग तीतें. ९१
रुचती क्षमा चि आम्हां; वैर नृपति हो! तुम्हीं हि सोडावें.
निष्कपट नित्य सख्यें सयश सुकविप्रियार्थ जोडावें.' ९२
ऐसें, सत्य, प्रिय, हित बोलुनि, कैशिकमुखाकडे पाहे,
विश्वसुहृत्, करुणार्णव, मग जगदीश्वर नृपा! उगा राहे. ९३
प्रभुला भीष्मक विनवी, 'राजेंद्रा! हा स्वयंवर स्वमतें
रुक्मी, मज न कळविनां, करणार बळें, असें मला गमतें ९४
माझें मत एकाला द्यावी कन्या, परंतु हा तनय
चालों चि न दे, देवा! कीं अतिदारुण कुबुद्धि हा तनय.' ९५
श्रीकृष्ण म्हणे, "राज्या! रुक्मी येव्हां चि जरि असा अनय;

---

१ बाजूस २ छत्रचामरविभूषित ३ ज्यावर पाणी शिंपडलें नाहीं अशानीं
४ [रणांत] पाठ न फिरवितां. ५. भाग्यवती

पावल प्रौढदशा, तव्हां होईल हा कसा तनय ? ९६
कळला नसे स्वयंवर तुज कैसा, कुंडिनास घेरा जे
घालुनि, बहुत उतरले, बहु आदरिले तुवां हि हे राजे. ९७
मिथ्या वदतोसि, नृपा ! मिथ्या रुक्मी हि बोलतो कां गा ! ?
आंगा अपयश कुष्ट चि, नृप हो ! हें सत्य कीं मृषा, सांगा.
'करितों स्वयंवर,' असें रुक्मी बोलोनि, करित कां नाहीं ?
कुलज्यांचें आयकिलें सत्य चि, मिथ्या न, चरित कांनाहीं. ९९
'जे स्वर्गीं यज्ञाहीं संपादित असति रम्यतम लोक,
अनृतें ते सर्व बुडति,' धर्मज्ञ म्हणति, 'घडे परम शोक.' १००
एका ही नृपतिपुढें वदतां मिथ्या, असा असे घात,
बहुतांसीं अनृत सुता वतौं देतोसि तूं कसा तात ? १०१
बहुधा तुजला माझें आगमन चि हित नसे, नव्हे पात्र,
आतिथ्य तरी च नृपा ! तुजपासुनि पावलों न मीं मात्र. १०२
मत्संकोच न धरितां, दे पात्राकारणें नृपा ! तनया.
मीं आलों या दोषें, दान न देवूनि करिसि कां अनया ? १०३
कन्यादानीं करि जो विघ्न, असुनि आयु, तो चवे नर कीं,'
वदले मन्वादि स्मृतिकार, 'महापातकी पचे नरकीं. १०४
वास्तव चि तव गृहा मीं नाहीं आलों, नृपा ! मला कळलें
कीं, आतिथ्य न होयिल; सुयश मळेल चि, कधीं न जें मळलें.
आतिथ्यपात्र सर्व हि, मीं च नव्हें कीं, बरें अगा राया !
होती फार चि लाज, न जरि येतों साधुच्या अगारा या." १०६
भीष्मक म्हणे, 'करावा अज्ञजनीं कोप न, क्षमाशीला !
साधु न चित्तीं धरिती, घडती अपराध लक्ष माशीला. १०७

---

१. स्वयंवर कैसा (कसा असतो, त्याचे नियम व त्याचीं बंधनें कोणती)
[हें] तुज कळला नसे (याची तुला बरोबर माहिती नाहीं असे वाटते).
२. योग्य वराला. ३. कौशिकराजाच्या ४ माशीच्या अंगीं लाखो दोष असतात; परंतु त्याचा सुज्ञ लोक राग धरीत नाहींत.

आलों शरण तुला मीं; मजवरि करिसिल दयासुधावृष्टी,
होयिल जरि बहु मलिना नलिनाक्षी! हे सुनिर्मळा दृष्टी. १०८
वाटे, आतां न करिल कन्यादान स्वयंवरीं तनय;
द्यावी एकास चि, हें होयिल; होतां असें, नसे अनय.' १०९
कृष्ण म्हणे, "एकाला, किंवा द्याल स्वयंवरीं कन्या,
काय प्रमाण येथें? लंघी धर्मासि, तो न कां अन्या? ११०
'मजला चि दे स्वकन्या, अन्या देवूं नको चि,' हा कांहीं
आग्रह सुज्ञ न करिती, भाव्यर्थी काय होय हाकाहीं? १११
हे दिव्यमूर्ति होय श्रीदेवी रुक्मिणी, नव्हे अन्या;
दयिता विष्णुप्रभुची, परम सती समुचिता नसे अन्या. ११२
अंशावतरणसमयीं विधिनें श्री विनविली स्वयें, प्राज्ञा!
आयिकतां, 'हो भीष्मककन्या,' हे विष्णुनें दिली आज्ञा. ११३
'देती धन्या कन्या अन्या, अन्याय,' म्हणुनि पक्षीन
आला, हा, विघ्न करुनि, म्हणतो, 'मीं स्वामिवित्त रक्षीन.' ११४
'हे भलत्यासि न देवूं द्यावी,' ऐसा विचार आठविला,
देवेंद्रें हा विनतापुत्र प्रार्थूनि शीघ्र पाठविला. ११५
आलों स्वयंवरातें, साक्षात्छ्रीतें हि मीं पहायास;
ब्रह्मादि देव करिती यच्चरण पहावया महायास. ११६
जरि म्हणसि 'क्षंतव्यं,' तरि आधीं च क्षमा असे केली,
कीं, सौम्यरूप आलों, अरिवरि सेना कधीं नसे नेली. ११७
आला घेवुनि मागध, कवलुनि आग, रुंडहीन सेनेला,
तेव्हां बळ कोठें हो!? आम्हीं हा गरुड ही नसे नेला. ११८
आलों न विरोधाला, कलुष नसे आमुच्या मनीं कांहीं.

१ कमलनेत्रा २ धर्माहून कमी महत्त्वाच्या इतरास ३ होणाऱ्या गोष्टीबद्दल उगी च ओरड काय कामाची? ४ स्त्री ५ गरुड ६ क्षमा असावी. ७ मनांत पापबुद्धि धरून. ८. क्रोधें अहीन—अरहित,—'मागध' विशेषण अथवा 'सेना' विशेषण—**पंत.**

स्वस्थ रहा, वृष्णींच्या न दुखविला साधुधी[1] अनीकांहीं[2]. ११९
कुलज पवित्र ज्ञाता देवद्विजभक्त तूं असामान्य.
मज उग्रसेन किंवा आनकदुंदुभि तयाअसा मान्य. १२०
ज्यांहीं मदर्चनार्थ[3] प्रेमभरें आपुलें दिलें राज्य,
हे पावतील मोक्ष क्रथकैशिक, विषय सेवुनि प्राज्य. १२१
यांचे दश[4] पूर्वपुरुष[4] गेले स्वर्गासि, शत्रुच्या काळा!
जातील पुत्रपौत्रप्रभृति अवर[5] ही दश, क्ष्मापाळा[6]! १२२
नृप अभिषेका आले स्वर्गीं वसतील हे हि वासवसे;
कीं, मृत्तिकेंत मृगमदसंयोगें रसिकसेव्य वास वसे. १२३
आतां स्वपुरा जातों, स्वस्ति[7] तुम्हांला असो, धरापति हो!
तुमची निजधर्मसुरद्विजभजनीं सादरा सदा मति हो." १२४
वसतां स्वरथीं भीष्मकराज्यातें स्वस्वरूप दाखविलें;
तें विश्वरूपदर्शन त्या, रुग्णा[8] जेंवि अमृत चाखविलें. १२५
भीष्मक भगवंतातें, गरुडातें, स्तवुनियां, करी नमनें,
गेला शरण प्रभुला मुक्त्यर्थ तसा, जसा करील मनें[9]. १२६
एक कोश प्रभुला पावितें[10] जावूनि, परतले मागें,
नेले कुंडिननगरा सर्व हि नृप भीष्मकें महाभागें. १२७
मथुरेंत स्वबळसह प्रभु राहवुनि, स्वयंवरा गेला,
परं[11] राजे ते भ्याले, जैसे मृग, सिंह जरि न रागेला. १२८
प्रभु निघतां चि निघाला, तें परमासन[12] पुढें करूनि, हरी[13]
स्वर्गातें जाय; गमन निजलोका सर्व लोकपाळ करी. १२९

---

१ चांगल्या बुद्धीचा २ सेनानीं ३ माझ्या पूजनाकरितां ४ पूर्वांच्या दहा पिढ्या ५ पुढील [दहा पिढ्या] ६ पृथ्वीपते! ७ कुशल ८. रोग्याला. ९ अंतःकरणापासून १० पोंचवीत ११ परंतु १२ ज्यावर श्रीकृष्ण अधिष्ठित झाला होता तें श्रेष्ठ सिंहासन. (मागें ६० वी गीति पहा). १३ इंद्र

# अध्याय तेविसावा.

भीष्मक म्हणे, 'नृपति हो! कृष्णविरोध स्वयंवरीं दोषे[1]
मम अन्यायें उठला, नमितों, मजवरि करूं नका रोष.' १
प्रभुच्या प्रतापतपनें[2] जे होते अंतरांत पोळविले,
वस्त्रालंकारांहीं पूजुनि, निववुनि नरेश बोळविले. २
मागध, शाल्व, सुनीथ, क्रथ, कैशिक, दंतवक्र, हे होते,
म्हणती, 'कुंडिनपालिचा विदित अभिप्राय आपणा हो,' वे.[3] ३
भीष्मक म्हणे, "नृपति हो! तुमची, 'श्रीकृष्ण विष्णु,' हे उक्ती
आयकिली, मग गेलों शरण तया मीं, घडावया मुक्ती ४
त्रिभुवनपतिपुत्रानन पाहे सप्रेम देवकी धन्या.
भाग्यवती अदिति सती कीं हे, लोकीं असी नसे अन्या. ५
प्रभुसीं स्पर्धा करितो, ऐकुनि हि महाद्भुता चरित्रास,
रुक्मी पावेना, परि पावतसें वृद्ध मीं, परित्रास[4]. ६
जो हरिपुढें करिल गज, होवूनि मदांध, काननीं चेष्टा,
प्राप्ता दशा तयाला होयिल तत्काळ कां न नीचेष्टा[5] ?" ७
शाल्व म्हणे, "नरनाथा! रुक्मी तव पुत्र हा असामान्य,
रामाकृष्णावांचुनि तिसरा क्षितिवरि नसे असा मान्य. ८
एक रथातिरथांचीं वृंदें युद्धांगणांत वाहेल;
जरि भार्गवास्त्र योजिल, तरि याचें तेज कोण साहेल ? ९
श्रीकृष्ण तों परपुरुष[6], या शूलधर[7] हि न जिंतिल कदापी,
चा! अमरीतिलकांतें[8] एक महाभूतिचा तिलक दापी. १०

---

१ वखेडा, गडातर २. तपन=सूर्य. ३ समजू दे. ४ अत्यंत त्रास. ५ नीचाला योग्य अशी. ६ सर्वश्रेष्ठ पुरुष ७ शिव. ८ देवस्त्रियांच्या तिलकाला—सौभाग्याला—एक महाभूतिचा (महामाया जी लक्ष्मी तिचा) तिलक दापी, पति हें च स्त्रियांचें सौभाग्य, म्हणून देवस्त्रियांच्या सौभाग्याला अर्थात् देवांना पराभूत करणारा एक लक्ष्मीपति विष्णु (कृष्ण) च होय, असा भावार्थ.

तव पुत्र महातेजा शास्त्रांचें तत्व जाणतो शुद्ध;
'जगदीश' असें समजुनि, न करी वसुदेवसूनुसीं युद्ध. ११
त्याचा समरीं जेता एक असे 'काळयवन' या नावें,
कृष्णासि अवध्य, नृपा! ज्याचें शकें हि तेज वानावें. १२
द्वादश वर्षें, भक्षुनि चूर्ण अयाचें, करी सुतप, राया!
गार्ग्य मुनि; महेश्वर दे सुत यादवपरिभवा सुतपरा या. १३
तो एक अवध्य असे यवनाधिप माथुरांसि या काळीं,
होतिल वृष्णिमुखें, त्यापासुनि पावुनि पराजया, काळीं. १४
हें जरि रुचेल, नृप हो! यवनपतिकडे स्वदूत धाडावा;
आणावा मथुरेवरि; कृष्णाचा सर्व गर्व झाडावा." १५
ते नृप म्हणती, 'करितों आश्रय विजयार्थ काळयवनातें;
पेटो भेटोनि यवन मंत्रातें, दहन जेंवि पवनातें.' १६
मागध म्हणे, 'नृपति हो! आश्रय मीं; स्नेह आजि सोडून,
करितां परसंश्रय, अरिहृत राज्यें मद्गळें चि जोडून. १७
स्वपति त्यजुनि जसा परपुरुष वरावा, तसें चि हें कर्म,
धर्मत्यागें न घडे स्त्रीस, तसें कुलजमतिस हा, शर्म. १८
माझे आश्रित होतां अन्याश्रित, मम मना महाकष्ट,
यावरि मरण श्रेयं, क्षितिपति हो! मज न जीवन स्पष्ट. १९
या तुमच्या संकल्पें झाली लोकांत मज बहु व्रीडा;
परि देतों दूत; करा कार्य; करिन मीं तुम्हांसि कां पीडा? २०
न कळे कृष्णासि असा प्रेषावा दूत, जो गगनगामी.

---

१ जिंकणारा २. लोखंडाचें ३ मुलगा व्हावा असा ध्यास लागलेल्या गार्ग्याला ४ मथुरावासी जनास (यादवांना). ५. जेंवि पवनातें भेटोनि दहन [पेटतो तेंवि] यवन (काळयवन) मंत्रातें (आमच्या या बेतांत) भेटोनि (सामील होऊन) पेटो (अतुल पराक्रम करो) ६. [काळयवनाचा आश्रय] करितां (जोडावयास पाहतां हें तुमचें कर्म, ६० ७. हितावह; बरे ८. आकाशमार्गें जाणारा.

पुरवुनि काम, न होयिन देवांच्या मान्य कां मग नगा मीं ? २१
सौभपते ! खेचर रथ, जैसा रविचा, तसा तुझा आहे.
जा तू चि, काळयवना घेवुनि ये, नृप सुखी करीं बा ! हे' २२
शाल्वासि असें सांगे, मग मगधाधीश भीष्मकासि पुसे,
जाय स्वपुरा, गमले परमप्रिय राम-कृष्ण ज्या रिपुसे. २३
रुक्मी, भीष्मक, दुर्नय चिंतुनि, होवूनि दीन गेहांत
गेले, ज्यांच्या कांहीं नाहीं उत्साह तेज देहांत. २४
सखियांत रुक्मिणीनें निश्चय 'कृष्ण चि वरीन' हा केला.
शाल्व स्वपुरा जावुनि, गगनपथें यवनपतिकडे गेला. २५
होता सभेंत हरवरसंभव तो काळयवन अतितेजा,
वृत्रा असुर तसे बहु यवन, उपासिति विशाळमति ते ज्या. २६
मंद, सुगंध, सुशीतळ वायु अकस्मात् सभांतरीं वाहे,
पाहुनि आश्चर्यातें, काळयवन ससख तो नभीं पाहे. २७
तों विश्वकर्मनिर्मितरथरत्नीं शाल्व देखिला यवनें,
तो स्वसखा ओळखिला, ज्याच्या अत्यंत निववीलें पवनें. २८
दिव्यरथावरुनि तळीं शाल्व उतरला, तया यवनपतितें
भेटे, ज्याच्या वरिलें बहु सौख्य सकळ जनें पवनपतितें. २९
पूजोद्युक्त यवनपति होय, तथा तो म्हणे, 'महाबाहो !
मीं दूत, नको पूजा, सिद्ध, जयें धावया सहा, बा ! हो.' ३०
यवनपति धरूनि करीं, बसवी सिंहासनीं स्वमित्रातें,
कुशळ पुसे, त्या पाहुनि बहु हर्षे, पद्म जेंवि मित्रातें. ३१

---

१ ह्या ठिकाणीं हस्तलिखित प्रतांत "न गा मीं" असे पदच्छेद आहेत, परंतु त्यावरून कांहीं हि अर्थबोध होत नाहीं, म्हणून 'नगा मीं' असा पदच्छेद च योग्य दिसतो व संदर्भावरून हि "देवांच्या नगा" (कल्पतरूस) असा अर्थ युक्त आहे २ आकाशगामी ३ निरोप घेई ४ दुष्ट मसलत योजून ५ शंकराच्या वरानें उत्पन्न झालेला ६ इष्टमित्रांसह ७. ज्या रथाच्या वेगानें उत्पन्न झालेल्या वाहुटळींत पडलेल्या मनुष्यानें हि. ८. आनंदाला.

'त्वत्पूजनें सकळ नृप पूजित होतील, म्हणुनि मित्रास
तुज पूजितसें; पूजुनि पूज्यातें होय सर्व वित्रासें. ३२
सखया! राजगृहेशें तूं पाठविलासि कोणत्या कार्या?
आम्हीं आश्रित ज्याचे, त्या काय असाध्य मागधा आर्या? ३३
आज्ञा प्रभुनें केली काय? मला सांग, दुष्कर हि तातें
कथिलें करिन चि; करितो रवि तो श्रितभूपपुष्करहितातें.' ३४
शाल्व म्हणे, "यवनेंद्रा! आयिक मगधेंद्रशब्द तूं बा! हे;
'जगदाबाधी कृष्ण क्रूरमति प्रकट जाहला आहे. ३५
मीं या अविनीतातें समुचित शासन करावया, राजे
सकळ सबळ मेळविले, माझ्या आज्ञेंत वर्तती या! जे. ३६
कोंडुनि गोमंतनगीं त्यासि, चहूंकडुनि लाविला दहन,
दमघोषमतें सहसा पेटविलें एकदा चि तें गहन. ३७
तों कृष्णाचा अग्रज राम उडी सैन्यसागरीं घाली,
मागुनि कृष्ण हि; नाहीं द्वादशअक्षौहिणी चमू झाली. ३८
हळमुसळाहीं राम क्षय करिता जाहला, जसा काळ,
कृष्ण गदाचक्राहीं, तेजें तो प्रौढ, हे वयें बाळ. ३९
राम रणीं मज मुसळें माराया सिद्ध होय, तों धाता
'मृत्यु विहित अन्य असे,' ऐसें वदतां चि आवरी हाता. ४०
त्या विधिवचनें झालों मीं चिंताविष्ट, परतलों मागें,
सांप्रत सर्व नृपांचें श्रेय करावें तुवां महाभागें. ४१
गार्ग्यमुनि महोग्रतपें आराधुनि शंभुच्या पदा लागे,
'माथुरजनें नव्हे वध, तेजस्वी पुत्र दे,' असें मागे. ४२
रुद्रवरोद्भव तो तूं हे माथुर रामकृष्ण मथिसील,

१ त्रासनाश म्ह० सुख, समाधान २. जरासंधानें, 'राजगृह' हें मगधदेशांतील एक मोठें नगर होतें ३ प्रिय [मित्रानें] ४ आपल्या आश्रयास असलेले जे राजे ते च कोणी पुष्कर (कमळें) त्यांच्या कल्याणाला ५ जगाला पीडा देणारा. ६. उन्मत्ताला. ७. नाहींशी, नष्ट ८. नेमलेला. ९. काळजीनें व्याप्त.

नृपजनताप दिगंतीं अरिजनसह जावयासि कथिसील. ४३
स्वजनवदन विकसवितो जन्मुनि, अस्वजनवदन करपवितो;
सर्वामरबहुमत हा पुरुष, जसा दैत्यकदनकर पवि तो.' ४४
ऐसा संदेश तुला आलों घेवुनि राजराज्याचा,
सखया! प्रताप नाहीं यामागें पावला जरा ज्याचा." ४५
यवनेंद्र म्हणे, "झालों या संदेशेंकरूनि मीं धन्य.
सर्व नृपांच्या कोणी यापरि पात्र न अनुग्रहा अन्य. ४६
मज सर्वसुरासुरगणदुर्जयकेशवपराजय कराया
सकळ नृप कथिति, त्यांच्या पुण्यें येइल वरा जय करीं या. ४७
बहुतांचें संकल्पित जें, तें होतें चि निश्चयें कार्य.
'बहुजनहितार्थ मृत्यु हि जय चि,' असें म्हणाति सर्व ही आर्य."
ऐसें बोलोनि, पुढें, सत्कारुनि, शाल्वनृपतिस प्रेषी,
'आजि च सुमुहूर्त,' म्हणे; ब्राह्मण पूजुनि निघे प्रभुद्वेषी. ४९
कृष्ण विदर्भपुराहुनि मथुरेसि निघोनि जेधवां आला,
मुख्य सचिव पक्षीश्वर, हृद्गत समजोनि, विनविता झाला. ५०
'रैवतनरवरनगरी सागरतीरीं कुशस्थळी होती,
प्रभुजी! रुक्म्यानें बहुकाळ लुटुनि ओस पाडिली हो! ती. ५१
अतिरम्य रैवताचळ पाहुनि, तें ही कुशस्थळीस्थान,
मग कंटकोद्धरण मीं करिन, करि जसें भवत्पदध्यान.' ५२
ऐसें प्रभुला प्रार्थुनि गेला पक्षींद्र. 'कृष्ण मथुरेला
येणार,' उग्रसेना वृत्तांत श्रुत चरें सकळ केला. ५३
शक्रप्रेषित यादवरूप धरुनि शंखनिधि भजे देवा,
दे वासुदेवचित्तप्रीत्यर्थ यथेष्ट धन, करी सेवा. ५४
मांडळिकाला लक्ष प्रभुच्या आज्ञेकरूनि दे वित्त,

१. नाहींसा व्हावयास. २ सर्व देवाना बहुमान्य ३. निरोप ४ या माझ्या हाताला ५. मंत्री, मसलतगार ६. [ नरवरशत्रुरूपी ] कांट्याचें उच्चाटण. ७. तुमच्या पायाचें चिंतन. ८. कुबेराच्या नऊ निधींपैकीं एक.

अर्बुद मांडलिकेशा; अयुतें करि हृष्ट सर्वजनचित्त. ५५
अभिषेक देवकीतें प्रभुचा कथि उग्रसेन, शौरीतें;
जावुनि गृहीं गुहाचा जेंवि शिवातें हिमाद्रि गौरीतें. ५६
हर्षे जसी अयोध्या अभिषेकमहें तसी च मथुरा, हो!
द्विज म्हणति,'असा चि प्रभु सुचिर सुजन पाळु,शत्रु मथु, राहो.'
बळदेवातें घेवुनि, सामोरा उग्रसेन तो गेला;
प्रभुतें पाहुनि, पायीं चाले, कीं, विवश भक्तिनें केला. ५८
सुरुछत्रमुकुटचामरशोभासंपन्न कृष्ण पाहोनीं,
संकोचला प्रभुपुढें, न च टिकवे राजचिह्न वाहोनीं. ५९
त्यातें राम म्हणे, "बा! बैस रथीं, छत्रचामरें कां गा!
त्यजिसी? यदुराजा! हीं मातें म्हणती, 'तुम्हीं तरी सांगा.'" ६०
यदुराज म्हणे, 'रामा! अनुज तुझा कृष्ण विष्णु हा पहिला,
भाव न समजों चि दिला, ताराया पातला स्वयें महिला. ६१
अभिषेक स्वीकारुनि, झाला राजेंद्र; यापुढें शोभा
काय पराची? कोण ग्रह तो, दिनमणिपुढें धरी जो भा? ६२
कृष्ण प्रभु राजेंद्र, त्रिजगत्पति, हा अनंतवर्चा, या
वांछित असें स्तवाया मीं, सर्वस्वें करूनि अर्चाया.' ६३
राम म्हणे, 'जरि झाला राजेंद्र तुझा, तुझ्या गृहा आला,
पूज्य स्तव्य पराला, गुरु तूं, पूजूं स्तवूं नको याला.' ६४
बळ उग्रसेन, ऐसें बोलत, गेले प्रभूत्समाजवळ;
पूजोद्यत यदुराजा प्रभु वारी, प्रेमें जरि म्हणे 'न वळ.' ६५
'यादवराज्यपदीं तूं संप्रार्थुनि बसविलास, बसलास;
पूजिसि कसा मज? करीं पूजा, जरि वृष्णिराज नसलास. ६६
मत्पूजा करिन म्हणसि, मच्चित्तप्रिय नव्हे चि बापा हें;

---

१. कार्तिकस्वामीचा [अभिषेक] २. महें=उत्सवानें. ३. पाडाव करो. ४. देहभानरहित. ५. तेज. ६. अपार तेजस्वी अशा. ७ कृष्णप्रेम त्याला 'मागें बहू नको' असें म्हणत होतें तरी. ८ नसतास.

आम्हीं प्रजा, प्रभो! तूं स्वामी, समुचित असें चि बा! पाहें. ६७
बैस रथीं, नृपचिह्नें स्वीकारुनि, चाल तूं पुढें, देवा!
आम्हीं नित्य करावी यदुराजा! आदरें तुझी सेवा. ६८
हे लक्ष दक्षिणा, हीं दिव्यें वस्त्रें, विभूषणें, शक्रें
तुज दिधलीं, यदुराजा! घे, राज्याच्या हि घेतलीं चक्रें. ६९
या आर्या रामाला, वसुदेवाला, विभूषणें वस्त्रें
पाठविलीं त्या देवें, ज्याच्या वृत्रादि भक्षिले शस्त्रें. ७०
तुजजवळि जे विकद्रुप्रमुख वसति, दशसहस्र धन यांतें
दिधलें आहे शक्रें, द्यावें तातें जसें स्वतनयांतें. ७१
माथुर पौर पुरुष जे, प्रत्येक सहस्र यांस हा भाग,
तैसे चि सूतमागधबंदी, यांला हि दे महाभाग. ७२
वृद्ध स्त्रिया पुरीं ज्या असती, वसती गणांगना बा! ज्या,
शत शत सुवर्ण यांला दिधलें आहे सुरेश्वरें, राज्या!' ७३
यापरि सांगुनि कृष्णें, जननीचा फार सुखविला चुलता,
परमप्रसाद नसतां, अति हर्षभरें हि तो उरीं उलता. ७४
श्रीसाकेतीं जैसा श्रीरामाचा त्रिताप वाराया,
श्रीमथुरेंत तसा चि श्रीकृष्णाचा प्रवेश, गा राया! ७५
वर्षति लाजप्रकरें, पाहुनि, करिती पुरस्त्रिया नमनें;
वर्णिति चरितें; हरितें सोडुनि, मानिति परं प्रिया न मनें. ७६
मातातात विसरती नमनीं द्याया सुतासि आशीतें,
या शीतें नेत्रजळें भिजवुनि, परि देति हर्ष राशीतें. ७७
प्रभु उग्रसेन नृप बहुमान सभेमाजि बसुनि जों रक्षी,
तों त्या कुशस्थळीहुनि आला कल्पांतवातसा पक्षी. ७८
एकांतीं गरुडासीं साग्रज केशव वदे, 'महाबाहो!

---

१. देणगी. २ समुदायानें. ३. भालदार, चोपदार, भाट. ४. महाभाग्यशाली ३द ५ वेश्या, वारांगना. ६. भयोध्येंत. ७. लाह्यांच्या राशीनें. ८. अन्याला. ९. कल्पांताच्या वाऱ्याप्रमाणें वेगवान्.

अतिबळ मागध; माथुरजन परिपीडित पुन्हा न हा बा! हो.
शत वर्षें ही करितां संगर, याची चमू न आटेल,
कीं, हा अवध्य आम्हां; पौरांला काळ कां न वाटेल? ८०
आम्हां मथुरावास श्रेय, पहातां विचार, वाटेना.
अठरा संगर झाले, परि बा! हा लेशमात्र आटेना.' ८१
गरुड म्हणे, "कृष्णा! मीं पाहुनि आलों कुशस्थळी रम्या,
वसवावी ती नामें होयील 'द्वारका' परागम्या. ८२
तेथें करिल, स्वर्गीं शक्र तसा, उग्रसेन हा राज्य,
शिल्पींद्र[2] विश्वकर्मा रचिल, स्थळ सिंधु देयिल प्राज्य." ८३
स्वस्थानातें जाया आज्ञा दे देवदेव सुखगातें;
जाय पदद्वय वंदुनि तो, ज्या सद्वृंद लब्धसुख गातें. ८४
कृष्ण म्हणे, "यादव हो! वाटे मज या पुरीं नये राहूं;
नीतिज्ञ म्हणाल तुम्हीं, बाकया म्हणवेल या न येरां[3], 'हूं.' ८५
जन्हि होय राजधानी वडिलांची हे पुरी न सोडावी,
अमरावती महेंद्रें तेंवि त्यागूनि सिद्धि जोडावी. ८६
प्रबळ अराति जरासुत करिल उपद्रव पुन्हां, अनळस[4] महा-
द्वेष्टा; विग्रा[5] याच्या ठाव्या असती तुम्हा; अनळसम हा. ८७
जेथें नव्हे उपद्रव, राहूं वसवूं पुरी नवी; साहे
न विमर्दातें जीर्णा; योग्या मथुरापुरी न वासा[6] हे." ८८
यादव म्हणति, 'बहु बरें.' कृष्ण म्हणे, "तरि निघा, सुवासर[7] हा.
नवपुरपद्मवन तुम्हां मधुपांसि म्हणेल, 'घ्या सुवास, रहा.'"
काळयवन बहु सेना घेवुनि आला, जरासुत हि अहित.
कृष्ण निघे, निजमथुरानगरी सोडूनियां, स्वजनसहित. ९०
घालुनि घटांत कृष्णव्याल[8] प्रभु यवनपतिकडे प्रेषी;

---

१ परक्यास अगम्य (आंत येता न येण्यासारखी) २. कारागिरांतील श्रेष्ठ. ३. नीतिज्ञ (व्यवहारचतुर) नव्हेत अशा इतरांस. ४ उद्योगी ५ लढाईला ६ राहण्याला. ७. चांगला दिवस, सुमुहूर्त. ८. काळा साप.

कीं, 'मीं अत्युग्र असा आहें, न उरेल मजपुढें द्वेषी.' ९१
तों बहु पिपीलिकाहीं भरोनि, फिरोनि कलश धाडिला अहितें-
कीं, 'आम्हीं बहुत तुलें, जेंवि पिपीलिकसमूह या अहितें.' ९२
केला पिपीलिकाहीं भस्म भुजग पाहिला घटीं अजितें,
केलें प्रयाण मथुरा सोडुनि; हरतेज मानिलें अजि! तें. ९३
'कैलपक अल्प कसा अरि?' ऐसें मानुनि, निघोनि जलधीतें
गेला प्रभु भुलवाया सजरासुतकालयवनखलधीतें. ९४
जो एकलव्य बहु शर वर्षुनि, देणार लाज आखाडा,
त्या द्रोणच्छात्राचा ज्या स्थानीं परम रम्य आखाडा, ९५
प्रभु, त्या स्थानीं स्वजन स्थापुनि, ये एकला चि परतोन,
मथुरेंतूनि निघुनि, दे दर्शन; उमजे प्रताप पर तो न. ९६
देवर्षिकथितचिह्न ओळखुनि प्रभुसि पाठिला लागे,
धांवे पंक्ति, धराया न शके, जड कालयवन तो भागे. ९७
मांधात्याचा नंदन मुचुकुंद, रणांत असुर मोडून,
श्रमला, सुर संरक्षुनि बहुकाळ, प्राज्य विजय जोडून. ९८
त्यातें प्रसन्न होवुनि सुर वदले, 'पाळका! नृपा! शिष्टा!
आम्हांपासुनि मागुनि घे मुचुकुंदा! सख्या! वरा इष्टा.' ९९
मुचुकुंद म्हणे, 'श्रमलों, यास्तव चिरकाळ करिन मीं शयन.
निद्राभंग करिल जो, त्या माझें भस्मसात् करो नयन.' १००
सुर वदले, 'हें दिधलें.' होता गुरुगिरिगुहेंत ज्या सुप्त,
तींत शिरे प्रभु, राहे मुचुकुंदशिरापलीकडे गुप्त. १०१

१ मुंग्यानीं २ परत ३ शंकराच्या वरानें मिळालेलें तेज ४ असा चतुर शत्रु तुच्छ कसा होईल? ५ खलधीतें=[त्याच्या] दुष्ट बुद्धीला. ६. आषाढमासाच्या पावसाला. ७ शिकण्याचें किंवा व्यायामाचें ठिकाण या ठिकाणीं हस्तलिखित प्रतींत सदर शब्द 'आषाडा' असा आहे, परंतु संदर्भावरून तो पहिल्या अर्धातील 'आखाडा' या ठिकाणीं पाहिजे होता असें दिसतें ८. पायीं. ९ राख करो.

श्रीनारदमुनिवचनें शिरला प्रभु त्या गुहेंत, बाळाया—
ताराया मुचुकुंदा, त्याकरवीं त्या खळासि मारविया. १०२
काळयवन पवनजवन, लव न करुनियां विलंब मागून
शिरला गुहेंत, मानी, ' निजला वसुदेवसूनु भागून. ' १०३
चरणें चाळवुनि, खळें केला मुचुकुंद तो वळें जागा;
पाहे उठोनि, नागा हरि, किंवा पक्षिपति जसा नागा. १०४
चक्षुर्विष जो, त्या ही दे तो नरपाळ लाज सापाला.
तेणें भस्म चि केला खळ, दहनें वाळला जसा पाला. १०५
दर्शन देउनि भगवान् मुचुकुंदातें म्हणे, ' महाभागा!
झाला भस्म महारिपु, जेणें केलासि तूं नृपा! जागा. १०६
शत वर्षें जरि करितों यासीं मीं, करुनि यत्न परम, रण,
श्रीरुद्रवरोद्भव हा मत्तेजें पावता न पर मरण. १०७
निजलासि सुचिर, यास्तव, उठवुनि, भेटावयासि आगमन
नारदवचनें माझें; निद्राभंगें धरो न राग मन.' १०८
भूप म्हणे, ' आकार श्रेष्ठ तुझा नयनमानसां गमला.
तूं कोण? असेल विदित, तरि माझें शयनमान[6] सांग मला.' १०९
कृष्ण म्हणे, " सोमान्वयसंभव राजा ययाति, तज्जाया
शुक्रसुता ज्या प्रसवे, लज्जेंत शचीमहेंद्र मज्जाया, ११०
त्या श्रीयदुच्या वंशीं वसुदेव महायशा, महातेजा,
'राजर्षि' किति म्हणति, किति 'देव चि,' सज्जन वरें पहाते ज्या.
श्रीवसुदेवतनय मीं, मज म्हणती ' कृष्ण, वासुदेव,' जन.
स्वद्वृत्त मज कथी [10]तो, ज्याचें करिती सदा सुधी भजन. ११२
निजलासि त्रेतेंत[11], त्रिदशपतिवरें कळींत हा बोधें[12].

---

१. वाऱ्यासारखा वेगवान् २ हस्तीला. ३. सापाला ४. डोळ्यानीं च विषासारखा घात करणारा. ५. राजा. ६. मी किती वेळ निजलों होतों तें ७. चंद्रवंशीय. ८. देवयानी. ९. बुडवाया. १०. नारद. ११ त्रेतायुगांत. १२ जागें होणें.

योधश्रेष्ठा ! नारदमुनिवचनेंकरुनि लागला शोध." ११३
पाहुनि वृक्ष प्राणी ह्रस्व, समजला कलिप्रति ज्ञानी.
प्रभुचें पदयुग वंदी, जें मोहातें छळी प्रतिज्ञानीं.[1] ११४
प्रेमें प्रभुसि विचारुनि, हिमशैलवनीं तपोनीधी रमला.
आढळला न, निजोनि न तद्दितर तैसा तपोनिधीर मला.११५
तप जोडुनि, सोडुनि तनु, गेला स्वर्गासि तो महातेजा,
वदले 'धन्य' तपस्वी, आजन्म हिमाचळीं रहाते, ज्या. ११६
कृष्ण हि कुशस्थळीतें जाय, वळुनि[2] काळयवन सेनेला.
बहु धन, परि प्रभुविना इतरें[3] त्यांतील लव नसे नेला. ११७
बहु काळयवनसेना, इतराची तों तसी न सेना कीं,
कापे भूमि न केवळ, निष्कंपा सुरसभा नसे नाकीं. ११८
ती अश्वशकृन्नामें अश्वशकृद्राशिजा[4] नदी मोटी
झाली, अद्यापि असे, बहु सेना, गोष्टि हे नव्हे खोटी. ११९
त्याउपरि रोहिणीशुभनक्षत्रीं पूजिले अदीन मुनी,
जो स्वस्तिवाचनाविधि, प्रभुनें तो करविला, पदीं नमुनीं. १२०
चित्तांत विश्वकर्मा, नगरी निर्मावयासि, आठविला;
आला तत्काळ चि तो, शक्रें सांगूनि कार्य पाठविला. १२१
द्वादशयोजन सिंधु स्थळ दे, तितुकें चि विभु तया योची
शिल्पिवर विश्वकर्मा पुर निर्मी, व्हावया दया याची. १२२
नगरींत विश्वकर्मा प्रकटी, ज्या ठावुक्या कळाकुसरी.
कनकमय[6]प्राकारा भासे अमरावती च ती दुसरी. १२३
जेथें कोट कनकमय, तेथें जननिलँय[7] कां न कनकाचे ?
मग कां नसतिल सुमणिस्वर्णप्रासाद विश्वजनकाचे ? १२४
प्रासाद लाजवी परभूपांचे द्वारका दुकानाहीं;

---

१. निश्चयपूर्वक. २. मागें पिटाळून. ३ लुटींत सापडलेल्या धनांतील. ४. घोड्याच्या लीदीच्या ढिगापासून उत्पन्न झालेली. ५ मागे. ६. सुवर्णाच्या कोटाची. ७. निलय=घरें.

किंबहुना, भगवत्पुरपांसु[1] तसा इंदुरीं बुका[2] नाहीं. १२५
श्रीनाथ शंख[3]निधितें सांगे, 'जे द्वारकापुरीं असती,
सर्व हि धनिक करावे, न रुचे चि दरिद्रता, जसी असती.' १२६
बहुजनसदनें भरिलीं पुष्कळ संपत्तिनें महानिधिनें[4].
प्रभुच्या वरप्रसादें पुसिलें, लिहिलें[5] अभाग्य जें विधिनें. १२७
जी द्वारकापुरजनीं भूपजनीं तेंवि संपदा नाहीं;
म्हणती अर्थिजनाच्या दारिद्र्या वैश्य[6] 'संप' दानाहीं. १२८
देवसभा आणविली, प्रभुनें आज्ञा करूनि वातातें,
जें स्वजनीं वात्सल्य प्रभुचें, येना चि लेश ताता तें. १२९
ती सुरसभा सुधर्मा बैसाया यादवांसि वासव दे.
पुरवुनि काम, 'पुरवितों' ऐसें न मुखें रमानिवास वदे. १३०
प्रभुसत्त्में पुरोहित केला सांदीपनि द्विजश्रेष्ठ.
नृप उग्रसेन, जो बहुमान्य समस्तां वयें गुणें ज्येष्ठ. १३१
सचिव श्रेष्ठ विकद्रु, स्वचमूंचा पाळिता अनाधृष्टि,
सात्यकि वीराग्रेसर, ज्याची निर्मळयशीं सदा दृष्टि. १३२
दश उद्धवप्रमुख कवि केले प्रभुनें अशेषकार्यकर[7],
अतिरथ दारुक सारथिवर, जो जयहेतु, जेंवि आर्यकर[8]. १३३
रामें द्वारवतींत प्रथम श्रीरेवती सती वरिली;
मति सर्वा हि नरांची, नारींची, त्या महोत्सवें हरिली. १३४

---

१. पासु=धूळ, धुरळा २. इदूरचा बुका फार सुवासिक असतो. ३. 'शंख' हा कुबेराचा एक निधि. हा इंद्राज्ञेवरून कृष्णसेवेला मूर्तिमत आला होता. ४. शंखनिधीनें. ५. [नशीबीं] लिहिलें. ६ शेटसावकार. ७ बाकी सर्व कामाचे कामगार. ८. साधुसज्जनाचा हात.

# अध्याय चोविसावा.

दमघोष, जरानंदन, एककुलोत्पन्न भूपती बा! हे,
मागध शिशुपाळातें[1] पुत्रस्नेहें करूनियां पाहे. १
शिशुपालार्थ जरासुत भूप, गळां पडुनि, रुक्मिणी मागे.
तें भीष्मकासि रुक्मिस्नेहें अप्रिय हि ऐकणें लागे. २
मागध म्हणे, 'सुनीथ[2] प्रियसुतसा, रुक्मिणीस हा लाहो.'
कृष्णद्वेष्टे राजे बहु घेवुनि, कुंडिनासि आला, हो! ३
नृप दंतवक्रनंदन पौंड्रकसुत एकलव्यसुत वीर,
कालिंग-वेणुदारि-क्राथ-प्रघसाख्य नृप महाधीर, ४
विंदानुविंद, बाह्लिक, शल्य, भजति शूर भूमिपति ते ज्या,
भगदत्त, कुंतिभोज, द्रुपद, विराट, क्षितीश अतितेजा, ५
भूरिश्रवा, जयद्रथ, गांधाराधिपति, काश्य बलशाली,
धृतराष्ट्रसुत, असी बहु राज्यांची मंडळी सजुनि आली. ६
ज्यांला सरहस्य[2] धनुर्वेद गुरूपासनाबळें पाठ,
अक्षौहिणी मिळाल्या त्या राज्यांच्या नृपोत्तमा! साठ. ७
त्या राज्यांला रुक्मी सामोरा सबळ जाय, बहु मानी,
पूजुनि दे साहित्य प्राज्य तयां, जो समर्थ बहुमानी. ८
पितृभगिनीपुत्राचा लग्नोत्सव रामकृष्ण जाणोनीं,
आले कुंडिननगरा, निजयादवयोध सर्व आणोनीं. ९
भीष्मक यांतें येवुनि सामोरा, करुनि पूजन, स्थापी.
याच्या प्रीति, परांच्या चिंता, हृदयासि तत्क्षणीं व्यापी. १०
कुंडिननगराबाहिर दूर निराळे चि राहिले हो! ते,
जे पाण्यांत[3] पराहीं पूर्ण परमपुरुष पाहिले होते. ११
स्वविवाहपूर्वदिवसीं देवीच्या दर्शना वधू गेली,

१ शिशुपाळ. २. गुप्त मन्त्रासह. ३. पाण्यांत पाहणें—द्वेष करणें.

केली रुक्म्यानें ज्यां, आज्ञा त्याहीं जपोनि ती नेली. १२
जें आयकिलें होतें, दिव्य स्त्रीरत्न देखिलें आजि तें;
श्रुतिचें शूद्रास, तिचें ग्रहण परा तेंवि लेखिलें अजितें. १३
[1]हठहरणविचार करुनि, दोघे प्रभु जपत राहिले दूर,
देवीतें पूजुनि ती बाहिर निघतां चि धावले शूर. १४
गरुडें जेंवि सुधा, त्या प्रभुनें श्रीरुक्मिणी तसी हरिली,
धरिली करीं [2]अनन्या, [3]राक्षसविधिनें निजप्रिया वरिली. १५
श्रीतें स्वरथीं वाहुनि देव म्हणे, 'दारुका! तुरग हाकीं.
[4]आर्य करिल कार्य सकळ; [5]अहितायुर्वायुचा उरगें हा कीं.' १६
धांवे रक्षकवळ जें, तरु उपडुनि राम झोडपी त्यातें,
जरि अरिला विष वाटे, लागे हरिचरित गोड पीत्यातें. १७
हरिता जरि वज्रधर हि, तरि त्यातें तत्क्षणी च गट करितें;
परि पाडिलें बळप्रभुभुजतेजें, हरुनि तेज, कटक रितें. १८
भार स्थापुनि रामीं, प्रभु जाय द्वारकापुरा नीट.
गद, सारण, कृतवर्मा, सात्यकि, अक्रूर, राहिले धीट. १९
नृप दंतवक्रमागधशिशुपाळप्रमुख खवळले सर्व,
शत्रुसमूह क्षोभे सागर येतां जसें महापर्व. २०
समरीं रामविभुपुढें, जे कृष्णवधार्थ धांवले अरि, ते
[6]करिते बळ वायुपुढें घनसे पडतील मूढ कां न रिते? २१
प्रथम जरासंधासीं [7]युयुधान महायशा करी युद्ध;
अक्रूर दंतवक्रा ताडुनियां, विजय मेळवी शुद्ध. २२
शिशुपाळातें विपृथु च्छेदी मर्मीं अनेक रोपाहीं;
त्याहीं व्याकुळ केला, सर्पाहीं जेंवि उग्रकोपाहीं. २३

---

१. बलात्कारानें हरण करण्याचा बेत. २. दुसऱ्यास प्राप्त न होणारी, किंवा जिचें मन दुसऱ्यावर नव्हतें अशी. ३. आसुरविवाहपद्धतीनें. ४ बळराम. ५ शत्रूच्या आयुष्यरूपी वायूचा [ भक्षक ] सर्प. ६. आपल्या शक्तीची घमेंड करणारे. ७. सात्यकी.

रामें वृक्षाघातें वधिला अंगेश्वर द्विरदसहित,
बसुनि रथीं शत मागध बाणशतें मर्दिले प्रबळ अहित. २४
कारूष महारथ सा, रामाचे वधिति त्यांसि शर सा, जे.
बहु शत्रुकदन करितां, बळभद्र रणांत जेंवि हर साजे. २५
राम जरासंधावरि, सिंहावरि सिंहसा, करी लगट;
कीं कल्पांतांबुधि तो परसेनाभूमिंत करील गट. २६
मगधेंद्र शर तीन, प्रभुनें तों त्यासि हाणिले अष्ट;
ध्वज तोडुनि, पहिल्यापरि पावविला पार्थिवेंद्र तो कष्ट. २७
रामादि यादवांहीं मगधेश्वरमुख्य सर्व ही भूप,
बळ मथुनि, पराभविले; हे सागरसे चि, शत्रु ते कूप. २८
वेचुनि सर्वस्व, मरण मेळविलें शत्रुहीं ससेनाहीं.
तुरतो पळ हि हरिपुढें गज, मग होतिल न कां ससे नाहीं? २९
रुक्मी म्हणे, 'स्वसेतें सोडविन, प्राण शत्रुचे हरिन,
वरिन जयश्रीतें, तरि कुंडिननगरीं प्रवेश मीं करिन.' ३०
तो वृष असी प्रतिज्ञा करुनि निघे, त्या सहाय अविचार,
नृप अंशुमान्, श्रुतर्वा, क्राथ तथा वेणुदारि, जेवि च्यार. ३१
हरिवरि अरि तो वेगें गेला, घेवूनि बहु बळ क्रुद्ध.
गांठुनि रेवातीरीं प्रभुसीं रुक्मी करी महायुद्ध. ३२
सेनासहाय सोडुनि, रुक्मी प्रभुसीं स्वयें चि युद्ध करी,
वनगज जरि गुरु, तेणें हरिचा होयील काय रुद्ध करी? ३३
उग्रचतुःषष्टिशरप्रकरें रुक्मी त्रिलोकपा वेधी,
प्रभु सप्तति शर हाणी, तों त्या अरिची भ्रमासि पावे धी. ३४
ध्वज तोडुनि सारथिशिर उडवी, तत्काळ संकटीं पाडी,
तों अंशुमान् महीपति दश बाणांहीं यदूत्तमा ताडी. ३५
हाणी नृप श्रुतर्वा पांचांहीं, वेणुदारि सातांहीं,

१. द्विरद=हत्ती २ जरासंधपक्षीय. ३. प्रलयकाळचा समुद्र ४ बैल (बुद्धिहीन) ५ एडके-पंत. ६ ऐरावत. ७. चौसष्ट. ८ सत्तर.

क्राथ हि तसा चि ताडी, त्यांच्या धारिला न कंप हातांहीं. ३६
ताडुनि उरांत, केला मूर्छित तो अंशुमान् महीपाळ;
मग लक्षिला श्रुतर्वा प्रभुनें, पक्षीश्वरें जसा व्याळ. ३७
च्यारी वाजी वधिले, च्यार चि हाणोनि बाण मग कोपें.
त्या वेणुदारिचा ध्वज, भुज ही, तत्काळ खंडिला रोपें. ३८
शरपंचकें श्रुतर्वा विंधुनियां विकळ नेरनटें केला,
त्यांचे शरवृष्टि करिति, सोडिति ते वीरवर न टेकेला. ३९
एकेकातें हाणुनि बाण चतुःषष्टि, सर्व ही पळवी;
बळ वीरोत्तम भगवान् सकळांतें आपुलें रणीं कळवी. ४०
निजबळभंगें सायक पांच प्रभुच्या उरस्थळीं ओपी,
ताडुनि केतु, शरत्रय हाणी त्या दारुका महाकोपी. ४१
केशव हि बहु शरांहीं ताडुनियां भीष्मकात्मजा पापा,
चापा त्याच्या तोडी, पक्षीश्वर जेंवि दारुणा सापा. ४२
रुक्मी, अन्य शरासन घेवुनि, जगदीश्वरासि माराया
योजी बहु दिव्यास्त्रें, प्रत्यस्त्रें त्यांसि कृष्ण वाराया. ४३
अस्त्रें प्रत्यस्त्रांहीं वारुनि, भगवान् पुन्हां हि चापातें
खंडी, जेंवि शिखंडी पक्षी लीळेकरूनि सापातें. ४४
छिन्नधनुष्य, विरथ, तो रुक्मी, घेवूनि खड्ग चर्म, कुडीं
बुद्धि धरुनि, कृष्णावरि धावे, टाकुनि रथावरूनि उडी. ४५
प्रभु खंडी खड्गातें, येतां अरि धरुनि गरुडसा वेगा.
सोडी तीन विशिख, जे अहिसे, लक्षूनि अरु, डसावे, गा! ४६
ते विशिख उरीं शिरले, पर पडला वज्रभिन्नपर्वतसा,
प्रभुसीं स्पर्धा करितां, कां हो! न करिल अनर्थ गर्व तसा? ४७
शरवृष्टि करित उठले प्रभुवरि भयनष्टवर्ण ते राजे

१ नररूपधारी कृष्णानें २. चिकाटला ३ ध्वज ४ अस्त्राचा प्रतिकार करणारीं अस्त्रें. ५. वाकडी ६ मर्मस्थान ७. भयानें नाहींसें झालें आहे तेज ज्याचें ते, भयानें काळवंडलेले

दोष[1] त्रि, [2]हरिशर गमले मूर्त महामंत्रवर्ण तेरा जे. ४८
झटले भटलेखर्षभ[3] जे रुक्म्याचें करावया अवन,
स्वनिकट येवूं न दिले कृष्णें, सुब्राह्मणें जसे यवन. ४९
रुक्मी पडला पाहुनि, पर पृथ्वीपति पळोनियां गेले;
केले हतशेष परित्रस्त, कबंध चि पुढें उभे ठेले. ५०
रुक्मी पडतां, प्रभुच्या पायांवरि रुक्मिणी सती पडली,
व्याकुळ होतां खळ ही बंधु, स्नेहकरूनि[5] ती रडली. ५१
प्रेमें प्रिया प्रभुवरें उठवुनि आलिंगिली, तया भ्रात्या
दिधलें अभय तिच्या ये द्रव धरितां पाय, बहु दयाभ्रा[4] त्या.
रुक्म्यासि अभय देवुनि, जाय स्वपुरासि कृष्ण तेथूनीं,
मुख भरवुनि घेती, जे भगवद्द्वेष्टे मदांध, ते थूनीं. ५३
स्वपुरा वृष्णि हि गेले, राम पुढें करुनि, शत्रु भंगूनीं,
प्रभु अरिनीं लंघावा जरि, तरि गिरिराज मेरू पंगूनीं. ५४
वाहे रथीं श्रुतवा रुक्म्यातें, निजपुरासि ने त्यातें,
जो जड वदला, 'मारिन काळाचिया हि नेत्यातें.[6]' ५५
भग्नप्रतिज्ञ राहे भोजकटीं नवपुरीं च तो मानी,
त्यातें मारीन म्हणे, जो संस्तुत शक्रसूर्यसोमानीं. ५६
राम सवृष्णि स्वपुरा आल्यावरि, केशवें कृपानिधिनें
केलें भीष्मककन्यारत्नकरग्रहण उत्सवें[7] विधिनें. ५७
श्रीराम जानकीसीं, गौरीसीं जेंवि हर, असा रमला.
श्रीकृष्ण रुक्मिणीसीं; वाटे दृष्टांत पर असार[8] मला. ५८
प्रद्युम्नादि दश तनय, चारुमती कन्यका तिला झाली.
कालिंदी सूर्यसुता, होवुनि कृष्णप्रिया, सुखें धाली. ५९

---

१ बाधा, पिशाचाची वगैरे पीडा. २. जे हरिशर मूर्त महामन्त्रवर्ण तेरा असे गमले–**पत.** त्रयोदशाक्षरी महामन्त्रांचीं अक्षरें. ३. भट+लेख+ऋषभ=वीरश्रेष्ठ व देवश्रेष्ठ. ४ दयाघनाला. ५. [ लोकाच्या ] छी थू करण्यानें. ६. नियमन करणाऱ्या यन्याला. ७. विवाहोत्सवानें. ८. कमी दर्जाचा; हलका.

वसुदेवाची भगिनी नामें राजाधिदेविका धन्या,
तदपत्य मित्रविंदा आवंत्यभवा प्रभुप्रिया अन्या. ६०
प्रख्यात जो अयोध्यापति सुयशा नग्नजित्, तया आर्या
सत्या कन्या धन्या झाली, ती विष्णुची तिजी भार्या. ६१
जी जांबवत्सुता, ती जांबवती प्रभुमनःप्रिया जाया
चवथी कथिली; जाल्या लक्ष्म्यंशें वर्णिलया स्त्रिया ज्या, या.
पितृभगिनी कैकेयस्त्री जी श्रुतकीर्ति, तत्सुता देवी
ती रोहिणी, कवि म्हणति, भद्रा हि प्रभुसि पांचवी सेवी. ६३
जी मद्रराजकन्या प्रभुदयिता होय लक्ष्मणा सावी[1],
ज्या सुंदरीपुढें रति अतितुच्छा स्त्री तसी च भासावी. ६४
प्रभुदयिता सत्राजित्तनया, यन्नाम सत्यभामा, ती,
वा ! जीपुढें करुनि घे चपळा[2], होवूनि अत्यभा[3], माती. ६५
शैब्यसुता गांधारी नामें तन्वी हि आठवी, नाहे[4]
प्रभुभक्त्यमृतनदींत, स्वशरीरातें हि आठवीना हे. ६६
राया ! श्रीकृष्णाच्या पेशा या पट्टनायिका आठ,
पाठ प्रभुभक्त्युचिता ज्यांसि चहूआगळ्या कळा साठ. ६७
षोडशसहस्र भार्या आर्याराध्यें[5] रमावरें अन्या
एकीं लग्नीं वरिल्या, रूपगुणवती, सुवंशजा, कन्या. ६८
दश सुत, एक सुता, दे, कीं प्रभुचा सारिखा सदा धारा[6],
सर्वां प्रिया समा त्या शरणागतवत्सळा सदाधारा. ६९
रुक्मी निजकन्येच्या सर्व नृपांतें स्वयंवरीं बाहे,
रंगात ती शुभांगी प्रद्युम्ना कृष्णनंदना पाहे. ७०
प्रेमें वरी शुभांगी प्रद्युम्नातें, जसी रमा हरितें;
परतुनि उगें चि गेलें नृपमंडळ, खिन्न जाहलें परि तें. ७१
त्या प्रद्युम्नापासुनि होय शुभांगीस पुत्र, हा नावें

१. सहावी लक्ष्मणा नांवाची. २. बीज. ३. अत्यंत निस्तेज. ४. नाहती झाली. ५. श्रेष्ठांना पूज्य अशा कृष्णानें. ६. पद्धत.

प्रद्युम्न[1], सुरवराहीं ज्याचें बळ, रूप, शील, वानावें. ७२
रुक्म्याची रुक्मवती पौत्री त्याकारणें अगा राया !
प्रभु मागती; म्हणे तो, 'देवूं, परि आमुच्या अगारा या.' ७३
गेले[2] सदारनन्दन[3] भोजकटीं रामकृष्ण लग्नातें,
सुखवाया रुक्म्यातें समरपराभूतिदुःखमग्नातें. ७४
होय विवाहमहोत्सव, मग खळ दाटुनि अनर्थ पिकवीती.
'द्यूतीं तरि जिंकावा राम,' असें रुक्मियासि शिकवीती. ७५
'निपुणपण नसे अक्षीं[4], व्यसन परि द्यूतकेलिचें आहे,'
कथितां हें कुनृपाहीं, रुक्मी रामासि आदरें बाहे. ७६
जो निजनामग्रहणें करणारा धन्य राम रांव्या[5] ही,
तो भाग्यें प्राप्त, परि प्रिय वाटेना चि पामरा व्याही. ७७
हर्षें गेला व्याही, रुक्मी जेव्हां सभेंत बोलावी,
कनकायुत निष्क[6] ग्लह तेव्हां द्यूतांत राम तो लावी. ७८
रुक्मी तो पण जिंकी, लावी तितुका चि पण पुन्हां राम,
त्यातें ही कितव हरी, जिंकूं पाहे हरा जसा काम. ७९
वारंवार द्यूतीं रुक्म्यानें जीयमान[7] बळ झाला,
लावी सुवर्णकोटि [8]ग्लह राम, जिणोनि ने कितव[9] त्याला. ८०
तो [10]श्लाघमान रुक्मी, कपटें अनुकूळ, करुनियां फांसे,
प्रभुतें, 'अविद्य, दुर्बळ, गोरक्षणपटु,' असें म्हणे, हांसे. ८१
'मुसळधराला ठावें धरणें द्यूतांत काय अक्षांचें ?
हें कर्म होय आम्हां राज्यांचें सर्वकेलि[11]दक्षांचें.' ८२
युद्धीं अजेय हळधर, केला द्यूतांत हा पराजित कीं.
बोलों दे रामप्रभु, बोलवलीं कटु वचें परा जितकीं. ८३

---

१ मूळ प्रतींत 'प्रद्युम्न' असें आहे; परंतु 'प्राद्युम्न' असें असलें पाहिजे होतें, असें दिसतें २ राम आणि कृष्ण ३ बायकामुलांसह. ४. फांसे टाकण्यांत ५. राघूला सुद्धां (अर्थज्ञान वगैरे नसतां केवळ वाणीनें "राम राम' म्हणणाऱ्या पोपटाला सुद्धा) ६ नाणीं. ७. हरलेला. ८. पण, पैज. ९. लबाड. १०. घमेंड-खोर. ११ क्रीडापटूचें.

द्यूतीं कलिंगराज क्षुल्लक रुक्म्यासि मानवे[1], दांत
दावी; हांसे त्या ज्या प्रभुचा साधूंत मान वेदांत. ८४
आवरुनि क्रोधातें, राम म्हणे, ' तूं नराधिपा! दक्ष'
दशकोटिसहस्र ग्लह हा, हूं घे या हि, पाड हे अक्ष.' ८५
करि अक्षपात रुक्मी, बळनिर्जित[2] होय तो, असें चि घडे,
कीं, रामविजयसूचक चतुरंकांकित[3] यथोक्त[4] अक्ष पडे. ८६
जरि निर्जित, तरि रुक्मी ' आपण निर्जित नव्हें ' असें स्थापी;
पापी, धृष्ट प्रभुला, मिथ्याचारा खरा, तसा दापी. ८७
ऐसी होय गगनगी[5], ' जिंकिल खद्योत काय हा रविला?
रुक्मी खोटा, द्यूतीं रामें धर्मेंकरूनि हारविला.' ८८
प्रभुकोप पेटवि खगी, कवि कोण म्हणेल न ' धमनी[6] ' तीतें?
मग वांचतो प्रभुपुढें कैसा, लंघूनि अधम नीतीतें? ८९
रुक्म्यातें कनकमयक्रीडाफलकें[7] चि राम तो ताडी,
पाडी, अशनि च ईशें[8] जी कोपेंकरुनि कवळिली काडी. ९०
पाडी कालिंगाचे सर्व हि रुक्म्याचिसारिखे दांत,
वदन गतश्रीक[9] पडे कां न संदुपहासकारि[10] खेदांत? ९१
द्यूतसभेचा उपटुनि सौवर्ण स्तंभ घे, परित्रास
रुक्मिसखनृपांतें दे, नरहरिच्या दाखवी चरित्रास. ९२
बळ जावुनि निजशिबिरीं सांगे कृष्णासि सर्व जें घडलें,
राहे उगा चि भगवान्, संकट सद्रसळा तया पडलें. ९३
बहु रुक्मिणी रडे, परि समजों दे खेद या न दीरा हे,
शोकीं[11] उगी च भंग, प्रेमा देखे, दयानदी राहे[11]. ९४

---

१. स्तुति करिता झाला २. रामानें पराजित केलेला ३. चारी बाजूनें चिन्हित—ज्याच्या चारी बाजूवर ठिपके आहेत अशा ४ म्हटलेला फासा (डाव). ५. आकाशवाणी. ६ फुकणी. ७ क्रीडाफलक=खेळण्याचा पाट—पट. ८. ईश्वरानें काडी जरी फेंकली तरी ती वज्राप्रमाणें समर्थ होते, असा भाव. ९. निस्तेज. १० सज्जननिंदक ११. शोकामुळें उगी च थोडीशी लाट उसळत होती, परतु त्या प्रभूचें प्रेम तिच्या नजरेस येऊन ती दयानदी शांत झाली. भग=लाट—निर्णय०.

द्रुमभार्गवतुल्य. द्रुमभार्गवशिक्षित, मर्त्त्यीं रणीं दक्ष,
जो भूप नित्ययाजी[1] अर्थिजनाला सुवर्ण दे लक्ष, ९५
तो रुक्मि स्वद्वेषी रामें द्यूतांत मारितां, झाले
विमनस्क[2] सर्व यादव, म्हणती, 'देवापुढें न बळ चाले.' ९६
भोजकटपुराहूनि प्रभु दोघे द्वारकापुरा आले,
भ्याले पर नृप ज्यांच्या चरितें, बहु साधु सर्व ही धाले. ९७
राज्या! जांबवतीचा नंदन सांब स्वयंवरीं तनया
हरितां सुयोधनाची, धरिती कौरव करूनियां अनया. ९८
कारागृहांत केला रुद्ध[3], असें द्वारकापुरीं कळलें,
बळ नागपुरा[4] गेला, सयश ज्याचें कधीं नसे मळलें. ९९
दुर्योधनासि सामें सांगे नंदन करावया मुक्त,
परि तो अतिखळ मानी मानीना त्या बळाब्धिचें उक्त. १००
गजपुर गंगेंत हळें पाडाया पालथें बळें पाहे;
दुर्योधन रामपदीं सांबसुता, स्वशिरसंपदा, वाहे. १०१
'शरणागत शिष्य तुझा मीं; बा! उचिता तुज क्षमा आहे,'
ऐसें चि म्हणे, प्रभुपद नमुनि, म्हणुनि सर्वनाश तो राहे. १०२
नगर उचलितां झाला होता गंगेकडे जसा तोल,
राहुनि तसें चि आझुनि सूचवितें यश, न बोलतां बोल. १०३
रामें अनंतबळ प्रभु, त्याला हें नवल काय हो! आहे?
दशशतशिरांत[5] एकीं भूमंडळ कमळदळतसें वाहे. १०४

---

१ नित्य यज्ञ करणारा २. खिन्न, असंतुष्ट. ३ कोंडलेला, बंदिस्थ. ४. हस्तिनापुरास. ५. बळराम हा शेषाचा अवतार. शेष आपल्या दशशत (हजार) मस्तकांपैकीं एकीं (एकावर) [जर सर्व] भूमंडळ (पृथ्वी) कमळाच्या एका पानाप्रमाणें (सहज) वाहे (धारण करितो) तर त्यानें गजपुर नांगरानें उचललें, यांत नवल काय?

# अध्याय पंचविसावा.

भूसुत नरकाख्य असुर तो प्राग्ज्योतिषपुरीं वसे क्रूर,
देवब्राह्मण पीडी, दुःसह सर्वांस ही जसा धूर. १
करिता झाला तेजें लोकांतिल रत्नमात्र[1] तो गोळा.
गंधर्वादि सुकन्या एकशत सहस्र ही नृपा! सोळा. २
किंबहुना सर्वांला जी पूज्या अदिति माय शक्राची,
मणिकुंडलें तिचीं ने. वद्वेना रीति फार वक्राची. ३
ये द्वारकापुरीतें शक्र प्रभुला स्वदुःख सांगाया,
भेटोनि म्हणे, "कृष्णा! न करिसि अद्यापि भस्म कां गा! या?
या गरुडीं बैस कसा, स्मरत्यांच्या नरकनाशना[2]! चाल.
वदलों[3] सुरांसि 'गाजुनि केशवकृत नरकनाश नाचाल.' ५
तुजवांचुनि सर्वांस हि नरकासुर हा अवध्य घननीला!
त्वां या अरिला मारुनि, सत्वर द्यावा प्रमोद जननीला." ६
पापाचारा नरका प्रभु माराया करी प्रतिज्ञा त्या,
ज्या रक्षाया नलगे पळ बा राया! करीप्रति ज्ञात्या. ७
भूमिनिदेशें[4] समरीं नरकासुर भूमिपुत्र माराया,
भूम्यंशें[5] सत्यभामा घे संगें सत्यकाम[6] बा राया! ८
'गरुडीं सस्त्रीक प्रभु बसुनि नभीं जेंवि, तेंवि न विराजे
सौदामिनीसह[7] कनकनगश्रृंगीं मेघ,' म्हणति कविराजे. ९
कृष्णसुरेश व्योमीं रविविधुसे जाहले जना दिसते,
जे देवर्षि, स्तविती त्या मायामानुषा अनादिस ते. १०
शक्र स्वर्गीं जाउनि, चिंतित सुरकार्यसिद्धिला ठेला[8],

---

१ सर्व उत्कृष्ट पदार्थ. २. स्मरण करणारांच्या अधःपाताला चुकविणाऱ्या! ३. हें मद्वचन सत्य करावें–**पंत.** ४ आज्ञेनें. ५. भूमीचा अवतार ६. सत्यसंकल्प भगवान् कृष्ण. ७ विजेनें युक्त ८ काळजी करित राहिला.

प्रभु, नीलवर्ण अर्णव जो, त्याच्या उत्तरीं तटीं गेला. ११
पाहे प्राग्ज्योतिषपुर, ज्याहुनि संपन्न नाक भासेना,
त्याच्या द्वारीं मोटी असुरांची देवदेवहा[1] सेना. १२
येतां निकट प्रभुवरि टाकी दानव महोग्र मुरु शक्ति;
खंडी क्षुरप्रें[2] सोडुनि, तत्काळ तितें मुकुंद उरुशक्ति[3]. १३
टाकी अत्युग्र गदा, तोडी तीतें हि अर्धचंद्रशरें,
मुरुदानवशिर खंडी भल्लें जगदीश, जेंवि पद्म करें. १४
मुरुपाश षट्सहस्र च्छेदुनि, मारूनि तें महासैन्य,
कृष्ण शिलासंघातें[4] लंघी, देवूनि दानवां दैन्य. १५
असुर निसुंद महाबळ, उग्र हयग्रीव ही दुजा भारी,
रोधिति मार्ग निजबळें, ज्यांपासुनि होय भीत जंभारी[5] १६
बैसुनि निसुंद सुरथीं देवावरि उग्र बाण दश सोडी.
प्रभु सप्तति[6] बाणाहीं शत्रुशरांतें न[7] पाँवतां तोडी. १७
त्याचे सैनिक दानव शरजाळें झांकिती, करुनि वेगा,
तत्सत्वें[8] हृदयीं तो साधुखगांचा[9] महातरु निवे, गा! १८
एकैका असुराच्या मर्मीं प्रभु पांच पांच शर हाणी,
योजुनि पर्जन्यास्त्र, क्षतजें[10] रंगे तसे चि पर न्हाणी. १९
मेले, बहुत पळाले, पाहुनि करि, म्हणुनि 'हा!' निसुंद रंया[11];
झांकी शरजाळानें प्रभुसि रणीं गणुनि हानि सुंदर; यां[12]. २०
झांकुनि रविला, पाडी अरिकृत शरवृष्टि अंधकारा ती,
योजी सौवित्र[13] प्रभु जेंवि परीं चक्षु[14] अंधकारारी[15]. २१
छेदुनि शरवृष्टींतें, विरथ करुनि तो निसुंद भल्लानें
शिर हरुनि पाडिला, हो! परमल्ल[16] जसा प्रगल्भ मल्लानें. २२

१ इंद्राचा नाश करणारी. २. बाण ३ फार सामर्थ्यवान ४ खडकांना. ५. इंद्र. ६. सत्तर. ७ ते निसुदाचे दहा बाण येऊन पोंचतात न पोंचतात तों च. ८ सत्व=शौर्य, सामर्थ्य. ९ साधुरूपी पक्ष्याचा [आश्रय–] वृक्ष. १०. रक्तानें. ११ वेगाला १२. या प्रभुसि–**पंत.** १३. सूर्यास्त्र. १४ तृतीय नेत्र १५. शंकर. १६. प्रतिपक्षीय गडी.

जो एकला चि सर्वां देवांसीं रण सहस्रवर्ष करी,
साहे सुखें सुरांचें शरवर्ष, जसें चि मेघवर्ष करी. २३
पडतां निसुंद, धावे असुर हयग्रीव, तो शिळा मोटी
लोटी प्रभुवरि, करिती तुकडे जगदीशशर तिचे कोटी. २४
सैन्य हयग्रीवाचें वधिलें प्रभुनें अनेक शस्त्राहीं;
[1]भरिलें रजीं विभूषित रत्नाहीं जें अमूल्य वस्त्राहीं. २५
सैन्यविनाशें क्षोभे, तरु उपडी, स्थूळ जो [2]दशव्याम,
त्या मर्दाया धांवे, ज्याचें काळासि भीति दे नाम. २६
शतखंड महातरुतें करि हरि खरशर अनेक सोडून,
हाणी बाण प्रभु, तो जाय तयाच्या उरासि फोडून. २७
सबळ हयग्रीवाच्या निधनें पावे अनंत हरिख पवी;
उग्र विरूपाक्ष असुर जो, त्यासि रणांगणांत हरि खपवी. २८
प्राग्ज्योतिषपुरनिकट प्रभु दानव आठ लक्ष तो खपवी,
त्या शक्रारिविनाशें [3]जडें ही पावे अपार तोख पवी. २९
श्रीकृष्णें वाजविला, दानव मर्दूनि पांचजन्य दरें.
खवळे नरक; न ज्याला मृत्युदरें, असेल काय अन्यदर? ३०
ज्यासि सहस्र हय, अशा स्वरथीं बैसे त्रि[6]नल्वपरिमाणीं,
[7]ज्याचें दर्शन अमरीनयनीं ने अमरवदनगत पाणी. ३१
बहु लक्ष असुरवीर, प्रबळतर, अनेकवेषशस्त्रधर
घेवुनि, नरकासुर ये प्रभुवरि, [8]पविपाणिवरि जसा चि [9]धर. ३२
रण[10]तूर्यनादमिश्रित वीरांचे सिंहनाद, वाजींचे,
रथाचक्रांचे, अगणित झाले ध्वनि मत्तहस्ति[11]राजींचे. ३३
भूमिसुताच्या सेना, प्रभुवरि पावुनि जयासि हर्षाया,

१. जें अमूल्य वस्त्राहीं [व] रत्नाहीं विभूषित [असें तें] रजीं (धुळीनें) भरिलें
२. दहा वाव [लांब] ३ अचेतन. 'पवी'चें विशेषण ४. शस्त्र ५ भीति.
६. नल्व=४०० हात. ७ ज्याच्या दर्शनानें देवांच्या तोंडचें पाणी निघून जाई व ते त्याच्या स्त्रियांच्या नेत्रांत येई ८. इंद्र. ९. पर्वत १० तूर्य=एक रणवाद्य
११ टोळ्यांचे.

लागति विविधें अमितें खरशस्त्रें एकदा चि वर्षाया. ३४
श्रीकृष्ण स्वाभिमुखा सर्वा ही दैत्यदानवा खाणी,
तो तो निर्वोनि मारण, तप्त जसा शैत्यदान, वाखाणी. ३५
मेले बहु धन्य, पळुनि गेले अशुभावहाललाटांचे;
प्रभुहेतिचा गुण गुरु, न अमृताब्धीच्या पहाल लाटांचे. ३६
निजसैन्यक्षयभंगक्षुब्ध नरक विष्णुसीं करी समर.
हरिसीं भिडतां, कवि कां न म्हणतिल प्राकृता करासि 'मर'? ३७
नाशति ज्याच्या नामें नरक अनेक हि म्हणोनियां 'हाय!'
त्या साक्षाद्विष्णुपुढें करिल नरक एक बापुडा काय? ३८
योजी नरक महास्त्र, प्रभुवर लीलेकरूनि तें शमवी;
प्रेक्षकसुरमति मधुसा मधुसूदनसह भिडोनि तो भ्रमवी. ३९
कृष्णें बाणसहस्रें समरीं वधिले सहस्र जे वाजी,
जाणों निश्चळ होतां म्हणती ते प्रभुशरांसि 'जेवा, जी!' ४०
प्रभुनें सूत, शिर, ध्वज, कवच हि, खंडूनि पाडिला उघडा,
सुचलें, रुचलें शूळग्रहण चि तेव्हां धरासुता सुघडा. ४१
टाकी प्रभुवरि रागें नरक ज्वाळाकराळशूळातें,
जो जाळाया क्षम सुरसैन्यातें, अग्नि जेंवि तूळातें. ४२
शूल च्छेदुनि कृष्णें, केला नरकासुर द्विधा चक्रें;
पडला धडडड, जाणों वज्रें पर्वत विदारिला शक्रें. ४३
सुत पडतां, भूमि, पुढें ठेवुनि तीं कुंडलें, म्हणे हरिला,
'बाळकसा क्रीडसि, कीं त्वां चि दिला पुत्र, तो पुन्हां हरिला.
त्वां जेंवि लक्षिला हा, ऐसी याची प्रजा न लक्षावी,

१ मरून (अर्थात् मोक्ष पावून) मारण (वध) वाखाणी (स्तवी), जसा तप्त (तापलेला मनुष्य) शैत्यदान (शीतोपचार) वाखाणी. २. फुटक्या नशीबाचे. ३ शस्त्राचा. ४. मद्यासारखा, मदिरा ज्याप्रमाणें मतिभ्रष्ट करिते त्याप्रमाणें. ५. निश्चेष्ट (मरून) पडता ६ हुशार. ७ भयंकर. ८. कापसाला.

प्रभुनें करुणा करुनि, प्रणता जनता सदैव रक्षावी.' ४५
भूमिप्रार्थित विभु दे भगदत्ता नरकनंदना राज्य;
धनरत्नराशिकन्या प्रेषी स्वपुरीप्रति प्रभु प्राज्य. ४६
मणिपर्वत पक्षिवरीं वाहुनि, तेथूनि जाय नाकातें,
शक्रातें बहु सुखवी, दूर तयाच्या करूनि धाकातें. ४७
स्वस्थानीं स्थापि प्रभु मणिपर्वत मेरुशृंग, भवनातें
शक्राच्या जाय, करी अत्युज्वल अदितिगर्भभव नातें. ४८
देवुनि शक्रकरीं तीं मातेचीं कुंडलें, तयासहित
जाय अदितिच्या भवनीं, करुनि, हरुनि सर्वसुरभयास, हित. ४९
तीं दिव्य कुंडलें दे, कृष्णसह नमूनि शक्र मातेतें;
तीच्या हृदया द्रववी, लंघिति सत्पुत्र न कर्मा[3] ते, तें.[4] ५०
नमन करि सत्यभामा, करुनि पुढें त्या शचीस, सासुस; ती
दे आशी, नांदाया कांतसहित सुचिरकाळ साधु सती. ५१
श्रीकृष्णातें शक्रें दिव्यांबरभूषणें दिलीं नव्यें,
दिधलीं पुलोमजेनें प्रेमें सात्राजितीस हीं भव्यें. ५२
आज्ञा घेवुनि कृष्णप्रभु येतां नंदनीं वनीं पाहे
त्या पारिजाततरुतें, मणिवेदीसह खगेश्वरीं वाहे. ५३
ये द्वारकेसि भगवान्, संपादुनि विजय, हर्षवि स्वजन;
निववी हें चरित, जसें गंगांबुजपत्रनिर्मित व्यजन. ५४

---

१ शरणागत लोक. २. अदितीच्या पोटीं जन्म घेतल्याचें नातें वामनावतारीं विष्णूनें अदितीच्या पोटीं जन्म घेतला होता व इंद्र हा हि तिचा च मुलगा, हें नातें. ३. योग्याचारास, सन्मार्गास. ४ सत्पुत्राचें विहित आचरण ५. जीवत. ६ नूतन ७ शचीः इंद्रपत्नी. ८ रत्नांचा पार व आळें यासुद्धा. ९ गंगेंतलि कमळाच्या पानाचा केलेला पंखा.

# अध्याय सत्विसावा.

श्रीकृष्ण रुक्मिणीसह रैवतकीं पर्वतोत्तमीं आला,
द्याया बहुमान, तिचें शुभ उपवासावसान जें, त्याला. १
षोडशसहस्र भार्या, सुतबंधुज्ञातिवर्ग झाडून,
प्रथम पुढें हयरथगजशिबिकांहीं द्विज सदारें धाडून, २
दयिताव्रतावसानीं विप्रांतें विपुळ दक्षिणा अर्पी,
वस्त्राळंकाराहीं, विविधान्नें, कृष्ण आदरें तर्पी. ३
पुरवुनि वांछित अर्थी कृष्णें, यादव हि, सर्व जेवविले.
रामांसि रुक्मिणीनें रत्नाळंकार, सुपट, लेवविले. ४
तों श्रीनारद आला जेथें श्रीकृष्ण, रुक्मिणी देवी;
ठेवी शिर पायांवरि, पूजी प्रभु दाससा तया, सेवी. ५
देवर्षि पारिजातद्रुमकुसुम प्रभुसि दे, प्रभु हि फुल तें
दे रुक्मिणीस, जीचें मन पत्युपभुक्तसेवनें भुलतें. ६
परमप्रसाद, यास्तव ती त्या पुष्पीं पतिव्रता लोभे;
इंगित जाणुनि पतिचें, धरुनि शिरीं, द्विगुण रुक्मिणी शोभे. ७
तीतें देवर्षि म्हणे, " रुक्मिणि! कृष्णस्त्रियांत तूं धन्या,
तरि च तुला पुष्प दिलें; प्रभुसि तुजअसी प्रिया नसे अन्या.
योग्य तुज चि, समलंकृत तव संसर्गेंकरूनि हें झालें;
तूं सत्सभा चि, पुष्प प्रभुचरित चि, यासि शोभणें आलें. ९
हें पारिजातकुसुम श्रीमति! अम्लान सर्वदा असतें,
वांछित सुगंध देतें, ऊध सुरभिचें श्रिता जसें रस तें. १०
शीत हि, उष्ण हि, देतें; नाना पुष्पें हि वांछिलीं देतें;
सति! दीपकर्म करितें; हें विलयातें क्षुधातृषा नेतें. ११

---

१ उपवासव्रताची समाप्ति २ बायकासुद्धा ३. उत्तम वस्त्रें ४ पतीनें उपभोगिलेल्या वस्तूच्या स्वीकारानें ५. शोभिवत ६. स्तन. ७. दूध.

रुक्मिणि! लघु गुरु होतें; ग्लानि, जरा, व्याधि, आधि, हें हारितें.
देहीं वर्ण, कृशत्व, स्थूलत्व हि, इच्छिलें तसें करितें. १२
हें धरितां, मति धर्मी होती, सौभाग्य वाढतें आर्ये!
बहु वाद्यगीतनाद प्रकटितसे, लोकबंधुचे भार्ये! १३
बहु गुण या पुष्पाचे; देतें धरित्यासि नित्य हर्षभर;
जायिल तरुराजाप्रति, रुक्मिणि! तुजजवळि वसुनि वर्षभर.
येयिल पुन्हां हि करितां स्मरण, सुकुसुमें असीं उमा देवी,
श्रीविश्वेश्वरदयिता, विश्वनुता, भगवती, सदा सेवी. १५
अदिति, शची, सावित्री, लक्ष्मी विष्णुप्रिया, अमरभार्या,
भोगिति या पुष्पांतें, ज्या ज्या सुपतिव्रता, सुमति, आर्या. १६
'पतिस बहुत आवडत्यें,' म्हणवुनि जी आपल्यास मानवती,
निवविल मनास या अपमानें कसि तापल्यास मानवती? १७
'आपण सौभाग्याढ्या न,' असें तीच्या मनांत बाणेल,
सात्राजिती तुझा बहु सौभाग्योत्कर्ष आजि जाणेल. १८
पतिला अतिलावण्यें, शीलें, वशावावयासि साजेल,
परि परिसुनि तव सुयशा, रामा भामादि फार लाजेल." १९
इत्यादि सुरर्षि वदे; तें दासीकथित आयके भामा;
अपमानदुःख विरवी तद्देहा, जळ जसें घटा आमा. २०
ऐकुनि अपमान, करी जाणों परिहारयत्न हा रमणी.
फाडी वस्त्र क्रोधें, विखरी तोडूनि रत्नहारमणी. २१
इतरा म्हणती, 'ज्येष्ठा वैदर्भी होय सर्वथा अर्हा.'
भगवद्दयिता भामा मानी स्वविपक्षसत्क्रिया गर्हा. २२
आवडती म्हणुनि करी, मानुनि निजमानघात, रुसवा हे.
हृदयांत, ताप ज्याचें फळ, जो कोपाख्य, या तरुस वाहे. २३
बांधुनि शिर, शून्यगृहीं निजली, नेसूनि शुभ्र पातळ ती.

---

१. आपल्या च तोऱ्यांत असणारी (सत्यभामा). २. गर्विष्ठ. ३. अत्यंत दैववान्. ४. कच्चा, न भाजलेल्या. ५ सवतीचा मान ६. निंदा.

संवाहनकामा परि धाकें दासी पदा न आतळती. २४
प्रभु हें कळतां चि, मिषें भैमीपासुनि निघोनि रैवतकीं*
ये सांत्वनार्थ धावुनि, समयज्ञ, दयार्द्र, मुख्य दैवत कीं. २५
ज्यासि म्हणे वैदर्भी, 'मत्कर्णीं धर्मसत्कथा यो, जी!'
त्या मुन्युपचारार्थें प्रद्युम्ना साधु सादरा योजी. २६
प्रभु विश्वकर्मनिर्मितसदनद्वारांत दारुका ठेवी,
जाय हळू च न कळतां, जेथें ती खिन्नमानसा देवी. २७
दुरुनि भीतभीत श्रीपति कुपिता मनःप्रिया पाहे,
मृदुचरणांगुष्ठनखें उकरीत क्षोणितें सती आहे. २८
लीलाकमळदळातें सुनखांहीं लेशलेश तोडून,
जोडून स्वमुखीं तें, ती हांसे, श्वास उष्ण सोडून. २९
प्रेष्यार्पित चंदनरस घेउनि, वर्णन यथेष्ट मांडून,
क्रोधावेशभ्रांता होती टाकीत सर्व सांडून. ३०
ठेवुनि वामकरतळीं मुख, धरुनि ध्यान, ते पुन्हां सोडी;
शयनीं पळ निजुनि उठे, लागे कोठें हि न च जिला गोडी. ३१
अंतर्बाह्य क्रोधें, पहिली प्रेमें जसी, तसी भिजली,
शिर ठेवुनि उपधानीं, झांकुनि पदरें मुखाब्ज, ती निजली. ३२
त्या समयीं प्रेष्यांतें संज्ञा करि हरि, मुनिव्रता धरवी,
शंकित समीप जाय, प्रभुची हे रीति आयका बरवी. ३३
प्रेष्येच्या हस्तीं जें चामर, सज्जनमयूरघन घे तें,
ढाळीत उभा राहे! सेवी त्या देवदेव अनघेतें! ३४
प्रभुकरसंसर्गीं त्या कुसुमाचा तीस चेव दे वास,

१. पाय चेपूं इच्छिणाऱ्या ( दासी ) २ हात लाविता ३ भैष्मी—पंत रुक्मिणी. ४. प्रसंगावधानी. ५. नारदमुनींच्या शुश्रूषेसाठीं ६. कृष्णसारथि. ७. भुईवर [ नखानीं ] खरवडीत ८ घेऊन, धरून ९. दासीनीं आणून दिलेला. १०. कांहीं तरी खोडी ठेवून व मनसोक्त बडबडून—निर्णय०. ११. उशीवर. १२. खूण १३. मौन धरावयास लावी * रैवतकावरील सत्यभामेच्या मंदीरांत.

प्रेष्यांसि सुगंध पुसे, उठुनि, न जाणूनि देवदेवास. ३५
प्रेष्या नमिति, न वदती, जाणों त्या ज्ञाणती न बोलाया.
पाहे चहूंकडे, तों देखे तीची च दृष्टि लोला या[1], ३६
प्रभुतें पाहुनि, भामा देवी भगवत्प्रिया म्हणे, 'युक्त'
पाहे अन्यत्र, निघे एकमुहूर्त न तिच्या मुखें उक्त. ३७
नेतें भवाब्धिच्या जें ध्यात्यासि पलीकडील[3] कांठीं, तें
श्रीमुख रागें पाहे ती, घालुनि भोंवयांत गांठीतें. ३८
मग 'बहु शोभसि,' ऐसें म्हणुनि, वदन वामकरतळीं ठेवी,
होवुनि अधोमुखी, स्फुरदधरा[4], लागे रडावया देवी. ३९
अंभोजदळांपासुनि शुद्ध हिमसलिल[5] नृपा! जसें गळतें,
स्रवलें त्या भामेच्या नेत्रांपासूनि जें, तसें जळ तें. ४०
वरिचेवरि हस्ताहीं धरुनि, प्रभुवर उरस्थळीं जिरवी;
मिरवि स्नेहातिशय, प्रीति श्रीजानिची नव्हे हिरवी[6]. ४१
श्रीकृष्ण म्हणे, "दयिते! तव नयनांतूनि तोय कां आलें?
वदन प्रभातहिमकरमध्याह्नांबुजसमान[7] कां झालें? ४२
केसरांकित रुचलें, किंवा कौसुंभ[8] वस्त्रयुग. वामे[9]!
पूजेंत चि समुचित हें कां रुचलें शुभ्र आजि तुज रामे!? ४३
रत्नालंकारांचें सति! सुभगे! देवि! सर्वदा पात्र,
केवळ अनाभरण कां आजि तुझें मन्मनोज्ञ[10] हें गात्र? ४४
वदन[11], रदनमणिरुचिनें हरुनि द्युति, पाडणार कुंद रितें,
गतपत्रलेख[12] जेणें[13], कारण वद, जें असेल, सुंदरि! तें. ४५

१. चचल. २. या प्रभुतें—**पंत.** ३. 'पलीकडील' असें पाहिजे होतें. ४. जिचे ओंठ कापत आहेत अशी. ५. दवाचें पाणी. ६ कच्ची. ७. सकाळच्या चंद्रप्रमाणें किंवा हिम तुषारांच्या कमळाप्रमाणें [निस्तेज]. ८. केशरी किंवा कुसुंबी रंगाचें. ९. सुंदरि! १० माझ्या मनाला आल्हादकारक. ११ आपल्या दंतरत्नाच्या तेजानें कुंदकुसुमाचें तेज हरण करून त्याला पराजित करणारें तुझें मुख. १२ [ भालावरील चंदनरस-निर्मित ] पत्रावली—( चित्रलेखन )—चें नाहींसें होणें. १३. ज्या कारणानें.

मुक्तामणिहार सदा जो प्रिय तुज या चि हरिसम, स्तनगं[1],
सगुण, सुवृत्त, असावा तो, सति! नसतील जरि समस्त नग[2].
पूर्णेंदुसपत्नें[3] या, उत्पळगंधें, स्मितप्रभासदनें,
सुमुखि! किमपि न वदसि कां अमृतमधुरसूक्ति सुनिपुणें वदनें?
न पहासी एकें ही नयनें कुवलयदलादत्तस्पर्धें[4];
अर्धें हि तरि मला तूं देवि! विलोकूनि, म्हण, 'सुखें! वर्धें.'[5] ४८
देवि! तुझा किंकर मीं, हें या लोकीं प्रसिद्ध; मग मातें
कां आज्ञा न करिसि तूं? खगमा तें भव्य, जें चि अगमातें.[6] ४९
म्यां केलें काय तुझें विप्रिय? जेणेंकरूनि आयास
देसी अतिसुकुमारा देहा; सुंदरि! असह्य हा यास. ५०
कर्में, वचनें, चित्तें, त्वल्लंघन देवि! करित मीं नाहीं,
तव मानिलें मदसुहीं, गंगेचें जेंवि चरित मीनाहीं. ५१
बहुमानापात्र मात्र श्रीमति! अन्या स्त्रिया खरें, जाण;
स्नेह हि, बहु मान हि, सति! तुझिया ठायीं असे, तुझी आण.५२
यौवन तुझें स्थिर असो; न च, न घडायासि सुरत, रुसवा हो.
मन्निश्चय हा अर्थी गंधाक्षत कां न सुरतरुस वाहो? ५३
गंधक्षमादि सुगुण प्राणेश्वरि! जेंवि भूमिच्या राहे,
तैसा तव स्वरूपीं स्थिर माझा स्नेह सर्वदा आहे. ५४
अर्कीं प्रभा, हिमकरीं कांति, जसी सुरसुतोपमे! असती,
गुणगेहीं तव देहीं तैसी मत्प्रीति, सर्वदा वसती." ५५
ती प्रभुसि म्हणे, "पूर्वीं होती, 'माझा चि तूं,' असी समज;

---

१ स्तनावर (वक्षःस्थळावर) पडणारा २. दागिने ३ पूर्णचंद्राशीं स्पर्धा करणाऱ्या (वदनें) ४. कमळ पत्राशीं स्पर्धा करणाऱ्या (नयनें) ५ अर्धें ही नयनें (निदान कटाक्षानें तरी) ६ जें चि अगमातें (वृक्षातें) भव्य (कल्याणकारक) तें [ त्या वृक्षाचा आश्रय करणाऱ्या ] खगमा (पक्ष्याला) [ हि ] भव्य.

सामान्यें[1] आजि कळतां, जाड्यें[2] श्रम कां नसो असीस मज?
नेणें काळगतिस मीं, विपरीत अनित्य सर्व जी करिती;
आजि समजली, ख्याता आहे लोकांत सर्वदा परि ती. ५७
मेल्यावांचुनि घडलें मज दुसरें जन्म आजि, कीं, भेद
झाला, तूं पति मीं स्त्री; हा देतो फार या मना खेद. ५८
झालें तुज द्वितीया, झालासि मज द्वितीय तूं आजी;
किंबहुना, हृदय तुझें जाणतसे भेद, हा मना भाजी. ५९
कृष्णा! माधुर्य तुझ्या न मनीं, वदनीं च नांदतें या हें.
माझा ठायीं कपटस्नेह, असें स्पष्ट आजि मीं पाहें. ६०
या चि जनीं कृत्रिम हा स्नेह, न अन्यत्र, हें कळों आलें;
'आ' लेंकरूं करी जें, घालावें मधु तयांत कीं आलें? ६१
पुष्पांजळिसा देह स्त्री जी देवा! घनप्रभा! वाहे,
कपटें तूं अवमानिसि, वंचिसि, भक्ता ऋजुस्वभावा[3] हे. ६२
द्रष्टव्य देखिलें म्यां! श्रोतव्य हि ऐकिलें! नसे तृष्णा!
स्नेहाला फळ आलें! झालें पर्याप्त[4] सर्व ही कृष्णा!! ६३
कृष्णा! अनुग्रहाला भाजन[5] हा जन असेल जरि काय,
देसिल आज्ञा, वेंचिन, तप करुनि तपोवनांत तरि, काय. ६४
पतिच्या छंदें[6] केलें व्रत तप जें काय, सर्व तें फळतें;
मळतें यश अच्छंदें; स्त्रीधर्मरहस्य हें मला कळतें." ६५
ऐसें बोलुनि, झांकुनि पतिच्या पीतांबरांचळें वदन,
राणी पाणी आणी नयनीं, करि घाबरें जगत्सदन[7]. ६६
कृष्ण म्हणे, 'देवि! असा आयास मनास सेव्य कां गमला?
माझा शपथ तुज असे, जें सत्ये! सत्य, तें चि सांग मला. ६७

---

१. पूर्वी जी तुझी प्रीति मीं माझ्या एकटीच्या च मालकीची आहे असें अभिमानानें समजत होतें, तिच्यावर इतर स्त्रियाची हि तितकीच सत्ता चालते हें मला आज समजून आल्यानें. २ मूर्खपणाच्या [ समजुती—] मुळें. ३ सरळ मनाची. ४ पूर्ण. ५. पात्र, योग्य. ६. अनुमतानें. ७. विश्वाधार श्रीकृष्ण.

‘मानार्थ चि वांचावें मानधनांहीं,’ तुझें चि हें उक्त.
यास्तव, ‘मरेन’ ऐसें म्हणत्यें मीं मानवर्जिता युक्त. ८०
हा दैवा ! जो रक्षक दक्ष, करुण, तो चि सर्वथा वक्र
झाला मज भयदायक; काय करूं ? दीन तुजपुढें शक्र. ८१
देवा ! न कळे, त्यजिली त्वां हे अबळा पुढें करिल काय?
बहुधा कुमुद्वतीची[1] जी गति, तीतें इचा वरिल काय. ८२
बहु होउनि प्रिया, मीं झाल्यें तव अप्रिया विनाकळहें;
क्यां केलें देवाचें प्रिय अप्रिय, तरि च जाहलें फळ हें. ८३
तुजसह तव प्रियत्वीं रैवतका जी यदूत्तमा पाहे,
पाहेल कसी यावरि[2], होवुनि तुज अप्रिया, नगा[3] या हे? ८४
अप्रियपणांत मुक्ताहार कसी हे गळांत वाहेल?
ज्यांत क्रीडा केली तुजसह, त्या सागरासि पाहेल? ८५
यावरि जाईल कसी हे सासूच्या गृहासि पदनतिला[4]?
बहु मानवती, बुडवुनि मान, कसी दाखवील वदन तिला? ८६
‘सत्ये ! तुजवांचुनि मज अन्या नाहीं प्रिया,’ असें केलें
जें भाषण या स्वमुखें, कोठें तें आजि कृष्णजी ! गेलें? ८७
कळलासि आजि कृष्णा ! तूं केवळ कितव, धूर्त, शठ, चोर,
तत्पक्ष[5] चंचळ खरा, जनवंचक मधुर गुण मुखो थोर.” ८८
अभिमानवती देवी जी कोपें मत्सरें असें वदली,
सांत्वन करि कृष्ण तिचें, रत ज्याच्या चरणसारसीं सदलि[6].
“ऐसें न वद, मदीश्वरि ! दयिते ! सत्ये ! त्वदीय मीं जाण,
प्राणप्रिये ! ‘मदुक्तिश्रुति सत्या[7],’ तूं असें मनीं आण. ९०
श्रीमन्नारदमुनिला प्रद्युम्नाची करि प्रसू[8] नतितें;
तो मत्समक्ष दे तें, करुनि दया मजवरि, प्रसून[9] तितें. ९१

---

१. कमललतेची. २. यापुढें. ३. ह्या रैवतकाला. ४ पाया पडण्याला. ५. तो पक्ष (पूर्वी माझ्याविषयीं दाखविलेला पक्षपात). ६. साधुरूपी भृंग ७ माझें वचन हें च वेद (वेदतुल्य सत्य). ८. आई (रुक्मिणी). ९. फूल.

म्यां भक्तें ऐकावें, वदतां नाश[१] हि नसेल, तरि बोल.
लोल श्रवणीं आहे; प्रेमाचें त्वन्मनीं असो ओल.' ६८
पतिचा पाहुनि सत्या अत्यादर, गहिवरे, म्हणे, "देवा !
माझें सौभाग्य जगीं वाढविलें त्वां चि, घेतली सेवा. ६९
स्वविपक्षजनीं[२] ऐकत होत्यें स्वस्तवनगर्भिता गाथा,[३]
नाथा ! माझा लवला लव लाडानें तुझ्या न हा माथा. ७०
बहुमानगर्विता मीं होत्यें बहु मानदा विलासवती,
हांसुनि आजि म्हणतिल, 'व्यर्थ चि बहुमान दाविला,' सवती.
माझ्या अपमानातें ऐकुनि, मातें विपक्षजन सर्व
हांसेल, अन्य जन ही होवुनि मजहूनि उच्च बहु खर्व.[४] ७२
कथिती दासी दिधलें तुज सुरतरुपुष्प नारदें, देवा !
त्वां इष्टजनासि दिलें, वर्जुनि मज, न स्मरोनि मत्सेवा. ७३
त्या कुसुमरत्नदानें त्या इष्टजनीं सुगुप्त जो ठेला,
बहुमान स्नेह हि, तो त्वां आजि प्रकट वल्लभें केला. ७४
जेंवि शिवेचें केलें ब्रह्मसुतें स्तवन साधुवादरतें,
त्वां ऐकिलें प्रियेचें, मोक्षपरें[६] ब्रह्मसें चि, सादर तें. ७५
जरि तुजपुढें प्रियेचा ब्रह्मसुतें स्तवनसुरस[७] वाढावा,
तरि जो दुर्भग जन हा, तेणें तेथें[८] कशास काढावा ? ७६
देवूनि प्रेमरस, प्रभु तूं देतोसि जरि असा ताप,
मज तप करावया दे आज्ञा, क्षाळीन आपुलें पाप. ७७
अन्यत्र प्रेम तुझें नव्हतें स्वप्नीं हि देखिलें, स्पष्ट
प्रत्यक्ष पाहत्यें तें; मज याहुनि अधिक कोणतें कष्ट ? ७८
मुनिवर वर्णू, ती[९] ही न म्हणो, 'वर्णन असें नको, पावें,'
ऐकत होतासि रसें,[१०] परिसुनि हें, म्यां कसें न कोपावें ? ७९

१. नुकसान. २. सवतींमध्यें. ३. गाणें ४. क्षुद्र. ५. गोडबोल्या नारदानें. ६. मोक्षेच्छूनें. ७. गोड पदार्थ ८. त्या ठिकाणीं माझें नांव कां काढावें ? ९. रुक्मिणी. १०. मोठ्या प्रेमानें.

देवि! प्रसन्न हो तूं, माझा अपराध एक हा साहें,
'दिधलें' म्हणो तव मुख, प्रकटुनि पीयूषसेकेहासा, हें. ९२
पुष्पेच्छा जरि, तरि तूं 'हूं' मात्र म्हण, त्वदिष्ट जाणून,
खाणून पारिजात चि, लाविन तव मंदिरांत आणून. ९३
तूं वांछिसील जोंवरि, तोंवरि तो तव गृहांत राहेल,
वाहेल तुला पुष्पें, त्वद्भाग्योत्कर्ष विश्व पाहेल." ९४
भामा म्हणे, 'मुकुंदा! जरि तूं देसील पारिजातातें;
तेणें हर्ष मम मना, यमुनेच्या जेंवि वारिजातातें. ९५
म्यां हा कोप त्यजिला या सुरतरुदाननिश्चयें, देवा!
सर्व स्त्रियांत अधिका होवुनि, हर्षें करीन मीं सेवा.' ९६
श्रीकृष्ण म्हणे, 'जाण स्वकरा आला चि देवनग, जाये!
कासारांत न कमळें, करिणीचें काय सेवन, गजा ये?' ९७
प्रभु यापरि समजावी, जी होती जाहली प्रिया साधी.
सदनीं सत्येच्या चि स्नानाद्यावश्यकक्रिया साधी. ९८
प्रभुनें ध्यातां चि, गृहीं भामेच्या हेतु ये कलागतिचा,
जो सर्व मुमुक्षूंला देणार ख्यात एकला गतिचा. ९९
मुनिचरण प्रक्षाळी सत्या अत्यादरें, कमळपाणी
श्रीतीर्थपाद घाली कांचनपात्रें स्वयें अमळ पाणी. १००
पूजुनि परमप्रेमें, बसवुनि मणिकांचनाचिया पाटीं,
दोघांहीं जेवविला शुचिकनकाच्या मनोरमीं ताटीं. १०१
नारद आशीर्वाद प्रभुला देवुनि म्हणे, 'अजितभार्ये!
माझ्या तपोबळें तव सौभाग्य सदा असो अधिक, आर्यें!' १०२

---

१. अमृतवर्षावाप्रमाणें हास्याला २ कमलाला ३. कल्पवृक्ष (पारिजातक). ४. जर कासारात (तळ्यांत) कमळे च नसलीं तर करिणीचें (हत्तिणीचें) सेवन (मनधरणी) हत्ती कसा करणार? ५ दुःखी. ६ नारद ७ मोक्षाचा. ८. उत्तम तीर्थ (गंगानदी) आहे पायाचे ठिकाणीं ज्याच्या असा कृष्ण—निर्णय०.

मग देवर्षिनिदेशें भगवान् विघसान्न आदरें सेवी,
जेवी त्यावरि पतिच्या आज्ञेनें तत्प्रसाद ती देवी. १०३
प्रभुसि मुनि म्हणे, "आज्ञा दे, जायिन मीं महेंद्रसदनातें,
तेथें तन्मह आहे, जो करि पाहोनि भस्म मदनातें. १०४
प्रतिमासीं परमोत्सव शंभुप्रीत्यर्थ होतसे, देवा!
गावुनि गंधर्व, करिति विभुची नाचोनि अप्सरा सेवा. १०५
पूर्वदिनीं जें देवुनि शक्रें आमंत्रिलों स्वयें बा! मीं,
तरुराजपुष्प तें या रैवतकीं तुज दिलें तुझ्या धामीं. १०६
हा इष्ट शचीस असे, देतो सौभाग्य पूजनें, कृष्णा!
तूं तेंवि पारिजात स्वपरांची सर्व पुरवितो तृष्णा. १०७
सेवासक्त करितां, अदितिस कश्यप म्हणे, 'महाभागे!
माग, प्रसन्न झालों; वांछित वर ओपितां न हा भागे.' १०८
अदिति म्हणे, 'अतिसुभगा हे वर्णावी समस्तसुभगानीं,
तोटा न भूषणीं हो, तैसा चि न नर्तनीं, न शुभगानीं. १०९
नित्य कुमारी च असो, न शिवावा शोक सर्वथा चित्ता,
विरजा, स्वधर्मशीला, पतिभक्तिमती, प्रभो! तपोवित्ता.' ११०
पत्नीप्रियार्थ निर्मी कश्यपमुनि पारिजातवृक्षातें;
याचें यश न परा ये; जें चंद्रा, तेज काय ऋक्षा तें? १११
ज्या तरुराजीं पुष्पें सर्वें हीं सर्वकामदें असती,
ज्याच्या ठायीं केली, सुगुणाहीं सज्जनीं तसी, वसती. ११२
या वृक्षासीं बांधुनि कश्यप मज अदितिनें दिला दान,
सौभाग्यपुण्यकामें कथिल्या विधिनें, करूनियां मान. ११३
निष्क्रय घेवुनि, केला म्यां कश्यप मुक्त केशवा! साचा,
या दानीं बहु महिमा, इतरीं याच्या न लेश वासाचा. ११४

---

१ देव, पितर, ब्राह्मण, इत्यादिकांना अर्पण करून शेष राहिलेलें अन्न—निर्णय०.
२ त्या [शंकराचा] उत्सव. ३ घरीं. ४. पापरहिता, सत्वशीला. ५. तपोधना.
६. नक्षत्राला. ७. किंमत, मोल.

सौभाग्यार्थ शचीनें मग शक्र दिला मला चि बा! नमुनी,
पतिदान रोहिणी दे, देवा! घे तें हि हा चि दान मुनी. ११५
ऋद्धि प्रभुसखभार्या, बहु भीड तिची हि केशवा! पडली,
तत्पतिदान हि घे हा, न सुटे आंगासि पात्रता जडली. ११६
ऐसा सौभाग्यप्रद निःसंशय पारिजात अगम हितें,
संश्रितवांछितपूरक, हा त्रिजगीं कां नसेल मग महित?"११७

## अध्याय सत्ताविसावा.

कृष्ण म्हणे, " मुनिवर्या! येथुनि जाबूनि शक्रसदनातें,
उत्सव पाहुनि, मग तूं पूर्वील प्रभुसमीप वद नातें. १
सांगुनि वंदन माझें, प्रार्थित मम अग्रजासि कळवावें,
स्तवपूर्वक मधुर वदुनि, पाहुनि सुखसमय. चित्त वळवावें. २
'श्रीकश्यपमुनिनिर्मितकल्पद्रुमपारिजातयश आर्या!
ऐकुनि साधुमुखें या, वांछिति तद्दानपुण्य मम भार्या. ३
तरुसह दान अदितिनें स्वपति दिला, तो चि तें तिला सिकवी;
सौभाग्यार्थ शचीनें मग नगसह दान तूं दिलासि कवी. ४
तैसा चि रोहिणीनें दिधला पति; ऋद्धिनें हि, धन्याही
केलें ऐसें चि, विभो! वांछुनि सौभाग्यपुण्य अन्याहीं. ५
यास्तव या स्तवनार्हा दे आर्या! पारिजातनगराज्या,
उत्सुक मति म्हणति, 'तुझ्या जावें विनवावयासि नगरा ज्या.'
धाडुनि द्याया स्ववधूकामास्तव तरुवरा वदान्या या,
आर्या! समर्थ असती, दिधल्यावरि दान, निजपदा न्याया.' ७
हें कार्य अगत्य करीं; वळवील न पाकशासना कावा;

१. प्रभुसख=कुबेर २ हित (कल्याणकारक) अगम (वृक्ष) ३. बधुत्व. ४. जो (पारिजात) मागण्यासाठीं. ५. कचा.

'नाहीं,' म्हणेल भर्ता मिळतां यश वा! कशास नाकाचा? ८
बा! पशु हि वळेल तुझे सुप्रिय सेवूनि बोल कानाहीं,
तुजसम तूं चि त्रिजगीं, देवर्षे! अन्य बोलका नाहीं." ९
देवर्षि म्हणे, "देवा! विनविन शक्रासि, अर्पिल प्राण,
परि पारिजाततरु तो न सुखें देयील, निश्चयें जाण. १०
पूर्वीं पयोधिमथनीं जैसीं तीं कौस्तुभप्रमुख रत्नें,
देवांच्या असुरांच्या तरुराज प्रकटला परमयत्नें. ११
प्रार्थी शिवा शिवा कीं, 'हा मंदरसन्नगीं नगें वसावा.
लोभ्या परीं न, जैसा मणि वसतां पन्नगीं न गवसावा.' १२
साहे, मंदरशैलीं तरु विभुनें प्रेषितां, न मघवा तें;
विनवि प्रभुतें, ज्याच्या निर्माल्याच्या उरे न अघ वातें. १३
'वरदवरा! भगवंता! शरणागतवत्सळा! तुझी भक्ता
आहे पुलोमकन्या या वृक्षीं, त्वद्गुणीं तसी सक्ता. १४
तीच्या क्रीडोद्यानीं द्यावा लावावयासि पादप हा,
आहे अशा प्रसादीं या तरुहुनि अधिक साधुवाद, पहा.' १५
ज्या प्रभुपुढें असत्यें सहसा विधिचे हि वेद हरपावे,
तो हि, शचीचें करितां मिष, नाशायासि खेद हरपावे. १६
देवीप्रियार्थ, सुयशें व्हाया जन ही भवाब्धिनिस्तीर्ण,
करि पारिजातवन मग भगवान् गव्यूतिमात्र विस्तीर्ण. १७
सगण प्रभु, देवी, कीं जातों मीं त्या स्वयंप्रभ वनांत;
नाहीं प्रवेश अन्या, जेंवि अपूता सुविप्रभवनांत. १८
त्या पूर्वपारिजाताहुनि बहुगुण फळ असे सदा यांचें;
जें इष्टवस्तुदानीं मातांचें, तेज तें न दायाचें. १९
ते मूर्तिमंत वृक्ष प्रभुची गणसे उपासना करिती;

१ जेव्हां [प्रकट झाली] २ पार्वती ३ वृक्ष ४ अत्यंत (लोभ्या) ५ सर्पमस्तकीं असणारा ६ कीर्ति ७ सबब ८ दोन कोस लांबरुंद ९. मुळचें च तेजस्वी अशा. १० अपवित्र (चांडाल वगैरेस) ११. मूळच्या, समुद्रमथनोत्पन्न.

धरिती प्रेम तयांवरि देवी, पुत्रीं जसें, तयापरि ती. २०
तेथें अंधकनामा, वरदर्पित, पापनिश्चय, क्रूर,
सिरला, वधिला प्रभुनें, वृत्रादिक दशगुणें बळी शूर. २१
पाहोनि सर्वभूतावध्या त्या, होयें अंधकार मलां[1];
भगवान् स्वयंप्रभ वनीं देवीसीं, वधुनि अंधका, रमला. २२
कृष्णा! यास्तव म्हणतों, देयिल शतमख न पारिजाततें.
सर्वाधिक विषयरता[2] त्याचें विषयप्रदत्व[3] ताता! तें." २३
कृष्ण म्हणे, "हरिला न द्रुम, युक्त चि होय तें महादेवा;
[4]करुणा म्हणे, 'पुढें स्त्री केली कीं, तीकडे पहा, देवा!' २४
तो देव सर्वभूतज्येष्ठ, श्रेष्ठ, स्वयें जगद्भर्ता,
करिता झाला लौकिकमर्यादोचित चि तें उमाभर्ता. २५
त्या जेंवि जयंत[5], तसा मीं बंधु कनिष्ठ लालनीय असें,
कीं, मोडिलें तदीय न ईशें; मोडील मन मदीय कसें? २६
यत्न करीं या कार्याविषयीं; आहेसि नारदा! शक्त;
[6]व्यक्त, ब्राह्मण सज्जन जे, त्यांचा वासुदेव हा भक्त. २७
सत्येसमीप केली 'सुरतरु आणिन' असि प्रतिज्ञा, ते
रक्षीं; न भजति भग्ना[7] पुरुषाप्रति कीं असिप्रति ज्ञाते.
म्यां त्यजिलें, तरि लोकीं लेश हि राहेल सत्य न मुने! तें. २८
अनृत पुरुष संततितें दूषी, कालिय जसा चि यमुनेतें. २९
सर्व सुरासुरराक्षस शकतिल माझ्या पणा न मोडाया;
आहेत समर्थ शर प्रबळा परपर्वता हि फोडाया. ३०
[8]सामें मागत असतां, वृक्ष न देतां, यशासि[9] जोडाया,
सांग स्पष्ट तया कीं, 'न चुकेन उरीं गदेसि सोडाया.' ३१

---

१. मला घेरी आली. २. विषयासक्त इंद्राला ३ विषयोपभोगदायित्व ४. [ महादेवाची ] दया ५. इंद्रपुत्र ६ हें स्पष्ट च आहे कीं. ७. वचनभंग करणाऱ्या पुरुषाला व मोडक्या तरवारीला. ८. सामोपचारानें, गोडीगुलाबीनें. ९. मोठेपणास

भ्रातृप्रेम त्यजितां, रक्षीन न [1]शतमखा [2]अनगदात्या;
हाणिन उरस्थळीं मीं, मृदु हि कठिन करुनियां मन, गदा त्या.''
प्रभुचा निश्चय ऐकुनि, नारद आला महेंद्रसदनातें,
पाहे परमोत्सव तो, प्रेमें वंदूनि [2]कामकदनातें. ३३
परमेश्वर गेल्यावरि, राजर्षि, सुरर्षि, जे पर महर्षि,
स्वस्वस्थाना गेले, होवुनि परमोत्सवें परमहर्षी. ३४
तो उत्सव झाल्यावरि, जाय सुरसभेंत कीर्तिसदनमुनी,
स्वासनसमासन तया कल्पी वासव, ससभ्य पद नमुनीं. ३५
नारद म्हणे, 'महेंद्रा! दूत श्रीकृष्णविष्णुचा झालों,
किंचित् कार्य प्रभुनें कथिलें सांगावया तुला आलों.' ३६
शक्र म्हणे, 'चिरकाळें कृष्णें आम्हांसि आजि आठविलें;
बहु उत्तम! ऐकों दे, वद, सांगुनि काय कार्य पाठविलें?' ३७
देवर्षि म्हणेः–शक्रा! तव अनुजा केशवा पहायाला
गेलों द्वारवतीला, [4]सरसीला गज जसा नहायाला. ३८
शक्रा! सत्कुळदैवत रैवतकीं रुक्मिणीसहित पाहें;
नेत्रद्वय बहुमानी, पाहुनि त्या रुक्मिणीस हि, तपा हें. ३९
श्रीकृष्ण करित होता सप्रेम उमामहेश्वरस्तवन,
अतिमधुररवें झालें होतें तें चित्रसें समस्त वन. ४०
म्यां पारिजातपुष्प श्रीकृष्णाला, तदीय भार्यांतें
द्याया विस्मय, दिधलें; झालें बहु हर्षकारि आर्यां तें. ४१
करितां श्रवण प्रेमें, भार्यांतें त्या [5]अपारिजाताच्या,
अद्भुत गुण पुष्पाचे सांगावे कां न पारिजाताच्या? ४२
कथिलें कश्यपतेजें झालें तें पारिजातजन्म हि म्यां,
झाल्या विस्मितहृदया प्रभुदयिता आयकोनि सन्महिम्या. ४३

---

१. वृक्ष न देणाऱ्या शतमखास (इंद्रास). २ मदननाशन शंकरास ३. देई ४ सरोवराला ५. अप+अरि+जाताच्या=नाहींसे झाले आहेत शत्रूचे समूह ज्याचे अशाच्या (कृष्णाच्या)

या तरुसीं पुष्पांच्या स्वकरें बांधूनि मान दामानें,[1]
ऐकति, पतिदान अदिति दे मजला, हें हि मानदा! मानें. ४४
तूं हि दिलासि शचीनें, दिधले धनदादि ही सुदाराहीं,[2]
त्यां निष्क्रयप्रकार हि, कथिला, तें ऐकिलें उदाराहीं. ४५
ऐकुनि, तव अनुज्याची अतिदयिता एक सत्यभामा हा,
पतिस म्हणे, '[3]पुण्यक मीं करिन, तुम्हीं या सहाय कामा [4]व्हा.'
श्रीकृष्ण म्हणे, ' भामे! देतों आणूनि पारिजातातें,
[5]मतिमति! सति! पतिसुरतरुदानें तूं ही [6]उजीव हातातें.' ४७
इंद्रा! करूनि हा पण, आपण तव अनुज मज म्हणे, "आर्या!
प्रार्थुनि मदग्रजाला, सिद्धिप्रति पाववीव या कार्या. ४८
आर्यासि वद, ' वरांच्या तुजला मीं बंधु लालनीय शतें;
बा! तनुजपालनीं जें, देवेंद्रा! अनुजपालनीं यश तें. ४९
हा सफळ तव वधूंचा धर्ममनोरथ असो, प्रसादानें
होय, शचीदेवीचा या तरुराज्याचिया जसा दानें. ५०
नरलोकीं दुर्लभ हा, यातें पाहोत सर्व ही मनुज,
अतुळप्रभाव होयिन या कर्मेंकरुनि मीं तुझा अनुज.' " ५१
या प्रभुसंदेशातें ऐकुनि वासव म्हणे, 'मुने! आधीं
तूं बैस आसनीं, घे उत्तर मग, कार्य साध्य तें साधीं.' ५२
मुनि आसनीं बसे, मग तदनुज्ञेनें महेंद्र ही राज्या!
वृत्रादिघन न शकले लेश हि भंगावयासि हीरा ज्या. ५३
इंद्र म्हणे, "ज्या दहनीं झाले परवीरराय कापूस,
देवर्षे! मद्वचनें कुशळ तया वृष्णिनायका पूस. ५४
सांग निरोप, मुने! कीं, 'कृष्णा! [10]स्वजनाधिरोगनासत्य

---

१ माळेनें २ पतिव्रता स्त्रियांनीं ३ पतिदानरूप पुण्यकारक व्रत. ४ हा शब्द **पंतानीं** 'व्हा' असा लिहिला आहे ५ बुद्धिमान् स्त्रिये! ६ उजळ (पवित्र) कर ७. धाकट्या भावजयांचा ८ हातोंडें ९ हिऱ्याला १० आपल्या भक्तांच्या मनोव्यथेचे देववैद्य (अश्विनीकुमार)

मजमार्गें त्रिजगाचा निःसंशय तूं चि नाथ नासत्य. ५५
हा पारिजात, रत्नें अणिक हि, जीं संग्रहांत आहेत,
सर्वस्व तुझें स्वर्गी, तव दयितेचा पुरेल हा हेत. ५६
सुरकार्य करुनि नाकीं यावें, भामा प्रिया हि आणावी;
पुण्यक्र घडेल; योग्या मर्यादा रक्षणासि जाणावी. ५७
स्वल्पार्थ न नरलोकीं न्यावीं स्वर्गाचिंतें महारत्नें,
हे विधिकृत मर्यादा संरक्षावी च सर्वदा यत्नें. ५८
तरु नरलोकीं जातां, किमपि न अस्मत्स्वरूप राहेल,
सुर नर समान होतिल, आम्हां कोणी न भाग वाहेल. ५९
अर्पील मानुषांला, देवांचें रूप जें, सुरतरु च तें.
न रुचेल, अप्सरांचें आजि नरांला जसें सुरत रुचतें. ६०
अद्भुत सुख नरलोकीं होतां, करितिल कशास जन यज्ञ ?
या कार्या अनुमोदन देतील अदीर्घदृष्टि अनयज्ञ.' ६१
मर्यादा मोडितसे; झाला, भक्षूनि मांस, मत्त; पहा;
जरि त्यां क्षमा करावी, तरि देवर्षे ! म्हणेल मत्तप 'हा !' ६२
बहु अयश जगीं होयिल, कीं, झाला स्त्रीस कृष्ण वश्य, पहा.
भलतें चि कर्म करितां कां न अदितिसह म्हणेल कश्यप 'हा !'
सुज्ञ न सोसी, सोसो ज्ञातिकृता धर्षणा असुज्ञा ती;
न स्वर्गरत्न, माझें स्पष्ट 'हरिन' म्हणतसे 'असु' ज्ञाती. ६४
सुर, सुरतरु पाठवितां, 'हा !' म्हणतिल, करुनि आठवा, नाकीं
विटुनि म्हणेल शची ही, 'स्वपरिग्रह हा हि पाठवाना कीं !' ६५
'नेणें देवनगाचें नरलोकीं सर्वथा नव्हे युक्त;'
सांग असें कृष्णाला; आहे बहु मत तया तुझें उक्त. ६६

---

१. न+असत्य=खरोखर; नि संशय २ मर्यादा (चालत आलेली किंवा थोर-मोठ्यानी घालून दिलेली रीत) रक्षणास योग्या (भलधनीया) जाणावी. ३ क्षुल्लक कामासाठीं ४ यज्ञभाग, हविर्भाग ५ अदूरदर्शी. ६. नय न जाणणारा. ७ अपमानाला ८ आठवण ९. ही मी आपली स्त्री तीं सुद्धा.

जा, पावे तोष असें कथिलें हें नारदा! वद भ्रात्या;
ज्या सुविवेका देती, बा! जाणसि युक्ति तूं [1]अदभ्रा त्या. ६७
मणिहार, अगुरु, चंदन, चित्रें वस्त्रें, वधूसि ने त्याच्या,
नरयोग्य वस्तु घेवुनि जा, जें येयिल मनासि नेत्याच्या[2]. ६८
'देतों दिव्यें वस्त्रें, देतों रत्नें, विभूषणें चित्रें,
न सुरप्रिय तरु देयिन,' सांगावें युक्तिनें तुवां मित्रें." ६९
नारद म्हणे, "महेंद्रा! म्यां तुज हित तें अवश्य सांगावें;
समयीं चुकतां, कविनीं 'सर्वसुहृत् साधु' म्हणुनि कां गावें?
कृष्णाला कथिलें म्यां, 'हालाहळ पिवुनि, जो न वमता तें,
त्वां त्या हरा हि न दिला सुरतरु.' या जाणतों तव मतातें. ७१
ज्या माज्या उपदेशा वेदासीं सर्व सुज्ञ हे तुकिती.
तो मीं बहुत चि वदलों, न करावा हठ, म्हणोनि हेतु किती!
'मीं अनुज लालनीय, द्रुम द्यावा अग्रजें,' असें च वदे.
लोभीं विहित वचन न, द्रव्य[3] मधुर हि ज्वरीं तसे, चव दे. ७२
प्रभु हांसुनि वाक्यांतीं वदला, मज तें सरोषसें गमलें;
परिस, तुला मीं कथितों, ज्याच्या श्रवणीं च मन्मन भ्रमलें. ७४
'[4]सर्व सुरासुरराक्षस शकतिल माझ्या पणा न मोडाया,
आहेत समर्थ शर प्रबळा परपर्वता हि फोडाया. ७५
सामें मागत असतां, वृक्ष न देतां यशासि जोडाया,
सांग स्पष्ट तया कीं, 'न चुकेन उरीं गदेसि सोडाया.'" ७६
इंद्रा! उपेंद्रनिश्चय जाण असा स्पष्ट, नीति आठीव;
पुससिल मज तरि देवा! देवतरु द्वारकेसि पाठीव." ७७
इंद्र म्हणे, "देवर्षे! जरि अग्रज निरपराध मीं आहें,
अनुज मला लंघितसे, भ्राता म्हणवूनि सोसितों बा! हें. ७८

---

१. पुष्कळ २. नेणाऱ्या तुझ्या. ३. पदार्थ ४. गीति ७५ व ७६ ह्या द्विरावृत्त आहेत. मागें गीति ३०-३१ पहा.

बहु विप्रिय कृष्ण करित आला, आम्हीं सहात आलों; बा!
म्हणतो आम्हांसि, 'अजाकंठस्तनसे वृथा चि' हा 'लोंबा!' ७९
आपण सारथि होवुनि, करुनि पुढें मत्तनूज[1] पांडव, हा
घन वारुनि, मजकरवीं म्हणवी, जाळूनि सर्व खांडव, 'हा!'
गोपांची मति भेदुनि, अनव[2] महोत्सव बळें चि राहविला,
गोवर्धन धरुनि करीं माझा सर्व प्रताप वाहविला. ८१
स्वसमत्व[3] वदे, होय प्रबळारिवधीं सहाय हा न मज,
करुनि निजभुजबळाश्रय, वधिला म्यां वृत्र नारदा! समज. ८२
देवासुरसंग्रामीं करितो स्वेच्छेकरूनि हा युद्ध,
तरि मीं, प्रेम त्यागुनि, होत नसें स्वानुजावरि क्रुद्ध. ८३
मीं कलह करित नाहीं भ्रात्यासीं, तूं चि आजि साक्षी बा!
'हाणीन गदा' म्हणतो, नाहीं च विवेक या जसा क्षीबा[4]. ८४
अदितिसह पिता कश्यप संप्रति उदवास[5] करुनियां आहे,
तन्नंदनप्रतिज्ञा त्यांला आधीं कथीन मीं बा! हे. ८५
अजितात्मा मद्भ्राता, हा! हा! केवळ रजोगुणें मळला,
स्त्रीवाक्यें मज गुरुतें[6] वधितो, धिक्! कामवश खरा कळला.
'स्त्रीपुत्रसहस्राहुनि अधिक भ्राता,' असें मला माता,
तात हि, सांगे, 'सोदर[7] जो, तो आत्मा चि, न विसरें ताता!'
कश्यपकुळांत किमपि हि निंद्य नसे, नारदा! अदिति[8] झाली
तें हि नव्हे राक्षसकुळ, कां कृष्णीं उग्रता असी आली? ८८
ज्या कर्मीं स्वस्तव[9], तें न वदावें, बा! परंतु हा समय;
देवर्षे! अनवसरीं[10] युक्त हि होतें चि उक्त हासमय[11]. ८९

---

१ माझा पुत्र अर्जुन. २. जुना ३. आपलें तटस्थपण ४ कैफ्यास, मत्तास. ५. पाण्यांत राहणें ६. वडील भावाला ७ बंधु, सहोदर ८. ज्या कुळांत अदिति झाली तें हि निंद्य राक्षसकुळ नव्हे; तर मग पित्याचें व मातेचें कुळ चांगलें असता कृष्ण क्रूर कसा झाला? ९. आत्मस्तुति १० अयोग्य काळीं. ११. हास्यास्पद.

शार्ङ्गाच्या झटक्यानें गुण तुटतां विष्णुचें उडे शिर तें
त्यां जोडिलें प्रयत्नें, धरिलें देह स्वयें दयानिरतें. ९०
'काय म्हणेल मज पिता माता?' ऐसें मनांत आणून
धरिलें शरीर याचें त्यां, बंधुप्रेम अधिक जाणून. ९१
'सर्व त्रिदशांत,' म्हणे, 'हा मीं च विशिष्ट[2], अन्य न विशिष्ट.'
दर्पें धनुष्य चढवी, बापा! हें जाणतात कवि शिष्ट. ९२
श्रावणभाद्रपदांतिल पूजा त्यां आपुली दिली याला,
बा! लाज मला होत्ये, उद्धत मदनुज, पहा, कसा झाला! ९३
यत्नें अवतारांत स्वशरीरा तेंवि यासि रक्षितसें,
स्वानुज म्हणुनि प्रेमें स्वात्म्यापरि मीं सदैव लक्षितसें. ९४
या माझ्या भवनावरि[3] रचिलें बहुरम्य आपुलें भवन;
न गणुनि अपमानातें, करितों स्नेहेंकरूनि मीं अवन. ९५
धर्में अनुज भ्राता तो पुत्र चि लालनीय बाळकसा.
म्हणतों 'हा दुखवावा आपण, रागें भरूनि, बाळ कसा?' ९६
आवडतो ताताला, मातेला, बहु मला हि आवडतो,
स्नेहें आश्रय केला, मार्कंडेयें जसा चि बा! वड तो. ९७
'करिन प्रहार,' म्हणतो, यांत दिसे कीर्ति शुचितरा ज्याला,
तो चि करो आघात प्रथम; नव्हे स्पष्ट उचित राज्याला. ९८
अहितें रणीं हटकितां, बहु ज्याचें ज्ञान दभ्र मुरडेल,
पाहुनि अधैर्य पतिचें केवळ न शची च, अभ्रमु रडेल. ९९
सांग तया दाराजिला, 'ये, उत्साहेंकरुनि हो पीनें[4];

---

१ हयग्रीवासुराच्या वधोपायार्थ समाधिस्थ विष्णूला जागा करण्यास देवानीं त्याच्या हातातील शार्ङ्गधनुष्याची दोरी तोडिली, त्यामुळें धनुष्याचा झटका विष्णूस बसून त्याचें शिर उडालें, मग शंकरानें त्याला घोड्याची मान लाविली. या हयग्रीवावतारानें त्या असुरास मारिलें [ही च आर्या यामागें क्रमानें ८३ व्या स्थळीं लिहिली गेली असून तेथें ती हरताळली आहे]. २. श्रेष्ठ ३. नगराहून. ४. लठ्ठ, धष्टपुष्ट.

मीं जों अजित, तुला तों[1] तरुचें पत्रार्ध ही न ओपीन.' १००
सांग, ' बसुनि गरुडीं ये, धरुनि गदा, शार्ङ्ग, चाप, चक्र, दर;
कपटें तरुवर न हरीं; धरिल पवि करीं, मनीं न शक्र दर.' " १०१
ऐसें अविहित वदतां, एकांतीं तो सुरर्षि ने त्यातें,
बोध करी, देवांच्या, सांगोनि रहस्य तत्व, नेत्यातें. १०२
" सांगावें राज्याला शक्रा! न विचारितां हि जें विहित;
सुहृदुक्त युक्त कडु ही, ओखद बाळासि होय जेंवि हित. १०३
न करावें परिणामीं तापप्रद जें मनास देहास,
शक्रा! ज्या कर्माचा आरंभ चि रिपुजनास दे हास. १०४
जो निर्गुण परमपुरुष नारायण, तो चि, वरुनि मायेतें,
झाला शिव, विष्णु; विभो! प्रकृतिस्तव[2] नामरूप या येतें. १०५
चिच्छक्ति उमादेवी, अंशें चिच्छक्ति रुक्मिणीदेवी;
जे वीतमोह[3] सुकवि, प्राप्त तयांला चि होय हे ठेवी. १०६
लीलेनें चि महेंद्रा! रचितो क्रीडार्थ कृष्ण विश्वास,
निश्वास वेद याचे, याचा चि असे कवींस विश्वास. १०७
पूर्वीं सुतप करुनियां, अदिति सती सुचिरकाळ आराधी,
जीची योगपथीं न च निसरे, विसरे हि विश्व, सारा[4] धी. १०८
भेटे प्रभु तीस म्हणे, ' माग, तुझ्या सुफळ इष्ट सुतपा हो.'
अदिति वदे, ' वरदेशा! हे तुजसम सुगुण शिष्ट सुत पाहो.' १०९
देव म्हणे, ' मीं च तुझा सुत होतों, साध्वि! अन्य मत्सम न.
मदुपासना भजकमन तृप्त करी, सुरभि जेंवि वत्समन.' ११०
झाला देव तव अनुज, मनुज हि सांप्रत धराभर हराया,
राया! हा जगदीश्वर अवतरतो, बहु सुखी नत कराया. १११
वा! पेललपिंड[5] जेंवि स्नेहें[6], कृष्णें प्रपंच[7] हा सर्व

१. जोपर्यंत जिंकला गेलों नाहीं तोपर्यंत. २. मायेमुळें. ३. गेली आहे अज्ञानरूप भ्राति ज्यांची असे. ४ श्रेष्ठ प्रतीची ५. मांसाचा गोळा ६. तेलानें ( चरबीनें ). ७ ससार, विश्व

व्याप्त असे, देवेंद्रा ! यासीं कोणीं करूं नये गर्व. ११२
हा सर्वात्मा सर्वां देवांला पूज्य होय सद्वेष;[1]
तरले, न तयापासुनि बहु मेले बळसमुद्र सद्वेष.[2] ११३
होउनि शेष, धरेतें केशव आधार जाहला आहे.
बा ! हे शक्ति तुज असे? दंष्ट्राग्रीं, होय किटि,[3] धरा वाहे. ११४
असुर हिरण्याक्ष महादारुण, त्यासीं रची वराह रण,
एकार्णवीं करी हा तत्प्राणांचें शचीवरा ! हरण. ११५
अत्युग्र हिरण्यकशिपु वधिला, होवुनि नृसिंह, या अजितें,
अजि ! तें काय विसरलां? कारुण्य प्रभुसि सद्वनीं साजितें. ११६
होवुनि वामन, हा मन निववी, भू हरुनि, वळिस आकळुनीं;
न कळुनि जसें वदावें, तैसें वदतोसि काय गा ! कळुनी ? ११७
तुझिया ठायीं श्रीपति बळिच्या श्रीतें हरूनि हा स्थापी,
याच्या कीर्तिसुधेतें साधुसभा, बहु धरूनि आस्था, पी. ११८
दशवदनातें मारी, तारी देवांसि, होय हा राम,
निववी नतांसि, केवळ कल्पतरूचा असा न आराम. ११९
कथितों भविष्य, 'नेयिल सुरतरुतें शत्रुकाळ केशव हा;
नगरल पदीं, जाणुनि यासि सकळलोकपाळकेश, वहा. १२०
बंधुस्नेहपराभव[6] करिल, धरिल हात; बा ! तया पविनें
तूं तो न गदेनें तुज हाणिल.' स्यां भावि जाणिलें कविनें १२१
दे पारिजात सामें, घ्यावा न वृथा करूनियां वभ्रा,
दभ्रा श्री; विटवावें न भ्रात्या त्या दयेचिया अभ्रा. १२२
स्यां कथिलें नेकासि, तरि सचिवांतें देवनायका ! पूस,
कीं स्वमना, 'वायुपुढें बळ धरुनि टिकेल काय कापूस ?'" १२३
शक्र म्हणे, "आयकिलें, कृष्णाचें कथिसि तूं हि थोरपण,
म्हणुन चि न देयिन द्रुम ऐकुनि त्याचा तसा हि घोर पण. १२४

---

१ सुंदरवेषधारी २ सज्जनद्वेष्टे. ३ वराह ४. सज्ज करितें. ५ वाग्
६. तो कृष्ण बंधुस्नेह विचारांत घेणार नाहीं.

कीं, तो महाप्रभाव, तुमचर हा स्वल्प अर्थ, याकरितां
क्रोध न धरील, कैसा परमपुरुष, कामकोप हे धरितां ? १२५
स्पष्ट असावा चि सदा, जरि कृष्ण महाप्रभाव, सोसिक तो.
वृद्धांचें सुपुरुष तों, म्हणतो 'स्वमहाप्रभा वसो,' सिकतो. १२६
पाडील स्त्रीप्रार्थिततुच्छविषयकाम हा प्रभाव ढिला,
लंघाया वांछितसे, मळवाया कां महाप्रभा, वढिला ? १२७
जरि अदितिला दिला वर, आपण झाला कनिष्ठ हा तनय,
स्वज्येष्ठ भ्रात्याचें ऐको, साहो, न हो चि हातनय. १२८
योग्य महात्मा ज्येष्ठ भ्रात्यासीं व्हावयासि न विरोधी;
कैंचि रोधी मन; कां जरि परमपुरुषें निजसुखीं च न विरो धी ? १२९
पूर्वीं ज्येष्ठ न व्हाया कोणी कृष्णासि घातल्या आणा ?
वढिलपणाची वांछा, तरि तें आता हि पातल्या आणा." १३०
द्यावा न च तरु, ऐसा निश्चय जाणोनि सुदृढ शक्राचा,
जाय द्वारवतीतें नारद, धर्ता स्मरोनि चक्राचा. १३१

---

# अध्याय अठ्ठाविसावा.

ज्याच्या शरणागतिनें सर्वांची होय अल्पभा माया,
द्वारवतींत उपासित होती स्वगृहांत सत्यभामा या. १

---

१ चांगला मनुष्य आपलें शहाणपण घटकाभर बाजूस ठेवून वडिलधाऱ्याचें ऐकतो, असा भावार्थ २ पारिजातेच्छा–**पंत.** ३ शहाणा आपल्या मनास ताब्यात ठेवितो, [असें जर आहे आणि त्यात हा] जर [तुझ्या म्हणण्याप्रमाणें] परमपुरुष [तर याची] धी (बुद्धि) निजसुखीं च (आत्मानंदांत) का न विरो (का विश्राम पावत नाही)? [बायकोचे हट्ट पुरविण्याची प्रापंचिकांची इच्छा या परमात्म्याचे ठिकाणीं का दिसावी]? ४ याची–**पंत.** अन्वयार्थ द्यावयाचें अध्याहृत पद. ५ मिळत असेल तर मिळवा ६. सुदर्शनधारी. ७. अत्यंत निस्तेज.

भामेसीं प्रभु बोले, परि चिंती मानसांत तें कार्य,
ज्याकरितां पाठविला जिष्णुकडे विश्ववंद्य तो आर्य. २
तेथें ये प्रणतांला देता भवसिंधुपारदान मुनी,
सामोरा जाय प्रभु, पूजी विध्युक्त नारदा नमुनी. ३
होतां विश्रांत[1], पुसे हांसुनि वृत्तांत विभु तया तरुचा,
मुनि सर्व विचार कथी शक्राच्या स्नेहवारिच्या[2] मरुचा. ४
ऐकुनि शक्रोक्त म्हणे केशव, 'अमरावतीस बा ! जातों,
मुनिवर्या ! विदित असे निश्चय तुज हा अभंग माझा तो.' ५
सिंधुतटीं एकांतीं मग देव म्हणे, "पुन्हां मुनिवरा ! जा,
इच्छीना चि सुरांचा कीर्तिमहाशारदी पुनिव राजा[3]. ६
सांग नमन आर्याला आधीं, मग, 'मजपुढें[4] नको राहूं;
कीं म्यां न म्हणावें तुज पौलोमीवदनशशिचकोरा ! 'हूं.' ७
जाण खरा मम निश्चय निश्चळ तव पारिजातनगनयनीं[6],
क्रोध न यावा, आला जरि, संकोच न उरे चि मग नयनीं.'" ८
घेवुनि आज्ञा प्रभुची, स्वर्गातें तो पुन्हा हि जाय कवी,
देवेंद्रातें भेटुनि, कृष्णें कथिलें तसें चि आयकवी. ९
इंद्र गुरुसि[7] तें सांगे, तो त्यासि म्हणे, 'कळों दिला न मला,
केला अविचार कसा? तुज कार्य ज्ञातिभेद कां गमला? १०

---

१ विसावा घेतलेला असा. २. प्रेमरूपी पाण्याच्या. मारवाडांत जसा पाण्याचा दुष्काळ तसा इंद्रहृदयांत प्रेमाचा दुष्काळ होता, असा भाव ३. सुरांचा राजा (इंद्र) मला पारिजातवृक्ष देऊन त्यामुळें शरदृतूंतील पौर्णिमेसारख्या उज्वल कीर्तिला संपादूं इच्छित नाहीं हा मोठा च चमत्कार' ४ माझ्यासमोर [युद्धार्थ] राहूं नकोस, त्यांत तुला यश मिळणें नाहीं ५. पौलोमी (इंद्राणी) तिचें मुख हा च कोणी चंद्र त्यावर निर्वाह करणाऱ्या चकोरा ' म्ह० हे इंद्रा' मीं तुला 'हूं' न म्हणावें [तूं मला आडवा आलास तर तूं वडील भाऊ हें कांहीं मनांत न आणितां मी युद्धास तयार होईन.] अशी तुझी इच्छा असेल तर. ६. नयनीं= नेण्याच्या कामीं. ७. बृहस्पतीला.

गेलों ब्रह्मसभेतें तों त्वां आरंभिलें कसें भलतें?
जें नयविरुद्ध केलें, तें हृदयीं कर्म सर्वदा सलतें. ११
अथवा निजदैवातें लंघी ऐसा कृती नसे कोणी;
जरि वृष उडतो, पडतो, तरि त्यावरि वैश्य लादितो गोणी.'
इंद्र म्हणे, 'आचार्या! कार्य पुढें काय? सांग, तूं सुकवी;
या! गुरु [१]उरुप्रताप प्रारब्धातें हि युक्तिनें चुकवी.' १३
सुरगुरु उगा चि राहे, पाहे सदुपाय, मग म्हणे, 'बा! हे
रक्षीं कृतप्रतिज्ञा, रण चि उचित आजि विष्णुसीं आहे. १४
ससुतें त्वां श्रीहरिसीं आजि करावें चि युद्ध धीटपणें,
साधिन चि कार्य; [२]जाणें जें बक तें हा हि शुद्धधी टपणें.' १५
सुरपतिस असें शिकवुनि, [३]जीव [४]क्षीरोदसागरा गेला,
सांगे कश्यपमुनिला, तो त्याचें स्मरुनि आग रागेला. १६
कश्यप म्हणे, "सुरगुरो! करुनि अहल्याव्रतक्षयें पाप
हा कामी गौतममुनिपासुनि अत्युग्र पावला शाप. १७
'आपण सुरपति, मानुष हा काय?' असें मनांत आणून,
माझी अवगणना त्वां, जरि केली स्वाधिकत्व जाणून, १८
तरि मानुषाचिपासुनि परमभय प्राप्त तुज असो, पापा!"
शापा देता झाला यापरि, पावोनि मुनि महातापा. १९
ज्याच्या शांत्यर्थ असा हा म्यां उद्वास मांडिला, परि तो
दोष पहा आला चि, [५]ध्रुव कर्मविपाक वश जना करितो. २०
येयिन अदितिसह, उभा दोघांमध्यें रणांत राहेन;
अनुकूळ दैव होयिल, तरि, सुत वारुनि, भव्य पाहेन. २१
त्यातें देवगुरु म्हणे, 'समर्थी यावें, तपोधना! आर्या!

१ महाप्रतापी २ जे टपणें (आपली वेळ येईपर्यंत दम धरून सावध राहणें) बक जाणे तें हा हि शुद्धधी (मी बृहस्पति) [जाणें], बकासारखा मी हि तुझा कार्यभाग साधीन, थोडा अवकाश लागेल एवढें च. ३. बृहस्पति; देवगुरु. ४. क्षीर हें च आहे उद (उदक) ज्यात तो क्षीरोद. ५. खरोखर, निश्चयें.

भार्या हे आणावी, सिद्धिसि नेसील या महाकार्या.' २२
म्हणुनि 'अवश्य,' विसर्जी[1] स्वसुतकलहशांतिसादरा[2] जीवा,
कश्यप सदार वदी कैलासीं शंभुपादराजीवा. २३
मारीच स्तवुनि म्हणे, 'शंभो! शरणागतास मज पावें,
अतिवत्सळें तुवां च्चि प्रणता जननीशतासम जपावें.' २४
शंभु म्हणे, 'देतों मीं, चिंती जें इष्ट आत्मजनतां, तें.
त्वां देखिजेल गौतमशाप हि अक्षेम आत्मज न तातें. २५
जें पहिलें, न प्रेम त्यजितिल दोघे हि भक्त मम ते तें;
समजतिल, पुन्हां धरितिल अन्योन्य गुरूक्तसक्त ममतेतें.' २६
दे अभयवर प्रभु, जो पुरुषार्थांच्या[6] समर्पितो वर्गा,
भर्गा नमुनि, न मुनि तो धरि चिंता, जाय कश्यप स्वर्गा. २७
श्रीकृष्ण म्हणे, 'शक्र त्यागुनि नयधर्म सत्य काचा हो.'
मृगयेचें मिष करुनि स्वरथीं घे पुत्र सत्यकाचा, हो! २८
प्रद्युम्नातें 'तूं ये' ऐसें सांगूनि, रैवतीं गेला,
स्थापुनि दारुक तेथें, त्यासीं संकेत केशवें केला. २९
स्मरतां ये गरुड, वसे त्यावरि सात्यकिसमेत कंसारी,
'भक्तीं प्रेम बहु,' असें जाणे तो धन्य होय संसारी. ३०
प्रभु जाय स्वर्गातें, ज्या घेती साधु दास्य मागून:
प्रद्युम्न गगनगामिस्वरथें चाले नभांत मागून. ३१
गेलें निमेषमात्रें श्रीसगुणब्रह्म नंदनवनीं तें,
पुत्रप्रेमें पोषी स्वोच्छिष्टें ज्यासि नंद नवनीतें. ३२
तेथें नानायुधधर होतें सुरवीरसैन्य, हरि त्यातें
न गणुनि, उपडुनि, गरुडीं घे सुरतरु, मान्य होय हरिस्त्यानें.

१ जाण्यास निरोप देई २. मुलांतील कलह मिटविण्यास उत्सुक अशा ३ कश्यप ४ आपली [भक्त] मंडळी ५ वडिलांच्या शब्दास मान देणार ६. धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांना ७ सात्यकी ८. पारिजातवृक्ष हरण करणाऱ्या कृष्णास

तो पारिजात, होवुनि विग्रहवान्, विष्णुला करी नमन,
त्यातें अभय प्रभुवर दे, व्हाया तन्मनोव्यथाशमन. ३४
हाका मारित, सांगों गेले, सोडुनि शक्रवन, माळी.
रक्षक ही जाऊं दे, न करी निजचक्षु वक्र वनमाळी. ३५
त्या पारिजाततरुतें स्पर्शुनि, वाहूनि खगवरीं, उजवी;
श्रीकृष्ण निघे तेथुनि, घालुनि अमरावती पुरी उजवी. ३६
तरु नेला हें कळतां, सुरपति ऐरावतीं गजीं चढला,
कढला क्रोधज्वलनें, सांग हि जरि वेद गुरुमुखें पढला. ३७
ज्या स्यंदनरत्नाचें बहु भय धरि अरिसमाज, यंता तें
आणी सिद्ध करुनि, दे कर, घे वरि हरिसमा जयंतातें. ३८
मागें सुत, शक्र पुढें धांवत ये, कल्पतरुहरा पाहे,
कीं श्रीकृष्ण सुरपुरद्वाराचिपुढें नभीं उभा राहे. ३९
इंद्रासि उपेंद्र म्हणे, 'आर्या! मीं अनुज करितसें नमन.
दिसलें प्रभुचें निष्ठुर बहु बाहिर, आंत परि तसें न मन.' ४०
सुरतरु पाहुनि गरुडीं, क्षोभ तो भेदधी, म्हणे 'हाय!'
मग विभुतें शक्र वदे, 'कृष्णा! वद, हें प्रवर्तलें काय?' ४१
कृष्ण स्मित करुनि म्हणे, 'परमोदारा! सुरेश्वरा! आर्या!
हा वृक्ष तव वधूच्या नेतों मीं पुण्यकाभिधा कार्या.' ४२
शक्र म्हणे, 'मद्धाणी आयिक तूं पुष्करेक्षणा! आधीं,
साधीं कृतप्रतिज्ञा, ज्ञाते न इच्छा प्रवर्तती बाधीं. ४३
मजसीं युद्ध न करितां योग्य नससि तूं वरागमा न्याया;
बा! पण आपण चि कसा लंघिसि? यावा न राग मान्या या.
देवर्षिजवळ केली स्वपणोक्ति तुवां मनांत आणावी,

१. मूर्तशरीरधारी २ उज्वल अर्थात् धन्य करी. ३. सारथि. ४. इद्रासारखा च जो इंद्रपुत्र त्याला ५. भिन्नभाव म्ह० 'मीं' 'तूं' अशी बुद्धि झाली आहे ज्याची असा इद्र. ६. तुझ्या धाकट्या भावजयीच्या (सत्यभामेच्या) ७ पुण्यक-नामक व्रतासाठीं. ८. श्रेष्ठ वृक्षाला (पारिजाताला).

स्वगदा जगदाधारा! आधीं माझ्या उरांत हाणावी. ४५
माझ्या देहासि करीं तूं चि प्रथम प्रहार यदुपा! या
गुरुकीर्तिच्या समजसी सर्वज्ञ गुरुप्रहार सदुपाया.' ४६
ज्याची आज्ञा विधिला बहुमान्या, होय अग्रजाज्ञा त्या;
बाणाहीं हाणावें लागे समरांत अग्रजा ज्ञात्यां. ४७
कृष्णाचे शर तोडी, आपण ही शक्र बाण बहु सोडी,
झोडी त्यांला, प्रभु जो नखरें च खरें च दिव्य यश जोडी. ४८
सोडी या हरिवरि तो, त्या हरिवरि हा हि, जें शरपटळ, तें,
पडतें च वैरें, तरि बा! तपना न म्हणावया 'करप' टळतें. ४९
वाखाणिते शचीच्या 'बहु वत्सळ' म्हणुनि देवरां जग ज्या,
तो भगवान् रिपुवाणी हाणी बहु बाण देवराजगज्या. ५०
गरुडातें हरि हाणी, पावे तो वीर अणु हि न त्रास,
तद्बहुमानाकरितां सोडी एकैक रम्य पत्रास. ५१
गरुडस्थ तरु हराया शक्रसुत जयंत तो करी लगट,
प्रद्युम्नासि हरि म्हणे, 'वारीं या, हा यशा करील गट.' ५२
दारुण संगर करिति प्रद्युम्नजयंत हे चुलत भावू;
कीं रणदर्शनरत जो, स्वनयनयुग धन्य तो डुलत भाँवू. ५३
जो सर्वविध्य तपें सपादी स्वर्गलोक विप्रवर,
हरिसख वृक्ष हराया ये भार्गवशिष्य तो कवि प्रवर. ५४
प्रभु सांगे सात्यकिला त्या प्रवरा वाडवास वाराया,
ज्याचें सख्य सुखप्रद अमृताहुनि वाडें वासवा राया. ५५
युयुधानप्रवरांचे युद्ध हि बहु उग्र काय सांगावें?
या सोडुनि, सिंहगजां, तरि, हंसां त्यजुनि, वायसां गावें. ५६

---

१. मोठ्या यशाच्या. २. वडील माणसांवर हात टाकणें ३. कृष्णास—पंत. ४. [ जर सूर्याशीं ] वैर पडलें-असतें तर. ५. वीर जो कृष्ण त्यास. ६ बाणाला. ७. आनंदानें डुलत मानो—समजो. ८ इंद्रमित्र ९. ब्राह्मणास १०. चांगलें, गोड—निर्णय०.

सात्यकितें हाणुनि खर शर साठ प्रवर विप्र तो भेदी;
त्याचें धनुष्य, सोडुनि सायक, सहसा चि सात्यकि च्छेदी. ५७
युयुधान म्हणे, 'प्रवरा! चाप कशाला? कशास हे बाण?
अहित[१] हि अवध्य भूसुरें[२] यदुवीरांला, यथार्थ हें जाण.' ५८
प्रवर म्हणे, 'क्षांति पुरे, मीं भार्गवशिष्य यादवा! आहें,
बा! हें ऋण सख्याचें वाराया युद्ध, सत्व तूं पाहें.' ५९
शस्त्रास्त्रांतें योजिति दोघे ही कुशळ, शुद्ध. समयज्ञ.
प्रेक्षक सुर मुनि म्हणती, 'लोकांत नसे चि युद्धसम यज्ञ.' ६०
शक्रसुताच्या अस्त्रें प्रद्युम्नाचा जळोनि रथ गेला;
बहु देवमंडळीला झालें आश्चर्य गगनपथगेला[३]. ६१
प्रद्युम्न म्हणे, 'ऐसे रथ मीं निर्मीन लक्ष मायावी;
केली क्षमा चि पाहुनि जिष्णुकडे, जरि हि न क्षमा यावी. ६२
हा तव बळप्रवाहीं, नसता जरि गुरुपदा नत, वहाता.
येयिल यावरि वृक्ष स्पर्शाया ही कदा न तव हाता.' ६३
अस्त्रें च्यार चहुकडे, एक वरि हि अस्त्र, शक्रसुत सोडी;
शमवुनि पांच हि अस्त्रें, प्रभुनंदन साधुवाद वहु जोडी. ६४
प्रवरधनुष्य पुन्हा ही, सात्यकि परम त्वरा करी, खंडी.
हरिदत्ता चापलता धरि तो परकंपदा, जसी थंडी. ६५
शैनेयाच्या[४] तोडी मग विप्र प्रवर तो धनुष्यातें;
देव चि तो शक्रसखा; कैचें सामर्थ्य बहु मनुष्या तें? ६६
युयुधान नवधनुष्यें सोडी शरनिकर; आड वारा या
येवूं न शके, वेधी मर्मीं लक्षूनि वाडवा, राया! ६७
हाणुनि अन्योन्यातें, क्षतजें दोघे हि वीर ते न्हाले,
झाले पुष्पितकिंशुकसम[५] समरीं देव देखतां भ्याले. ६८
द्विज अष्टधारबाणें माधवकार्मुक[६] पुन्हा हि तो तोडी;

१. शत्रु देखील २. ब्राह्मण. ३ आकाशमार्गी असणाऱ्या. ४ सात्यकीच्या.
५ पळसासारखे ६. सात्यकीचें धनुष्य.

सोडी तीन शर, नृपा! सात्यकिचें मर्म हरिसखा फोडी. ६९
करितां सज्य नव धनु, प्रवर गदेनें उरस्थळीं ताडी,
युयुधान चर्म[1] असि घे, खड्ग हि तोडूनि विप्र तो पाडी. ७०
विप्राच्या उत्कर्षें क्रोधावेशें उरांत उलत्यातें
प्रद्युम्न स्वकरींचा समयीं दे दिव्य खड्ग चुलत्यातें[2]. ७१
तो त्या ही खड्गातें प्रवर च्छेदी, तया हि चर्मातें;
मग शक्ति उरीं हाणी, झोंबे व्याळीतसी च मर्मातें. ७२
सात्यकितें विकळ असें जाणुनि, तरुरत्न यश हि तो धवळ
प्रवर हराया भिडवी स्वरथातें त्या खगाधिपाजवळ. ७३
तों उडवी पक्षांच्या सरथ प्रवरासि पैक्षरथ[3] वातें,
विघ्नेश्वर विघ्नातें, त्या तापा रामनाम अथवा तें. ७४
तो सरथ प्रवर द्विज उडुनि पडे दोन कोस दूरवर,
त्यातें स्वरथीं, धावुनि, घेता झाला जयंत शूरवर. ७५
आश्वासिला जयंतें, तो प्रद्युम्नें हि आपुला चुलता,
अत्यद्भुत रणरस हा नसता, तरि रसिक सर्व कां भुलता? ७६
कुरवाळी सात्यकितें वत्सळवर विभु मुखावरुनि हातें,
गेलें कश्मळ[4] सहसा सर्व हि, सोडुनि तया, करुनि 'हा!' तें.
तरुच्या दक्षिण पार्श्वीं राहे प्रद्युम्न वीर रक्षाया,
वामीं सात्यकि; न शके प्रवर जयंत हि तयासि लक्षाया. ७८
एकरथस्थित वीर प्रवर जयंत हि नगार्थ जे आले,
झाले झड घालाया सिद्ध खगेंद्रीं, न लेश ही भ्याले. ७९
त्यांतें देवेंद्र म्हणे, 'येवूं देयिल न हा निकट कांहीं,
यापासुनि अनुभविली अहितांच्या प्राणहानि कटकांहीं. ८०
या माझें पार्श्वद्वय[5] रक्षा, सावध रहा, पहा युद्ध,
क्रुद्ध द्विजराज पुन्हा उडविल; यश मीं च जोडितों शुद्ध.' ८१
ऐसें सांगुनि सुरपति झांकी गरुडासि सायकासारें[6],

१ ढाल. २. सात्यकीस. ३. गरुड. ४. घेरी. ५. गरुड ६ शरवृष्टीनें.

बा! सारें व्यर्थ चिं तें, जलनिधिचें होय काय कासारें? ८२
न गणुनि शक्रशरांतें गांठी पक्षींद्र देवराजगजा,
दोघांचे ही स्वामी हरि, म्हणतें भजुनि 'दे वरा' जग ज्या. ८३
हांसुनि शक्रशरांतें, जावुनि भिडला चि तो सुरगज्यातें;
तेज प्रकटी, भीती स्मरुनि स्वप्नांत ही उरग ज्या तें. ८४
गरुडावरि वेग बहु व्यापारुनि हात कान नीट करी;
धीट करीश्वर हाणी त्या, वप्रा जेंवि काननीं टकरी. ८५
शक्रें ही गरुडावरि कोपुनि तो नागराज बा! हुलिला;
वेगांत पहाल्यांच्या दिसला स्थानाविना न बाहुलिलों. ८६
दंतकराघातांतुनि, हाणुनि मर्मस्थळांत चचु, निघे;
कंठ असाया ओला, जाणों तद्रक्त, त्यासि वंचुनि, घे. ८७
करिती फार चि अद्भुत युद्ध गजेंद्र द्विजेंद्र दोन घडी;
प्रभुकेलिमोहरांतें व्यास कवि, क्षुद्र अन्य होन घडी. ८८
हा ही हस्ती हाणी शुंडादंडें धबाधब तयातें,
देवर्षि म्हणे, 'पुण्यें सामर्थ्य दिलें अबाध बत! यातें?' ८९
हा हाणी पक्षाचे बहु फडफड पक्षिराज फटकारे,
तेव्हां देवर्षि म्हणे, 'साधु! सखे! साधु! दैत्यकटकारे!' ९०
नखरांकुशधरचरणें गरुड द्विरदासि मस्तकीं ताडी,
त्या पारियात्रगोत्रीं सहसा मूर्छित करूनि तो पाडी. ९१

---

१ थमरून—टवकारून. २. सोंड. ३. मातीच्या टेंकडास ४ अगावर सोडला ५ पहाल्याच्या (पाहणाराच्या) बाहुलिला (डोळ्याना, दृष्टीस) [तो] वेगात (अतिशय वेगानें धावत असता) स्थानाविना (स्थान सोडल्यावांचून) न दिसला अत्यंत वेगवान् पदार्थ स्थानस्थित दिसतो हें अनुभवसिद्ध आहे ६ कर=सोंड; आघात=प्रहार. ७ पराक्रमी वीराच्या क्रीडारूप मोहरा (सुवर्णाचीं नाणीं) घडण्याचें सामर्थ्य फक्त व्यासासारख्या कुशल कारागिराचें च. बाकीच्यानीं होनासारखीं हलकीं नाणीं च घडावीं ८. आश्चर्यद्योतक अव्यय. ९. दैत्यसैन्याच्या शत्रो! १० नखरूपी अंकुश असणाऱ्या पायानें. ११ पर्वतावर.

स्वर्गोपासुनि पडतां देवगजातें न वृत्रहा सोडी,
गोडी त्याच्या सुगुणीं बहु, ऐसी प्रीति आश्रितीं थोडी. ९२
काळ हि देना, पोतां यज्ञाभा सिद्धपारिया, त्रास,
त्या खगवर घेवुनि ये, पडतां गज विद्ध पारियात्रास. ९३
त्या पारियात्रगोत्रीं होतां तो सावधान शुद्ध करी,
पुनरपि शस्त्रास्त्राहीं जगदीशासीं सुरेश युद्ध करी. ९४
वज्रेंकरुनि करी तो जों जों शक्र प्रहार रागानें,
तों तों पत्र खगानें सोडावें एक भूरिभागानें. ९५
सर्वावध्य महाबळ पक्षीश्वर एक पत्र जें सोडी,
तें पविबहुमानार्थ चि; थोरा परमानरक्षणीं गोडी. ९६
गरुडें गिरि आक्रमितां धरणींत शिरे, महाभरें दडपे;
जेंवि जळीं नाव बुडे शिखरसहित लोपले कडे खडपे. ९७
किंचिच्छेष विलोकुनि गिरितें, प्रभु गरुडसह नभीं राहे;
प्रद्युम्नासि म्हणे, "जा, दारुक रथयुक्त रैवतीं आहे. ९८
जा द्वारकेंत सत्वर, भेटुनि कुकुराधिपास आर्यास,
सांग, 'उद्यां येइन मीं जिंकुनि सुरपतिस, करुनि कार्यास.' ९९
दारुकसह रथ घेवुनि ये, मत्तेजेंकरूनि हो युक्त"
प्रद्युम्न निघे सत्वर, ऐकुनि निजजनकविष्णुचें उक्त. १००
गेला क्षणांत, आला उक्त करुनि, वररथासि आणून,
बसला स्वरथीं भगवान्, गरुडभरें भग्न अद्रि जाणून. १०१
जेथें बसुनि निजगजीं शक्र म्हणे, 'द्वारकेसि हो त्रास,'
स्वरथीं बैसुनि गेला यदुनायक पारियात्रगोत्रास. १०२
अद्रि म्हणे, 'प्रभुरथ सुखगति हो; न घडो प्रभुप्रभावज्ञा;'

---

१ मारून सिद्ध केलेल्या पारियात्रला २ महाभागानें ('खगानें' याचें विशेषण) ३ बळरामास. ४ बिनहरकत आहे चाल ज्याची असा. ५ प्रभु कृष्णाच्या पराक्रमाची अवज्ञा

धरि शाणपादसमता, बहुमानी त्या प्रभु प्रभावशा. १०३
प्रभुमार्गं गरुड नभीं, त्यावरि तो पारिजात रक्षाया
वैदर्भीसुत, सात्यकि, कोणी न क्षम जयासि लक्षाया. १०४
अस्तातें रवि गेला, तरि पाहुनि शक्र संगरा सिद्ध.
योजी युद्धोपरमा प्रभु जाणुनि देवनाग तो विद्ध. १०५
इंद्रासि म्हणे, 'आर्या! या चि धरेचा धरूनि सग, रहा.
रवि मावळला, झाला विद्ध गज, उद्यां घडेल संगर हा.' १०६
शक्र 'अवश्य' म्हणे, मग उतरे पुष्करसमीप तो रात्रीं,
जींत वसे, सावरणा करि गिरिनीं ती सभोंवती धात्री. १०७
ब्रह्मा, कश्यप, अदिति, त्रिदश सकळ ही, तया स्थळीं आले;
ते हि मिळाले तपते, सेवुनि जळ, वात, वाळले पाले. १०८
श्रीकृष्ण पारियात्रीं राहे, त्या पुण्यपर्वता पावे.
जड हा नम्र निवावे, ज्ञाते हि अनभ्र सर्व तापावे. १०९
'हो परमरम्यकानन, हिमगिरिपुण्यार्धकीर्तिपद लाहें,
हो शाणपादनामा,' त्या गिरिला देवदेव वदला हें. ११०
देवुनि बहु वर गिरिला, ज्या ध्यातां जन कधीं न भंगे, तें
शिवपदकमळयुग नमुनि, अच्युत चिंती मनांत गंगेतें. १११
आली श्रीविष्णुपदी, श्रीकृष्णें जी मनांत आठविली:
'आलों' हें कळवाया प्रथम प्रभुनें चि काय पाठविली. ११२
गंगेंत स्नान करुनि, गंगोदक बिल्वपूजना स्थापी,
बा! पीतपट प्रभु त्या चिंती, ज्याच्या यशें तरे पापी. ११३
सर्वेश्वरेश्वर प्रभु झाला बिल्वोदकांवरि प्रकट,
वरदवर, दयासागर, देणारा सर्व आपणासकट. ११४
ज्याहुनि न शिवा सदया, काय म्हणावें मग 'प्रसू नाहीं'?

---

१ पाऊल नीट पडल अशा प्रकारचा शाणाचा (=शिळाचा) सारखेपणा, सपाटी–निनळपणा–निर्णय० २. युद्धाच्या समाप्तीला ३ पृथ्वीचा–अर्थात्–जागेचा ४. आवरणसह (कोट–तट–युक्त) ५. जागा, धरा ६ गगा ७. शकरानें. ८ पार्वती

श्रीशिवभक्त श्रीपति पूजी त्या सुरनगप्रसूनाहीं. ११५
‘तव हेति कीर्ति अतुळा, करिति जना पूर्णकाम रुद्रा! ज्या.
नसतासि परम वत्सळ, करितासि न चूर्ण कां मे[1]रुद्राज्या?
आघातें सांकळतें, त्वद्भक्त न तत्समान सांकळलें;
वत्सळगुरु तूं; हें, तव कीर्ति सुरभि, वत्समानसां कळलें.
झालासि नीलकंठ प्रभु तूं, जड सुकवि म्हणु न कां पविला?
लोकीं स्वयश उराया जेणें तव कंठ अणु न कांपविला. ११८
मीं, ब्रह्मा, अदितितनुज, दनुज, मनुज ननु जगत्पते! शर्व
झाले तुजपासुनि, बा! किंबहुना तूं चि विश्व हें सर्व.’ ११९
दक्षिण कर करुनि पुढें, शंकर भगवान् म्हणे, “स्वनगरा जा,
होसिल सिद्धमनोरथ; नेसिल तूं पारिजातनगराजा. १२०
मज बहु रुचतें भाषण भक्ताचें; भक्त कीर, मैना कीं;
तूं मत्प्रसाद वांछुनि, पूर्वीं तपलासि धीर मैनाकीं. १२१
‘अजित, अवध्य, मजपरिस शूरतर त्रिभुवनांत होसील,’
मैनाकीं वर दिधले; सत्य चि यश मत्प्रसाद पोसील. १२२
[3]सिद्धोपयाचन प्रभु नामें ‘विल्वोदकेश्वर’ ख्यात,
मीं या देशीं वसतों, ताराया भक्तजन असंख्यात. १२३
होयिल या गंगेचें ख्यात ‘अविंध्या’ असें जगीं नाम;
स्नातांचे पुरविल हे, दूर करुनि ताप, सर्व ही काम. १२४
धरणींत दानवांचें नामें ‘षट्पुर’ वसे महानगर,
स्पष्ट ज्येष्ठ गमे हें, याहुनि दुःसहपणें लहान गर[4]. १२५
हे दानव देवांला ब्रह्मवरास्तव अवध्य आहेत;
नररूपें देवांचा तूं पुरवीं ‘हे मरोत’ हा हेत. १२६
स्मरुनि वर, स्थैर्य धरीं; गातिल सुर हे तुतें; विशंक रहा.
चातकतृप्तिस मेघ, श्रिततृप्तिस हेतु तेंवि शंकर हा.” १२७

---

१. रुद्राला २ बरोबर ३ सिद्ध (पूर्ण) होतात उपयाचनें (वांछा) ज्याच्यामुळें असा. ४. विष

ऐसें श्रीकृष्णातें साधूंचा साधु सोयरा शिकवी
आलिंगुनि, गुप्त नृपा! होय कृपाकीर्तितोयराशि कवी. १२८
प्रभु गिरिसि म्हणे, 'पिडिले सुर असुरांनीं तुझ्या अधःस्थानीं,
तू रोधिलासि बापा! त्यांचा या व्हावया वध स्थानीं. १२९
देवावध्य असुर हे ब्रह्मवरें मत्त जाहले असती,
द्वारनिरोधें कोंडुनि, केली म्यां या तुझ्या शिरीं वसती. १३०
चढुनि तव शिरीं, जन जे मद्रूपातें नगा पहातील,
गोदानसहस्राच्या शुभ पुण्य फळासि ते लहातील. १३१
पूजील तव शिळेची करवुनियां भक्तिनें जरि प्रतिमा,
जनता पावेल सुखें मद्गति, जसि पावली हरिप्रति मा.' १३२
हा वर जाणुनि, सुकृती प्रतिमा या पुण्यकीर्तिपात्राच्या
करवुनि भजति शिळांच्या वैकुंठोत्कंठ पारियात्राच्या. १३३

---

# अध्याय एकुणतिसावा.

बिल्वोदकेश्वरातें नमुनि, रथीं चढुनि. अजित हरि हरितें
हटकी, आठवि नातें, निजशार्ङ्गधनुष्य सजित हरि! हरि! तें.
स्वरथीं ससुत हरि चढे, होवुनियां युक्त अमरसेनाहीं;
नारद म्हणे, 'संमिति! तुजसम कुतुक अनन्यसमरसे! नाहीं.'
प्रभु शरपटळें झांकी गुरुसि, म्हणे, 'मलिन हा पतिद्रोहें
पाहो ना; तूं न तसा, घडली माझी तुला गति द्रो! 'हें.' २

---

१. तोयराशि=समुद्र. २. खालीं (पट्टणात) राहणाऱ्या. ३. जाण्यायेण्याचा मार्ग अडवून. ४. वैकुंठी उत्कंठा ज्याम–**पंत.** ५ रणदेवते! ६. असाधारणानंदे! –**पंत.** ७ वडील भावाला (इंद्राला). ८. द्रो! (हे पारिजातकवृक्षा!) हा मलिन (दुष्ट, पापी) पति (तुझा पूर्वीचा धनी, इंद्र) [तुज] द्रोह (द्वेषानें) ना पाहो, [कारण जरी] हें (हे?) माझी गति (सगति) तुला घडली [तरी] तू तसा न (माझ्यासारखा तू इंद्रुशत्रू नव्हेस)

शक्र हि तेव्हां कोपें झांकी प्रभुच्या रथासि रोपानीं;
कवि म्हणति, 'यत्कथांच्या चित्त,धरुनि सत्पथा सिरो, पानीं.'
याची त्या त्याची या हेति[1] न, उरवायया न यश, हानी:
जाय जवें, हळु च सिवे, सुकर्मींचा जाणती नय शहाणी. ५
शक्राच्या एकैका हाणी दश दश सुबाण अश्वास;
असते कुबाण, तरि ते घेवूं देते तयासि न श्वास. ६
शैब्यादि[2] भगवदश्वप्रवरांतें शक्र शरगणें ताडी,
तो[3] सरळ, सुवृत्त, सुगति, हरिवाहकहरिशरीररज[4] झाडी. ७
हरिहय[5] म्हणति हरिशरा[6], 'यन्नामें नित्य पाप लक्ष तरे,
तत्संश्रितांसि म्हणतां कवि, 'करूं, धरुनि चापल, क्षत?' रे!"
कोणी रक्त हि काढी शर, तो बहुमानिला तिहीं व्यक्त,
तें[7] अर्थिदानें; हरिचे[8] जे त्यासि अभक्त ही जसा भक्त. ९
प्रभु देवगजीं, अचळीं जेंवि जलद जळ, तसे चि शर विखरी.
झाला मदांत[9] वंश, यश बुडवाया, हा अनीति करवि खरी. १०
परि करुणा, नाहीं तरि लागति केव्हां चि अभ्रमु रडाया,
घे अभिमुख प्रहार हि, चुकता मार्गी न दभ्रें[11] मुरडाया. ११
स्पर्शुनि पवित्र झाले, जे शक्रें प्रेषिले बळें पत्री.
पत्रीश्वरापुढें[12] किति? न त्रिजगीं विप्रवर जसा अत्री. १२
भूगतहरिसमरींचा[13] दिवस गमे जेंवि एक हायन[14], हो!
मुनि जपति, म्हणति, 'लोकीं शोकमहागरळसेक हाय! न हो.'
भूकंपप्रमुख परमभयद महोत्पात जाहले शतशा,

---

१ 'हेति'चें विशेषण २ शैब्य, सुग्रीव, मेघपुष्प आणि बलाहक हीं भगवंताच्या चार घोड्यांचीं नावें ३ शरगण ४. कृष्णाला वाहून नेणाऱ्या घोड्याच्या अंगावरील धूळीला ५. कृष्णाचे घोडे. ६ इंद्राच्या बाणास ७ याचक ( ते इंद्रबाण ) त्यांना दिलेलें रक्तदान. ८ हरीच्या दासांना भक्त व अभक्त हे सारखे च वाटतात ९. मदोन्मत्त. १०. हत्तीला आलेला मद ( मस्ती ) ११. अल्पबल ( ऐरावत ) १२. पक्षीश्वर गरुड. १३ भूमीवर उतरलेल्या जिष्णुविष्णूंच्या युद्धाचा. १४ वर्ष.

कीं न प्रवर्तले ते निकरा गजपक्षिवाह लेश तरा. १४
तों विधि म्हणे, "म्हणो न त्रिभुवन, विसरुनि वचा शुभा चिर 'हा!'
जा, कश्यपा! वधूसह पुत्रांच्या अंतरीं उभा चि रहा." १५
कश्यप म्हणे, 'अवश्य;' स्त्रीसह ठाके सुतांचिया मध्यें,
ज्यां दोघां परिपाल्यें साधुकुळें, खळकुळें सदा वध्यें. १६
स्वरथावरुनि उतरले, ठेवुनि धनु, पाहतां चि पितरांतें,
अत्यद्भुत भाग्य जगीं बा! त्यांचें जें, नसे चि इतरां तें. १७
इंद्रोपेंद्र पित्यातें मातेतें वंदिती; तया आशी
दे कश्यप, अदिति सती, भव्याच्या ज्यांत नांदती राशी. १८
अदिति, कर धरुनि, बोले, "सुज्ञांचे वत्स हो! तुम्हीं राय,
स्वल्पार्थे असोदरसे कां करितां कलह? योग्य हें काय? १९
ताताचें मातेचें ऐकावें, धर्म होय तनयाचा;
तरि अस्मत्सूक्त करा, बा! यांत नसे चि लेश अनयाचा. २०
सुत हो! तुम्हां म्हणोत 'व्यसनीं अन्योन्य उद्धरा' हो रे.
द्या आम्हां हें, अस्मत्प्रीत्यर्थ व्यर्थ युद्ध राहो, रे!" २१
नारद म्हणे, "म्हणा 'हूं.' स्वगुरुवचन होय मत नयशातातें.
द्यावें वचनकराला प्रेमें सर्वस्व, वतन, यश, तातें." २२
म्हणुनि 'तथास्तु,' कलहमति तत्काळ चि विष्णु जिष्णु ही सोडी,
करुनि दिली मातेनें किंवा श्रीशिववरोक्तिनें गोडी. २३
प्रिय कश्यपादि यांचा ज्या देशीं सिद्ध जाहला काम,
'प्रियसंगमन' असें त्या स्थानाचें सुमुनि ठेविती नाम. २४
गंगास्नान कराया जातां श्रीविष्णुसीं वदे शक्र,
'देवुनि सुरराज्य मला, बापा! होतोसि तूं कसा वक्र?' २५
गंगेंत स्नान करुनि, येवुनि पितरांसमीप, वनमाळी
अभय हरिस दे. कंटकदोषें सुकवील काय वन माळी? २६

---

१. कधीं हि—पंत. २. घोर युद्धाला. ३ इंद्र व कृष्ण. ४. मध्यें. ५. प्रतिपाळ करण्यास योग्य ६. सुमुहूर्त. ७. सलोखा.

ब्रह्माद्यमरगणांसीं भेटुनि, मग पितृनिदेशवशचित्तें
अग्रजसहितें केलें तातविमानें चि यान मुनिवित्तें. २७
स्वर्गातें प्रभु गेला, कैसा 'नाहीं' म्हणेल मातेतें?
गुर्वाज्ञागीतिहरिण होतें सद्पत्य, जें न मातें तें. २८
एक दिवस झाल्यावरि, अदिति म्हणे वासवानुजा कृष्णा,
'ने पारिजात; बा! तव दयितेची पुण्यकें पुरो तृष्णा.' २९
जनकातें, जननीतें, देव नमी, जिष्णुतें, शचीतें ही;
ख्याति जगीं, भक्ता जें प्रिय सगुण ब्रह्म, तें रचीतें ही. ३०
प्रार्थुनि शक्रासि, शची प्रभुच्या सोळा सहस्र भार्यांतें
दिव्यांबर भूषण दे, जें प्रियकर योग्य होय आर्यां, तें. ३१
आला रैवतकाला, कालाहिमदघ्न राहता झाला,
धाडी सात्यकिस पुरीं, कळवाया विजयवृत्त हें त्याला. ३२
सात्यकि पुरासि जावुनि, भगवद्यश कथुनि हर्ष देवून,
पुनरपि रैवतकीं ये, सर्व हि यादवकुमार घेवून. ३३
उष्णकर न झांकावा द्वारवतीमाजि कां पताकांहीं?
वैकुंठलोक ही, ती शोभा पाहोनि, कांपता कांहीं. ३४
द्वारवती बहु शोभासंपन्ना जेंवि नृपतिची महिला,
तींत सुरद्रुम घेवुनि गरुड प्रद्युम्नसह सिरे पहिला ३५
त्यामागें प्रभु चाले, मग सात्यकि, सांब हे तयामागें.
जन म्हणति, 'हरि च सुरतरु, हृदया! हो पूर्ण हेत, या मार्गें.'
जन आनर्तनिवासी हर्षें पाहोनि दिव्य नग, नाचे
जयजयकारें तेव्हां भरले अवकाश गेहगगनाचे. ३७
तो कल्पतरु पहातां, वृद्धांची तत्क्षणीं जरा गेली;
अंधा गंधानें ये दृष्टि हि, तन्नियति ही न रागेली. ३८

---

१ गमन. २. मुनींचें वित्त जो कृष्ण त्यानें. ३ गुरूची आज्ञा हें च गायन, त्यास वश असणारें हरिण [ त्यासारखें ] ४. कालियासर्पाचा गर्व नाहींसा करणारा कृष्ण. ५. सूर्य ६. त्याचें दैव.

कर्मींचे तरुगंध न बंधन उरवी जना सरोगातें;
नीरोग करि, म्हणे, 'जें इष्ट न वाटे मना, सरो गा! तें' ३९
देवःसीं स्पर्धाया वृद्ध हि, होवुनि युवा, सजे. पिके ते
शुभ्र तया वृक्षवरीं अन्यत्र सकळ सुवास जे पिकेते. ४०
झाले जन वाद्यांहीं रोमांचितरुचिरकाय गेयांहीं;
देवी म्हणति, 'कळेना केलें तप सुचिर काय गे! यांहीं.' ४१
पितरांतें, राज्यातें, प्रभु सुखवी, पाय नमुनि, रामातें;
दे यश सतीस चुकुनि हि, बहु पावे काय न मुनिरामा तें? ४२
ती नमुनि म्हणे, 'प्रभुजी! दास्य चि, तारावयासि सत्या, द्या.
श्रीचरणाहीं केली हे धन्या, जेंवि शक्ति सत्याद्या.' ४३
'आच्छादी पुर केव्हां, केव्हां तरुराज होय करहार्य,
अंगुष्ठमात्र केव्हां प्रभुसंकल्पें,' असें कथिति आर्य. ४४
जय मेळविला, ज्याच्या सुगदेसीं करुनि समर, न गदानीं,
तो प्रभु सहाय, मग कां न धरिल ती हृदय अमरनगदानीं? ४५
सत्या अत्यादृतमति वदली, 'साहित्य पुण्यकाचें हो.'
प्रभुनें सर्व हि केलें; काय तिचें पूर्वपुण्य काचें हो!? ४६
द्याया निजदान, प्रभु चिंती श्रीनारदा सुपात्रास;
होय अलेपा सिवतां, न सलेपां वंशजां सुपा त्रास. ४७
स्मरतां चि सुधर्मज्ञ प्रकटे मुनिराज नारद नयज्ञ,
ज्याचे शुचि फळ देती स्वसम दयाभाजना रदनयज्ञ. ४८
पूजुनि मुनि, भामेसह विभुनें प्रार्थुनि सदन्न जेववीला,

---

१ कोकिळ. २. उत्पन्न होतात, आढळतात ३. गायनानीं. ४. तिच्या हातून चूक घडली असतां हि, सवतीमत्सरानें भलत्या च गोष्टीबद्दल सत्यभामेनें हट्ट घेतला असता हि ५ अहल्या—**पंत.** ६. सतींत आद्य शक्ति जगदंबा—**पंत** ७. हात पोचण्यासारखा. ८. इच्छेप्रमाणें ९. कल्पतरू देण्याच्या कामीं. १०. अतिशय आदरयुक्त बुद्धीची ११ सारविलेल्या. १२ वेळूपासून केलेल्या. १३. दंतरूप यज्ञ—**पंत.**

त्याकारणें स्वसह तरु सत्येकरवीं यथोक्त देवविला. ४९
त्या सुरतरुसीं बांधुनि तत्पुष्पांच्या चि मान दामानें,
देवी देती झाली देवाद्या दान मानदा मानें. ५०
तिल, सर्व धान्य, कांचन, रजत, सुमणि, पर्वत द्रुमासहित,
ती गोसहस्र ही दे. जन्महित जगांत जें चि सन्महित. ५१
मुनितिलक ज्या मुहूर्तीं आला, त्या साधुजन घेवाड वदे;
करुनि विनोद, क्षण भयें सत्येला परम अनघ बांडव दे. ५२
मुनि संप्रहृष्ट होय, स्त्रीवद्ध त्या त्रिलोकभर्त्यातें
लीलेनें मुक्त करी आपण, जीवांसि मुक्त कर्त्यातें. ५३
प्रभुसि म्हणे, "कृष्णा! तूं भामेनें मज दिलासि जोडून
बहुतांसमक्ष विधिनें, संकल्प करून, उदक सोडून. ५४
वा! यावरि तूं माझा, ये मजमागून सद्धना! चाल.
जीवांसि म्हणेन, 'मुढा, किति होवुनि विषयबद्ध नाचाल?'
जें सांगेन तुला मीं स्वामी, तूं तें समग्र कार्य करीं:
होसिल याहूनि सुखी: भाग्यें आलासि आजि आर्यकरीं." ५६
देव म्हणे, 'साधूंची आलों सेवा करीत सेवकसा,
हें च मज रुचे, स्वामी! दावा कैलासवासि देव कसा.' ५७
करि तें तें देव, म्हणे, 'चित्ता! हें यश चि, एवमस्तु, सदा.'
आज्ञा करूनि, नेववि, घेववि, मुनि पादुकादिवस्तुस दा. ५८
तो ज्ञानि भक्त गुरुवर विश्वाच्या भाग्यपुण्यपुंजातें
द्वारापावेतों ने, जेंवि उपाध्याय सोडमुंज्यातें. ५९
क्षणभरि करुनि विनोद, प्रभुकंठांतील काढिलें दाम,

---

१ कृष्णाचा गळा. २. माळेनें ३ एका अत्यंत शुभदायक मुहूर्ताचें नाव. ४ 'दान घेतलेल्या कृष्णाला मी आतां परत देत नाहीं' अशा तऱ्हेचें भाषण करून भय दे ५. बांडव=ब्राह्मण. ६. साधुजनांच्या सर्वस्वा! ७ भर्त्याच्या हातीं. ८. एवं (असें च) अस्तु (असो). ९. सौभाग्याचा पुण्यकारक समूह—साठा—जो कृष्ण त्याला.

ज्याचे[1] म्हणति, 'यशोदे! वेड्यानीं, अमृत, जोडिलें दाम.' ६०
'झाले[2] दश पुत्र जनकगुण, कन्यारत्न भव्य अकरावें,
स्वस्था रहा, पहाल हि; दत्तपुत्रग्रहण काय न करावें?' ६१
कपिला धेनु सवत्सा तुचली पद दोह ज्यारदा[3] करितां;
दे तिलपूर्ण सकांचन कृष्णाजिन आत्मनिष्क्रयाकरितां. ६२
हा निष्क्रय जगदीशें श्रीरुद्रें योग्य कल्पिला आहे,
बहु निःसंगोपासन दुष्कर, तुज युक्ति सोडवू बा! हे. ६३
भक्तिवश श्रीवल्लभ, सांगे मुनिराज, ती च गोठि करी.
सत्कीर्ति कृष्णकीर्तिस रुचि दे, कैथिकेसि जेंवि! हो ठिकरी.
श्रीकृष्ण द्रवुनि म्हणे, 'बा! तूं मत्प्रीतिकेलिसदन मुनी,
दुर्लभ वर मागुनि घे, देतों, ज्या त्यजि न कीर्ति, पद नमुनी.'
नारद म्हणे, "मुकुंदा! 'माग चि' म्हणतोसि 'वर' मला काय.
'भेद[4]व्यवहार नसो, साधूंचा यांत बरमला काय. ६६
तव सालोक्य[5] घडो, हा विप्र अयोनिज,' असा च वर दे हा.
ब्रह्मज्ञ[6] सार्वभौम न हें स्वीकारिल कसा चवर देहा?" ६७

---

१. ज्याचे (ज्या भगवताचे भक्त) म्हणतात—हे यशोदे! [त्वा] अमृत जोडिलें; व वेड्यानीं दाम (द्रव्य) जोडिलें; म्ह० यशोदे! तू धन्य आहेस; कारण, तू भगवताची जोड संपादिलीस, इतर वेडे लोक द्रव्य संपादण्याच्या कामीं झटत आहेत. २. ही गीति मूळ हस्तलिखित प्रतींत ५८ व्या गीतीनतर आहे. परंतु संदर्भावरून इलींच्या ठिकाणीं च ती असली पाहिजे असें दिसत असून निर्णयसागरी प्रतींत हि ती या च ठिकाणीं आहे. झाले=झालेले, हा आर्यार्धे पुढील आर्यार्धांतील 'पहाल हि' याचें कर्म. ३. कढीला. ४. कोठें हि भेददृष्टि नसावी; सर्वत्र समदृष्टि असावी हा वर दे. कारण या च गोष्टींत सर्व साधुसंतास खरा आनंद आहे. किंवा, जी भेददृष्टि पाहून साधूंना लज्जा उत्पन्न होते ती भेददृष्टि कोठें हि नसावी हा वर दे. ५. सलोकता नांवाची मुक्ति. ६. हें सार्वभौम चवर (सलोकता मुक्तीमुळें मिळणारें ईश्वरासीं सान्निध्य हें च सार्वभौमसत्तादर्शक चिह्न) देहा (स्वतःकरितां) ब्रह्मज्ञ (खरा ब्रह्मज्ञानी) कसा न स्वीकारिल?

श्रीकृष्ण म्हणे, 'सुज्ञा! जें आवडलें, दिलें असो दे हें.
बा! आम्हीं सर्वस्वें जैसे तैसे तुझे असों देहें.' ६८
आमंत्रुनि सत्यें सर्व श्रीकृष्णदार जेवविले,
दिव्यपटालंकार स्वकरें हरिदत्त त्यांसि लेवविले. ६९
सुरतरुसंपत्कौतुक देखाया कृष्ण सोयरे वाहे,
ते आप्त म्हणति, 'योग्या रीति तुझी तुज चि होय रे! बा! हे.'
पुत्रस्नुषासह पृथा आली, ते ही श्रुतश्रवा[1] ससुता.
भीष्मक हि ससुत ये, [2]ते आले सुहृदां जयां दिली असुता. ७१
श्रीकृष्ण प्रभु सार्जुन सांतःपुर बहु सुखें सदा रमला,
गमला मंदरसुरतरुवनविहितविहार हर सदार मला. ७२
कृष्णें नेला स्वर्गीं तरुवर ठेवूनि एक वत्सर तो,
अदिति म्हणे, 'वा! याच्या संपत्तीसीं महेंद्र वत्स रतो. ७३
बंधुत्वीं [3]वर्धिष्णु स्नेह असो.' प्रभु म्हणे, 'महाभागे!
करिल जसें म्हणसी तूं, गुर्वाज्ञा वाहतां न हा मागे.' ७४
आज्ञा घे पितरांची, निघतां तेथूनि, करुनियां नमना,
नमुनि पुसे स्वभुजांहीं कृष्ण ज्येष्ठासि धरुनि या[4]नमना. ७५
केशव शक्रासि म्हणे, 'आज्ञा केली शिवें मला कांहीं,
ज्याच्या कीर्तिमराळा लाजावें परयशोबलाकांहीं. ७६
त्या पारियात्रशैलाखालें भूमींत असुर आहेत,
विधिवरमत्त वधावे ते म्यां, श्रीशंभुचा चि हा हेत. ७७
मानुषदेव असावा एक, दुजा देवपुत्र, तन्मरणा
प्रवरजयंत सहाय प्रेमें द्यावे; [5]मदीय जन्म रणा.' ७८
म्हणुनि 'अवश्य' सुरेश्वर, अमृतसमुद्भव किरीट दे हरितें,
तैसें चि सुकुंडलयुग, कृष्णार्चनहीन गेह देह रितें. ७९
प्रभुयोगें स्वर्गाहुनि बा! सरस द्वारकापुरावास.

---

१ शिशुपाळमाता २ ज्या मित्रांना असुता (पंचप्राण) दिला (मानिले) ते जिवलग मित्र आले. ३. वाढणारा ४. गमनोत्सुक ५ रणार्थ जन्मलों—**पंत.**

'एक चि' म्हणे 'अमित ही वासर' सद्वार 'कापुरा वास.' ८०
श्रीरुक्मिणी पुसे, मुनि सांगे पुण्यक, कथूनि उत्पत्ती;
कीं तो वर कवि, पर कवि; मारुतिसम होय काय उत्पत्ती ? ८१
"देवी उमा भगवती प्रकटी सद्व्रतविधि स्वयें पहिला;
आमंत्रिलया तिणें त्या आल्या समयीं पतिव्रता महिला. ८२
दक्षसुता अदितिदितिप्रमुखा, तैसी च ती शची देवी;
जी रोहिणी प्रियतमा सोमाची पतिपदें सदा सेवी. ८३
जी रेवती गुणवती, जी पूर्वाफल्गुनी तपःसक्ता;
जी शतभिषा, मघा, या सर्वा हि पतिव्रता उमाभक्ता. ८४
गंगा, सरस्वती, रविकन्या, वेणा, तसी च ती गोदा,
वैतरणी, पुण्यनदी सुजना जी गंडकी हि दे मोदा. ८५
अन्या हि नदी आल्या, लोपामुद्रा पतिव्रता आली,
अद्रिसुता, वह्निसुता, प्रकट स्वाहा हि ते स्थळीं झाली. ८६
आली श्रीसावित्री, धनदाची स्त्री, तसी च वरुणाची,
आली यमधर्माची महिषी देवी अपारकरुणाची. ८७
वसुभार्या ही, श्री, धृति, मति, आशा, प्रीति, कीर्ति, मेधा, या
ख्याति हि, सन्नति हि, तयां श्रीदेवी सुबहुमान दे धाया. ८८
देवुनि रत्ननग, मला अवसानीं स्वव्रताचिया आर्या,
देवर्षिसिंधुपर्वत यांच्या पूजी पतिव्रता भार्या. ८९
व्रतविषयकथा त्यांत प्रथम निघाली, पतिव्रता सर्वा
म्हणती अरुंधतीतें, 'पूस, कथिल तत्व भगवती शर्वा.' ९०
व्रतविधि अरुंधतीनें पुसिला, सांगे स्वयें उमा पतिचा

---

१ सद्वार (साधुसमुदाय) कापुराला नेहमी च एक चि (एकसारखा) वास असतो असें सांगतात. प्रभु स्वर्गी असला किंवा द्वारकापुरींत मृत्युलोकीं असला तरी त्याचें ऐश्वर्य व त्याच्या संगतीचा परमानंद हा सर्वत्र सारखा च असावयाचा. २. पर (इतर) कवि (नावाचे कवि). ३ मूळ पाठ—**मारुति होयील** ४ गगनीं उडाला प्यादा—**पंत.** एखादा मोठी उच उडी मारणारा झाला तरी त्याच्या व मारुतीच्या उडीची बरोबर होईल काय ? ५. संतुष्ट करण्याकारितां ६. पार्वती.

मुख्य प्रसाद, पुण्यकविधि ही, प्रेमा व्रतीं उमाप तिचा. ९१
'बायी! अरुंधति! सदा सर्वज्ञा मीं पतिप्रसादानें;
दे पति च; सतीस इतर सर्वार्थांचीं न दे असा दानें. ९२
प्रभुनें व्रतविधि कथिला; त्यां हि ज्ञानें विलोकिला भव्य;
श्रवण करीं, तुज कथित्यें, व्रतविधि हा प्रकट जाहला नव्य.'"
देवर्षि म्हणे, 'रुक्मिणि! जें तत्व उमा अरुंधतीस वदे,
तें श्रवण मला घडलें, श्रवणें ही पुण्य जें जसा सव दे.' ९४
ऐसें म्हणोनि, नारद आपण ही रुक्मिणीस आयकवी,
तें मूळीं च पहावें, विस्तर भाषेंत करिल काय कवी? ९५

---

# अध्याय तिसावा.

असुरांतें भस्म करी त्रिपुरासह अस्त्रपावकें त्र्यक्ष,
दैवें प्रधान उरले जे संख्येंकरुनि साठ, ते लक्ष. १
जंबूमार्गीं तपले, त्यांच्या विधि नाठवूनि परमागा,
होय प्रसन्न, भगवान् तो त्यांसि म्हणे, 'अभीष्ट वर मागा.' २
असुर हरद्वेषी वर न वरिति हरपरिभवाविणें इतर;
त्यांसि म्हणे, "मज म्हणतां भलतें चि अशक्य तें कसें 'वितर'?
कैसे या ब्रह्मांडप्रासादाच्या खणाल जोत्यातें?
न घडेल चि दृढनिश्चय उग्रतपःक्षम गणाल जो त्या तें." ४
गेले शरण प्रभुतें कितित, ऐकुनि पद्मयोनिबोधातें;
असुर उमजले अतुळें भाग्यें लोकत्रयैकयोधातें. ५
न च रव्यॅंभाव होयिल खद्योतशता, न पव्यॅंभाव नगा,

---

१. [ पतीं—] खेरीज पदार्थ २ प्राकृत भाषेंत. ३. त्र्यंबक, शंकर. ४. दे. ५. जो दृढनिश्चय (दृढनिश्चयी) व उग्र तपानें समर्थ झाला आहे [ असा ] गणाल (मानाल) त्या (त्याला सुद्धां) तें (खनन) न घडेल चि. ६. मूळ पाठ—**म्हणाल.** ७ रवीचा किंवा इंद्रवज्राचा चूर्ण नाश.

नें शिवपराभवें जीवा हें समजति असुर भव्यंभावन, गा ! ६
कुमतींस म्हणे, 'वेतन ठेवावें प्रभुवरें न दासाचें.
रुद्रक्रोधावांचुनि मागा, घ्या इष्ट तें, वदा साचें.' ७
वदले असुर, 'असावीं सुसमृद्धें षट्पुरें रहायाला,
तीं धरणींत वसावीं, न शकावे सुर तयां पहायाला. ८
पहिलें, दुसरें, तिसरें, चवथें, कीं पांचवें अयन सावें,
देवूं न परा, आम्हां देवांचें लेश ही भय नसावें. ९
रुद्रापासुनि आम्हां मरण नसो; मारिले बहु ज्ञाती;
हृदयांत तसी च असे, बा ! झाली भीति जी वहुज्ञा ! ती.' १०
त्यातें चतुरास्य वदे, 'हें सर्व दिलें तुम्हांस जें इष्ट;
व्हाल सुरांसि अवध्य, श्रीरुद्रास हि, न मोघवाक् शिष्ट. ११
चिर नांदाल सुखानें, सद्ब्राह्मण एकतरि न भाजाल;
भाजाल, न वांचाल स्पष्ट, विलंघूनि जरि नभा जाल. १२
नारायण साहेना ऐकुनि विप्रोपघात कानाहीं,
स्मरुनि प्रभुवर होत क्षुब्ध असा अन्य पातका नाहीं.' १३
आज्ञा होतां गेले इष्टस्थानीं सुरारि, वर वरुनीं.
देव तपःसंकोचें करिती दुर्घी प्रसाद वरवरुनीं. १४
श्वेतीं वृषभीं बैसुनि शिव ये शरणागतांसि ताराया,
ज्याची कीर्ति क्षीराब्धिलहरीहुनि शतगुणें सिता, राया ! १५
असुरांतें शंभु म्हणे, 'आलां जरि देवरिपु भला शरण,
मजसह कर्मरण तसा, श्रीरामासीं जसा पलाशरण. १६

---

१. मूळ पाठ—**ईशपरिभव न.** २. भवे (शंकराचे ठिकाणीं) रता (सक्त) भव्या. (भव्या) भावना (वासना, मति) येषां ते=शंकरासक्त मति ज्याची असे असुर. ३. वसतिस्थान ४. [ ब्रह्मदेव ] परा ( इतरांना ) न देवूं ( देवो ). हें आमचें षट्पुर-वैभव इतर कोणाला मिळूं नये, म्हणज, आमच्या बरोबरीचे अन्य कोणी नसावे. ५ फोल आहे वचन ज्याचें तो. ६ अन्य पाप स्मरुनि प्रभु असा क्षुब्ध होत नाहीं—**पंत.** ७. तपाच्या भिडेनें ८ मनापासून नव्हे, वरवर. ९. भक्तकर्मकृत—**पंत.** १०. राक्षसांचें युद्ध (रामाशीं रण करितां जसा राक्षसाचा नाश झाला तसा

ज्यांहीं दीक्षा दिधली, त्यांसह उत्तमगतीस पावाल.
ऋ[1]ण शरणागति खंडी, देणें स्वर्गादिलोक हा बोल. १७
तुमच्या सुतपस्थानीं तीन दिवस मात्र आपुल्या धर्में
वर्ततिल, तयां मिळतिल उत्तमलोकीं तुम्हांअसीं शर्में. १८
तरतिल बहु जन तुमच्या शुद्धतपस्थानवासिसहवासें;
चंदनसंगि नग वरिति पूजा, देवुनि जनासि महं[2] वासें. १९
पूजील प्रेमें जो सन्मनुज श्वेतवाहना मातें,
पावेल मद्गतिस तो, घेवुनि हि श्वे[3]तवाहनामातें.' २०
ऐसें वदुनि, तयांसह गेला श्रीरुद्र रुद्रलोकाला,
आहे गात्या श्रोत्या, शोकाला हरुनि, देतें[4] ओकोला[4]. २१
'जंबूमार्गीं जायिन, जंबूमार्गीं वसेन,' हें बोले,
तो पुरुष रुद्रलोकीं पूजा पावोनि, बहु सुखें डोले. २२
श्रीब्रह्मदत्तनामा पंडितवर याज्ञवल्क्यशिष्य गुणी,
जो पद्महस्त हि सदा घ्याया दुष्टप्रतिग्रहासि कुणी[5]. २३
श्रीवसुदेवाकरवीं करवी हयमेध हा कविप्रवर;
देणारा अर्थिजना सर्व, न देतां हि हाकें[6], विप्रवर. २४
तो एका वर्षाचें प्रारंभी शंभुसा सुधी सत्र,
अध्वर्यु सहाध्यायी श्रीवसुदेवासि पाठवी पत्र. २५
वसुदेव देवकीसह सत्राला षट्पुरस्थळीं गेला,
स्वउपाध्याय सखा तो, सदनीं येवूनियां, सुखी केला. २६
आवर्तच्या तीरीं मुनिसंकीर्णी सुसत्र राया! तें,
बहुदक्षिण बहुन्न स्तविलें सत्कविजनें समायातें[7] २७

माझ्याशीं गांठ पडता माझ्या भक्ताच्या पूर्वार्जित कर्मांचा नाश होता)

१ मग तुम्ही शरण येऊन कर्जमुक्त झाल्यामुळें स्वर्गादि लोक तुम्हाला देणें हें अगदीं क्षुद्र देणें होय-निर्णय०. २. आनंद. ३ शिवनामाला ४ रुद्रलोकीं सन्मंदिरें देत आहे-**पंत.** ५ कमळाप्रमाणें सुंदर असता हि दुष्टापासून प्रतिग्रह (दान) घेण्यास तो कुणी (ज्याच्या हाताला कोड भरलें आहे असा) [-प्रमाणें हात पुढें करण्यास लाजे]. ६. हाक मारू न देतां च वर देणारा-**पंत.** ७. आलेल्या सुज्ञ लोकांनीं.

गुरुसत्रीं हरि जावा सादित्य सरुद्र साश्विवसुदेव,
त्या ब्रह्मदत्तसत्रीं तैसा चि सदार जाय वसुदेव. २८
जैमिनि, सुमंतु, कृष्णद्वैपायन, याज्ञवल्क्य, जाजालि, हे
मुनि देवलादि, मीं ही होतों, ज्यां तो सुविप्रराज लिहे. २९
भूप ब्राह्मण म्हणती, 'वसुदेवाचा सखा खरा होय.'
तो यजमान करि सुखी, धन वांटी देवकी, जसें तोय. ३०
श्रीश सुत जिचा, द्याया विप्राला धन तिला उणें काय?
देतां, घेतां, वदतां, श्रमवी सत्रांत शतगुणें काय. ३१
तें सत्र होत असतां, षट्पुरवासी निकुंभमुख दैत्य
आले, ज्यांसि पहातां यावें अमराधिपास ही शैत्य. ३२
यजमाना खळ म्हणती, 'आम्हां प्राशावयासि दे सोम,
दे कन्या, दे रत्नें, चालों देवूं तरी च हा होम.' ३३
यजमान म्हणे, 'नाहीं असुरांला यज्ञभाग वेदांत;
मानधनाला योग्य हि वस्तु न दावूनि मागवे दांत. ३४
झाला संकल्प खरा, द्याव्या सदृशांसि आपल्या कन्या,
धन्या मिळति न अन्या, अन्यायेंकरुनि पंडितंमन्या. ३५
रत्नें देयिन सख्यें मीं, येतां सबहुमान सत्रास.
हा कृष्णाश्रित पावे; पाहुनि परें न बहु मानस त्रास.' ३६
क्रोधांधें असुरांच्या कटकें वा! यज्ञवाट तो लुटिला,
कुटिला रक्षकजन ही; मर्यादा काय हो! तया कुटिला? ३७
कीं तो तद्दैवाला बिलयाला अज्ञ वाटला जावा;

---

१ अश्विनीकुमार व अष्टवसु यांसह. २. पत्र लिही, आमंत्रण करी ३. 'कुबेराचा' असा हि अर्थ करावा. ४ थंडी, हुडहुडी, कांपरें ५. मानी स्वभावाच्या माणसाला योग्य अशी वस्तु सुद्धा दात विचकून मागवत नाहीं. ६. जर आला असतां. ७. बहु पर पाहुनि मन्मन त्रास पावत नाहीं—**पंत.** मूळ पाठ—**स्वर्गीं ही.** ८ त्या असुरांच्या दैवाला तो मूर्ख असुरसमूह बिलयाला जावासा वाटला.

वरदेंस निकुंभ असुर कां लुटितां यज्ञवाट, लाजावा? ३८
तें यज्ञवाटलुंठन सर्वी तैसें प्रवर्ततां क्षिप्र;
करि शौरि रामकृष्णध्यान, सुखी व्हावया सखा विप्र. ३९
कृष्ण म्हणे, 'प्रद्युम्ना! जा, कन्या रक्ष, समय हा, निघ रे!
बा! मुनिहृदयीं पाडू खरशरतातिसीं न कीर्तिहानि घरे. ४०
येतों, यादवसेना घेवुनि, मीं षट्पुरास सत्वर चीं;
तों रक्षीं. यत्न शत स्वजनसमवना सुधी ससत्व रचीं.' ४१
कृष्णातें नमुनि निघे, कार्यार्थ यशोर्थ असु हि ओपावे,
प्रद्युम्न निमेषांतरमात्रें त्या षट्पुरासि तो पावे. ४२
प्रभुपुत्र षट्पुरा ये, सत्या सत्रांत लोपवी कन्या,
तो मायामय कन्या स्थापुनि तैशा च सुंदरी अन्या. ४३
कन्या रक्षुनि, सांगे प्रद्युम्न नमुनि रहस्य आजीत,
कीं, 'आला यदुसेनासह कृष्ण करावयासि आजीतें.' ४४
त्या मायामय कन्या हरुनि, सुराराति षट्पुरा गेले,
चालविलें सत्र, सुखी वसुदेवें सर्व विप्र ते केले. ४५
यजमाननिमंत्रित नृप सर्व जरासंध, दंतवक्र, तथा
शिशुपाळ, सुकीर्ति सुगुण पांडव ज्यांची महापवित्र कथा. ४६
विंदानुविंद, रुक्मी, शल्य, शकुनि, धार्तराष्ट्र, मालव, ते
बहु आले, जे वात चि, ज्यांचें रिपु ते दिवे चि मालवते. ४७
भूप उतरले होते बहु सेनायुक्त षट्पुराजवळ,
पाहुनि देवर्षि म्हणे, 'देतें यश हरिस हें सुराजवळ.' ४८
'येथें कांहीं आपण युक्ति करावी,' असें मनीं आणी,
दे भेटि निकुंभाला, ज्याची सर्वां रुचे सुधावाणी. ४९
त्यासि म्हणे, 'स्वस्थ कसे बसलां? निश्चिंत वर्ततां स्वैर?
जयशालि यादवांसीं करुनि तुम्हीं असुर हें असें वैर. ५०

१ वरामुळें गर्विष्ठ झालेला २ लुटालूट. ३. मूळ पाठ—**साधुमनीं**. ४ आपल्या लोकांच्या रक्षणार्थ ५ करितो. (याच कर्मे "यत्नशत"). ६. युद्धाला ७ दैत्य

जो ब्रह्मदत्त, तो चि श्रीकृष्ण स्पष्ट कीं, सखा त्याचा,
काळाअशा हि उतरों देणार ग्रास जो न खात्याचा[1]. ५१
जीं ब्रह्मदत्तकन्यारत्नें, द्याया हि नृपजनीं कांहीं
व्हा युक्त, नरवरांच्या विजय रणीं व्हावया अनीकांहीं.' ५२
ऐसें त्या असुरातें शिकवुनि देवर्षि सटकला गाया,
यश करि, पांडववारी[2] विलयातें दुष्टकटक लागाया. ५३
शिकवुनि मुनि जाय, असुर मग मगधवरादिकांसि ते रत्नें
देती कांहीं, कन्यारत्नें ही, जीं सुदुर्मिळें यत्नें. ५४
राजे म्हणति, 'निकुंभा! प्रत्युपकृति सर्व वांछिती आर्य,
केलें आतिथ्य तुम्हीं, सांगा चित्तीं असेल जें कार्य.' ५५
माहात्म्य सत्य वर्णुनि नरनाथांतें निकुंभ तो मागे,
'व्हावें सहाय युद्धीं, कीं, निजधर्मीं तुम्हीं सदा जागे.' ५६
त्या पांडुसुतांवांचुनि म्हणति नृप सकळ 'अवश्य' ते, राया!
तों वृष्णिसैन्य घेवुनि, हरि आला त्या खळांसि घेराया. ५७
सत्रसमीप प्रांतीं प्रभु यादवसैन्य उतरवी, उतरे,
नारद म्हणे, 'असुर हो! आला असुरारि देवकीसुत, रे!' ५८
वचन महादेवाचें चित्तांत धरून चक्रधर आला,
यद्यश म्हणे परांला, 'चळदळदळसें[3] चि थरथरां हाला.' ५९
रक्षार्थ परिभ्रमणीं प्रद्युम्नास स्वयें चि तटकारी[4],
जो आकळी खळांतें सहजें, चटकांसि जेंवि चटकारी[5]. ६०
भवतें गुल्म[6]स्थापन करि सेनासन्निवेशीं[7] रक्षाया,
हें नयलालन[8]; काळ हि दक्ष न हरिसंश्रितांसि लक्षाया. ६१
आवर्तागंगेंत स्नान करुनि, राम, कृष्ण, युयुधान,

---

१. यमासारख्या खाणाऱ्याचा. २ ?. ३. पिंपळाच्या पानांप्रमाणें. ४ ताबडतोब हुकूम करी–निर्णय ५ ससाणा ६. कोट, तट. ७ तळ, छावणी. ८ मूळ पाठ–**नयदर्शन.** युद्धाच्या रीतीचें हें प्रदर्शन किंवा ही पाळणूक होय; ती फक्त लोकांकरितां.

गरुडीं बसले वंदुनि, घेवुनि बिल्वोदकेशवरदान. ६२
प्रद्युम्नातें गगनीं स्थापी सेनेपुढें रमाकांत,
पांडुसुतांतें सर्वी, कीं, हे शुचि, शूर, शुद्धधी, शांत. ६३
जीमाजि षट्पुरांची वसति, नृपा! त्या गुहेचिया निकट
विकट स्वरिपु वधाया, यादवसेनेसि विभु म्हणे, 'चिकट.' ६४
मग जगदीश जयंत प्रवर स्वमनांत आठवी, राया!
शक्रसुता, शक्रसखा, तत्सम चि परांतें पाठ वीरा या. ६५
आले प्रवरजयंत प्रद्युम्नसमीप ठेविले व्योमीं,
सादर रणीं तिघे ही, श्रोत्रिय जैसे सदैव ही होमीं. ६६
रचिला सांबगदाहीं जो मकरव्यूह परशताभेद्य,
अनिरुद्धोद्धव रक्षिति, ज्यांसि असे विदित सर्व ही वेद्य. ६७
मग रणदुंदुभि वाजे, आधीं प्रभु युद्धसिद्धता करवी;
सुरकार्य तों चि नैरतारीति धरी, जों चि सिद्ध ताक रवी. ६८
असुर हि षट्पुरवासी सर्व गुहेंतून सरति बाहेर,
मुनि आपणा म्हणे, "हे, व्यर्थ अनय करुनि, मरति, बा! हेर.
तरले, परि भक्तिसुखा अंतरले मूढ सर्व दानव, रे!
भक्त कसे हे मिरवति मुक्तिवधूसहित सर्वदा नवरे? ७०
भक्तिसुख श्रवण करुनि, करिसील चि, म्हणुनि 'हा!' निकुंभा! रें;
कुळपुरुषहानि साहे प्रभु हि न, सत्कलशहानि कुंभार." ७१
नानावाहनगत ते मणिकांचनभूषितांग गगनातें
व्यापिति, कां न सुरांसीं वांड्याचें लावितील मग नातें? ७२
भूमितळा जेंवि, करी दैत्यांची तेंवि पर्द नभा सेना.
शर ईश्वरावरि धरी, कां कविस निकुंभ मदन भासेना? ७३
राजे सहाय झाले असुरांला, असुरहित करायास.
सफळ कधीं तरि झाला काय जगीं असुरहितकरायास? ७४

१ शत्रुनाश २ जाणावयास योग्य तें. ३. मनुष्यकृति. ४. रर, रड ५. हिंड्याचा संबंध ६. राहण्याचें ठिकाण ७. असुरहितकराचा आयास—पंत.

मागध, विराट, कौरव, रुक्मी, भगदत्त, शल्य, शकुनि, असे
नृप असुरांसि मिळाले, कीर्ति न, लोभें नयां[1] न शकुनि, असे.
दैत्य निकुंभ महाशरवृष्टि करी; लेश ही न भागे हा;
वृष्णिबळ असो, व्यापी ग्रहसिद्धसुरांचिया[2] नभा गेहा. ७६
झांकी सबळ निकुंभा तो यादवसैन्यपति अनाधृष्टी,
उघडूं न दे चि तच्छरसंहतिविद्युत्[3] परा जना दृष्टी. ७७
मोहुनि, गुहेंत ने तो, हरुनि अनाधृष्टितें, महामाय,
जय मानुनि, कृतगर्व ब्रह्मांडीं ही कुधी न हा माय. ७८
षट्पुरगुहेंत नेवुनि, दैत्य अनाधृष्टितें ठकवि, रोधी,
कृतवर्म्यातें हि हरी तो, मायावी, महाठक, विरोधी. ७९
तैसा चि चारुदेष्ण हि, वैतरण, सनत्कुमार ही नेला,
ऋक्ष, निशठ, उल्मुक ही; थोर निकुंभें अनर्थ तो केला. ८०
नेतां यादव, कोणा तो मायेच्या न दाविला पदरें[4]?
वीरवधू परि करित्या, ऐकुनियां हें, तदा विलाप दरें[5]. ८१
श्रीकृष्ण म्हणे, 'नेले रे! यादव वीरमणि कसे चोरा!?
होरा साधुनि, बहुधा केलें त्वां घोर कदन हें, घोरा! ८२
वीरपुरुषरत्नांच्या अपहारें फार राम रागेला,
हासुनि म्हणे, 'सरुनि कीं तव आयुर्दाय[6], पामरा! गेला.' ८३
युयुधान म्हणे, 'यावरि न जगाचा[7] हेतु[8] वांचविल यातें,
दुष्टा! नेले अनयें निज आश्रित हे तुवां च विलयातें.' ८४
प्रद्युम्न बहु क्षोभे, खवळे अनिरुद्ध, सांब न च साहे,
यादव भट कडकडले, एकाच्या हि न मनीं क्षमा राहे. ८५
सज्ज करुनि शार्ङ्गधनु, प्रभुनें बहुकोटि सोडिले बाण,
प्राण हरिति असुरांचे, त्या प्रभुची काय घातली आण. ८६

१ न्यायरक्षणीं न शकता कीर्ति नाहीं—पंत. २ ग्रह, सिद्धपुरुष व सुर यांच्या घराला (आकाशाला) ३ त्याच्या बाणसमुदायापासून निघालेली वीज ४. आच्छादनानें. ५ भयानें ६ आयुष्याची पुंजी. ७. भगवान् श्रीकृष्ण. ८ बाणांस.

सर्वासुरसर्वायुधवृष्टीतें स्वस्थचित्त हरि साहे,
वृष जेंवि वृष्टि, सज्जननिंदा, दृष्टांत योग्य परिसा हे. ८७
प्रभुबाणांतें समरीं परसमुदाय न विशाळ ही साहे,
सिं[1]कतासेतुशतांत न एक हि वृष्टींत बा! जसा राहे. ८८
समरीं असुर हरिपुढें, न टिके, सिंहापुढें जसा बैल,
मेघ जसा वायुपुढें, अथवा शक्रापुढें जसा शैल. ८९
नारायणापुढें ते हतबळ झाले समस्त, मग नीच
गेले उडोनि वरि, परि अरि ह[2]रिसुतमित्र वधिति गगनीं च. ९०
पाडिति शिरें परांचीं, जेंवि फळें उग्र वायु ताडांचीं,
ते तपन, दहन, राहो देती त्या जी[3]वनें न आडांचीं ९१
प्रद्युम्न कर्णमागधमुख मायामयगुहांतरीं कोंडी,
पडले मोहीं, निघणें नेणति ते, जेंवि कर्दमीं धोंडी. ९२
धृतराष्ट्रसुत, विराट, द्रुपद, शकुनि, शल्य, मनुजवर विंद,
अनुविंद, कोंडिले हे; प्रभुसुत विधु, भूपवृंद अरविंद. ९३
भी[4]ष्म हि तयांत! खळगुण! हा! तो कवि काय कोंडला जावा?
ज्या षडरिवर्ग उग्र हि बहु दावायासि तोंड लाजावा. ९४
भगदत्त हि, शिशुपाळ हि, त्या गतितें मान्य तो करी रु[5]क्मी;
कुदशा अरिला हि नसो, म्हणतो, 'तीहूनि बहु बरी रुक्मीं.'
त्यांतें प्रद्युम्न म्हणे, 'मायेसि तुम्हीं दिलां उपायनसे,
सं[6]बंधगुरुत्व कळे, प्रभुच्या आज्ञेपुढें उपाय नसे. ९६
बिल्वोदकेश्वराच्या आज्ञेनें घातलां गुहागर्भी,
अ[7]र्भी तात, तसा प्रभु विनतीं, अनतीं शिखी जसा दर्भी.' ९७
शिशुपाळ राजसेनापति धरितां प्रथम खवळला भारी,

---

१ वाळूच्या शेंकडों बांधातून २ इंद्राचा पुत्र जयंत व मित्र प्रवीर. ३. उदकें. ४ दुष्टसंगति कशी बाधते पहा' तिच्यामुळें शहाण्या भीष्मास देखील कैदी व्हावें लागलें' ५ रोग ६. नातें व वडीलपणा. ७ अर्भकावर. ८. अग्नि.

मारी प्रद्युम्नातें खरशर परकीर्तिंधवळलाभारी. ९८
बिल्वोदकेश्वरातें वंदुनि, ते बद्ध नृप करायास
प्रद्युम्न सिद्ध झाला जों, सद्हितशक्तिनें हरायास, ९९
तों, ज्याच्या आज्ञेनें चळवळति न शैल मेरुशैलादि,
त्याचा पार्षद्वर जो, तो तेथें प्रकट होय शैलादी. १००
नंदी प्रद्युम्नातें बोले, "बिल्वोदकेश्वरें पाश
पाठविले, घे, नृप हे बांध, कराया कुबुद्धिचा नाश. १०१
प्रभुनें आज्ञा केली, कथिले रात्रौ जसें, तसें चि करीं,
बांधुनि गुहेंत घालीं राजे, यांच्या नसो दया निकरीं. १०२
आधीं नृप बांधावे, बंधिल्यावरि सर्व दैत्य, सोडावे;
कृष्णास हि सांग, 'रणीं असुर मथुनि, कीर्तिराशि जोडावे.'
जें असुरांसि मिळाले मुनिकन्यांच्या धरूनि लोभातें,
जें कलुष कर्म केलें, दीन करील चि हरूनि शोभा तें." १०४
सांगुनि नंदी गेला, ते दिव्य सहस्र पाश ओपून.
प्रद्युम्न मग नृपांतें बांधुनि टाकी, गुहेंत कोपून. १०५
बांधुनि बळपति, धनपति, करि हरिचा पुत्र सुगुणखनि रुद्ध,
सर्वस्व हरुनि त्यांचें, ठेवी तद्रक्षणासि अनिरुद्ध. १०६
केलें कर्म निवेदी प्रद्युम्न, मग स्वतातमित्रास
प्रभु सत्रीं नमुनि म्हणे, 'कर्म करीं, मन करूनि विस्रास. १०७
ज्या रक्षक पांडव, त्या पाहेना शक्र वक्र नयनाहीं,
अर्जुन पहा, असुर किति! तुज काळाचें हि लेश भय नाहीं.
ताता! त्या असुरांहीं हस्तें हि स्पर्शिल्या न तव कन्या.
तुझिया चि यज्ञवाटीं मायेनें ठेविल्या, पहा, धन्या.' १०९
त्या ब्रह्मदत्तविप्रा सांगुनि ऐसें, सुरारि माराया,
ताराया विश्व यशीं, तो होय मुरारि सिद्ध, बा राया! ११०

---

१. शत्रुकीर्तिरूप शुद्ध लाभाचा शत्रु; शत्रूंना कीर्तिलाभ होऊं न देणारा. २. विशेषनाम. ३. खाण ४. नक्षदेवास. ५. त्रासमुक्त; शांत.

# अध्याय एकतिसावा.

जाणुनि गति राज्यांची, भ्याले बहु असुर, सर्व मग मोहें
ते लागले पळाया! भंगीं आश्चर्य किमपि न गमो हें. १
त्यांसि निकुंभ म्हणे, "रे! धरितां अपकीर्तिहेतु कां चाल?
परम अधर्म पलायन, यमपाशीं सांपडोन कांचाल. २
किति दिन, अयशें पावुनि ताप म्हणत 'हाय! हाय!', वांचाल?
परमाधर्में नरकीं, विष्ठेंत किडे तसे च, सांचाल. ३
विजयें येथें शर्म, स्वर्गीं मरणें यथेष्ट भोगाल;
गेहीं स्त्रीचे सुस्मितविकसित देखाल काय हो! गाल?" ४
धिक्कारिले निकुंभें असुर परतले करून येकोपा,
ते द्विगुण वेग करिती, कीं निजधर्में करूं नये कोपा. ५
सर्व्हीं दानव साग्रज सानुज ने पार्थ हा तदा विलया,
कृष्णसखा[1] काय रणीं असुरांचा सार्थ[2] हात दाविल या? ६
गगनीं शिरतां मारिति असुरभटातें जयंत सप्रवर,
प्रसरुनि सर्वत्र, परा भिववी सर्वत्र, जेंवि[3] संप्रवर. ७
असुरांच्या रक्ताची उग्र नदी त्या रणांत वाहविली,
भूकरवीं निजभारापगमानंदें[4] चि चिळस साहविली. ८
सर्व स्वसहाय असुर मरतां चि, निकुंभ तो नभीं उसळे.
ज्याच्या शरा पर, जसे क्षुधिता हिरवे हरेभरे उसळे. ९
मारी प्रवर, जयंत हि, शरततिच्या तच्छरांत चडकण गा!
घे काढुनि तेज गमे; आपण चि म्हणेल काय 'चंड'[5] कणगा[6]?
सुखवाया परलोकीं स्वसहायस्वजनचित्त अरिघातें,
हाणी प्रवरोरावरि तो असुरोत्तम निकुंभ परिघातें. ११

---

१. अर्जुनास २ समुदाय, मंडळ. ३. एका गोत्राचे ४. अपगम=नाश, नाहींसे होणें ५. वर चढ ६. कणिग, ढोपळी

प्रवर पडे क्षितिवरि, तों कवळी त्यातें जयंत बाहूनीं;
[1]सप्राणातें सोडी, ताडी खड्गें अरीस [2]बाहूनीं. १२
हाणी निकुंभ परिघें, [3]स्वस्ति [3]रेची देवराज तनयाला;
नारद म्हणे, 'करीं बा! तूं चि शचीदेवरा! जतन याला.' १३
[4]स्तुति वरि परिघा [4]बरवी, परि घाबरवी न तो शचीतनया;
आला जो अमरांच्या [5]उष्णें नयनोदकें रचीत [6]नया. १४
[7]विक्षत होय अरि, म्हणे, 'श्रमवूं येथें स्वबाहु, तरि त्यातें
वधिन कसा मीं समरीं या परिघें ज्ञातिघातकरित्यातें?' १५
होवुनि गुप्त सटकला, गेला, जेथें सराम [8]अरिहोता;
धन्य खळ हि ते, ज्यांच्या दृष्टिस सद्ध्येय पडत हरि होता. १६
तों ऐरावतनागीं चढुनि सहअमर, पहावया समरा
आला, म्हणे, 'असुर हो! या स्वर्गीं चिर रहावयास, मरा.' १७
पोटासीं पुत्रातें धरि, भेटे कडकडून सखयातें,
सन्मित्रप्रेमविपुळ, दृष्टांतीं योग्य शून्य[9] न [9]खं या तें. १८
जयवंत जयत रणीं झाला, शक्रास ही महानंद.
'पुत्रप्रेम बहु' म्हणति कवि, करि विजयीं व्रजीं महानंद. १९
शक्राच्या आज्ञेनें सुरदुंदुभि वाजले, मग नगार्नी
मंडिति तसे स्तवानीं, भरिती गंधर्व ही गगन गानीं. २०
सत्रसमीप चि देखे प्रियसखफाल्गुनसमेत अजितातें;
प्रभुवरि धावे. ज्याचा पुत्र असा चि प्रवीर आजि! तातें. २१
देवर्षिप्रमुख महायोगी कंदुकसमा उसळल्याला
वदले, 'निकुंभ मरतो, कीं प्रभुसंमुख चि तो मुसळ ल्याला.'
शिखरच्युत उपळें[10]तसा दानव जगदीश्वराउपरि घसरे,

१. जीवत [ आहे असें पाहून ] त्यास २ आह्वान करून, बोलावून ३ कुशल चिंती ४ तें शस्त्र स्तुति पावलेलें ( नांवाजलेले ) होतें. ५ दुःखामुळे रडत ६ नद्या ७. क्षतरहित. ८ शत्रूचा होम ( नाश ) करणारा. ९ पोकळी, आकाश [ विपुलपणाबद्दल ] १०. दगडाप्रमाणें

तेव्हां वरीक मागें, गरुडीं हाणोनि तो सुपरिघ, सरे. २३
ताडी रामा, कृष्णा, सात्यकितें आणि धर्मराज्यातें,
भीमकिरीटियमांतें; तैसें चि अचाट कर्म राज्या! तें. २४
न दिसे, करी प्रहार प्रद्युम्नातें हि, काय सांगावें?
प्रभुहत म्हणुनि अशांतें, देवनदींतील वायसां, गावें. २५
सर्व हि सांपडले त्या दैत्यवराच्या महोग्रपरिघातें
न, 'रिघा' तें कर्म म्हणे, शोकीं कोणाचिया हि परि घातें. २६
बिल्वोदकेश्वरद्र्येप्रति म्हणती, 'बाळतात नेदि! सेतें;
हें, बाळां व्याघ्रवनीं वीर सकरचाळ तात न दिसे तें.' २७
सांबीं प्रहार परिघें, वसुदेवीं ही, तदा करी राया!
कोणी न देखती बा! शास्त्रपटु हि, ताडितां, शरीरा या. २८
बिल्वोदकेश्वरातें लागे प्रार्थूनि केशव ध्याया,
देखाया मायेचें सामर्थ्य नुरोनि लेश वध्या या. २९
श्रीशंकर प्रसादें कृष्णा, इतरा हि, तो जना दिसला.
हें किति? काढी प्रभुचें ध्यान मनींच्या तमा अनादि सला. ३०
दिसतां निकुंभ, त्याच्या परिघीं, देहीं, सिताश्व शर हाणी;
कुंठित होवुनि पडले; न करिति अरिची, जरी हि खर, हाणी.
अर्जुन कृष्णासि पुसे, 'मद्वाणाहीं महाद्रि फोडावा,
मग हा कसा महास्त्रप्रखरांहीं संगरांत सोडावा?' ३२
प्रभु सांगे, 'लक्ष समा, जावुनि उत्तरकुरूंत, हा तपला;
झाला प्रसन्न ईश्वर, कीं यमनियमांसि सर्वदा जपला. ३३
रूपें तीन धरी हा जीं अत्युग्रें सुरासुरावध्यें,
रक्षी द्वार श्रीशिव, या असुराला दिल्या वरामध्यें. ३४
श्रीशंभु म्हणे, 'माझें विप्रांचें, कीं महासुरा! हरिचें
अप्रिय परि जरि करिसिल, जाळिल तुज तेज विष्णुच्या अरिचें.

---

१. नकुळसहदेवांस. २. हे [बिल्व—] दयानंद! ३. खड्गधारी रक्षणकर्ता. ४. अर्जुन. ५. प्रखर अशा महास्त्रांनीं. ६. वर्षे. ७. सुदर्शनचक्राचें.

ब्रह्मण्य[1] मीं हर, हरि, ब्राह्मण आम्हांसि आश्रय व्यक्त,
भक्त ब्रह्मकुळाचा निर्भय, जो धर्मनयपथासक्त.' ३६
देहत्रयांत एकें दितिची सेवा सुरारि हा करितो,
आम्हांवरि द्वितियें देहें सांप्रत महायुधें धरितो. ३७
भानुमतीच्या हरणीं म्यां याचा देह नाशिला तिसरा,
ऐसा अवध्य देवासुरशस्त्रास्त्रांचिया महाविसरा.' ३८
देव म्हणे, 'तुज कथिली वरदानकथा सुरारिची थोडी,
युद्धप्रसंग हा, बा! वरवीररसीं च तूं धरीं गोडी.' ३९
षट्पुरगुहेंत अर्जुन, वाजाया देवमुरज[3] शिरला, हो!
मागुनि तो हि विधि म्हणे, ज्याचें पद्पद्मसुरज 'शिरलाहो.' ४०
चंद्रार्कद्युतिहीना, निजतेजें चि प्रकाशिता मोटी,
षट्पुरगुहाविचित्रा, दैत्यांच्या जींत नांदती कोटी. ४१
जीमाजि उष्ण, शीत, स्पष्ट स्वेच्छानुरूप बा राया!
वारा या सुगुहेंत क्षम समयीं सर्व ताप वाराया. ४२
शिरला अशा गुहेंत प्रद्युम्नप्रमुख सर्व ही योध,
शोध करुनि, सोडविले यादव, केला जयां खळें रोध. ४३
प्रभु समर निकुंभासीं करितां सांगे सुतासि कीं, 'तोडा
वृष्णिभद्रांचें मायाबंधन; ते नृप हि बांधिले सोडा.' ४४
बा! जे प्रद्युम्नानें प्रभुवचनेंकरुनि सोडिले राजे,
लाजे मुख दावाया सर्व हि, न तयांत एक ही साजे. ४५
हाणी परिघें शुद्धीं युद्धीं तो, बहु खिजोनि, घोर तया,
शरणागतां म्हणे जो, 'स्वस्थ विमानीं निजोनि घोरत या[4].' ४६
प्रभु हि गदेचा बसवी घोर चि घोरासुरासि फटकारा,
पाहे वाट कराया काळप्रभुची जयासि गट कारा. ४७
परपरिघाभिहत अजित, अजितगदाभिहत पर हि तो पडला,

---

१. ब्राह्मणसेवक. २. मोठ्या समुदायाला. ३. मृदंग (दुंदुभी). ४. स्वर्गी या.

न घडावा, तो चि पहा स्वयंशःप्रेमें प्रकार हा घडला. ४८
पांडव 'हा! हा!' वदले, कीं ते शिशु, देवदेव हे माता;
यादव 'हा! हा!' वदले, कीं ते झषे, कृष्ण तोय, गा ताता! ४९
मुनिवर कृष्णहितार्थ श्रुतिजप करिति, स्तुती हि सूक्तानीं,
प्रत्यागतासु झाला प्रभु, यश हें मानिजेल मुक्तानीं. ५०
उठला उपेंद्र आधीं, मग तो हि निकुंभ, पुनरपि कवी ते
युद्धीं प्रकार दाविति नव, सुहृदां जेंवि सुनर पिकवीते. ५१
वृषभतसे, द्विरदतसे, कीं शालावृकतसे हि ते क्रुद्ध
युद्ध करिति. सत्कविनीं गावें यश हें सदा महाशुद्ध. ५२
अत्यद्भुत हें, साहे, हाणी हि ब्रह्म जें, तडाखा तें;
प्रभुरक्षित नसतें, तरि वाटे ब्रह्मांड ही तडा खातें. ५३
विष्णुस हि ईश्वराची लेश हि न वरोक्ति अन्यथा करवे,
अमृताचे चि, प्रभुयश गावुनि नटनांत धन्य, थाक, रवे. ५४
यत्न न चाले, तेव्हां झाली अशरीरिणी असी वाणी,
'कृष्णा! देवब्राह्मणकंटक हा तूं सुदर्शनें हाणीं.' ५५
बिल्वोदकेश्वर त्रि हें बोले, 'यातें वधूनियां चक्रें,
धर्मयश विपुळ पावें; स्वमुखें वाखाणिजेल तुज शक्रें.' ५६
बिल्वोदकेश्वरातें नमुनि, प्रभु चक्र तत्क्षणीं सोडी,
तोडी निकुंभमस्तक; गोडी यांत चि, सुधारसीं थोडी. ५७
असुरांच्या नाशानें झाला बिल्वोदकेश्वरा तोष;
फार चि आला होता विप्रात्यपमानमंतुनें रोष. ५८

---

१. अद्भुत लीला दाखविण्याची जी परमेश्वराची हौस तिच्यामुळें—निर्णय०. २ मासे ३ परत आले आहेत प्राण ज्याचे असा ४ स्वकष्टोपार्जित सपत्समर्पण—पंत. ५. लाडग्यासारखे ६ तल्लीन, गुग ७. ढेंपा, कण; घट्ट झालेले भाग [ जे ] प्रभुयश गावुनि नटनात धन्य [ व ] थाक [ असतात ते ] अमृताचे चि रवे (त्याना मृत्युभय नाहीं). परमेश्वराच्या कृपेस पात्र झालेल्यांस कोणी हि मारता नाहीं. ८ विप्र+अति+अपमान+मतु (अपराध).

सुर दुंदुभि वाजविती, देवावरि पुष्पवृष्टि शक्र करी.
हरि हरि च, सत्र तें सर, ते दैत्यब्रह्मदत्त नक्रंकरी. ५९
मुनि सुप्रसन्न झाले, जग होय प्रमुदित, क्षमापाळा!
प्रभु यादवांसि वांटी दैत्यांच्या रूपगुणवती बाळा ६०
त्या क्षत्रियांस ही दे कन्यारत्नें हि देव, समजावी.
हे श्रुतिपथें कथारुचि हृदयीं, नाशावयासि तम, जावी. ६१
उत्तम वस्त्रें, रत्नें, सतुरग रथ षट्सहस्र, धर्मातें
दे, ब्रह्मदत्तविप्रा षट्पुर विभुगीतपुण्यकर्मा तें. ६२
बिल्वोदकेश्वराच्या प्रीत्यर्थ प्रभु करी समाज्यातें,
शिववार्ता सुरभिसमा, इतरा वार्ता खरीसमा ज्यातें. ६३
मल्लक्रीडा, गानें, नृत्यें, बहु रम्य करविलीं वाद्यें,
दिधलीं महासमाजीं अन्नें, वस्त्रें, धनें, तयां आद्यें. ६४
सत्र समाप्त यथोक्त प्रभु करवी ब्रह्मदत्तविप्रकरें,
त्यातें मग नमुनि निघे, जो स्तविला नित्य सत्कविप्रकरें. ६५
केला धन्य प्रभुनें जन्मुनि वसुदेव देवकीसहित,
हें किति अद्भुत? साधुनि सन्मुनिवसु देव दे बकीस हित. ६६
स्वजनसह मुकुंद धरुनि वौसरस, द्वारकापुरा गेला;
वैकुंठ न तें म्हणतां, कान चि सद्वार कापु रागेला. ६७

---

# अध्याय बत्तिसावा.

विष्णुहतसुता दिति किति दिवस शिवसमा सुसृष्टिकर्त्यातें
बहु आराधी, मागे सर्वसुरावध्य पुत्र भर्त्यातें. १

---

१ सुसर व गजेंद्र. २ कानावाटें, ऐकून ३ प्रभूनें वर्णिलें आहे पवित्र कर्म ज्याचें अशा (ब्रह्मदत्ताला) ४ समारंभाला, उत्सवाला ५ साधूचें धन जो श्रीकृष्ण तो. ६. बकीस (पूतनेस) ७ स्वगृहीं जाण्याची इच्छा ८ रागेला (क्रुद्ध) सद्वार (साधुवृंद) कान चि कापु (कापून टाको) ९. विष्णूनें मारिले आहेत सुत जिचे ती.

कश्यप म्हणे, 'प्रिये ! तुज आलय संपन्महाविलासाचा,
एका रुद्रावांचुनि सर्वसुरावध्य सुत दिला साचा. २
तो देवदेव भगवान्, सति ! माझें बळ तयापुढें न चले,
खचले गिरि तत्तेजें, ज्याला विषकाम हे दहन पचले.' ३
ऐसें बोलुनि कश्यप मुनिवर्य स्पर्शला जया बोटें,
पोटें धरिला गर्भ ! ब्राह्मणसामर्थ्य सर्वथा मोटें. ४
झाला सहस्रमस्तक, अत्यद्भुत सुत सहस्रबाहु तिला,
द्विसहस्रेक्षण, तावच्चरण, गिळाया शिखी च आहुतिला. ५
अंध नसोनि, मदालस तो मीलितनेत्र अंधसा चाले,
यास्तव 'अंधक' ऐसें नाम तया लोक ठेविते झाले. ६
आपण अवध्य ऐसें जाणे, जाची उदंड लोकांतें.
कामी, लोभी, निर्भय हरिल, जगीं रत्न जें न तो कां तें ? ७
स्त्रीरत्नें, हरिरत्नें, करिरत्नें या जगांत जीं रत्नें,
हरिलीं निजबाहुबळें, जीं ज्यांहीं जोडिलीं महायत्नें. ८
देवासुरराक्षसनरनागमुनि हि जरि हि म्हणति 'नंनु,' गांजीः
कोणांस हि प्रतिष्ठा नाहीं, त्याच्यासमीप अनुगां जी. ९
परदारापहरण पररत्नविलोपन करी सदा मोहें,
झाला सिद्ध, 'करावा विश्वविजय,' धरुनियां मनीं तो हें. १०
तें जाणुनि, तातातें शक्र म्हणे, 'अंधकें असें कार्य
आरंभिलें, करावें आम्हीं जें काय, सांग तूं आर्य.' ११
योग्य नव्हे चि कनिष्ठें केला ज्येष्ठा व्यतिक्रम सहाया,
वधितां इष्ट सुत, करिल रोष दिति, म्हणुनि वधीं प्रभु न हा या.
कश्यप शक्रासि म्हणे, 'शतमन्यो ! भद्रमस्तु ते तात !

---

१. कालकूट विष व मदन. २. दोन हजार डोके असलेला. ३. तितके च पाय असलेला. ४. नको, नको. ५. चाकरास. ६. हरण. ७. अपमान. ८. हे वत्सा ! बापा ! तुझें कल्याण असो !

वारीन अंधका मीं. आयु असलिया गुरूक्त घेतात.'[1] १३
दितिसह कश्यपमुनि तो हरिकीर्तिधरावराह[2] वीरा या
वारी बहु कष्टे, परि तत्संकल्पा[3] न राहवी, राया! १४
अंधक निवारिला, तरि पीडा देवांसि सर्वदा हि करी,
उच्चैःश्रवःसुतांतें, दिग्गिभसुतांतें[4] हि, तो बळें चि हरी. १५
देवोद्यानें भंगी, विध्वंसी सर्वसाधुजनयज्ञ,
कनककशिपु जेंवि, तसा सत्पथ चालों न दे चि अनयज्ञ. १६
तपन तपे इच्छेनें त्याच्या, उगवे शशी, पवन वाहे,
त्या दितितनयापासुनि धरिती संत्रास बा! नवनवा हे. १७
सुर ऋषि दुःखित झाले, होतां वेदक्रतुक्रियालोप,
ते म्हणति, 'या खळाचा यावा जगदीश्वरा! तुला कोप.' १८
देवब्राह्मण चिंतातुर, त्यांतें गुरु म्हणे, "अहो! युक्ति
स्फुरली, या, श्रीनारद विनवूं, हा देतसे नता मुक्ति. १९
देवद्विजकंटक तो, न हरावांचुनि परा मरायाचा;
सह्य प्रभुचा शर या, जेंवि दशमुखा न रामरायाचा. २०
साधु असाधूंपासुनि रक्षावे, त्यांत सर्वथा विप्र;
प्रभुचें व्रत हें कळतां, स्वजनाचा ताप वारिल क्षिप्र. २१
कळविल, मन वळविल, घन करुणेचा हा बरे उपाय सखा
प्रभुचा जाणे, जीवां म्हणतो, 'शिवयश अरे! सुपायस खा.'
मुनि कथिल, प्रभु करिल चि तुमचें अश्रुप्रमार्जन[5] स्वकरें."
हें पैकोनि, विनविला श्रीनारदमुनि सुरद्विजप्रकरें. २३
नारद म्हणे, 'अवश्य, स्वस्थ रहा, करिन यत्न, हें माझें[6].
प्रभुपासीं शिशु शब्दें करि कार्य, न होय रत्नहेमा जें.' २४

---

१ सुहृद्वाक्यं न शृण्वति गतायुषः (आयुष्य च सपलें असलें तर हितोपदेश कसा रुचेल?). २ हरिकीर्तिरूप पृथ्वी [धारण करणारा] वराहावतार ३. अंधकाच्या इच्छेस. ४. दिग्गज. ५. अश्रु पुसणें, दुःखाचें परिमार्जन करणें. ६ माझें काम.

इतिकर्तव्य विचारुनि, भगवान् देवर्षि मंदरा गेला,
प्रभुचा वयस्य नारद असुरा जाणोनि मंद रागेला. २५
मुनि एक रात्रि राहे श्रीशंभुसमीप, फार सुख लाहे,
भगवत्प्रसादसुरतरुपुष्पांचें दाम तो गळां वाहे. २६
मंदारवनीं प्रभुतें नमुनि, निघे, भेट दे तया काळीं,
तो मुनिस पुसे, 'कोठिल वर्णें, गंधें हि, अद्भुता माळा? २७
मीं पारिजातपुष्पग्रथिता माळा सदा, तुरे, गजरे
भोगितसें; परि हे बहु. सांग तरुस्थान नाथ! बा! भज रे!'
देवर्षि म्हणे, "ज्यांच्या पुष्पांची हे विनिर्मिली माळा,
ते मंदरीं महेश्वरनिर्मित मंदार, असुरभूपाळा! २९
या मंदारांचें बा! अद्भुत गव्यूतिमात्र वन आहे,
ज्यांत प्रमथगणांचें पावे शोकाग्निची न मन आहे. ३०
त्या पारिजातवृक्षाहुनि याचा बा! अनंत महिमा गा!
योग्या भक्ता देतो, देयिल हि, पहा, अनंत महि, मागा. ३१
स्त्रीरत्नें, मणिरत्नें, अन्नें, वस्त्रें, विभूषणें, वाद्यें,
गीतें, नृत्यें, सर्व हि रस देते तरु विनिर्मिले आद्यें. ३२
नाम 'स्वयंप्रभ' असें मंदारांच्या प्रसिद्ध सुवनाचें,
स्वर्गाचा स्वर्ग खरा, मूर्त महावैभव त्रिभुवनाचें. ३३
न तपे तेथें रवि, मग कोण परा असुरनायका! पुसतो?
त्राते स्वयंप्रभाचे गण दहन चि, अन्य काय कापुस तो? ३४
आधिव्याधि नसे बा! तेथें, ग्लानि, क्षुधा, तृषा नाहीं;
तें चि सुखाचें सुख वन, म्हणती 'इतरें सुखें मृषा कां हीं?'
एक हि दिन जो कोणी मंदारद्रुमवनांत राहेल,
बा! त्रिभुवनविजयश्री स्वशिरीं तच्चरणरेणु वाहेल. ३६
तेथें क्रीडे भगवान्, भलत्यास पहावया कसें मिळतें?

---

१. ह्याप्रमाण करावयाचें कार्य. २ मित्र ३ त्या अंधकासुराला ४. दोन कोस विस्तृत. ५ ज्वाला. ६. प्रकाशे ७. रखवालदार. ८. खोटा. ९. पायधूळ.

पर आखु[१], प्रमथगणव्याळांचें होय अंधका! विळ तें. ३७
ज्या श्रीस्वयंप्रभवनीं नित्य श्रीसांब अंधका! रमला,
तेथें प्रकाश, लोकीं वाटे अन्यत्र अंधकार मला. ३८
भगवद्रूप चि केवळ, सुमनोहर, परम रुचिर मंदर तो
जोंवरि न देखिला, बा! तोंवरि विषयांत सुचिर मंद रतो.”
नारदवचनें अंधक असुरचमूसहित मंदरा गेला,
सधनीं अभाग्य तैसा, सांबशिवीं अहित मंद रागेला. ४०
[२]रूपी मंदर भेटे, त्यातें अंधक म्हणे, ‘अगाधमते!
समयज्ञा! तूं साधु, व्यर्थ इतर जे जगीं, [३]अगाधम ते. ४१
मीं नाथ, रत्नभोक्ता, मज वश हे सर्व लोक आहेत.
मंदारवन [*]पहावें, झाला आहे मनांत हा हेत. ४२
कश्यपमुनितातवरें सर्वांसि असें अवध्य, कां ठावें
हें तुज नसेल? अचळा! दावुनि वन, यश विशुद्ध गांठावें. ४३
मजसीं युद्ध कराया कोणी च पुढें अगा! धसेना, गा!
[४]माझी अगाध शक्ति क्षोणिधरा! तूं अगाध सेना [५]गा. ४४
मंदारांचें सामें मजला जरि दाविसील तूं न वन,
तरि पीडीन तुला मीं; कोण करिल संकटीं तुझें अवन?’ ४५
अंतर्धान चि केलें, किमपि न बोलोनि, [६]मंदरागानें,
ऐसें बोले, पेटुनि अंधक अत्यंत मंद रागानें:— ४६
‘मम वीर्य पहा, जेणें अरि पावुनि सर्व ताप, हारे, तें.
मच्छक्तितें अरे! तूं किति? पापड, पर्वता! पहारेतें.’ ४७
उपटी शृंग, करी, जें वदला, तें [७]वीर्यतोयराशि खरें;
चुरि एक शृंग त्या तो संपत्तीचा [८]कुसोयरा शिखरें. ४८
गडबडला तो नग, मग जगदीश्वर शंभुच्या वरें झालें

१. उदीर. २. मूर्तिमत ३. क्षुद्र पर्वत. ४. माझी शक्ति ही च माझी सेना. ५. वर्णन कर—पंत ६ मंदरपर्वतानें. ७. पराक्रमाचा समुद्र. ८. अन्यायानें संपत्ति मिळविणारा—निर्णय०. * हस्तदोषानें ‘पाहावें’ असें लिहिलें गेलें आहे.

शिखरयुग प्रकट, तया पहिल्याहुनि फार रम्यपण आलें. ४९
बहुयोजन शिखरें जें बहुयोजन शिखर असुर चूर्ण करी,
नाहीं होय, प्रकटे; बुडुनि सरीं, दृश्य जेंवि तूर्ण करी. ५०
जें जें शृंग नगाचें उपडुनि, ते असुर उडविती दूर,
तें तें मागें लागे, त्या दैत्यांची चमू करी चूर. ५१
जे दैत्य हात जोडुनि होते, ते मर्दिले न शिखराहीं;
मुक्ताफळें शिवयशें, सज्जनहंसांपुढें चि विखरा हीं. ५२
स्वबळक्षयकुपित असुरराज म्हणे, 'कोण तूं वनस्वामी?
हो प्रकट, च्छळ न करीं, श्रमवूं देयीन न च मन स्वां[1] मीं. ५३
उक्ति रुचो, छळ न करीं, हें[2] अनुचित, ये समोर, सारा [3]हे,
[4]अहित अहि तसे यांची शूर धरुनि वेस मोरसा राहे.' ५४
ऐसें गर्जुनि, अंधक बाहे जों, तों चि पावला भर्ग[5],
स्वर्गप्रद यश ज्याचें, साधूंचे ज्या उपासिती वर्ग[6]. ५५
वृषभवरीं बैसोनि प्रभुवर कर्पूरगौर, तूळातें[7]
वात, तसा उडवाया, आला तोलीत दिव्यशूळातें. ५६
'हिमनगशिखरीं शारद[8] सोमि, तसा' कां म्हणें न 'भासो' मीं?
वृषभीं तो न हिमनगीं, जी जगदीशीं, तसी न भा[9] सोमीं. ५७
किरण चि रणपटु गण, हर रवि, अंधक अंधकार किति काय?
यत्तेजें चैतन्यें ब्रह्मादि पिपीलिकांतें[10] जितिकायें[11]. ५८
झाले उत्पात, मुनि ब्रह्मपरिस्फूर्ति[12]शांतिमुद्रहित.
शूळें अंधक जाळुनि, विश्वाचें करि पळांत रुद्र हित. ५९

---

१. स्वजनास स्वस्थ करीन—**पंत.** २. छळ करणें—**पंत.** ३. हे सारा उक्ति—**पंत.** ४ सर्पासारख्या अहितांची (शत्रूंची) वेस धरून (वाट आडवून) तू शूर मोरासारखा रहा ५ शिव. ६. समुदाय. ७. कापुसाला. ८ शरदृतूतील चंद्र ९. शोभा, तेज १० ब्रह्मापासून मुंगीपर्यंत अखिल विश्व ११. जीवंत आहेत देह ज्यांचे तीं १२. ब्रह्माची स्फूर्ति झाल्यानें होणारी शांति व मुत (आनंद) यांविरहित.

देवगण, मुनि तपोधन, बंदीजन जो, तयां सम स्तविती,
पुरुषार्थ प्रणतप्रियकामें ज्याची दया समस्त विती. ६०
सुर पुष्पवृष्टि करिती, गाती गंधर्व शंभुचें कृत्य,
वाजति दुंदुभि गगनीं, प्रकटिति सर्व हि वराप्सरा नृत्य. ६१
झालें स्वस्थ त्रिभुवन, धालें, भगवद्यशोमृतीं न्हालें;
भ्यालें होतें बहु, परि आलें बहु धैर्य, सुख, कराखालें. ६२
'पाव' असें म्हणतां चि, प्रणतांच्या पावला चि हाकेला;
प्रकट प्रताप न, सुखें जगदीशें पावलो चि हा केला. ६३
प्रभु वधुनि अंधकातें, निजनिर्मित पारिजातवन सेवी;
ते वीतमोह करित्ये लीला स्मरतां, जसी शिवा देवी. ६४
शक्रप्रमुख सकळ ही केले सुर सुप्रचार लोकांत,
प्रभु वात्सल्य बहु करी विश्वांत, जसा चि तात तोकांत. ६५
असुरें जो क्षोभविला मंदरगिरि, तो विशेष शोभविला,
लोभ विलासीं या बहु, तरि च स्वगुणीं हरी हि लोभविला. ६६

---

# अध्याय तेतिसावा.

भूप म्हणे, 'श्रीकृष्णें वधिला दुसरा निकुंभ काय कसा?
सांग मुने! श्रोत्यांची वांछा पुरविसि महर्षिनायकसा.' १
वैशंपायन सांगः—कोणी आलें नृपा! महापर्व,
पिंडारकासि यादव गेले स्नानार्थ सिंधुच्या सर्व. २
वसुदेव, उग्रसेन, द्वारवतीमाजि राहिले अवना,
वरकड सर्व हि गेले, कीं यात्रोत्सव भजों न दे भवनीं. ३
बळ हरि जसे, निराळे करुनि निघाले अनेक लोक थवे;

---

१. ज्ञाता. २. केवळ पवित्रा च; नुस्ती सलामी ३. अज्ञानरहित. ४. ज्याच्या जाण्यायेण्यास हरकत येणार नाहीं असें. ५. व्यासासारखा. ६ घरी राहू देईना.

अत्यद्भुत उत्सव जो, न सविस्तर कविजनासि तो कथवे. ४
प्रभुच्या इच्छामात्रें धरि सिंधु सुगंध अमृतसें तोय,
[1]जानुप्रमाण कोठें, कोठें वक्षःप्रमाण तो होय. ५
बळदेव रेवतीसीं मधुरसमुद्रोदकीं करी केली,
बहुदयितांसीं क्रीडा बहुरूपें केशवें बरी केली. ६
प्रभुसि भजुनि, मान करिति, साहुनि तपविघ्न सर्व ही रमणी,
चढुनि शिरीं, धरिति न कां शाण[2]घनोत्तीर्ण गर्व हीरमणी? ७
जी ती चित्तांत म्हणे, 'मीं च बहु श्रीधरास आवडती.'
संसारग्रीष्मपथीं पांथ अतिश्रांत कृष्ण हा, वड ती; ८
कृष्ण जसा स्ववधूंसीं, यादव यादवकुमार ही व्रीडा
सोडुनि, कृष्णाज्ञेनें करिती मधुरोदकार्णवीं क्रीडा. ९
बहु विश्वकर्मनिर्मित नौका मणिहेममंडिता कोटी,
ज्यांत प्रासाद, वनें आकृति इच्छेकरूनि लघु मोटी. १०
क्रौंचमयूराकारा, नागाकारा, प्रकार अर्णव तो,
श्रीशप्रभुचा, भलत्या बहुभाग्यविलास काय वर्णवतो? ११
निजतेजें आ[3]प्यायित केले स्त्रीपुरुषकाय ते, अजि! तें
बहु नवल, दिले त्यांला समयोचित सुगुण आयते अजितें. १२
कोणी स्त्री जळ सिंची, कोणी [4]भंजनभयें गळां पडली,
कोणी 'अबळांपासुनि परि[5]भूति' म्हणे, 'गळां भली जडली.'
कोणी मीनाकारें उडुपें[6] सिंधूंत, कच्छपाकारें,
क्रीडे, मकराकारें, स्त्री जाणे जेंवि धीवरी[7] सारें. १४
भूमितळीं, तेंवि जळीं, क्रीडुनि गगनीं हि पावल्या हर्षा,
स्वजना प्रभुची करुणा, जेंवि मयूरांसि निववितो वर्षा. १५
त्या सर्व यादवांसीं क्रीडाया अप्सरा हि आठविल्या,
आल्या, प्रभुनें त्या त्या सांत्वुनि, त्यांत्यांसमीप पाठविल्या. १६

---

१. गुडघाभर. २. निसणा व घण यातून निभावलेले ( परीक्षेंत टिकलेले ) हिरे. ३. युक्त. ४. बुडण्याच्या भीतीनें. ५. पराभव. ६. नक्षत्रें. ७. नाविक स्त्री.

कैलासमेरुमंदररूप प्रासाद देति शर्मातें;
नौकांत, सत्य गमती, करि अद्भुत शिल्प विश्वकर्मा तें. १७
अन्न चतुर्विध वांछित, नानाविध मद्य, मांस जेवाया:
गीतें, वाद्यें, नृत्यें, सर्वांस हि सिद्ध सर्व सेवाया. १८
तो सिंधु अप्सरांहीं, चपळांहीं मेघ, तेंवि शोभविला:
वृष्णिजन नभीं नाकीं नेला भोगार्थ, सर्व लोभविला. १९
इच्छित शीतोष्ण, तयां नाहीं चिंता, क्षुधा, तृषा, ग्लानि;
ध्यानीं आलें, सिद्ध चि, मानी सन्मुक्तिसुख चि तें ज्ञानी. २०
ऐसें करिती नादें, देहीं[1] बहु हर्ष ये कंचा,[2] तूर्यें.[3]
करि नवल विश्वकर्मा, बहु लाजवि अमृतसेक चातुर्यें. २१
नौकेंत प्रासाद प्रभुचा ऐसा विराजला मोटा,
स्वपुर चि मानिति देवी, ज्यांत न कोणा हि वस्तुचा तोटा.
वंदूनि रेवतीतें, देववधूंनीं करूनि सलगीतें,
आराधिला सुवाद्यें, नृत्यें तो राम पानकल[4] गीतें. २३
त्या प्रभुपुढें करिति त्या प्रभुचरितांच्या जपोनि अनुकारा,[5]
जेणें नाहीं व्हावी, न सुटे जी तप तपोनि, तनुकारा.[6] २४
स्वस्वानुजचरितांच्या अनुकारांहीं प्रसन्न बळ झाला,
गावूं लागे प्रेमें, कीं तो स्वयशें स्वयें हि बहु धाला. २५
पानमदमधुरकंठ प्रभु लागे रेवतीसहित गाया,
जी देहीं वृत्ति, न दे आश्रय तो देव तीस हि तगाया.[7] २६
झाला निजचरितांच्या अनुकारांहीं प्रसन्न केशव ही,
मग कसि धरिल यमाची जीवरचित कर्मलेखलेश वही?[8] २७
प्रभु सत्येसह आला, हरिण जसा ये भुलोनि नादानें,

१. विजानी २. अगावर हर्षरोमांच उभे राहिले ३ तुतान्या ४. मद्यपानविकल—पंत. ५ अनुकरणास ६. देहरूपी बंदिखाना. ७ देहभान. ८. जीवानें केलेल्या कर्मांचा अल्प हि उल्लेख यमाच्या [चित्रगुप्तलिखित] वहींत येणार नाहीं.

गाय स्वयें हि सुस्वर, शिवचरितांचीं जयांत आदानें. २८
बळभद्र रेवतीसह, सत्येसह कृष्ण लागला गाया;
कवि हो! सुपथा धृतिचा लागाया शीघ्र लाग लागा या. २९
आला होता यात्रेकरितां नरलोकवीर तो पार्थ,
गाय सुभद्राकृष्णांसह यश परपापगर्वलोपार्थ. ३०
प्रद्युम्न, सांब, सात्यकि, उद्धव, अक्रूर, हे हि गानाचा
करिति प्रसंग, सादर कवि हो! तैसे तुम्हीं हि गा, नाचा. ३१
जों जों रंग, तसा तो गानाचा बहु समाज ही वाढे,
तों तों वाढे नाव हि, तींस स्वर ते चि मानले कोढे. ३२
प्रभुगानामृत पुष्कळ नारद सज्जन सुरागें आला पी,
मग आपण हि तयांत श्रीहरिहरयशें सुराग आलापी. ३३
श्रीमुनि वीणा लावुनि, गावुनि सप्रेम डोलवी त्यांतें,
करिता उमेश्वर हि जे त्यां विश्वाच्या हि लोल वीत्यांतें. ३४
गानरसीं हास्यरस प्रकट करी हा नयज्ञ, समयज्ञ,
वदले श्रीबळ, कृष्ण प्रभु हि, 'नसे गानयज्ञसम यज्ञ.' ३५
बळ हांसविला मुनिनें, हांसविली रेवती हि; अन्या या
सात्राजिती, सुभद्रा, हांसुनि ही न करिती च अन्याया. ३६
सर्व स्त्रिया पुरुष ते वाहविले गानहास्यरसपूरें,
सूरें भवतिमिराच्या प्रभुभक्तिज्ञानदानबहुशूरें. ३७
त्या भगवदिंगितज्ञा देवी देती अमूल्य आभरणें,
त्या रासें बहु हर्षवि देवमुनि, तसा न पद्मनाभ रणें. ३८
जाणों शंकर हि म्हणे, 'बहु सुखकर तुज उमे! रुचो रास.

१. संग्रह, संचय २ या सुपथा–पंत. ३ कृष्णा=द्रौपदी. ४ पाप व गर्व. ५ नावेच्या वाढीस कारण झालेल्या स्वरांस पुष्टिवर्धक काढ्यांची उपमा दिली आहे. मानले=प्रकृतीस मानलेले ६. प्रेमयुक्त. ७ गुण–पंत. ८. उत्तम रागरागिणींत. ९. उत्पन्नकर्त्यांस. १० संसाररूपी काळोखाच्या सूर्यानें. ११. कृष्णाचा हेतु जाणणारी

क्षुद्रा न घेववे रस हा दिव्य, जसा सुमेरु चोरास.' ३९
जो श्रवण ही करावा शंकरदुर्गांचिया हि नवसानीं,
प्रभु त्या रासरसाच्या अवभृथ करि सागरांत अवसानीं. ४०
दक्षिणकरीं मुनीतें भामेसह, धरुनि पार्थ सव्यकरीं,
टाकी उडी समुद्रीं प्रभु, ज्यातें म्हणति साधु 'भव्य करीं.' ४१
सात्यकिला प्रभु सांगे, 'एक फळी सागरांत आर्याची,
माझी दुजी फळी, या सिद्धि करावी तुवां चि कार्याची' ४२
प्रांजलि सागर होता; त्यासि म्हणे कृष्ण, 'शीघ्र हो मधुर,
प्रसव प्राज्य सुगंध, प्रसवे जैसा पवित्र होम धुर. ४३
हो ग्राहरहित, मृदुमणिसैकत, तव तोय शर्करामधुर;
जलकेलिची वहातो, पैरविधुचा नित्य अँर्क राँम धुर. ४४
वैडूर्यकनकमुक्तामणिचित्र असोत सौम्य मीन मनीं,
कांहीं अप्रिय घडतां, न च होयीन प्रसन्न मीं नमनीं. ४५
नानाविध मद्याचे भरले, बहु दिव्यपरिमळा वरिते,
मणिकांचनमयघट भरतोषार्थ असोत तव जळावरिते.' ४६
सांगुनि असें जलाधितें, कृष्ण किरीटीसवें करि क्रीडा;
प्रभुभावज्ञा भामा सिंची मुनिला, न ती धरि व्रीडा. ४७
तों राम, रेवतीतें धरुनि करीं, सागरीं उडी घाली,
झाली यादवसंहति तिकडे, मग अर्ध हरिकडे आली. ४८
रामाकडील यादव ते धरिती चिन्ह वेगळें धीर,
कृष्णाच्या पक्षींचे लँक्ष्म निराळें चि वरिति ते वीर. ४९
जळवाद्यें वाजविती, उडविति जळयंत्रहस्त नीरातें,
गाती भाषागीतें, ताडिति सिंधूंत वीर वीरांतें. ५०
जरि चंद्रसहस्रातें निर्मळ आकाश एकदा धरिल,

१. [illegible] स्नान. २. बलरामाची. ३. नक्रादि जलचर नाहींत [illegible]. ४. [illegible] ज्याचें असा. ५. शत्रुरूप चंद्राचा [illegible] ६. जूं (पुढारीपणा). ७. खूण. ८. देशभाषेतील गाणीं.

तरि वृष्णिसुरवधूमुखरम्य जलधिची बरोबरी करिल. ५१
प्रथम निघुनि बाहिर, हरि सर्वांतें कळवि हा, ' रहा, निकर
होतो अभिमानास्तव, म्हणुनि न हो जळविहार हानिकर.' ५२
मदिरामत्त, महाबळ, मानी, यादव न भंग लव घेते,
जळकेलींत हि मरते, कलह परस्पर करूनि, अवघे ते. ५३
यदुपति निघतां चि, निघुनि सर्व हि आले क्षणांत बाहेर;
असुनि हि तेज, निर्यमिलें कैसें भालें क्षणांत, वा! हेर. ५४
मग आपण घे, आर्धी मुनिला अनुलेपनादि दे, वरद,
शोभाप्रद शुद्ध द्विज मानी, निज तेवि तो न देव रद. ५५
कृष्ण म्हणे, ' अवसर हा, यादव हो! पानभोजनाचा, या.'
लागति, पाहुनि हरिपद निजपदसोपान, भोज नाचाया. ५६
नानाविधें सदन्नें, मांसें, सेविति तसे च आसव, ते
वासव तेज न साहे, अजिताचे जन जनांत वा! सवते. ५७
उद्धव, अक्रूर, असे जे धर्मसहाय विष्णुचे भक्त,
व्यक्त श्रीविष्णु च ते, कीं विषयीं सर्वथा न ते सक्त. ५८
सेविति पायसगोघृतभक्तांतें संतराय शाकांतें,
ऐसें जें बुडविल सुखसह, मळवुनि अंतरा, यशा, कां तें ? ५९
रात्रौ सभेंत बैसुनि, सांगे छालिक्य गेय योजाया,
ज्या ते भजति, म्हणति जे, ' स्वर्गादि पदार्थ हेय; यो जाया.' ६०
छालिक्य गेय अद्भुत अति ऐके रेवती जधीं, कन्या
च्यार सहस्र युगांतें मानी दिन एक तातसह धन्या. ६१

---

१ कृष्ण—**पंत.** २ युद्ध ३ आवरलें. ४ दांत. ( ' शुद्ध ' ' द्विज ' हीं पदें श्लिष्ट आहेत ) ५ येथें आद्यतयमक साधण्यासाठीं व चा व केला आहे ६ कांहीं अपूर्व, वेगळ्या च प्रकारचे, इतराप्रमाणें नव्हेत असे. ७ भक्त=भात. ८ अंतःकरणाला ९ गाण्याचें नांव. १०. त्याज्य ११. जावयास येवो; आला असता आम्हांकडून त्याचा सत्कार होणार नाहीं

षड्ग्राम जयांसि, अशा रागांहीं दे जना समाधीतें.
मुनि वीणा घे, रुचली सुमहाविद्याधनासमा धीतें. ६२
वाजवुनि वेणुतें, जें गाणें नटणें बहुस्त्रियांसहित,
तें हल्लीसक वरितो विश्वोद्धारार्थ सत्सभामहित. ६३
हल्लीसक आदरिलें जेव्हां सप्रेम सर्वदेवाद्यें,
पार्थ मृदंगप्रमुखें सर्वांतें परम हर्ष दे वाद्यें. ६४
देववधू वाजविती अद्भुतगुणरूपराशि वाद्यांतें,
ज्या मान्या, देवांच्या करणाऱ्या रू परा शिवाद्यांतें. ६५
प्रथम प्रसन्नचित्तें ये रंभा देवनर्तकी रंगीं,
ती रामकृष्ण सुखवी, अभिनयनिपुणत्व बहु जिच्या अंगीं. ६६
ये उर्वशी मग महानिपुणा रंगीं, जसी सदा रंभा,
करि ती मोमाँपरिणयनाटकरसरीतिच्या सदारंभा. ६७
तैसी च मिश्रकेशी, तिलोत्तमा, मेनका हि, हेमा, या
प्रभुतें त्या त्या रूपें सुखविति, ज्याची त्रिलोक हे माया. ६८
अनिरुद्ध, सांब, राम, प्रद्युम्न, प्रभु तसा चि कंसारी,
गाय स्वयें, रसें त्या होयील कसा न धन्य संसारी? ६९
त्या त्या वाद्यें, नृत्यें, भरिला तो सर्व रंग रागानें.
छालिक्यें जीव निवे सकळ, जसा देह अंगरागानें. ७०
छालिक्यें अत्यद्भुत गांधर्वें सर्व पाप, ताप, सरे;
चंद्रासि चकोराचा, रसिकाचा या रसासि 'आ' पसरे. ७१

१ ग्राम=सप्तस्वरांचा समूह, षड्जग्राम=षड्जापासून निषादापर्यंतच्या आरोहानें सप्तक राग=मनास रंजविणारी सप्तस्वरांची विशिष्ट रचना २. नाचणें. ३ नाचण्याचा एक प्रकार. ४ देवशत्रुतें उडविणाऱ्या—भस्म करणाऱ्या—अग्निशिखा—**पंत.** ज्या (देववधू) शिवादिक देवाना पूज्य व देवांच्या परा (शत्रूना) रू (कापसासारख्या) करणाऱ्या. ५ स्वर्गातील कलावतीण ६. सभेंत ७. मा (लक्ष्मी)+उमा+परिणय (लग्न) ८. उत्तम आरंभास. ९. प्रेमानें, उत्साहानें. १०. चंदन वगैरेंच्या उटीनें.

छालिक्य सिंधु, तद्रस नरलोकीं एकबिंदुसा राया!
प्रभुनें लेश उरविला, जनतापा, जेंवि इंदु, साराया. ७२
छालिक्य परम मंगळ मुनिराजें वर्णिलें सविस्तर तें;
याच्या श्रवणें हि भवीं श्रोत्यांचें वृंद बहु सुखें तरतें. ७३
भगवच्चरणांसि नमन करुनि सुरवधू, प्रसाद पावून,
गेल्या स्वस्थानातें; प्रभु निववि स्वजन कुतुक दावून. ७४

---

# अध्याय चवतिसावा.

क्रीडाप्रसक्त यादव असतां, दानव निकुंभ मायावी
भानुसुता भानुमती ने; खळहृदयांत कां क्षमा यावी? १
कीं वज्रनाभ याचा भ्राता, त्याची प्रभावती तनया
हरिली, तो ही वधिला, प्रद्युम्नें, या स्मरे मनीं अनया. २
होता छिद्र[2] पहात द्वारवतीच्या वनांत दानव हा,
ज्याच्या त्रासें म्हणती सुर, मग कां न म्हणतील मानव हा!
बहु आर्त नाद करिती अबला अंतःपुरांत भानूच्या,
द्राक्षा खातो लंघुनि खर कटकाला हि रत्नसानूच्या[3]. ४
वसुदेव, उग्रसेन, त्राणार्थ त्वरित धांवले, परि तो
नाहीं दिसला, गेला; मायाबळ खळ असें चि बा! करितो. ५
ते भानुमतीहरण प्रभुतें कथिती स्वयें चि भेटोन,
सार्जुन गरुडीं बैसे, क्रोधें भगवान् मुकुंद पेटोन. ६
चढुनि रथीं, 'मागुनि ये,' प्रद्युम्नातें असें स्वयें सांगे;
गांठुनि वज्रपुरपथीं अरिस, म्हणे प्रभु, 'मुली! भिसी कांगे!?'
पाहुनि तिघांसि, झाला तो आपण हि त्रिधा गदापाणी,
वामकरीं कन्येतें धरुनि, गदेनें तिघांस ही हाणी. ८

---

१. त्रासानें २. न्यून, व्यंग, कळ काढण्यास निमित्त. ३. हिऱ्याचें शिखर असलेल्या पर्वताच्या ( मेरुपर्वताच्या ) तीक्ष्ण कड्याला. ४. तीन प्रकारें.

जरि हि समर्थ परवधीं, वीरांच्या वीरराज नति घेते,
निर्दय होवुनि, कन्येकरितां करिति प्रहार न तिघे ते. ९
वैतस्तिक[1] बाणाहीं प्रद्युम्नजनार्दनार्जुन क्रोधें
ताडिति, कन्या रक्षुनि शिक्षेनें आणि युक्तिच्या शोधें. १०
भानुमतीसह होवुनि गुप्त निकुंभ त्रिदेह चोर, पळे;
जाणों तो गज त्यांच्या सायकदावानळांत[2] होरपळे. ११
परि लागले चि त्याच्या कृष्णार्जुन काम[3] वीर हे मागें;
वज्रापुढें धरावा प्रबळें ही काय धीर हेमागें? १२
गांठुनि समीप येतां शीघ्र तिघे वीरराज मारीत;
झाला पक्षी सहसा तो मायावी निकुंभ हारीत[4]. १३
हाणी वैतस्तिक खरतर शर नरराय[5] गाढकायाला;
कन्या महौषधि करीं, शस्त्रांचा काय गा! ढका याला? १४
सप्तद्वीपा पृथ्वी श्रीकृष्णानुगत[7] तो अरि भ्रमला,
गमला वातमनोगति[8], बहुचळ परि धांवतां बहु श्रमला. १५
उत्तरगोकर्ण महागिरितें तो दुष्ट लंघितां पडला,
त्रिजगदलंघ्यप्रभुपदलंघनपरमापराध त्या घडला. १६
असुर, सुर, तपोधन मुनि, ज्या परमेश्वरपदा सदा नमनें
करिति, तयातें लंघी, जें लंघावें नृपा! कदा न मनें. १७
पडतां गोकर्णातें लंघुनि, तो देवसिंधुपुलिनीं[9] च,
प्रभुसुत सांवरुनि म्हणे, 'हो सावध, हा मरेल मुलि! नीच.' १८
मूर्छा जाय, उठे, तो कृष्णशरार्दितें[10] निकुंभ, मग नेतें
लावी मित्रपणाचें पवनासीं[11], आक्रमूनि गगनातें. १९
जाय यमदिशेसि[12], तयामागें केशव सपार्थ तो लागे;

१. बाणविशेष. २ बाणांच्या वणव्यांत ३. प्रद्युम्न. ४ पक्षिविशेष. ५. अर्जुन ६. दृढदेहा निकुंभाला ७. श्रीकृष्ण आहे अनुगत (पाठीस लागलेला) ज्याच्या तो. ८ वारा व मन ह्याप्रमाणें गति असलेला, अत्यंत वेगवान्. ९. गंगेच्या वाळवटांत. १०. पीडिलेला. ११. वाऱ्यासारखा पळाला १२. दक्षिणेस.

वनदिग्देवी[1] म्हणती, 'राहुसवें हा अपार्थ[2] तोला, गे!' २०
अरि षट्पुरांत गेला, सार्जुन हरि राहिला बिलद्वारीं, २१
ज्याचा प्रताप पूजित साधूंच्या वरसभामिलद्वारीं.[3] ः
प्रभु पुत्रासि म्हणे, 'ये सत्वर, नेवुनि पुरासि मुलगीतें.' ७३
केलें क्षणांत तें चि प्रद्युम्नें सर्ववृष्णिकुलगीतें. ः
तन्नियति गुहेसि म्हणे, 'हा असुर कशास गे सखि! लपाला?[4]
वांचेल कसा गरुडा वंचुनि अहि, तेंवि या अखिलपाला?' २
प्रभु, पार्थ, प्रद्युम्न द्वारीं असतां हि, धरुनि आवांका,
असुर बिळांतूनि निघे, म्हणता देवांसि, 'करुनि आ वांका.'
निघतां बिळांतुनि, तया पसरुनि शरजाळ, पार्थ कवि रोधी.
हाणी गदा नरशिरीं, व्हाया निजबाहुसार्थक, विरोधी. २५
बहुकंटका परगदा बसतां चि शिरीं धनंजय भ्रमला;
भ्रमला, गमला मृतसा, कृतसाहस रक्त भडभडां वमला. २६
प्रद्युम्नशिरीं हि गदा घाली, चुकवूनि दृष्टिला, दुष्ट;
हा ही मूर्छित होतां, झाला चित्तांत पाप तो तुष्ट. २७
पुत्र हि, सखा हि, मूर्छित पाहोनि, गदा गदाधरें धरिली,
परि लीला हे प्रभुनें संकल्पें[6] सृष्टि निर्मिली, हरिली. २८
आला समर पहाया, निजगजराजीं चढोनि पाकारी,
गर्जे; प्रभुतें जाणों निववाया दृष्टि देव हाकारी. २९
जेंवि महापुरुष धरी, तेंवि अरिवधा महासुर गदेतें,
दे भय इतरां, गांठुनि मूषकपति, मूषकां उरग दे तें. ३०
मंडळगति हरि, अरि ही, गर्जे, गरगर गदा यदा फिरवी,
हरि हि, अरि हि, गज वाटे, परि गज तो, जो सदा मदा मिरवी.
असुरेश सुरेश करिति पुष्पवतीकारणें महायुद्ध,

१ वन व दिशा याच्या देवता २ व्यर्थ—**पंत.** ३ श्रेष्ठ सभेमध्यें येऊन मिळणाऱ्या समुदायानीं ४. विश्वपाळकास. ५ शत्रु. ६. इच्छामात्रेंकरून. ७ नाहीशी केली ८. इंद्र. ९. जेव्हां.

वृषभ जसे, द्विरद जसे, कीं शालावृक[1] जसे, तसे क्रुद्ध. ३२
जों हरिस अरि समरपटु, ताडी तों अरिस हरि सदाधार[2],
ज्याच्या अहितवधूंच्या डोळ्यांला लागली सदा धार. ३३
साहुनि अरिप्रहार, स्वगदेनें अरिस मस्तकीं ताडी,
पाडी, आपण हि पडे, पतनें सुरधृति[3] दिगंतरीं धाडी. ३४
वैकुंठांगुष्ठोदरगत[4] बहुशिव सुरसहाय हा यव दे.
तत्पातें जग, जैसें गळतां करसुरस, 'हाय! हाय!' वदे. ३५
देखति बहु प्रपंचीं सर्वत्र अनित्यवस्तुचा[6] लोक,
त्यां जाणों प्रभु दावी अत्यद्भुत नित्यवस्तुचा शोक. ३६
जें गगननदीजीवन[7] बहु शीत, सुगंध, अमृतमिश्र करी,
सिंची शक्र प्रभुवरि, तें तत्क्षण सर्व मोहताप हरी. ३७
प्राप्तप्राण हरि उठे, चक्र उगारुनि म्हणे, 'अरे! घे रे!
संसारींचे चुकविल षड्रातींचे[8] हि हे अरे! घेरे.' ३८
ऐसें देव वदे, तों अतिमायावी निकुंभ, देहातें
सोडुनि उडे, पळे, खळ, सोडी, जन जेंवि दीप्तगेहातें. ३९
श्रीव्यास म्हणे, 'आलें कपट खळाचें न केशवध्यानीं.
केलें असें हि जरि, परिहरिलें प्रभुयश न लेश वध्यानीं.' ४०
देव म्हणे, 'उठल्यावरि वधिन, उचित हा असा वधा नाहीं;
कीं, वीर व्रत रक्षी, बुडतें वधिल्यां असावधानाहीं.' ४१
तों सावधान होवुनि, पार्थ, प्रद्युम्न, पातले जवळ,
अरि वधुनि, मेळवाया यश शशधरराशिहूनि जें धवळ ४२

---

१ लांडगे २. सज्जनाचा आश्रय ३ देवांचें धैर्य सुटलें. ४ वैकुंठ (विष्णूच्या)-अंगुष्ठोदर (हाताच्या आंगठ्याच्या मध्यभागीं)-गत (असलेला) हा यव (कृष्ण-कृष्ण हा विष्णूच्या अंशानें अवतरला असल्यानें त्यावर शरीराच्या [...]का भागाचा आरोप केला आहे) अत्यंत कल्याणप्रद असा देवांना साहाय्य दे [...]यव (आंगठ्यावरील चिह्न) शुभप्रद आहे हें सामुद्रिकास माहित आहे च]
५ हातांतील उत्तम रस ६ परब्रह्म जो कृष्ण त्याचा ७ आकाशगंगाजळ.
८ कामक्रोधादिकांचे फेरे

मायावी काम मनीं समजे[1], प्रभुला म्हणे, 'अहो तात!
येथें निकुंभ नाहीं; अतिकपटी हत सुखें न होतात[2].' ४३
ऐसें प्रद्युम्न वदे, तों होय अदृश्य परकळेवर तें;
मायाबळ योगबळाहुनि नीच, पळार्ध [3] पर कळे वर तें. ४४
करिती यदुकुरुकुळवर कृष्ण, न पाहुनि कळेवरा, हास्य;
हें कुतुक ध्यातृजनां, अधिक तयाहुनि कळे वराहास्य. ४५
नरनारायण हांसति, वंचन करितां, धरूनि रागा, जों,
तों लागले निकुंभ व्योमीं बहु शतसहस्र वा! गाजों. ४६
अयुतसहस्रें भूवरि, गगनीं भरले निकुंभ, किति हरितें,
किति कामातें वेष्टिति, किति विजयातें; विचित्र करि अरि तें.
किति पार्थाच्या धनुतें, किति झोंबति ते निकुंभ भाल्यांतें,
किति भुज,किति चरण,धरिति,संख्या,भीति हि,नसे चि वा! त्यांतें.
यापरि धरुनि धनंजय, गगनीं नेला, नृपा! असी मोटी
माया केली, दिसती ते कोटि निकुंभ, पार्थ ही कोटी. ४९
अंत निकुंभांसि नसे, गगनीं, पार्थांस ही नसे अंत,
ऐसें मायाकौतुक असुराचें अतुळ वर्णिती संत. ५०
दिव्य ज्ञानें. कृष्णें, प्रद्युम्नें, मुख्य शत्रु लक्षून,
केले छिधा शरांहीं सर्व हि ते, मूळ पार्थ रक्षून. ५१
कपटनिकुंभ च्छेदुनि बाणांहीं, मुख्य मारिला चक्रें,
सोडविला पार्थ, जसा प्रभुनें गजराज पीडिला नक्रें. ५२
गगनांतुनि पार्थ पडे, पडतां होता चि निश्चयें चूर्ण,
प्रद्युम्न प्रभुवचनें त्यातें परि सांवरूनि घे तूर्ण. ५३
सन्मुनि करिती, 'जय! जय! पाहि[6]! नमस्ते[7]!' अशासह स्तवन;
स्वर्द्रूचें[8], गंगेचें, जोडी ज्याच्या यशास हस्त, वन[9]. ५४

---

१ त्या कपटी राक्षसाचें कपट आहे ही गोष्ट २. लबाड सुखें (सहजगत्या) हत न होतात (मरत नाहींत) ३ परतु एक क्षणभर तें श्रेष्ठ असेंचें वाटलें. ४ वराहाचें तोंड. ५. कृष्ण व अर्जुन ६. रक्षण कर. ७. तुला नमन असो. ८. स्वर्गतरूचें (कल्पवृक्षाचें). ९. अरण्य [पक्षीं] उदक.

सुर कुसुमवृष्टि करिती, वाद्यें विविधें उदंड वाजविती,
गाजविती सर्व दिशा जयजयकारें, घनांसि लाजविती. ५५
पार्थातें सांत्वुनियां, गरुडीं वाहुनि, सकाम वनमाळी
गेला, पुर सुखवाया धावुनि जैसें स्वकीय वन माळी. ५६
द्वारवतींत हि होता, देता भवसिंधुपारदान मुनी;
त्या परमप्रियभक्ता पूजी श्रीकृष्ण नारदा नमुनी. ५७
भानुमतीजनकातें विधिज म्हणे, "स्ववश जग न भानो! हें
क्षणभरि ही; आश्रय तूं या दैन्या मोहखगनभा नोहें. ५८
दुर्वासा दुर्ललितें भानुमतीच्या धरी मनीं ताप,
'जायिल हे शत्रुकरीं,' ऐसा दे रैवतीं इला शाप. ५९
तो मुनि, मुनिजनसह त्यां स्तवुनि, विनविला, 'असा कुलीनाहीं
न करावा कोप, मुने! काय चुकत लाडक्या मुली नाहीं? ६०
दे कन्येसि अभय, बा! भरितो चि तुझा अनुग्रह रित्यातें,
आम्हीं तुज विनवितसों, निजबाळक जें, अनुग्र हरि त्यातें.'
द्रवला मुनिवर, वदला, 'शत्रुकरीं सांपडेल, परि कन्या
दूषण पावेल न हे, वाहेल सुगंध सर्वदा, धन्या. ६२
सुभगा पुत्रवती हे होयिल, वांछिति जसा मुली नवरा,
पावेल, वाढवाया लोकांत यशा, तशा कुलीन वरा.' ६३
देता झाला भगवान् दुर्वासा प्रार्थिला वर दहानीं.
न करिति च, पाय धरितां करितां, विज्ञापना, वरद हानी. ६४
म्हणुनि सुता शत्रुकरीं गेली, केली यदूत्तमें मुक्ता,
युक्ता सहदेवा हे द्यावी, हंसा खगा जसी मुक्ता." ६५
या श्रीनारदवचनें हा अर्थ युधिष्ठिरासि जाणविला,
प्राणविलासी साक्षात् कृष्णेचा केशवें त्रि आणविला. ६६

---

१ नारद २ आपल्या अधीन, आपल्या तंत्रानें चालणारें. ३ अज्ञान-रूपी पक्ष्याच्या आकाशाला—दैन्याला—तूं (भानु) आश्रय करूं नको, वेड्यासारखें मनाला वाईट वाटूं देऊं नकोस. ४ हट्टीपणानें ५ सिद्ध. ६. हेतु.

माद्रेयासि दिली ती, विधिवत् पूजुनि, भानुनें कन्या.
या प्रभुविजयश्रवणें विजय मिळे आस्तिका जना धन्या. ६७

# अध्याय पसतिसावा.

राजा म्हणे, 'मुनींद्रा! सूचविला जो मला निकुंभवधीं,
तो वज्रनाभवध, वद, कामें केला कसा, तसा च कधीं?' १
वैशंपायन सांगेः–मेरुनगीं वज्रनाभ तो तपला,
लुब्धं जसा वित्ताला, बहु यमनियमांसि सर्वदा जपला. २
'देवावध्य असावें' वरदा धात्यासि असुर मागे हें,
वज्रपुर पुर, धरावें तेणें बहु जेंवि वसु रमागेहें. ३
माझ्या आज्ञेवांचुनि ज्याच्या सुसमर्थ हात, शिर, काया,
अक्षम हो, किंबहुना मम वज्रपुरांत वात शिरकाया. ४
चिंतन केलें नसतां, कामांची प्राप्ति नित्य हि असावी,
मद्वज्रपुराभवतीं शाखानगराळि सुंदर वसावी ५
अतिरम्य आसमंतान्मंडळ नंदनतसें उपवनांचें,
त्यांत असावें तांडव सर्वर्तूंचें सदा, सुपवनांचें.' ६
ब्रह्मा म्हणे, 'दिलें हें.' झालें तैसें चि सर्व वरदानें,
पुरवुनि काम, उरविला चिंतामणिचा न गर्व वरदानें. ७
ख्याति वराची झाली राया! लोकत्रयांत ती मोटी;
आणुनि रत्नोपायन, दैत्यांच्या त्यासि भेटल्या कोटी. ८
प्रमुदित रत्नसमृद्धीं वज्रपुरीं वज्रनाभ तो राहे,
त्रैलोक्यस्वामित्वप्राप्तीचा काम मानसीं वाहे. ९
स्वर्गीं जावुनि भेटे तो शक्रातें, म्हणे, 'तुवां प्राज्य
त्रैलोक्याचें केलें, कश्यपसुत मीं हि, करिन हें राज्य. १०

१ लोभी मनुष्य २ संपत्ति. ३ लक्ष्मीच्या मंदिरानें. ४. दुय्यम नगरांची पंक्ति.

दे राज्य, हो निराळा, कीं[1] मजला दे सुरेश्वरा! युद्ध.'
सांत्वुनि तया, हरि वदे सुरगुरुनें शिकविलें तसें शुद्ध. ११
'सत्र करितसे कश्यपमुनि, तुमचा आमुचा पिता आर्य;
तें सत्र संपल्यावरि तो चि करो, बा! असेल जें कार्य.' १२
शक्रासि पुसुनि गेला तो, देवांतें करूनि सत्रासें[2];
भेटे कश्यपमुनितें, जेथें होता वरूनि सत्रास. १३
'हें सत्र होय, तोंवरि जा वज्रपुरीं सुता! असायास;
मग युक्त तें करिन मीं,' तो तात निदेश करि असा यास. १४
ऐसी गुरुची आज्ञा होतां तो वज्रनाभ मग, राज्या!
गेला त्या आपुलिया, वात हि लंघी स्वयें न नगरा ज्या. १५
जाय द्वारवतींत, प्रभुतें तो वज्रनाभवृत्तांत
कळवी एकांतीं, जो चिंतेनें फार वज्रभृत्[3]तांत[4]. १६
श्रीकृष्ण म्हणे, 'आर्या! करिताहे अश्वमेध तात, न या
सोडुनि जावें, गीता जेंवि हरिण, साधु वेधतात[5] नया. १७
हा हयमख झाल्यावरि मारीन झटोनि वज्रनाभातें,
संपादाया आळस कोण करिल सुज्ञ किर्तिलाभातें? १८
परि वज्रपुरीं त्याच्या इच्छेवांचून वासवा! राया!
नाहीं प्रवेश कोणा; भीतो घ्यायासि वास वारा या. १९
त्या पविपुरप्रवेशीं चिंतावी म्यां तुवां हि बा! युक्ती,
सामर्थ्यें लंघावी कैसी त्या आत्मयोनिची उक्ती?' २०
अभयवर प्रभुपासुनि पावुनि, अति दुर्लभा हि नमनातें,
गमनातें करि हरि, दे चिंतूं युक्तीतरार्थ[6] न मनातें. २१
त्यावरि वसुदेवाचा तो हयमेध प्रवर्ततां, आला
अतिनिपुण भद्रनामा नट तेथें, प्रिय मुनीश्वरां झाला. २२
मुनि सुप्रसन्न झाले, वदले ते त्या नटासि, 'वर मागें,

---

१. किंवा. २. त्रासयुक्त; पीडलेले. ३. इंद्र. ४. [तांत=] ग्लानि पावला—पंत. ५. मोहिले जातात, गुंग होतात. ६. दुसऱ्या युक्तीकरितां.

अस्मत्प्रसादमित्रें वरिली भा भक्तपूर्वचरमार्गें.' २३
देवेंद्रश्रीकृष्णप्रभुसंकल्पें चि नाटकीं धाले,
कीं, त्या सुमानसीं बहु हरिहरगुणहंस आदरें आले. २४
बोले सरस्वतीनें प्रेरित तो भद्रनट असें नमुनीं,
भावी चित्तीं, 'यांचा पुत्र चि जन्मांतरीं असेन मुनी.' २५
भद्रनट म्हणे, 'मुनि हो! व्हावें सर्व द्विजांसि मीं भोज्य,
वाटावा साधूंला स्वप्रियसंपादनार्थ हा योग्य. २६
तुमचा प्रसाद, तोका सज्जनक, तसा मला जडा वाहो;
सप्तद्वीपांत सुखें संचार हि सर्वदा घडावा, हो! २७
सकळां भूतांला हा नित्य असावा अवध्य, सन्मुनि हो!
गगनगति, अरोग, अजर, मर्त्यांत हि हा अमर्त्य जन्मुनि हो.
जो वर्तमान, जो मृत, जो होणार हि, तसा चि वेषानें
व्हावें, ख्याति वहावी शुद्ध म्यां, जेंवि भूमि शेषानें. २९
द्या, सुगुण, तिहीं व्हावें मजवरि बहु सुमुनि अन्य ही तुष्ट;
मित्रकरें शशिमंडळ, हो यश तुमच्या वरें तसें पुष्ट.' ३०
वदले 'तथास्तु' मुनि ते, झाला भद्र प्रसिद्ध, तो हर्षें
हिंडे सप्तद्वीप, प्रेक्षी त्यांतील सर्व ही वर्षें. ३१
सन्मुनिवरप्रसादें सत्कृति सर्वत्र भद्रनट पावे.
त्या उत्तरकुरु भजले, कोण पहायासि भद्र न टपावे? ३२
पर्वीं पर्वीं ये तो भद्रनट, द्वारकेसि उद्धव दे,
करि नाटकप्रयोग, ब्राह्मीशुकपतिपरीस शुद्ध वदे. ३३

---

१. अस्मत्प्रसादमित्रें (आमचा संतोष हा च कोणी सूर्य त्याच्या प्रभावामुळे) भक्तपूर्वचरमार्गें (भक्त हा च कोणी अस्तपर्वत त्यानें) भा (प्रभा, तेज) वरिली. सूर्यामुळे जसा अस्तपर्वत तेजस्वी होतो, तसा आमच्या प्रसादानें भक्त आनंदपूर्ण होतो—निर्णय०. २ त्या नाटकरूप उत्तम मानससरोवरात—निर्णय० ३. आवडता. ४. सूर्यकिरणांनीं. ५. देश. ६. आनंद. ७. सरस्वतीचा पोपट.

शक्र म्हणे हंसांतें, "सुरकार्य करा प्रियंवद भ्राते
कश्यपपुत्र तुम्हीं शुचि, कीर्ति करिति, कुलज जे, अदभ्रा ते.
सर्वत्र तुम्हीं सत्कृत, जा वज्रपुरांत वज्रनाभाच्या,
क्रोडा वापींत करा, स्मरुनि उपायासि कीर्तिलाभाच्या. ३५
झाली आहे त्याला श्रीमद्गौरीप्रसादजा कन्या,
धन्या त्रैलोक्यांत हि तैसी नाहीं मराळ हो! अन्या. ३६
शोभे सरसी तुमच्या तेंचि गुणाच्या प्रभावती व्रातें;
मृदु न तीव्र कराया क्षम, मृदु हि जिचा प्रभाव तीव्रातें. ३७
अंतःपुरवापींत क्रीडा करितां प्रभावती रमणी,
भाग्यें पहा तुम्हीं ती, व्हा अर्थिसुविप्रभावतीरमणी. ३८
कर्णी प्रद्युम्नाच्या पेरा तद्रूपशीलगुणबीजा,
पिकवा प्रेम, करा त्या, अनलस यत्नासि करिति कुणबी ज्या.
मुख, नेत्र, कर्ण तीचे, प्रद्युम्नाचे, तुम्हीं स्वयें, जा, व्हा,
तील तयाची, त्यास हि तीची, सुतृषितसुधा चि हो आह्वा-
वृत्तांत मला कळवा प्रतिदिवस, तसा चि तो मदनुज्यातें,
श्रुति हि म्हणे 'अतिवत्सळ,' परि 'अतिवत्सळ' म्हणे न दनु ज्यातें.
तू गंधर्वांह, नलिनी ती, तद्गुणगंध सुवास, अळिवर तो,
भेटो प्रभावतीसीं, हंससमाजा तदिष्ट काळिव, रतो. ४२
देवावध्य असुर तो ब्रह्मवरें बहुत वाहतो दर्प,
क्षीरें पोषुनि, जैसा मत्त करावा निजाहिता सर्प. ४३
देवसुतप्रद्युम्नप्रमुखीं हंतव्य थापटुनि रसिकीं,
उन्मूळुनि युक्तीनें विचलित दंत, व्यथा पटु निरासि कीं. ४४
भद्रनटाचा, त्याच्या परिवाराचा हि, वेष धरितील,

१ समुदायान २ याचक व ब्राह्मण याचा जो भाव (हेतु) आह, [तो मनांत आणून] तो ॰पूर्ण करण्याच्या कामीं तीर (बाणासारखे वगवान्—चपळ) आणि मणि (चिंतामणीसारखे इच्छापूरक) व्हा—निणय० ३ कृष्णाला ४. वारा. ५. मारण्यास योग्य. ६ सावध करूनि कीर्तिरसलुब्धाहीं—पंत. ७. हलणारे.

वृष्णिकुमार पविपुरीं प्रद्युम्नादि प्रवेश करितील. ४५
पवन हि शिरे पविपुरीं आज्ञेवांचूनि न पविनाभाच्या,
युक्ति करा, जीणें तो रुक्म्याच्या दैत्य खपविना भाच्या. ४६
त्या शंबरासुराच्या पूर्वी मायावती जसी भवनीं,
तुमची युक्ति असावी प्रद्युम्नाच्या तसी रता अवनीं. ४७
याची प्रभावती ही, ती दमयंती जसी च, आर्यकरा.
हें काश्यप हो! आम्हां निजबंधूंत्रें जपोनि कार्य करा." ४८
शक्रप्रेरित, निपुण प्रथम तैसे[3] हंस अरिपुरा गेले,
अंतःपुरवापींत हि, शुभदर्शन म्हणुनि न रिपु रागेले. ४९
त्या वापींत सुरम्यें, कनकाचीं, स्पर्शनक्षमें, कमळें;
अमळें, अमृतसमरसें, शीतसुगंधें, यथेप्सितें, कमळें. ५०
वापी नाकीं न तशा बहुरम्या, रत्नरसनसोपाना;
यदमृत पिउनि म्हणावें तृषितें, 'तो अमृतरस नसो पाना.' ५१
त्यांतें पविनाभ वदे, 'स्वर्गींचे शुद्ध खग तुम्हीं वसते
आलां, बरें, सुखें या, गृह तुमचें, घ्या, अभीष्ट जे रस, ते. ५२
येत असावें उत्सवसमयीं हृदयीं धरूनि विश्वास,
मंगळ मिळतें तुमच्या दर्शनलाभेंकरूनि विश्वास.' ५३
ऐसी आज्ञा हि दिली त्या पविनाभें; सुखें मग मराल
अंतःपुरीं हि सिरले, म्हणति मनीं, 'पीडितां जग, मराल.' ५४
युक्तीनें उपडाया दृढमूळा जिष्णुच्या अरिचयातें[10],
दैत्यांच्या दयितांसीं करिती कवि हंस ते परिचयातें. ५५
गीर्वाणदेशभाषानिपुण कथिति हंस कवि कथा राया!
स्वर्गीं सुरांसि देत्या शत्रूचें हरुनि भाविक[11] थाराया. ५६
हंस प्रभावतीतें कथुनि कथा, करिति परिचिता, राया!

---

१ प्रद्युम्न ला. २ रतां ३ लागले च—निर्णय० ४. गेले—**पंत.** ५ हात लाव- ण्यास योग्य ६ उदक ७ रत्नखचित पायऱ्यांच्या. ८ मूळ पाठ—**पीयूषरस.** ९. मराळ, हंस १०. चय=समूह ११. कल्याण.

जाणों त्या रतिस शिवावाक्यें ते सिद्ध वरिति ताराया. ५७
हंसी एक शुचिमुखी, तीस करि सखी प्रभावती, राया!
प्रद्युम्नाचा वर्णी स्वजना म्हणता प्रभाव 'तीरा या.' ५८
प्रथम कथा कथुनि म्हणे, "यौवन न सखि प्रभावति! [१]स्थिरासी;
करिसि असें व्यर्थ कसें वपु, हरि ज्याचा प्रभाव तिमिरासी?
वर न वरिसि, बंधूनीं तू केलीस स्वयंवरा धन्या,
बहु अननुरूप गणिले, गेले सुर असुर, न भजसी अन्या. ६०
कामोपभोगतुल्या प्रीति जगीं स्त्रीजना नसे दुसरी,
पतिच्या संगावांचुनि सर्व स्त्रीच्या वृथा कळाकुसरी. ६१
सुंदरि! सुरवर वर येतां प्रद्युम्न जरि पहातीस,
श्रीविष्णुला जसी श्री, त्याला सर्वस्व तूं वहातीस. ६२
परि तो कशास येयिल येथें जगदेकवीर? सुंदर हा
अमृतनद म्हणे, 'प्या, जननयनें हो! वाढवूनि तुंदें, रहा.' ६३
सखि! नारींचा धीर प्रद्युम्नातें विलोकितां गळतो,
स्त्रीजन मीन चि वाटे, त्याचा रूपादि सुगुण जो गळ तो. ६४
देवांत देव, सुंदरि! योग्यगुणें दानवांत दानव तो,
सखि! मानवांत मानव, या नवल करूनि सर्व मानवतो. ६५
सर्व जगत्सार करूनि एकत्र, अनंग जो सुचिर काय,
केला सांग प्रभुनें तो, जैसा आपुला रुचिर काय. ६६
यदुवंशीं अवतरला विष्णु, तयाचा चि हा कुमारमणी;
श्रीरुक्मिणीसुतसा सुत वांछी शंभुची उमा रमणी. ६७
त्रैलोक्यांतिल गुरु गुण या प्रद्युम्नीं च वसति एकवट,
जाणों ग्रीष्मव्याकुळ पांथ चि ते, तो हि वसति एक वट." ६८
इत्यादि प्रद्युम्नस्तुति ऐकुनि, ती प्रभावती वदली,
"सखि! तात वदे, 'प्रसवलि अद्भुत कर्पूर देवकीकदली. ६९

---

१ कायम टिकणारे २. दोंद -**पंत.** ३. सत्व ४ जो काय अनंग (मदन) सुचिर (पुष्कळ काळ) अनंग (अंगरहित) तो प्रभुनें सांग केला. ५ वासस्थान-**पंत.**

श्रीकृष्ण विष्णु साक्षात्, सर्वेश्वर, दैत्यदानवाराती,
ज्याची कीर्ति, सुरांच्या तमा दे शैत्यदान वारा ती.' ७०
वृद्ध म्हणति, 'असुरांसीं कृष्णासीं तों कधीं नसे साम.'
जनककुळाहूनि पतिकुळ अधिक असावें असा वधूकाम. ७१
आज्ञप्त असति दैत्य श्रीकृष्णविनिग्रहार्थ मत्तातें,
हा त्यातें भंगाया बहु जपतो, तो हि या प्रमत्तातें. ७२
स्मरतें याचें त्याचें अनुदिन अन्योन्यवैर आग मन,
या वज्रपुरीं कैसें प्रद्युम्नाचें घडेल आगमन? ७३
व्हाया भर्ता प्राप्त प्रद्युम्न मला, मनांत सदुपाया
योजुनि सांग, सये! जो द्रववुनि आणील शीघ्र यदुपा या. ७४
प्रद्युम्नोत्पत्तिकथा सर्वा वृद्धस्त्रियांत आयकिली,
मीं म्हणतसें मनीं कीं,'या सुखनिधिची मिळेल काय किली?'
हें कार्य कराया, त्या प्रभुसूनुकडे तुवां चि सखि! जावें;
राज्ञीनें ही, देतां जीवन रुग्णानुगांसि, न खिजावें. ७६
हे तव अनुजा, तनुजा, अथवा दासी च, म्हण, न आलि; सये!
या कार्यां हि न व्हाया कोणा उपकारगणन, आलिस, ये." ७७
हंसी म्हणे, 'करिन, तों प्रभु तुज नेयील सुदति! शयनातें.
मज, साधुसभेस हि, सखि! तुमचें देयील मुदतिशय नातें. ७८
घालिति, परार्थ चि, धवलतर यश लक्षुनि, न आंग, जन कास;
परि मम कथाकुशलता, स्वहितार्थ, जपोनि सांग जनकास.'
तीची तातासि कथाकथनकुशलता प्रभावती कळवी,
श्रवण कराया त्याच्या चित्तातें रसिकतास्तवें वळवी. ८०
तो त्या हंसीस पुसे, 'शुचिमुखि! कांहीं अपूर्व सांग मला,
मीं हि कथारस जाणें, स्त्रीजन चि तुला रसज्ञ कां गमला?'
ती हंसी मधुर वदे, 'असुरेंद्रा! शांडिली सती मोठी

---

१ समुद्रास–पंत. २ आज्ञापिलेले. ३. पकडण्यासाठीं. ४ पाणी ५. रुग्णा (रोगी) अनुगा (दासी) ६ अत्यानंद.

म्यां देखिली सुपुण्या, कीर्ति जिची सेविती सुधी कोटी. ८२
हे सुमति मेरुगिरिच्या पार्श्वीं वसती; असी च या दुसरी
ती सुमना कौशल्या, तनु ज्यांची वाळली जसी उसरी. ८३
या प्रियसखी शिवेच्या करुनि सदा सर्वभूतहित राया!
जीचा प्रसाद नव्हतां, योग्य भवातें न पूत हि तराया. ८४
ज्याचें, सुर, सज्जन ही, सप्रेम पहावया वदन टपती,
तैसा चि देखिला मुनिदत्तवर सुसत्क्रियापद नटपती. ८५
द्विजभोज्य, कामरूपी, सर्वद्वीपांत हिंडतो, याचें
शुचि गीत, नृत्य सुमधुर, मित्र न देखूनि खिड तोयाचें.' ८६
पविनाभ म्हणे, "चारणसिद्धमुखें ऐकिला असे नट तो,
नाना कौतुक करितो, सर्वद्वीपांत सर्वदा अटतो. ८७
शुचिमुखि! हंसि! अनुभवुनि सुरगांधर्वादिका, नहा वाहें
चित्तांत सर्वदा मीं, 'सद्गुणनिधि भद्रनट पहावा' हें." ८८
हंसी म्हणे, "म्हणतसे 'भद्रा बुधतोष हें चि' भद्र 'सिकें,'
सर्वें हि देखिला हो! तो नटगुण हार्यं आर्यसद्रसिकें. ८९
'तूं सुगुणज्ञ प्रभु,' हें कळतां येयील आपण चि राज्या.
वांछी रसिक नंवाज्या, करितो न पवोनि आ पण चिराज्या.
लोकांत गुणी जन, ते सुगुणज्ञातें स्वयें चि हुडकीती,
गुणवत्ता एक, दुजी, ज्ञात्याची साधुउक्ति, कुडकी ती." ९१
असुरेंद्र म्हणे, 'हंसि! त्वरित चि यो भद्रनट पुरा; तनया
कथिती कुशलपण तुझें; हंसख्या स्तविति कवि पुरातन या.'
पविनाभें असुरेंद्रें हंस शुचिमुखीसमेत बोधूनीं
पाठविले आणाया भद्रनटातें जगांत शोधूनीं. ९३

---

१ सुकविलेली भाजी २ चांगल्यांनी सत्कार करण्याजोगा ३ ब्राह्मणाचा आवडता. ४ ? ५ फिरतो. ६ गुणज्ञ—**पंत.** ७ मनोहर किंवा प्रयत्नांनीं अर्गीं आणलेले. ८. उत्तम रसिकानें ९ राज्याप्रति—**पंत.** १० ताज्या तुपाला. ११ परंतु शिळ्या तुपाला [तें प्राप्त झालें तरी] 'आ' करीत नाही. १२. चिरकालीन घृतातें—**पंत.** १३. गुणीपणा.

त्या[1] या[1] हि हरिस कथिती स्वर्गीं, सागरपुरीं[2], सुख गमाया,
सुरसाधुशत्रुनाशाकारितां करिती असी सुखग[3] माया. ९५
प्रभुनें आज्ञा करितां होय प्रद्युम्न भद्र नटपाल,
सुचवि, 'उराल, संदहितें[4] जरि कीं व्हाया स्वभद्र, न टपाल.'
प्रद्युम्न होय नायक, सांब विदूषक, तसा चि गद राहे
श्रुतिधर होवुनि, भगवन्मायेनें पावती च न दरा हे. ९६
निपुणा वेश्या सजिती, वेषें होवूनियां नटी, काया,
भरतकृत ग्रंथ चि हे नट, यांच्या होति कां न टीका या? ९७
मायारचितविमानीं ते प्रद्युम्नादि सर्व ही बसले,
छळुनि, अरिस बुडवाया गेले, कीं अनय कां मनीं न सले? ९८
वज्रपुराच्या शाखानगरीं ते नट नभःपथें गेले.
ठेले, जेथें असुरप्रवर बहुत नगरपाळ जे केले. ९९

---

## अध्याय छत्तिसावा.

सुपुरींच्या[5] असुरांतें, 'द्या गृहसाहित्य सर्व जें इष्ट,'
पविनाभ करी आज्ञा हे; कीं, प्रतिकूळ जाहलें दिष्ट[6]. १
भद्र महानट आला, झाला बहु हर्ष असुरवर्गांत,
स्वर्गांत तयाहुनि बहु, ज्याच्या गणनीं न शक्ति गर्गांत[7]. २
भेटति परवृंदें त्या, बहुरत्नांचें उपायन वहातीं;
कीं, परमानंदाचा आला अद्भुत उपाय नव हातीं. ३
भद्रा सुरारि सेविति, तैंचि पिपीलिक रसा न सेव्या ही,
व्याह्या प्रियतनयेच्या लग्नीं जपला तसा नसे व्याही. ४

---

१ इद्रास व कृष्णास २ द्वारकेंत ३ उत्तम पक्षी, हंस ४ सूर देणारा, साथीदार ५ सुपुरी—पत्त. ६ देव ७ गर्गाचार्य हे प्रसिद्ध ज्योतिषी व उत्तम गणिती होते ८ साधूचें अहित करून.

ते वेषधारणार्थ श्रेष्ठ मणि स्वर्णभूषणें, वस्त्रें,
देती बहुमोलाचीं बहु, न मिळावीं कधीं च जीं शस्त्रें. ५
पौरासुरवीराहीं तन्नाट्य पहावयासि, आधीं तें
आरंभविलें विनवुनि, दारांसि वहावयासि आधींतें. ६
जें श्रीमद्रामायणनाम महाकाव्य नाटकीं रचिलें,
आरंभिलें नटें तें, सत्पदक चि सुगुणमणिगणें खचिलें. ७
श्रीविष्णुजन्म आधीं, सांग आणुनि, सांग दाखविलें.
त्यां तें वेड चि लावी, जैसें बाळांसि अमृत चाखविलें. ८
जें लोमपाददशरथ धाडुनि पटु गोपिकांसि शांतार्थ
विषयांत ऋष्यशृंगा आणी, दावी समस्त शांतार्थ. ९
तें दाखविलें सुचरित सुरसभरित, परि तसें जना झालें,
तृषिता मिळे सुरस जळ, पीता चि सरे, न चित्त जों धालें. १०
तो भद्र, राम, लक्ष्मण, शत्रुघ्न, भरत, सुनाटकीं दावी.
वा! ऋष्यशृंग, शांता, त्यां असुरांस हि नमावया लावी! ११
नटवेषें दाखविती तत्तद्रूपा, असत्य परि सांगा;
त्या काळींचे दानव मानवलें, हें गुरूक्त परिसा, गा! १२
वृद्ध सुविस्मित झाले, रावणवध, दशरथें दिले वर ते
दाखविलें, जाणविलें नाटक कीं अमृत हें इलेवरतें. १३
ते असुर नाटकींचे सर्व चमत्कार अतुळ पाहून,
नाट्यविशेषीं देती भूषण, वस्त्र, स्वयें, न वाहून. १४
जें कांहीं उत्तम, तें ते दानव दैत्य अर्पिती वस्तु;
स्वस्तुत्यादि न करिती, तद्वधनसक्त म्हणति ते 'अस्तु.' १५

---

१. युद्धानें. २ आपल्या बायकांस दुःख भोगावयास लावण्याकरितां ३ शांता-नामक मुलीसाठीं ४ देशांत ५ शांतरसपूर्ण नाटक ६ न मागतां ७ नाश-पंत. तद्वधनसक्त (त्याचा म्हणजे असुराचा नाश करण्यास तत्पर असे) ते (भद्रादि) स्वस्त्युत्यादि न करिती (आपला बरा च कार्यभाग झाल्याबद्दल आनंद न प्रकट करितां) 'अस्तु' (ठीक आहे, असो) असें म्हणती.

त्या असुरातें स्तविती, तत्त्वंशप्रवर्तका ऋषितें;
वर्धविति अरिजनातें, अतीं कापावया जसें कृषितें. १६
परकटक नटकविवरें प्रद्युम्नें प्रभुसुतें कुटिलकुटिलें
भुलवुनियां, श्रीरामायणनाटकरसवरासवें लुटिलें. १७
कोणी दे कुंडलयुग, कोणी ग्रैवेय, मुद्रिका कोणी,
कोणी उष्णीष, पदक, हार, न पुरती नगां अयुत गोणी. १८
'हा नट सत्काराया योग्य तुला दितिजदनुजपाळाला,'
सांगुनि पाठविलें हें पौराहीं अहितकटककाळाला. १९
दैत्य म्हणे, 'आणावा,' नेती ते पौर पटु नटा कविला,
न त्यजिला विषय जनें, दैवें जो कटु न झटुन टाकविला. २०
सिरला, स्वीकारुनि नटवेष, पविपुरांत कृष्णसुत, राज्या!
सुरदुस्तरा सहस्र हि शंबरमाया रणांत सुतरा ज्या. २१
त्या विश्वकर्मनिर्मित मंदिर दे दैत्यदेव उतराया,
सदहित बुडे चि, जपतप वर, हर हि जिणूनि, देववु तराया. २२
वेषार्थ शतगुणोत्तर तो दे साहित्य, भूषणें, वासें;
करवि महाकाळोत्सव, ज्या प्रभुच्या नुरति दूषणें वासें. २३
रचवी स्थळ देखाया स्वस्त्रीपौरासवीरसमुदाया,
सांगे सचिवांसि, 'नटा पूजुनि, घेवूनि, धीर समुदीं या.' २४
परिविश्रांत नटातें असुरप्रभु विपुल पाठवी रत्नें;
वेषग्रहणाकरितां आज्ञापी सचिव बुद्धिच्या यत्नें. २५
आपण मुख्य स्थानीं सज्ञाति बसे नटांसि देखाया,
मंत्री एकैक तबक मुख्य विड्याचें भटांसि दे खाया. २६

---

१ वंशाचे मूळपुरुष ज त्यांना २ शेतातें ३ वरासव=उत्तम मद्य ४ कंठांतील अलंकार. ५ मदील, पागोटें. ६. राजा ७ जपतप शंकराला जिंकून (वश करून घेऊन) [स्वत.ला] तारण्याकरितां वर देणें भाग पाडील; पण त्याचें काय? तो जपतप करणारा जर सज्जनाशीं वैर करील तर तो तरून न जातां बुडेल च बुडेल, असा भाव. ८ वस्त्रें. ९. राहण्यानें. १० वज्रपुरपंडित—**पंत.** ११. सानंदित होण्यास.

असुरवरांतःपुरजन, करवुनि मणिरत्नजंवनिका मुक्ता,
स्थिति करि सामसखीजन रत्नगवाक्षीं सुखें जसी युक्ता. २७
सद्रक्षणार्थ यादव सुरशत्रुपुढें स्वयें चि गानाचा
अधिकार घेति, म्हणते जे गंधर्वाप्सरांसि 'गा, नाचा.' २८
नांदी करिती, स्तविती प्रभुतें विद्यानदीनगातें हो!
ज्याचें सयश म्हणतें, 'कविकुळ मातें न दीन गातें हो.' २९
यादवनट वाजविती शिववीणावेणुतालमुरज्यांतें,
आलापिति रागांतें, वदले ऐकोनि 'साधु!' सुर ज्यांतें. ३०
छालिक्यश्रवणामृत जें सुरगांधार, तें नटी गाती;
जांय समाधींत जसी, परमसुखाची तसी घटी गा! ती. ३१
गंगावतरणगीतें नांदी करिती, धरूनि नटतेतें,
सर्वजनमनोहर तें, प्रकटिति सत्कुतुक भैमें भट ते तें. ३२
रंभाभिसारनामक नाटक जें करिति ते तदारंभा,
गद रावण होय, गणस्त्री मुख्य मनोवती तदा रंभा. ३३
प्रद्युम्न होय तेथें नलकूबर, सत्य तो गमे आला;
झाला सांब विदूषक, हास्यरसें रंगें सर्व ही धाला. ३४
मायेनें कैलासा शैला सामर्थ्यसिंधु ते रचिती,
शोभा दाविति सर्वा, जी करिती अन्य अद्रि, येर चि ती. ३५
ज्या कर्मे दशवदना कोपुनि नलकूबरें दिला शाप,
दाखवि, चाखवि सांत्वनरस, हरि रंभामनस्थ जो ताप. ३६
रावणशापाह्लादें, जें पादोद्धरणनाम, तें नृत्य
दाखविलें, त्या मुनिचें, ज्याचें सुप्रिय चि सर्व ही कृत्य. ३७

---

१. पडदा २ खालीं सोडलेला ३ बसवी. ४ गवाक्ष=खिडकी. ५ मंगलाचरण. ६ विद्यारूपी नदीचा उत्पादक पर्वत त्याला, याचा उद्देश 'प्रभुतें' याजकडे. ७ रुद्रवीणा, मुरली, टाळ व मृदंग यातें. ८. वाहवा' ९. गंगा खालीं येण्याच्या पद्यानें. १० भयानक. ११. वेश्या. १२. कुबेरपुत्र. १३. समाज. १४. नारदाचें.

हें प्रकरण दाखविलें, असुरांत न भान लेश राखविलें;
बा! त्यांत श्रीनारदरूपवरामृत यथेष्ट चाखविलें. ३८
रंभाभिसारनाटकसुरसीं, वर्षांबुनीं जसे रेडे
खेडेगावींचेसे, पाहुनि ते असुर जाहले वेडे. ३९
देती मुख्यें वस्त्रें, देती रत्नें, अमूल्य आभरणें,
सानुग हि उदारपणें, रसिकपणें, अतुळवज्रनाभरणें. ४०
लुटिला कुटिलानीं तो खोजन हीं, काय देय न गमो त्या?
शोभार्थ जें उरे, त्या नाकींच्या, लाज देति नग, मोत्यां. ४१
कोणी विमान ही दे, कोणी दे दिव्य रथ गगनगामी,
हय, गज, चिंतामणि ही, 'सर्वां हि' म्हणो न कां मग 'नगा' मीं?
परमवदान्या बळिचें प्रभु तो सर्वस्व जेंवि वटुरूपें,
त्या पविनाभाचें ही, अरिकरिहरि हरि च या हि पटु रूपें. ४३
घटजें सिंधु, तयापरि केले कामें अशेष अहित रिते,
भुलले महाप्रयोगें, भुलती मंत्रें, महोग्र अहि, तरि ते. ४४
हंसी स्वसखीस म्हणे, "प्रद्युम्ना प्रणतमानदा सांजे
देखसिल आजि, वरिसिल, ते म्हणती चरण 'मा' न दासां जे.
तुज भेटतो प्रदोषीं; यदु न वदति गुरुर्पदानते! लटिकें.
दीपकलिकेसि म्हणतें [illegible] 'छिकें.'" ४६
ती त्या हंसीस म्हणे, 'मज मत्सदनांत धीर दे, वस, ये,
प्रथमसमागम, भीतें मन, कीं तो वीर, धीर, देव, सखे!' ४७

१ पावसाच्या पाण्यात २. अतएवाद्याप्यधोमुख स्रवते– **पंत.** इतर दागिने सदुपयोगास लागले याबद्दल, दानार्थ न लाविलेल्या नथांना इतकी लाज वाटली कीं, तेव्हापासून अद्याप हि त्यांचें मुख खालीं आहे तें आहे च ३. सर्वां हि नगा (अलकारांना) [दे, असें] मीं का न म्हणों? ४ प्रद्युम्नानें ५. शरणागतास मान देणारा. ६ जे चरण दासा (सेवकांना) 'मा' (नाहीं) न म्हणती ते आजि देखसील. ७ सायंकाळीं ८. हे आशाधारक कन्ये' यदु यादव) लटिकें (खोटें) न वदति (बोलत नाहींत) ९. दिव्याच्या ज्योतीस

हंसी म्हणे, 'सये! मीं सोडिन तुज पळ हि न, सदना चाल,
भय काय? तुम्हीं दोघें, पावुनि नवसंग रेंसद, नाचाल.' ४८
हांसवुनि तिला, तीसह जाय तिच्या विश्वकर्मकृतगेहीं.
संकेत करी सुदती, धरि सात्विक भाव ती सकळ देहीं. ४९
'प्रद्युम्नातें येत्यें घेवुनि,' ऐसें पुसोनि ती गेली,
ये फिरुनि, म्हणे, 'प्रियसखि! येतो प्रियतम करावया केली.'
स्त्री[2] माल्य[3] नेत होती त्या राजसुतेकडे, तया पाहे,
प्रद्युम्न भ्रमरांत भ्रमर चि होवूनि तो, शिरे, राहे. ५१
माल्य प्रभावतीच्या सन्निध ने स्त्री, नमी पदा, स्थापी;
त्यां पी अलिकुल, हलिकुलमणि[4] तल्लावण्य, धरि तदास्था,[5] पी.
संध्याकाळीं गेले अन्य मधुप, मधुपकुळगुरु[6] चि राहे,
कीं[7] हा कविवर पद्मा जाणे, जाणति न या सुरुचिरा हे. ५३
होय प्रभावतीच्या येउनि कर्णोत्पळांत[8] तो लीन,
तद्धृदयपुंडरीकीं सिरल्या, यासीं च यासि तोलीन. ५४
तों राजसुता पाहे, भी, उदया पावतां हिमकरातें.[9]
न च दैत्यसुता भीती, मुख पसरुनि धांवतां हि मकरातें. ५५
"जो होता हिमकर, सखि! झाला अद्भुत चि अहिमकर[10] तो कीं;
मारूं, गिळूं पहातो, हा दितिज्याच्या चि, अहि, मकर, तोकीं.
'द्विजराज' म्हणवितो जरि, अकरुण, हिमकर नव्हे चि, गरकर[11] हा,
बाळा म्हणतिल, 'होउनि, या कर्मे, दुर्यशांत गरक, रहा.' ५७
झालें मुख शुष्क, हृदय उत्सुक, सखि! तापलीं पहा अंग.
कोण अनौषध गद हा? दाह अधिक शीतवस्तुच्या संगें. ५८
मारुत सुगंध, शीतळ, मंद हि, देहास या दवानळसा,

---

१. आनददायी २ दासी ३ फुलें ४ बळरामकुळाचें भूषण च असा प्रद्युम्न ५ त्याची [ती मिळण्याची] आशा ६ भ्रमराचा कुलगुरु असा तो प्रद्युम्न ७. प्रद्युम्नाला च कमळाची परीक्षा, ती इतर भ्रमरांस नव्हती, असा भाव. ८. कर्णरूपी कमळात. ९. चद्राला. १०. सूर्य ११. विषकिरण

म्हण, 'हे दमयंतीसी, भेटुनि दे हास यादवा! नळसा.' ५९
पूर्वीं न देखिला, श्रुतमात्र प्रिय वांछिला हि कांपवितो,
तापवितो, न्यून नव्हे, प्रियसखि! विरहापरीस कां पवि तो?
धिक्कारातें लोकीं सखि! होय स्त्रीस्वभाव हा पात्र,
गात्र[1] व्याकुळ होतें, भ्रमतें मन, कांत ऐकिला मात्र. ६१
मरती च हे तव सखी, मदुपेक्षा करु नको, पहांड[2] सलों
काढी प्रभुच्या म्हणती; मदनभुजग करुन कोप हां![3] डसला. ६२
गेलें धैर्य, नव्हे स्थिर हें, जेंवि प्रथम वासरूं सुटलें;
घडिभरि दर्शन नव्हतां, सुमुखि! समज, सूत[4] आयुचें तुटलें."
कामविकारें पवनें पावलि कंप प्रभावतीकदली
वदली, बहुत असो तें; गावें ज काय बोलिला सैदलि[5]. ६४
मदन मनिं म्हणे, 'सुतनुखि हा मोह नव्हे, सुदंड[6] हे बाळा,
शर हो! खर[7] होवु नका, वश झालीस न उदंड हेंवाळा[8].' ६५
हंसीस म्हणे, "शुचिमुखि! आलों मीं हें सखीस कळिव, रहा
स्वस्थ' असें म्हण, 'सुंदरि! जो तव कर्णोत्पळांत अलि वर हा.'
'वर्तो यथेष्ट मजसीं,' हे करु आज्ञा हि मज अधीनातें,
देयिल संपादुनि जें दयिता, चिसरेल मम न धी नातें." ६७
ऐसें वदत निघे, मग अलिरूप त्यजुनि, होय सुरुचिर हा;
भेटे तिस म्हणे, 'नलिनी तूं, हा रवि, भाग्य तोय, सुरुचि[9]! रहा.'
प्रभुनंदनप्रकाशें सहसा सोमप्रकाश लोपविला,
स्वकुलजकृतें परिभवें शुद्धात्मा निववीला, न कोपविला. ६९
प्रद्युम्नातें पाहुनि वाढे सहसा प्रभावतीकाम,
विधुतें विलोकुनि जसा सागर; अद्भुत तसें चि तें धाम. ७०
राजात्मजा सलज्जा होवूनि, उभी अधोमुखी राहे,

१. शरीर २. प्रभुनिमित्तक मोठ्या काट्याला ३. विकळत्वें वदत्ये—पंत. ४ आयुष्याची दोरी ५ चांगला भ्रमर (प्रद्युम्न) ६. सरळ वर्तनाची. ७. तीव्र. ८. हेंवाळणें=हिसकाहिसकी करणें ९. हे सुंदरि!

साहे तेज न बाळा, मृदनानन तिर्यगीक्षणें पाहे. ७१
स्वर्दे स्मर, देखोनि मुख, वदवाया, प्रभावतीहनुतें.
रोमांचरूप कंचुक तो त्याच्या स्पर्शे लेववी तनुतें. ७२
“ करुनि अधोमुख मुख, सखि ! मजसीं कांहीं च तूं न कां वदसी?
या दासाची उक्ति स्वीकारीं; काय चंद्र घे न दसी ? ७३
न करीं उपमर्द वदनशशिशोभेचा स्वयें चि दाटून,
कष्टोंत न ओष्ठांच्या प्रांता लोचनचकोर चाटून. ७४
झाला मनोरथांच्या प्राप्त तुज झतेंकरूनि हा, रमणी !
प्राणांत मेळवावा घेवुनि, हारांत जेंवि हारमणी. ७५
भीरु ! भय त्यागावें, हा दास तुझा, मिळो अनुग्रह या,
प्रेमें चि करिति कुलजा वश, सुखलीनें जसें अनुग्र हया. ७६
हो गांधर्वविवाहानुग्रह, अंजलि करूनि याचितसें;
मातें तुवां म्हणावें, सुवदान्यें, कर धरूनि, ‘ या चि ’ तसें.” ७७
ऐसें प्रभावतीतें प्रार्थी, वदलों तदन्वयें हो ! मी,
मंत्र म्हणोनि मणिस्थितदहनीं पुण्याहुति स्वयें होमी. ७८
रत्नाभरणविभूषित कर तीचा धरुनि विष्णुचा सुत तो
मणिवह्नितें प्रदक्षिण करि, जो सत्कुलज काय तो उततो? ७९
करितां प्रदक्षिण, मणिप्रवरीं प्रकटे स्वयें अनळ साचा,
कीं, ती देवी वरजो, तो ही सुत सदनीं अनळसाचा. ८०
वरुनि वधूतें, सांगे द्वारीं स्वत्राण काम सुखगीतें,
मग जें, तें वर्णावें लक्षें ही काय कामगत गीतें ? ८१
दक्षिण कर धरुनि, स्मर शयनीं ने, बैसवी तिला अंकीं,
चुंबी मुख, आलिंगी, मदनीं सुख बहु, धन जसें रंकीं. ८२
रमवी प्रद्युम्न बहु प्रेमें, पाहोनि तदधिकार, तितें,

---

१ वाकड्या दृष्टीनें २ चांगल्या लगामानें. ३. त्यास अनुसरून ४ रत्नाच्या पोटीं असलेल्या अग्नींत ( तेजात ) ५ श्रेष्ठपुरुषापासून जन्मलेली, कुलीन ६ [ अर्थात् ] कृष्णाचा. ७ आपलें रक्षण ( रंगमहालाचें द्वारपाळपण ) ८ हसीला.

करि सुरत नवोढेसीं जें, दे तन्मतिस तदधिका रति-लें. ८३
प्रातःकाळीं कष्ट प्रद्युम्नातें प्रभावती सोडी;
गोडी लावुनि जाय; क्षणदा घटिका तसी गमे-थोडी. ८४
अलिरूपें ये, राहे दिवसभरि नटांत तो गुरु नटांचा,
यज्ञनकाच्या नुरवीति मद, कालियफणिफणा चुरुन, टांचा.
सायंकाळीं जावें, प्रातःकाळीं नटालयीं यावें,
रात्रौ कामचकोरें मुखचंद्रामृत तिचें सुखें प्यावें. ८६
यापरि वसतां व्हावा, परि माया मायसी च बोभाट
होवूं देना, झाला त्याचा पर पौर सर्व ही भाट. ८७
प्रेमें वेड चि लावी प्रद्युम्नास प्रभावती, राया!
त्या रसतरंगिणीचा लागों दे न प्रभाव तीरा या. ८८
राहे नटांत अर्ध, अर्ध देहें प्रभावतीजवळ;
धवलेंच्छद संरक्षिति, घेतां तदधरमहासुधाकवळ. ८९
दक्षत्व, ऋजुत्व, विनय, विद्वत्ता, शील, सन्नति, सुलीला,
असुरमतिला बहु रुचे, अधनाच्या जेंवि भूषण मुलीला. ९०
भाषा आर्यत्वमृजा, सौगंध्यविलासरूप गुणशोभा,
इच्छिति नटस्त्रियांची सर्वा असुरस्त्रिया, धरुनि लोभा. ९१
बंधु सुनाभ महाबळ पविनाभाचा, नृपा! तया तनया
दोघी होत्या, नामें चंद्रवती, गुणवती, अयातनया. ९२
चंद्रवती, सुगुणवती, दोघी जाणोनि उचित वेळा या,
भगिनी प्रभावतीच्या सदनीं जाती सदैव खेळाया. ९३
पुरुषवर प्राप्त तिला झाला, हें इंगितें तयां कळलें;
यश जेंवि मृगमदाचें, सुरतसुखाचें कधीं नसे मळलें. ९४
करुनि स्मित, एकांतीं विश्वासवतीस कृत्य नव पुसती,

१. नूतन वधूशीं. २. रास. ३. शृंगारनदीचा ४. हंस. ५ प्रेमाची व लडिवाळपणाची. ६. न गेला न्याय ज्यांपासून—**पंत.** ७. कस्तुरीचें.

की, भगिनी झांकाया शकली कृत[1]सुरतनत्य न वपुसें ती. ९५
सांगे, ‘ज्याच्या देती पुष्टि अनशनें,[2] न नाश, देहा तीं,[3]
श्रीदुर्वासा भगवान् जो, विद्यादिव्यपाश दे हातीं. ९६
सुर कीं असुर असो जो कांक्षित, विद्या जपोनि आणावा.
वरपुरुषसंग बायी ! ब्रह्मानंद स्त्रियांसि जाणावा. ९७
मीं सुरसुत आणितसें,[4] दाविन, झांका परं स्वसा हो ! तो;
प्राणाधिक दयित[5] मना या चोराच्या परस्वसा[6] होतो. ९८
प्रद्युम्ना देवसुता मोठ्या भार्येंकरूनि आवडतें
झाल्यें भगिनी हो ! मीं, जैसी रामेश्वरासि कावड ती. ९९
दावी प्रिय भगिनींला, ज्यासीं गुप्त प्रभावती राते.
स्तवि विद्येचे, नेती कामजलधिच्या, प्रभाव तीरा, ते. १००
स्वप्रिय दावुनि, तन्मन करुनि बहुत आपणापरिस वेडें,
‘ऐसा देवसुत वरा कांत,’ म्हणे, ‘सुपति, कुपति, पुर, खेडें.
सुर साधु, असाधु असुर, सुमति, कुमति; म्हणुनि देवसुत बरवा.
वरवा वरमतिकरवीं, पर[7] खाजविला नखें जसा वरवा.’ १०२
चंद्रवती तीस म्हणे, ‘पतिस पुसुनि, सुवर तूं चि सांग मला;
तुज निजदेहाहुनि हा देह प्रिय, भगिनि ! भिन्न कां गमला ?’
ती गुणवती म्हणे, ‘गे ! सेव्यफळीं प्रथम पाहती गोडी,
आतें म्हणुनि म्हणावें काय सुहृत्प्रीति जाहली थोडी ?’ १०४
तद्योग्य वर पुसे ती प्रद्युम्नातें प्रभावती चतुरा,
कर्णासि यद्यशाहुनि सुरकुसुमांचा हि होय नीच तुरा. १०५
काम म्हणे, ‘विद्येच्या सामर्थ्यें मीं तसा चि आणावा
गद चंद्रवतीस, असे सांब गुणवतीस योग्य जाणावा.’ १०६

---

१ सुरतक्रीडा केलेल्या देहास. २ उपोषणें ३ प्रसिद्धें–**पंत.** ४. परतु. ५. प्रियकर. ६ परक्याच्या धनासारखा ७ पर (असुर) [हा] जसा नखें खाजविला वरवा [तसा]. वरवा=खाजविल्यानें जास्त च फुगणारा व त्रासदायक होणारा एक त्वग्रोग.

मग ती भगिनींस म्हणे, देवुनि विद्या, प्रभावती, 'धन्या
कन्या सौभाग्यवती होय इणें, स्त्री असी नसे अन्या.' १०७
वंदिति मुनितें कन्या, ज्याची सर्वत्र सारिखी सत्ता,
इच्छुनि गदसांबांतें, जपती विद्या प्रभावतीदत्ता. १०८
प्रद्युम्न मायेनें ते कन्यारत्नलाभ जाणविले,
विद्याजपावसानीं, सहसा गदसांब वीर आणविले. १०९
गांधर्वविवाहें त्या चंद्रवती गुणवती तिहीं वरिल्या,
धरिल्या कंठीं प्रेमें, त्यांच्या चित्तस्मरव्यथा हरिल्या. ११०
रमविति विचित्र सुरतें मन्मथगदसांब हे तिघे त्यांतें,
माराया असुरांतें जपले विजयार्थ[1] होति घेत्यांतें. १११

---

# अध्याय सदतिसावा.

त्या वज्रपुरीं वसतां नरनाथा! प्राप्त होय घनकाळ,
जो दयितासंगिजनप्रियकर केवळ वियोगिजनकाळ[2]. १
त्या काळाचे वर्णी सुज्ञ प्रद्युम्न सर्व गुणदोष;
तेणें प्रभावतीच्या हृदयातें दे सदैव परितोष. २
वर्णी बहु सोमातें, तद्वंशजराजसाधुरीतीतें,[3]
भुलवी यदुवसुदेवश्रीकेशवकीर्तिमाधुरी तीतें. ३
कश्यपसत्र समाप्तिस पावे, स्वस्वस्थळासि सुरजन, गा!
असुर हि गुरुसि, जयाचें तेज म्हणे, 'वाजवूनि मुरज न गा.'
त्रैलोक्यविजयकामुक असुरेश्वर वज्रनाभ आला जो,
कश्यप तया म्हणे, 'वस वज्रपुरीं, स्वर्गवास या लाजो ५
ज्येष्ठ भ्राता शतमख, हा ज्या आला करीत अधिकारा,

१ शस्त्र २ विरही लोकांचा यम ३ चंद्रवंशातील राजांच्या शुद्ध वर्तनाला

त्यों चि करो, बा! तृष्णा जेंवि निरुद्धा, तसी न वधि कारा.[1]
ब्रह्मण्य, धर्मपाळक हा, याच्या जय न जोडिला अहितें.
जा, स्वपुरीं वस, वत्सा! मरसील चि लंघितां तया[2] अहितें.'
ऐसें वदतां, कश्यपमुनिला तो करुनि जाय नमनातें;
त्याच्या गुरुबोध, जसा बधिराच्या जेंवि गायन मनातें. ८
येवुनि वज्रपुरातें, म्हणवाया सुरवरा हरिस 'हाय!'
त्रिभुवनविजयारंभीं सिद्ध करी जिष्णुचे अरि सहाय. ९
तों त्या प्रद्युम्नातें हंस कथिति जिष्णुविष्णुसंदेश,
कीं, 'हा समय असे; त्वां मारावा वज्रनाभ मंदेश.[3]' १०
शक्राच्युतांसि कळविति गर्भवती असुरपतिसुता रमणी,
आधिस उपाय मागति हंस चॅर,[4] अहिस जसा उतार मणी. ११
प्रद्युम्नप्रोक्त जसें संकट कथिलें प्रभूसि हंसानीं,
आधि हराया त्यांतें वर दिधला निहतवृत्रकंसानीं.[5] १२
'सुत उपजतां चि होतिल अतुलबलज्ञानरूपगुण तरुण;
अरुण तमीं जेंवि, तसे जे परमथनीं सदैव निष्करुण.' १३
हंस असा वर कथिती, तों ती पुत्र प्रभावती प्रसवे,
तो हंसकेतु नामें, सुकवींस जया न वर्णितां नसवे.[6] १४
एकें मासें झाला चंद्रवतीला हि पुत्र, हा नावें
चंद्रप्रभ गदनंदन, सत्कविनीं बहु जयासि वानावें. १५
जो गुणवतीस झाला, तो गुणवान् सांबपुत्र वरतेज्या,
मातामह, मातुळ जे, गमति सुनाभादि असुर पर ते ज्या. १६

---

१ तो च अधिकार तो [ इंद्र ] चालवो, निरुद्धा ( कोणी कोणचा अधिकार चालवावा वगैरे नियमानीं जो बांधला गेला त्यास अर्थात् तुला ) तृष्णा ( ही इंद्रपद घेण्याची हाव ) जितकी त्रासदायक होईल तितकी बंदिशाळा हि होणार नाहीं या महत्वाकांक्षेनें तुझें हित न होता उलटें तुझें अकल्याण च होईल, हा भाव. २ त्या इंद्ररूप सर्पाला. ३. मूर्खांचा राजा, महामूर्ख ४ दूत. ५ मारिले आहेत वृत्र व कंस ज्यानीं त्या इंद्र व कृष्ण या दोघानीं ६. न राहवे

जन्मीं च तरुण जो तो सुत, सर्व हि सांग वेद पाठ वदे,
अभ्यास सुदृढ पहिला, जाणों समयीं तयांसि आठव दे. १७
पितरांच्या आशींची दशदा दिवसांत जे सुतति घेते,
हर्म्याग्रीं असुरांहीं वृष्णींचे देखिले सुत तिघे ते. १८
त्या प्रभुच्या देखियले ते इच्छेनें चि बा! परजनाहीं,
ज्याच्या करि चरणांचें ब्रह्मवधाद्यखिलपाप रेंज नाहीं. १९
बहु भिवुनि हर्म्यरक्षक, कथिती त्या स्वर्गविजयासिद्धातें;
गृहधर्षणें तया जें दुःख, न विषदिग्धबाणविद्धा तें. २०
असुरपति म्हणे, "दिसतां खिळिले कां? देव मानव धरा, हो!
जा त्या पोरांस म्हणा, 'गिळिलें कां दे वमा, न वध राहो.'"
कन्याहर्म्य व्यापुनि, असुर असें गर्जले, 'धरा, बांधा.'
कां 'धामधर्षकांतें' प्रभु न म्हणे राक्षसांसि 'खा, रांधा'? २२
वदली प्रभावती 'हा!' चंद्रवती, गुणवती हि, बा! भ्याल्या;
कीं, सोसेल कसा हो! केळीच्या तरु शूळ गाभ्याला? २३
हांसे प्रद्युम्न, म्हणे, "रडतां कां? वेड लागलें काय?
'हाय!' म्हणावें न तुम्हीं; वृष्णींचा रक्षिता सुखी राय. २४
आम्हीं तुमचे नाथ, स्वस्थ अजित अजितसंश्रयें आहों,
पाहों शके न इकडे काळ हि, ताडूनि भुज, पुढें राहों. २५
तात, पितृव्य, तसे चि ज्ञाति भ्राते, तुझे गदापाणी,
प्राणांसह सर्वस्वा सोडितिल सुखें न हे मदा पाणी. २६
आम्हांतें मारावें, या अहितांच्या मनांत हा हेत,
तुझिया संबंधें तों, सर्व हि हे मान्य, पूज्य आहेत. २७

---

१ परपरा. २ वाड्याच्या अग्रभागीं, गच्चीवर ३. धूळ ४ नाहींसे ५ स्वर्ग जिंकण्याविषयीं सिद्ध अशा (वज्रनाभाला) ६. घर बळकाविल्यानें ७ घर बळकावणाऱ्याना. ८ वज्रनाभ. ९. तुझे आप्त जे असुर ते सर्वस्वनाश झाला तरी मस्ती मोडणारे नव्हत, म्हणजे शरण येणार नाहींत व नाश च पावतील, हा भाव.

भगिनींस पूस, मतिमति! पिकवध कर्तव्य वायसां गमला,
या संकटीं करावें आतां म्यां कार्य काय? सांग मला." २८
सुमति प्रभावती दे प्रद्युम्नकरीं कराल करवाल,
ती त्यासि म्हणे, "वांचा, वांचोनि यशें कराल, करवाल. २९
जीणें साधु निवावे, ती ठावी या न दानवां चाल,
अहितजनीं करुनि कृपा, शस्त्र न धरितां, कदा न वांचाल. ३०
कल्याण असाल जरि, स्त्रीपुत्रांतें तुम्हीं तरि पहाल,
आधि न आर्येसि म्हणो, कदलीस म्हणे जसा केरिप 'हाल.'
मज मुनि वदला, 'होसिल जीवत्पतिका सदैव जीवसुता,'
हा भरवसा असे कीं, गुरु ती रक्षी, न दैव जो वसुता." ३२
चंद्रवती हि असें चि प्रार्थुनि, दे असि गदासि उपसून,
सांबासि गुणवती ही, माराया पर, उरांत खुपसून. ३३
प्रद्युम्न सुतासि कथी, 'सांबसहित तूं महायशा लाहें.'
'खळबळ मर्दा चि,' म्हणे, "न वदोत निजा, न 'हाय!' शाला हे."
ते हंसकेतु, चंद्रप्रभ, गुणवान्, सांब निकट तो स्थापी;
मायारचितरथावरि बसुनि, शरांहीं अरिव्रजा व्यापी. ३५
भगवान् सहस्रमस्तक सारथि झाला रणांत कामाचा,
कीं, त्या पुत्रीं प्रेमा त्या कृष्णाहूनि फार रामाचा. ३६
भासे बा! सेनांत त्रिदशारींच्या वनांत या दव हा,
म्हणवी जिकडे तिकडे, क्षय करितां, परजनांत यादव 'हा!
गदसांबांसीं करिती, जे शक्रावध्य असुर, संगर ते;
जो संमुख ये पर, तो परतोनि न, धरुनि देहसंग, रते. ३८
दैत्यांच्या दमनातें सामरगण शक्र ये पहायास,
चित्तीं म्हणे, 'पुरारे! प्रद्युम्नाला नसो महायास.' ३९

---

१ भयकर तरवार. २ मोठा हत्ती ३ काप ४ ज्याच्या जीवमानापर्यंत पति व पुत्र हयात असतील अशी ५ धन-पंत. श्रीमंत। ६ निजा (आपल्या स्त्रिया) [न] हे शाला (वाडा) शोक न करोत ७ व्रज=समुदाय ८ शेष. ९ देवशत्रूंच्या १०. त्रिपुरांतक शंकरा! चिंता, दुःख.

मातलिपुत्र सुवर्चा सारथि, निजरथ, गदासि दे शक्र,
सांबाला प्रवरसहित गज, असुरांचें मथावया चक्र. ४०
तैसा चि जयंत दिला प्रद्युम्नाला सहाय समरांत,
जों जों ते खळ गळती, तों तों बहु हर्ष होय अमरांत. ४१
सजयंत प्रद्युम्नप्रभु आटोपी क्षणांत तें हर्म्य,
देवुनि रथ, गज, सांगे त्या सांबगदांसि 'कर्म हें धर्म्य.' ४२
"आजि द्वारवतींत श्रीरुद्राची असे महापूजा,
येयिल सकाळ, पावे वृष्णींची पाहतां महा पूं[1] ज्या. ४३
मग कृष्णाज्ञस म्हणों लोकांसि, न या पहाल पविनाभा,'
करितों विधान[2] जेणें शक्राची पाप हा लपविना भा. ४४
स्त्रीधर्षणें बुडे यश; मानी[3] वपुस न, जपो कळत्रास[4].
मृतिचा[5] पोकळ, भार्यापरिभव जो हा न पोकळ त्रास." ४५
ऐसें गदसांबांतें सांगुनि, माया करी प्रकट मोटी,
निर्मी तो प्रद्युम्न प्रद्युम्नांच्या रणीं बहुत कोटी. ४६
जें परचित, उरों दे त्या भैमदिनेश[6] तेंवि न तमातें;
हा मायावींद्र म्हणे, 'परमायालक्ष तें विनत मातें.' ४७
बहु देवेश्वर हर्षे पाहुनि रिपुमर्दना हरिसुतातें,
कीं, 'पुत्रयश' म्हणावें, 'स्वयशोधिक जग सदा परिसु,' तातें.
देखति सकळें भूतें सकळां शत्रूंत कृष्णतनयातें,
जो क्षेत्रज्ञ[7] अशेषां देहांत जसे चि सुज्ञ जन यातें. ४९
रण करितां रात्रि सरे, त्या असुरांचा त्रिभाग तो खपवी,
श्रीरुक्मिणीसुताच्या तेजें पावे अपार तोख पवी. ५०
काम करी रण, संध्या तों विष्णुपदीजळीं[8] जयंत करी;
जों युद्ध जयंत वरी, काम प्रातर्विधि स्वयें हि वरी. ५१

१ पुरी–पंत. २ कृति, युक्ति, उपाय–निर्णय० ३ अभिमानी पुरुष ४ भार्येला ५ मरणाचा ६ भैम=माघशुद्ध एकादशी; या दिवशी दिनेश (सूर्य) फार प्रखर असतो ७ क्षेत्र=शरीर, क्षेत्रज्ञ=ईश्वर, आत्मा. ८. गंगेच्या पाण्यांत.

त्रिमुहूर्तदिवस आला, प्रभु ही गरुडीं चढोनि अरिनगरा;
जो म्हणतो, 'गर अमृता, अमृत चि लीलेकरूनि करिन गरा.'
प्रभु अग्रजासि वंदुनि, आकाशीं तत्समीप मग राहे.
पाहे असुरांसि, म्हणे, 'भिरवूं देतील गर्व न गरा हे.' ५३
अहितांसि भयद ज्याचा नाद, जसा गरुडनाद सर्पांस,
तो पांचजन्य वाजवि, गाजवि नभ, नुरवि दैत्यदर्पांस. ५४
ऐकुनि दरवररव, जव करुनि, प्रद्युम्न ये, चरण नमुनी,
निकट चि राहे, लाहे सुख, ज्याचें विसरति स्मरण न मुनी. ५५
प्रभु निजपुत्रासि म्हणे, 'प्रद्युम्ना! पातलों पहायाला,
हूं, मार वज्रनाभा, अनुचित वध समरीं न हा याला. ५६
हा वज्रनाभ वध्य चि, या हर तूं, खगवरीं चढ, गरा हो.
शत्रु तुजपुढें जरि, तरि वायुपुढें अंबरीं च ढग राहो.' ५७
हरियानीं बसुनि प्रभु, वसवी प्रद्युम्न तोक विवरीं, हो!
बसवाया रवि तमसें शत्रुकुळ, करीत शोक, विवरीं हो. ५८
प्रभुसि नमुनि, पविनाभा गांठी तो चित्तपवनवेगानें,
ज्यांतें देति सुर, असुर, सुयशाच्या हर्ष नवनवे गानें. ५९
तार्क्ष्यगतें प्रद्युम्नें, नाशाया परचमूमदाघातें,
पविनाभ पाडिला, उर ताडुनि, मूर्छित रणीं गदाघातें. ६०
बहु रक्त असुर वमला, भ्रमला, गमला गतासुसम, राया!
हरिपुत्र करी कौतुक, हरिस श्रम लागता सुसमरा या. ६१
प्रद्युम्न म्हणे, "म्हणतें, 'योग्य न मूर्छित असा वधा,' नातें;
हो सावध, पविनाभा! यादव न वधिति असावधानातें." ६२
उठुनि मुहूर्तें, तो पविनाभ म्हणे, "परम शत्रु, पण साधु,

---

१ खगवरीं (गरुडावर) चढ [आणि] या (वज्रनाभरूप) गरा (विषाला-हालाहलाला) तूं हर हो (शंकरासारखा भिऊन टाक—नाहीसा कर). २. प्रद्युम्नातें, वज्रनाभातें ही—पंत. ३. गरुडावर बसलेल्यानें ४. मद (गर्व—दर्प)
* अघ (पाप).

मग कां देव न म्हणतिल, 'सद्यश, होवूनि सत्य पण, साधु'?
तूं लोकीं श्लाघ्य मला शत्रु, भला! यादवा! भला! साहें
आतां प्रतिप्रहार, स्थिर अभिमुख संगरीं उभा राहें." ६४
ऐसें म्हणुनि, ललाटीं स्वगदेनें प्रभुसुतासि तो ताडी,
पाडी मुहूर्त मूर्छित, भान सुरांचें दिगंतकीं धाडी. ६५
शोणित वमतां, भ्रमतां, सुत, फुंकी कृष्ण पांचजन्यातें,
ज्याच्या नादें व्हावा स्वजनातें मोद, मोह अन्यातें. ६६
त्या पांचजन्यनादें उठला प्रद्युम्न मोह सोडून,
जाय करीं चक्र, तया घाया यश नव्य भव्य जोडून. ६७
श्रीकृष्णच्छंदें जें आलें स्वकरांत चक्र, तें सोडी,
तोडी पविनाभाचें शिर, चिर कंविगेय विजय तो जोडी ६८
हर्म्यगत गदावरि, तो पविनाभानुज सुनाभ करि लगट,
वाटे तत्तनयांतें, निजपतिसह आपणांसि करिल गट ६९
त्यातें मारुनि समरीं, केले व्याकुळ महासुर गदानें,
देती आशीर्वा, या प्रेक्षक सुर, नर सुधी, उरग, दानें. ७०
बरकड असुर निवटिले सांबानें संगरांत झाडून;
प्रभुनें प्रमुदित केले स्वर्गीं ते दिव्यदेह धाडून. ७१
दैत्य निकुंभ पळाला, गेला तो षट्पुरास मायावी,
असुरमनीं शांति कसी, रुचनां दुर्मति सुरासमा, यावी? ७२
इंद्रोपेंद्र उतरले वज्रपुरीं, वज्रनाभवधभीता
अभयें प्रजा सुखविती, कीर्ति जयांची महत्सभागीता. ७३
राज्य चतुर्धा केलें, प्रद्युम्नजयंतसांबगद यांचें
अभिषेचिले यथाविधि सुत अनुभविति प्रसाद सदयांचे ७४
सुत विजय जयंताचा, कामाचा हंसकेतु सन्महित,
चंद्रप्रभगुणवान् गदसांबज, ज्यांचें जनांत जन्म हित. ७५

---

१ प्रतिज्ञा २ मिळवो ३ छंद=इच्छा ४ कवींस गाण्याजोगा ५ मद्यासारखा ६ गीता=गाइलेली

जे ग्राम च्यार कोटी, शाखानगरें सहस्र, तें प्राज्य
सर्व चतुर्धा केलें, वांटुनि चवघांजणां दिलें राज्य. ७६
शक्र जयंतासि म्हणे, "त्वां हे राजे सदैव रक्षावे;
दक्षा! वेळोवेळा प्रेमें स्वप्राणसे चि लक्षावे. ७७
उच्चैःश्रवा हयोत्तम, तत्सुत, जे दिग्गजात्मज प्रथित,
यां मागतील तितुके दे, यांचे व्हावया अरि व्यथित. ७८
आकाशग ऐरावतसुत शत्रुजयरिपुंजय प्रेमें
गदसांबांतें द्यावे, समलंकृत करुनि मणिगणें हेमें. ७९
आकाशपथें येतिल यांवरि बैसोनि सुत पहायाला;
पुर, चिर नांदो, माझें न म्हणों देयील सुतप 'हा!' याला. ८०
स्वच्छंदानें यावे स्वर्गासि, द्वारकेसि, हे चवघे,
चव घेवूत यशांची यांच्या, जे रसिक, साधु ते अवघे." ८१
ऐसें सांगुनि शक्र स्वर्गासि, पुसोनि केशवा, गेला,
प्रभु हि द्वारवतीला, बहु उत्सव पौर वृष्णिहीं केला. ८२
गद, काम, सांब, होते वज्रपुरीं, पुसुनि हरिस, सा महिने;
प्रभुवर हा कीं नोकीं स्पष्ट, करुनि दंड अरिस, साम हि ने.
'मौसेल' रण झाल्यावरि गेले गदसांबकामसुत राज्या;
गांवें हें वैतरणी व्हावी, अति दुस्तरा हि, सुतरा ज्यां. ८४
हीं राज्यें मेरूच्या उत्तर पार्श्वीं प्रसिद्ध आहेत,
व्यास म्हणे, 'या चरितश्रवणें होतो चि पूर्ण बा! हेत.' ८५

---

१. प्रसिद्ध २ स्वर्गांत शांतता स्थापी ३ ब्राह्मणशापानें उत्पन्न झालेल्या मुसळानें यादवांचा संहार झाल्यावर. (आर्याभारत-मौसलपर्व पहा) ४. ज्याला अतिदुस्तर अशी वैतरणी सुलभपणें तरता यावी अशी इच्छा असेल (ज्याला स्वर्गप्राप्ति हवी असेल) त्यानें हें आख्यान पठण करावें.

# अध्याय अडतिसावा.

नार्की हि न जें कौतुक, करि शक्रप्रोक्त विश्वकर्मा तें;
द्वारवतीच्या न शके वर्णाया लेश विश्व कर्मातें. १
द्वादश योजन दीर्घा द्वारवती शुद्ध रत्नकनकाची,
तैसी च अष्टयोजन विस्तीर्णा वसति विश्वजनकाची. २
पूर्वेसि रैवताचळ, अद्रि लतावेष्ट दक्षिणेसि असे,
अक्षय पश्चिमदिग्गिरि, उत्तरदिक् वेणुमन्नगें हि लसे. ३
चित्रक, नंदन, पुष्पक, ऐशीं अतिरम्य उपवनें चवदा,
जीं म्हणति "पहा त्यांतें, 'झाला कृतकृत्य सुपवनें च,' वदा."
प्रासाद रुक्मिणीचा कांचन, तैसा चि भोगवाशामा
तो ख्यात, ज्यांत नांदे श्रीकृष्णाची मनःप्रिया भामा. ५
जांबवतीचा दिव्य प्रासाद व्यक्त संजननामा.
नाग्नजितीचा मेरुप्रासाद, स्तुत्य जिष्णुच्या धामा. ६
भीमेचा प्रासाद ख्यात पुरीं पद्मकूल या नावें:
प्रासाद लक्ष्मणेचा सूर्यप्रभ, बहु जयासि वानावें ७
परनामा प्रासाद श्रीव्यासें फार वर्णिला आहे,
ज्यामाजि मित्रविंदा श्रीकृष्णाची मनःप्रिया राहे. ८
जीचें नाम सुवार्ता भगवन्महिषी, तिचा महारुचिर
प्रासाद केतुमान्, जो प्रेक्षावा प्रेक्षिला तरी सुचिर. ९
देवद्विजपूजा ज्या प्रासादीं, परम रम्य तो विरजा,
शिल्पींद्र विश्वकर्मा जपुनि रची, करुनियां मन स्थिर, ज्या. १०
प्रभुच्या प्रासादाचें अत्यद्भुतरूप, आठ ही यामं

---

१. इंद्रानें सांगितलेलें २ शोभे. ३ अन्वय–[ ज्यातील ] सुपवनें च कृत-
कृत्य झाला त्यातें पहा [ असें जनाना ] वदा [ असें ] जों म्हणति ४ येथें नादें
ऐवजीं ... लिहिलें गेलें आहे. ५. इंद्राच्या राजवाड्याला ६ पुष्कळ वेळपर्यंत ७
चोवीस तास; अहोरात्र.

ज्यामध्यें परमोत्सव बहु, ज्याचें वैजयंत हें नाम. ११
त्या हंसकूटगिरिचें शिखर, तया मेरुचें हि जें रम्य,
तें द्वारकेंत नेलें प्रभुनें, केलें नरांस ही[1] गम्य. १२
आला केशव ऐसा अतिरम्य द्वारकेंत निजगेहीं,
भरले, यादव तेथें जे, सात्विक भाव सर्व तद्देहीं. १३
बहु देवकी यशोदा हर्षे, तैसी च रोहिणी देवी;
सर्व हि जन नयनाहीं भगवन्मुख, तृषित अमृतसें[2], सेवी. १४
ज्या श्रीपतिच्या भार्या, सौभाग्यें त्यांत उत्तमा भामा;
प्रभुच्या दे वैदर्भी[3] सर्वकुटुंबेश्वरी प्रभा धामा. १५
प्रियसख जसा प्रियसखें, कृष्णें सत्कारुनि स्वयें प्रेमें
पक्षिपति स्वस्थाना पाठविला, यत्प्रभा नुता[4] हेमें. १६
आला, सकाळ जावुनि, संपादुनि विजय, कृष्ण जरि सांजे;
गुरुपूजेनें लाजवि ते, भेटति गुरुसि फार दिवसां जे. १७
धन आणिलें परांतें जिंकुनि, तेणें स्ववृष्णि तज्जाया
तर्पी, अर्पी अभिमत[6], निजजन सुखसागरांत मज्जाया. १८
श्रीमत्सांदीपनि गुरु, आहुक[7], वसुदेव वृद्ध जे वाहे
तच्चरणीं मस्तक; कीं, रीति रुचे फार फार देवा हे. १९
सत्कीर्ति यशोदेची तनुजा दे भेटि, योगमाया जी;
सर्व म्हणति, 'कल्पलतासुरभिगुरु गुणें तुम्हीं गमा, या, जी!'
त्या एका[9] नंशोतें आलिंगिति रामकृष्ण बाहूनीं,
प्रेमें हुंगिति माथां, पूजिति वृष्णिस्त्रिया हि पाहूनीं. २१
म्हणती, 'या अनुजेनें अग्रज गोविंद रक्षिला, गावें,
पूजावें नित्य इला, ईच्या चरणीं चि अक्षि[10] लागावें.' २२
प्रभु यादवांप्रति वदे, 'तुमच्या पुण्यें चि दुष्ट हे खपले,

१ जाण्यास सुलभ. २ अमृत=पाणी ३ रुक्मिणी. ४. आदिमाया व लक्ष्मीचा अंश अशी-निर्णय०. ५ सोन्याहून पिंवळा. ६. इष्ट ७. उग्रसेन. ८. वाटतां किंवा वाटा. ९. यशोदेची योगमायानामक कन्या तिला. १०. डोळे.

जपले बहु, दारुण जे शक्राचें पद हरावया तपले.' २३
यादव वदले, 'प्रभु तूं सद्यश शारदसुधांशुगौर विसी,
त्या निजविभूषणें बा! आम्हां, पुत्रांसि तेंवि, गौरविसी.' २४
तों सुरराजप्रेषित नारद ये, प्रभुचरित्र जें भूत,
जें वर्तमान, भावि हि, वर्णी, जग होय ज्या यशें पूत. २५
जनमेजय नृपति पुसे, 'कैसा प्रद्युम्न शंबरें हरिला?
अरि लाधला कसें तो विवर[1], तनयशोक द्यावया हरिला? २६
प्रद्युम्नें तो शंबर कैसा वधिला? अशेष सांगावें.'
त्यासि मुनि म्हणेः-राज्या! ऐकसि तूं रसिक, मग न कां गावें?
[2]प्रभुदृक्पातें झाला पूर्वी जो दग्धदेह, तो काम
आला श्रीच्या[3] पोटा, त्याचें 'प्रद्युम्न' हें नृपा! नाम. २८
सुररिपु शंबरनामा, होय तया सप्तरात्र जों पूर्ण,
पळवी निशीथ[4]समयीं वृक मृगतोका[5] जसा, तसा तूर्ण. २९
जाणुनि[6] करी उपेक्षा प्रभुवर, सुरकार्यसिद्धि साधाया;
नाहीं तरि, कोण क्षम सुतशोकें ईश्वरासि बाधाया? ३०
मायावत्यभिधाना निजभार्या, जी रतिप्रतिच्छाया[7],
राया! तीस प्रभुसुत दे सुतसा, अरि हि तो करी माया. ३१
काळप्रेरित शंबर, कीं स्वगृहीं नें स्वकाळ पोषाया;
पाहुनि कांता[8] हर्षे; पाळी ती असुरराजयोषा[9] या. ३२
स्तनपानदान अनुचित, यास्तव तो काम कांत रतिदायी
पोषविला, प्रार्थुनियां, देवुनि धनवस्त्र, साधुमति[10] दायी. ३३
मायावती सुनिपुणा स्मरुनि करी प्रेम बाढ[11] वीरा या,
सुरसायन[12]प्रयोगें मदनातें शीघ्र वाढवी, राया! ३४

१ संधी, अवकाश २ शंकर. ३. रुक्मिणीच्या. ४ मध्यरात्रीं ५ मूळ पाठ–**अजतोका**. ६ जाणूनबुजून. ७ रतीचें प्रतिबिंब ८ पतीला ९ स्त्री. १० चांगल्या बुद्धीची ११. पुष्कळ. १२. उत्तम पौष्टिक औषधें व अन्नें खावयास घालून–निर्णय०.

त्या धात्रीच्या कथितें मानी मायावतीस तो माता,
झाला तरुण, तया ती शिकवी माया सुरारिच्या घाता. ३५
हास्य विनोद बहु करी ती, इच्छुनि अंगसंग, वदनातें
सादर पाहे, समजे कां सुज्ञ इंगितें न मदना तें? ३६
मायावतीस समजुनि निजसंगीं लोल, बोल तो लावी;
'होसी माय कसी स्त्री? सुरसरितेसीं सुरा न तोलावी. ३७
रीति मनीं त्वां धरिली हे धर्माधर्म नेणत्या पशुची;
स्पष्ट घडेल चि पणें सकळां नरकांत नरक जो अशुची.' ३८
मायावती म्हणे, "तूं जरि मज म्हणतोसि, 'सत्य वद नातें;'
मदना! तें ऐक, तुला कथित्यें सद्गुणसुकीर्तिसदनातें. ३९
तूं प्रिय, तुझी प्रिया मीं, प्रद्युम्ना! मज म्हणों नको 'माता,'
शंबर तव तात नव्हे, असुराधम योग्य होय हा घाता. ४०
यदुवंशीं जन्म तुझा, तात श्रीकृष्ण, रुक्मिणी माता,
सप्तम दिवसीं असुरें हरिलासि अरातिघनघटावाता! ४१
रडली बहु वैदर्भी, रात्रिदिवस बहु तुला चि आठवि ती,
शोकें सा विति बहुधा होयिल, तुज भेटतां चि आठ विती. ४२
नेणति, येथें तूं, हें प्रभुवर ते रामकृष्णमामाजी,
पडले पुत्रवियोगें स्वमतिश्रीसांत्वनश्रमामाजी." ४३
मायाशस्त्रास्त्रस्वज्ञान प्रथम प्रियासि दे, मग ती
मायावती सुतेज हि, जेणें शत्रु न तयापुढें तगती. ४४
प्रद्युम्न बहु क्षोभे, दीर्घोष्ण श्वास सर्पसा सोडी,
खोडी कलहार्थ करी, भलें तो रणगतध्वजा तोडी. ४५

---

१. सांगण्यानें २ देवनदी जी गंगा तिजशीं ३ शत्रुरूपी मेघसमुदायाच्या वाता! ४ मनुष्यदेहाचें प्रमाण प्राय साडेतीन हात (सात विती) असतें, पुत्रशोकानें रुक्मिणी सहा विती झाली आहे (खगली आहे), पण तुझ्या दर्शनानें ती आठ विती (आनंदानें उंच) होईल. ५. स्वतांचें व श्रीचें (रुक्मिणीचें) सांत्वन करण्यांत गुतलेले. ६. आसुरी विद्येनुरूप शस्त्रास्त्रांची स्वत:ची माहिती.

तो असुर चित्रसेनप्रमुख शत सुत स्मरासि माराया,
आज्ञापी, समरार्थ स्वरथीं बैसे रतीश, बा राया! ४६
युद्ध प्रवर्ततां चि त्रिदशसहित शक्र, नारद, महा या
बसुनि विमानीं आला, गंधर्ववराप्सरांसह पहाया. ४७
विनवी देवेंद्रातें अद्भुतनामा महाप्रतीहार[1],
'प्रभुजी! जी विजयश्री, घालिल कोणासि आजि ती हार? ४८
शंबरसुत शत, यांसीं रण करितो एक कृष्णसुत, राया!
न कळे, कैसी होयिल असुरचमूसिंधु आजि सुतरा या.' ४९
हांसुनि सुरराज म्हणे, "श्रीरुद्रक्रोधवह्निनें काम
केला पूर्वी भस्म, प्रभुचें साहे न लंघना धाम[2]. ५०
प्रभुसि शरण जाय, धरी प्रणतांचे कल्पवृक्ष पाद रती,
गौरविली अभयवरें त्या वरदवरें, करूनि आदर, ती. ५१
प्रभुवर वदला रतिला, 'वत्से! सत्सेव्य विष्णु नरतेतें
वरिल, करिल यश, तरतिल जीव, पळ हि विसरतील न रते! तें. ५२
द्वारवतींत वसेल, त्वत्पति होयील तत्तनय पहिला;
त्या हरिल सप्तमदिनीं शंबर मरणार्थ, शिशु जसा अहिला. ५३
जा शंबरसदनीं तूं, हो, मोहाया तयासि, तज्जाया,
लज्जा यास्तव न धरीं, वरिजे शव[3] हि न नंदींत मज्जाया. ५४
तव हस्तीं, पाळाया बाळा यादववरात्मजा कामा,
देयिल शंबर; होयिल सिद्ध चि तें, वांछिसील ज्या कामा. ५५
तूं यत्नें कांतातें तोषासह, जपुनि शीघ्र वाढीव;
शिकवुनि माया, विद्या, पतिहस्तें हृदयशल्य काढीव. ५६
होवुनि तरुण तुझा पति अतितेजा, शंबरासि मारील,
वारील स्वाम्बिता, तो शोकीं रुक्मिणीस तारील ५७
जायिल तुजसह, जोडुनि वर विजय, द्वारकेसि काम रते!
सामर तेजस्वी जे वीर, उडवितील कीर्तिचामर ते. ५८

---

१. मुख्य चोपदार, द्वारपाळ. २. तेज. ३. मूळ पाठ–ही नदीं न.

हा या नगतनयेसीं नगतनयेसीं जसा रमे, यश तें
जोडिल रमोनि तुजसीं; हरि परिभविला न सारमेयशतें.' ५९
ऐसा रतिस तपाेतीं वर देवुनि, हरुनि शोक, शैलास
श्रीशंकर जाय; करी स्वनिवासें विश्वचर्ण्य कैलास. ६०
शंबरभार्या होवुनि, त्याच्या अंतःपुरांत वास रती
करि, अरितें मायेनें मोही, कंठी उदंड वासर ती. ६१
पुरुषोत्तम शिव वदला तें सत्य असें मनांत बाणावें,
प्रद्युम्न रणीं वधितो सुतशतसह शंबरासि जाणावें." ६२
ऐसें शक्र वदे, मग समरीं प्रद्युम्न शत हि तो खपवी,
त्या विजयें बहु पावे बळवृत्रघ्नापरीस तोख पवी. ६३
कामें शंबर, शंभर सुत मारुनि, संगरांत कोपविला;
द्विरदें कुसुमहारानें, तेंवि न मानी मनांत जो पविला. ६४
ऋक्षसहस्रयुतरथीं शंबर संगर करावया चढला,
सुतशोकप्रभवमहाकोपें, अनळें कटाहसा, कढला. ६५
दुर्धर, तथा प्रतर्दन, रिपुहंता, केतुमालि, हे सचिव
पाहुनि, म्हणे गुरु, 'सुभटपूजासाहित्य सुरपते! रचिव' ६६
उत्पात फार झाले, परि दानव रण करावया आले,
नाहीं मरणा भ्याले, भट लोकीं शस्त्रहत सुखें धाले. ६७
केशवचक्रसमप्रभ सोडी तो केतुमालि चक्रातें,
तेणें चि तया मारी, वाटे आश्चर्य फार शक्रा तें. ६८
तो केतुमालि चक्रें वधुनि, निववितां रतीश्वरें दृष्टी,
गंधर्व, अप्सरा, सुर, कुसुमांची करिति मन्मथीं वृष्टी. ६९
बळ मथुनि, क्षतजनदी वाहवुनि रणांगणांत, कामानें
अत्युग्र शत्रुहंता वधिला, प्लवगेंद्र जेंवि रामानें. ७०
क्रोधें वदे प्रतर्दन, 'रडाविन मीं रुक्मिणीस हरिसहित;

१ पर्वतकन्येशीं (पार्वतीशीं) २ नाहीं गेली नीति जिची अशा ३. शेकडों कुत्र्यांनीं. ४. तपाच्या शेवटीं. ५ विश्वानें वर्णन करण्याजोगा. ६ हत्ती. ७. वाली.

ज्यां देखिल्या[1] न साधे या लोकीं तों कदापि अरिस हित' ७१
उचली प्रतर्दनाचा सारथि तुरगांसमेत बाहूनीं,
निमिषांत जाय मकरध्वज[2] सध्वज रथ नभांत वाहूनीं. ७२
गरुड व्याळासि, तसा घेवुनि, नेवुनि महाजवें दूर,
चूर क्षितिवरि टाकुनि करि; परि तो, सजुनि रथ, निघे शूर.
हाणी रतिपतिचें उर, परि दुखवी लेशमात्र न गदा तें,
परवश[3] होय, फिरे स्त्री पतिवरि च, जसी मिळूनि [3]नगदातें.
त्याच्या चि गदेनें तो स्वर्गपथा लाविला सचिव, राया!
शौर्यें रिझोनि, जाणों प्रभुपुत्रें हा विलास चि वराया. ७५
वधितां प्रतर्दन सुटे त्रासें पळ[4] शेषदैत्यसमुदाया,
अविसंघ[5] सारमेया व्याला, तैसा चि शत्रु समुदा[6] या. ७६
// जसि रुधिरदिग्धवस्त्रा, गतशोभा, स्त्री रजस्वला, राया!
संकोचे परपुरुषा, शंबरसेना तसी च ती बा! या. ७७
सेनासचिवविनाशें शंबर कोपे, करी महासमर
त्यासि म्हणे श्रीनारद, 'देव कराया जयें सहास[7], मर.' ७८
अस्त्रें सुटतां कांपे भूमि, मुनि म्हणे, 'धरित्रि! अंब! रहा
स्थिर धैर्य धरुनि; होतो प्रद्युम्नकरें परासु शंबर हा.' ७९
अद्र्यस्त्र तया योजी, प्रकटी जें वृक्षवर्ष देवारी,
अस्त्रातें प्रत्यस्त्रें प्रद्युम्न, सुरांसि हर्ष दे, वारी. ८०
शंबर सिंह प्रकटी, काम तयांवरि महाशरभ[8], राया!
शुद्धीं पिशाचसे न क्षम, अरिचे प्रभुसुतीं शर भराया. ८१
शस्त्र न चाले काहीं, अस्त्र हि, शंबर म्हणे, 'निदानींच्या[9]
मीं मुद्गरें वधिन या, करुनि दृढ उर स्थळीं भिदा[10] नीच्या. ८२

---

१. देखिलेल्या. २. काम (प्रद्युम्न). ३. नगदातें मिळूनि (अलंकार देणाऱ्याची संगत धरून) जसी स्त्री पतिवरि च फिरे व परवश होय, तशी प्रतर्दनाच्या गदेची अवस्था झाली. ४ पळापळ. ५. बकऱ्यांचा कळप. ६. आनंदयुक्त प्रद्युम्नाला. ७. आनंदयुक्त. ८. सिंहाला मारणारा पशु. ९. अखेर उपयोगीं पडणाऱ्या. १०. भेद, फोडणें.

तप करुनि रचुनि, जेणें शुंभनिशुंभांसि संगरीं निवटी,
तो मुद्गर मज दे ती, जो शत्रुबळीं, जसी तमीं दिवटी.' ८३
ज्यासि अवध्य न कोणी, त्या दुर्गादत्त मुद्गरें अरि तो
कामवध मनीं योजी, शक्र म्हणे, 'हाय! हा यशा हरितो.' ८४
प्रार्थी नारदमुनिला, 'उपदेशीं वैष्णवास्त्र कामातें,
रावणवधार्थ सांगे सूर्यहृदय घटज जेंवि रामातें. ८५
जा, जातिस्मरण, तथा कवच अभेद्य हि मुने! तया दे हें;
समयीं साहित्य करुनि, उद्धरिले बहु तुवां दयादेहें.' ८६
केलें शक्रोक्त सकळ, भेटोनि प्रभुसुतासि सत्वर, तें;
दुर्गास्तवन हि कथिलें देवर्षिवरें विशुद्धसत्वरतें. ८७
असुरें मुद्गर धरितां, झाले उत्पात, न स्फुरे तर्क,
रोमांच देवदेहीं उठले, द्वादश नभीं नृपा! अर्क. ८८
क्षम दुर्गोद्भव मुद्गर अमरादिप्राणिलक्ष माराया,
कांपे ब्रह्मांड हि, मग धृति कोठुनि आणिल क्षमा राया!? ८९
उतरे रथावरुनि रतिपति, म्हणुनि 'नमो नमः' स्तवी तीतें,
'श्रितकल्पलता,' जीतें म्हणती हें जग समस्त वीतीतें. ९०
होय प्रसन्नचित्ता, दर्शन देवुनि, म्हणे तया आर्या,
'वत्सा! वर माग, शरण ज्यास्तव आलासि करिन त्या कार्या.'
बद्धांजलि काम म्हणे, "माते! मज जय रणीं घडावा गे!
त्वदनुग्रहें चि, भगवति! जीव सुखें, वरुनि ही जडा, वागे.
माझ्या उरीं विराजो, होवुनियां पद्महार मुद्गर हा;
म्हणसील सति! अपथ्या भार्या 'होवूनि पथ्य मुद्गे रहा.'" ९३
दुर्गा 'तथास्तु' ऐसें बोलुनियां, गुप्त होय जों, अरि तों
स्वमनांत म्हणे गरगर मुद्गर फिरवीत, 'घात मीं करितों.' ९४

---

१. दुर्गादेवी २. मत्रविशेष. ३. कुंभोद्भव, अगास्त्यमुनि. ४. पूर्वजन्माची आठवण. ५ पृथ्वी. ६. उत्पन्न करणारीला. ७. देहाला ८. उडिदांस. ९. मुग.

सोडी शंबर मुद्गर, उद्गरधर कोपला जसा काळा,
परि तो शिवाप्रसादें पद्मांची होय, लागतां, माळा. ९५
जयजयकार करिति सुर, मुनि, जे गगनांत दाटले होते;
दुर्गाप्रसाद मुदिरें चि, शक्रादि मयूर वाटले हो! ते. ९६
मग वैष्णवास्त्र योजी तो जीमूताभदेवसुत, राज्या!
सोडी वर खरतर शर, परसेनासिंधुकोटि सुतरा ज्या. ९७
शर, शंबरोर भेदुनि, धरणींत शिरे, फणी जसा सिरतो;
जाणों 'भोगवतींच्या' काम म्हणे 'पितुनि हा रसांसि रतो.'
त्या शंबरासि म्हणतो कवि 'सिकतासेतु,' सायका 'पूर,'
किंति अंधकार तो, शर खरकर, तो दीप, काय कापूर? ९९
श्रीवैष्णवास्त्रतेजें झाला नाहीं च त्या शरें काय,
प्रद्युम्न म्हणे, 'केलों पूर्वीं ऐसा चि मीं हरें काय?' १००
झाला भस्म, परि नृपा! गेला उत्तम गतीस शंबर तो,
तरि च प्रभुसुरभीतें स्मरुनि सदा, साधुवत्स हंबरतो. १०१
सुर गंधर्व निवाले, हर्षें नर्तन वराप्सरा करिती,
वर्षति दिव्यें कुसुमें, जयजयकारें नभासि ते भरिती. १०२
सुर गेले स्वर्गातें गात प्रद्युम्नकृष्णशर्वांतें,
रतिलक्ष्मीदुर्गांतें; ज्यांचें यश निर्ववितें चि सर्वांतें. १०३
स्मर ऋक्षवंतनगरीं जावुन, मायावतीस घेवून,
सेवून स्वस्तुतितें, गगनपथें द्वारकेसि येवून, १०४
देवून प्रथम प्रभु गुरुच्या अंतःपुरांत सहसा च
मातेस हर्ष, विस्मय मातृसपत्नींस, होय मह साच. १०५
वैदर्भीच्या अंतःपूर्वीं ससुरर्षि हरि पुरा गेला,
कळवी सुतवृत्त प्रभु, वाटवि हितकर चि, न रिपु रागेला.

---

१ विष ओकणारा सर्प २ मेघ ३ मेघकांति (कृष्ण) देवाचा पुत्र. ४ पाताळगंगेच्या. ५ पाण्याला. ६. सूर्य. ७. नाहींसा, नष्ट. ८ 'अत.' आहे पूर्वा ज्याच्या अशा 'पुरा'ला म्ह० अत पुराला

भुलवी रूपें, चरितें, द्वारवती पुत्र जळजनाभाचा,
रुक्म्यासि गमे हरिपरिभवकर, भंगूनि खळजना, भाचा. १०७

# अध्याय एकुणचाळिसावा.

बळदेवाह्निक[2] अद्भुत, ज्याच्या संकीर्तनें निवे ताप,
पाप त्रासोनि पळे, गरुडाच्या[3] जेंवि मनुजपें साप. १
आत्मविनाशाकारितां जेव्हां प्रद्युम्न शंबरें हरिला,
सुत सांब या चि मासीं शंभुवरें प्राप्त जाहला हरिला. २
सांबावरि राम करी प्रेमा, शस्त्रास्त्र सर्व या सिकवी,
मानिति रामासि जसें यादव, सकळ हि तसें च यासि कवी. ३
दुर्योधन यज्ञ करी, देखाया पातले नरेश तदा,
ऐकाति जे तज्ज्ञमुखें प्रभुचे संपत्तिगुण बरे शतदा. ४
दूत प्रेषुनि, करुनि प्रभुसीं संधान, भूप सर्व तया
भेटों जाति, म्हणे त्या पक्षिरवें रैवताख्य पर्वत 'या'. ५
पांडवकौरवकोसलगंधारप्रमुख देशपति, अन्य
आले, त्यांच्या सेना अठरा अक्षौहिणी, सुराजन्य[4]. ६
भेटे त्यांतें सुखघन, बैसे सिंहासनीं, तया बसवी,
वसवी चकोर, ते प्रभु चंद्र चि, सत्कार तो सुधारस वी. ७
तेजस्वीप्रभुदर्शनहृष्ट कथिति धर्मनयकथा राजे,
देते हिमालयीं ही अहितजना तापहर न धारा जे. ८
तों तेथें श्रीनारद आला, सिंहासनीं, प्रभुसि पाहे;
वाहे प्रभु भव्यासन, तेथें सानंद साधु तो राहे. ९
प्रभुसि म्हणे, 'देवांत अशा! आश्चर्य, धन्य, तूं मात्र;

१ इंद्राला जिंकणारा. २ बळरामाचें नित्यधर्मकृत्य ३ गारुडमंत्राच्या जपानें.
४ चांगले राजे.

कृष्णा! लोकांत नसे तुजवांचुनि अन्य या यशा पात्र.' १०
प्रभु मुनिस म्हणे, 'साधो! जें तूं वदलास काय, गा! बा! हें
सत्य, परि दक्षिणांसह धन्य हि, आश्चर्य ही, स्वयें आहे.' ११
ऐकुनि देवर्षि म्हणे, 'कृष्णा! पर्याप्तवाक्य मीं झालों,
जातों, दया असों दे, देवा! यास्तव चि या स्थळा आलों.' १२
इतुकें वदोनि निघतां, विनवुनि कृष्णासि, पुसति ते राय,
'सांग, विभो! तूं नारद दोघे हें गूढ बोलिलां काय?' १३
श्रीकृष्ण म्हणे, 'नृप हो! हें या देवर्षिनें चि सांगावें,
अर्थिजनें, कल्पतरु त्यजुनि, परातें धनार्थ कां गावें?' १४
मग देवदेव मुनितें हसुनि म्हणे, 'यांसि सांग, बा! राहें,
तुज चि यश मिळे, न परा झिंवुनि तपें अब्द आंग बारा हें.' १५
बैसुनि कांचनपीठीं देवर्षि वदे, "नृपाळ हो! परिसा,
स्नानार्थ सुरनदीप्रति गेलों, भीती जिच्या जळा अरि सा. १६
गंगेंत देखिला म्यां तों कूर्म क्रोशमंडलाकार,
स्पर्शुनि वीणाकारा, वदलों, 'तूं धन्य कच्छपा! फार.' १७
मज कूर्म म्हणे, 'कांहीं नाहीं आश्चर्य, धन्य, बा! हा मीं,
जींत असे, बहु गंगा धन्या, आश्चर्यरूपिणी, स्वामी!' १८
गंगेतें वदलों, 'तूं माते! आश्चर्यभूषिता, धन्या.'
'आश्चर्य धन्य सागर, मीं न,' असें जह्नुची वदे कन्या. १९
'आश्चर्य! धन्य!' ऐसें वदतां, प्रकटोनि, भेटि अर्णव दे,
'जीवरि मीं, हे धन्या भूमि,' असें सिंधु शुद्धवर्ण वदे. २०
'आश्चर्य! धन्य!' म्हणतां, क्षिति हि म्हणे, 'मज म्हणों नको, पावें,

---

१ यज्ञ=विष्णु, यज्ञपत्नी=दक्षिणा. जें काय तू बोललास हें खरें, परंतु माझ्या ठिकाणीं धन्यत्व व आश्चर्यत्व दक्षिणेमुळें आलें आहे. २ समाधानकारक पूर्ण उत्तर ज्यास मिळालें असा. ३ झिजवून. ४. बारा अब्द (वर्षें)-पंत. ५. [कामक्रोधादि] षड्रिपु ६. वीण्याच्या आकाराच्या त्यास ७. असले माझ्यासारख.

पर्वत सर्व तसें, बा ! धरिति मला, कीं, तिहीं न कोपावें.' २१
नृप हो ! क्षितिची झाली कर्णाला उक्ति तोखराशि खरी,
आश्चर्य धन्य गमला, जो मेरुप्रमुख, तो खरा शिखरी. २२
मग सर्व भूधरातें म्हणतां 'आश्चर्य ! धन्य !' ते प्रणती
करुनि, 'प्रजापतीतें म्हण, देवर्षे !' असें मला म्हणती. २३
वदलों प्रजापतिस मीं, 'देवा ! आश्चर्य ! धन्य ! तूं कर्ता,
भर्ता, या विश्वाचा, भक्ताचा पातकव्यथाहर्ता.' २४
तों विधि मला म्हणे, 'म्हण, वत्सा ! 'आश्चर्य ! धन्य !' वेदांतें;
हे ज्ञानामृतघन या मोराच्या हरिति सर्व खेदांतें.' २५
वदलों त्यां, 'आश्चर्य हि धन्य हि कथिलांत वेद हो ! तातें,
हरिलें अज्ञान तुम्हीं, जेणें जीवांसि खेद होता, तें.' २६
वेद वदले, 'प्रजांतें देती जी रीति नरेश महिवरि, ती
आम्हां मख, बांसि भजुनि भाग्य महद्यश, अरे ! शम हि वरिती.
आश्रय आम्हां मख, रे ! न खरे याहूनि सर्व जे अन्य,
आश्चर्य जगीं यज्ञ चि, देवर्षे ! हे चि जाण बा ! धन्य.' २८
ब्रह्म्याहुनि वेद परम, वेदाहुनि परम यज्ञ, हें कळलें;
मन्मन सद्यश जिकडे, खावू तिकडे चि तोकसें वळलें. २९
गुरु गमले जे त्यांवरि कळतां मख परम, मीं न कां वदलों ?
'आश्चर्य, धन्य हि तुम्हीं; यज्ञ त्रिजगांत मुख्य,' हें वदलों. ३०
मख वदले, 'विष्णु चि, जो जाणे आश्चर्य तो कवि न यज्ञ,
त्यों 'धन्य' म्हणे, तद्वच गुरुसि रुचे, जेंवि तोक विनयज्ञ. ३१
आश्चर्य परम विष्णु चि, धन्य परम एक विष्णु, हा नियम;
हें बोधामृत पीना, त्याची न करील काय हानि यम ? ३२
आश्चर्य धन्य विष्णु चि देवर्षे ! यज्ञ दक्षिणासहित,

१ होत होता. २. प्रेम. ३. यज्ञातें आश्चर्य जो जाणतो [तो] न कवि–पंत.
४. विष्णूतें–पंत. ५. विनयशील.

धन्य असा अन्य नसे, [1]सन्यस्ताखिलमहत्सभामहित.’ ३३
यज्ञोक्त असें ऐकुनि, आलों येथें खरें करायास,
सफळ [2]मेंदायास, जसा [3]मार्गीं रचिल्या सरें [3]करायास. ३४
आलों शोध करित, तों श्रीविष्णु विलोकिला तुम्हांआंत,
बद्ध हि, मुक्त हि, काळव्याघ्राचे हा चि करितसे, दांत.” ३५
जें आश्चर्यत्व, तथा धन्यत्व हि जें जगीं असे, याची
श्रीकृष्ण [4]पराकाष्ठा, वर्णुनि कूर्मादि, मुनि कथी, साची. ३६
श्रीकृष्ण म्हणे, ‘जे [5]बहुदक्षिणमख करुनि, यज्ञपतिस मज
यजिति, तयांस चि होत्ये [6]हे, इतरा दुर्लभा चि अति समज.’
मुनि कथुनि असें गेला, प्रभु हि, [7]अमृततृप्तकर्ण ते राजे,
किति हें ज्ञान सुरक्षिति, जपति [8]महामंत्रवर्ण तेरा जे. ३८
हें ‘धन्योपाख्यान’ श्रवण करावें, कधीं न भागावें,
देवानीं हि विमानीं बसुनि सुखें लंघितां नभा, गावें. ३९

---

# अध्याय चाळिसावा.

[9]सायंकतल्पशयानश्रीगंगानंदनें [10]महाप्राज्ञा
कृष्णसखा, ‘वद धर्मा प्रभुचें माहात्म्य,’ केलि हे आज्ञा. १
अर्जुन धर्मासि म्हणे, “गेलों संबंधिजन पहायाला

---

१. सर्वसंगपरित्याग केलेल्या महात्म्याच्या सभानीं स्तविलेला. २. माझे श्रम ३. [तृषित पांथस्थांच्या उपयोगार्थ] वाटेवर बांधलेल्या सरोवराबद्दल हातांस पडलेले श्रम जसे सफळ होतात तसे ४. अखेरची अत्युच्च स्थिति, अवस्था. ५ ज्यांत पुष्कळ दक्षिणा वांटण्यांत आली असे यज्ञ. ६ पराकाष्ठा ७ अमृतासारख्या भाषणानें तृप्त झाले आहेत कान ज्यांचे असे. ८ ‘श्री राम जयराम जयजयराम’ या त्रयोदशाक्षरी मंत्राचीं अक्षरें. ९ बाणांच्या बिछान्यावर निजलेल्या भीष्मानें. १० महाबुद्धिवान् अर्जुनाला.

श्रीद्वारकेंत, राज्या! प्रभुसीं क्रीडत सुखें रहायाला. २
प्रभु सोमयाग करि, घे दीक्षा राज्या! महामुनिस्तुत्या
सुत्यागवद्वरिष्ठा, ज्यामध्यें एक मात्र वा! सुत्या. ३
त्या यज्ञमंडपीं प्रभु दीक्षित तो सुद्विजव्रजीं आहे,
तों 'रक्ष, रक्ष,' ऐसें वदत, ब्राह्मण पुढें उभा राहे. ४
कृष्ण म्हणे, 'विप्रवरा! भय न धरीं, रक्षितों, न हो लोलें,
कोणापासुनि तुज भय काय? कळों दे मज, स्वयें बोल.' ५
"म्हणवितसे, मदपत्यें तीन तळीं करुनि शुष्क, राक्षस 'हा!'
'प्रारब्धकर्म', न म्हणसि एक प्रभु तूं चि पुष्कराक्ष, 'सहा.' ६
मदपत्य चतुर्थ तरी श्रीकृष्णा! त्वां जपोनि रक्षावें,
लक्षावें सुकृत यश, ब्राह्मणकुळ राक्षसें न भक्षावें. ७
श्रीकृष्णा! धांव कसा! बहु निकट ब्राह्मणीप्रसवकाळ,
वा! चवथा, तरि रक्षुनि दे चि मज, गिळो निशाचर न बाळ."
मज देव म्हणे, 'दीक्षा वरिली म्यां, व्रत कधीं न मोडावें,
सर्वां हि अवस्थांत ब्राह्मण रक्षूनि, सुयश जोडावें.' ९
वदलों मीं, 'मज कृष्णा! ब्राह्मणसंरक्षणांत योजावें,
यश करिल, या सख्यातें त्वां अजिता! निजभुजांत मोजावें.'
कृष्ण स्मित करुनि म्हणे, 'विप्रातें रक्षिसील?' हे वाचा
बहु लाजवी, नृपा! कीं मीं गोप सखा न वासुदेवाचा. ११

---

१. उत्तम दानामुळें श्रेष्ठ (दीक्षा). २ सोमरसाची निष्पत्ति. सोमवल्लीचा रस काढण्याचें भांडें–निर्णय० ३ घाबरा, चचल, कांपणारा. ४ [गगन–] तळीं (आकाशात) नाहींशीं करून. ५ 'हें तुझें दैव आहे, निमूट सहन कर,' अशा प्रकारचा हताश व नेभळट उपदेश न करणारा, असा काय तो तू च एक कमल-नेत्र मला दिसत आहेस–निर्णय० ६. माझ्या बायकोचा प्रसूतिसमय. ७. कीं (कारण) मीं [यद्यपि] वासुदेवाचा सखा [तरी] गोप न (त्याच्या इतर गुराखी मित्रांप्रमाणें युद्धकर्म न जाणणारा नव्हतों).

भज लज्जा झाली, हें जाणोनि, प्रभु म्हणे, ‘ न लाजावें,
अवनीं शकासिल, तरि तूं द्याया यश आपणा, मला, जावें.’ १२
रामप्रद्युम्नांतें सोडुनि, वरकड कुरूत्तमा ! अवघे [1]
युयुधानप्रभृति अहितसैन्यतृणाचे समागमें दवे घे. १३
कृष्णाज्ञेनें घेवुनि वृष्णिबळ, पुढें करूनि तो विप्र,
गेलों तद्ग्रामातें, धर्मा ! मीं द्वारकेहुनि क्षिप्र. १४
ग्रामाजवळि उतरलों, करुनि स्वस्था चमू समग्रा मीं,
मग सात्यकिप्रमुख भट घेवुनि, शिरलों मनोरम ग्रामीं. १५
तों उत्पात निशीथीं[2] झाले, उल्का पडे नृपा ! मोटी,
सेना सिद्ध करविली, ती वेळा समजली मला खोटी. १६
सर्व रथावरि चढलों, तों तो द्विज ये, म्हणे, ‘ प्रसवकाळ
स्त्रीचा आतां चि असे, रक्षा सावधपणें सकळ बाळ.’ १७
बहु सावधान आम्हीं झालों, राया ! मुहूर्त जों गेला,
‘ हरिला ! हरिला !’ ऐसा आक्रोश द्विजगृहीं जनें केला. १८
त्यामाजि दीनरोदनरव सहसा ऐकिला, अगा राज्या !
रक्षित होतों देवुनि विप्राच्या अभय मीं अगारा ज्या. १९
तों सहसा आयकिलें आम्हीं रोदन नभांत बाळाचें,
वपु देखिलें न शिशुचें, न तया ही विप्रवंशकाळाचें. २०
जेणें चवथें हि बळें विप्राचें तोक जन्मतां हरिलें,
तो राक्षस रोधाया आम्हीं नभ तें शरव्रजें भरिलें. २१
सर्व दिशा शररुद्धा केल्या, कोंडावयासि चोरा ज्या,
तेणें नेला चि नभीं, न दिसों देवूनि, बाळ तो, राज्या ! २२
विप्र करी आर्त स्वर, कार्तस्वरपटसखा[3] मला गांजी,
कां जी ! धिकारींना ‘ दुध देतों ’ म्हणुनि अर्पितां कांजी ? २३

---

१ शत्रूसैन्यरूपी गवताचे वणवे २ मध्यरात्रीं. ३. पीतांबरधारी मित्र ( कृष्ण ) [ मला काय म्हणेल हा विचार ] माझ्या मनाला अतिशय दुःख देत आहे. कार्तस्वर=सोनें.

यादव हतसंकल्प, स्पष्ट चि झालों विनिष्टचेतन मीं,
त्या विप्रातें शापत्रासें, धिक्कृति द्दष्टांत घेत, नमीं. २४
ब्राह्मण म्हणे, " धनंजय हें जरि हि असत्य नामपद, लासी.
शिशु रक्षिला न, 'रक्षिन' ऐसें कैसें मृषा चि वदलासी? २५
आयिक, रे! तुज कथितों जें तुजला योग्य, तें चि, मन, पार्था!
न तुझें शुचि, कीं करिसी प्रभुसीं स्पर्धा सदैव अनर्थार्था. २६
तूं काय! अमितकर्मा काय श्रीकृष्ण! यासह स्पर्धा!
तन्नामपदनखाचा गुणमहिमा न सगळा, नसे अर्धा. २७
येता कृष्णप्रभु, तरि अत्याहितें हें कधीं न आतळतें;
रे! सुतशोककटाहीं अति मृदु मम मन, करूनि 'आ', तळतें.
'रक्षिन' म्हणोनि, रक्षी बुध, धर्मांचें चतुर्थ फळ घेतो.
रक्षि न जो, अघगिरिच्या चवथ्या शृंगीं न काय वळेघे तो?
'रक्षिन' म्हणुनि न रक्षण केलें, मज भरवसा दिला लटिका.
व्यर्था तव प्रतिज्ञा, जसि पौकामिषें विभूतिची वटिका. ३०
निष्फळ गांडीव तुझें, व्यर्थ तुझें वीर्य, यश तुझें मोघें,
पोकळ वीराकार स्पष्ट तव, जसा मृगांबुचा ओघ." ३१
किमपि न वदतां, आलों परतुनि, लाजुनि मनांत आपलिया;
निसटे यादवसेना; याद वसेना हृदांत तापलिया. ३२
समजे द्वारवतींत प्रभु, पाहुनि मन्मुखा अवनता तें
समजावी, खेद हरी, यापरि केलें नसे अवन तातें. ३३

---

१ भग्नप्रतिज्ञ. २ भ्रांतिष्ट ३ शाप देईल या भयानें ४ धनंजय (अग्नि) हें खोटें नामाभिधान जरी तू घेतलें आहेस, असें तुला माझ्या मुलाचें रक्षण करिता आलें नाहीं यावरून उघड होत आहे, तरी मला मात्र तू लासी (भाजीत आहेस). ५. व्यर्थ. ६. तुझ्यांत व कृष्णांत केवढें अंतर? ७. भयंकर सकट. ८ येऊन पोंचतें. ९ शिखरावर लोंबकळतो १०. पक्वान्नाच्या मिषानें [दिलेली] भस्माची वडी ११. व्यर्थ. १२. मृगजळाचा. १३. [लज्जेनें] खालीं घातलेल्या. १४ विपन्नामवृत्त—पंत.

सांत्वन करि विप्राचें, स्वरथीं हरिराज योजवी, राया !
अतुळप्रताप हा, बा ! कोणासीं ही न मोज वीरा या. ३५
स्वरथीं सद्विज बैसे, वरि चढल्या दारुका तळीं उतरी,
मज सारथि करि, वरि जो मम सारथिता, भवांत जी सुतरी.
दोघे सखे निघालों उत्तर दिग्धरुनि, तो हि होय तिजा,
ज्या विप्राचें सद्यश वदलें शरदिंदुला हि 'हो यति, जा.' ३६
गेलों क्षिप्र विलंघित बहु नग, विपिनें, सरोवरें, सरिता;
रूपी सागर वंदी, सत्कारी, स्तुति हि फार जो करिता. ३७
परि कृष्ण म्हणे, 'सिंधो ! निजतोयावरुनि शीघ्र दे वाट.'
जलधि म्हणे, 'तूं रक्षिसि मर्यादा, म्हणुनि सुर तुझे भाट. ३८
तूं लंघिसील, तरि नृप इतर हि लंघावया पहातील;
प्रभुनें चि सेतुलंघन करितां, पर कां उगे रहातील? ३९
यमुनेनें जेंवि दिली, देतों शोषूनि जळ, तशी वाट,
यादांसि मदुदरीं तूं, आला भेटावया शशी वाट.' ४०
कृष्ण म्हणे, 'नररत्नें नेणतिल, न पावसील शोषा तें,
सत्य असो मद्वरवच, कोणी लावू न यासि दोषातें. ४१
स्तंभित जळ करुनि, मला किंवा सुब्राह्मणासि दे अयन.
नय नम्रत्वें न बुडे सुरतीं, धरि अणु हि न त्रपा नयन.' ४२
'जी जी आज्ञा प्रभुची, बहु मान्या मज,' असें वदे, तो या
स्तंभित करी, तिळभरि हि अजितरथभरें लवों न दे तोया. ४३
कैलास जयंत, तथा विजयंत हि, रजत, नील, नग, वाटे,
गिरि, चंद्रकूट, मेरु हि, भेटति; आश्चर्य कां न मग वाटे? ४४
'किं कुर्म' असें पुसती, कृष्ण म्हणे, 'विवरमार्ग ओपावा.'
देती रथपथ सत्त हि, कीं प्रभु वाग्लंघनें न कोपावा ४५

---

१. उत्तम अश्व. २. उत्तम नौका ३ मार्गे अ० ३२।४१ पद्य ४ मर्यादातिक्रमण ५. माझ्या वराचे शब्द. ६. निश्चल. ७. मार्ग. ८. लज्जा. ९. वाटेला, वाटेंत. १०. किं कुर्मः=आम्हीं काय करावें?

नगपंक्तींत धडक रथ चाले, घनराजिमाजि जेंवि रवी;
स्पर्शें कळे असें तम मग लागे, तुरगतेज जें विरवी. ४६
कष्टें चालति वाजी, पंकसम तम क्षमावरा ! दाट,
वाट रुसूं न दे तें, मन उपदेशा जसें, जया कोंट. ४७
लागे महानगाचा मग मार्गामाजि अंधकार गडी,
त्या चक्र तसें प्रभुचें, शूळ जसें काय अंधका, रगडी. ४८
चालविले तिमिराचळ भेदुनि, जे निष्प्रयत्न, ते वाजी;
चक्रद्युति 'बहु' म्हणती हिमरजतकनकनगांसि, 'तेवा जी !'
तम नाशुनि, प्रकाशुनि नभ, दाखविला हयांसि अच्छपथ;
चक्रापुढें तिमिर किति? काळ हि लंघील वा ! न तच्छपथ. ५०
मरण तमीं झालें, मग जन्म पुन्हां मतिस वाटलें हो ! तें.
बाहेर तिमिर तैसें कश्मळ हृदयांत दाटलें होतें. ५१
गेलों दूर पुढें, तों झालें आश्चर्य, ऐक बापा ! हें,
मीं अत्यद्भुत गगनीं शुचि पुरुषाकार तेज वा ! पाहें. ५२
आम्हांसि रथीं स्थापुनि, अमित चमत्कार आयते ज्यांत,
आर्या ! धर्मा ! सहसा त्या हा यदुराय जाय तेज्यांत. ५३
एक मुहूर्त, तेजोनिधिमाजि शिरोनि, हा निघे, राया !
त्या विप्रातें न पुन्हां स्वप्नांत हि पुत्रहानि घेराया. ५४
रिक्तें[11] कवींच्या व्हाया, आणी द्विजभवचतुष्टया, दवेती;
तसा तद्दृष्टि निवावि शरणागतकवच[12] तुष्ट[13] यादव ती. ५५

---

१. मेघपक्तींतून २ शृगाला जणू काय चिकटणारें च असें—निर्णय० ३. नाहींसें करी ४ चिखलासारखें. ५ मळ, कलंक, गंज ६. तिमिर (अंधार) अचल (पर्वत) ७ अगदीं अडून राहिलेले. ८ सुदर्शनचक्राचें तेज बर्फ, रुपें व सोनें यांच्या पर्वतांस 'बहु (सारखे, पुष्कळ) जळत रहा' असें म्हणे. ९. स्वच्छ वाट. १०. अंधारी. ११. कवींच्या [शाईच्या] दवती [चरित्रवर्णनपर काव्यें लिहून] रिकाम्या व्हाव्या, म्हणून चौघे द्विजभव (ब्राह्मणपुत्र) आणी (परत आणी). १२ रक्षणकर्ता. १३. प्रसन्न–पंत.

हर्षे विप्र, प्रभुनें दिधले नंदन विलोकितां अवघे,
माझें तों अतिविस्मित करुनि हरुनि हृदय रुक्मिणीधव घे. ५६
द्वारवतीतें परतुनि, अर्धे हि दिन न भरतां, नृपा! आलों,
झालों विस्मित मीं, या प्रभुच्या चरितें महामृतें धालों. ५७
ब्रह्मण्यें श्रीकृष्णें ससुत द्विज मंदिरासि आणून,
न्हाणून, अळंकारुनि, जेवविला शंभुरूप जाणून. ५८
बाळांसि बाळलेणें देवुनि, करुनि प्रहृष्ट धनदानें,
फार निववला ब्राह्मण, जैसा चातक, मयूर, घनदानें. ५९
सुरथीं बसवुनि, विप्र, स्वग्रामातें नमूनि पाठविला,
महिमा दिसांत शतदा या प्रभुचा म्या मनांत आठविला ६०
पुसतां, कृष्ण मज कथी, 'तो श्वेतद्वीपपति महायास
शिशु हरुनि दे द्विजातें, परमाश्चर्या मला पहायास.' ६१
जो यज्ञांचा भोक्ता श्रीश्वेतद्वीपपति, तया हि सदा
आश्चर्यभूत भगवान् कृष्ण, असें तत्व या कथेंत वदा" ६२

---

## अध्याय एकेचाळिसावा.

बळिपुत्रशतज्येष्ठ, श्रेष्ठगुण, ख्यात दितिकुळीं बाण;
शोण तया हीरा तप झालें, जनमेजया! नृपा! जाण. १
गुहकृत शंकरभजन प्रेक्षुनि, आपण हि तो हरास भजे;
भजती च कुलज भावें, न भजति ते, प्राप्तमोह रासभ जे. २
होय प्रसन्न भगवान्, वरदेश्वर, देवदेव, हर पावे;
'वर माग,' म्हणे ज्याच्या चरणस्मरणें चि ताप हरपावे. ३
बाण म्हणे, 'दे देवीपुत्रत्व हि, बाहु, उरु, सहस्र मला;

१ मेघानें २ पुष्कळ त्रास ३ कसोटी ४ कार्तिकस्वामीनें केलेलें ५ देवी=पार्वती.

तुजसम तूं चि, रविसम न कोणी जन्हि तपुनि गुरुसह श्रमला.'
दे वर देव रजनिकरचूड, दयासुरनदीसुमेरु च तो;
गौरीस म्हणे, "घे सुत, बाण रुचो, गुह जसा उमे! रुचतो. ५
वडिल गुह तसा चि रुचो देवि! तव मना कनिष्ठ हा तनय;
असमद्भक्त असुतपा सति! होय न, नाकनिष्ठ हातनय. ६
गुहजन्मभूप्रदेशीं व्हावें पुर रम्य नाम 'शोणित,' या
मीं आंगें रक्षीन; स्पर्शेल न अहिततेज कोणि तया." ७
दुर्गा पुत्रत्वें घे, अनुजत्वें स्कंददेव बाणातें;
बाणातें भजतो द्विज, भक्तातें शंभु, तुल्य जाणा तें. ८
पुर ईश्वरें रचविलें अप्रतिम त्रिभुवनांत बाणा या,
प्रभुला भक्त प्रिय बहु, हें श्रोत्यांच्या मनांत बाणाया. ९
ज्याचा भालदृगग्नि प्राशी रतिजानिचें शरीराज्य,
त्याच्या वरसामर्थ्यें बलिसुत शोणितपुरीं करी राज्य. १०
झाला बाहुसहस्रें वीर्यमदोत्सिक्त बाण अतितेजा,
रणकाम धरी, भीती शक्रादि सलोक लोकपति ते ज्या. ११
स्कंदें या स्वभ्रात्या स्वध्वज वाहनमयूर दिधला हो!
प्रेमें शिवा म्हणे, 'जें रत्न जगीं, तें अनेकविध लाहो.' १२
गंधर्व, यक्ष, राक्षस, न टिकति समरांगणीं, न वा सुर ते;
उरते घन वायुपुढें, तरि अरि बाणासि संगरीं पुरते. १३
सुर म्हणति, "या जयश्री जोडुनि देतो महामद नवि च कीं.
ईश्वरतेज म्हणेना कां हो! तेजोंतरा 'वदन विचकीं'?" १४
गुरु हरिस म्हणे, "व्यर्थ चि न, वरूनि तपा नवा, सुकिव देहा,

१. चद्रचूड—(मौलि) शकर २ दयारूपी गगानदीचें [उगमस्थान असा] मेरुपर्वत. ३. असुतपा (ज्याचें तप उत्कृष्ट नाहीं तो) असमद्भक्त न होय, [तसा च] जो नीतिमान् नाहीं तो स्वर्गप्राप्तीला योग्य होत नाहीं ४ शिवलिंगाला. ५. कपाळावरील [तृतीय—] नेत्राग्नि. ६. रतीच्या पतीचें (मदनाचें) शरीररूपी तूप. ७. वीर्यमदानें उन्मत्त. ८ अष्टदिक्पाळ. ९. अन्य तेजाला

बा! बाण असह्य तुला, गरुडरणीं कां न वासुकि वदे 'हा!'?"
प्रतिभट[1] मात्र सुदुर्लभ बाणाला, त्रिभुवनीं नसे अन्य,
कष्टी चित्तीं तेणें, जरि केला ईश्वरें असा धन्य. १६
बळिसुतभुजा क्षम नग न, वारण हरिहरिनखा जसे नाहीं.
एकाची[2] हि सुरांच्या हरिली हरि! हरि! न खाज सेनाहीं. १७
प्रभुतें नमुनि पुसे तो बाण असें कीं, 'मज श्रम स्फार[3]
देती रणाविणें हे भुज, भुजगवरांगदा[4]! वृथा भार. १८
जें अचळत्व[5], दृढत्व, न धरिति नग लहाति बा! हुलीं[6] जे तें,
खाजेतें न सहाती, पावती वंध्येच्छ[7] बाहु लाजेतें. १९
होयिल निःसीम कधीं भुजकंडूप्रशमहेतु[8] युद्ध? वद:
ब्रह्मांडीं मज नाहीं समरसम रस प्रगल्भ उद्धवंद[9].' २०
'होवुनि असपत्नें[10],' म्हणे जो प्रभु बळिसुनुतें, 'विशंक रहा,'
तो त्याच्या या कामें वदला, कितवासें[11] तेंवि शंकर 'हा!' २१
शंकर हांसुनि सांगे, 'जरि काम तुझ्या मनांत संगर हा,
तरि बा! निजध्वजाचा वांछितपूरक[12] पहात भंग रहा. २२
जेव्हां ध्वजभंग तुझा, होयिल तेव्हां महासमर जाण.'
ऐसें प्रभुचें वचन श्रवण करुनि, फार हर्षला बाण. २३
प्रभुतें बाणासुर तो स्तवि, सविनय बहु पुनःपुन्हा नमुनी;
ज्ञानक्षीराब्धि[13]लाभें वाटे झाला सुखी असा न मुनी. २४
प्रभुनें आज्ञा देतां, वंदुनि गेला स्वकीय सदनातें.

---

१ प्रतिस्पर्धी २. एका हि भुजाची. ३. फार ४ उत्तम सर्प आहेत बाहुभूषणें ज्याचीं अशा शंकरा! ५. स्थिरपणा. ६ जे नग हुला (उचीला?) लहाति (धारण करितात) म्ह० उच्च पर्वत जे अचलत्व, दृढत्व धरिति तें [ते] न धरिति=माझ्या बाहूचें अचलत्व, दृढत्व मोठमोठ्या उच्च पर्वताचे ठिकाणीं हि नाहीं, असा भाव. ७. निर्फळ झाली इच्छा ज्यांची ते. ८. बाहूची खाज शमविणारें. ९ आनंददायी. १०. शत्रुरहित. ११ ज्याचा आप्त जुगारी किंवा दुर्व्यसनी निघाला आहे अशा मनुष्याप्रमाणें. १२. मनोरथ पुरविणारा. १३. समुद्र.

जेथें तो ध्वज, तेथें बैसे चिंतीत कामकदनातें. २५
स्मित करुनि म्हणे, 'कथिन, प्रिय कुंभांड प्रधान जो त्यातें,
बळिमोक्षादि महोदये वर चिंतुनि परमहृष्ट होत्यातें. २६
कुंभांड पुसे, 'सांगें सुवरा पावोनि, हर्ष वीरा! ज्या,
त्या ऐकों दे; न तुला भलतासा लाभ हर्षवी, राज्या!' २७
सांगे बाण सविस्तर वरदवरप्राप्त युद्धवर हा या,
कुजनगृहीं सुजन, तसा त्याच्या हृदयीं न उद्धव रहाया. २८
कुंभांड म्हणे, 'म्हणतो देवांच्या बहु यशें न शोभ नगा,
त्या ऐसें मागावें? केलें राजा! तुवां न शोभेन, गा!' २९
वदति असें, तों चि ध्वज सहसा पावोनि भंग, तो खचला.
सुरमुनि म्हणे, 'अमर हो! रण पाहूं, व्हावयासि तोख चला.'
शोणितपुरांत शोणित वर्षे घन; भूमि पावली कंपा;
शंपा उल्का हि, पडे, म्हणती उत्पात, 'असुर हो! संपा.' ३१
बहु युद्धोत्सुक बाण ध्वजभंगें कां यथेष्ट नाचेना?
कुंभांड म्हणे, "होतां उत्पात, बुडेल हे न कां सेना? ३२
दिसतें अनिष्ट भारी, परि लंघिल शंभुतें न, न गुहातें,
हें तेज, जें उपासिति मुनिवर्य करुनि महावन गुहा, तें. ३३
न मिरविल छत्र शिरीं, तैसें चि सुमत्त बाण हा चवर.
कीं मागे प्रभुपासीं दाटूनि, म्हणावयासि 'हा!' च, वर." ३४
बाण प्राशी हर्षें, संगें घेवूनियां सुरामा, ती,
जी श्रीची कीर्तीची, पुण्यधींची, करी सुरा माती. ३५
एके समयीं शिव करि देवीसह सद्वीतटीं केली,
ज्यां प्रभुनें, स्वीकारुनि, करुणा चि विभूषणीं पटीं केली. ३६
गंधर्व, अप्सरा बहु होत्या सेवेंत, चित्रलेखा या

१. शंकरास २ महोत्सव ३ कल्पवृक्षाला. ४ चांगलें ५ वीज. ६. सुंदर स्त्री. ७ पुण्याच्या समृद्धीची ८ भिकार वस्त्राभरणाची करुणा येऊन च शंकरानें त्यांस धारण केलें होतें, असा भाव

प्रभुतें मोहूं पाहे, रूप धरी सत्य मित्रे[1] लेखाया. ३७
हांसे प्रभु, देवी ही समजे तीच्या तशा हि परि सांगा,
किंचित् कोपे, लंघन साहे न, असा वशाहि[2], परिसों, गा! ३८
देवीच्या आज्ञेनें देवीचें रूप अप्सरा धरिती,
पार्षद हि शंभुरूप, भ्रांत क्षणमात्र ते तिला करिती. ३९
त्यास्तव अंशें झाली कुंभांडसुता वराप्सरा, बापा!
रामा[3] जातिस्मृति ती प्रभुच्या बहु मानवे मनीं शापा. ४०
सेवेंत नगसुतेच्या त्या बाणाची सुता उषा होती,
पाहे प्रभुसीं क्रीडा देवीची निकटवर्तिनी[4] हो! ती. ४१
इच्छी अनुरूपसुगुणपतिसीं क्रीडा तसी च ती धन्या.
समजे, स्मित करुनि म्हणे तीतें ती श्रीहिमाद्रिची कन्या. ४२
'वत्से! करिसिल तूं ही ऐसी च प्रियतमासह क्रीडा,'
या श्रीदेवीवचनश्रवणें आलींत[5] पावली व्रीडा. ४३
'पतिलाभ घडेल कधीं?' ऐसें जों ती उषा मनीं आणी,
तें ही समजोनि, वदे श्रितकल्पलता शिवा असी वाणी. ४४
'जो रमवील स्वप्नीं वैशाखद्वादशीनिशाकाळीं
कन्ये! तो दयित तुझा, तूं त्याचें वचन सर्वदा पाळीं.' ४५
दे तृप्ति वरें मिथिला[6], जसि दधिपृथुकें नवें तुषातीतें[7];
दैत्यसुतादिस्वसखीजनसह वंदुनि निघे उषा तीतें. ४६
सखिया हसति, हसविती, म्हणती, 'वांछितवरा उखा लाहो,
स्वप्नीं लग्न! वराडी आपण चि! सुपात्र हे सुखाला हो.' ४७
करितां पतिप्रतीक्षा, झाली बहु काममोहवशगा ती,
व्हाया स्वस्था आलि श्रीदुर्गेचें चि भव्य यश गाती. ४८

---

१ ईश्वरें आपणास दुर्गा मानाया--**पंत**. २ स्वाधीन आहेत सर्प ज्याच्या असा ३ कुभांडकन्येचें नांव ४ जवळ असणारी ५ मैत्रिणींमध्यें ६ मथ्यंते रिपवः यया इति मिथिला=शत्रुदमन करणारी श्रीदुर्गा ७ तुष (कोंडा) नाहीं ज्यात अशा दहींपोह्यानें.

न निजे जेवी, सेवी न जळ हि, तांबूल ही न ती चावी,
पांडुत्वातें देह प्रतिपळ अतिशक्तिहीन तीचा वी. ४९
निंदी शीतकरातें, सेव्य हि वाटे तिला असेव्य जन,
'आर्द्र हि नलगे चि,' म्हणे, 'भाजितसे तापलें असे व्यजन.'
पुसति वयस्या, 'होतें काय तुला? सांग, न व्यथा राहो.
कृशालि, स्वजनहृदय, मृदु हें हि न आंग नव्य थारा हो. ५१
सखि! न तुझा राहों दे शत्रुमनामाजि गर्व लव तात,
यातें शिवप्रसादें प्रबळ हि लोकेश सर्व लवतात.' ५२
प्रभुजलकेलिविलोकनसमयापासूनि फार मातें, तें,
दासी कथिति उषेच्या देहींचें व्याकुळत्व मातेतें. ५३
माता धावुनि आली, प्रियकन्येतें विलोकिती झाली;
चित्तीं बहु ती भ्याली, घर्माच्या, अश्रुच्या, भरें न्हाली. ५४
आलिंगी, कुरवाळी, वदवी, परि किमपि ती सुता न वदे,
दावी चिकित्सकांला, तीस परम भय तिचें सुतानव दे. ५५
पटु वैद्य वदति, 'देवि! स्वस्थ रहा, ईस लागली दृष्टि,
कीं अति सुंदरपण हें, न असें अन्यत्र, शोधितां सृष्टी. ५६
अभिषेक करा, उतरा सर्षप, लावा मुलीस आंगारा,
सांगा रामकवचमनुपाठ; सुधा जवळि असुनि, कां गारा?' ५७
वदल्या चतुरा नारी, 'केला देहीं प्रवेश तारुण्यें.
पति शीघ्र उषेसि मिळो पितृवात्सल्यें महेशकारुण्यें.' ५८
त्याउपरि भगवतीनें कथिल्या काळीं उषा सखीसहिता
निजहर्म्यवरीं निजली, स्वप्नीं पाहे तसें चि ती महिता. ५९
देवीवरसामर्थ्यें अतुळें, नागोत्तमें जसी नागी,

---

१ चंद्राला २ मैत्रीण ३ मस्त होई ४. परीक्षकाना (वैद्यास). ५ सु (अत्यंत) कृशांग ६ हस्तलिखित प्रतीत 'देव' असें आहे; परंतु तो हस्तदोष असावा. संदर्भावरून 'देवि' हा च पाठ योग्य आहे ७. मोहऱ्या. (दृष्ट काढा) ८. रामरक्षामन्त्राचा पाठ ९. पाण्याच्या गारा. १०. आपल्या उत्तम महालांत.

स्वप्नीं सभोगचिह्ना[1] पुरुषवरें होय भोगिली जागी. ६०
झाले ते नवसंगीं होतात विकार भोगिलीला जे,
कुळदूषण मानी, भी, प्रबळ विटें[2] जेंवि भोगिली लाजे. ६१
कुंभांडसुता रामा तीस म्हणे, 'सखि! धरूं नको ताप,
घडतां स्वप्नीं संग, स्त्रीस हि, पुरुषास ही, नसे पाप. ६२
स्मर वर, सखि! अखिलेश्वरदयिता वदली, तसें चि हें घडलें:
जडलें कंठीं चिंतारत्न[3], क्लेशांत हृदय कां पडलें?" ६३
ईश्वररक्षितशोणितपुरपतिकन्येसि तुज बळें भोगी,
तो गीष्पतिहुनि[4], हरिहुनि, कवि, तेजस्वी, महेशसम योगी.
तुज जो कांत शिवें दिधला, तो त्रिभुवनीं असामान्य,
सखि! तूं धन्या, कन्या कोण दुजी, पति जिचा असा मान्य?
न कळे सुर कीं दानव मानव; या नवस करुनि, रतिचोरा[5]
बांध दृढ प्रेमगुणें[6], प्राप्त हो देवि! कीर्ति तुज थोरा.' ६६
रामेसि उषा प्रार्थी, 'प्रियसखि! न सुचे चि, मन्मति भ्रमली;
तूं सांग उपाय, सुजनजिह्वा न च सांगतां हित श्रमली.' ६७
रामा सांगे, 'कार्या करिल निजा तेंवि चित्रलेखा या,
कविनीं न सुमैत्रीहुनि कल्पलतेतें विचित्र लेखाया.'[7] ६८
तत्काळ अप्सरा ती प्रभुपौत्रीनें[8] समीप आणविली,
पडुनि गळां, अतिपीडा, वांछा, विनवूनि तीस, जाणविली. ६९
देवी तीस म्हणे, 'सखि! हें कार्य अशक्य; कीं न कुळ, शील,
देश हि, लोक हि, ठावा; परि विरहें तूं उरांत उलसील. ७०
याकरितां लिहित्ये मीं, त्रैलोक्यामाजि पुरुष जे महित

---

१ भोग घडला जिला तीस २ जारानें. ३ चिंतामणि. ४ बृहस्पति ५ चोरून सभोग घेणाऱ्याला. ६ प्रेमरज्जूनें ७ कविनीं सुमैत्रीहुनि कल्पलतेतें विचित्र (अधिक चमत्कार दाखविणारी) न लेखाया (मानावें म्हणून) चित्रलेखा या कार्या निजा तेंवि (आपलें च असतें तर जसें करिती तसें) करिल—असा अन्वयार्थ. ८. प्रभु (शंकर) त्याचा पुत्र बाणासुर त्याच्या मुलीनें (उषेनें).

सुरदानवयक्षोरगराक्षसगंधर्वमानवांसहित. ७१
परि दिवस चित्रपट्टीं लागतिल मला लिहावया सप्त,
पाहुनि पावसिल प्रिय, तोंवरि तव मन उषे! न हो तप्त.' ७२
प्राप्तसुखा वदलि उखा, 'तुज जनें परिपालय आलि! हो, याचें
स्मरण असों दे, मतिमति! घेवुनि साहित्य जा लिहायाचें.' ७३
देवस्त्री ती आणी पट्टातें सप्त दिन सदा लिहुनीं,
प्रिय संसारांत करी, सेविलि संपत्ति हि न सेदालिहुनीं. ७४
उकलुनि, उषेसि देवी लिहिला तो चित्रपट्ट नव दावी;
दुर्गांवरशक्ति च ती; स्वर्वैश्याबुद्धिशक्ति न वदावी. ७५
देवासुरादि सुपुरुष जे चित्रपटांत रेखिले होते,
सादर सर्व उषेनें, वळखाया दयित, देखिले हो! ते. ७६
नंदाचें भाग्य म्हणे, 'व्रज तारायासि, वळ खिलारा,' ज्या,
त्या प्रभुचा पौत्र परम सुंदर अनिरुद्ध वळखिला, राज्या! ७७
वदली स्मित करुनि उषा, 'रतितस्कर हा च साख्य जाणावा,
सखि! कोणाचा कोण, [४]यानीं त्वां प्रथम नीट आणावा. ७८
कुल, शील, नाम, याचें प्रथम मला त्वां अशेष कळवावें,
मग मीं कथिन उचित तें, जन्मुनि पितृयश सये! न मळवावें.
सांगे देवी, ज्याची कीर्ति निववितो, सुधा जसी तसा,
त्या श्रीकृष्णप्रभुचा सखि! अनिरुद्धाख्य होय हा न[३]सा. ८०
सखि! धन्या तूं, तुज हा योग्य पति प्रथित[४]कीर्ति, शिव[५]शील;
निवसील, श्री आजी याची, तीच्या पदांसि सिवसील.' ८१
ती तिस म्हणे, 'सखि! करीं, बहुत न लावूनि दिवस, भेटि कसी;
सेवेंत शिवेच्या तूं [६]शीलितयोगींद्रशिवसभे टिकसी.' ८२

---

१. मी. २ चांगल्या मैत्रिणीहून ३ नातू ४ प्रख्यात आहे कीर्ति ज्याची असा. ५ शिव (कल्याणकारक) शील (स्वभाव) ज्याचा असा. ६ ज्याचें भक्तिशील माठें आहे असा श्रेष्ठ योग्यांच्या मंगल सभेंत. तुला योगमाया फार उत्तम ठाउकी आहे, असा या गीतिचरणाचा भाव—निर्णय०.

देवी म्हणे, 'जसें हें प्रभुसंरक्षित, तसें चि कीं पुर तें;
तेथें प्रवेश दुर्घट सहसा, आयुष्य साहसें पुरतें[१]. ८३
सखि! तूं साहस न करीं, रक्षीं मज, आपणास, जनकास;
साध्या कार्याविषयीं घाली स्वपरार्थ सुज्ञ जन कास.' ८४
ती तीस म्हणे, 'आहे तुज मायायोग ही सुतनु! ठावा;
कोण म्हणेल, अमृतरस पुष्कळ असतां करीं, सुत नुठावा?
जीवितसंदेहा[२], कीं कामार्ते न वंशदूषणा, पाहे;
साहे सर्वस्वक्षय, देवि! तुला सर्व ठावुकें आहे. ८६
चित्तांत मरणनिश्चय, वदत्यें, वाहूनि आण, जागे[३] हा;
आल्यें शरण तुला मी, सखि! पति पाहूनि, आण, जा, गेहा.'
देवी वदली, "जात्यें, म्हणासि, मज स्तवुनि साहसी आण;
करिल भगवती करुणा, कीं वदसि 'मरेन,' वाहसी आण."
वदुनि असें गुप्तपणें ती प्रभुच्या नित्यनव[४] पुरा नेली,
कीं, कीर्ति, सदुपकारीं करितां श्रमपात्र न वपु, रागेली[५]. ८९
द्वारवतीप्रति पावे, प्रभुभवननिकट नभीं सुधी राहे,
पाहे अनिरुद्धहरण विभुसि कळायासि, युक्ति धीरा हे. ९०
मज्जन[६] करीत होता श्रीनारदमुनि, तयासि, पाहून,
तो आपणासि पाहे, तों कर जोडी, समीप राहून. ९१
पाहुनि देवर्षि पुसे, 'वद, कां या द्वारकेसि आलीस?
एका हि चित्रलेखे! नाणूनि समागमें स्व-आलीस.' ९२
पायांकडे चि, देवी ती बहु विनयें तदा नमुनि, पाहे;
आगमनहेतु सांगे, पावुनियां अभयदान, मुनिपा[७] हे. ९३
वृत्त सविस्तर परिसुनि, करि सुनिपुण तो दया दयालु बरी=

---

१ पुरें होतें, सपतें २ जगण्याच्या संशयास ३ मनांत वागत आहे. (याचा कर्ता 'हा मरणनिश्चय') ४ नेहमीं नव्याप्रमाणें असणाऱ्या द्वारकेला ५ परोपकारार्थ शरीर शिजविलें नाहीं तर कीर्ति रागावते (मिळत नाहीं) ६ स्नान. ७ मुनिश्रेष्ठाला

या आवडली बहु हे, जो भोळा जन जसी तया लुंबरी. ९४
दे तामसी सुविद्या, अभय प्रभुकडिल ही, तिला गाया;
मुनि भाविरणें हर्षें, जो कारण साधुरीति लागाया. ९५
मग ती अनिरुद्धातें पाहे, जावूनि रम्य गेहांत,
ज्याच्या ऊषाविरहज्वर दुःसह सुप्रवृद्ध देहांत. ९६
उपभोग जिचा स्वप्नीं, चिंतित होता उषेसि चित्तांत;
तद्रूपीं तो तैसा, लुब्ध जसा दृष्ट नष्टवित्तांत. ९७
चिंती उषेसि तो त्या प्रेमें हृदयांत राम सीते ज्या;
त्यासीं वदे, स्त्रियांतें मोहुनि, पसरूनि तामसी तेज्या. ९८
"अनिरुद्धा! यदुवीरा! कुशल असे कीं? तुला पहायाला
आल्यें, दूती होवुनि, मीं बाणसुतासखी वहायाला. ९९
दिधलासि भगवतीनें जीचा स्वप्नीं तुला समागम, ती
मत्प्रियसखी उषा पतिविरहें त्या जानकीसमा गमती. १००
प्राण उषेचे विरहीं यावरि यदुसत्तमा! न वांचावे;
ज्ञात्यां हि सुरां असुरां, स्मर-अहि अतिमत्त मानवां चावे. १०१
शिरलें असेल हृदयीं जरि काय स्त्रीसहस्र ही, तरि ती,
'कामयमाना कविनें रक्षावी,' प्रणति तुज असी करिती. १०२
आहे, तव चित्र दिलें म्यां जें, त्यातें उषा सदा पाहे,
म्हणती, 'अजि नाथ! गिळों स्मरशार पसरिति मुखास, दीपा हे.'
बळिसुत शोणितपुरपति बाण, तयाची सुता उखा, लाहो
तुज ती, तिस तूं लाहें, बा! हें यश सत्सभासुखाला हो." १०४
अनिरुद्ध म्हणे, 'मज ने, सत्य करीं स्वप्न, रक्ष तीस मज;
जी उपकृति अत्यार्ता, देवि! स्वल्पा हि लक्ष ती समज. १०५
तुज सत्य चित्रलेखे! वाटो, स्वप्नीं विलोकिली, परि ती

---

१ पुढें पुढें करणारी स्त्री. २. लवकर च सुरू होणाऱ्या युद्धामुळें ३ अत्यंत वाढलेला ४. इच्छा करणारी. ५ विनति. ६ जीवन-पंत. ७. आवरून धरा. ८ अतिदुःखितावर.

करिती खरीपरीस हि बहु विकळ, मन क्षणक्षणीं हरिती.' १०६
देवी चित्तांत म्हणे, 'पावलि परमेश्वरी[1] उखा यास;
चंद्रासि चकोरीसीं; सेविल हा जन[2] जगीं सुखायास.' १०७
मग अनिरुद्धासि म्हणे, 'भेटवितें शीघ्र अंगना, चाल;
दोघें परमानंदें, पावुनि अन्योन्यसंग, नाचाल.' १०८
श्रीनारददत्ताद्भुत विद्येनें ती तयासि झांकून,
घेउनि जाय, करूं दे कोणां पुरुषस्त्रियांसि कांकूं न. १०९
शोणितपुरांत ने त्या, न धरूं दे विरह नेट[3] वीरा ज्या;
अनिरुद्धासि उषेसीं, क्षण करुनि विनोद, भेटवी, राज्या ! ११०
ती तीस म्हणे, 'अनघे ! धन घे शोधुनि दिलें, उखे ! नाच;
दोघें सावध वर्ता, जेणें मन लेश ही दुखेना च.' १११
वाढे शरजा[4]हृदयीं, निःसीम प्रीति, भीति ही राया !
आधीं सखीस मग, ती आलींगी साधुरीति हीरा[5] या. ११२
बाणात्मजा म्हणे, 'सखि ! कैसें हें कर्म गुप्त राहेल ?
पाहेल प्रभु जरि, तरि हरिल त्रि असु, न क्षणार्ध साहेल.' ११३
ती अप्सरा म्हणे, 'गे प्रियसखि ! न मनांत काळजी वाहें,
वरदापदयुग[6] चिंतीं; ध्यात्या हित सर्वकाळ जीवा हें.' ११४
श्रीहरिहरांसि वंदुनि, गांधर्वें सुज्ञ इष्ट संपादी;
दुर्गावरविश्वासें सोडी ती सुतनु दैन्यकंपादि. ११५
कांहीं काळ प्रेमें क्रीडा व्रीडावती करी, राज्या !
निववी पतिसंगसुखें, कामदहन तापवी शरीरा ज्या. ११६

---

१. 'परमेश्वरी' या पदाचा अर्थ 'मोठा सत्ताधारी जो बाणासुर त्याची [illegible] 'परमेश्वरी' म्ह० 'पार्वती' असा अर्थ करून 'पावलि' क्रियेचा संबंध 'पार्वती' व 'उखा' या दोन्ही कर्त्यांकडे आहे असें समजावें. २. आपण अप्सरा—पंत. हा जन जगीं सुखायास ( जे श्रम करण्यांत आनंद वाटतो ते ) सेविल. ३. धीर. ४. शरजा=बाणकन्या. ५. पुरुषरत्नातें —पंत. ६. पार्वतीपदयुग.

रक्षक दक्ष कपट तें समजुनि कळविति अनर्थ बाणातें,
तो असुरांसि म्हणे, 'जें शासन चोरासि, यासि जाणा तें. ११७
मत्कुळदूषक दुर्जन मारा चि, धरूं नका चि आळस, जा;
हूं, घ्या शस्त्रें, कवचें; शीघ्र तुम्हीं सर्व शत्रुकाळ सजा.' ११८
या बाणाज्ञेनें तें असुरांचें धांवलें नृपा! सैन्य,
वेढुनि मंदिर, म्हणती 'मारा,' तों पावली उषा दैन्य. ११९
बहु भिवुनि, रडों लागे, दयिता, त्या बाणवंशभूषेतें
अनिरुद्ध स्मित करुनि, स्वमुखें कळवी स्वतेज ऊषेतें. १२०
गर्जति दानव, परजिति शस्त्रातें, दांत ओंठ ते खाती;
संकटसमयीं स्मरली श्रीनारदमुनिस चित्रलेखा ती. १२१
तों भगवान् मुनि गगनीं प्रकटे, हांसे, म्हणे, 'कुमारा! हो;
निर्भय, हूं, झगड, रगड कंटकचटक, चित्रसी उभा राहो.' १२२
हर्षोत्फुल्लवदन मुनिपद नमुनि उठे धरूनि परिघातें;
अरिघातें यश मिळवी, असुरबळ म्हणे, 'शिखींत न रिघा' तें.
त्या हर्म्यद्वाराच्या कवळूनि करें सलील परिघास,
पळवी, पळ वीर गमे तो दीप्त ज्वलन मूर्त, अरि घांस. १२४
पाहुनि असुरभटकदन, देवर्षि म्हणे, 'भला! भला! साधो!
बाधो न त्रास तुला, जय कोणास हि न लाभला साधो.' १२५
हतशेष क्षतजोक्षत भट म्हणती, 'रक्ष, रक्ष,' बाणातें,
तो अन्यांसि म्हणे, 'रे! जा, कुलदूषण समूल खाणा तें.' १२६
पुनरपि वीर अयुतशः प्रेषी द्वेषी मदांध तो बाण,
प्राण हराया गेले, परि न शकति आपुलें चि ते त्राण. १२७
तच्छस्त्रांहीं च रणीं केलें तत्कदन मदनतनयानें,
न्यायापुढें टिकावें कैसें, बहुत हि झटोनि, अनयानें? १२८

---

१ भूषा=अलंकार (उषा) २ सेनारूपी चिमणी ३. चित्रासारखा, तटस्थ, स्तब्ध ४ अडसराला, मुद्गराला ५ अग्नीत ६. लीलेनें, सहज. ७. गवत. ८. [आजवर] मिळालेला. ९. मिळो १० रक्तानें माखलेले, भरलेले.

शोणितपुरांत शोणितपूरीं घाली परांसि आंघोळ,
न करिल करिकटकाचा कं[1]ठीरव एक ही न[2] कां घोळ ? १२९
वरचर्मखड्गधर परकदन करी तो कुमार मदनाचा,
त्याचा सिंहरव म्हणे सुरमुनितें, हरुनि दैत्यमद, 'नाचा.' १३०
मेले, बहुत पळाले, सोडुनि बाणा, सहा[3]यें 'हा!' करिती.
[4]याची परांत पडली न च म्हणवायास 'हाय!' हाकें रितीं. १३१
होतां बळभंग, बहु क्रोधें हृदयांत बाण तो कढला,
ज्यासि सहस्र हय, असा दशनल्व[5] रथीं मग स्वयें चढला. १३२
कुंभांड करुनि सारथि, नानायुधधर सहस्रबाहु निघे,
हांसे अनिरुद्ध, 'भला!' म्हणुनि मुनि मुखें तयासि बाहुनि घे.
तो बाण 'धरा, मारा,' ऐसें क्रोधें वदे, करी लगट,
ऊषा भिवुनि बहु रडे, तीस गमे स्वपतिला करील गट. १३४
तीतें अनिरुद्ध म्हणे, 'मज यापासूनि लेश भय नाहीं,
स्वस्थ रहा, अधिक न हा, सुमुखि! पहा शुद्ध युद्ध नयनाहीं
वीर[6]सुता तूं सुज्ञे! पडुनि गळां ठाकसी; समर सिकता
मीं यादव कीं? करितां रडुनि गळांठा कसी समरसिकता?'
बाणप्राण हराया कोपें बाणादि शस्त्र जें सोडी,

---

१ सिंह २ 'न' विनाकारण अधिक आहे ३ साह्यकर्ते मित्र ४. अनिरुद्धाची हाक (गर्जना, सिंहनाद) शत्रूंना 'हाय' हाय'' म्हणविण्यास रिती न पडली (फुकट गेली नाहीं) ५ चार हजार हात प्रमाणाच्या. ६ सुज्ञे' तू वीरसुता [ आहेस तरी ] गळां पडुनि ठाकसी ('माझें रक्षण करा' म्हणून गळा पडत आहेस), मीं यादव समर सिकता कीं? (मीं यादवकुलोत्पन्न आहे, तेव्हा आज च कांहीं नवीन युद्धकलाभ्यास करणारा नव्हे) [तू] रडुनि गळांठा (गाळण) करितां (दाखवूं लागलीस तर) सम-रसिकता कसी?—वीरसुतेस व वीरपत्नीस योग्य असे गुण तुझ्या ठिकाणीं आहेत असें कोण समजेल? तुझ्या या वर्तनानें 'वीरसुता' व 'वीरपत्नि' हीं विशेषणें व्यर्थ होतील, हे कसें तुझ्या ध्यानांत येत नाहीं, असा भाव.

तोडी खड्ग, चर्म उडवी, बहु साधुवाद तो जोडी. १३७
असि, मुसळ, शूळ, पट्टिश, तोमर, हाणी सहस्रभुज बाण,
तो धीर वीर त्यावरि जाय, म्हणे 'हाणिसील किति ? हाण.'
बाण उपाय वधाया, येतां अनिरुद्ध निकट, लाख रची;
ईषा खडुनि, तद्धरि, होउनि अनिरुद्ध, विकटला खर[1]ची. १३९
त्यातें बळिसुत झांकी बहु विशिखप्रमुखशस्त्रवर्षानें,
'मेला अनिरुद्ध,' असें मानुनि, गर्जति सुरारि हर्षानें. १४०
घनजाळातें रविसा क्षिप्र विदारूनि शस्त्रजालातें,
बाहिर निघे, सुरांला बहु नवल गमे तशांत [2]ज्याला तें. १४१
पार्श्वीं उडोनि येतां बाणानें देखिला स्वजामाता,
केवळ न उपेक्षीच, स्कंदाची ही प्रसन्न ज्या माता. १४२
'कन्या होयिल विधवा,' ऐसें चित्तांत बाण तो नाणी;
सोडी शक्ति महोग्रा, सुर[3]जन हीं 'हा !' असी नभीं वाणी. १४३
येतां प्रद्युम्नावरि वह्निज्वाळा भयानका घमली.
भ्रमली प्रेक्षकजनता, जैसी कृत्या, तसी च ती गमली. १४४
पाठविली बाणानें जी कृत्यासी करावया कवळ,
अतिवेगें कृत्यासी, आली जों उग्र शक्ति ती जवळ, १४५
धरिली त्या अनिरुद्धें, गरुडें भुजगी, तसी च उडुनि करें;
स्तविला तो सुरनिकरें[4] जेंवि [5]शरत्पूर्ण चंद्र [6]उडुनिकरें. १४६
मूर्छित केला प्रभुच्या पौत्रें त्या शक्तिनें चि तो बाण,
प्राण व्याकुळ झाले, शकला न करावया निजत्राण. १४७
त्यातें कुंभांड म्हणे, 'तूं विषय असा वधा न हो, माया
प्रकटीं, शीघ्र न शकासिल या अरिस असावधान होमा[7]या.'

---

१ अनिरुद्ध (अनावर) होऊन विकटला (भिडलेला) [अनिरुद्ध] [बाणाच्या रथाचा] ईषा (जू) मोडून त्याच्या घोड्यास खरचा (मारिता झाला) २ जीवत राहिला ३ सोडी 'हा !' असी-पंत. ४ निकर=समुदाय. ५. शारदीय पौर्णिमेचा. ६ उडु=नक्षत्र ७ होम करणें=नाश करणें

तो सावधान आधीं, गुप्त रथामात्यसहित होय मग
वर्षे सर्पशर, म्हणे, 'कुळदूषक, धृष्ट, अहित हो यमग.' १४९
फणिकुळ चंदनतरुला, अनिरुद्धा त्यासमान वेढी, गा!
त्यों मुनि मानी बाणा, कीं नागांच्या न मानवे ढींगा. १५०
फणिरुद्धा अनिरुद्धा पाहे अतिकुपित बाण माराया,
मंत्री म्हणे, 'दिसतसे वरपुरुष, करीं विचार, बा राया! १५१
ज्याच्या देहीं दिसतें तेज सुदुःसह अरीस अधिक रणीं,
उत्तरमीमांसेच्या जैसें पहिल्यापरीस अधिकरणीं. १५२
कोणाचा हा? कवणें तव गेहीं आणिला? कसा आला?
झाला बहुमत तनयाहृदयाला, मारिसी कसा याला? १५३
त्वदधिकबळ गांधर्वें वरिला वर हा, तुझी उषा कन्या
धन्या, कीं हे राज्या! अन्याय स्पष्ट अर्पितां अन्या. १५४
बा! तूं दशशतभुज, हा द्विभुज, तदपि वद, पिनाकिपुत्रास
तुज देता झाला कीं नाहीं समरांगणांत उत्रास? १५५
रूप कसें? तेज कसें? प्रभु हि वधिल वामदेव तात न या,
चतुरा आहे, पाहे, या पुरुषीं कामदेवता तनया. १५६
क्षतविग्रह, विग्रहपटु, कृतनिग्रह हि, ग्रहप्रवरतेजा,

---

१ यमाकडे जाणारा, मृत्युपथास लागणारा २ अनिरुद्धा–**पंत.** ज्या सर्पांच्या ड[illegible]ानें (अनेक सर्पांच्या समूहानें) अनिरुद्धास वेष्टिलें होतें. त्याचें विशेष महत्त्व नारदाला वाटलें नाहीं, परंतु सर्पांखाला योजिणाऱ्या बाणासुराची मात्र त्याला धन्य वाटली ३ दिव्य. ४. वाटाघाटीनें निश्चित सिद्धांत काढण्याच्या पद्धतीस 'अधिकरण' म्हणतात अधिकरणाच्या पांच अंगांचा जों जों अधिकाधिक विचार करावा तों तों सिद्धांत अधिक च प्रकाशित होत जातो, तद्वत् अनिरुद्धाचें तेज जसजसें त्याजकडे पहावें तसतसें वाढणारें दिसे. ५ तुझ्यापेक्षा अधिक बळवान ६- शंकरपुत्रास (बाणास). ७ अतिशय त्रास. ८. इच्छा पुरविणारी देवता. ९ जखमा झाल्या आहेत अंगावर ज्याच्या. १० युद्धकुशल. ११. बांधून घातलेला १२. श्रेष्ठ ग्रह जो सूर्य त्याप्रमाणें तेजस्वी.

वदन पहा, भय लेश हि, बांधुनि, देती न सर्पशर ते ज्या.'
ऐसें हित, विहित वदे जें मंत्री, मान्य धन्य तो करि तें;
कीं, सन्नीतिसुरभिचें न पडे, पडतें चि अन्यतोक रितें. १५८
रक्षक अनिरुद्धनिकट ठेवुनि, तो बाण जाय गेहातें;
गेला मुनि हि कथाया तें त्या लीलामनुष्यदेहातें. १५९
चित्तीं अनिरुद्ध म्हणे, 'मुनिवर सांगेल वृत्त हें हरिला,
अरिला मर्दील; मदगद कोणाचा न प्रभूत्तमें हरिला?' १६०
बाणसुता, ती पतिगति अतिकष्टा पाहतां, रडे, मोहे.[1]
अनिरुद्ध म्हणे, 'प्रभुला कळविल मुनि भीरु! मद्दशा तो हे.
येतिल बळ कृष्ण प्रभु, तूं शोकाचळभरें[2] नको चिरडों,
स्वप्ननिधनसम[3] हा श्रम, अंतीं होयिल बरें, नको चि रडों. १६२
मरतिल बळबाहुरवें, दामोदरदररवें चि देवारी;
गळतिल गर्भ वधूंचे; तूं या दुःसंगतीस दे[4] वारी.' १६३
ऐसें जरि सत्य कथी परमेश्वरपौत्र वीर तो, तरि ती
अरितीक्ष्णत्वें[5] ऊषा चिंता चित्तांत जाहली करिती. १६४

---

# अध्याय बेचाळिसावा.

फणिशरबद्ध प्रभुचा पौत्र घडायासि आपणा मुक्ती,
युक्ति मनीं योजी, तो सुचवी[6] गुरुची शिवास्तवा उक्ती. १
नमुनि, मनांत म्हणे तो, "इंद्रोपेंद्रानुजे! महामाये!
तूं स्वाश्रितवत्ससुरभि, तव महिमा त्रिभुवनीं न हा माये. २

---

१. मूर्छित होई २. शोकरूपी पर्वताच्या भारानें ३ स्वप्नातील मरणाप्रमाणें. ४ पाणी दे=सोड, त्याग कर ५. अरि (बाणासुर) त्याचा क्रूरपणा मनांत येऊन. ६ गुरुची उक्ति (नारदाचें वचन) पार्वतीची स्तुति सुचवी, म्हणजे, नारदाच्या सांगीप्रमाणें त्यानें पार्वतीचें स्तवन केलें.

भगवति ! शंकरदयिते ! महिषादिमहासुरांतदायिकरे !
तू म्हणसि प्रणतांच्या दुर्विधितें, 'हो चि दूर, आयिक रे!' " ३
झाली प्रसन्नचित्ता शरणागतवत्सळा, स्वयें आली;
त्याली शिशुच्या साध्वसलमयीं च, जसी, तसी उडी घाली. ४
नक्रापासुनि जेंवि प्रभुनें केला क्षणांत मुक्त करी,
अहिशरबंधविमोचन करुनि, तसें त्यासि बोधयुक्त करी. ५
"हरि ये, तों, मुक्त हि तूं, वत्सा ! या बंधनीं असा चि रहा;
प्रभु बहु कोपेल न, तरि हा बाण म्हणेल बा ! कसा चिर 'हा!'?
ज्ञानी असोनि दिसतो संसारिजनासि जेंवि संसारी;
मुक्त हि दिस बद्धतसा, जों ये शोणितपुरासि कंसारी. ७
बाणभुज छेदील, स्वपुरा नेयील तुज सदारास,
गातील रण प्रभुचा, प्रेमें गाती जसे सदा रास." ८
करुनि दया, देवीनें यापरि अनिरुद्ध सुखविला साचा;
याच्या जाया रडती, कीं, झाला नाश सुखविलासाचा. ९
नेला अनिरुद्ध, असें तद्दयितांच्या कळे विलापानें;
ताप द्वारवतीला या वृत्ताच्या पुन्हां दिला पानें. १०
'व्हा सिद्ध,' असें कळवी दुंदुभि गर्जोनि उग्रसेनमतें,
'गमतें अनिष्ट मोटें,' जन म्हणती, 'बहु भयें मन भ्रमतें.' ११
यादव धांवुनि आले, म्हणती अन्योन्य, 'काय हा निकर?
अनिरुद्ध हरूनि, दिला अहितें हृदयांत घाय हानिकर.' १२
कोणासि किमपि न सुचे, चिंता यादव समस्त ही करिती.
धरि ती च स्थिति हरि ही, मौनादिगुणेंकरूनि जी न रिती.
विपृथु म्हणे, 'श्रीकृष्णा ! शक्राची ही मनोव्यथा हरिसी,

१ अंतदा०=नाश करणाऱ्या हाताचे देवि' २ आई ३ संकटकाळीं ४ रासक्रीडा ५ 'पुन्हा' म्हणण्याचें कारण, यापूर्वी शंबरासुरानें प्रद्युम्नहरण केल्याचा प्रसंग आहे ६ कठिण प्रसंग ७ रिकामी नव्हे म्ह० भरलेली अर्थात् मौनादिकेंकरून युक्त अशी स्थिति ८ यादवविशेष

श्रितयादवचिंतामणि तो तूं चिंता स्वयें कसा करिसी?' १४
कृष्ण म्हणे, 'विपृथो! मीं या कार्याच्या चि चिंतितों गतितें,
परि पावेना, न कळे, कोणें केला अनर्थ हा, मतितें. १५
श्रवण करुनि हे वार्ता, मानितिल अशक्त आहुका राजे;
मज ते उपहास जगीं, इतरला होति साहुकारा जे. १६
सप्तम दिवसीं पूर्वीं सहसा प्रद्युम्न शंबरें हरिला,
परि तो शिवप्रसादें आला, वधुनि स्वयें तया अरिला. १७
शाल्वें नेला होता या नगरींतूनि आहुक वळून,
परि सोडविला आम्हीं; जिरविल रवि काय राहु कवळून? १८
अनिरुद्धहरण सुविषम वाटे माझ्या मनासि यादव हो!
आतां श्रीशिवचरणस्मरण चि चिंतावनासि या दव हो.' १९
सात्यकि म्हणे, 'करावा, चार प्रेषूनि केशवा! शोध.'
प्रभु आहुकासि सांगे, तो चार, तसे चि पाठवी योध. २०
सैन्यपति अनाधृष्टि प्रभुसि म्हणे, 'केशवा! तुवां हरिला
परिभवुनि, पारिजात स्वर्द्रुम पूर्वीं, न अर्पितां, हरिला. २१
या वैरें शक्रानें हरिला अनिरुद्ध, मज असें गमतें;
न शमे दायादाचें, इतराचें हृदय तापलें शमतें.' २२
कृष्ण म्हणे बळपाळा, 'देवांची प्रकृति बा! नव्हे क्षुद्रा,
आंत कलुष कीं निर्मळ तें सुज्ञजनासि कळविती मुद्रा. २३
अकृतघ्न, भक्तवत्सळ, अक्षुद्रप्रकृति, सर्व सुर समजः
वाटे वासवशील चि उच्च, जरि हि अमृत खेर्वे सुरस मज. २४
माझा तों बा! घेउनि गेली या पुंश्चली असा तर्क,
अर्के प्रिय नलिनीस, स्त्रीस रुचिर, शूरमतिस तो कर्क.' २५
अक्रूर म्हणे, 'होवुनि मानुष, याचें चि साधितां कार्य,
संरक्षितो महेंद्रा, तो ही आम्हांसि रक्षितो आर्य.' २६

१ उपायाला २ उग्रसेनाला ३ इंद्रानें आपखुषीनें न देतां ४ सेनापतीला. ५ हलकें ६ जारिणी, दुर्वर्तनी स्त्री ७. सूर्य ८ शुभ्राश्व उच्चैःश्रवा —पंत.

'गंधर्व, यक्ष, राक्षस, यांतुनि तों' प्रभु म्हणे. 'नसे हरिला, २७
प्राद्युम्नि पुंश्चलीनें नेला, हें वाटतें मला, हरिला.
दितिज्यांच्या, दनुज्यांच्या, नाना मायाविचक्षणा रामा,[1]
त्यांहीं बहुधा हरिला; त्या चुकतिल सर्वथा न या कामा.' २८
सर्वत्र शोध केला, आले ते सर्व चार परतोन,
वदले, 'उपश्रुति[2] कुशळ कथितो, दिसला कुमार पर तो न.' २९
यापरि गडबड करितां, रात्रि युगसमा जसी तसी सरली,
प्रातःकाळीं च सकळ यदुवीरांहीं महासभा भरली. ३०
तों ये पारद[3] नारद, फार दया यादवांवरि कराया,
संशय सर्व हराया, तत्वज्ञ समर्थ हा वरिक,[4] राया! ३१
स्वीकारुनि सत्कार, स्वस्थ बसुनि आसनीं, पुसे तो, कीं,
'दिसतां सचिंत, सिरलें यादव हो! आजि चित्त कां शोकीं?"
कृष्ण म्हणे, 'देवर्षे! प्रद्युम्न जसा, तसा चि तत्तनय
अनिरुद्ध हि वा! नेला; बुडति तदपि बुडवितात मत्त नय. ३३
श्रुत, दृष्ट, असेल तुला जरि हा वृत्तांत, सांग ताराया.'
ऐसें ऐकुनि हांसे श्रीमुनि, मग होय सांगता, राया! ३४
"बळिसुत बाण महेशप्रियपुत्र चि होय, तत्सुता ऊषा.
वा! ती तद्वंशाची, शैलकुलाची[5] जसी शिवा भूषा. ३५
अनिरुद्ध तिणें नेला, धाडुनि निपुणा वराप्सरा दूती;
कुचकुंकुम नयनजळें अत्युष्णें[6] आजकाल ती धूती. ३६
त्या पंक्तिशत[7]भुजासीं करितां झाला कुमार शुद्ध रण,
शक्रहृदयशल्याचें करित चि होता सुवीर उद्धरण ३७
भंगुनि मारित होता शत्रुपराभूतिदक्ष मायावी,

१ कपटविद्येंत (जादूंत) निपुण. २ रात्रीं झालेल्या शुभाशुभसूचक ध्वनी-
—रून (फक्त) त्याची खुशाली समजून आली ३. सकटाच्या तडीस लावणारा. ४
बरिक (फक्त, मात्र). ५. पर्वतकुलाची. ६ दुःखाश्रूंनीं. ७ पंक्ति—दहा. ८.
[illegible]

कन्यादूषण गमले बा! ज्यास, तयास न क्षमा गावी. ३८
धर्मनयज्ञ सचिवें कुंभांडें प्राण रक्षिले यत्नें,
समरें सुटो, न सोडिल याच्या भारें समर्पितां रत्नें. ३९
ऊठ त्वरित अरितमस्तपना! हा समय होय अवनाचा,
म्हण कृष्णा! स्वजनांतें, 'प्रेमें गाऊनि विजय नव, नाचा.' ४०
आहे धैर्ये, कंठीं प्राण धरुनि, नागवद्ध अनिरुद्ध
युद्धश्रांत पहातो त्वत्पथ, घे सोडवूनि यश शुद्ध." ४१
बळ कृष्ण प्रभु झाले सिद्ध द्रुत सर्व यादवांसहित,
पुनरपि मुनि सांगे अरिकक्षीं व्हायासि या दवांस हित. ४२
'बाणाचें शोणितपुर तें एकादशसहस्र योजन कीं,
गरुडें घडेल जाणें; ऊषेच्या भंग शीघ्र यो जनकीं.' ४३
या मुनिवचनें कृष्ण प्रभु गरुडाचें मनीं करी स्मरण,
तों तो प्रकटे, वंदी जगदीशाचे नतें शिरें चरण. ४४
गरुड वदे, "'धन्य!' म्हणे, ज्याप्रति तू करिसि वरद यात्रा त्या
कवणा मारिसि? तारिसि? सांगुनि मजवरि हि कर दया, त्रात्या!"
गरुडातें वृत्त कथी प्रभु, वर्णी तत्प्रताप, जो समर
केला अमृताहरणीं, लीलेनें सर्व जिंकिले अमर. ४६
दास्यापासुनि माता सोडविली तें वदे, म्हणे, 'गातां
स्वयश, मद्यशताहुनि भुलवी, तैसें चि बा! करीं आतां. ४७
शोणितपुरासि आम्हां घेवुनि तूं शीघ्र चाल, नागानीं
अनिरुद्ध रुद्ध सोडिव, कचि या बांधोत पालना गानीं. ४८
अनिरुद्धमोक्षणानें बा! वैदर्भी, तव स्नुषा, हर्षो,
अश्रु पदीं हे नगरी, लाजकुसुमराशि तव शिरीं, वर्षो.' ४९

१ शत्रूरूपी अंधकाराच्या सूर्या' २ तुझी वाट ३ कक्ष=गवत. ४. जिकडे तू जातोस. ५ अनिरुद्धाच्या—पंत. ६ अनिरुद्धाला सोडवून आणिलेंस तर हे नागरिक तुझ्या पायाचें वंदन करून त्यांस आनंदाश्रूनीं भिजवितील व तुझ्या मस्तकावर लाह्यांचा व पुष्पांचा वर्षाव करतील.

हर्षें गरुड, म्हणे, 'वा! दासातें तूं चि फार गौरविसी,
तरि च यश सुधांशुपरिस कोटिगुणें विमळ, मधुर, गौर विसी.'
प्रद्युम्न, राम, कृष्णप्रभु, वाहुनि, पक्षिपति उडे तूर्ण,
वृष्णिसुरांचे विजयें सर्व मनोरथ करावया पूर्ण. ५१
निजरूप प्रकट करुनि, गेले कृष्णादि हे तिघे, राया!
उत्सुक अरींस, घेवुनि चक्रहळाद्युग्रहेति, घेराया. ५२
राम म्हणे, 'श्रीकृष्णा! अस्मत्तनुवर्ण पीत कां गमला?
सहसा त्रवघे हि असे झालों, या हेतु कोण, सांग मला.' ५३
कृष्ण म्हणे, 'शोणितपुरपाळाहवनीयतेज हें आलें,
वाटे त्याच्या द्युतिनें वर्णांचें वैपरीत्य हें झालें' ५४
राम म्हणे, 'जरि निष्प्रभ झालों आतां चि पावतां जवळ,
कैसें होयिल? कृष्णा! अग्निबळ करो न आमुचा कवळ.' ५५
कृष्ण म्हणे, 'पक्षिपते! घडतें शोणितपुरीं कसें गमन?
न मन व्यग्र तुझें, वा! करिसिल तूं एक वह्निचें शमन.' ५६
प्रभुवचनें विनतेचा सुत तो सहसा सहस्रमुख होय,
घनसा शरीर सत्वर पोषी, शोषी नभोनदीतोय. ५७
वर्षे प्रलयजलदसा, त्या आहवनीय वह्निला शमवी,
प्रभुचें मन निजचरितें, प्रभु विश्वाचें जसें, तसें रमवी. ५८
वर अंगिरा जयांत, श्रीरुद्रानुचर अग्नि ते आले,
झाले भग्न, न कांहीं तत्तेज प्रभुपुढें रणीं चाले. ५९
तो अंगिरा महात्मा प्राण हराया त्रिशूळ जें सोडी,
त्या अर्धचंद्रसायक सोडुनि, मधुसूदन स्वयें तोडी. ६०
स्थूणाकर्णें बाणें छेदुनि उर, अंगिरा महातेजा
प्रभुनें मूर्छित केला, 'मेला' जन बोलिले पहाते ज्या. ६१

---

१ आमच्या शरीराचा रंग पिवळा (फिकट व निस्तेज) कां झाला? २ शोणितपुराचा नगररक्षक जो आहवनीय अग्नि त्याचें तेज ३. आकाशगंगाजळ ४. प्रलयकाळच्या मेघासारखा ५. मुख्य, श्रेष्ठ.

अग्निपराभव करितां देवर्षि म्हणे, 'जनार्दना! बा! हें
बाणाचें शोणितपुर, यांत श्रीरुद्र नांदतो, पाहें.' ६२
हास्य करुनि कृष्ण म्हणे, 'देवर्षे! आठवूनियां भक्तां,
बाणत्राणा येतां श्रीरुद्रासीं भिडों यथाशक्ति.' ६३
शोणितपुरनिकट प्रभु दरवर गगनांत वाजवी, राज्या!
खिजवी, त्यास न सोसे, बाहूंची फार खाज वीरा ज्या. ६४
शोणितपुरांत सिरतां, प्रभुवरि बहु कोटि जीं महासैन्यें
प्रमथगणसहित आलीं, वधिलीं, वरिलीं हि राहिलीं[1] दैन्यें. ६५
अग्न्यस्त्र प्रभु योजी, तेणें किन्नरबळ प्रथम मोडी,
प्रमथासुरबळ बळ हळमुसळें, मेघांसि वातसा, झोडी. ६६
रामें, मेघश्यामें, प्रद्युम्नें, सैन्य भंगितां सर्व,
त्रिशिरा, त्रिपाद, आला, नवनेत्र, ज्वर, धरूनियां गर्व. ६७
तो भस्ममुष्टि टाकी बळभद्राच्या उरीं, उडे वातें
कांहीं कनकनगाच्या शिखरीं जावूनियां पडे बा! तें. ६८
त्या भस्माच्या स्पर्शें मेरुनगशिखर गळे, जळे सगळें;
मग हळधरधैर्यातें, पडुनि उरीं, तें म्हणेल कां 'न गळें'? ६९
राम म्हणे, "कृष्णा! मीं जळतों, अत्यंत तापला काय,
अभयंकरा! उपेक्षिसि अतिकष्टीं बंधु आपला काय? ७०
ताप शमेल कसा? रे! तू स्पर्शुनि काय, बा! पहा, हातें;
कृष्णा! न घडो[2], शोकें म्हणतिल जें मायबाप 'हा! हा!' तें." ७१
स्मित करुनि, 'न भेतव्यं' ऐसें बोलोनि, पापहर पावे;
त्यातें आलिंगी प्रभु, यत्स्मरणें तीन[3] ताप हरपावे. ७२
स्नेहें दाहापासुनि रामातें सोडवूनियां, हरि तो
माहेश्वरज्वरातें बाहे, जो मृत्युभीतितें हरितो. ७३

---

१ राहिलीं (जीवत राहिलेलीं सैन्यें) दैन्यें (दैन्यानें—दीनपणानें) वरिलीं (घेरलीं, व्याप्त झालीं). जें सैन्य जीवंत राहिलें तें उत्साहरहित झालें. २. भिऊ नको. ३. त्रिविधताप. (आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक.)

त्या तैशा भस्माच्या टाकी प्रभुवरि हि दोन तो मुष्टी,
होय प्रदीप्तगात्र, प्रभु एक मुहूर्त दे तया तुष्टी. ७४
प्रभुदेह ज्वालाकुळ साक्षात् कर्पूरराशिसा गमला,
भ्रमला न लेश हि प्रभु, पेटोनि मुहूर्त वह्नि तो शमला. ७५
मद्यार्द्र[1] पदार्थ जसा, दीसे भस्में तसा चि तो धडके,
धड[2] केशव परि राहे, कीं, तत्कंठीं अनंत हो[3] अडके. ७६
मधुसूदनासि मग तो उग्र ज्वर वज्रमुष्टिनें ताडी,
पाडी प्रभु हि तयातें, तज्ज्ञान[4] क्षण दिगंतरीं धाडी. ७७
मूर्छित करितां, अंशें प्रभुच्या ज्वर तो मनोहरीं देहीं
शिरुनि करि बहूपद्रव, खळ जेंवि निरंतरोत्सवीं[6] गेहीं. ७८
जी बळभद्रावस्था, होय प्रभुची हि तीपरिस भारी;
पूर्वज्वरावरि ज्वर निर्मी, धृति धरुनि, तो अरिसभारी[7]. ७९
तो वैष्णवज्वर जिणुनि आणी, माहेश्वरज्वरा धरुनीं,
मान नभोवाणीतें प्रभु दे, सोडी तया, दया करुनी. ८०
धरि पाय, जाय शरण ज्वर हरिस, म्हणे, 'दयासुधासुसरा[8]!
स्यां[9] चि असावें लोकीं, न च हा जो निर्मिला तुवां दुसरा.' ८१
कृष्ण म्हणे, 'हें हि दिलें, माझा ठायीं दुजा असो लीन,
शरणागतवत्सळ मीं; प्रभुवर ही शर्करा न सोलीन.' ८२
पावुनि अभयवर, ज्वर विनवी कीं, 'करिन मीं वचन कथिलें;

---

१. मद्यानें भिजलेला २ सुरक्षित ३ त्या अग्नीनें केशवास गिळून पार केलें असतें; परतु हा केशव पडला 'अनत,' व त्यामुळें अग्नीच्या घशात 'केशवाचा घास' अडकला सर्वभक्षक अग्नीचा जबडा प्रचंड खरा, पण केशव हा विश्वव्यापी असल्यानें त्याचा ग्रास अग्नीस करवला नाहीं, एवढ च नव्हे तर, उलट खाणाऱ्यावर च श्वास कोंडून प्राण सोडण्याची पाळी येऊन ठेपली ४ त्याची शुद्धी—देहभान. ५ अदात., जरासा. ६. नेहमीं आनद चालत असलेल्या ७ सत्रुसमुदायाचा शत्रु. ८ सु (चांगल्या) सरा' (सरोवरा'). ९ सामर्थ्य आहे म्हणून मी उगी च भलत्या च निरर्थक कामाला लागणार नाहीं, असा भाव.

कीं, सिद्धपारदाचें श्रेयस्कर लंघिजे वचन कांथिलें.' ८३
देव म्हणे, 'श्रद्धेनें श्रवण करिल हें चरित्र जो ज्वरित,
सोडावा, द्विज गरुडें, तैसा माहेश्वरें तुवां त्वरित.' ८४
शासन वाहोनि शिरीं, चरणद्वय हि, प्रदक्षिणा करुनीं,
गेला माहेश्वर तो, रूप मनीं, नाम ही मुखीं, धरुनीं. ८५
ज्वर गेल्यावरि, करिती असुरबळक्षय पुन्हां हि ते चवघे,
उरले प्रमथ पळाले, हतशेष सुरारि थाकले अवघे. ८६
बाण म्हणे, 'दैत्यकुळीं जन्मुनि घेतां लघुत्व कां? पळतां,
मळतां अयशें, परता, भट हो! करितां अधर्म, हें कळतां? ८७
मीं असतां कां पळतां? आश्रय ईश्वर असोनि, कां चळतां?
परता रे! परता रे! भट हो! सद्गति घडे, रणीं गळतां.' ८८
कुंभांड ही म्हणे, 'रे! भट हो! मुरडोनि, पळ विशंक रहा;
हा बाण, हा गुह, पहा, काळव्याळा हि पळवि शंकर हा.' ८९
फिरतील कसे ज्यांचे गेले पहिले चि निघुनि आंवांके?
जो तो हा भीतिभरें कश्मळपंकांत, करुनि 'आ,' वांके. ९०
वर देवुनि, आपण चि श्रीहर रक्षावयासि बाणातें
श्रीहरिसीं ये समरा, कारण या प्रेम शुद्ध जाणा तें. ९१
अग्निरथीं हर चढला, सारथि नंदीश्वर स्वयें झाला,
प्रभुवरि नानारूप प्रमथमहाभटसमाज ही आला. ९२
गरुडीं चढोनि आला श्रीरुद्राभिमुख अजित ही, राया!
कोपे, नाराचशतें वेधी तो देवदेव वीरा या. ९३
पर्जन्यास्त्र प्रकटी श्रीविष्णु, नृपा! कृपानिधि हि कोपे,
उत्पात फार झाले, ज्ञानिजनीं धृति, विवेक ही, लोपे. ९४
अश्यस्त्र रुद्र योजी, तों चवघांचे हि पेटले काय,

१. सिद्ध केलेल्या पाऱ्याची अवज्ञा कथिलानें करून उपयोगी नाही, तात्पर्य थोराचें बोलणें लहानांस मोडणें कल्याणकारक नव्हे २ पक्षी ३ आज्ञा ४. कळत असतां. ५ धैर्य. ६ मूर्छा ७. बाणशतें ८. महादेव. * येथें चुकून 'अशये' पडलें आहे.

सुर म्हणती, 'हे दहना दहन चि होवूनि भेटले कांय?' ९५

सुरशत्रु 'दग्ध झाला कृष्ण,' म्हणति, हृष्ट गर्जती हरिसें,
सामरमुनि विधि आला, निजलोकीं सिंहनाद ते परिसे. ९६

प्रभु वरुणास्त्रें शमवी अग्न्यस्त्रातें, मुहूर्त साहून;
'स्वास्त्र प्रतिहत केलें,' ऐसें त्या संगरांत पाहून, ९७

पैशाच, रौद्र, राक्षस, आंगिरस अशीं महेश्वरें च्यार
अस्त्रें केलीं प्रकट, क्रूरत्व जयांत सर्वदा फार. ९८

अस्त्रें पाहोनि म्हणे, 'जरि उग्र असेल अन्य, तरि यो, जी!'
सावित्र आणि वासव, मोहन, वायव्य, च्यार हरि योजी. ९९

वारी च्यारी अस्त्रें, मग वैष्णव अस्त्र विष्णु तो टाकी;
भग्न प्रमथ हि झाले, भ्याले शक्रादि सर्व ही नाकी. १००

तों आला श्रीकृष्णप्रभुसीं संगर करावया बाण,
रणसाहित्य तयाचें भुजसम अद्भुत चि सर्व ही जाण. १०१

वैष्णवतेजें समरीं व्यापुनि वहु कामकाळ तापविला,
त्रिपुरघ्न शर करीं घे, ज्याची साजे न बाळता पविला. १०२

पाहे त्रिपुरांतक शर जोडाया सत्प्रभापद पिनाकीं,
तों प्रभुसि जृंभणास्त्रें प्रभु मोही, भय शिरे तदपि नाकीं. १०३

तो सशरचाप जृंभित होय, न सज्ञा मुहूर्त हर पावे,
ज्याच्या चरणस्मरणें भक्तांचे मोह ताप हरपावे. १०४

मोहुनि जगदीशातें, वाजविला पांचजन्यदर अजितें,
भ्रमलें सुरमुनिमन, कीं, नेणे त्याहूनि अन्य दर अजि तें. १०५

---

१. कीं काय किंवा जणू काय २. निरुपयोगी. ३. स्वर्गवासी, देव. ४ त्रिपुरनाशाच्या वेळीं योजिलेला. ५ त्या बाणाशीं तुलनेंत पविला पोरपणा सुद्धा शोभत नव्हता. प्रौढ व कसलेल्या वीरापुढें जसें एखादें पोर तद्वत्—छे' तितकें सुद्धा नाहीं—इतक्या कमी प्रतीचें वज्राचें तेज दिसलें. ६ उत्तम तेजाचें ठिकाण. ७ शिवधनुष्यावर ८ महादेवास. ९ जांभया देण्यास लावणाऱ्या अस्त्रानें. १० तें भय स्वर्गांत देखील शिरल, असा भावार्थ. ११. शुद्धि, भान. १२. भय.

जृंभित होतां, प्रभुच्या निघति मुखांतूनि भडभडां ज्वाळा,
जेंवि विषज्वलनाच्या[1], मन्त्रभरें भारितां महाव्याळा. १०६
ब्रह्मयातें भूमि म्हणे, 'मीं हरिहरबळभरा सहायाला
न शकें; मशकें व्हावें क्षम गरुडभरा कसें वहायाला?' १०७
ब्रह्मा म्हणे, 'धरे[2]! त्वां धैर्य धरावें मुहूर्त, होसील
स्वस्था शीघ्र, तुजविना कोणी सर्वंसहे! न सोसील.' १०८
प्रभुसि म्हणे, 'वर देवुनि, खाज भुजांची रणीं परिहराया,
संरक्षिसि तूं चि कसा, वरदात्यांचा धणी, परि हरा! या?
तूं कोण? कृष्ण कोण? ध्यानांत पहा, रुचे न समर मला;
तुमचा[3] भक्त हि न अशा खेदीं, भेदीं त्यजूनि शम, रमला.' ११०
आणी, 'आपण हरिहर एक,' शिव विचार हा असा ध्यानीं,
व्हावें पुरुषार्थांनीं सुखसाध्य[5] यदाश्रिता[4] असाध्यानीं. १११
शंभु म्हणे, 'सत्यपते[6]! स्वस्था हो भारपीडिता क्षोणी[7],
केलें युद्ध पुरे म्यां; साध्वस[8] चित्तीं धरूं नये कोणी.' ११२
मग हरिहर अन्योन्य प्रेमें आलिंगिती, न दोघांसीं
अंतर दिसे, फुटोनि हि पुनरपि मिळतां जसें संदोघांसीं[9]. ११३
विधि कथित नारदसहित मार्कंडेया, 'रहस्य तें परिसा,
परि सात्विक हो! रक्षा यासि, विसंबों नये जसें परिसा. ११४
मंदरगिरिच्या पार्श्वीं जी नलिनी[10] अतिमनोहरा आहे,
मंद, सुगंध, सुशीतळ, जेथें पवमान[11] सर्वदा वाहे, ११५
तेथें रात्रि स्वप्नीं मीं भाग्यैंकरुनि एकदा बा! हें

१. विषरूपी अग्निज्वाला २. हे पृथ्वी' (सर्वांचा भार सहन करणारी म्हणून पृथ्वीस 'सर्वंसहा' हें नाव आहे) ३ तुमचा भक्त सुद्धा शांतवृत्ति सोडून व कलह-निमग्न होऊन दुःखांत आपणास पाडून घेणार नाहीं, असें असतां, तुम्हीं मात्र या गोष्टी करीत आहां, तेव्हां तुम्हांस काय म्हणावें? हा भाव ४ ज्याच्या सेवकास. ५. 'पुरुषार्थांनीं' याचें विशेषण ६ सत्यलोकपते ब्रह्मदेवा' ७. पृथ्वी. ८ भय ९. चांगल्या स्वच्छ पाण्याच्या प्रवाहास १०. नदी ११. वायु.

अद्भुत हर हरिरूपें, हरि हररूपें, मुनीश्वरा! पाहें. ११६
पीतांबरधर दरकर चक्रगदापाणि देखिला भर्ग,
चर्मत्रिशूळपट्टिशधर हरि, जो अर्पिता चतुर्वर्ग. ११७
गरुडध्वज हर भगवान्, वृषभध्वज हरि, विलोकिला व्यक्त;
कथिलें रहस्य तुज, कीं, कथिसिल तूं त्यांसि, जे भले भक्त.'
मार्कंडेय हरिहरस्तवन करी, अनुसरोनि वेदांतें,
खेदांतें जीवांच्या नाशाया, भग्न करुनि भेदांतें. ११९

---

# अध्याय त्रेचाळिसावा.

बाणरथीं गुह बैसुनि, कुंभांडातें करूनि सूत, रणीं
गांठी एक तिघांतें; वाटे तो पाहत्यांसि भूतरणी. १
रामातें, कृष्णातें, प्रद्युम्नातें, महेषु तो हाणी,
न्हाणी रक्तें त्यांतें, आणी नेत्रांसि जिष्णुच्या पाणी. २
वातदहनमेघास्त्रें सोडिति, कोपोनि, हे तिघे तीन,
हेतींपुढें जयांच्या, 'साधु!' म्हणुनि, शत्रु हेति घेती न. ३
वारी पार्वतवारुणसावित्राहीं तयांसि तो स्वामी,
यदुवीर अस्त्रमाया उडविति, देती म्हणों न ते या 'मीं' ४
स्वामी ब्रह्मशिरोस्त्र प्रकटी, तें प्रलयतपनसम तावी;
त्रासें रोमांचितता त्या समयीं कोण न पनसमता, वी? ५
इतरांची काय कथा? 'हा! हा!' उच्चारिलें तदा शक्रें;
रविमंडल जेंवि घनें, निष्प्रभ केलें चि अस्त्र तें चक्रें. ६
करितां ब्रह्मास्त्रप्रतिघात प्रभुनें, कुमार कोपानें

---

१ शस्त्रधारी. २. पट्टिश=भाला, बरची ३ चार पुरुषार्थ ४. पृथ्वीवरील सूर्य. ५ मोठा बाण ६ ते या (याला) 'मीं' म्हणो न देती=अहंकार काढून टाकते झाले, गर्व उतरला ७ पनसमता (फणसाला सुद्धां मान्य अशी) रोमांचितता.

सोडी शक्ति, करी जी परतेजांचीं रणांत सोपानें. ७
शक्तिधराची शक्ति प्रभुवरि ये ज्वाळपुंज ओकीत,
हत मानी नत मानी ज्या त्या 'हा! हा!' चि शक्र घोकीत. ८
येतां शक्ति समीप, प्रभु हुंकारें चि लोळवी तीतें,
सुब्राह्मण कृत्येतें, अग्नीचे जेंवि लोळ वीतीतें. ९
सुर 'साधु! साधु!' वदले, 'मद लेश नुरे चि तुजपुढें अरिचा,'
हरिचा स्तव बहु करिती देवर्षिप्रमुख मुनि परोपरिचा. १०
चक्र धरी हरि, अरिवरि सोडाया, धगधगीत, जो फिरवी,
मिरवी तें रविशतरुचि, धैर्य परांचें विलोकितां विरवी. ११
रुद्र म्हणे देवीतें, 'रक्षावा संकटीं कुमारमणी,'
प्रेषी स्वाष्टमभागजदेवीतें शंभुची उमा रमणी. १२
मध्यें चि उभी राहे नग्ना तत्काळ कोटवी, राया!
ती कनकशक्ति चित्रा, भासे, बा! होय कोट वीरा या. १३
दृष्टि प्रभुवर फिरवी, पाठ करुनि तीकडे, रणीं राहे,
त्या लंबादेवीतें क्रोधीं हि न धर्मपाळ तो पाहे. १४
तीस म्हणे, 'गे लंबे! अंबे! वेड्ये! निघोनि जा गेहा,
धर्मत्राणाविषयीं, क्रोधभरीं ही रिघोनि, जागे हा.' १५
गेली निघोनि, घेवुनि शंभुनिकट पुत्र, कोटवी तीचें
यश चि, न दुर्यश जाणे, हें वरवात्सल्य पोटिं वीतीचें. १६
प्रभु धर्मज्ञत्वस्वप्रेमामृत हें कवीस वाढूनीं,
लंबा अंबाशभवा ती गेल्यावरि, गुहासि काढूनीं. १७
तो बाण मयूरध्वज गरुडारूढासह स्वयें समर

---

१ जिना जसा पायानें तुडवितात त्याप्रमाणें त्यानें शत्रुतेज पायाखालीं तुडविलें २ पडले, जखमी झाले. ३ तोंडाने बाहेर टाकणाऱ्या (कृत्येतें). ४. तेज ५ पार्वतीनें आपल्या आठव्या अंशानें उत्पन्न केलेली जी कोटवी (नग्न स्त्री) नांवाची देवता तिला. ६. सदृशा आईचें ७ धर्माविषयीं स्वत चें प्रेमामृत ८. बाहेर एकीकडे नेऊन. ९. गरुडावर आरुढ (बसलेला) श्रीकृष्ण.

करिता झाला निरुपम, ज्या पाहुनि चकित जाहले अमर. १८
बाण म्हणे, 'मरसी तूं, ज्यांला अरिदलन हें भलें पाठ,
ते हे मद्भुज कोठें ? कोठें त्वद्बाहु यादवा! आठ ? १९
सुहृदवलोकन कैंचें ? यावरि न द्वारका पहासील,
गोपा! मला न तरसिल, सरसिल, मरासिल, न तूं रहासील.' २०
बाणोक्तें मुनि गगनीं हांसे सर्वां हि हास्य आयकवी;
ऐकुनि अबद्धं, उगला राहेल प्रभुसमक्ष काय कवी ? २१
भगवान् म्हणे, 'प्रलाप व्यर्थ करिसि, यांत काय गा! जीव?
बाणा! नाम, रणमखीं व्यापारुनि आजि कार्य, गाजीव.' २२
ऐसें गर्जुनि, भगवान् सोडुनि शतें अनेक बाणांचीं,
भेदी मर्में, शर्मे घाया, खंडूनि गर्व, बाणाचीं. २३
हांसे बाण, प्रभुतें झांकी, नानाविधायुधें सोडी,
वृष्टि सहस्रभुजाहीं केली, घनवृष्टि तीपुढें थोडी. २४
खर परशु, परिघ, पट्टिश, शक्ति, गदा, मुसल, शूल, बाण, असी,
सोडी, जोडी, थोडी घनवृष्टि, ख्याति वीर बाण असी २५
त्या हि सहस्रभुजाला तो द्विभुज हि रामें विप्र आटेना,
हा तों अष्टभुज प्रभु, विफळ स्वायास यास वाटेना. २६
जें दानवास्त्र होतें प्राप्त कुळीं कनककशिपुपासून,
तें योजी, अरि ज्याच्या तेजें मेले चि तोंड वासून. २७
तों दाटलें निविड तम, त्यांत विविधशस्त्रवृष्टि बा राया!
वारा यातायात न करि, परि हरि होय सिद्ध वाराया. २८
पर्जन्यास्त्रें शमवी प्रभुवर तो दानवास्त्र, आंगातें
प्रभुच्या हि पेटवी जें, करितें त्रिभुवन न भस्म कां गा! तें? २९
क्रोधें बळिसुत हांसे, शरनिकरें पिहितें करि पुन्हां याला,

---

१ पुढील २६ वी गीति पहा २ असबद्ध भाषण ३ अर्थ, तात्पर्य ४ अग मेहनत करून दाखवन. ५. परशुराम ६. जा य—निर्णय० ७ झाकलेला असा

रक्तें न्हाणायाला,[1] चुकला तो मत्त न रिपु न्हायाला.[2] ३०
तो करि बाणरथाचे, हाणुनि खर विशिख, तिळतसे तुकडे,
जातात सुकवि ज्या भवसिंधूच्या, गुरुसि मिळत,[3] सेतुकडे. ३१
प्रभु हस्तावाप[4] कवच तोडुनि, मणिकनकमुकुट ही पाडी,
ताडी उरांत विशिखें, गर्व दिगंतासि तत्क्षणीं धाडी. ३२
मूर्छित बाण पडे, त्या प्रासादाग्रावरूनि मुनि पाहे,
वाहे प्रहर्ष, वाजवि नखें,[6] शतमखसख[7] बसे, उभा राहे. ३३
कक्षास्फोटनतत्पर[8] नारद हांसे, म्हणे, "भलें झालें,
धालें[5] नेत्रयुग, विभो! माझ्या जन्मासि सुफळ हें आलें. ३४
गायिन मीं तुज हरिला, अरिला ही लाविलोसि[9] वाटेतें;
हर! हर! मदगदहर हर, कीं तूं, मज अन्य गुरु न वाटे तें. ३५
मार कसा, तारकसा दारकसा[10] पाल्य तुज गमे, खळ हा;
न म्हणों बळ[11] 'हा!' बळहा[12] हर्षो, यासीं पुन्हा न यो कळहा." ३६
तों करिति कृष्णबाणध्वज गरुडमयूर ते महायुद्ध,
क्रुद्ध द्विजवर[13] जोडी यश, पाहुनि बर्हिसत्तमा,[14] शुद्ध. ३७
रणभूवरि बर्हिणसह सहसा तो बाण पावला पतन,
गतनय तनया न करी व्यसनांत पिता महेश ही जतन. ३८
पाहुनि पराभवातें, पश्चातापेंकरूनि तो भाजे,
'सुहृदुपदेश,' म्हणे, 'अवगणिले, देतो सुकीर्ति शोभा जे.' ३९
करणारा शरवृष्टि प्राज्या वर्षावनासम क्षम हा,
झाला भंग बळिसुता या देवासुरजनासमक्ष महा. ४०

---

१ याचें कर्म 'कृष्णाला' २ [स्वत] ३ संपादन करून, मिळवून. ४ हाताचें रक्षण करणारें एक कवच ५. येथें धाळी असें लिहिलें गेलें आहे ६ चुटकी ७ इंद्रमित्र—नारद ८ हासून हासून याच्या कुशी फुटतील कीं काय असें वाटावें, इतक्या मोठ्यानें व आवेशानें हासूं लागला—निर्णय०. ९ मारतोस [पक्षीं] स्वर्गपद देतोस १०. पुत्रासारखा ११ सैन्य १२ बळनामक असुराला मारणारा—इंद्र १३ पक्षिश्रेष्ठ—गरुड १४ मयूरश्रेष्ठाला

समजोनि भक्तवत्सळ भव भक्ताची व्यथा, म्हणे, 'तूर्ण
जा, नंदिकेश्वरा! ने रथ, बाणीं मत्प्रसाद बा! पूर्ण. ४१
हो सारथि, बाण रणीं विरथ नसो, बसिव मद्रथावरि तो,
मज भक्त स्वामीसा, आप्त विपत्तींत भद्र थावरितो.' ४२
'संकटसमयीं स्वाश्रित रक्षावा सर्वथा,' असें पढवी.
तो नंदिकेश्वर द्रुत, आज्ञा सांगुनि, तया रथीं चढवी. ४३
ब्रह्मरचित दिव्य रथीं चढला, भरला पुन्हा हि उत्साहें,
ब्रह्मशिरोस्त्र प्रकटी, जुमजे होयिल तसी च कुत्सा, हें. ४४
सर्वास्त्रपातनें त्या अस्त्रें सुरलोक सर्व तापविला,
ब्रह्मशिरोस्त्रा चक्रा गांठि पडे, जेंवि पर्वता पविला. ४५
वारुनि अस्त्र, हरि म्हणे, "कोठें तीं कत्थितें तुझीं? बाणा!
कां न विकत्थन करिसी? सुहृदांच्या तों न मानिसी आणा.४६
जेंवि सहस्रभुजाची गति केली संगरांगणीं रामें,
तेंवि तुझी करितों मीं; दंडें खळ वळतसे, न तो सामें. ४७
जो ज्ञाता, हितकर्ता, म्हणतो, 'कुलजीं न दर्प राहो,' तो;
कीं, या सर्वस्वहरा भजतां जन पात्र खर्परा होतो. ४८
आलों, बाहु च्छेदुनि, सर्व तुझा आजि दर्प साराया;
न भला हा देहांत क्षण ही, गेहांत सर्पसा, राया!" ४९
भुजकर्तनप्रतिज्ञाश्रवणें लागे सुरर्षि नाचाया,
बा! नावरे चि कांहीं केल्या अतिहर्षवेग याचा या. ५०
जें वज्राचें तेज, व्याळांचें तेज, तेज यक्षांचें,
जें ब्रह्मचारितेज, ब्रह्मर्षींचें स्वकर्मदक्षांचें, ५१

---

१ आप्त (हितकर्ता) विपत्तींत (आश्रितास विपत्ति प्राप्त झाली असता) भद्र (कल्याण) थावरितो (सांभाळून धरितो)—होता होईल तों अकल्याण होऊं देत नाहीं, अकल्याण न व्हावें म्हणून शक्य ती खटपट करितो. २. सर्व अस्त्रांचा वर्षाव करणाऱ्या अस्त्रें. ३ बडबड, वल्गना. ४. विनविण्या. ५ सर्व नाश करणाऱ्या [दर्पाला]. ६. खापराला, दरिद्र्याला. ७. कर्तन=कापून टाकणें, छेदणें.

रविचें, पतिव्रतांचें, त्रेताग्नींचें, तसें चि शक्राचें;
तेज स्थापुनि, केलें आप्यायन[1] केशवें स्वचक्राचें. ५२
वरद हर दयासागर, मानुनि विड्वर[2] तदा सकळ, वळला;
गौरीस म्हणे, 'रक्षीं, स्पष्ट पहावें न दास कळवळला.' ५३
लंबा अंबाप्रहिता तत्काळ प्रभुपुढें गभीरा हे
प्रकटे, अन्यादृश्या नग्ना, स्मरणें जिच्या न भी राहे. ५४
तीस म्हणे कृष्ण, 'अगे देवि! विवस्त्रा[3] पुन्हा हि आलीस,
कोटवि! तुज[4] हे स्फुरली, किंवा तुझिया सुयुक्ति आलीस? ५५
सोडुनि दृष्टिपथातें, हो असितापांगि[5]! दूर, न वधीन
बाणातें, द्विभुज करिन, हरीन मद चि; वृष्णिवीर[6] नवधी न.' ५६
लंबा म्हणे, "दयार्णव तूं, तारक सत्य देवदेवाचा,
शरणागतासि तव पदपंकजरज अभय दे, वदे 'वांचा.' ५७
होसील जीवपुत्री, मीं याचे बाहुमात्र खंडीन,
आर्ये! हो एकिकडे, या, व्हाया सावधान, दंडीन." ५८
दे अनुमोदन, व्हाया, होता सुत सिंह, तो चि अवि, लंबा;
जाय, करूनि अवश्य प्राप्तापत्यार्थनार्थ[7], अविलंबा[8]. ५९
कृष्ण म्हणे, 'रे बाणा! धिक् तव या पौरुषा असो लोकीं;
आपण बुडोनि, पितरां बुडवितसे दुष्ट पुत्र तो शोकीं; ६०
आली, जेंवि अशक्ता, तुज रक्षायासि कोटवी, राज्या!
हूं, भीड, काय भय त्या, प्राप्त असा दिव्य कोट वीरा ज्या?' ६१
ऐसें गर्जुनि हरिसा, हरि, साराया मदासि, अरि[9] सोडी,

१. पोषण, वाढ. २. संकट. (हा शब्द आर्या भारतात हि एकदा योजिला आहे).
[illegible] तुला तुझी तुला च सुचली का तुझ्या मंत्रणानें (पार्वतीनें तुला सुचविली? ५ शामनयने ! ६. यादववीराची बुद्धि वरचेवर बदलत नाही; मी बोलतों त्याप्रमाणें च करीन, याला ठार करीत नाही म्हणून तुला आता दिलेलें वचन अन्यथा होणार नाहीं. ७. प्राप्त झालेल्या संकटाविषयीं प्रार्थना [करणें] हा च उद्देश त्यास. ८. विलंब न लावितां. ९. सुदर्शनचक्र.

त्या बाणाचे नवशत साष्टनवति संगरांत भुज तोडी. ६२
छेदूनि पाडिले ते, उग्रत्वें हांसते भुज गरा जे,
चक्रें लीलालेशें, श्रीखगशंकें जसे भुजगराजे. ६३
दंडुनि, वर भुज खंडुनि, जैसा विच्छिन्नशाख तरु, अरितें,
करितें झालें, आलें प्रभुच्या हस्तांबुजीं पुन्हां अरि तें. ६४
रक्तार्द्र गमे, गैरिकगुरुगिरि अतिवृष्टिनें जसा उलला,
गर्जो लागे घनसा, शोणितगंधेंकरूनि तो भुलला. ६५
गर्जित पेकुनि, अरिकरिहरि हरि अरि धरि पुन्हां करीं रागें,
तों सगुह शिव पुढें ये, कीं त्यासि 'अभय' द्या म्हणे 'मागें.'
शंभु म्हणे, 'जगदीशा! कृष्णा! मधुसूदना! महाबाहो!
आतां क्षमा करावी, भस्म तव सुदर्शनें न हा बा! हो. ६६
म्यां अभय दिलें आहे या बाणाकारणें, न कोपावें;
भुज खंडुनि, मद हरिला, बा! योजू मारणें नको, पावें.' ६७
कृष्ण म्हणे, 'विश्वेशा! बांचो त्वद्भक्त दैत्यचक्रप हा,
तूं मान्य सुरां असुरां, म्यां हें आटोपिलें स्वचक्र, पहा. ६८
माझें नमन तुज असो, न करिन तें, जें महेश्वराकार्य,
जातों, जाया आज्ञा द्याया मजलागि योग्य तूं आर्य.' ६९
यापरि या परिपूर्ण प्रार्थुनि परमेश्वरा, तदाज्ञा त्या
मागुनि निघतां झाला अत्युत्सव नारदा तदा ज्ञात्या. ७०
अनिरुद्ध रुद्ध जेथें, भगवान् गरुडें तया स्थळीं गेला,
अंतर्बाह्य मळ हरुनि, लाजविती यत्सुकीर्ति गंगेला. ७१
श्रीकीर्तिमदें बुडवुनि, ज्याच्या बहु दुर्दशा दिली देहा,
त्या बाणाला नंदी तारी व्यसनांत, गुरुकिली दे हा. ७२
बाणा! प्रसन्न होयिल शंकर, पंकरहित क्षणें होसी;

१ अष्टाण्णव. २. अगदीं सहज ३ गरुडानें. ४. तोडिल्या आहेत शाखा ज्याच्या असा. ५ काबेचा मोठा पर्वत. ६. शत्रुरूपी हत्तीचा सिंह ७. चक्र ( मंडळ )+प ( पाळणारा ). ८ महेश्वरास अकार्य ( अयोग्य कृत्य ).

शंभुपुढें नृत्य करीं, कथितों तुज हें घबाड मीं जोसी.' ७३
नंदी ने, त्या विकळा बाणा वाहुनि रथीं, हराजवळ;
धवळ क्षीराधिहुनि यश घे, दे उपदेश जो सुधाकवळ. ७४
'रे बाणा! रे बाणा! निःशंक प्रभुपुढें करीं नृत्य,'
ऐसें पुनरपि नंदी सांगे, मग तो हि नाचला भृत्य. ७५
होय प्रसन्न नृत्यें, 'वर माग' म्हणे तयासि वरदेश,
ज्याच्या भक्तासि नसे कोणी पर, देश तो हि परदेश. ७६
बाण म्हणे, 'अजर अमर भजनार्थ तुझ्या असो, दयाळो! हा;
स्पर्शमणि जया स्पर्शे, देतो चि सुवर्णता तया लोहा.' ७७
शंकर म्हणे, "दिला हा वर तुज, दुसरा हि माग, ओपीन;
द्रवली माय बहु म्हणे, 'सेवुनियां स्तन्य वत्स हो पीन.'" ७८
बाण म्हणे, 'नृत्य असें करितां, हो पुत्रलाभ सर्वांस,'
हा देवुनि वर, 'तिसरा माग,' म्हणे; भक्त इष्ट शर्वास. ७९
बळिसुत म्हणे, 'न बाधो पीडा चक्रप्रहारजन्या या,
अन्या यादा न, दयासिंधो! व्हावी, करूनि अन्याया.' ८०
जगदीश म्हणे, 'जाइल आतां चि त्यजुनि हे तुला पीडा,
चवथा ही मजपासीं घे वर मागोनि दितिकुलापीडा!' ८१
बाण म्हणे, "प्रमथोत्तम व्हावें निकटस्थ आठ याम हि म्यां,
नाम 'महाकाळ' असो, लोकीं जन करुत पाठ या महिम्या.८२
हें देवुनि, देव वदे, 'वत्सा! वर माग पांचवा यास,
हा वरदोत्तम जैसा, न क्षम अमृताब्धि वांचवायास.' ८३
बाण म्हणे, "या माझ्या क्षण हि करु विरूपता न घर देहा;
आश्रितकल्पतरो! हा अल्प तरो, 'हा!' म्हणो न, वर दे हा."
त्र्यक्ष म्हणे, 'बाणा! हे टाकेल विरूपता न या देहीं,
बा! जैसी दुर्गतता स्वद्भुच्छायाश्रिताचिया गेहीं.' ८५

---

१. एक शुभ मुहूर्त. २ म्हातारपण न येता. ३. स्तनातील दूध. ४. पुष्ट. ५ दैत्यश्रेष्ठ' ६. प्रमथनामक गणांत श्रेष्ठ. ७. त्र्यंबक, शंकर. ८ दारिद्र्य.

देवुनि वर, परमेश्वर, घेवुनि बाणासि, जाय कैलासीं.
सिद्धि गिरिशभक्तासीं जैसी, देवी तसी न पैलासीं. ८६
अजित म्हणे, 'देवर्षे! कोठें अनिरुद्ध रुद्ध दाखीव,
मूर्त सुधारस माझ्या सुतृषितदृग्घ्रींस शीघ्र चाखीव.' ८७
देवर्षि म्हणे, 'देवा! आहे कन्यापुरांत अनिरुद्ध,
मणिमंत्रौषधितेजें प्रज्वलित, ज्वलन जेंवि वनि रुद्ध.' ८८
तों प्रभुसि चित्रलेखा सामोरी ये, नमूनि नेत्यातें,
रामप्रद्युम्नगरुड यांसह अंतःपुरांत ने त्यातें. ८९
नाग गळाले, झाले, गरुडातें देखतां चि, ते बाण,
कुटिलपण त्यजुनि, सरळ जन होती प्रभुपुढें तसे जाण. ९०
अनिरुद्ध मुक्त होवुनि आर्धी, पावोनि हर्ष, रामातें,
कृष्णातें, गरुडातें, वंदी चित्रेषुपाणि कामातें. ९१
ऊषा, गुरुजन पाहुनि, होऊं दे व्याकुळ श्रमें न मन,
करि रामकृष्णगरुडप्रद्युम्नातें अनुक्रमें नमन. ९२
तों आला देवर्षि त्रिदशेंद्राचा निरोप आणून
वर्धापन करि हरिचें, त्या जयसमयांत युक्त जाणून. ९३
अनिरुद्धसह श्रीवर वंदवि त्या नारदा, करी नमन,
मुनि दे आशीर्वाद प्रभुला, जो हर्षवी करीन्द्रमन. ९४
नारद म्हणे, 'करावा अनिरुद्धाचा विवाह, मीं श्रवण
जंबूलमालिकेचें करिन; कवण या रसीं नसे प्रवण?' ९५
या नारदमुनिवचनें आलें सर्वांसि हास्य वहुतर तें,
कविवृंद यद्विनोदें करितें, हर्षांनि लास्य बहु, तरतें. ९६
केशव म्हणे, 'करावा अनिरुद्धाचा विवाह, तरि तूर्ण.'

---

१ ह्या नावाच्या सिद्ध पुरुषास. २ पुर=राहण्याचें ठिकाण, वसा. ३. नेता= उपदेशकर्ता, मार्गदर्शक ४ विचित्र बाण आहेत ज्याच्या हातांत अशा. ५ अभिनंदन करिता झाला. ६. गजेंद्राचें मन ७ जंबूल=नवरानवरीची स्त्रीपुरुषानीं विवाहसमारंभात केलेली थट्टामस्करी—निर्णय०. ८ लोलुप. ९. नृत्य.

कुंभांड करी सर्व हि, मुनिच्या ज्यामाजि काम परिपूर्ण. ९७
कुंभांडातें देवुनि शोणितपुरराज्यराष्ट्र वरदानें,
आयुष्य, अभय, सद्यश, ऐसीं दिधलीं तयासि वरदानें. ९८
निघतां, महेश्वरातें वंदुनियां, द्वारकेस जायाला,
कुंभांड कथी प्रभुतें, वरुणावरि हि स्वयें संजायाला. ९९
बाणाच्या बहु गायी होत्या वरुणाकडे सुरुचिरा ज्या,
ज्यांचें जराज्वरापह वीर्यप्रद पय सुधासुरुचि, राज्या ! १००
ज्यांच्या अमृतसम गुण क्षीराचा व्यक्त देखिला, राया !
प्रभुकारणें उचित तें, यास्तव तो भक्त दे खिलारा या. १०१
गेले सुर शतमख, विधि, वर्धवुनि प्रभुसि, पुसुनि हर्षानें,
सत्यार्थस्तवनानें, पूजुनियां दिव्यपुष्पवर्षानें. १०२
वाहन मयूर देवुनि, हर्षवुनि द्वारकेसि पाठविली
ऊषा जगद्देवें, तन्मातेहूनि फार आठविली. १०३
अग्रजसुतपौत्रसह प्रभु ही गेला दिशेसि वरुणाच्या,
धेनु विलोकुनि, धाडी अनुजातें करुनि दूत अरुणाच्या. १०४
भामा हि बाणधेनुक्षीराशनकाम जाणवी पतितें,
'आवश्यक कार्य' म्हणे यास्तव ही देव तो, 'महामति ! तें.'
आपण वरुण रण करी, सामें प्रभुला हि दे न हा गायी,
बहुधा सुविवेकाची सर्वत्र सुरांत ही महागायी. १०६
राम, घनश्याम महाधाम, गरुड, काम, तत्तनुज यांहीं
नाहीं त्या वरुणाचें समरीं राहों दिलें कटक कांहीं. १०७
केशव वैष्णव योजी, तों प्रकटे अग्नि, दारुणतरा या

१. जाण्याला, स्वारी करण्याला. २ म्हातारपण व आजार यांस घालविणारें. ३ अमृताप्रमाणें उत्तम रुचि ज्यास असें. ४. खऱ्या अर्थाच्या स्तुतीनें, हांजीखोर-पणानें नव्हे ५ बळराम, प्रद्युम्न व अनिरुद्ध यासह. ६. अरुणाच्या धाकट्या भावास (गरुडास) ७ अशनकाम=सेवनाची इच्छा असलेला.

न शके वरुणप्रेरित, बहु वृष्टि करूनि, वारुण तराया. १०८
वैष्णवतेजें शमतां स्वास्त्र, म्हणे वरुण, "केशवा! परिस,
जे समयाचे भेदक, अपवित्र जगांत ते शवापरिस. १०९
'बाणाचें गोधन दे,' म्हणसी, तरि समयभेद नव घडतो,
तव अग्रजासि मज, बा मेघश्यामा! जगांत अवघड तो. ११०
तुज बाणाच्या गायी, जीवंत असोनि, मीं न ओपीन,
मज मारुनि ने, न्यासत्राणें मद्यश जगांत हो पीन. १११
रक्षीं, वरुणीं करुणा करणें चित्तीं असेल, तरि समया;
नाहीं तरि मारुनि. ने गायी, जरि लेखिसील अरिसम या."
जैसी सुदती तरुणा, करुणाकीर्ति प्रिया जया धीरा,
तो सांत्वुनि त्या वरुणा अरुणानुजरथ असें म्हणे, वीरा:- ११३
"धेनु असोत तुजकडे, वरुणा! तव सत्यसंधता राहो,
म्हणतो सत्यरतांतें, 'जन विखरुनि पुण्यगंध, तारा हो!' ११४
जेंवि धरि बहु कुटुंबी, वित्तीं च न, विप्र भोजनांत रुची,
धरितों यशीं, न विषयीं मीं तरि च नवि प्रभो! जनांत रुची.
तुज मारुनि, कां न्याव्या? देवूत तुला चि या महा गायी;
नंदगृहांत न यांची पोषार्थ मुलाचिया महागायी." ११६
दे अभय, घे वरुणकृत पूजन, ये प्रभु महर्षिसुरसहित,
पुर यां म्हणे, तसें त्या स्वरगा होवुनि न हर्षि 'सुरस हित'.
श्रीनारदप्रमुखमुनि, जे शक्रप्रमुखदेव, ते सर्व
प्रभुनें सुतांसि सांगुनि पूजविले, होय तें महापर्व. ११८
शक्र यदुसभेंत कथी बाणपराभूतिची कथा, राया!
भगवत्तत्वज्ञानें भवभय जनमानसीं न थाराया. ११९
सांगे, बहु मर्यादा रक्षुनि, केली जयांत करुणा, तें,

---

१. वरुणानें सोडिलेले वारुणास्त्र २. प्रतिज्ञा (वचन) भंग करणारे ३ ठेवलेल्या वस्तूच्या संरक्षणानें. ४ सुंदर स्त्री ५. गरुडवाहन कृष्ण ६. सत्यप्रतिज्ञत्व. ७. आनंदाला. ८. कृष्णाला. ९. आनंदयुक्त.

जें, परिभव करुनि, रणीं दे अभय श्रीमुकुंद वरुणातें. १२०
अवतरला ज्यास्तव, तें उरलें नाहीं च कार्य होण्याचें,
तारक, सार, कविस्तुत चरित हरि तमासि आर्य हो! याचें.
या गावें, स्वस्थानीं स्वस्थानीं स्थिर बसोनि, कृष्णातें;
याचें यश चि शमवितें, अमृत शमविना चि ताप तृष्णा तें.
कृष्णातें आलिंगुनि, पुसुनि, चरित गात, जाय हरि नाकीं,
न म्हणे प्रभुप्रतापें ज्याचें मन 'शत्रु ठाय हरिना कीं?' १२३
देवुनि आशीराशी, होवुनि परम प्रसन्नवदन, मुनी
गेले स्वस्थानातें, प्रभु दे आज्ञा जयांसि, पद नमुनी. १२४
आहुक म्हणे, "मुकुंदा! कुंभांडाची सुता सती रामा,
मज वाटतसे योग्या जांबवतीच्या सुतास ती रामा. १२५
बहु असुरांच्या कन्या ऊषेच्या आलि आलिया धन्या,
यांला सत्कृति अन्या न हिता, जासि नागरा जना वन्या. १२६
त्या द्यावी, ज्या पाहुनि, जीचें मन कामसायकाकुळ, ती;
'सेंव' म्हणुनि काय करिल, वरुनि रसिकधाम, साय कांकुळती?"
ऊषा, रामा, इतरा हि तराव्या, म्हणुनियां विवाह नया
धर्मा रक्षूनि करी, सुखवि सुता गणुनियां, विवाहन या. १२८
परिपक्व विवाहोत्सव, उत्सव जे इतर, सर्व ते हिरवे;
फिरवे न गृहीं, जीं बहु सुकुमारी, द्वारकेंत ती मिरवे! १२९
उत्सव नित्य यदुपुरीं, परि म्हणति तयांस परम हा च कवी,
प्रभु वैकुंठ चि गमवी, दावुनि विधिजा हि परमहा चकवी.

---

१. शांतचित्तानीं २ शत्रु माझें पद हरणार तर नाहींना? ३ आल्या—निर्णय० ४ मदनबाणानीं व्याकुळ झालेली. ५ दुधाची साय [खाण्याच्या कामांत पटाईत अशाच्या घरीं] 'माझें सेवन कर' अशी काकुळती करील काय? ६ वि (गरुड)+वाहन=कृष्ण. ७. या लग्नोत्सवांत बायकांना मिरविण्याची इतकी हौस झाली कीं, कधीं घराच्या बाहेर न पडणारी सुकुमारी देखील उन्हातान्हांतून हिंडू लागली' ८. नारदाला सुद्धा. ९ अति आनंदाला.

# अध्याय चव्वेचाळिसावा.

शौनक पुसे, 'प्रतिष्ठित हा पांडववंश कोणत्या भूपीं?
सौते! वद, या श्रवणीं बहु गोडी वा बुधा! सुधारूपीं.' १
सौति म्हणे, "जनमेजयभार्या काश्या, तिचे तनय दोघे,
सूर्यापीड ज्ञानी, जो चंद्रापीड, राज्यपद तो घे. २
त्या चंद्रापीडाचे नंदन शत, सत्यकर्ण तो ज्येष्ठ;
त्या श्वेतकर्णनामा, सुगुणांहींकरुनि तो नृपश्रेष्ठ. ३
धार्मिक हि, अपुत्र नृपति; वृद्धपणीं मानलें तपोवन या.
स्त्री मालिनी प्रसवली दैवबळें त्या तपोवनीं तनया. ४
त्या पुत्रातें त्यागुनि, पतिमार्गें द्रौपदीतसी जाय,
'हाय!' स्वांतीं न म्हणे, पतिहूनि अधिक सतीस तें काय? ५
मातृमहाप्रस्थानीं सुकुमार कुमार तो रडायाचा
गिरिकुंजीं वेग करी, वा! झाला कंठ कोरडा याचा. ६
चळवळ करितां, शिशुचे दोनी ही पार्श्व घांसले गा! ते,
छाया घन करिति पुढें, त्याचे धात्रीस हांसले गातें. ७
त्या पैप्पलादि कौशिक परम करुण आश्रमासि वेमाच्या
नेती, न शिवायाचे, न पहायाचे हि, राशि हेमाच्या. ८
वेमस्त्री अनपत्या, विधवा, मानूनि पुत्र बाळा या
पाळी, विधिनें केली धात्री त्या संकटांत पाळाया. ९
पार्श्व शिलाघृष्ट अजश्याम तयाचे, म्हणोनियां नाम
'अजपार्श्व' असें झालें, आलें त्यामाजि विष्णुचें धाम. १०
ते पैप्पलादि कौशिक धरिति, करुनि बहु दया, सचिवरीती;
जी पौरवराजांची श्री, अजपार्श्वा तयास चि वरी ती. ११

---

१ मनात २ आईच्या मरणकाळीं ३ वणन करणारे ४ दगडावर घांसलेलें ५ बकऱ्यासारखे काळें.

स्वजरास्वीकारीं बहु होय ययाति प्रसन्नमति, डोले;
'होइल अपौरवा भू न कधीं च,' असें चि तो वरद बोले. १२
चंद्रार्कग्रहरहिता होयिल, परि भू न पूरुकुलरहिता,
कथिली असी मुनिवरा! हरिवंशकथा तुला सुजनमहिता."
विप्रवर म्हणे, 'सौते! ऐकुनि आख्यान, सर्प कंपवुनि,
जनमेजय भूप पुढें काय करी, सांग, सत्र संपवुनी.' १४
सौति म्हणेः—जनमेजय हयमेधातें उपक्रमी आर्य,
सांगे हय सोडाया, प्रार्थुनि ऋत्विक् पुरोहिताचार्य. १५
तो हयमेधोपक्रम जाणुनि, ये व्यास या पहायास;
नृप पूजुनि मुनिस, वदे, ज्याच्या सूक्तें चुके महायास. १६
'सत्य महाभारत हें परमामृत, फार पावलों हर्ष,
श्रवणसुखांत स्वामी! न कळत गेलें निमेषसें वर्ष. १७
बा! सर्वज्ञ प्रभु तूं, पुसतों, करुणा करूनि, सांग मला;
धर्मासि राजसूय क्षत्रक्षयहेतु कार्य कां गमला? १८
आयिकतों मीं, पूर्वीं केला हा राजसूय सोमानें;
संग्राम तारकामय झाला कीं या चि नोनुलोमानें? १९
वरुणें हा केल्यावरि, देवासुरयुद्ध जाहलें मागें;
बहु भूतक्षय घडला अन्योन्याच्या दुराग्रहें, रागें. २०
यासि हरिश्चंद्र करी, येणें चि वसिष्ठ जाहला अडी,
ताडी गाधिज यातें, बक होवुनि, विश्व संकटीं पाडी. २१
त्या अडीबकयुद्धीं रिक्त यमाचे न राहिले पाश,
दोघांच्या पक्षींचे क्षत्रिय तेव्हां हि पावले नाश. २२
आर्यें धर्में केला क्षत्रक्षयकर, असें असुन, यज्ञ;

१ आरंभ करी २ क्षत्रियाच्या नाशाला कारण असा. ३ मागें अध्याय ९ वा पहा ४. अनुलोम=स्वाभाविक अनुक्रम, झाला न कीं?—झाला नव्हे काय? असें च खरें ना? ५. जलचर पक्षी—पंत. ६. ह्या युद्धाची हकीकत पंतकृत हरिश्चंद्राख्यानांत दिलेली आहे ७. यमाला खूप काम पडलें—प्राणनाश अतिशय झाला.

सुनयज्ञें मन तयाचें, स्वामी! झालें कसें असुनयज्ञ? २३
त्वां ज्ञानिवरें आप्तप्रवरें कां तो न वारिला राजा?
माझा संशय वारीं, गुरुवर बहुमान्य तूं तया आजा. २४
पुसतो तुज हें भावें कीं, कां वरदा! न वारिला गा! तो?
साधुजन तुला, जैसा जोडुनि कर दानवारिला, गातो.[१] २५
व्यास म्हणे, "राज्या! ते केले विपरीत सर्व ही काळें,
न पुसति, मी न वदें; दे स्तन माता, वदन पसरितां बाळें. २६
सांगत नव्हते काय ब्राह्मण धर्मज्ञ पापरत वेना?
काळाची गति उग्रा, कोणा हि भविष्य वा! परतवेना. २७
वदलों सत्य; प्रत्यय याया तुज, कथिन अर्थ, जो भावी,
जरि म्हणसि, पुरुषयत्नें, फिरवूनि भविष्य, कीर्ति शोभावी. २८
'हयमेध करिन' म्हणसी, विघ्न करिल तुज,न शतमख वळेल,
त्यजुनि विवेक खवळसिल, कां नसतां दीप, न तम खवळेल?
हयमख पुढें न व्हाया कारण होसील; भावि टाळाया
शकसिल, तरि तूं टाळीं येणार निमित्त, भा[२] विटाळाया.[३] ३०
हयमेध राजमार्गें न लोकांत त्वन्निमित्त वाहेल,
तुजपासूनि पुढें हा वेदज्ञद्विजमनीं च राहेल."[४] ३१
भूप म्हणे, 'भ्यालों, मीं होणार निमित्त वास्तव, नयज्ञा!
वा! करिल काय कोणीतरि न, परा जैवि, या स्तवनं यज्ञा?'
व्यास म्हणे, 'द्विज काश्यप योगी प्रकटेल खाणितां क्षोणी,
तो एकमात्र हयमख करिल कलियुगीं, न याचिना कोणी.' ३३
ऐसें सांगुनि, सांगे मुनिवर कलिधर्म घोरतम राया,
कीं जागो द्रुत, सेवुनि विषय जन, निजो न घोरत मराया. ३४
हित सांगुनि मुनि गेला, मग जनमेजय सुबुद्धि हि भ्रमला,

---

१ दानवाच्या संहारकाला (विष्णूला) २ पुढें होणारा प्रकार ३ तेज मलिन होण्याला. ४ तुझ्यामुळें यापुढें राजेलोक अश्वमेध करणार नाहींत आणि त्याची आठवण फक्त वेदपठण करणारांना च असेल.

आरंभुनि हयमेध, प्रत्यूहें करुनि तो बहु अमल
यज्ञांत मारितांश्वस्थानीं काश्या वपुष्टमा देवी
जाय, बसे; तों तीतें, होवूनि सजीव अश्व ता सेवी. ३६
त्या संश्रयीं अश्वीं शिरला विघ्नार्थ तत्क्षणीं योगी,
जो गीष्पतिचा शिष्य त्रिदशांचा नाथ, तो तिते भोगी. ३७
ऐसा विकार झाला सहसा, जनमेजयासि तो कळला;
पळ लागेना, तों चि क्रोधें सुविवेक नृपतिचा मळला. ३८
अध्वर्युतें नृप म्हणे, 'ध्वंस; असा अश्व काय मारित? रे!
माझा अरि न कधीं ही, जैसा न म्हणोनि हा यमारि, तरे.'
ज्ञानी अध्वर्यु म्हणे, 'दूषी गौतमवधूसि जो विट, तो
तुरगीं सिरला, राज्या! दुष्टपणा दुष्ट काय गा! विटतो?' ४०
राजा म्हणे, "मदांधा शक्रगजा जोडितों महात, पहा;
दुष्टा दंड न करितां, माझें न म्हणेल कां महातप 'हा!'? ४१
यज्ञप्रजावनसुकृत माझें निर्मळ असेल, तरि, वक्रा!
यजितिल न आजिपासुनि हयमेधें नृप पुढें कुमति शक्रा." ४२
जे ऋत्विक्, त्यांसि म्हणे, 'व्यर्थ तुम्हीं दुर्बळ, प्रभा वसती,

---

१. विघ्नामुळें. २. ज्या ठिकाणीं तो अश्व मारिला होता तेथें राजाची मुख्य राणी जी काशीपुराधिपतिकन्या वपुष्टमा ती जाऊन बसली, ही वपुष्टमा रंभानामक अप्सरेचा अवतार होती ३ संश्रस=ठार मारलेला ४. इंद्र. ५. विपरीत गोष्ट; अनुचित प्रकार. ६. रे! ध्वंस (मर जा, तुझा नाश होवो), असा काय अश्व मारित [असतात]? तो पुनः आपोआप जीवंत होईल, अशा रीतीनें यज्ञपशु मारतात काय? ज्या अर्थीं तुझ्या या कृतानें अश्व पुन्हा सजीव होऊन त्यानें हें अमंगळ कृत्य केलें, त्या अर्थीं "तुझा नाश होऊ दे" असा माझा तुला शाप आहे. ७. जैसा यमारि (विष्णु) न म्हणोनि (अंतकालीं विष्णूचें नांव न घेतां) हा (कोणी हि) न तरे (मोक्षास जाणार नाहीं) [तद्वत्] माझा शत्रू होऊन कोणाचा कधीं हि टिकाव लागणार नाहीं. ८. अंतर्ज्ञानी. ९. यज्ञाची व प्रजारक्षणाची पुण्याई १० तुमच्या अंगीं तेज असतें तर.

तरि दाखविती दुष्टा शक्रा, महिषा जसी प्रभाव सती. ४३
असतां तुम्हीं प्रतापी, देवाधम दूषिता न यज्ञातें,
जें अयशस्कर, अनुचित शुद्धयशोभूषिता नयज्ञा तें. ४४
जा, सर्व निघा येथुनि, माझ्या राष्ट्रीं तुम्हीं नका राहूं;
प्रस्थान करा आतां, ब्राह्मण हो! न करितां नकारा, हूं!' ४५
'जा! जा!' म्हणतां, ब्राह्मण, सोडुनि तत्काळ नरवरा, गेले;
ते याचे, तेंवि कथीं ऐकुनि कटु अन्य न रव रागेले. ४६
राजा म्हणे स्त्रियांतें, 'मत्सदनांतुनि वपुष्टमा जावी,
स्त्री श्रमरहिता भोगें देह बहु करुनि न पुष्ट माजावी. ४७
जें यज्ञानुष्ठानें, भूत्राणें, शुद्ध मद्यश, तपानें,
या कुकळत्रें गेलें, जावें जैसें चि मद्यशतपानें.' ४८
गंधर्वांचा राजा विश्वावसु नृपतिला म्हणे, "परिस
परि सत्य, मान देसी स्वाश्रितलोहा सुरूप तूं परिस. ४९
यज्ञ त्रिशत नृपा! त्वां केले, उत्कर्ष हा तुझा भारी;
यासि न साहे, बापा! तापा पावे मनांत जंभारी. ५०
जरि, 'अनुसरली' म्हणसी, 'कां महिषी काशिराजकन्या या?
तरि हे रंभादेवी, स्पर्शी पाहीं नको चि अन्याया. ५१
त्रिसवशतसुकृतभीतें शक्रें केली जपोनि हे माया,
लावुनि दोष, नको चि त्यागूं तूं शुचिकळत्रहेमा या. ५२
हरि हरिदेहीं सिरला; काशीशसुता यथार्थ, परि रंभा;
आला देत इला तो प्रभु, देयील चि पुढें हि परिरंभा. ५३
तुजपासुनि बहुत जसा, विप्रांपासुनि तसा चि तो भ्याला,
शक्राला स्वपदाचा, वित्ताचा लोभ जेंवि लोभ्याला. ५४
तूं, तव ऋत्विक्, सर्व हि, एका कार्यें चि तत्क्षण स्पष्ट

१ महिषासुराला. २ जगदंबा. ३. दुराचारी स्त्रीमुळें. ४. तीनशें यज्ञांच्या पुण्यानें भ्यालेल्या ५ मोठ्या काळजीनें. ६ शुद्ध अशा स्त्रीरूपी सोन्याला. ७. आलिंगन.

क्रोधें मोहुनि, केला उत्कृष्टक्रतु महाफळभ्रष्ट. ५५
पावोनि जयंताचा, सुखवाया निजसभा, जनक विवर[1],
हे माया करि, परि वा! याचें करिती संभाजन[2] कविवर. ५६
बोलुनि न च विटवावी, स्त्रीरत्न वपुष्टमा, नव्हे असती,
कां शक्र भोगिता, जरि भोगानुचिता चि सर्वथा असती?" ५७
ऐसा विश्वावसुनें राजा समजाविला, समजला, हो!
समजावी स्त्रीस, म्हणे, 'संप्राप्त इसीं विलास मजला हो.' ५८
मुन्युपदेशीं[3] वसवी, प्रासादीं शंभु, तैंवि विश्वास.
कीं सत्य, अत्यहितहर[4], तो संतत परम मान्य विश्वास. ५९
कथिलें या सच्चरितश्रवणाचें फळ अनंत तज्ज्ञाहीं,
जें तीर्थसेवनाहीं, दानाहीं, सांगचीर्ण यज्ञाहीं. ६०

---

# अध्याय पंचेचाळिसावा.

पुष्करसंभव[6] अमृत चि, वाटेना काय हो! मला गावा?
परि, बहु विस्तर होता भाषाग्रंथीं, न गोड लागावा. १
दुर्जनचोरांपासुनि संरक्षायासि तत्व हें रत्न,
केलें परोक्षभावें[7] कथन, मुनिवरें करूनिया यत्न. २
प्रथमाध्यायीं तत्वप्रश्नोत्तर रम्य वर्णिलें आहे,
ऐसें पुष्करनाम[8] प्रादुर्भावांत साधुधी पाहे. ३
ज्ञानपरमसाधन जें वैराग्य, तदीय सिद्धिला दुसरा
अध्याय वदे; सेविति या, हंस जसे चि मानसा सुसरा. ४

---

१. छिद्र, व्यंग. २ पूजा, सत्कार. ३ मुनीच्या उपदेशावर (विश्वास ठेवी.) येथें 'उपेदेस' असें लिहिलें गेलें आहे. ४ अति+अहित+हर (नाश करणारा) ५. परिपूर्ण केलेल्या ६ उत्पत्ति ७. अप्रत्यक्ष रीतीनें. (आडून, गूढ प्रकारानें—निर्णय०). ८. पुष्कर नावाच्या ईश्वरविभूतींत—अवतारांत.

सर्व हि दृश्य विनाशि, श्रद्धावान् नाशरहित पद लाहो,
म्हणवुनि योग तिसरिया अध्यायांत द्विजेंद्र वदला, हो ! ५
मार्कंडेयसमाधि व्यास चतुर्थांत जाहला कथिता,
निवबाया पर[1]तत्वामृतरसपानें भव[2]व्यथाव्यथिता. ६
जो ब्रह्मज्ञ ब्राह्मण, तो शुद्ध ब्रह्म होय, या भावें
मुनि आप[3]वादिजन्म व्यक्त कथी पंचमांत, हें गावें. ७
मुनिनें, बाह्या[4]भ्यंतरविश्वांतें भेद लेश ही नाहीं,
षष्ठांत वर्णिलें हें, समजावें दुरु[5]पदेशहीनाहीं. ८
तामस, राजस, दोघे जे लय[6], विक्षेपँ[7], सातव्यामाजी
मधुकैटभरूप वधी सत्व[8]महाविष्णु, करुनियां आंजी[9]. ९
ईश्वरसूत्रा[10]त्मविराड्भाव त्यागूनि, चिति उरे शुद्धा;
तीपासुनि सृष्टि पुन्हां, हें कळवी व्यास अष्टमीं बुद्धां[11]. १०
सांख्याचें[12], योगाचें[12], देणार रहस्य आशु[13] भव्यास,
तद्विस्तरार्थ कथिता झाला, नवमाख्य हा शुभ, व्यास. ११
मुनिराज सांख्ययोगात्मक सांगे ब्रह्मयज्ञ दशमांत,
सांख्यब्रह्मविचार स्तवि, जीव पडे जयास्तव शमांतें[14]. १२
कर्म[15]फळपरिच्छेदा मुनि वर्णी भोग[15]भूमितें, जाणा,

१ श्रेष्ठतत्त्व, ब्रह्म २ संसारदुःखानें गांजलेल्यास ३ वसिष्ठादि ४ बाहेरील व आंतील जगांना. ५ दुष्ट उपदेश ज्यास झाला नाहीं त्यांनीं, सदुपदेश झालेल्यांनीं ६ सात्त्विक गुणाचा पूर्ण लय ज्या अवस्थेंत होतो ती मंद अजगरस्थिति ७ सत्त्वगुणाचा केव्हां केव्हां किंचित् उदय होतो ती चंचल अवस्था ८. सत्त्वगुणरूपी महाविष्णु ९. युद्ध १० ईश्वर सूत्रात्मा ( लिंगस्वरूप ) व विराटात्मा ( विश्वरूप ) या उपाधी काढून टाकिल्या म्हणजे केवळ चितिचैतन्य ( शुद्ध ब्रह्मज्ञान ) शिल्लक राहतें. ११. ज्ञान्यास. १२. आत्मानात्मविचारशास्त्राचें, ज्ञानयोगाचें व निष्काम कर्मयोगाचें किंवा आत्मसमाधीचें. १३. तावडतोब. १४. शांतवृत्तींत. १५. पूर्वजन्मींच्या सुकृतदुष्कृतानें सुखदुःखात्मक फळ भोगावयास लावणारी जी ही भूमि तिला.

मग योग[1]याग अ[2]क्षरलाभा, एकादशीं मनीं आणा. १३
यो[3]गोपसर्ग कथिले श्रीमुनिनें द्वादशांत समजावे,
कीं, ते [4]पर वैराग्यें वितळुनि, वातें [5]पयोदसम, जावे. १४
मुनिनें त्रयोदशीं मग कथिल्या सर्वा हि [6]धारणा व्यक्ता,
दाविति महाचमत्कृति भुलविति ज्या, सुंदरी जशा सक्ता. १५
देती बहु भीति [7]पृथग्भूतांच्या धारणा, जशा कारा;
यास्तव चतुर्दशीं मुनि सांगे [8]सूत्रात्मधारणा सारा. १६
जीवन्मुक्त्यर्थ कथी मुनि आधीं ब्रह्मतत्व, [9]चवदांहीं,
बाराहीं धर्म [10]क्रममुक्त्यर्थ, जसा पयोद [11]दवदाहीं. १७
पंचदशीं, ज्या ब्रह्मज्ञान नसे, त्या [12]महत्तमें कर्में
विधिलो[13]कच्युत करिती, हें सांगे द्यावया बुधां शर्में. १८
कथिलें श्रीमुनिनाथें जें स[14]निवृत्तिप्रवृत्तिधर्मफळ,
[15]निखळें [16]प्रवृत्तिनिष्ठस्थिति सोळाव्यांत, जावयास मळ. १९
सप्तदशीं अध्यायीं, म्हणती ज्या ‘द्विभुज [17]हरि’ असें तज्ञ,
तो [18]प्राणयज्ञ सांगे चित्तजयावह, दुजा हविर्यज्ञ. २०
अष्टादशांत कथिलें, जडु भेदाया अशक्त जे, त्यांहीं
[19]अविमुक्तांत करावें निजधर्माचरण चित्तजेत्याहीं. २१
कामादिविघ्न आहे [20]श्रौतीं यज्ञीं हि; विष्णुभक्ति बरी;

---

१ योग (समाधि)-रूप यज्ञ २. अव्यय जें ब्रह्म त्याच्या प्राप्तीला ३. योगास होणाऱ्या पीडा ४ परम, श्रेष्ठ ५ मेघाप्रमाणें. ६. मन ताब्यात ठेवण्याच्या सर्व शक्ति. ७ प्राणिमात्रात भेद आहेत अशा ८ सूत्ररूपानें सर्व एक च आहे अशी भावना. ९ चौदा अध्यायानीं. १०. एका ठराविक क्रमानें होणाऱ्या मुक्तीसाठीं. ११ वणव्याच्या सपाट्यात. १२. अतिशय मोठीं. १३ ब्रह्मलोकापासून भ्रष्ट १४ निवृत्ति=विषयपराङ्मुखता, प्रवृत्ति=कर्तव्यपरायणता १५ निव्वळ, निर्मळ. १६. कर्तव्यपरायणता असण्याची अवस्था. १७. व्यास. (हा विष्णूचा अवतार) १८. नियत आहार वगैरे करून प्राणापानवायूस ताब्यांत ठेवण्याचा प्रकार ( भगवद्गीता चतुर्थ अध्याय २८-३० पद्य) १९. काशीक्षेत्रात. २०. वैदिक सकाम कर्मांत सुद्धां

मुनिवर एकुणिसाव्या अध्यायामाजि हें चि सिद्ध करी. २२
मोहें देहीं निगडीं[1] आत्मा बांधोनि पाडिला आहे,
उद्धरिजे सत्वबळें; विंशीं[2] हें वर्णिलें कृती[3] पाहे. २३
सत्वें मोह निवटितां, गुरुशास्त्रप्रमुख विश्व जें आहे,
पाहे हार्द[4] ब्रह्मीं, एकविसाव्यांत हें कृती लाहे. २४
द्वाविंशीं विष्णवादि हि योगें ऐश्वर्य पावले मोटें,
श्रद्धार्थ वदे, धरिला सत्यवतीच्या मुहूर्त जो पोटें.[5] २५
कर्म करावें योगप्रत्यूहशमार्थ, हें त्रयोविंशीं
मुनि पूर्वकल्पकथनें[6] सांगे, व्हायासि सन्मनें हिंशीं.[7] २६
श्रीव्यास चतुर्विंशीं सांगे हें कीं, समान हीं कष्ट,
योगफळा मोक्षातें, सात्विक पावति, न तामस स्पष्ट.[8] २७
तम सिंधु, मन चि मंदर, कथिले शमकाम[9] जे, सुरासुर ते,
अभ्यास हें चि मंथन, मुक्ति सुधा, जाणती सुधी पुरते. २८
जो कूटशिष्य,[10] तो ही काळें साधुत्व पावतो लक्ष,
श्रीव्यास पंचविंशीं कथि, सांगुनि कनककशिपुचा यक्ष. २९
श्रीमंत मत्त होतो, तद्धन, करुणा करूनि, हरि हरितो,
कनककशिपुविभ्रंशें[11] कळवी मुनि, साधु हें मनीं धरितो. ३०
षड्विंशीं, द्रोही जो दक्ष, तया शंभु सत्पथीं लावी,
मग काय बल्यनुग्रह सांगावा? व्यास तत्व हें दावी. ३१
ईशद्रोहिकृत[12] हि जो धर्म, असे सर्वथा महाफळ तो;
मुनि दक्षनिग्रह कथा,[13] यास्तव हा भाव साधुला कळतो. ३२

१. देहरूपी बेडीत २ विसाव्या अध्यायात ३ शहाणा. ४ हृदयस्थ ब्रह्मांत. ५. सत्यवतीच्या गर्भाशयांत जो दोन घटका होता असा व्यास ६. पूर्वकाळांतील कथांनीं ७ थंडशीं, शांत. ८ सात्विक योग व तामस योग हे दोन्ही सारखे च कष्टमय आहेत, परंतु पहिल्याचें फळ 'मोक्ष' असून दुसऱ्याचें फळ 'मोक्ष' नाहीं. ९. शांति व कामना (वासना) १० कपटशिष्य. ११. पतन, नाश. १२. ईश्वराचा द्वेष करणारा धर्म अर्थात् विरोधभक्ति १३. दक्षवधनकथा.

ऐसें रहस्य पद्मप्रादुर्भावांत वर्णिलें कविनें,
सत्यवतीपुत्रानें, श्रीहरिहरजनसभाब्जिनीरविनें. ३३
तद्वशा मोह न लंघी, नकुळाच्या गरळधर बिलाग्रास.
होतो तृप्त पिता, जरि बाळानें एक भरविला ग्रास. ३४

---

# अध्याय शेचाळिसावा.

भूप म्हणे, 'वाराहप्रादुर्भाव हि अशेष आयकिव,
प्रणतीं जसि गुरुरसना, तसि तोकीं करिल माय काय किंव?' १
वैशंपायन सांगेः–जगदुंपसंहार करुनियां कल्पीं,
जगदीश योगनिद्रा करिता झाला निजीं महातल्पीं. २
स्त्रजिलें अंड हिरण्मय, तें भेदुनि, सृष्टि मग अजें रचिली.
पृथ्वी बुडे समुद्रीं बहुविपुलसपक्षनगशतें खचिली. ३
उच्छ्रित शतयोजन, दशयोजनविस्तीर्ण तोयदासम, हा
जलकेल्युचित वपु धरी, जें अद्भुत हेतु होय दासमहा. ४
होवुनि यज्ञवराह प्रभु सिंधूंतूंनि उद्धरी महिला,
मग निजमुखभवविधितें प्रभुवर अधिकार दे जसा पहिला. ५
विधिरूपें दे राज्य, ज्येष्ठ अदितिपुत्र जो, तया हरिनें;
ज्या श्रीश्रीकांताचें नाम स्मरतां चि भवभया हरितें. ६
असुरांचें राज्य प्रभु दैत्य हिरण्याक्ष जो, तया दे, हा

---

१. पुष्करोत्पत्तिकथनात २. श्रीहरिहरभक्तमंडळरूपी कमलिनीच्या [विकासास कारण अशा] सूर्यानें. ३ मुंगसाच्या बिळाच्या तोंडाला ४ गुरुची जिह्वा म्ह० वाणी. ५. दया. ६. जगाचा लय. ७. प्रलयकाळीं. ८ तल्प=शय्या. ९. उत्पन्न केलें. १० सोन्याचें. ११. सपक्षनग=पंख असणारे पर्वत. १२ उच. १३. जलक्रीडेस योग्य १४. दासांच्या (भक्तांच्या) आनंदास. १५ आपल्या मुखापासून जन्मलेल्या.

करि करुणा सर्वांवरि देव, धरुनि मंत्रमखमया[1] देहा. ७
दिधलें ज्या ज्या जें जें, तो तो तें तें सुखें करी राज्य;
धर्मन्यायें वर्तति, भव्यप्रभ[2] भाग्य भोगिती प्राज्य. ८
अद्रि[3] हिरण्याक्षाच्या रम्यपुरातें उडोनियां गेले,
कलहार्थ कुमंत्र कथिति, देवांवरि पूर्वदेव[4] रागेले. ९
'ज्यान्हि सुर कनिष्ठ, करिती विश्वाचें आधिपत्य; जे ज्येष्ठ,
ते सर्व अनीश[5] तुम्हीं, म्हणति, गुणाहीं असोनि हि श्रेष्ठ.' १०
राजा कनकाक्ष शिखरिवचनातें श्रवण करुनियां कोपे,
युवराज कनककशिपु हि; असुरजनविवेक विधिवळें लोपे. ११
दितिज, दनुज, भट झाले युद्ध करायासि सर्व ही सिद्ध,
इद्ध[6] ज्वलन तसे चि त्रिदश हि, अन्योन्य करिति ते विद्ध[7]. १२
सामर शक्र वदे, त्या असुरांसीं करुनि तुमुल संगर; 'हा!'
कनकाक्ष कीं विधि[8] म्हणे, सर्वांसि, 'उगे चि, वरुनि भंग, रहा'
तत्काळ, हिरण्याक्षें स्तंभित करितां रणांत शक्रातें,
प्रकटे प्रभुवर सहसा, द्याया परिभूति दैत्यचक्रातें. १४
प्रभुदरनादें क्षोभे, दग्युग[9] कनकाक्ष तो करी शोण[10],
पाहुनि असुरांसि, म्हणे, 'हूं! मारा: अरि अपूर्व हा कोण?' १५
नानाविध शस्त्रांची वृष्टि करिति सर्व असुर हरिवरि ते,
जरि[11] वर्षुनि घन, गिरिच्या भंगें, प्रभुच्या जयासि अरि वरिते.
त्या अक्षत परपुरुषीं कनकाक्षें सोडिली महाशक्ति,
ज्याची, पुरुषार्थ सुखें[12] साधुनि देती पदानता[13], भक्ती. १७
ज्वलिता घोरा शक्ति प्रभुच्या भेदावया उरा लागे,

१. मत्र आणि यज्ञ याच्या स्वरूपाच्या. २ कल्याणरूपी तेजानें युक्त ३ पर्वत ४ दैत्य. ५ ईश नव्हे असे–सत्ताहीन. ६ पेटलेला ७ जखमी. ८ कनकाक्ष किंवा सर्वांचें दुर्दैव ९ डोळे १० लाल ११ जरि घन वर्षुनि (पुष्कळ वर्षाव करून) गिरिच्या भगें (पर्वत फोडून) जयासि वरिते (यशस्वी होते) [तरि] प्रभुच्या भंग ह० १२. सहज. १३ शरणागतास, नम्र झालेल्यास.

भंगे, द्रुहिण म्हणे, 'तूं किति? या तेजांत रवि मुराला गे!' १८
बहु 'साधु! साधु!' ऐसें वदला चतुरास्य यज्ञवाराहा,
म्हणति, 'स्वरिपुघनांचा' ते सुर शक्रादि तज्ज्ञ 'वारा हा.' १९
स्तविला कंविलास्यप्रदपदपद्म प्रभु परासि चक्रानें
शिर हरुनि, पळें पाडी; भंगावें दुग्ध काय तक्रानें? २०
आधीं मूर्धा पडला कनकाक्षाचा, विशाळ मग काय;
मुनि वदले, 'हा पविनें केला भिन्न प्रचंड नग काय?' २१
'काय करावें?' ऐसें पुसती शक्रादि चरण लक्षूनीं;
देव म्हणे त्यांसि, 'असा स्वस्थ स्वस्वाधिकार रक्षूनीं.' २२
देवुनि अभय सुरांतें, अंतर्हित होय तोयदश्याम,
नाम स्मरतां ज्याचें, भक्तांचा पूर्ण होतसे काम. २३
देवांसीं, असुरांतें शिकवूनि कुबुद्धि, लाविते कळहा,
त्यांचे पक्ष च्छेदी वज्रें सुरराज, म्हणति ते खळ 'हा!' २४
झाले पावुनि पक्षच्छेदातें, पात्र सर्व तापातें;
बापा! तें न जलधिच्या एका मैनाकपर्वता पातें. २५
सुर म्हणति, 'शरण आला, चुकला, परि न व्यथा जडाला हो,
मैनाक पक्षरक्षणकाम धरुनि, सागरीं दडाला हो!' २६
तरती प्रादुर्भावा गावुनि, ऐकोनि, सर्व वाराहा;
'वारा हानि,' गुरु म्हणति, 'गा या, अघ मेघ सर्व, वारा हा.'

---

# अध्याय सत्तेचाळिसावा.

वैशंपायन सांगेः—प्रभुची भव्या कथा परिस, राया!
उग्रा बहुकल्पांची होय जनिमृतिव्यथा परि सराया. १

---

१ कवींना नाचावयास लावणारें पदकमल ज्याचें असा. २. मस्तक. ३. पडण्यानें (समुद्रांत दडून राहिल्यानें). ४. वराहावताराय. ५. जननमरणपीडा.

श्रीनारसिंहनामा प्रादुर्भाव प्रभूत्तमाचा या,
श्रवण करुनि, भगवज्जन लागति, होवूनि मुदित, नाचाया. २
दैत्यांचा आदिपुरुष, विख्यात हिरण्यकशिपु या नावें,
तप करि, जें, रोमांचित होवुनि, देवादिकीं हि वानावें. ३
तप [1]अपविघ्न करी तो [2]सार्धैकादश सहस्र [3]हायन हो!
ब्रह्मा प्रसन्न झाला; धीरा कृतनिश्चयासि काय न हो? ४
बैसुनि दिव्यविमानीं सुरजनमुनिजनसमेत ये धाता,
'[4]ताता! वर माग,' म्हणे, 'आलों द्याया अभीष्ट मीं दाता.' ५
कनककशिपु नमुनि म्हणे, "देवासुर, उरग, यक्ष, गंधर्व,
राक्षस. पिशाच, मानव, न वधुत, शापुत, ऋषिप्रवर सर्व. ६
शस्त्रास्त्र, वृक्ष, पर्वत, शुष्कार्द्र, इहीं नसो चि वध माझा.
येतां काळ, म्हणावें त्या, 'अयश नसो फिरोनि; अधमा! जा.' ७
स्वर्गीं कीं पाताळीं, भूवरि, गगनीं, नसो निशा, दिवसा;
लोकपतींस म्हणावें, 'होवुनि मम दास, शतमखादि, वसा.' ८
व्हावें म्यां तपन, शशी, वायु, दहन, उदक, गगन, नक्षत्रें;
दशदिग्नृप धरावें, ठाकावें मजसमोर न क्षत्रें. ९
धात्या! व्हावें त्रिजगीं म्यां चि अहंकार, कोप, यम, शक्र,
वरुण, धनद, [5]विदिगीश हि; असुरांचें वश मला असो चक्र. १०
मज मूर्तिधरें अस्त्रें व्हावीं युद्धीं उपस्थितें सर्वें;
गर्वें आला अरि म्यां भंगावा, [6]पंचशर जसा शर्वें. ११
एकें करप्रहारें सबळा मज जो शकेल माराया,
त्यापासुनि मृत्यु असो," वर मागे विधिस दैत्य हा, राया!. १२
द्रुहिण म्हणे, 'वर दिधले, तूं या सर्वा हि पाव कामातें;'
वातें जेंवि म्हणावें, होवुनि अनुकूळ, पावका, '[7]मातें.' १३
वर देवुनि निजलोकीं जातां, मुनिदेव म्हणति, 'बा धात्या!

---

१ विघ्नरहित २. साडे अकरा. ३. वर्षे. ४. बाळा ५. अवांतर दिशांचे अधिपति. ६ मदन. ७. माज; उन्मत्त हो.

दिधले असे कसे वर, विश्वासि करावयासि बाधा, त्या ? १४
अद्भुत वर जरि दिधले लोकक्षयकर पितामहा ! यास,
चिंतीं वध हि, घडों दे स्वापत्यासि न पिता महायास.' १५
ब्रह्मा म्हणे, 'तपाचें फळ पावावें अवश्य दितितनयें,
भगवान् वधिल, तपस्या सरतां, त्यातें तयाचिया अनयें.' १६
विधिवाक्य श्रवण करुनि, गेले ते स्वस्थळासि देव मुनी.
सर्व प्रजांसि भय तो, सिंधु कुशांस न विषाग्नि दे वमुनीं. १७
जे सत्यधर्मनिरत ब्राह्मण होते धरूनि आश्रम, ते,
कनककशिपुकृत धर्षण बहुशत, झाले म्हणोनि 'हा !' श्रमते. १८
सर्व हि सुर जिंकुनि, तो त्रैलोक्य करूनि वश, वसे नाकीं;
असुरांसि पुसे, 'कोणी अजित पर त्रिभुवनीं असेना कीं ?' १९
सुर केले यज्ञाच्या भागासि अपात्र, असुर ते पात्र;
बा ! त्रस्त साधु झाले, भ्याला अनय न एक हा मात्र. २०
गेले शक्रादि सकळ देव शरण विष्णुतें शरण्यातें,
ज्याचा प्रतापदावानळ नुरवी नतविपत्त्यरण्यातें. २१
श्रीविष्णु म्हणे, 'सुर हो ! व्हा स्वस्थ, रहा, धरूनि न भयातें;
वरमत्त अवध्य जरि हि, करितों लीलेकरूनि नष्ट यातें.' २२
देवुनि अभय स्वमुखें, आला जगदीश हरि हिमनगातें,
सत्कवि म्हणति, 'जयातें, ज्ञात्यांचें मुक्त तरि हि मन, गातें.' २३
चिंती प्रभु तुहिननगीं ऐसें कीं, 'शीघ्रसिद्धिकर रूप
म्यां कोणतें धरावें ? माराया उग्र हा असुरभूप.' २४
दिव्य, अनुत्पन्न, असें अत्यद्भुत नारसिंहरूप धरी,
मग ये कनककशिपुच्या अतुळ सभेतें वधावयासि अरी. २५
शत गावें रुंद सभा दिव्या ती, लांब दीड शत गावें,

१. सिंधु–[ नद ] विषाग्नि वमुनीं [ किंवा ] ( सिंधुपक्षीं–पुराच्या पाण्याने वाहून, अग्निपक्षीं–विष ओकून ) कुशास ( गवतास ) [ देखील जे ] भय न दे ( देणार नाहीं ) [ तें ] भय तो सर्व प्रजांसि दे २. अनेकवार. ३. रक्षण करणाऱ्यास. ४. गन्य, नष्ट ५. हिमालयावर ६ योजनें

जी उंच पांच गावें, जींत गुरु हि दुःख लेश न तगावें. २६
जींत मणिस्तंभ रुचिर, मणिबद्धें हंसमंडितें सुसरें,
नंदनवनाधिक वनें, एक सभारत्न तें, नसे दुसरें. २७
हस्तचतुःशतमात्र स्वर्णकशिपुचें अनर्घ आसन तें,
ज्या भजति अमरवृंदें, निकटस्थितिची च धरुनि आस, नतें. २८
विरजस्क मंद वाहे जेथें सुख पवन नव नव सुवास;
धरि, तेंवि महेंद्राचें धनदाचें भवन न वन वसुं, वास. २९
रचुनि प्रबंध सुललितें, याचें गंधर्व सर्व यश गाती,
नाचति वराप्सरा, जी लोकपसंपत्, तयासि वशगा ती. ३०
तेजें गमे विचित्राभरणांबरधर हिरण्यकशिपु रवी,
उग्र परि स्वजनांची, पद्मांची प्रीति भानु कशि पुरवी? ३१
लब्धवर विरोचन, बळि, नरक, प्रह्लाद, विप्रचित्ति, असे
दैत्य शतसहस्र, तयांमध्यें दैत्येंद्र तो प्रहृष्ट असे. ३२
होता स्त्रीशतवेष्टित दिव्यसभेमाजि रत्नपर्वतसा,
वैरतेजा, पर ते ज्या तृणसे, दैत्येंद्र मूर्त गर्व तसा. ३३
तो नरहरि दैत्यांहीं त्या दिव्यसभेंत देखिला, राया!
आश्चर्य क्षण, मग भय, वृषभांच्या फार दे खिलारा या. ३४
ते दैत्य कनककशिपुप्रमुख म्हणति, 'देखिलें न हें मागें,
शीतांशुसित नरहरिरूप सृजिलें न असें हिमागहेमागें.' ३५
प्रह्लाद पित्यासि म्हणे, 'या नरहरिच्या विचित्ररूपातें
नीट पहा, यांत दिसे, जें आहे विश्व, दैत्यभूपा! तें.' ३६
दितिसुत म्हणे, 'सुभट हो! जीवंत धरा नृसिंह पाळाया.
जरि सांपडेल न सुखें, हो कंठीं प्राप्त शस्त्रमाळा या.' ३७
सुररिपुनिकरें, त्रिपुरें ज्यापरि भव, देव वेढिला हो! तो;

१. हसांनीं सुशोभित २. चारशें हात प्रमाणाचे. ३ अमूल्य ४ धूळ नाहीं ज्यांत असा ५ धन. ६ गद्यपद्यग्रंथ, चंपू ७ सुंदर ८. इंद्रादि लोकपालाची संपत्ति ९ फार तेजस्वी. १० चंद्रासारखें पांढरें. ११ उत्पन्न केलें.

अहिगण झटो, न गरुडा त्या परिभव देववे, ढिलाँ होतो. ३८
गर्जे नरहरि, भंगो क्रोधें दिव्या तसी अरिसभा जी;
असुरपतिस, दावानळ जेंवि गजा, बहु तयापरिस भाजी. ३९
श्रीनरहरिवरि योजी आधीं दंडास्त्र देवरिपुंशक्र,
मग काळचक्र सोडी अतिदारुण, विष्णुचक्र, ऋषिचक्र. ४०
तो धर्मचक्र सोडी, पैतामहचक्र दैत्यपति टाकी,
शुष्काशनि, आर्द्राशनि सोडी बहु; 'हाय!' म्हणति तीं नाकी.
कंकाळ, मुसळ, शूळ, ब्रह्मास्त्र, तसें चि ऐंद्र तो सोडी,
ऐषीक आणि शैशिर, आग्नेय, महानगासि जें फोडी. ४२
वायव्य कपाळाभिध, किंकरनामास्त्र, हयशिरोस्त्र, तथा
क्रौंचास्त्र, महाशक्ति हि, जी दावी अरिस मृत्युलोकपथा. ४३
पैशाच, सार्प, मोहन, शोषण, संतापनास्त्र ही योजी,
टाकी विलापनास्त्र हि जृंभण, पालन; न देव तें मोजी. ४४
त्वाष्ट्र प्रकटी मोहन, सवर्तन, कालमुद्गर हि भारी,
मायाधर गांधर्व हि, असिरत्न हि, जें अरातितें मारी. ४५
क्षोभण, वारुण योजी, प्रस्वापन ही वधावया स्वारी,
प्रमथन हि पाशुपत ही, वा! कोणीं ही न अस्त्र ज्या वारी. ४६
ऐसीं अस्त्रें, शस्त्रें, कनककशिपु, तद्भटोघ ही वर्षे,
स्पर्शे पदांसि, तें तें, पावुनि दुःसंगमोचना, हर्षें. ४७
अस्त्रें वेंची, मानी धन योजुनि जेंवि काज वेंचितसे;
ते ते प्रताप झाले, भास्करभंगेंकछु काजवे चि तसे. ४८
अक्षत नरहरिवरि ते अरि तेजें बहुत सोडिती चक्रें,
प्रभुनें गिळितां, केला बहु जयजयकार सामरें शक्रें. ४९

---

१ [स्वत च] सैल (नि शक्त) होतो. २. दैत्येंद्र. ३. निर्जळ व सजल वीज.
४ हाडाचें केलेलें हत्यार. ५ त्वष्ट्यानें निर्माण केलेलें. ६ निद्रास्त्र ७ स्व+अरि.
८ त्याचा वीरसमूह. ९- दुष्ट हिरण्यकशिपूच्या संगतीपासून झालेल्या सुटकेला.
१० खर्च करी, फुकट दवडी.

मग पावकप्रभा[1] त्या अहितानें प्रेरिली महाशक्ती,
प्रभुहुंकारें भंगे, प्रत्यूहें जेंवि तामसी भक्ती. ५०
मग नरहरिवरि अरि ते उपळांची[2] करिति दारुणा वृष्टी,
प्रभुतनु भंगी तीतें, मायेतें सुकविची जसी दृष्टी. ५१
जळवर्ष सोडिलें मग, रज्जुसमा प्रकटल्या तदा धारा,
वरि जळति, गळति बाहिर, त्या नाहीं स्पर्शल्या सदाधारा.
केले प्रकट दितिसुतें दहन, पवन, पेटला महादहन,
मह न त्रिदशांत उरे, कीं, वाटे गिळिल तो जगद्दहन[3]. ५३
नरहरिपुढें शिखीच्या त्या तेज्याचें न मांडलें कांहीं,
'झाला भस्म अरि,' असा केला बोभाट रांडलेंकाहीं. ५४
शक्र, घनांतें आज्ञा करुनि, महावृष्टि पावकीं करवी;
होय प्रसन्न भगवान्; सेवा स्वल्पा हि अवसरीं[4] बरवी. ५५
पावकमाया शमतां, प्रकट असुरराज घोर करि तम तो,
देवर्षि म्हणति, 'कां हो! अद्यापि प्रभुपुढें हि अरि तमतो[5]?' ५६
प्रकटो नरकंठीरव[6] निजमूर्तिद्युति, तमासि ती निवटी,
ज्याची स्मृति होय महामायातिमिरीं जडा जना दिवटी. ५७
सर्वा माया शमतां, भ्याले ते असुर सोडिती धीर,
जाती कनककशिपुला शरण, न रणमरण वांछिती वीर. ५८
तेव्हां कांचनकशिपु क्षोभे, बहु कांपवी धरा समुद्री[7];
गडबडली देवी च न, देवांच्या विरह दे करास मुद्री. ५९
सागर हि उच्चंबळले, तटिनीचा जो प्रवाह तो उलटा;
खचलीं गुरुगिरिशिखरें; धृति हृदयीं न, सुपथीं जसी कुलटा.
उत्पात विविध झाले, शास्त्रश्रुत अनुभवासि ते आले,
असुर बहु मनीं भ्याले, प्रेक्षक रोमांचकञ्चुका[8] ल्याले. ६१

---

१. अग्नितेज आहे जिला अशी २ दगडाची ३ विश्वरूपी अरण्य ४ योग्य वेळीं, प्रसंगीं ५. वल्गना करितो–निर्णय०. ६. नरसिंह ७ समुद्री, सप्रथ, सर्व–निर्णय०. ८ आंगठी.

दितिसुत शुक्रासि पुसे, 'कथितो उत्पात काय हों तात!?
अत्युग्र हे पहातां, रोमांचित वीरकाय होतात.' ६२
शुक्र म्हणे, 'राष्ट्रीं ज्या राज्याच्या प्रकटतात हे घोर,
होतें राष्ट्रहरण कीं राजमरण, सांगतात हें थोर.' ६३
ऐसें उत्पातांचें फळ बळवत्सत्य, भावि, आयकवी,
परमगुरु तें निवेदुनि निजशिष्या, स्वालयासि जाय कवी. ६४
गुरु जातां, असुरेश्वर हृदयीं पावे मुहूर्त मोहातें,
धांवे नरहरिवरि अरि अत्युग्र गदा धरूनि तो हातें. ६५
तेव्हां कांपे अचळा अचळांसह चळचळां, जशी तरणी
शीत रणीं देवांला ये, विप्रभ जाहला शशी, तरणी. ६६
तक्षक वासुकि, शेष हि, कांपे, मग कां न आन कांपावे?
कनककशिपु सिंहध्वनि दे, परमोत्साह आनकां पावे. ६७
कृष्णा, गोदा, सरयू, यमुना, इत्यादि आपगा, त्यांतें
तो कांपवी, न बाधो दती ज्या पापताप गात्यांतें. ६८
तों रुद्रादित्यादि प्रभुसि म्हणति, "कांपतात लोक पहा,
देवा! मारावा हा अरि शीघ्र, म्हणोत हे न लोकप 'हा!' ६९
नरसिंहा! काळाहुनि देताहे न्यून कांप हा काय?
डळमळती भू पादन्यासें, बुडविल न कां, पहा, काय? ७०
विश्वस्वस्तिकर नसे तुजवांचुनि अन्य, पाव, नाश तशा
कनकाक्षाचा केला; वधिसि सदरि तूं चि पावना! शतशा."
सर्वामरसंप्रार्थित, भगवान् नरकेसरी करी लगट,
गर्जे बहु, मुख पसरुनि, वाटे विश्वास ही करील गट. ७२
असुरांच्या हृदयातें झाला नरसिंह गर्जनें चिरिता,
तज्जीवन किति? करिता जलनिधि ही नादसर्जनें चि रिता.

---

१ शुक्राचार्य २. पर्वतांसुद्धां पृथ्वी ३ नौका ४ हुडहुडी, कप, हींव. ५. अन्य, दुसरं ६ नगांच्याना ७ नद्या ८ पाय ठेवण्यानें ९. स्वस्ति=कल्याण. १०. आवाज उत्पन्न करण्यानें च. * येथें 'निजशिष्य' असें लिहिलें गेलें आहे.

जेंवि करावी गरळावरि म्हणवायास 'हा!' निकेड केडुनीं,
अरिनीं केली प्रभुवरि तसि, जरि करि गर्वहानि कडकडुनीं.
मोठ्यांमोठ्यां असुरांसह धांवे दैत्यराज माराया,
नरहरि, उडोनि, गांठी त्या प्रबळातें पळांत, बा राया! ७५
सत्सुख खळक्षय करी, ठाव्या अगदेककोविदा रीती,
जी अशनिगुरु अरितनु, प्रभु नखरांहीं च तो विदारी ती. ७६
त्या शशका, व्याघ्र चि तो दे, वरि घालूनियां कव, चपेटा;
न उरे व्याघ्रीपासुनि, न धरुनि बहुलीनताकवच, पेटा. ७७
प्रभुनें पळांत पर परमोग्र हि सहसा, हरूनि मद, वधिला;
जो मत्त म्हणे, 'ईश्वर मीं च, प्रभु कोण करिल मदवधिला?'
इतरांतें हि, न लावी पळ तो निजभक्तसुरतरु, चिराया,
प्रभुचें उग्र हि सुचरित गाती, विसरूनि सुरत रुचिरा या. ७९
वंदिति, पुष्पें वर्षति सुर, 'जय! जय!' म्हणति, करिति सुस्तवन,
'कीं हें चि सुसुख, राज्य त्यजुनि, वरिति कवि चरित्रपुस्तें वन.
गातिल सत्कवि सादर या सुयशा विजितदेवतरुतुला,
ध्यातिल मोह शमाया, श्रीनृहरे! पूजितील सर्व तुला.' ८१
अर्जुनि, आज्ञा घेवुनि, सामर विधि जाय आत्मलोकाला,
प्रभु हि श्वेतद्वीपाप्रति गेला, हरुनि विश्वशोकाला. ८२
पूजाया भक्तांहीं, पुरुषार्थ सुखेंकरूनि साधाया,
प्रभु निजनरहरिमूर्ति स्थापी, पीडा जना न बाधाया. ८३
अत्यद्भुत नरसिंहप्रादुर्भाव प्रभुप्रसादानें
हा लेश गायिला म्यां, पर अभयाचीं न दे असा दानें. ८४

---

१ चाल, स्वारी. २. कडु पदार्थांनीं ३ सज्जनास सुखदायी. ४ अखिल जगातील अद्वितीय ज्ञात्यास. ५ वज्राहून बळकट. ६ नखांनीं. ७ पकड, वेग. ८ वाघाचें पिलूं ९. माझ्या नाशाला. अवधि=आयुष्याची मर्यादा—शेवट. १० पुस्त=ग्रंथ, पुस्तक. ११. जिंकिला आहे कल्पवृक्ष ज्यानें व म्हणून तुलनारहित अशा सुयशाला.

# अध्याय अठ्ठेचाळिसावा.

श्रीप्रद वामननाम प्रादुर्भाव त्रितापहर, पाया[1]
पुरुषार्थांचा, गावा, ऐकावा स्वत्रिताप हरपाया. १
असुरांच्या राज्यपदीं सद्गुणसंपन्न म्हणुनियां विधिनें
विधिनें अभिषेक करुनि, बळि बैसविला स्वयें दयानिधिनें. २
सचिव म्हणति असुरेंद्रा, 'हित कथितों, जाणतोसि, पण तूतें;
सुरहृत कनककशिपुचें राज्य हरीं तूं प्रवीर पणतू तें ' ३
'देवानीं प्रपितामह[2] वधुनि, त्रैलोक्य आपुलें हरिलें,'
बळिनें ऐसें समजुनि, तत्प्रत्याहरण[3] तें मनीं धरिलें. ४
त्रैलोक्यजयाकारितां आज्ञा करुनि स्ववीरचक्रातें,
केलें प्रयाण राज्यभ्रष्ट कराया स्वशत्रुशक्रातें. ५
बळिसुत सहस्रभुज जो बाण, तयाचे रथातिरथ कोटी,
मोठी चमू निघे, ती वाटे तेजें खरी, दुजी खोटी. ६
बाणें अधिष्ठिला[4], परमद्द नेता जो रथ त्रिनल्व[5] लया,
आयुधरत्नाकर[6] हा, होय रणीं शत्रुयान[7] पल्वल[8] या. ७
रथ शतसहस्र ज्याचे, बळनामा असुर हा निघे राया!
ऋक्षसहस्रयुतरथें, द्याया अहितांसि हानि, घेराया. ८
खरयुक्त, सर्वभीषण[9], रथ षष्टिसहस्र घे नमुचि ऐसे,
व्याघ्रसहस्रयुतरथीं, साधाया विजय वीर तो बैसे. ९
अयुत शतसहस्र रथ प्रबळ करुनि सिद्ध अष्टनल्वमितीं
ऋक्षसहस्रयुतीं मय बैसे, जो निरत असुरराजहितीं. १०
षष्टिसहस्र स्यंदन[10] घेवुनि, खड्गांककेतु[11] जो, धीर,

१ मूळ, आधार २ पणजा (हिरण्यकशिपु) ३ त्रैलोक्य परत मिळण्याचें काम ४ बाणासुर रथावर बसला ५. बाराशें हात. ६ समुद्र ७ शत्रूचें वाहन ८ डबकें ९. सर्वांना भयंकर असे. १०. रथ ११. तरवारीच्या चिह्नाचें निशाण ज्यावर असा

उग्रसहस्रयुतरथीं बसुनि, पुलोमा निघे महावीर. ११
वीर हयग्रीव गिरिप्रतिमस्यंदनवरीं बसोनि, नृपा!
रथलक्षसह निघाला, स्वपरांची ज्या नसे रणांत कृपा. १२
प्रबळबळ प्रह्लाद स्यंदनरत्नें निघे महातेजा,
‘अमरपरिवृत[1] पितामह’ ऐसें कवि मानिती पहाते ज्या. १३
शंबर अंबरमणिसा[2] तेजस्वी, सर्ववीरजनमहित,
दशशतहययुतरथगत, तो त्रिंशच्छतसहस्ररथसहित. १४
पुत्र अनुह्लादाख्य प्रह्लादाचा, मृगेंद्रमुख[3] वाजी,
ज्याच्या त्रिनल्व सुरथा, भट म्हणति जया,‘जयें स्व[4] सुखवाजी!’
याचे सुभटाधिष्ठित सद्रथ शत शतसहस्र, गा राज्या!
शात्रव[5] चमू चिराव्या पावुनि, तपनासि जेंवि गारा, ज्या. १६
बळिचा तात विरोचन, सत्तुरग[6] सहस्र तद्रथा, राज्या
प्रेमें करीत आलें पुण्य, यश श्रेष्ठ, भद्र, थारा ज्या. १७
अगणितरथसहित निघे हा जोडाया यशा शशिवलक्षा[7],
ज्याचा प्रह्लाद पिता, जेंवि रवि तमा तसा अशिवलक्षा[8]. १८
विश्रुत विरोचनानुज, असुरोत्तम, जो कुजंभ या नावें,
दानावें वीराहीं ज्या, अमराहीं स्वकाळ मानावें. १९
रणरुचि[9] शुचि भट घेवुनि, उत्साह मनीं धरूनि, हा समरा
निघता होय, म्हणे तो स्वरिपुसुरांतें, करूनि हास, ‘मरा’. २०
असिलोमा, जो स्वप्नीं देवांसि म्हणे, ‘सशक्र समरा या,’
तो उग्र निघे, ज्याचे डोळे ते शकटचक्रसम[10], राया! २१
पर्वतपादपयोधी[11] असुरसहस्रौघ घे पर दमाया,
गर्जत निघे महोग्रा ज्या दे धाता महावरद माया. २२
दिव्यरथें वृत्र निघे, घेवुनियां सुरथ बहुसहस्र, जितें[12]

१. वेष्टित. २ सूर्यासारखा. ३ सिंहमुखी ४. स्वकीय—**पंत.** ५ शत्रूच्या. ६. उत्तम घोडे ७ वलक्ष=वलक्ष=पांढरें ८. अशिव=अकल्याण ९. युद्धप्रिय १०. गाडाच्या चाकासारखे. ११. पर्वत व वृक्ष या आयुधांनी युद्ध करणारे १२. जिंकलेली.

मानी स्वःश्री, मायाशत रण करितां सुरांसह र्जिता. २३
तैसा चि एकचक्र हि युद्धोत्साहें महारथीं वेळघे
प्रबळ अशीतिसहस्र त्रिदशपतिपराभवार्थ तो बळ घे. २४
जो शतशीर्ष, शतोदर, विकट, दृढ रथीं चढोनि राहु निघे,
'साधु!' असें म्हणुनि,स्थिर कोणी हि जयापुढें न राहुनि घे.
तो बहुसैन्यसह निघे, परबळ पाहुनि रणांत परते ज्या,
जो सवसहस्रकर्ता, कश्यपसुत विप्रचित्ति वरतेज्या. २६
रथ अष्टनल्व दशशतहययुत कैलासशिखरसम, राया!
ज्याहीं स्वीकारावा रण दाटुनि, जेंवि विषरस मराया. २७
केशी, शताक्ष, शतभुज, जोडुनि रथीं महामहिषं, वळला
घनसा चि; निघे दुःसह जो अहितांला, जसा अहि खवळला,
यन्द्रट, उग्र, महाबळ, बावन्न सहस्र, काळसम राया!
ज्यांस नसे, माराया किंवा कलहांत आळस मराया. २९
वृषपर्वा, सुरसूदन, मेरुशिखरसम रथीं बसोनि, करीं
उग्र धनु धरूनि, निघे; 'जय न सुरांच्या' म्हणे, 'वसो निकरीं.
षोडशनल्व, मयरचित, बळिरथ अत्यद्भुत प्रभा वाहे;
वाहति दितिसुत, गजमुख, विकृताकृति, या महाप्रभावा हे. ३१
कनकमयचित्रपुष्पा, रुचिरा, विजयप्रदा महामाळा
बांधुनि, असुरेंद्र निघे, पूजुनि सद्विप्र, बा धरापाळा! ३२
वर्णावा तेव्हांचा त्याचा उत्साह कायसा राया!?
अत्युत्कंठित समरीं विजयार्थ द्रव्यकाय साराया. ३३
करिति जयसमारंभा, जेंवि विवाहक्रियासमारंभा;
जेणें सुभटांसि भजे श्री, सत्कीर्ति, प्रियासमा रंभा. ३४
मग जगदीशें शक्रें, त्या असुरांसीं करावया समर,

---

१. स्वर्गलक्ष्मी. २. उत्पन्नकर्ता ३ बेंधे, चढे ४. ऐशी हजार. ५ भयप्रद [आकाराचा]. ६. विष. ७. महिष, रेडा. ८. देवाचा नाशकर्ता ९. द्रव्य व देह.

आज्ञापिले वसुमरुद्विश्वादित्याश्वि[१]रुद्रमुख अमर. ३५
दशशतहरिहययुक्त स्यंदनरत्नीं बसोनियां, शक्र
निघता झाला क्रोधें, तें दैत्यांचें मथावया चक्र. ३६
दिव्यकिरीटकवचधर धरि जननीदत्त कुंडलें कानीं,
चित्तांत म्हणे, 'वरिलें दितिच्या वैराग्निकुंड लेंकानीं.' ३७
कंठांत वैजयंती घाली आपादलंबिनी[२] माळा,
जांबूनदरचिता[३], त्या फार रुचे दानवांचिया काळा. ३८
सप्तर्षि स्तुति करिती, बहु आशीराशि ओपिती हरितें;
करितें आशीर्वचन चि साधूचें भव्य, संकटें हरितें. ३९
राजर्षि, ब्रह्मर्षि, त्रिदश सकळ, चालती तयामागें;
वज्र धरुनि, शक्र निघे, मर्दाया असुर सर्व ही रागें. ४०
श्रीहरसखा विलोकुनि समरीं पावे द्विषर्जन[४] दरा ज्या,
तो हरिसहस्त्रयुक्तीं सुरथीं बैसुनि निघे धनद, राज्या! ४१
गर्जति पुढें महायुधधर राक्षसयक्ष राजराज्याच्या[५],
शिवली प्रभुप्रसादें कीर्तिस न तनुस हि, बा! जरा ज्याच्या. ४२
ये शतहरियुक्तरथीं चढुनि करायासि दैत्यहानि यम,
ज्याच्या दंडें न उरे पर, दहनें जेंवि शैत्य हा नियम. ४३
क्षोभोनि उरों देती जे नव दृढ ही कदा न वपु रोग,
ते काळाचे झाले, राहों द्याया न दानव, पुरोगें[६]. ४४
आला, त्रिशीर्षपन्नगयुक्तरथीं[७] चढुनि, पाशधर वरुण,
जो जळपति खळ पतितां अकरुण, सद्धर्मनयरतां करुण. ४५
याचे पुत्र महाबळ मूर्त पयोनिधि, महाविष व्याळ,
आले प्रबळखळक्षयकामें रक्षावया पयःपाळ[८]. ४६
रविअंश अर्यमा जो, त्वष्टा, पर्जन्य, मित्र, भग, धाता,
चंद्र, मनु, रुद्र, आले दिव्यरथारूढ परचमूघाता. ४७

---

१. अश्विनीकुमार २. पायापर्यंत लोंबणारी. ३. सुवर्णरचिता. ४ शत्रु ५. कुबेराच्या. ६ पुढारी. ७. तीन मस्तकाच्या सर्पांनीं युक्त. ८ वरुण.

वसु, अश्विनाकुमार, प्रख्यात महानुभाव जे सिद्ध
जे साध्य, सर्व आले गंधर्वेश्वर, शिखी जसे इंद्ध. ४८
श्रीहरिहर गुप्त नभीं त्यांची अवलोकिती थडक, राया!
स्मरण हि समर्थ ज्यांचें सुलभा भवसिंधुची थड कराया. ४९
बसुनि विमानीं, समुनि ब्रह्मा पाहे महासमरयज्ञ,
सुर, असुर, प्रकट करिति शस्त्रास्त्राद्भुतमहा सम रयज्ञ[३]. ५०
वाजति गोमुख, कौहळ, आनक, डिंडिम, मृदंग, दर, भेरी;
झाली सुरासुरचमू, श्रवण करुनि नाद उग्रतर, भैरी[६]. ५१
सेनासिंधु मिसळले क्रोधावेशें करूनि जव, दोनी,
घालिति गांठि सुरांसीं असुर रणीं, नाम ते निज वदोनी. ५२
परिस, प्रवर्तलीं जीं द्वंद्वं अत्यद्भुतें नृपा! युद्धें,
सावित्रें बाणासीं गांठि रणीं घातली अतिक्रुद्धें. ५३
ध्रुव वसुसीं युद्ध करी बळनामा असुर, नमुचि हि धरासीं.
तैसा चि विश्वकर्मा देव मयासीं महायुधधरासीं. ५४
वायुसह करि पुलोमा रण, इच्छुनि कीर्तिरूप वरभूषा;
त्या हि हयग्रिवासीं, वांछुनि निजभुजबळें विजय, पूषा. ५५
जे दैत्य चंद्र, भास्कर, शरभ, शलभ, करिति समर सोमासीं,
शंबर हि भगासीं, कीं, युक्त सदा शूर या चि होमासीं. ५६
संगर करी विरोचन, जो विश्वक्सेन साध्य, यासहित;
असुर कुजंभ तयासीं, जो नामें अंशवसु जगन्महित. ५७
करि समर मारुतासीं असिलोमा; देववैद्य जे त्यांसीं
वृत्र भिडे, राजेंद्रा! प्रणतांच्या सर्वरोगजेत्यांसीं. ५८
जो साध्य देव, यासीं युद्ध करी एकचक्र, गा राया!
वृत्राचा भ्राता बळ, त्यासि मृगव्याध रुद्र माराया. ५९

[illegible] ३. बलवान्. ४ गाईच्या तोंडासारखा घाट ज्याचा असें रणवाद्य ५. नगारे. ६ बहिरी. ७. स्थिर, अचल असा. ८ उत्तम अलंकार.

भगवान् अजैकपाद त्रिदशोत्तम देव जो महाबाहु
त्या शतशीर्षं, शतोदर, तो विकृताकार ‘ये’[1] म्हणे, राहु. ६०
समरांगणीं महाबळ केशी दानव धनेश्वरा पाहे,
वृषपर्वा ही विश्वेदेवा निष्कंभुला रणा बाहे. ६१
असुरवर महावीर्य प्रल्हाद झटे परेतपाळासीं,
झगडे कुबेर हि अनुह्रादासीं देवसैन्यकाळासीं. ६२
रण विप्रचित्ति हि करी वरुणासीं द्विषदजातकरुणासीं,[2]
असुरेंद्र बळि करी त्या इंद्रासीं युद्ध नित्यतरुणासीं. ६३
जे देव, दैत्य, दानव, या नवयागा रणाभिधा[3] झटते,
नटते झाले अद्भुत रणरंगीं, फार शोभले भट ते. ६४
देवपराभवसूचक झाले उत्पात तेथवां घोर,
थोर प्रभु तें स्मरती, करिती रणयज्ञ, न करिती घोर. ६५
त्या समरमहायज्ञीं नेता प्रल्हाद दैत्यकुळपाळ,
अध्वर्यु तो विरोचननामा, जो बळिपिता अमरकाळ. ६६
प्रस्तोता वृत्रासुर, नरनाथा! नमुचि दैत्य तो होता,
यष्टा बाण महाबळ त्या रणयज्ञात जाहला होता. ६७
जीं ब्रह्मास्त्रप्रमुखें अस्त्रें, ते मंत्र, मय हि उद्गाता,[4]
बळि तो ब्रह्मा, इंधन वैर, समर अग्नि, जाण गा ताता!. ६८
रथपंक्ति यूप,[5] भूपश्रेष्ठा! जें रक्त तें चि बा! आज्य,
दीक्षित बळि, तत्पत्नी सेना, जें रुधिर, सोम तो प्राज्य. ६९
शामित्र[6]कर्मकर्ता शंबर ऐसें नृपोत्तमा! जाण,
जो काळनेमिनामा, ती विपुळा दक्षिणा मनीं आण. ७०
अस्थि, कपालें, मस्तक, ते चि पुरोडाश[7] या सवा सवते,[8]

---

१. यमासीं. २. शत्रुविषयीं उत्पन्न झाली नाहीं दया ज्यास अशा (वरुणाशीं). ३ रण नावाच्या नव्या यज्ञाला. ४. यज्ञातील निरनिराळ्या कामांकडे ज्या ब्राह्मणांची योजना केलेली असते त्यांपैकीं एक. ५. यज्ञस्तंभ. ६. यज्ञपशूला मारण्याचें काम करणारा. ७. होमद्रव्य. ८. निराळे, स्वतंत्र.

पंडित दितिदनुज, करिति न असे सुर कुशळ वा! सवासवतें
तेथें सदस्य[1] राया! जंभकुजंभादि वर्णिले असती,
वर्णावा रणमख किति? त्यांत नृपा! सर्व सुगुण ते वसती. ७२
बळि करिल सुरपराभव, यज्ञांतें तें चि अवभृथस्नान[2];
गान व्यास असें करि, ज्याचें विश्रांत निरुपम ज्ञान. ७३
मर्दुनि सुरसेनेतें, सावित्राचे हरावया प्राण,
बाण प्रखरतर रणीं वर्षे ग्रीष्मार्ककिरणसे[3] बाण. ७४
सावित्र शक्ति टाकी बळिपुत्रीं, हरि नगीं जसी अशनी,
ती खंडितां गमे तो उग्र तया, तेंवि मानवा न शनी. ७५
मग विश्वकर्मनिर्मित असि घे सावित्र, पररथाजवळ
शीघ्र भिडे, गरुड जसा उग्र फणीचा करावया कवळ. ७६
बळिसुत खरतर वर शर सरसर परमर्म भेदिते सोडी,
झोडी तरुसि पवनसा, सावित्र पळे, पराभवा जोडी. ७७
सावित्रातें जिंकुनि, बळिनंदन बाण तो महातेजा
शक्ररथाप्रति गेला, सुर भीति, वरायुधें वहाते ज्या. ७८
बळ दैत्य ध्रुववसु हे करिति महायुद्ध दिव्य शस्त्राहीं,
झांकिति अन्योन्यातें, समयज्ञ सखे जसे चि वस्त्राहीं. ७९
वहु आप, अनळ, हे वसु केले व्याकुळ महारणीं वळकें,
सुरबळ तसें अपयशें दिसलें, कानन जसें दिसे जळकें. ८०
शस्त्रें सारीं सरलीं, मग केलें बाहुयुद्ध वा! बहुत;
ध्रुव होवुनि भग्न पळे, 'ज्वलनीं व्हावें,' म्हणे, 'बळें न हुत.' ८१
धरवसु नमुचिवरि शर क्रोधें वर्षे, गमे पयोधर तो,
जोडाया कीर्ति, रणीं शुचि शस्त्रास्त्रज्ञ कां न योध रतो? ८२
हास्य करुनि, नमुचि तया नव बाणाहीं महातपा वेधी,
वसुची, अतितापातें, अहितोत्कर्षा[4] पहात, पावे धी. ८३

१ सभासद; निर्णय करणारे. २. यज्ञसमाप्तीचें स्नान. ३. उन्हाळ्यांतील सूर्यकिरणाप्रमाणें. ४. मुद्दाम, हट्टानें.

खरतरशरप्रहारें फार क्षोभे धराख्य वसु, राया!
अभिमुख निजरथ हाकवि हा कवि, मारावयासि असुरा या. ८४
स्वरथाश्व वसुरथाश्वांमध्यें तो कश्यपात्मभू[1] मिसळी,
चक्रें धररथ जाळी, कीं ज्ञाति प्रबळ[2] हरुनि, भूमि सळी. ८५
दवदीप्तद्रुमसम रथ गमला धरवसु हि तेधवां पक्षी,
लक्षी[3] अधिक यशाहुनि वपु चि, तयातें पळोनि तो रक्षी. ८६
प्रख्यात विश्वकर्मे दोघे[4] देवासुरांत धीरा! जे,
स्पर्धेनें रण करिती चतुरांचे वळपयोनिधी[5] राजे. ८७
त्वष्टा तीक्ष्णशराहीं ताडी, न करूनि आळस, मयातें;
पंडित न चुके चि, चुको दैवें पावोनि बाळ[6] समयातें[7]. ८८
त्वष्टा तीस शर, मय हि तीस, तया, व्हावया स्वयश, हाणी.
ज्यांच्या बुद्धिसमाना बा! कोणाची हि बुद्धि न शहाणी. ८९
सोडी शक्ति अशनिसी, कृत्यासी, स्वाहितावरि त्वष्टा;
तोडी सप्त शरानीं, मय गरुड चि, सर्पिणी च ती स्पष्टा. ९०
मय गमवी व्यमर[8], तसा, त्वष्टा निजनायका व्यसुर[9] समय;
सादर युद्ध पहाती रसिक, जसें काय काव्य सुरसमय. ९१
गरगर फिरवुनि कोपें मय, मोहायासि सुर, गदा हातें
सोडी, जेंवि विषानळहेति[10] करायासि उरग दाहातें. ९२
मय हय वधुनि गदेनें, शरयुग्में केतुसारथी ताडी,
पाडी मोहीं तत्परिभूति सुरबला, मुला जसी तांडी[11]. ९३
झाला विरथ त्वष्टा, जरि समरीं पावला दशा कष्टा,

१ कश्यपपुत्र नमुचिदैत्य. २. प्रबळ ( बलशाली ) असे ज्ञाति ( अष्टवसु हे पृथ्वीचे अगदीं जवळचे आप्त ) हरुनि ( पराभवून ) भूमि ( पृथ्वीला ) सळी ( दु:खी केना झाला ) ३. समजला, मानिता झाला. ४. त्वष्टा व मयासुर. ५ बळसागर ६ अज्ञानी, मूर्ख. ७. वेळेला, प्रसंगाला. ८. नष्ट झाले आहेत अमर ज्यांत असा समय ९ नष्ट झाले आहेत असुर ज्यांत असा समय. १० विषाग्निज्वाला. ११. फेंपऱ्यासारखा रोग—निर्णय०.

तरि शर वर्षे, नष्टा न व्यसनीं होय सद्धृति स्पष्टा. ९४
ताडी मय विरथातें बहु बाणाहीं, तयास ही सुर तो
सव्यभुजीं शर हाणी, धीर व्यसनीं सखा तसा उरतो. ९५
हाणी मर्मी, धर्मी दृष्टि न ठेवूनि, सपरिहास मय,
त्वष्टा निघे, म्हणे, 'हें अयशस्कर, जयद न परि हा समय.' ९६
दैत्य पुलोमा, त्यासीं घाली गांठि प्रभु स्वयें वायु,
बा! युद्ध अतिभयप्रद तें, कीं हा होय सर्वजीवायु. ९७
जें कोणी हि न केलें, करि रणपांडित्य नव पुलोमा तें,
धरि वायुचें शरांतें, शल्याचें तेंवि न वपु लोमांतें. ९८
छेदी परबाणातें प्रकट करुनि अतितरा पवनवेगा,
प्रथम नव, पुन्हा विंशति, हाणी शर शत्रुतें नवनवे गा! ९९
तेव्हां मरुद्गणोत्तम दश म्हणती, 'साधु! साधु!' पवनातें,
स्तवनातें आप्त करिति, करितां व्यसनीं झटोनि अवनातें. १००
तें स्तवन पुलोम्यातें, तद्वीरांतें, न सोसलें कांहीं;
कीं, वीरसू म्हणति, 'हा नित्य वहावा चि सोस लेंकांहीं.' १०१
त्या पवनासि पुलोमा, प्रेरुनि बहु दैत्ययोध, वेढी गा!
मर्दी त्यांतें तो प्रभु, न तृणांच्या दहन रोधवे ढीगा. १०२
वधिले सप्त महारथ दानव पवनें करप्रहारें च
बहु शत्रूंचा उतरी त्या समरामाजि वीर हा रेंच. १०३
असुरकटकरक्ताची वाहविली खळखळां नदी पवनें,
वाढुनि लोभ, उरों दे मोटीं हि कुळें, जसीं न दीप वनें. १०४
देवांच्या कटकाचा बहु नाश करी रणीं पुलोमा तो,
जाणों म्हणे पळाशन, बळ पळरुधिराशनें भुलो, मातो. १०५

१ साधूचें धैर्य २ उपहासानें. ३ परते ४. रणातून पळून जाणे. ५. सर्व जीवाचें आयुष्य. ६ शाल्मिद्राचें. ७ केसाना, साळपिसाना. ८ वाढुनि लोभ (रक्तनदीची हांव वाढल्यानें) [ती ] मोटीं हीं कुळें उरों न दे; जसीं दीप वनें उरों न दे [ तसीं ]. ९. पळ (मांस) आहे अशन (खाणें) ज्याचें ते राक्षस.

त्या रणरंगीं वेष्टिति दैत्य महारथ सहस्र पवनातें,
परं[1] भंगाया न शकाति, जैसे भगवत्प्रसादकवनातें[2]. १०६
मारुनि अष्टशत, निघे, पवन वनांतुनि, शिखी जसा इद्ध,
त्या पवनकृतपथातें अद्यापि विलोकिती नभीं सिद्ध. १०७
शरवृष्टि हयग्रीव प्रथम करी, मग तसा चि तो पूषा;
समयीं विक्रम[3] करणें याहुनि पुरुषा नसे परा[4] भूषा. १०८
असुर हयग्रीवातें, सुर वदले 'साधु! साधु!' पूषातें;
परि होउनि विरथ निघे, म्हणुनि सुराचें न तेज दूषा तें. १०९
शंबर म्हणे, 'खरशरव्रजदहनें[5] भस्म मीं करीन भगा[6],'
अक्षसमाशुगनिकरें[7] तो वा जनमेजया! भरी नभ गा!. ११०
जें रुंद सप्तकिष्कु[8], स्पष्ट द्वादशअरत्नि[9] लांब, करीं
कार्मुक धरी, मग न कां तो हरि? तीं सुरवळें न कां बकरीं?
होत्या सहस्र ठाव्या राया! त्या शंबरासुरा माया,
तद्यश न ढळों देती, जपती त्या अंबरा सुरामा यां[10]. ११२
भग हि, महाचापातें सज्ज करुनि, सुरसमूह हर्षाया,
त्या शंबरदैत्यावरि लागे प्रलयाब्दसा चि वर्षाया. ११३
असुरबळा भग, शंबर अमरबळा, भंग दे, वदे 'हा!' तें,
जेंवि दितिजदेहातें, ये किंशुकरंग[11] देवदेहातें. ११४
बाणाहीं भगवपुचें करि शंबर असुर तो विदारण गा!
भग हि विदारी राया! त्या मायायोगकोविदा[12] रणगा[12]. ११५
तो होय खंड शंभर शंबर भुजवीर्यमत्त मायावी,

---

१. परतु २. भक्तिपूर्ण प्रासादिक काव्याला ३ पराक्रम ४. अधिक श्रेयस्कर. ५. प्रखरबाणसमूहरूपी अग्नीनें. ६ सूर्याला ७. सापासारख्या बाणाच्या समूहानें. ८. किष्कु=कोंपरापासून पुढील हात. ९ अरत्नि=कोंपरापासून करंगळीच्या टोंकापर्यंत हात. १०. चांगल्या स्त्रिया आपल्या वस्त्राना जशा जपतात त्याप्रमाणें इ०. ११. पळसपुष्पांचा तांबडा रंग. १२. रणांगणीं आलेल्या त्या कपटविद्यानिष्णाताला.

कीं, स्पष्ट पराभूति भ्रमयोगें देवसत्तमा यावी. ११६
क्षणभरि अरि, पसरुनि मुख, भुज, चरण, रणीं विचेष्ट तो पडला,
घडला सत्य वध गमे, कीं, त्याचा आप्तवर्ग ही रडला. ११७
क्षणभरि अदृश्य होय, प्रकटे, क्षण युद्ध करि महातेजा,
शत रूपें धरि, मानिति सुर सर्व सपक्ष गिरि पहाते ज्या. ११८
होय प्रादेशमित क्षणभरि, कोणी नसेल खर्व तसा,
तत्क्षण विशाल देह प्रकट करी विंध्यमेरुपर्वतसा. ११९
बैसुनि दिगिभीं[2] भांडे[3], होय पयोधर, करी महावृष्टी,
सृष्टिग्रास कराया प्रलयानळ होय, तापवी दृष्टी. १२०
शस्त्रें सगळीं च गिळी, भीती सुर, असुर ही महाकाया,
त्यातें कोणी शकती, व्याघ्रासि जसे, तसे न हाकाया. १२१
तो प्रलयकाळघनसा लागे सर्वत्र शत्रु वाढाया,
सुर म्हणति, 'फुटाण्यापरि याच्या नग रगडितील दाढा या.'
रूपें उग्रें प्रकटी बहुसंख्य सहस्रमाय शंबर हा;
'शंबर हानिकर,' म्हणति निर्जर, अवलंबुनी हि अंबर, 'हा!'[5]
सुर पळति, सुमुनि म्हणती, 'असुराच्या काय भीति भंगला हे?'[5]
शक्रासि शरण जाय, त्यजुनि समर, फार भीति भंग लाहे.
भंगुनि भगदेवातें, तो शंबर अग्नितें म्हणे, 'दहना!
करितों भस्म तुला मीं, जैसा करितोसि काय तूं गहना.' १२५
यापरि दटावुनि, असुर अंतर्हित होय, आधि अनळातें
व्याकुळ फार करी, बा! कलि उग्र, परंतु तेंवि न नळातें. १२६
सोम करी असुरांच्या चंद्रार्कांसीं महोग्र कलहातें,
देवांचें दैत्यांचें, सर्व म्हणे सुक्षतातें[6] बळ 'हा!' तें. १२७
द्विजराजें[7] शिशिरास्त्रें त्या असुरांचा बळौघ करपविला,
हरपविला मद, जैसा शक्रें सोडुनि विनाशकर पविला. १२८

---

१ आंगठ्याएवढा. २ दिग्गजावर. ३. युद्ध. ४. मायेला. ५. देव. ६ मोठ्या जखमानीं पीडित. ७. चंद्रानें.

दैत्यांचे चंद्रार्क क्रोधभरें वधिति देवसैन्यातें,
रक्तनदी वाहविली, झाले हतशेष पात्र दैन्यातें. १२९
शिशिरास्त्र सोम सोडी, जिकडे तिकडे सुरारि 'हा!' करिती,
जळती, पळती, गळती, त्यांची पडली रणांत हाक रिती. १३०
साहों न शकति कोणी शिशिरकरें सोडिल्या स्वशैत्यातें,
म्हणता 'येना कां पवि कांपवि सहसा तशा हि दैत्यातें?'
हिमकर हि बरें म्हणवी त्या ग्रीष्मींच्या[1] हि अहिमकरसमया
शिशिरास्त्र प्रकटी जें, मानिति ते दैत्य अहिमकरसम[2] या. १३२
'जित,' 'अजित हि,' मुनि न म्हणे, जो ब्राह्मणराज अत्रिनयनज,[3] या
त्रिनयनजय करि वृक, मग कां न करिल काळ अत्रिनयनजया[4]?
वीर विरोचन साध्या विष्वक्सेनासि शरशतें[5] झोडी,
विष्वक्सेन हि कोपें रोपें तदुर प्रगाढ[6] ही फोडी. १३४
कोपे, सप्तशराहीं मूर्छित करि देवकाळ[7] साध्या या,
ध्वज धरि, निश्चळ वाटे बसला, सोडूनि आळसा, ध्याया.
तो साध्य होय सावध; ठाके असुरांत, धरुनि चापातें;
सुरमथन करि विरोचन, सांगों निःसीम काय बापा! तें?
बोळविले स्वर्गातें बहु बळिजनकें, मनांत पोळविले,
जे साध्यपार्ष्णिरक्षक[8] देव चतुर्दशसहस्र लोळविले. १३७
विष्वक्सेनसहित सुर काळतसे अरिस धांवले खाया,
बहु झटति, आपुलें जें, तें कविनीं प्रथम नांव लेखाया. १३८
स्वरथ त्यजुनि तयांतें मारी घेवुनि कराल[9] करवाल,
हर्षोनि, वीरलोकीं त्यांसि म्हणे, 'स्तव कराल, करवाल.'
असुर कुजंभ हि करि, बहु होवुनियां क्रुद्ध, युद्ध अंशासीं;

१. उष्णकाळाला. २. अहि (सर्प) + मकर (सुसर) + सम=प्रमाणें. ३. अत्रिऋषीच्या डोळ्यांपासून उत्पन्न झालेला द्विजराज (चंद्र). ४ ज्यास तीन डोके नाहींत अशावर जय मिळविण्याला. ५. बाणानें ६. फार बळकट. ७. देवाना काळासारखा असा. ८. पाठिराखे. ९. भयंकर, तीक्ष्ण.

लोभें होय अदितिच्या, दितिच्या दारुण विरोध वंशासीं. १४०
सुर न गणिले कुजंभें, मत्तें वारणवरें जसे दंश[1],
दिव्य दशसहस्र गज प्रेषी वाराया तया, अंश. १४१
वीर कुजंभ गदेतें घेवुनि, टाकी उडी रथावरुनीं,
मारित सुटे, भिडाया शकती सुरगजघटा[2] न थावरुनीं. १४२
उग्र कुजंभामात्य हि गजयोधिशिरें शरव्रजें हरिती,
त्रस्त गज फिरुनि पळतां, सुरसेनामथन बहु रणीं करिती.
एकें चि गदाघातें मारी वर गज कुजंभ बलशाली,
भंगी मत्तगजघटा, दंडकर[3] जसा सलील कलशाली[4]. १४४
शतमख तया वधाया प्रेरी कोपोनि सर्व जें सैन्य,
वैन्य[5] क्षितिधर[6]निकरा, तेंवि परबळासि दे महादैन्य. १४५
'असिलोमा हरिमारुत यांसीं रण होय,' म्हणति कवि, 'भारी.'
हरि भारि संगरीं त्या झाला तो, जेंवि राहु रविभारी[7]. १४६
मारिति सुर असुरांतें, असुर सुरांतें अगा! घसाघस ते;
गमले कातर, मिळता जरि इतर जलधि अगाधसा घसते[8].
त्या देवांदैत्यांवरि दैवें पडला असा नवा घाला,
त्यांत हि तरे न सुर असिलोम्यास[9], जसा ससा न वाघाला.
असिलोम्याच्या धनुची हरिनें भल्लें चि खंडिली कोटी,
शर रोविले शरीरीं, शक्ति असी दाविली रणीं मोटी. १४९
कोपे कोटिच्छेदें, सज्य करी अन्य चाप देवारी,
झांकी हरिस शराहीं, बहु सुरसेनेसि ताप दे, वारी. १५०

---

१. डांस २. घटा=समुदाय ३. हातात काठी आहे ज्याच्या असा. ४. कलश (मातीच्या घागरी)+आलि (पंक्ति, उतरंडी) ५. पृथुराजा. (ह्यानें च पृथ्वी सपाट केली अशी कथा आहे). ६ पर्वतसमुदायास. ७. सूर्यप्रभेचा शत्रु. ८. ते इतके भ्याले होते कीं, सैन्यसागर सोडून दुसरा अत्यंत खोल असा जलसागर जर तेथें असता तर त्यात त्यानीं रणांगणातून सुटका होण्याकरितां उड्या घेतल्या असत्या. ९ शैंबद.

पाडी मूर्छित हरितें, हाणुनि वक्षःस्थळांत शर भारी;
देव म्हणति,-'हा! हा! हा! झाला दैवें चि सिंह शरभारी[१]!'
पाडुनि हरितें, भटीं एकत्रिंशत्सहस्रपरिवार;
असिलोमा शक्ररथाप्रति गेला, कांपवूनि अरिवार[२]. १५२
रण अश्विनीकुमार क्रोधें वृत्रासुरासवें करिती,
यांचे, वृत्राचे भट, अन्योन्यप्राण संगरीं हरिती. १५३
केली सुरवीरांहीं शस्त्रांची वृष्टि वृत्र तो उडवी,
बुडवी मोहीं परबळ, नळवन[३] गजसा, महायशा तुडवी. १५४
बहु खरशरवृष्टि करी, लाजवि मेघांसि वृत्रहा हातें.
साहे ताप न, पावे दैन्य, म्हणे देवसैन्य, 'हा! हा!' तें. १५५
तो अश्विनीकुमारें एके पार्श्वीं च वत्सदंतांहीं[४]
अरि ताडिला, प्रहार स्तविला बहु नारदादि संतांहीं. १५६
कोपे वृत्र, गदा घे; गर्जे नासत्य, शूळ सोडून;
धिक्कारी असुर तया, शूळ गदाग्रें पळांत तोडून. १५७
गगनीं उडोनि, हाणी वृत्र गदेनें उरांत नासत्या;
जिंकी समरीं, स्वयुगीं बळि कळि जैसा पुरातना सत्या. १५८
शक्राकडे, पराभव पावुनियां, जाय देव नासत्य,
निजकीर्तिकारणें तो, असमय जाणोनि, दे[६] वना सत्य. १५९
साध्यविशेष रणाजि[७] क्रोधें करि युद्ध एकचक्रासीं,
पावेल विजय कैसा, झगटुनि सरलस्वभाव वक्रासीं? १६०
आधीं पाहुनि निजभटशवलक्षव्याप्त तें रणाजिर हा,
मग खिजुनि एकचक्रा असुरासि म्हणे, 'उभा' रणाजि 'रहा.'
मथनास्त्र प्रकट करी, त्यापासुनि शूल लक्षशा निघती;
अर्थी वदान्यगेहीं, सुररिपुदेहीं विशंक ते रिघती. १६२

१. शरभघातक—**पंत.** शरभानें सिंहास ठार करावयाचें तें दुर्दैवानें उलट च झालें!
२ वार=मंडळ, समूह. ३ देवनळांचे (बोरूचें) रान. ४. ह्या नांवाच्या बाणांनीं.
५ सत्य धर्माला. ६. जळ सोडी—**पंत.** ७. रणभूमि.

तो एकचक्र वारि, प्रत्यस्त्र प्रकट करुनि, मथनातें;
गजहय वधी गदेनें; कवण सविस्तर करील काथनातें? १६३
कनककशिपुसा सुररिपु तो त्रिशच्छतसहस्र अरि खपवी,
हा जेंवि बळिस, तैसा हरिस रणीं दे कधीं न हरिख पवी.
जिंकुनि रणाजितें, तो गेला शक्राकडे चि जितकाशी;
रणभू वीरासि रुचे, कीं हे करिती, जसें चि हित काशी. १६५
रुद्र मृगव्याध करी रण नपरस्वापहारतृप्तासीं
अतिबळबळासुरासीं, विद्यासद्वंशजन्मदृप्तासीं. १६६
भंगुनि पार्षदबळ, बळ पळवि, कळवि कळहकर्म मुद्रहित;
असुर वधुनि शुचिशस्त्रें, करि शत्रूचें हि देव रुद्र हित. १६७
रुद्र बळाच्या हाणी शिखरिशिखरसम शिरीं विशिख सप्त,
गर्जे, नभीं शिरे तो, होय क्रोधेंकरूनि बहु तप्त. १६८
व्योमीं कपटखगांचा तो आश्रय अरितरु द्रवे, गा! तें
वंचन समजे, धांवे त्यामागें करित रुद्र वेगातें. १६९
वर्षे अरिवरि खरशर रुद्रप्रभु, घन नगीं जसा तोया;
पडुनि रथीं चूर्ण करी, नभ सोडुनि, सेववी रसा तो या.
साहति न, विरथ खांतुनि तो रुद्र रणांगणीं उतरला, तें;
पारिषद, नभीं वेढुनि, ताडिति शस्त्रव्रजें सुतरलातें. १७१
न गणुनि रुद्रगणातें, भूवरि उतरे, विशाल शालनगा

१. उलट अस्त्र. २. हर्ष ३. जयशाली. ४. परद्रव्याच्या अपहारानें संतुष्ट न झालेल्या (अद्यापि ज्याची ती इच्छा शमली नव्हती अशा), विद्येचा व प्रतिष्ठित कुळांतील जन्माचा ज्याला गर्व होता अशा (बळासुराशीं). ५. गणांचें सैन्य. ६. बळासुर. ७. आल्हादरहित म्ह० कष्टमय असें ८ मायेनें उत्पन्न केलेल्या पक्ष्याचा) ९. शत्रू हा च कोणी [आश्रय–] वृक्ष. १०. पळे. द्रु=पळणें, ११. तो या (याला) रसा (पृथ्वी) सेववी (ध्यावयास लावी); त्यान त्याला जमीनदोस्त केलें. १२. आकाशांतून. १३ पार्षद, गण. १४ अत्यंत चपल जो त्याला. १५. शाली वृक्षाला.

उपडुनि, पारिषदांतें मारी, रुद्रा न होय पालन, गा !. १७२
मग नगशृंग महाबळ बळ समृगव्याळवृक्ष उपडुनि घे,
तेणें चूर्ण करुनि गण, तो शेषबळक्षया, हि सुपडु निघे. १७३
अश्वें अश्व, रथें रथ, नागें नाग, क्षयासि ने बळ तो;
कातर म्हणती, 'याचा न टळे, काळप्रहार ही टळतो.' १७४
झाले सुरासुरक्षयकारक बळरुद्र रण असा रचिते,
वीरांसि गमति रणमखगुरु, इतर श्रेष्ठ, पण असार चि ते.
तैसा चि राहुसीं करि संगर दुसरा अजैकपाद्रुद्र,
ज्याच्या वीररसाहुनि रसिकासि गमे रसांतर क्षुद्र. १७६
शमविति महद्रणकथा, जो न शमे, तो हि ताप गारा या;
श्रीरुद्रराहुसमरीं चिर वाहे लोहितापगा राया !. १७७
क्रोधें युद्ध कराया या रुद्रासीं शतास्य राहु निघे,
केले प्रहार रुद्रें, पारिषदें ही, समोर राहुनि घे. १७८
रुद्रें वररथ चुरितां, क्षोभे कल्पांतकाळसा राहु,
भंगी तळप्रहारें रुद्रस्यंदन रणीं महाबाहु. १७९
पारिषदांतें मर्दी, रुद्रशराहत रणीं न राहु टळे;
गण म्हणति, 'गुरु हि तृणसे केलों परबाणवृष्टिवाहुटळे !' १८०
रुद्रक्षतदैत्याच्या लाजविले फुल्ल पळस सेनाहीं,
झाले जेंवि हरिपुढें राहुनि वाहूनि पळ, ससे नाहीं. १८१
उठले कबंध बहुशत, पुष्कळ समरांगणांत पळ सांचे.
रक्तस्नात सुरासुर गमले वृक्ष प्रफुल्ल पळसांचे. १८२
धूम्राक्षरुद्र भेदी केशीतें शक्तिनें नृपा ! मर्मीं,
गण ही वर्षति शस्त्रें, जे बहु सादर रणाभिधीं धर्मीं. १८३
केशिमुखांतुनि कोपें धडक निघाल्या सुदारुणा ज्वाळा,

---

१. हत्ती. २. निरर्थक ३. अन्य रस ४. रक्तनदी. ५. शभर तोंडाचा. ६. सहन करिता झाला ७. डगमगे ८. मांस. ९. धुरासारखे ( पिंगट ) डोळे ज्याचे.

शस्त्रपदस्पर्श बळें केला जाणों तया महान्याळा. १८४
पीडी सकळ सुरकटक, सोडुनि खर बाणकोटि, केशी तें;
तत्तेजें धीर तसा, वृद्धांत जसा न तो टिके शीतें. १८५
जेव्हां दे हाकेशी देहा केशी प्रकंप दे अरिच्या,
याच्या सुर जेंवि, तसे नादा भ्याले न मृगकरी हरिच्या.
गेले सर्व सुरांचे केशीच्या गर्जितें चि आवांके,
बहुभारें बाळवृषभ, तेंवि अरि भयें, करूनि आ, वांके. १८७
जाणों ज्वालावन्मुखभव रवें, यास्तव चि सर्व तापविते
झाले; बा! लेखांच्या अत्यद्भुतधैर्यपर्वता पवि ते. १८८
भ्रमले रजोंधकारें, केशिंध्वानें हि, देवदानव ते,
स्वजनातें चि निवटिती, कवि झाले बहु तयासि मानवते.१८९
वज्रास्त्रें करुनि महा पारिषदमनोरथघ्नु अवकेशी;
विजयश्रीचा झाला त्या धूम्राक्षासमक्ष धव केशी. १९०
वृषपर्वा, सूतातें आज्ञापुनि, करि रणीं महावेगा,
वर्षे बहु शर घनसा, न सुरांसि तयाकडे पहावे, गा!. १९१
निष्कंभु विश्वदेव क्रोधें त्याउपरि शालतरु भारी
हाणी, त्यातें चि असुर घेवुनि तेणें चि देवबळ मारी. १९२
निष्कंभु तया मर्मी हाणी कोपोनि बाण तीस महा,
असुर हि खर शर वर्षे, काळासीं देव जाणती सम हा. १९३
निष्कंभूचे अवयव वृषपर्वा क्षत रणांत करि सगळे,
तद्देहांतुनि शोणित वर्षी गैरिकनगांबुपरिस गळे. १९४
निष्कंभुचे भट पळति पृष्ठवदन करुनि आयुधन्यास,
रक्षी त्या वृषपर्वप्रलयज्वलनांत आयु धन्यास. १९५

---

१. शस्त्ररूपी पायाचा धक्का २. ज्वाळा ओकणाऱ्या मुखातून उत्पन्न झालेला नाद (गर्जना). ३. देवांच्या. ४ ध्वान=गर्जना. ५. निष्फळ, वाझ. ६. पति. ७. वर्षाऋतूंत. ८. गेरूच्या (कावेच्या) पर्वतावरील [लाल] पाण्यापेक्षां जास्त. ९. पाठीकडे तोंड केलेले, पराङ्मुख १०. शस्त्रत्याग ११ आयुष्याची दोरी.

युद्ध प्रह्लादासीं काळासीं होय तुमुल, गा राया!
होम स्वस्त्ययन करी प्रारंभीं शुक्र, शिष्य ताराया. १९६
विजयप्राप्त्यर्थ करिति शुक्राचे अयुत शिष्य जे जप, ते
तपते ब्राह्मण योगी, तत्तेजें विघ्न जाहले लपते. १९७
कंठीं, हस्तीं, माथां, प्रह्लादाच्या सदोषधीमाळा
गुरु अभिमंत्रुनि बांधी, सुतिलक लावी तयाचिया भाळा. १९८
मंत्रित मणिकनककवचमुकुट श्रीशुक्र लेववी, राया!
मंत्रितरथरत्नस्था पाहों शकती न देव वीरा या. १९९
सप्ततिसहस्र रथ, गज, घेवुनि पादात, लक्षशा सादी,
काळातें प्रह्लाद प्रभु तो युद्धांगणांत आसादी. २००
असुर प्रह्लादाचे अमित, यमाचे रविप्रभ व्याधी,
जे सोडिती न रणभू भंगीं हि, जसे न विप्र भव्या धी. २०१
द्व्यंगुल हि असा दिधलें क्षतवर्जित दैत्यकाय न गदाहीं,
तापे प्रह्लाद, उरे तिल हि नगीं शैत्य काय नगदाहीं? २०२
सर्वांस ही सुदुःसह काळाचे प्रबळ जरि, तरि, पुरोग
असुरांहीं लोळविले, जे होते कदन करित रिपु रोग. २०३
हतशेषा दिसति पुढें परिघ, मुसल, शूल, सायक, गदासी;
सकळा हि असुर झाले काळासम भीतिदायक गदासी. २०४
प्रह्लादाच्या व्यूहीं अतितेजा काळनेमि, गा राया!
काळाच्या सैन्यांत क्षय परम क्षम अरींस माराया. २०५
होतां असुरांचा जय, गद म्हणति, 'कांसि नाथ! हा! काल!'
कीं झाला शत्रूंच्या शस्त्रांला रोगनिकर हा काल. २०६

---

१ कल्याण हृ फळ ज्याचें असा. २. चांगल्या गुणकारी वनस्पतींच्या माळा. ३ स्वार ४ गाठी ५ चांगली बुद्धि. ६. दोन बोटें सुद्धां. ७. वणवा पेटला असतां पर्वतावरील वृक्षाचे ठायीं थंडावा कोठून असणार? ८. आघाडीचे वीर; पुढारी. ९. गदा+असि (तरवार). १०. हाय! हाय! हे आमच्या नाथा! काळा! तू कोठें आहेस?

स्वबळविनाशक्रोधें करिति प्रह्लादकाळ[1] कलहा ते,
झाले स्वपरजनमुखें स्तुति असुरव्याधिपालक ल्हाते[2]. २०७
काळप्रह्लादांचें युद्ध मनुष्येश्वरा! जसें काय
झालें, तसें न मागें, होयिल न पुढें हि, म्हणवि तें 'हाय!.' २०८
दे पाठ प्रह्लादा, सोडुनि अभिमान, अन्यसम यम हा;
सुर म्हणति,'अधन्य समय,' शेष असुर म्हणति,'धन्य समय महा[3].'
प्रह्लाद विजय पावे, काळ हि समरीं पराभवा लाहे,
झाले विजयी भजुनि श्रीशुक्रा गुरुवरा भवाला हे. २१०
प्रह्लादानुज दैत्यश्रेष्ठ अनुह्लाद धनद हे धन्य
वन्यद्विपसे, हरिसे, करिति क्रोधांधशरभसे अन्य. २११
धनु धरुनि, अनुह्लादें शर वर्षुनि, जे रणीं महादक्ष,
यक्षक्षणदाचरवर[4] गुह्यकवर वीर मारिले लक्ष. २१२
यक्षबळा न च तरवे तो, जैसा नग नरा जरा ज्यांला;
बहु असुर वधी, साहे निजवीरक्षय न राजराज्याला. २१३
प्रखर अनुह्लादानें धनदातें हाणिले असे बाण,
त्यातें भेदुनि,तदनुग[5] जे, त्यांचे ही विनाशिती प्राण. २१४
शरवृष्टि यक्षराक्षससहितें ईश्वरसखें[6] असी केली,
मेली बहु, रक्तनदीमध्यें वाहूनि परचमू गेली. २१५
शारदवर्षें[7] वृष जसें डोळे झांकूनि नरवरा! साहे,
तेंवि अनुह्लाद धनदशरवर्ष, मनीं न भीतितें वाहे. २१६
अतिकुपित अनुह्लाद क्षितिरुह[8] उपडी विशाळसा तूर्ण,
धनदरथाचे वाहक[9] वाह करी त्या द्रुमें चि तो चूर्ण. २१७
मर्दिति असुर सुरांतें, सुर असुरांतें, रणांत खवळून,
कुलिश[10]कठिन कुपित कलहकुशल करिति कदन, केश कवळून.

---

१. प्रह्लाद व यम. २ स्वीकारते. ३. युद्ध. ४. यक्ष व रात्रिंचर (राक्षस) यातील श्रेष्ठ. ५. त्याचे अनुयायी ६. महादेवाचा मित्र कुबेर ह्यानें. ७ शरदृतूतील वृष्टि. ८. वृक्ष. ९. घोडे. १०. वज्रासारखा कठिण.

त्र्यंबकसख शर सोडी, प्रळयजलदवृष्टि ही गमे थोडी.
असुरांतें बहु झोडी भुजमस्तक लक्ष तडतडां तोडी. २१९
धनदरथावरि टाकी तो असुर करावयासि घात शिळा,
ज्याच्या पर प्रतापा, जेंवि द्रविडद्विजासि भात शिळा. २२०
सगद रथावरुनि उडी टाकुनि, वित्तेश जाहला दूर,
तों वरि पडुनि शिळेनें केला सहसा शतांग तो चूर. २२१
सोडुनि सायक, सारी सुरसेना मथुनि, दूर पळवून,
पर्वतशृंग असुर घे, परवीरांचे मुखेंदु मळवून. २२२
गर्जे असुर क्रोधें, धांवे परि धनद भय मनीं नाणी,
गरगर फिरवूनि गदा त्याच्या वक्षःस्थळीं बळें हाणी. २२३
रुद्रसखगदाघाता साहे तद्धृदय सत्वराशि खरें!
प्रह्लादानुज ताडी धनदा अत्यंत सत्वरा शिखरें. २२४
वज्रें जेंवि नग, तसा नगशृंगें यक्षपाळ तो खचला;
यक्ष म्हणति, 'ईश्वरसख रक्षूं, झाला परांसि तोख, चला.' २२५
तेसें चि परतले ते राक्षसगुह्यकपतीस रक्षाया;
रक्षिति, न क्षिति सोडिति युद्धाची, जपति शत्रु भक्षाया. २२६
होता मुहूर्त मूर्छित, सावध होवूनि गर्जला धनद,
घन दर्प त्यजुनि, पळति असुर, जसे वातवेगहत घनद. २२७
त्या धनदभयें बरिती जे सुमहा काळपूर्वनेमि पळ,
त्यांसि अनुह्लाद म्हणे, 'कां पळतां? रे! रहा धरुनि बळ.
आहे पोकळ कळला, भिववितसे आरडोनि वित्तप हा;
आतां यासि पळवितों, कलहकुतुक, कठिन करुनि चित्त, पहा.
म्हणती असुरांसि असुर कोपारुणखरतराक्ष 'समरा या.'
यक्ष वदे, 'दुर्लभ यश होतें, रे! परत राक्षस मराया.' २३०
सुरशत्रु, यक्षराक्षस, वीर करिति युद्ध हें तुमुल गाया

१. रथ. २. स्वामी जो कुबेर त्याला. ३. मेघ. ४. काळनेमि. ५. क्रोधानें लाल व भयंकर झाले आहेत डोळे ज्यांचे असे (असुर).

कनककशिपुचा झाला, होवुनियां क्रुद्ध, हेतु मुलगा या. २३१
निजपक्षयक्षराक्षससंक्षय लक्षूनि, यक्षप क्षोभे,
अरिस क्रूरशरांहीं वेधूनि सहस्रकरतसा शोभे. २३२
विद्ध अनुह्राद वमे क्रोधें अंगारमिश्रिता ज्वाळा,
मारी सहस्र सायक 'हाय!' करवितें उदग्दिशापाळा.[1] २३३
शर शिरकतां शरीरीं, मोहे रक्तें भरे, धरेसि वरी;
पुनरपि सावध होवुनि, तुरवाया परमदा, गदा चि धरी. २३४
क्षिप्र अनुह्रादावरि हरसख तो त्या गदेसि भिरकावी;
कीं, अचळीं अशनि जसी, ती त्या अरिच्या उरांत शिरकावी;
शीघ्र महाकृत्येनें कृत्येतें जेंवि जाणता फिरवी.
स्वगदेनें धनदगदा फिरवुनि, तो असुर जय जगीं मिरवी. २३६
धांवे त्या चि गदेनें ताडाया धनद पुनरपि तयातें,
समजोनि गुरु हि, कोपें हाणाया जेंवि कुनर पितयातें. २३७
सुगुरु गिरिशिखर उपटुनि, सुपटु निकामप्रताप[2] तो अहित
प्रह्रादानुज धांवे, योजुनि धनदक्षय क्षमारहित. २३८
धरले शिवसख पुनरपि येतां अरि कीर्तितें बिटाळाया,
कवि काळा प्रतिकूळा, देतो अलकेश[3] तेंवि टाळा[4] या. २३९
झाला निरुपम राज्या! वरुणासीं विप्रचित्तिसीं झगडा.
ते स्वभटांसि म्हणति, 'हूं! दगडा घन[5], तेंवि परबळा रगडा.'
शर विप्रचित्तिचे खर शकला वारावयासि न जलेश[6];
सिंहापुढें प्रबळ हीं न समर्थ जसा रणासि गज लेश. २४१
मुख विप्रचित्तिचें रविमंडळसें, त्याकडे पहावेना,
सर्वेश्वरतेज तसें वरुणा तत्तेज तें सहावेना. २४२
वरुणाचा धीर, करीं धरितां तेणें महापरिघ, सरला;
उत्साहनगीं चढला होता जयकाम हा, परि घसरला. २४३

---

१ उत्तरदिशापतीला (कुबेराला) २. अत्यंत पराक्रमी. ३ अलका नगरीचा स्वामी (कुबेर). ४. झुकांडी. ५. घण, हातोडा. ६. वरुण.

शस्त्रास्त्र, जरि सरथ सकवच, जरि बहु कृती, परि सहाय
झाले निश्चेष्ट भयें त्रिदश, म्हणाति, देखतां अरिस, 'हाय !.' २४४
झाला न एक शक्र चि, धरिति भयाची च सरणि वरकड, बा !
केले त्या अरि[1]परिघें पडुनि अयुत वीर धरणिवर कडबा. २४५
तो चि पुन्हां त्या असुरें वरुणावरि टाकिला परिघ, राया !
होय वि[2]शीर्ण, शरीरीं न करि तिळसम हि तसा परि घरां[3] या.
जे परिघकण उसळले, दिसले विस्पष्ट काजवे चि तसे,
[4]गमला, विटोनि, तेज, न करितां निज मुख्य काज, वेचितसे.
एकवटुनि कटक, म्हणे वरुण, 'करा वीर हो ! जसें कथितों,
मारा असुरांसि तुम्हीं, हा मीं या विप्रचित्तितें मथितों.' २४८
जें पतिवच अनुग, श्रुतिवच धरितिल कां न विप्र चित्तीं तें ?
सोडुनि भय, गांठिति ते त्या असुरांतें सविप्रचित्तीतें. २४९
डसले सागरवासी आ[5]शीविष कडकडोनि स[6]द्रींतें,
सुखाभिभक्त समयीं वेचिति, जें धन असेल पदरीं, तें. २५०
जे उग्र असुर होते, दंश करुनि मारिती अहि तयांतें,
वाराया, माराया, बा राया ! न शकले अहित यांतें. २५१
शस्त्रें धरूनि करिती युद्ध हि, डसती हि, ते महासर्प;
तो विप्रचित्ति त्यांचा गरुडास्त्रें संहरी रणीं दर्प. २५२
सर्पादिक्षय होतां, असुर वधी बहु सकोप सलिलेशं[7];
बळ विप्रचित्ति याचें, धर्माचें जेंवि नुरवि कलि लेश. २५३
बहु विप्रचित्तितें भी वरुण, न भीता त्रि वरकडा खात्या,
न वसों दे असुराचा युद्धाध्वर[8]भूमिवर कडाखा त्या. २५४

---

१. शत्रुरूपी कोयत्यानें, खुरप्यानें. २. छिन्नभिन्न, चूर्ण. ३. क्षत–**पंत.** ४. [ तो परिघ ] निज मुख्य काज ( शत्रुहनन ) न करितां, विटोनि ( स्वतः च निर्वीर्य होऊन ) तेज वेचितसे ( फुकट घालवित आहे ) [ असा ] गमला ( वाटला ) ५. सर्प. ६. सज्जनाच्या शत्रूंना ( असुरांस ). ७. वरुण. ८. रणभूमीवर अध्वर—यज्ञ.

अरितेज, जलेश्वरता[1] आंगीं सत्या[1] असोन, सोसेना;
एकाकी च हरिकडे जाय, म्हणे, तो, 'असो, नसो सेना.' २५५
भगवान् वह्नि क्षोभे, त्याचा मारुत सखा तया भेटे,
सहसा सुरशत्रूंच्या सैन्यामध्यें चहूंकडे पेटे. २५६
व्यापुनि कटक चहुंकडे, अत्युग्र ज्वाळ धडकले वरते.
कोणां ही असुरांचें राहों देती न धड कलेवर[2] ते. २५७
ते असुर पराभविले प्रल्हादप्रमुख सर्व ही दहनें,
सर्वत्र पेटलीं तीं कटकें, दावानळें जसीं गहनें. २५८
पेटे ध्वज, रथ, कार्मुक कोशी[3], शरधि[4], चर्म, वर्म[5], पर्याण[6],
पर म्हणति, 'हाय! आतां या कल्पांतांत काय कल्याण?' २५९
तत्काळ भग्न केले, जे तेजस्वी, अशेष, ही पर ते;
बहु लागले पळाया मोटे मोटे; न एक ही परते. २६०
प्रकट करिति, मय, शंबर, दोघे पर्जन्य वारुणी माया;
वा! या महाप्रयोगें झाला मंदार्चि[7] अग्नि तो, राया!. २६१
होता मंदज्वाळ, स्तवुनि बृहस्पति म्हणे, 'अगा धात्या!
सुर रक्षीं, प्रकट करीं, आहे निजतेज जें अगाधा त्या.' २६२
जाणों[8] न स्तवन तया बळद खळदमार्थ सर्पि तें, दे हां,
होय पुन्हा दीप्त शिखी, स्तोत्रें अमृतसें चि तर्पितें देहा[9]. २६३
पहिल्याहूनि अधिक तो असुरांतें देवं[10]रंजना भाजी,
सदरिक्षयार्थ दहना शक्ति भजे ती च, कंजनाभीं[11] जी. २६४
झाले दग्धांग असुर, मग गेले शरण सर्व ही बाळितें;
प्रल्हाद म्हणे, "रक्षीं, शिखितेज त्वज्जना बहु च्छळितें. २६५

---

१. खरें खरें जलाचे स्वामित्व—निर्णय०. २. शरीर. ३. म्यान. ४. भाता. ५ कवच ६. खोगीर ७. अर्चि=ज्वाला. ८. मला वाटतें, यानें त्याला तें 'स्तवन' दिलें नाहीं, तर शत्रूंचा फडशा उडविण्यास्तव बळ देणारें असें 'तूप च' दिलें. ९. अमृतानें जसा देह तृप्त होतो तसा तो स्तुतीनें होतो १० देवांच्या संतोषार्थ. ११. विष्णूला.

तूं अग्नि, वायु, भास्कर, सलिल, शशी, व्योम, भूमि, नक्षत्रें,
झालासि, दिशा, विदिशा; हें मेळविलें कधीं च न क्षत्रें. २६६
झालासि सिद्ध सुतपें तूं भूत, भविष्य, वर्तमान; तुला
विधिदत्त वर असे कीं, 'त्रिजगीं या त्वन्महोदया न तुला.' २६७
ईशत्व, वशित्व, अमित शुभ बळ, सर्वेश्वरत्व, तुज आलें,
इंद्रत्व हि, अमरत्व हि, समरीं अपराजितत्व ही झालें. २६८
शूरत्व रणांत, महायोगीश्वरता, प्रभुत्व जें काय,
अमितत्व, लघुत्व तुझें, सत्वगुणांचा निवास तूं राय. २६९
शक्रातें, देवांतें भंगुनि, तूं विश्वपाळ हो चि कसा;
अहितांच्या नयनीं तव भाग्योदय सर्वकाळ हो चिकसा. २७०
विधिनें वरदान दिलें जें तुज, तें सर्व सत्य जाणावें.
सुरपतिहृतनिजपूर्वजराज्य पुन्हां त्वां जिणोनि आणावें." २७१
प्रह्लादाच्या वचनें बळि होवुनि परम हृष्ट, विजयाला
पूजुनि विप्रांसि, निघे; वर्धविती सर्व वीर निज याला. २७२
शुक्रप्रमुख मुनीश्वर बहु आशीर्वृष्टि मंगळें करिती,
असुरेश्वरप्रयाणीं रणतूर्यध्वनि दिशा दहा भरिती. २७३
गुरुवर दे त्या बळिला, रत्नमया जेंवि अर्क तेज नगा,
रूप विलोकुनि, करिती, 'जय होतो,' हा चि तर्क ते जन, गा !.
पाहे निजबळ दहनें विसकटिलें फार, राहिलें दभ्र;
जैसें वातें वा ! तें गगनांत ध्वस्त होतसे अभ्र. २७५
सांवरले क्षीण पुन्हां त्रिदश सबळ पावकाश्रयें सर्व;
सिंधूचे ओघ जसे बहु उसळति भेटतां महापर्व. २७६
बळि सुरकटकीं वर्षे बहु नाना शस्त्र, करि तदा 'हा !' तें;
सुरला कल्पांतींचा दहन जसा, तेंवि करित दाहातें. २७७
शक्राहुनि इतर सबळ सुर बळिनें भंगिले रणीं सर्व,

---

१ दुसऱ्यास वश करण्याची शक्ति ही अष्टसिद्धींपैकीं एक २ अभिनंदन करिती, उत्तेजित करिती ३. तूर्य=वाद्यें. ४. पौर्णिमा व अमावास्या.

ते त्या अतिशक्तिपुढें, प्रांशुपुढें वा! जसे नृपा! खर्वे. २७८
वदले सुर शक्रातें, 'देवेंद्रा! दव जसा अरण्यातें,
बळि तेंवि तव बळातें, रक्ष, तुज प्रार्थितो शरण्यातें.' २७९
देवुनि अभय, अशेषस्वबळसहित अहिततिमिरभानु निघे;
शतरविसमप्रभ प्रभु बळिवध हृदयांत शक्य मानुनि घे. २८०
सप्तर्षिसुरर्षिस्तुत हरि धरि अरिवरवधार्थ उत्साहा;
कीं, मानधना स्वजनानवनें बहु म्हणविती च कुत्सा 'हा!' २८१
दशशतलोचन, शतमख, शतपर्वप्रहरण, त्रिदशपाळ,
शतबाहु, शतशिरोधर, योगी प्रभु होय तो असुरकाळ. २८२
अदितिप्रियसुत परबळ उडवी, बुडवी भयांत समरीं तें;
गांठी बळितें, द्याया निजविजयें परम हर्ष अमरींतें. २८३
अरिकरिहरि हरि कोपें गांठी बळितें रणांत मग, राया!
तो हि महामगर तया तुमुलरणसरोवरांत मगरा या. २८४
स्तवनें प्रबोधिला तो, पवनें दावाग्नि, तेंवि आज्यानें,
आरंभिलें तयासीं समर समरयें चि देवराज्यानें. २८५
राज्यांसीं रण होतां, ते देवासुर हि करिति कळहातें;
मुखपद्म त्रैलोक्यश्रीनें धरिलें जयांत तळहातें. २८६
खरशस्त्रवृष्टि बळिवरि तो देवेश्वर महातपा सोडी,
झांकाया दृष्टि जसी मत्तगजशिरीं महात पासोडी. २८७
बळिवर बळि वरशस्त्रें खंडी तत्काळ वज्रभृन्मुक्तें,
युक्तें वाक्यें वादी प्रतिवादिमुखोद्गतें जसीं उक्तें. २८८
अग्न्यस्त्र शक्र सोडी त्यातें असुरेंद्र वारुणें वारी,

१. उच मनुष्यापुढें २ ठेंगू ३ स्वजनाचें अवन (रक्षण) न केल्यानें. ४. शतपर्व (वज्र) आहे आयुध ज्याचें तो. ५ ब्रह्मदेवानें ६ सारख्या च वेगवानानें. ७ त्रैलोक्यलक्ष्मी [ चिंताक्रांत होत्साती ] तळहातावर मुखकमल टेंकून बसली ८. इंद्रानें सोडिलेलीं

अरिहस्तें देवविलें प्राणां ज्या परमदारुणें वारी. २८९
तें बळिचें अत्यद्भुत बळ झालें देवसैन्य कांपवितें,
मग नगभेत्ता न धरिल वाराया स्वजनदैन्य कां पवितें? २९०
परजी परजीवनहरवज्रातें शक्र बळिस माराया,
वाराया यातें तों झाली वाणी नभांत, बा राया! २९१
'शक्रा! परत, वरतपा हा न कराया विनाश शकसील,
आद्य हरि च जिंकिल बळिहरिस, इतर याविना शशंकशील.
अत्यद्भुत तप याचें, अन्यत्र, त्यजुनि सत्य, हा न रते.'
वर तेज अधिक पेकुनि, बळितें सोडूनि, देवराट् परते. २९३
बळिजयतूर्यरव असुरलोकातें द्यावया सुख निघाला,
सुर म्हणति, 'साहिल कसा स्वस्वर्गस्थिति सुमुत्सुखनि घाला?'
बहुसाधुवादजयजयकारस्तुतिलाभ जाहला बळिला,
त्रिजगद्राज्यपद मिळे नव मानसनीरुह जसें अळिला. २९५
इंद्रपदीं प्रल्हाद प्रमुखाप्तजनासमेत तो कविनें
अभिषेचुनि शोभविला कर देउनि पद्म या! जसा रविनें. २९६
सद्धर्मन्यायपथें होवुनि देवेंद्र, बळि करी राज्य,
आज्य उंवरितपरातें पाववि, तो स्वप्रजां सुख प्राज्य. २९७

---

१ इद्रानें सोडलेल्या अग्न्यस्त्राचें बळीनें पर्जन्यास्त्र सोडून निवारण केलें, यावर पंत म्हणतात –परमदारुणें अरिहस्तें ( इद्राच्या हातून–इद्राच्या अग्न्यस्त्रयोजनेनें ) ज्या [ बळीच्या ] प्राणा ( प्राणांस ) वारी देवविलें ( पाणी सोडविलें–ज्या प्राणाची आशा सोडविली होती ) [ त्या प्राणास ] अरिहस्तें ( बळीकडून ) परमदारुणे ( वारुणास्त्रानें ) [ पुन. ] वारी ( जीवन–जल ) देवविलें, ( बळीनें वारुणास्त्रानें अग्न्यस्त्र शांत करून आपल्या प्राणास जीवन च जणूं दिलें–आपल्या प्राणांवरील सकट वारिलें ). २. इंद्र. ३ सशाच्या स्वभावाचे. ( भित्रे ). ४. देवांचा राजा इद्र. ५. उत्तम आनंदाची चांगली खाण च अशी जी आपली स्वर्गांतील स्थिति ( वसति ) ती हल्ला कशी सहन करील ? ६ मानससरोवरातील कमळाला. ७. शुक्राचार्यांनें. ८. हस्त–किरण. ९. तापकऱ्याला.

पद्मकरा श्रीदेवी आली भेटावया स्वयें बळिला,
अत्यद्भुत हें, यावी नलिनी भेटावया जसी अळिला. २९८
'कनककशिपुपरिस अधिक अससि,' असें ती म्हणे तया लुबरी,
तरि च 'चपळा' असें या श्रीस म्हणति, हे नव्हे दयालु बरी.
स्तवन बहु करुनि, शिरली श्रीदेवी प्रेमयुक्त बळिदेहीं;
गुरुचा प्रसाद ज्यावरि, त्याच्या ये असि च मुक्ति ही गेहीं. ३००
मातेतें शक्र म्हणे, 'मृत्युसम चि भंग अदिति! हा समज,
असकृत् सुहृदुक्त हि न, स्वास्थ्यप्रद[1] होय सोदितिहास[2] मज.'
ती जाय शरण ससुता, जाया निःशेष ताप हा, पतितें;
कीं, सत्पुरुषा नमितां न म्हणावें, स्मरुनि पाप, 'हा!' पतितें.
स्त्रीपुत्रांसह कश्यप कळवी, जावूनि शरण, आज्याला;
विधि त्यासि म्हणे, "विनवा पावुनि यदनुग्रहासि हा ज्याला[3].
सुतपें क्षीराधितीरीं मधुकैटभसूदनासि आराधा,
हरिल हरि लक्ष दुःखें, त्याच्या सेवुनि यशा[4] चि सारा, धा[5].
आराध्या सारा ध्या, त्या वरदवरा नमूनि, परभागा
प्रभुसि,अदितिकश्यप हो!'अस्मत्सुत हो,' असा चि वर मागा."
नमुनि ब्रह्मपदातें, क्षीराब्धिच्या उत्तरीं तटीं गेला,
ठेला अमृतस्थानीं मुनि, विधिनें बोध या जसा केला. ३०६
कश्यपमुनि, अदिति, तिचे सुत दिव्य सहस्र अब्द ते तपले;
जपले नामसुमनुतें[6], यमनियमांतें सदैव ही जपले. ३०७
कश्यप करी स्तव, वदे नामें जीं भव्य, तीं च दोन शतें;
कविशत बहुवत्सर जें सुग्रंथांच्या शकें वदों न शतें. ३०८

---

१. शांति देणारा २ साधूनीं कथन केलेला पूर्वेतिहास; चांगल्या लोकांवर अशीं च पूर्वी संकटें आलीं, परंतु अखेर त्यांचे निवारण होऊन संकटें आणणाराचा च नाश झाला, वगैरे संकटकालीं माझें समाधान करण्यासाठीं सांगत आहां त्या गोष्टी. ३. जीवत राहिला. ४. श्रेष्ठ अशा [यशास]. ५ तृप्त व्हा ६. नामरूपी उत्तम मंत्राला.

न दिसे विश्वगुरु, प्रभु सप्रेम म्हणे तयासि परि 'मागा';
कश्यप, अदिति विधिकथित वर मागति त्या स्वकल्पपरमागा.
'हो पुत्र, वरदवरदा! भेट कसा, तापले असों देहें;
रूपीं तुझिया चि सदा मन,' मागति 'आपले असोंदे हें.' ३१०
अदितिसह कश्यपातें विष्णु म्हणे, 'शीघ्र पुत्र बा! होतों,
तुमचें नेत्रयुग सुखें, जोंवरि इच्छा, यथेष्ट पाहो तों. ३११
जा सुर हो! स्वस्थ रहा; तुमचा मीं सर्वथा अनुज होतों.'
ऐसें वदे दयामृतसागर, जों प्राण, गा मनुज हो! तों. ३१२
'तुमचे शत्रु मजपुढें, घन वाता काय? न उरतिल काहीं;
करिजेल परवधूंचें विरहें कां दीर्ण न उर तिळकांहीं? ३१३
लाविन पुन्हां तुम्हांला यज्ञाचे भव्य भाग भोगाया,
लक्षायास हरि चरित माझें, व्हा सावधान लक्षाया. ३१४
जाणा या साध्वीच्या आलों हा देवदेव मीं पोटा;
तो टाका खेद तुम्हीं, बंधु अजित काय हो! जया तोटा? ३१५
सर्व सुधी स्वस्थ असा, हे आर्या, हा हि आर्य, साधि न हो-
परदुष्कर, परि तुमचें मीं लीलेनें चि कार्य साधिन हो!' ३१६
प्रभुतें वंदुनि कश्यप सुतदारसहित निजाश्रमा आला,
प्रभु हि अदितिच्या उदरा, हर्षोदय सर्वसुरमनीं झाला. ३१७
दिव्यसहस्राब्द धरी अदिति जगद्भव्यहेतुगर्भातें,
प्रकटे मग नुरवाया प्रभुपावक दैत्यगर्वदर्भातें. ३१८
म्हणती, 'मूर्त प्राशूं अमृत, असों परम चिर तृषित, यातें.'
वंदिति; सादर पाहति बहु भाग्यें सर्वसुरऋषि तयातें. ३१९

---

१. [ दिसला नाहीं ] परतु [ म्हणाला ] २. आपल्या श्रेष्ठ कल्पवृक्षाला. ३ ? ४ तिळांजलीच्या तिळांनीं. ५ 'भक्षाया' हा पाठ दामयमक वगैरेच्या दृष्टीनें बरा दिसतो; तथापि मूळ प्रतीप्रमाणें 'भोगाया' हा पाठ दिला आहे. ६. लक्ष आयास ( संकटें, कष्ट ) ७. नाहींसें करितें. ८. सचिंत, चिंतातुर.

हाहा, हूहू, नारद, तुंबुरु, गंधर्ववर तदा गाती,
नाचति वराप्सरा, सुखवेलौषधि[1] हरि मनोगदागा[2] ती[3]. ३२०
झाले परमप्रमुदित रुद्रादित्यादि सर्व ही सुर ते,
मेघश्यामीं नसते रत, तरि त्या संकटीं कसे उरते? ३२१
त्यापासुनि कवि बहुधा बहु धोती 'दीनबंधु' या नावें.
मानावें हें सत्य, प्रभुचें यश सर्वकाळ वानावें. ३२२
प्रभुतें वंदुनि, पाहुनि, झाला आनंद फार बा! धात्या,
देवांसि म्हणे, 'साक्षात् सत्पति हा विष्णु हरिल बाधा त्या.'
श्रीवामन वामें नयन लक्ष्मीचें पुण्यकीर्ति जो स्फुरवी,
सुरवीरांसि म्हणे तो, 'वर मागा, मम कथा व्यथा तुरवी.' ३२४
इंद्रप्रमुख अखिल सुर जोडुनि कर, म्हणति, 'वामना! भ्रात्या!
बळिव प्रसादवातें, गेल्या सोडूनि कामनाभ्रा[5] त्या. ३२५
अधिकार दिला होता त्वां जो आम्हां सुरांसि हव्याचा,
कव्याचा पितरांला, ज्यांत सदा प्राज्य लाभ भव्याचा. ३२६
तो अधिकार विधिवरें विधिनें हरिला करूनि सुतपाला,
बळिविक्रम[6] वात, तया साहेना सर्व अदितिसुत पाला. ३२७
हरिलें त्रिभुवनराज्य प्राज्य बळें जाण बाणजनकानें,
तें सोडवूनि द्यावें; ऐको हे तव सुकीर्ति जन कानें. ३२८
सांप्रत करितो, अरि तो आपण होवूनि इंद्र, हरिमेधा[7];
कविमेधेतें[8] पाहुनि, गुरुची बहु लाज आज धरि मेधा. ३२९
बळिपासुनि सुरराज्य प्रभुवर्या! व्हावया सुखें मुक्त,
चिंतावें त्वां वरदें सर्वज्ञें सिद्धिकारि जें युक्त.' ३३०
विष्णु म्हणे, 'तरि सुर हो! व्हावा आचार्य गुरु, न लाजावा;
बळिच्या हयमेधातें, घेवुनि शिष्यास हा मला जावा.' ३३१

---

१. सुखदायक वेल हो च औषधी २ मनातील रोगराशीला ३ तृप्त होती. ४. डावा. ५. इच्छारूपी मेघाला ६. बळिपराक्रमरूपी. ७. अश्वमेधाला. ८. शुक्राचार्यांच्या बुद्धिमत्तेला.

होय त्रिजगद्गुरुच्या आज्ञेनें गुरु तदीय गुरुसा जो,
तद्यश विश्वीं होउनि, सर्व गुरु यशांत कां न उरु[1]सा जो? ३३२
धरुनि कमंडलु, मौंजी, छत्र, ध्वज, दंड, अजिन[2], बटुता, तें
ब्रह्म निघे, द्रुहिण म्हणे, ‘रचिला सदुपाय कार्यपटु तातें.’ ३३३
भटगुप्त[3] यज्ञवाटद्वारें[4] मोहुनि सलील शिरला, हो!
ब्रह्मादि म्हणति, ‘ज्याचें पदपंकजरज सकृत् स्वशिर लाहो.’
जावुनि सभेंत वर्णी बळि, मुनिजन, यज्ञवाट, वामन या;
कपट करि तद्धिता, जे देती अनयज्ञ वाट वाम नयां[5]. ३३५
यज्ञप्रयोगविषय प्रभु बळिच्या यज्ञमंडपीं काढी,
कविस हि निरुत्तर करी, अमृत चि सभ्या जनासि तें वाढी.
श्रौती, शास्त्री, जिंकी वादांत, प्रकट करुनि पटुतेतें,
खंडित हि पंडित हित चि मानिति न म्हणति ‘बटूक्त कटु’ ते ‘तें.’
चालों दे तो कांहीं सर्वसभासद कविप्रसर[6] बटु न,
घे पांडित्यकरानें बळिचा महिमा सविप्र सरवटुन[7]. ३३८
वर्णुनि पांडित्य, म्हणे बळि, ‘केला त्वां बरा जय ज्ञानें,
यश या सर्व मिळविलें हें कोणा हीं न राजयज्ञानें. ३३९
देवर्षिकुमार असति बहु, परि तुजसम नसे चि बा! इतर,
जित रविविधुवह्नि तुझ्या या तेजें, धन्यतम तुझे पितर. ३४०
न कळे तूं कोण, असो माझें तुजकारणें बटो! नमन,
वद, काय करूं? भुललें भवदागमनोत्सवें नटोन मन.’ ३४१
वामन म्हणे, ‘नको मज राज्य, स्त्री, रत्न, यान, हें कांहीं;
विषयार्थ इंद्रियें तिळमात्र करिति राजया! न हेंका हीं. ३४२
अससिल तुष्ट जरि, तुझी मति धर्मीं सादरा असेल जरी,

---

१ श्रेष्ठ २ मृगचर्म. ३. योध्यांनीं रक्षित ४ वाट=स्थान ५. जे अनयज्ञ वामनया (वक्रनीतीला) वाट देति (अंगिकारितात) तद्धिता कपट करी=त्यांच्या हिताविषयीं खोटा कळकळ दाखविता झाला—निर्णय० ६. शुक्राचें वर्चस्व. ७. साफ पुसून; निपटून.

गुर्वर्थ अग्निशरणाकरितां दे त्रिपदमात्र भूमि तरी.' ३४३
हास्य करूनि बळि म्हणे, 'विप्रेंद्रा! काय तुज पदें तीन?
घे शतलक्ष पदें भू; अल्पार्थी उक्ति जी वदें ती न.' ३४४
शुक्र म्हणे, 'वंचाया तुज आला कनककशिपुचा काळ,
देवूं नको चि राया! मायावी विष्णु हा, नव्हे बाळ. ३४५
सर्वस्व तुझें हरुनि, प्रिय हा करणार, जाण, शक्राचें.
झाला कपटें बटु, हें हरिल सकळ भाग्य दैत्यचक्राचें.' ३४६
चिर चिंतुनि, बळि बोले, "बहुभाग्यें त्रिभुवनीं मला मात्र
झालें प्राप्त सुदुर्लभ अत्यद्भुतपुण्यकीर्ति हें पात्र. ३४७
विमुख न व्हावें; पात्र च्छात्र, असो कीर्तिधन; न वारावा;
गुरुजी! 'कुरु जीवें,' म्हणा; मोर अनुसरो चि घननवारावा."
बळि मानीना, झाला तो बहु, मोरूनि हांक, विप्र कटु;
विष्णु म्हणे, 'शिष्याचें अत्यद्भुत सत्व हा कवि प्रकटु.' ३४९
पूजुनि, जळ सोडाया घे असुरोत्तंस हेमभृंगार;
श्रीवामन कर पसरी, श्रीचा ज्याच्या अधीन शृंगार. ३५०
असुरकुळक्षयकर कर करि करिवरवरद तो पुढें बळिच्या,
प्रह्लादोक्ति हि त्याच्या, जसि गंधफळीं नये मना अळिच्या. ३५१
बळि मनिं म्हणे, 'यश उरो, जीवितसह भाग्य सर्व हा निपटु,'
त्रिपदक्षितिदानोदक दे, घे सुरशत्रुगर्वहानिपटु. ३५२
त्रिपदक्षितिदानाचें पडतां बळिनें दिलें करीं तोय,
वामन तो चि अवामन तत्क्षण जनमेजया! नृपा! होय. ३५३
अमृतें तरुसा, वामन दानजळें क्षिप्र वाढला गावा;
या महिम्या दोष, जसा वज्रा शिखरी, न बाढ लागावा. ३५४

---

१. अग्निशाळेकरितां २ कर (दान दे); चिरायू हो. ३. मेघाच्या नूतन गर्जनेस.
४. कानीकपाळा ओरडून. ५ सोन्याची झारी. ६. रसहीन चांफ्याची कळी.
७. उच्च. ८. पुष्कळ

प्रभुनें निजरूप अखिलदेवमय प्रकट करुनि दाखविलें.
तें अमृत चि सुजनाला, कुजनाला स्पष्ट विष चि चाखविलें.
भू पाद, मस्तक द्यौ[1], नेत्रें रवि चंद्र, वदन वह्नि, असें
रूप प्रभुनें धरिलें, जें गात्यांतें म्हणे, 'उगा चि असें.' ३५६
प्रभु चरणकरतळांहीं असुरांचें तेधवां करी मथन,
तन्नामाकारांचें किति विस्तरभीरु मीं करूं कथन? ३५७
दिसले वाढत असतां चंद्रादित्य स्तनांतरीं[2] हरिच्या,
मग ऊरुजानुदेशीं[3], सुकवींच्या वर्णनोक्ति यापरिच्या[4]. ३५८
यापरि बा! परिस नृपा! मथुनि महोद्दाम दैत्यचक्रातें,
लीलेनें लोकत्रय जिंकुनि दे देवदेव शक्रातें. ३५९
बळिला म्हणे त्रिविक्रम[5], 'साप्त अधिष्ठुनि सुखें रहा सुतळीं[6];
सुखमय चि नित्य तूं हो, कनकरसें ओतिला जसा पुतळा. ३६०
न करीं शक्रद्वेष, प्राप्त तुला सर्व भोग होतील;
बा! एकनिष्ठचातकवदनीं घन कां न अमृत ओतील? ३६१
बहु हर्षें, खेद मनीं न धरी प्रह्लादतनयसुत लेश;
केला प्रभुनें, शिकवुनि निजवदनें धर्म[7] सनयें, सुतलेश. ३६२
प्रभु पाशबद्ध बळितें स्थापुनि सुतळीं, निजालया गेला;
मग नारदें अनुग्रह, त्या पाशांतुनि सुटावया केला. ३६३
"सर्वस्वदान दिधलें, बळि न म्हणायासि योग्य यास्तव 'हा!'"
नारद असें विचारुनि, कथि हरिचा, प्रार्थितां चि, या स्तव हा.
तो मोक्षविशंक स्तव, आरंभ 'नमोऽस्त्वनंतपतये' हा,
ज्याच्या पाठें न मुखा, होतां भगवत्पदासि नत, ये 'हा!' ३६५
स्तवपाठ बळि करी, तों सेवकचातककिशोरतोयद या
मुक्त कराया धाडी गरुडातें, बहु मनांत होय दया. ३६६

---

१. आकाश. २ छातीवर. ३ मांड्या व ढोंपरें याजवर. ४ या प्रकारच्या. ५. विष्णु, विक्रम=पाऊल. ६. ह्या नावाच्या पाताळलोकाला. ७. नीतीसह धर्म.

सुतळीं जाय खगोत्तम, कापावें ज्यासि अहितसेनाहीं,
दोष जसे विष्णुगुणें, गरुडें झाले चि अहि तसे नाहीं. ३६७
फणिपाशमुक्त बळितें गरुड म्हणे, 'असुरनायका! अजितें
आज्ञापिलें असें तें परिस, प्रणतासि जें शिवें सजितें. ३६८
होवुनि मुक्त वसावें सुतळीं त्वां स्वजनसह, न लाजावें,
येथूनि दोन कोश हि न च, न गणुनि सर्वथा मला, जावें. ३६९
तूं लंघिसिल समय[२] जरि, तरि दंडाया नको मला वुशिर;
शतधा करिन, कठिनपण पण मच्चक्रा तुझें न लावु शिर.' ३७०
त्यासि बळि म्हणे, 'प्रभुच्या मान्य असे दास हा निरोपातें,
कल्पावा भाग मला, होवूं द्यावी न हानि रोपातें.' ३७१
गरुड म्हणे, 'जे करितिल यज्ञ विधिरहित, न देव घेतील;
[३]कीर्तित दानादिसुकृतभाग हि, ते तुजकडे चि येतील. ३७२
यज्ञादि भाग यापरि तुज जगदीशें चि योजिला आहे,
स्वस्थ रहा, तूं प्रभुची आज्ञा विसरूं नको बरें बा! हे. ३७३
होयिल लोकीं स्वत्कृत अत्युत्तम कल्पनगसम स्तव हा,
देहीं सत्वगुण, सुखी व्हाया, फणितल्पनग समस्त वहा.' ३७४
सांगुनि ऐसें बळिला, गेला त्यातें पुसोनि पक्षिवर;
न शकति जयापुढें पर कोणी हि करावयासि अक्षि वर. ३७५
लिहिला वामननामा हा प्रादुर्भाव, यांत रसिकांहीं
द्यावें मन, रुचि आहे, व्हावा परम [४]प्रमोद, असि कांहीं. ३७६

---

# अध्याय एकुणपन्नासावा.

जनमेजय नृपति पुसे, 'कृष्णप्रभु शंकरासि आराधी,
तें सांग मुने! माझी इच्छितसे या हि आजि सारा धी. १

---

१ कल्याणानें २ करार. ३. प्रसिद्ध ४. आनंद.

आराध्यें आराधक हर कां आराधिला? सदाराध्या
या पूर्णा याचें मन कां प्रेरी कीं, शिवा सदारा ध्या?' २
श्रीव्यासच्छात्र म्हणेः–श्रद्धेनें पुससि, म्हणुनि तुज राया!
कैलासाचळयात्रा कथितों सज्जनमार्ग उजराया. ३
हरिहर हे सर्वोत्तम एक चि, बा! यांत लव नसे भेद.
वेद प्रमाण येथें, या चि ज्ञानें नृपा! सरे खेद. ४
ज्वलनीं ज्वलन, जळीं जळ, तेंवि हर हरींत, हरि हरीं जाण.
देहद्वय धरि योगी जैसें तैसें चि हें, तुझी आण. ५
कोठें ईश्वरता हे, कोठें धरितात जीवता, राया!
भजती अन्योन्यातें, लीळेनें दास, जीव ताराया. ६
हरि तो हर, हर तो हरि, एक चि पर पुरुष नित्य, नवे[1] दोन;
हृदयीं तत्व धरावें, मंदापासीं कदापि न वदोन. ७
हरिहरवृत्त महाद्भुत, परिस, नृपा! सांगतों तुला आतां,
पापें सरती, तरती सर्व हि जन, ज्यासि ऐकतां, गातां. ८
नरकाद्यसुर, नृप हि, बहु वधितां थोडे चि राहिले असतां,
श्रीवैदर्भी प्रार्थी कृष्णातें द्वारकापुरीं वसतां. ९
'स्वपदाश्रितकल्पतरो! तुज सर्व हि अर्थ भक्तजन याची,
आहे वांछा त्वत्सम सद्गुणसंपन्न साधु तनयाची.' १०
कर जोडुनि, एकांतीं सुयशःकर्पूरपूरिता कदली,
पदलीनदृष्टि, साध्वी, देवी, ती रुक्मिणी असें वदली. ११
कृष्ण म्हणे, 'देवि! तुला देयिन सुतरत्न, यत्न करुन, सती!
आराधिन शंभुचरण, ऐसे कल्याण कल्पतरु नसती. १२
जो सुखदायक, धरणीधरनायक, साधुसेव्य कैलास,
प्रभुतें आराधाया जातों त्या पुण्यपुंज शैलास. १३
आर्जविन सिद्धिसद्मा, शिवपदपद्मा, करुनि सुतपा, तीं;

१. नव्हत.

पावसिल, पाहतां जो स्तब्ध करिल, मन हरूनि, सुत, पातीं.[1]
करिल प्रसाद भक्तीं प्रभु हि, प्रभुची हि ती उमा रमणी,
देयिल तुज सुजनप्रियकर शंकर वांछिला कुमाररमणी. १५
वंदुनि सांबशिवातें, बदरींत तपेन, परिस, रसना मीं
योजिन गुणगण गाया, प्रभुच्या अमृताहिपरिस रस नामीं.'
ऐसें बोलुनि रात्रौ निजला निजला[2]भपूर्ण पर्यंकीं,
जेणें लक्ष्मी उतरुनि, मुक्ति बसविली वळें चि अर्यंकीं.[3] १७
प्रातःकाळीं च करी स्नान, जप, ध्यान, दान, जें कार्य;
प्रस्थानप्रारंभीं प्रभु पूजी द्विज, तपोनिधी, आर्य. १८
आस्थानमंडपीं[4] मग बैसे, बळभद्र, उग्रसेन, तथा
कृतवर्मा, सात्यकि हे बाहे, ज्यांची जगत्पवित्र कथा. १९
उद्धव शुद्ध वदाया, बहु पटु, परहृदय जो विदाराया,
त्यातें आणवि जाणवि पुररक्षण, नीतिकोविदा! राया! २०
"परिसा हो आर्य! बळप्रमुख तुम्हीं, उद्धवा! बुधा! परिस,
जाणतसां बाळपणापासुनि मम यत्न मारितां अरिस. २१
साक्षी सर्व अहां त्या तैश्या अत्युग्रपूतनागतितें,
होते भयंकरत्वें 'स्वगुरु' म्हणत काळदूत, नाग, तितें. २२
अघ, बक, अरिष्ट, केशी, कंस वधुनि, मगधराज[5] मारविला,
वधिला सृगाळ, नरक हि, जो लावी 'हा!' म्हणावया रविला.
उरला अद्यापि सखा नृप पौंड्रक वासुदेव नरकाचा,
हा द्रोणशिष्य भार्गवसम, या साहेल कोण नर काचा? २४
संतत माझा द्वेष्टा, अतिकुशळ, ब्राह्म अस्त्र जाणतसे,
याचे जसे, न सांप्रत कोणाचे ही महोग्र बाण तसे. २५
छिद्र सदैव पहातो माझा अत्यंत शत्रु हा नीच,

१. ज्या पुत्राला पाहता च डोळ्यांचीं पातीं लवण्याचीं बंद राहतील, असा पुत्र तुला मिळेल. २. आत्मतृप्त. ३. शत्रूंच्या मांडीवर. ४ सभामंडपांत. ५. मागधदेशाधिपति जरासंध.

पावेल रंध्रें[1] जरि, तरि होयील द्वारकेसि हानी च. २६
सिद्ध असा, पर जेणें यदुवंशाश्रयपुरा[2] न बाधे या,
कीं आधारा होतें जें भय तत्काळ तें चि आधेया[3]. २७
मीं तों कैलासातें जातों श्रीशंकरा पहायाला,
कांहीं काळ ध्यानीं स्थिर किंचित्कारणें रहायाला. २८
मीं नाहीं यांत, असें कळतां चि प्रबळ बहु बळासहित
येवुनि निर्यादव पुर करिल, हरिल यश, असा चि तो अहित.
यत्त[4] असा रात्रिदिवस, शिव सतत मनीं स्मरा, धरा कवच,
नव चतुरंग बळ उभें राहो, विसरा कदापि हें न वच. ३०
एक असो वागाया[5], बहुत वरीं द्वारकेसि न द्वारें,
वर्तावें एकें चि, श्रुत्युक्तमतें चि जेंवि सद्वारें. ३१
त्यां[6] हो जाणें येणें, राज्याची प्राप्त होय ज्या मुद्रा[6],
क्षुद्रा हि परा भ्यावें, मग बुध हो! कोपल्या न कां रुद्रा[7]? ३२
मीं ये[8] तों वीरांची जी क्रीडा न पतिसीं सुरामा ती,
न प्राशावी कोणीं, ज्ञानाची करितसे सुरा माती. ३३
युयुधाना! जी निजजनसंरक्षा, ती च सत्क्रिया संध्या,
वीरांत ख्याति तुझी, धर्मधनुर्निपुणता न हो वंध्या. ३४
मृगया, भलती क्रीडा, स्पष्ट करावी कधीं न बाहेर,
वार्ता अरिच्या चि परिस, आहेत तुझ्या अधीन बा! हेर." ३५
सात्यकि वदला, 'देवा! भय नाहीं त्वज्जनासि काळाचें,
सेवेसि असें सादर, मीं वचन करीन कामपाळाचें. ३६
तुज नय कथितां, लज्जा तातसखा उद्धवा, मला, होती,
सुज्ञा! जी अहिताची जययुक्ति, कधीं फळा न लाहो ती.' ३७
उद्धव म्हणे, 'प्रभो! तूं मजवरि करुनि प्रसाद, हें वदसी,

---

१ व्यग २ द्वारकेस ३ आधारावर असणाऱ्या वस्तूला. ४. सावध, तयार. ५. आंतबाहेर येजा करण्यास ६ राजमुद्रा ज्याचेजवळ असेल त्याला च मात्र येण्याजाण्यास परवानगी असावी ७. भयकर अशा. ८. परत येईपावेतों.

मन्नीति स्वीकारिसि सर्वज्ञ गुरु हि, शशी त्यजी न दसी.' ३८
रामासि 'म्हणे, आर्या! राहो तुझिया गदा सदा हातीं,
ज्यां अमृतकर त्राता, पावति कुमुदें कदा न दाहा तीं. ३९
किति हें पुर? आर्या! तूं सुसमर्थ त्रिभुवना हि राखाया,
लागे उपहासास्तव बा! मानधना जना हिरा खाया.' ४०
राम म्हणे, 'मन कृष्णा! स्वस्थ शिवाराधनीं असो, आधीं
चिंतीं त्यातें चि स्थिर चित्तें तूं, तत्प्रसाद जा साधीं. ४१
आहेत पुष्ट, दुष्टक्षयपटु हे भुज, गदा, मुसल, हल कीं,
किति नरसुरासुरबळें? तेजें सकळें हि रविपुढें हलकीं.' ४२
प्रभु नमुनि गुरुजनातें, बैसोनि निघे स्मृतागतीं विवरीं,
जाय बदरिकेसि, म्हणे, 'जीं जीं विषयज सुखें, न तीं विवरीं.'
गगनीं स्तविती सुर मुनि सामोरे येवुनि त्रिजगदाद्या;
म्हणती, 'तोखद ओखद घ्या, हानि सचक्षु हो! निजगदा द्या.'
प्रभु दीपिकाप्रकाशितपथबदरींत प्रवेश करि सांजे,
श्रीचरण पूजिती मुनि, दिसले दैवें उदंड वरिसां जे. ४५
जेथें चिर तप केलें शक्रें, रामें हि, जावया हत्या,
अत्याश्चर्या बदरी, कीर्ति सुगतिदा असी जिची सत्या. ४६
पूर्वस्वतपःस्थानीं गंगेच्या उत्तरीं तटीं अजितें
धरिला समाधि, भासे तद्देह निवातदीपसें आजि! तें. ४७
अत्याश्चर्य हरिचरित, परिपूर्ण हि बैसला तप कराया,
'प्रभुयश चि' म्हणति कविवर,'परम मधुर,अमृत तें सपक' राया!
धरि हरि समाधि, चिंती निरुपाधिक तत्त्व चित्रसम यांत,

---

१. शुद्धद्वितीयेच्या नूतन चंद्राला वस्त्राची दशी वाहण्याची जी चाल आहे तिचा येथें निर्देश आहे २ चंद्र ३ मरावें लागे. ४. स्मरण केल्याबरोबर आलेल्या पक्षिश्रेष्ठ गरुडावर. ५ स्वस्मिन्संस्थितप्राणिजातप्रति बदरी वाक्ति–**पंत.** जी (बदरी) [त्या ठिकाणीं राहणाऱ्या प्राणिमात्राला] म्हणे 'विषयसुखें न विवरीं' ६. दिवट्यांनी प्रकाशित आहेत मार्ग ज्या बदरीचे नीत. ७. उपाधिरहित असें निर्गुण परब्रह्म.

तों मृगयासंबंधी शब्द उठे घोर रात्रिसमयांत. ४९
'श्वान प्रेरा, मारा मृग, मांसें खा पिवूनि रक्तातें,
या, देव शार्ङ्गधन्वा उद्धरितो भलतशा हि भक्तातें. ५०
रोधा गज, न विलंघूं द्यावे हे लेश वप्र[1], सांदानें[2]
भिवधा, निववा स्वात्मा रक्तरसें केशवप्रसादानें. ५१
करिल प्रसाद यादव, या दवदेशीं वराह रोधावे,
हे कृष्ण भक्तवत्सळ! गेले[3] इकडे चि शैल्य शोधावे. ५२
मर्दा मदमत्त द्विपपति, हा माधव मनांत आणावा,
हाणावा शशसंघ हि, भगवान् कृष्ण प्रसन्न जाणावा. ५३
हे अज! हे गजराजप्राणत्राणप्रवीण! हे विष्णो!
हे कृष्ण! हे जनार्दन! हे माधव! हे मुकुंद! हे जिष्णो!' ५४
ऐसे सिंहव्याघ्रद्विपमृगनादांत मिसळले शब्द,
त्यांत रव श्वानांचे, वाटे कल्पांत, खवळले अब्द[4]. ५५
कोलाहळ लोला[5] हळभृदनुज[6]विभुवृत्तितें नृपा! करि, तो
सोडी समाधि, परिसा कैसी शरणागतीं कृपा करितो? ५६
सोडुनि निश्वास, प्रभु विस्मित होवुनि, म्हणे मनीं, 'कां हीं
होताति गर्जितें बहु, जेंवि करावीं रणीं अनीकांहीं?' ५७
शब्द ममस्तुतिमिश्रित कोणाचे काय? काय हें आहे?'
वाहे विस्मय भगवान्, पाहे आशा[7], उगा चि जों राहे, ५८
तों सर्व वनेचर ते प्राणी त्या भगवदाश्रमीं भरले,
सरले ताप जयाच्या नामें, बहु जीव यद्यशें तरले. ५९
त्यामागें बहु गर्जत शिरले चिर[8] लेश न करितां कुतरे,
उतरे हरिमद ज्यांहीं, सरमेचे उग्र ते असे सुत रे! ६०
बहुदीपिकाप्रकाशें बहु भूत पिशाच आश्रमीं आले;
न्हाले रक्तवसाहीं, खावुनि सगळे हि गज न जे धाले. ६१

---

१. कडा, तट. २. आरडाओरडीनें. ३. पळून गेलेले मृग ४. मेघ. ५. चचल. ६. हलधर बळरामाचा भाऊ कृष्ण त्याच्या मनोवृत्तीला. ७. दिशा. ८. विलंब.

शुचि जी क्षोणि तपानें, शोणितपानें करील, तीमाजी
भूत पिशाच निशाचर भरले, ते लंघिती च सीमा जी. ६२
हांसति, नाचति, गाती, चरचर मृगमांस सेविती हिरवें,
आश्रमपद कांपविती, गज, सिंह, पिशाच, भूत, ते हि रवें. ६३
जो तो ही सत्वांतें, होवुनि जठरानळास वश, हाणी;
हिंसेविषयीं यांची मति, कोणांची हि तेंवि न शहाणी. ६४
आले भीत प्राणी प्राणत्राणार्थ केशवानिकट,
दोघे मुख्य पिशाच हि, खरशूलप्रोतनरशिरें विकट. ६५
प्रभु हृदयांत म्हणे, 'हे कोणाचे भूत भृत्य आहेत?
मज सादर स्तवावें, कोणाचा या अशांत हा हेत? ६६
मन्नामें जींत, असी कोणाची भव्यभूषिता उक्ती?
युक्ति श्रेष्ठा सुचली, रुचली कोणा महाजना मुक्ती? ६७
कोणाच्या काय मनीं या प्रेम्याची असी वसे लहरी?
कोणा सद्गुरुवचनें हृदयीं हा प्रकटला असेल हरी?' ६८
ऐसें प्राकृतसा प्रभु चित्तीं चिंतन करीत जों राहे,
तों दोघे उग्राकृति आले सहसा पिशाच तो पाहे. ६९
ते उच्च, अंत्रवेष्टित, पिंगलरोमे, सुदीर्घजिह्वतनु,
लंबकच, विरूपनयन, सुकृशोदर, विकृतमुख, विशालहनु. ७०
नरमांसरक्त सेवित, शवशत कर्षीत, भूमि कंपवित,
रद खात, गाल चाटित, आले श्वापदसमूह संपवित. ७१
सर्व पिशाचवरांच्या किति वर्णूं बहुभयावहाकारा?
त्यांचा सत्व उरों दे कोणाच्या ही मनीं न हाकारा. ७२
त्यांच्या उपडुनि पडती तरु ऊरूत्पन्नलेशवातें हो!
पाहति पिशाच सहसा, येवूनि समीप, केशवातें हो!. ७३

१. प्राण्यांना. २. प्रोत=टांगलेली, अडकविलेली. ३. कल्याणकारी. ४. सामान्य जनासारखा. ५. अंत्र=आतडीं. ६. पिंगट केसाचे. ७. विकृत=कुरूप. ८. ओढीत. ९. त्यांचा हाकारा (आरडा)...सत्व (धैर्य) न उरों दे.

कृष्णासि न जाणुनि, ते पुसती, 'तूं मर्त्य, सांग गा! कवण?
श्रवण करूं दें, मर्त्या! त्वद्वृत्तीं आमुचें मन प्रवण. ७४
तूं सुकुमार, श्यामल कामलेलितरूप विष्णुसा गमसी;
श्रमसी कां घोर वनीं? कां अस्मद्दर्शनें हि न भ्रमसी?' ७५
कृष्ण म्हणे, "जन म्हणति 'क्षत्रिय' मज, यदुकुळांत मीं झालों,
मीं लोकनाथशास्ता कैलासीं शिव पहावया आलों. ७६
मद्वृत्त असें, सांगा, कोण तुम्हीं ब्राह्मणाश्रमीं आलां?
ऱ्यालां न मनीं कांहीं, न क्रव्यक्षतजसेवनें धालां. ७७
मृगयास्थान नव्हे हें, पुण्या हे पुण्यरतमता बदरी;
न दरिद्र एक येथें, वसति तपोधन, न या स्थळीं सदरी. ७८
मुनिराजपदत्राण हि जेथें दूर प्रवेशतां उतरे,
त्या या पुण्यस्थानीं घेवुनि आलां कसे शवें, कुतरे? ७९
श्वापद न करिति हिंसा, करितां पुण्याश्रमीं कसी मृगया?
ब्राह्मणतेज सुदुःसह, झाला कीं सरड लंधितां नृग या. ८०
नँ पुढें जावें; नसतां, गुरु देती करुनि बाळका समज;
नातरि कास कसावी लागेल स्थानपाळकास मज." ८१
कोण तुम्ही? कां आलां? कोठें जातां? खरें, रहा, बोला,
मुनिसिंहदरी बदरी, वृत्ति नसावी च या स्थळीं लोला." ८२
ज्याला अमृताहुनि बहु भगवद्गुणनाम दिननिशा चव दे,
जो घोर, दीर्घबाहुक, दोघांतिल एक तो पिशाच वदे. ८३
"मर्त्या! श्रवण कराया इच्छिसि, तरि परिस सावधानमनें,

१ मदनाप्रमाणें सुंदर रूप ज्याचें असा. २ क्रव्य=मांस. ३ सज्जनशत्रु. ४ ऋषि व राजे लोक हि जेथें प्रवेश करितांना आपले जोडे दूर काढून ठेवितात ५. हिंसक प्राणी देखील. ६ ह्या नावाचा राजा ७ बाळकास समजूत नसली तर वडील माणसें समजावून सांगतात, तसें, येथें कसें वागावें याविषयीं तुम्हीं अज्ञ आहां म्हणून तुम्हांला मीं योग्य सल्ला दिला आहे, तो न ऐकतां पुढें जाण्याचा हट्ट धराल तर मी या ठिकाणचा संरक्षक असल्यानें तुम्हांस हरकत करणें मला भाग पडेल.

निजवृत्त तुला कथितों, करुनि श्रीकृष्णविष्णुला नमनें. ८४
मीं घंटाकर्णाभिध, धनदानुग, काळसा महाघोर;
मदनुज पिशाच दुसरा, क्रूरत्वें मृत्युहूनि हा थोर. ८५
हें श्वकुळ कटक माझें, मृगया हे विष्णुपूजनाकरितां,
कैलासाहुनि आलों ऐसा मीं; द्वेष विष्णुसीं धरितां, ८६
कर्णांत बांधिल्या म्यां घंटा, कीं विष्णुनाम नायकणें,
बहु कृष्णनामवर्णें चित्तीं, नयनांत ताप काय कणें? ८७
संपादिला बळें चि श्रीविष्णुद्वेष हा असा मोटा,
तोटा ज्यांत स्वसुखा, मर्त्या! मीं आत्महा[1] महाखोटा. ८८
नाशिति हृत्तम,[2] हृदयामाजि सदा जो धरूनि तपन, मनीं,
आराधिला सुचिर शिव, कैलासीं म्यां करूनि तप, नमुनीं. ८९
झाला प्रसन्न भगवान्, 'वर माग' म्हणे, तदा पदा नमुनीं,
म्यां मुक्ति याचिली, ज्या याहुनि मागति दुजें न दान मुनी. ९०
शंभु म्हणे, 'मुक्तिप्रद विष्णु चि, देयील, जा बदरिकेला;
तेणें मुक्त, स्मरतां, द्वेष्टा कंसादि ही सदरि केला.' ९१
श्रीशिववचनें जाणुनि परम श्रीविष्णुतें चि, मर्त्या! तें
वैर त्यागुनि, गेलों शरण मनें त्या चि विश्वकर्त्यातें. ९२
मागाया मुक्ति तया नवसतडिद्घनसमानसद्वेषा[3]
आलों, आतां माझें स्पर्शे त्याच्या न मानस द्वेषा. ९३
तो द्वारकेंत, करितो, ज्यातें गाऊनि, भर्ग लास्याला,
शरणागता नसे त्या प्रभुपासीं, जेंवि अर्गळा[4] स्याला.[5] ९४
मनुजा! 'नंनु'[6] ज्या म्हणती ब्रह्मादिक विष्णु तो पहायास
जातों, गातों, ध्यातों; सरतिल तद्दर्शनें महायास. ९५
प्रकट प्रभु असतां, जें न पहाणें, याअसा अनय नाहीं,
जावें काय, पहावें काय, तथा पंगुहीं, अनयनाहीं? ९६

---

१. आत्मघातो. २ मनांतील अज्ञान. ३ सतडित्=वीजेनें युक्त. सद्वेषा= उत्तम वेषधारी [ कृष्णाजवळ ] ४. आडकाठी; हरकत. ५ मेहुण्याला. ६. होकार.

जी पिंगळाभिधाना वेश्या प्रभु उद्धरी तितें गा! तो;
प्रभु पूतना हि तारी, व्यास अशा शुद्ध रीतितें गातो.” ९७
स्वाभिप्राय प्रकटुनि, बहु यश वर्णुनि, म्हणे, ‘अगा मर्त्या!
जा येथुनि तू, करितों नित्य नियम, चिंतितों रमाभर्त्या.’ ९८
बोलुनि असें, यथेष्ट क्रव्यरुधिर सेवुनि प्रथम, राया!
आचमन करुनि, मांडी सुकुशासन, सुविधिनें जप कराया. ९९
श्वगणातें वारूनि, ध्यान धरुनि, तो पिशाच बसला हो!
प्रेमें ध्याया, पावुनि जगदीश्वरदर्शनातिरस लाहो. १००
तो अष्टाक्षर मंत्र प्रथम जपे, द्वादशाक्षर हि भावें;
प्रांजळि पिशाच बोले, ‘विष्णो! शरणागतास मज पावें. १०१
त्वच्चरणजगंगेचें सर्वां जीवांसि सुमति दे वारी,
चक्रें हें शिर खंडीं, उद्धरिले, वधुनि कुमति देवारी. १०२
बा जगदीशा! भ्रमतें मन अनुदिन बहु दहा दिशा चपळ;
यां अळि शको कराया तवपदपद्मांत हा पिशाच पळ. १०३
सदया! दावानळ हो, जाळीं पापा वना, नता पावें;
तुज हस्त जोडिल्यावरि दीनें वा पावना! न तापावें.’ १०४
प्रार्थी बहु, नासाग्रीं दृष्टि करि, प्रणवजप असा ध्याया,
बैसे पिशाच शुचिमति भक्त, कवण सिद्धि मग असाध्या या?
त्या लैशा हि पिशाचीं निजनामाच्या हरि द्रवे गानें,
निववाया जि सुरनगें तो, आला जो दरिद्र वेगानें. १०६
ध्यातां पिशाचहृदयीं प्रकटे श्रीकृष्ण, दाखवी मूर्ति,
त्याची तत्काळ करी करुणार्णव सर्वकामनापूर्ति. १०७
श्रीमूर्ति मनीं पाहे तो, बहु कृतकृत्यता नृपा! लाहे,
ध्यान धरुनि चिर राहे, ‘धन्य’ म्हणे ‘कोण मजअसा आहे?
होय समाधिविरत, मग पाहों लागे पिशाच बाहेर,
तों देखे तें सन्मतिकन्येचें जें सभाग्य माहेर. १०९

१. मनाला. २. ॐकाराचें ध्यान.

जैंवि समाधींत, तसा भूभागीं कृष्ण देखतां, हर्षें;
'हा हरि, हा विष्णु,' म्हणे, प्रेमाश्रु पिशाचथाळ तो वर्षे. ११०
नाचे, हर्षें हांसे, 'जो विष्णु विलोकिला समाधींत,
बाहेर हि तो चि,' म्हणे, "हा चि वसे सत्सभारमाधींत. १११
आदिपुरुष नारायण, हा यज्ञवराह, मीन, कच्छप, हा;
होतों पिशाच पापी, झालों भाग्यें परंतु अच्छ पहा. ११२
वधुनि हिरण्यकशिपुतें, हतदर्प करी सुरारिचक्रातें,
जो नारसिंह, तो हा, देतो सुरराज्यदान शक्रातें. ११३
बळिचें सर्वस्व हरी, जो लीलेनें धरूनि वामनता,
हा मन तापहर निववि, होय न, दोष स्मरूनि, वाम नता. ११४
सर्वक्षत्रक्षयकर परशुधर, श्रीहरप्रियच्छात्र,
हा त्रस्ताखिलशूरक्रूर, करी कश्यपा धरापात्र. ११५
भस्म कराया शकला, दंड करीं धरुनि, ज्या न कीनाश;
याच्या चि करें पावे तो रावण, हरुनि जानकी, नाश. ११६
तो कीं हा कृष्ण, करी जो स्पर्शुनि तीर्थ पूतनाकाया,
ज्याच्या नामरतांतें सुर म्हणति,'कराल पूत नाका, या.' ११७
गति देता झाला हा कृष्ण अरिष्टा, बका, अघा, बरवी,
शरणागतासि याच्या रचितें महापाप ही न घाबरवी. ११८
केला आनंद चि या कृष्णें, जो पाप कंस तापावा,
याची च कीर्तिगंगा म्हणती काकांसि 'हंसता पावा.'" ११९
अवतारचरित्र असें बहु बहु वर्णुनि, पिशाच तो लास्य,
हास्य हि फार करि, पडे, पोट धरुनि, करुनि विस्तृत स्वास्य.
मग तो हतविप्राचें नव शव करुनि द्विधा, त्वरा सांडी,
प्रोक्षुनि उदकें, पात्रीं स्थापुनि, सप्रेम विभुपुढें मांडी. १२१
अंजलि करुनि, साविनय प्रभुसि म्हणे, नमुनि, "आज देवा! हें

---

१ साधुसमाज व रमा यांच्या बुद्धीत. २ स्वच्छ, पुण्यवान ३. आचरलेलें.
४ सुखरूप. ५ आपलें तोंड.

भक्षावें, आवडि मज म्हणती, 'टाकूनि लाज दे, बाहें.' १२२
सुब्राह्मणशव न्व हें शुचितम, म्हणवूनि तुज शुचितमास
प्रेमें दिधलें; कृष्णा! भक्षावें, होय बहु उचित मास १२३
न कळे काय मज दिजे देवाला; जो पदार्थ अनसुंट, तो
स्वप्रियवस्तु निवेदुनि, भवपाशांतूनि भक्तजन सुटतो." १२४
होय प्रसन्न भगवान् भावप्रिय, भक्तवत्सला गावी
प्रभुदृष्टि वश चि, येतां कासेला भक्तवत्स लागावा. १२५
देव स्वमनांत म्हणे, 'हा परमस्नेह, परमकारुण्य,
प्रेम चि मज वश करितें, कामिजना जेंवि सुतनुतारुण्य.' १२६
द्रवुनि, दयालुवर वदे, "वत्सा! मज पावलें, पुरे, शव न
स्पर्शावें स्यां, निववि प्रेम तुझें, न च असें सुरेशवन. १२७
वा! ब्राह्मणवध न बरा; ब्राह्मणहंता रडे, पडे नरकीं;
ब्राह्मण पूज्य जगद्गुरु, हे आम्हीं यांसि जोडितों कर कीं. १२८
जो भक्ति करी, होतो क्षिप्र भवतमोरवि प्रसन्न तया.
भक्ता नीचा हि म्हणाति, जावूनि समोर, विप्र सन्नत 'या'. १२९
अंतःकरण शुचि तुझें झालें मद्भक्तिनें, अगा! धाया,
पावाया, हें चि करिति कवि अविलंबें, अजा अगाधा या. १३०
सुखधाम नामकीर्तन केलें त्वां आदरें अनैवरत, रे!
येणें घंटाकर्णा! अवर हि, होवूनियां अनवर, तरे." १३१
ऐसें बोलुनि निववी, जो कुब्जा तत्क्षणीं च उंजरी ती;
करि दिव्य पिशाचातें; वा! प्रभुची कथिन काय तुज रीती?
प्रभु अंग पिशाच्याचें, मृदुल करें स्पर्श करुनि, कुरवाळी;
सुंदरता वरि, जोणों तें चि शुचि शरीर देवपुर वाळी. १३२

---

१ अर्पण कर २ अनुच्छिष्ट ३ अर्पण करून, नैवेद्य दाखवून. ४ प्रभुकृपादृष्टि ही च गाय ५ संसारांधकाराचा सूर्य ६ फार नम्र ७ निरंतर ८. क्षुद्र, हीन जातीचा ९ सरळ करी १०. घेई ११ मला असें वाटतें की, तें सुंदर स्वरूप स्वर्गाला हि बहिष्कार घालितें–निर्णय०.

न बुधें, न अश्विनीच्या गणिलें निज रम्य आंग लेंकांहीं,
अद्यापि न त्रिभुवनीं बा! तैसें रूप चांगलें कांहीं. १३५
भुलतिल कां न सुरमणी पाहुनि अत्यद्भुता सुरमणीया?
प्रभु सुप्रसन्न ज्या, त्या म्हणतिल शक्रादि ही सुरमणी 'या'.
प्रभु त्यासि म्हणे, 'जों हरि, तोंवरि भोगील भोग, वस नाकीं,
तुज वांछिती सुरसभा, जीभ रसा, स्त्री नगा सुवसना, कीं.
शक्राच्या अवसानीं तूं मत्सायुज्य मत्प्रसादानें
पावशिल; जसा देतों हा, काय स्वर्गतरु असा दानें? १३७
त्वद्भाता हा हि सुरस्वर्गीं, जों देवराज, राहेल,
पाहेल प्राज्य सुखें, सद्गतिलें मज भजोनि लाहेल. १३८
साधो! बाधो न तुला माया, गावूत यश तुझें शिष्ट;
वर माग सुदुर्लभ ही, देतों, बा! तुज गमेल जो इष्ट.' १३९
तो घंटाकर्ण म्हणे, 'वरदा! जो आठवील संगम हा,
व्हावी त्वद्भक्ति तया, त्याच्या स्पर्शीं कधीं न भंग महा. १४०
करिल मदुद्धाराचें श्रवणपठन रसिक जीव जो भावें,
शोभावें शुद्ध यशें तेणें, गतिनें तयासि लोभावें.' १४१
हे विज्ञप्ति परिसुनि श्रीकृष्ण म्हणे, 'तथास्तु,' ताराया,
ऐसी मज गुरुनें, म्यां तुज कथिली कथा स्तुता राया!. १४२
दिव्यालंकाराहीं प्रभु, हरुनि पिशाचता, अलंकारी,
करुनि प्रसाद तारी, बा! हा चि महायशा कलंकारी. १४३
त्या प्रभु म्हणे, 'पहातो स्वर्गाचा ससुरवृंद वाट पती,
जा शक्रातिथि हो, तुज देखाया देवदार बा! टपती.' १४४
ऐसें परिसुनि, मस्तक त्या भक्तें पदरजांत लोळविला,
प्रभुनें भ्रात्यासह तो स्वर्गातें, उद्धरोनि, बोळविला. १४५
तो ब्राह्मण हि उठविला, ब्रह्मण्यें केशवें महाकरुणें;

---

१ नाशकाळीं. २ [तुझा माझा] भेटीचा प्रसंग ३. माझा वैशंपायनाचा गुरु जो व्यास त्यानें ४. पापशत्रु—पापाचा नाश करणारा ५. देवस्त्रिया.

झाला असा सुतेजा, लाजावें ज्यासि भास्करें तरुणें. १४६
त्यासि म्हणे, 'स्वस्थाना जा, बा! हो तूं बुधा! न दीनमना.'
प्रभुदृष्टिकारणें कां न करिल दासी सुधानदी नमना? १४७
श्रीहरिहरभक्तिरसिकसेव्या भव्या कथा यथाबुद्धि
लिहिली भक्तमयूरें, विनयें पावावया मनःशुद्धि. ४४८

---

## अध्याय पन्नासावा.

बदरींत रात्रिवृत्त प्रात काळीं मुनींस आयकवी,
झाले ते बहु सात्विकभावपरिव्यास रम्यकाय कवी. १
गरुडीं बैसोनि निघे कैलासालें मुकुंद तो जाया;
'यावें,' म्हणे मुनींतें, कल्याणपथीं तयांसि योजाया. २
गेला प्रभु कैलासीं, जेथें धनपति उपासितो भर्गा,
जेथें मानससर, जें हंसांच्या पोषितें सदा वर्गा; ३
जेथें सिंहगजमृगव्याघ्र, सहजवैरभाव सोडून,
क्रीडति एकत्र सुखें, शाश्वत अन्योन्य सख्य जोडून; ४
जेथें गंगादि नद्या उत्पन्ना सागरंगमा झाल्या,
तप करुनि, साधकांच्या जेथें बहुकोटि निजसुखें धाल्या; ५
शिर जेथें ब्रह्याचें करितां अन्याय ईश्वर च्छेदी;
खेदी कोणी हि नसे जेथें, कीं त्रास काळ ही नेदी, ६
जेथें सुमुनिप्रार्थित हिमगिरि दे शंकरासि निजकन्या,
धन्या झाली पावुनि जगदीशा, ज्या न पावली अन्या; ७
शतपत्रपुष्करांहीं स्वनयनकमळें हि पूजुनि शिवाला,
जेथें सुदर्शनातें पावुनि हरि, चिर उपासुनि, निवाला; ८
सस्त्रीक सिद्ध, किन्नर, करिति मणिगुहांत निर्भय क्रीडा,

१. दृष्टि=कृपादृष्टि. २. भाव=मनोविकार. ३. समुद्राकडे जाणाऱ्या (मिळणाऱ्या).

जेथें स्त्री, प्रतिबिंब स्वविपक्ष[1] गणूनि, पावती व्रीडा; ९
व्यसनीं पडला, ज्यातें जातां पौलस्त्य[2] उद्धरायातें,[3]
आसादिलें[4] मुकुंदें नगरत्न हिमांशुशुद्ध राया! तें. १०
त्या कैलासीं जावुनि, रम्य स्थळ देवकीतनय पाहे,
मानससरोवराच्या उत्तरतीरीं करीत तप राहे. ११
हरि संकल्प द्वादशवर्षैपर्यंत करि तप कराया,
श्रीपंचाक्षर[5] मनुजप धरि, अमृत जयापुढें सपक्र राया! १२
निष्काम चि जो झाला तो चीरी[6] वल्कली, जटी, कामी,
भगवदभिप्रायाची स्पष्ट कराया शकें न टीका[7] मी. १३
प्रभु, शाकभक्ष,[8] कृतजप, करि वेदाध्ययन नित्य होमास;
ज्यांत तपःप्रारंभ श्रीशाचा, फाल्गुनाख्य तो मास. १४
होमाकरितां काष्ठें, समिधा आणूनि दे महापक्षी;
मूर्तिधर पांचजन्य प्रभुतें सर्वां दिशांत संरक्षी. १५
वेंचूनि बिल्व, पुष्पें, दे प्रभुला चक्रराज[9] आणून,
प्रभुची गदा तदा करि परिचर्या,[10] न वदतां हि जाणून. १६
तैसा चि मूर्त नंदक खड्ग हि अत्यंत कुशल या नेत्या
आणुनि दे, दुष्टांच्या, समर्यां नव मृदुल कुश, लया नेत्या. १७
मूर्तिधर शार्ङ्गचाप हि, जोडुनि कर विभुपुढें उभा राहे;
बा! हे ऐसी सेवा करितो कीं, ईत शिव सदा आहे. १८
होम करी व्याहृतिंहीं,[11] प्रभु, संपादुनि घृतादि हव्यास;
ने मास एकभुक्त[12] पहिला, भजनीं च फार हव्यास. १९
दुसऱ्या मासीं दुसऱ्या दिवसीं शाकादि अल्प भक्षावें,
तिसऱ्या मासीं तिसऱ्या दिवसीं, हें एक वर्ष लक्षावें. २०
मासीं द्वितीय वर्षीं शाकान्नें करि महातपा भुक्ती,[13]

१ आपल्या सवती २ रावण ३ उचलण्यास ४ गाठलें. ५. 'नमः शिवाय' हा मंत्रजप ६ चिंध्या पांघरणारा, लक्तरें घेणारा ७ फोड. ८. भाजी खाणारा. ९. सुदर्शन. १० सेवा ११ 'ॐभूर्भुवस्वः' या मन्त्रानें. १२. येथें 'एकभक्त' असें चुकीनें लिहिलें गेलें आहे. १३. भोजन.

तिसऱ्या वर्षी तिसऱ्या मासीं, जो दे पदानता मुक्ती. २१
गुरु[1] उत्तरोत्तर नियम धरि, आराधी जपोनि उग्रास.
'शिव भोक्ता,' म्हणवुनि घे तो शाकांचा हि होय सुग्रास. २२
एकें[2] चि उरला, व्हावे क्रमितां संपूर्ण अब्द बारा ज्या;
लागों दिधला न यमा, नियमा, काहीं च शब्द बा राज्या!. २३
बैसुनि देवगजेंद्रीं, आला देखावयासि हरि हरितें;
महिषीं चढोनि यम ही, ज्याचें दर्शन अघासि परिहरितें. २४
हंसीं वरुण बसुनि ये, आले आदित्य, रुद्र, वसु, खांत,
गंधर्व, अप्सरा, सुर, मुनि, झाले सर्व उद्धवें[3] सुखांत. २५
सुर म्हणति, 'यदर्थ वरिति सुज्ञ महावृष्टि, हिम, महातप[4], तो
साक्षात् सर्वार्थप्रद भगवान् कृष्ण स्वयें, पहा, तपतो. २६
करितो ऐसें चि नवल नव लक्ष्मीकांत हा, कवि तराया;
जीवांसि अर्थ सर्व हि देवुनियां, कीर्ति, हाक, वितराया.' २७
शंकर म्हणे, 'प्रसादप्रासादा[5] देव शौरिसुत पाया
रचितो, चाल, विलोकूं, मागो तो इष्ट, गौरि! सुतपा यां[6].' २८
शशिधवळवृषीं बैसुनि, साधूंच्या बुद्धिचा निवास हित,
सगण सधनद प्रभु ये प्रभुला भेटावया शिवासहित. २९
येतां प्रसन्नचित्तें गंगागौरीयुतें, शिवें, आद्यें,
गंधर्व गाति, नाचति सुरवेश्या, वाजती पुढें वाद्यें. ३०
सुर हरिजवळ मिळाले जे आटोकाट दाट[7], थाट, तसे
पाहुनि, म्हणे शिव, 'शिवे! मज बहु आनंद आजि वाटतसे.'
नियमांतीं भेटाया हरितें, शिव उतरला वृषावरुनीं,
पाहोनि मानसातें, हंस नभांतुनि जसा तृषा वरुनीं. ३२
श्रीहरिहरस्तुति करिति मुनि नारदपर्वतप्रमुख सर्व,
'जय विष्णो! जय शंभो! जय भगवन्! जय मुकुंद! जय शर्व! ३३

१. कठिण. २. मास—पंत. ३. निमग्न ४ प्रखर ऊन. ५. कृपारूपी वाड्याचा ६. मज वरदास—पंत. ७ दाटी.

जय जय ! जय भजदघहर[1] ! जय पर ! जय वर ! जय प्रणतपाळ !
जय देव ! सिंधुजाधव ! जय गिरिजाधव ! जय स्मररिपुकाळ !' ३४
इत्यादि बहु स्तविती कवि, ती श्रीहरिहरस्तुति नव सुधा,
सर्वार्थ दाखवी, दे आश्रय जीवां, रविद्युति, न वसुधा. ३५
श्रीकृष्ण पुढें पाहे प्रभुतें, जोडूनि कर, उभा राहे,
स्तुतिपुष्पांजलि वाहे, लाहे सुख, 'रुचि' म्हणे, 'स्तवीं आहे'
भिन्न दिसे, परि पाहे भेदास द्वारकेश वास्तव न,
बहु आवडे शिवाचें, ध्याया सद्वार[2], केशवा स्तवन. ३७
'भगवन् ! सांब ! नमस्ते, शर्व ! नमस्ते, महेश्वर ! नमस्ते,
त्वं[3] प्रभुरसि शिव ! जगति त्रातुं शरणागतानिह समस्ते. ३८
तेजस्विवर, सदयवर, वरदवर, त्रिभुवनांत तूं एक,
भक्तीं तुझा अनुग्रह, दवदग्धदवीं जसा सुधासेक. ३९
शंभो ! दंभोलिधरप्रमुखां[4] सकळां हि लोकपाळांतें
भर्गा ! स्वर्गादिपदें देता तूं विश्वनाथ बाळांतें. ४०
विघ्न न बाधति, साधति पुरुषार्थ सुखें समस्त तव भजनें,
यजनें जें, तें काय त्वन्नामजपें चि जोडिलें न जनें? ४१
देवा ! हरिहररूपा ! सर्वा ! तुजकारणें असो नमन,
आत्मघ्न तो स्मरेना जो संसारी तुला असोन मन.' ४२
स्तवनें प्रसन्न होवुनि शंभु, करें धरुनि कर, म्हणे, "बा ! हें
तप कां? स्वयें तपाचें तप कीं तूं काय अन्य मीं आहें? ४३
व्हावी तुला तपस्या, पुत्रार्थ प्रार्थना तरि कशाला?
चिंतामणिची वरितिल, विषयेच्छु अपूर्ण ते वरिक शाला. ४४
पूर्वीं च उचित पुत्र प्रेमें म्यां तुज दिला असे कृष्णा !
बा ! मीं काम पुरवितों, प्रियजनहृदयीं न जन्मता तृष्णा. ४५

---

१. भक्तपापहर. २ साधुसमूह. ३ शिव ! (शंकरा !) इह समस्ते जगति (या सर्व जगांत) शरणागतान् (शरणागतांस) त्रातुं (तारण्यास) त्वं (तूं) प्रभु (समर्थ) असि (आहेस) ४. इंद्रादिकांस ५ घर, जागा.

तप उग्र कृतयुगीं मीं कृष्णा! होतों करीत, हे देवी
तातानें मातें, परिचर्या करुनि, सर्वदा सेवी. ४६
ऐशा समयीं भीत त्रिदशाधिप काम मधुसह[1] प्रेषी,
शीघ्र मजप्रति आला श्रीकृष्णा! शांतमानसद्वेषी. ४७
वरवर्णिनी[2], नगसुता, सुमति, उमा परमपुण्यचरिता हे
मजकारणें मुकुंदा! जों प्रियपुष्पादिदान करिताहे, ४८
तों सहसा काम करी मज निजशरलक्ष्य[3], सजलघननीला!
ये दुःसह कोप मला, बा! व्याघ्राच्या जसा चि जननीला. ४९
येतां क्रोध निघे या भाळींच्या लोचनांतुनि ज्वाळा,
कामातें भस्म करी ती तत्काळ चि, जगत्त्रयीपाळा! ५०
आली दया मनीं, ती तद्गति पाहोनि बा दयाळो! कीं,
परवश तो; दीनवधें लेश नसे साधुवाद या लोकीं. ५१
शक्रचिकीर्षित[4] कळलें, जें होतें हृदय पळ तमें मळलें,
तें विधिवचनें वळलें, रतिचें तप ही दयाफळें फळलें. ५२[5]
मन्नेत्राग्निज्वाळादग्ध मदन जो, 'त्वदीयकायज' या
'हो,' ऐसें मीं वदलों. होयील न मत्प्रसाद काय जया? ५३
तव पुत्र ज्येष्ठ स्मर होयिल लोकैकनायका! महित,
करिल सुरांचें तेजें त्वत्तुल्यसुरम्यकाय काम हित." ५४
ऐसें बोलुनि, शिव करि हरिला अंजलि पुन्हां वदायाला,
शक्रादि सुर सुरर्षि हि जोडिति कर सर्व ही तदा याला. ५५
शंकर म्हणे, "मुकुंदा! तूं चि ब्रह्मांडसृष्टिचा कर्ता,
भर्ता तूं चि श्रीशा! तूं चि त्रैलोक्यनायका! हर्ता; ५६
विधि तूं चि सृष्टिकाळीं स्थितिकाळीं विष्णु तूं चि गा देवा!
बा! तूं चि रुद्र विश्वक्षयकाळीं, मुक्तिदा तुझी सेवा. ५७
'शं' सुख याचा कर्ता, यास्तव 'शंकर' तुला म्हणति सुकवी;

---

१ मधु=वसंत २ गोरी, सुंदर ३ लक्ष्य=बाणांच्या नेमाचें ठिकाण.
४. इच्छा ५ अस्तित्वाच्या समयीं.

हरिसी सर्व प्रलयीं यास्तव 'हरि' नाम, हे व्यथा चुकवी. ५८
'क' ब्रह्मा, मीं 'ईश' प्राण्यांचा, यां निजांगजातांतें
वश करिसि, म्हणुनि 'केशव' तू स्मरतां हरिसि सर्व वातां तें.
मा' विद्या, ईचा तूं त्राता, दाता प्रभूत्तमा! स्वामी;
यास्तव 'माधव' ऐसें नाम तुझें स्पष्ट जाणतों बा! मीं. ६०
लोकगुरूंत ब्रह्मा, तूं अश्वत्थद्रुमांत, जो हा मीं
रुद्रांत तूं चि, कृष्णा! तूं देवर्षींत नारदस्वामी. ६१
मीं हा तूं, तूं हा मीं, शब्दें अर्थें करूनि कांहीं च
तुज मज अंतर कृष्णा! बा! वंध्यापत्य तेंवि नाहीं च. ६२
जीं लोकीं त्वन्नामें लाजविति गुणें सुधारस, ख्यातें,
माझीं हि तीं च, न करिति पळ मोक्षाच्या उधार सख्यातें. ६३
माझी उपासना बा! ती च तुझी होय जळजनाभा! जी;
त्वद्वेष्टा मद्द्वेष्टा; तव हि, मम हि, सुयश खळजना भाजी." ६४
ऐसें वदुनि शिव म्हणे, "मुनि हो! कथितों रहस्य, हें परिसा,
हरिसा हरि च त्रिजगीं, या स्पर्शावें मनें अयें परिसा. ६५
हें चि परम वस्तु असे, याहुनि दुसरें नसे, असें जाणा,
परम तपःफळ हें चि, ब्राह्मण हो! निश्चयें मनीं आणा. ६६
हें चि ध्येय, श्रेय ज्ञाते हो! हें चि परम धन होय,
जन्मफळ हें चि, जीवन हें चि तुम्हांला, झषां जसें तोय. ६७
तुमचा पुण्याश्रय हा; जो शाश्वत मुख्य, हा चि तो धर्म;
सत्पथ हा चि तुम्हांला; मोक्षाभिध हा चि अर्पिता शर्म. ६८
जे ब्रह्मज्ञ, स्तविती या कृष्णातें चि ते, अहो! मुनि हो!
हे चि गति, यज्ञ; नेणुनि, कोणी कधीं वृथा न हो मुनि हो. ६९
ध्यावा हरि; प्रसन्न ध्यातां चि क्षिप्र होतसे; 'क्षिप' हा
विधिस म्हणे; या, चातक जेंवि घना, विप्र हो! तसें चि पहा.

१ स्वशरीरोत्पन्नांस २. विराटस्वरूपी पिंपळांत ३ प्रसिद्ध ४ लोखडानें.
५ माशांस.

शुचे मन करा प्रयत्न, शुद्धात प्रकटता च्चि हा सत्य;
यास, त्यागुनि लज्जा, गा; हा चि भवामयास[2] नासत्य. ७१
'या हरितें पावावें' ऐसें वांछित असाल तरि सारे,
मदुपासना करावी, हें प्रिय, हित, सत्य सर्व परिसा, रे. ७२
मी सुप्रसन्न होतां, होतो हरि सुप्रसन्न, सन्मुनि हो!
जो मोक्षेच्छु विवेकी, तो अस्मदभेदभक्त जन्मुनि हो. ७३
आम्हांत भेद करि जो, या होय न पात्र मदुपदेशाला,
त्या हा स्वभक्तिरूपा चिंतामणिची न यदुप दे शाला." ७४
नमुनि मुनि म्हणाति, 'देवा! विश्वगुरो! तुज नमो, हरा हेती
हे[3] तीव्रा अशनिपरिस भवदुक्ति, जिणें न मोह राहे ती. ७५
हें गहन तत्व न जना, तुमचा नव्हतां प्रसाद, समजावें;
भवदुपदेशें, तैसें न गुहेंतिल भास्करें हि, तम जावें. ७६
आलों या कैलासा शैला साधुप्रियाश्रया सर्व,
यास्तव चि, विश्वनाथा! लक्षुनि हें मुक्तिचें महापर्व. ७७
झालों कृतकृत्य सकळ हे आम्हीं, धन्य अन्य होतील,
शरणागतकर्णीं हें परमामृत युष्मदनुग[4] ओतील. ७८
ऐसें म्हणुनि, नमिति ते सुमुनि हरातें, तयाचिपरि हरितें,
हें चरित हरिहरांचें श्रद्धावत्तापपाप[5] परिहरितें. ७९
पुनरपि सर्व मुनींतें धाया विस्मय असीम, हा देव
कृष्ण प्रसन्न व्हाया, प्रेमें स्तुति करि असी महादेव. ८०
"रविशशिविधिहररूपा! बहुसंख्य असोत तव पदा नमनें,
तुज भक्तिचें चि वरदा! मागावें, मुक्तिचें न, दान मनें. ८१
व्यार किती वर्णाया? न क्षम ते आठ वेद या लीला,
तुझिया अवन चि नतहितदक्षमते! आठव दयाऽलीला[6]. ८२

१. निश्चल २ संसाररूपी रोगास. ३ जिणें मोह न राहे ती हे भवदुक्ति अशनिपरिस तीव्रा—**पंत.** ४. तुमचा चाकर ५ भक्तिमानांचें दुःख व पाप. ६ दयारूपी सखीला.

गरळस्तन्य तुला दे ती पावे पूतना महितकाय,
मग न करिसिल, ध्यातां, जपतां निजपूत नाम, हित काय? ८३
स्पर्शें कौस्तुभपदवी देतील चि पाय विंगळाला हे,
मी पंचवदन वर्णूं किति करुणा? मुक्ति पिंगळा लाहे. ८४
मजला प्रसाद वेड चि लावितसे तो, गजा मिळाला जो,
त्वन्नामपराङ्मुखमुख शुचि साक्षर ही अजामिळा लाजो. ८५
आयकिलें साधुमुखें कीं, गति दिधली तुवां अधा बरवी,
त्यापासुनि पाप बहु हि बापा! पापा जना न घाबरवी. ८६
नाम चि घेतां, पोटीं घालुनि अपराध सकळ, वळलास,
करिसि अरिसि निजसम तूं, बा! कंसीं काय न कळवळलास?
नमन तुला, श्रीकृष्णा! हृतसत्तृष्णा! तुला असो नमन,
नमन तुला, गोविंदा! हो निश्चळ, तव पदीं वसोन, मन. ८८
बहु शोभे, त्वत्सद्गुण गाता जो साधु भक्त, निष्कपट;
नसतां भवत्प्रसाद, न सुंदर हि धरूनि दिव्य निष्कपट. ८९
धर्म म्हणे, "दूता! जो न हरिजन, न यो समोर माज्या, ने.
प्रभुसम पूज्य मला तो, म्हणता, 'तुभ्य नमो रमाजाने!'" ९०
हें किति? गाधुनि तुझिया वसुदेवा! देवका नरा धातीं,
कुब्जा हि परमपूज्या, बा! केवळ सेवका न राधा ती." ९१
स्तवन करि बहु प्रभुचें, शिव म्हणुनि 'नमो, नमो, नमो', हा तें
स्तोत्र म्हणे भावें, जो जन, त्याच्या दे उरीं न मोहातें. ९२
श्रीशंभु म्हणे, 'मुनि हो! ऐसें विकसित करूनियां गाल,
या प्रभुतें सांजलि जरि, सुप्रेमरसें भरूनियां, गाल, ९३
तरि सर्व तराल सुखें, हा प्रभुवर, हा शरण्य, हा साचा;
श्रेयस्कर आश्रय या सर्वांला ही जगन्निवासाचा.' ९४
इत्यादि वदोनि, प्रभु झाला गुप्त त्रिनेत्र बा राया!

---

१ अग्नीला २ विद्वान्, ज्ञानी ३. निष्क (सुवर्णालंकार) पट (वस्त्रें). ४. हे रमापते' ५ देवक (देवकीचा पिता) राजाच्या वंशातील नराला (कृष्णाला).

त्रिजगद्गुरु उपदेशी ऐसें सुमुनींस, जीव ताराया. ९५
श्रीकृष्णातें नमुनि, स्तवुनि, ध्यानीं धरूनियां मूर्ती,
स्वस्थाना मुनि गेले, झाली निःशेषकामनापूर्ती. ९६
हरिहर महंत, यांचे शक्रादिक लोकपाळ हे चेले,
शेले निदेश घेवुनि, नाकादिगुरुस्थळासि ते गेले. ९७
बैसुनि गरुडस्कंधीं, बदरीतें देव ये तदा सांजे,
प्रभुचरण पूजिती मुनि, आले वर इष्ट देत दासां जे. ९८
जे मुनि धन्य कराया बदरींत स्वजनकल्पनग राहे,
मानितिल मनांत महामहिपतिच्या कां न अल्प नगरा हे? ९९

## अध्याय एकावन्नावा.

या काळीं पापाचारी तो पौंड्रक कृष्णशत्रु वश राजे,
सांपडले त्या प्रभुच्या आयुःशेषेंकरूनि न शरा जे. १
पौंड्रक राज्यांसि म्हणे, "स्यां भूभूपाळ जिंकिले सर्व,
यादव उरले असती, पावुनि कृष्णाश्रयें महागर्व. २
चक्रबळें करिताहे, मातें नेणूनि, कृष्ण मदवज्ञा;
अर्द्धवज्ञा घासों ही लंघ्य दव गमे, गजा हि न दवज्ञा. ३
कृष्ण नव्हे शुद्धतपा, उद्धत, पाखंड सर्वथा, अरि तो
गर्वें फुगला आहे, कीं, शार्ङ्गगदादि आयुधें धरितो. ४
धरिलें सनाम आयुध, जें माझें नाम तें हि गोपानें,
'मीं वासुदेव' म्हणतो, दंडीन रणीं तयासि कोपानें. ५
माझें चक्र सुदर्शन खंडील रणांत कृष्णचक्रातें,
मातें जिंकाया न क्षम यादव, जेंवि दैत्य शक्रातें. ६

१. उर्वी वर्जें व आशा. २. असा कृष्ण. ३ आयुष्य शिल्लक होतें म्हणून. ४. वणवा ज्यास माहीत नाहीं असा. ५. गवताला.

भार[1]सहस्रें रचिली माझी कौमोदकी गदा, त्याची
भंगेल दांभिका[2]ची कीर्ति तसी, जेवि हेतदात्याची. ७
तें शार्ङ्ग काय? माझें शार्ङ्ग सुदृढ, अशनि ही न खंडिल या;
तच्चापलता जायिल येणें, तपनें जसी च थडि, लया. ८
त्या अरिच्या खड्गाच्या नाशीं मत्खड्ग नंदक क्षम हा,
पावेल पुत्रशोकज्वलनांत विनाश नंद[3]कक्ष महा. ९
मीं मुख्य गदी, चक्री, खड्गी, शार्ङ्गी, यथार्थ जाणावें,
गोपातें वधिन रणीं, हें माझें मत मनांत बाणावें. १०
मज 'वासुदेव,' 'चक्री,' 'शार्ङ्गी,' 'शंखी,' 'गदी,' म्हणा स्पष्ट.
न म्हणाल असें जरि, तरि सर्व हि पावाल सर्वथा कष्ट. ११
ख्यात सखा नरकाचा मीं, त्या नरकांतकासि खंडीन,
जरि 'वासुदेव' मातें न म्हणाल, खरें तुम्हांसि दंडीन. १२
मज 'वासुदेव' कोणी न म्हणेल, म्हणेल भूप तो 'हाय!'
त्यापासुनि घेयीन चि अयुत वर[4]सुवर्णनिष्क मीं राय." १३
या जडपौंडकवचनें त्यांचें मन त्या सभेंत बहु लाजे:
वा! जे जाणत होते प्रभुचें सामर्थ्य शुद्धमति राजे. १४
भूप अधन्य तदन्य, प्राकृत मानूनि हरि, खलेश तशा
कुविचारा हित जाणुनि, वीर्यमदोत्सिक्त हरिखले, शतशा. १५
हरिहरसमागमोत्सव कैलासीं अनुभवूनियां, आर्य
नारद पौंड्रकनगरा ये, चिंतुनि दुष्टदमन हें कार्य. १६
मुनितें पौंड्रक पूजी, वर्णी पु[5]ष्कळ, म्हणे, "तुझें गमन
ब्रह्मांडीं अव्याहत, करिति तुज सुरादि सर्व ही नमन. १७
'मीं वासुदेव, चक्री, दाता, त्राता,' असें जगीं कळिव;
पळिव भ्रम लोकांचा, सर्वांचें चित्त मजकडे वळिव. १८
आपण गोप मिरवितो जो माझें 'वासुदेव' हें नाम,

१ भार=८००० तोळे २. कांहीं तरी खोटा आपमतलब मनांत ठेवून दान देणाराची. ३. नदरूपी गवत. ४. उत्तम सुवर्णाचीं नाणीं. ५. अखंड.

त्याला वीर्यबळ नसे, पक्क नव्हे, स्पष्ट मूढ तो आम. १९
मीं एक वासुदेव त्रिजगीं होतों, वधूनि गोपातें;
निश्चय तूं जाण, मुने! माझ्या साहेल तो न रोपातें. २०
मी वासुदेव, चक्रीं खवळेन रणांगणांत कोपानें,
तेव्हां सांग, करावें स्वप्राणत्राण काय गोपानें? २१
मन्नामें अमृत, राहु चि तो, न दिली सुमति वल्लवा तातें.
सांग, पराभविल, जरि प्रबळ हि, तरि काय, मल्ल, वातातें?
यादवसह गोपातें मारीन, द्वारकेसि जाळीन,
पाळीन स्वजन, भयें प्रभुवर मीं वासुदेव टाळीनें. २३
मीं योद्धा एक जगीं, भूप मिळाले बलाढ्य मजला हे,
तो गोप उरेल कसा? कोणें प्रभुरिपु जयासि भजलाहे? २४
मम हय, गज, अतिवेगी, करिति चमत्कार नवनवे गमनीं,
यांच्या पाहुनि वेगा, कविनीं गणिला न पवनवेग मनीं. २५
माझा तसा बलौघ, क्षुब्धाब्धीचा अवार्य लोट कसा,
दृढ हि द्वारवतीचा समयीं उतरेल तो न कोट कसा? २६
क्षम गिरिस ढांसळाया मद्गज, वाता हि घोटक वळाया,
रथवृंद काळवदन चि अतिपटु यदुनगरकोट कवळाया. २७
तस्मात्, सर्वत्र जगीं, शक्रास हि, मत्प्रताप सांगावा,
धांगा वास्तवतेजा हा न तुवां वासुदेव कां गावा? २८
म्हण मज चि 'वासुदेव', न त्या, कथितों तुज सुखार्थ मीं नमुनीं;
कीं तूं व्हावासि प्रभुसद्गुणरत्नाकरांत मौनमुनी." २९
देवर्षि म्हणे, "देतों प्रतिवाक्य मनुष्यनायका! याचें,

---

१ कच्चा. २ माझें नांव त्यानें (कृष्णानें) घेतलें आहे, परंतु अमृत देण्याच्या नादानें जसा राहूचा शिरच्छेद झाला तसा त्याचा होईल, असा भाव. ३ गोपाळा (कृष्णाला) ४ भीति नाहींशी करीन ५ मज धन्याच्या कोणत्या शत्रूला [कधी] जय मिळाला आहे? ६. हल्ल्याच्या वेळीं ७. घोडा ८ खऱ्या तेजाचें स्थान असा हा (मी) ९. मौनरूप मुनी १० उत्तर.

न वद असें, श्रीहरिचें श्रीशार्ङ्गधनुष्य नायकायाचें. ३०
सर्व महीतें शासित असतां कृष्ण त्रिलोकपति तरणी,
खद्योत इतर, 'मीं प्रभु' म्हणतां, होयील कां न पतित रणीं?
'मीं वासुदेव,' म्हणसी, करिसी हें काय गान! वाचाळा!?
तुज लागला अहा! हा हास्यावह काय गा! नवा चाळा? ३२
दुष्टजनातें नेतो लीलेनें संगरीं हरि लयातें,
झाला बहु गर्व तुला, सत्वर तो प्रभु, पहा, हरिल यातें. ३३
तूं पौंड्रक जगदीश्वर विष्णु, श्रीकृष्ण काय गा! जीव?
म्हण वासुदेव; नाम, क्षत जों चक्रें न काय, गाजीव." ३४
या मुनिवचनें कोपे पौंड्रक अतिमूढ, तोलयाला जे
जड अनुसरले होते, लाजति न जसा न, तो तया लाजे. ३५
असुरादि मत्त झाले, परि हा अत्यंत मातंगा, याची
भगवद्यशोर्थ गातों, जरि न बुधसभेंत मात गायाची. ३६
मुनिस म्हणे, 'देवर्षे! मीं प्रभुवर, मत्समक्ष काय कसें
बोलावें हें नेणसि, उच्चारिसि वचन सविषसायकसें. ३७
बापा! शापापासुनि भीतों, तूं तूर्ण ऊठ, जा च कसा.
लंघुनि, सभेंत केला सोसेल प्रभुवरासि जाच कसा?' ३८
हें ऐकुनि, मुनि हि निघे, त्याची वर्णुनि मनांत बालिशता;
कीं, हा बहुमान्य कनककशिपुखचरराजवेनबालिशता. ३९
मुनि जाउनि बदरींत प्रभुला पौंड्रकदुरुक्त आयकवी,
करिल क्षमा, स्वगुरुच्या निंदेतें आयकोनि, काय कवी? ४०
देव म्हणे, "देवर्षे! पौंड्रक बालो यथेष्ट, जों आयु,
बा! युद्धीं तद्वपु उडविन, उडवी तृणा जसा वायु. ४१
भ्रमला काय वदेना? साधूंच्या निंदितो सुरारि अहा,

१. ऐकावयाचें नाहीं, दाद देणार नाहीं २ मस्त. ३ उपमर्द करून. ४. खचरराज=राक्षसेंद्र ५. सज्जनसभेला. ६ दारूबाज.

जो मत्त, म्हणेल चि तो देवेंद्रातें हि 'हा! सुरापसदा!' ४२
ऐसें बोलुनि मुनिसीं, पावे भगवान् विराम बदरींत
यद्भक्तिविणें कोणी हिमगिरिच्या ही कृतार्थ न दरींत. ४३
प्रभुनें वसोनि, केली अतिमुदिता साधुमंडली बदरी,
ज्याच्या तेजें उरला वाहिर, आंत हि, न एक ही सदरी. ४४
नारद निघतां चि, निघे पौंड्रक, याचे तुरंग वर लक्ष,
अष्टसहस्र रथ, अयुत गज, अर्बुद पत्ति, सर्व रणदक्ष. ४५
ऐसी सेना घेवुनि, नानाविधशस्त्रयुत रथीं चढला,
पौंड्रक अत्युग्र, जसा ह्रद कालियगरळपावकें कढला. ४६
बहुदीपिकाप्रकाशें जाय निशीथीं च यदुपुरीजवळ,
काळ तसा अतिदारुण यदुवीरांतें करावया कवळ. ४७
तो पौंड्रक भूपांतें सांगे, 'हूं! शीघ्र ताडवा भेरी,
घेरी भयें अरींला येवू, होवू रवें पुरी भेरी. ४८
त्रास मनीं वृष्णींच्या सहसा, मद्दाम घोषवा, घाला;
यावा सर्वां वीरां अहितांचा, जेंवि रोष वाघाला.' ४९
ऐसी आज्ञा होतां, दुंदुभि, समरा सजोनि, वाजविती;
सहसा सर्व हि सैनिक पौंड्रकनामप्रताप गाजविती. ५०
म्हणती, "कोठें सात्यकि, सांब, प्रद्युम्न, राम, यादव हो!?
रक्षा, पौंड्रक ईश्वर होय, न या पुरतृणोंच्चया दव हो. ५१
'मीं वासुदेव ईश्वर' म्हणता कोठें प्रमत्त तो गोप?
कोपज्वलन प्रभुचा पाहे त्याचा करावया लोप." ५२
यापरि मर्यादेतें लंघुनि, झाले यथेष्ट बडबडते;
श्रीद्वारकेंत शस्त्रें वर्षति, करिती उदंड गडबड ते. ५३
प्राप्त महाव्यसन तसें होतां रात्री न वृष्णि ते भ्याले,
बळ, उग्रसेन, सात्यकि, उद्धव, हार्दिक्य, सिद्ध हे झाले. ५४

१. अरे देवांतील नीचा' अरे नीच, दुष्ट देवा!. २. [यमुनेचा] डोह. ३. नगारे. ४. बहिरी. ५. नगररूपी गवताच्या गंजीस.

चतुरंग सैन्य घेवुनि, रणलालस, मुख्य वृष्णिवर वीर,
गुरुदीपिकाप्रकाशें, भेरी ताडूनि, निघति बहु धीर. ५५
पळविति दूर तमातें, वृष्णि, प्रकटूनि दीपिका लक्ष,
दक्ष ध्वसिति परबळ, जाणों हे दाववह्नि, तें कक्ष. ५६
बहु हय, गज, भट मेले, ठेले होवुनि विषाद पतित रणीं,
तों यदुभट नक्षत्रें करि, होय क्षण निषादपति तरणी. ५७
तो एकलव्यनामा दहनाचा स्पष्ट लोळ वीर गडी
काळाचा भासे, कीं, बहु यादवसैन्य लोळवी, रगडी. ५८
निशठासि पंचविंशति, दश सायक सारणासि तो हाणी,
कृतवर्म्याच्या सिरवी तो अतिखर पंच शर तनुत्राणीं.[2] ५९
शर नवति[3] उग्रसेना हाणुनि, समरांगणीं करी तप्त,
वसुदेवास हि ताडी समरीं, सोडूनि बाण तो सप्त. ६०
पंच शराहीं ताडी अक्रूरा, उद्धवा दश शरानीं,
किति म्हणति, 'सांगतो हा सिंहांसीं शुद्ध वाद[4] शशरानीं.' ६१
गर्जे निषाद, 'कोठें सात्यकि? कोठें मदांध तो मुसली?
शस्त्रास्त्रशक्ति कोठें? भ्याली कीं आजि वृष्णि हो! रुसली?' ६२
यादववीरांसह चतुरंग हि बळ पळविलें निषादानें,
त्या दीपिका विझाल्या, झाले व्याकुळ तमीं विषादानें. ६३
गेले परतोनि पुरीं वृष्णि, सबळ युद्धभूमि सोडून;
झोडून एकलव्यें केलें हतदर्प, सर्व मोडून. ६४
पौंड्रक यादवभंगें हर्षें, हांसे धरूनि पोटाला;
स्वभटांसि म्हणे, 'पाडा, द्वारवतीच्या खणोनि कोटाला. ६५
कन्या दासी च करा, द्या एका ही न यादवा राहूं,
शोषा रामह्रद तो माराया सैन्ययादवारा, हूं!.' ६६
स्वामीच्या आज्ञेनें भट झटले, करुनियां पण, खणाया,

१ कोळ्यांचा राजा एकलव्य. २ चिलखतात ३ नव्वद ४ राजरोस लढाई —निर्णय०. ५ सैन्यरूपी जलचराच्या समूहास.

प्राकारीं टंक सबळ घन सहसा लागले खणखणाया. ६७
सात्यकि म्हणे, 'मुकुंदें मज नगरी फार निरविली आहे,
ज्याच्या प्रतापदहनें शात्रवशलभांत मिरविली आहे.' ६८
ऐसें चिंतुनि, दारुकसुत सूत करुनि, रथीं चढे तूर्ण,
अरिनीं करितां पूर्वद्वारप्राकार तो बळें चूर्ण. ६९
रामप्रभु हि निघाला, हळमुसलायुध महोग्र धरुनि करीं,
क्रीडा तसी कराया, जेंवि करी चंड वात तरुनिकरीं. ७०
बैसुनि मत्तवरगजीं, शुद्धमना, शुद्धनीति, शुद्धवया,
होवुनि पुढें, म्हणे यदुवीरांतें, सर्वमान्य उद्धव, 'या.' ७१
बाहिर निघतां, सात्यकि सकळा शत्रूंसि साध्वसीं बुडवी,
वायव्यास्त्रें सहसा प्रथम प्राकार पाडिते उडवी. ७२
जे अस्त्रवातवेगें सहसा निर्धूत यदुवरें केले,
सोडुनि बैळाविलें स्थळ, बळसह नृप पौंड्काकडे गेले. ७३
स्थळ सोडवूनि, सात्यकि तेथें ठाके, मनीं धरी कोप,
भात्यांतुनि काढुनि घे हस्तीं अत्युग्र सर्पसा रोप. ७४
गर्जोनि म्हणे, 'कोठें आहे पौंड्क? नव्हे बळी थोर;
चोर, स्पष्ट निशाचर; दिसतां मारूनि, वारितों घोर. ७५
यादव निजले जाणुनि, आला घालावयासि जो घाला,
चोर चि तो, सात्यकि मीं त्या क्षुद्रा, ग्रीष्म जेंवि ओघाला. ७६
चोरशिरश्छेद सुकृत, जरि मीं पाहेन काय अभ्रमास,
वांटुनि देयिन गृध्रश्वानांस, पळांत करुनि वध, मास.' ७७
ऐसें सात्यकि हांसे, जोडी सुदृढीं धनुर्गुणीं बाण,
त्याच्या शिरःफळाचें घाया काळा महाहिजा वाण. ७८
पौंड्क म्हणे, 'अरे! तो कोठें? त्याच्या चि पातलों अंता,
स्त्रीहंता, पशुहंता जो गुरु करि तक्षकाहिच्या दंता. ७९

१. ज्वाळा २. वृद्ध. ३. उडविलेले म्ह० हलके. ४ बळकाविलेलें. ५. उग्रविषासवधानें तक्षकाचा शिष्य च.

मन्नाम स्वीकारुनि, मिरवी निर्लज्ज धृष्ट जो गोप,
मत्प्रियसखनरकवधें आला त्याचा चि बहु मला कोप. ८०
मीं त्यासीं च भिडेन, क्षम नससी तूं करावया समर,
अथवा रहा, स्वरक्तें भूमितृषा परिहरावयास मर. ८१
त्या गोपाचा नाशो त्वन्निधनश्रवणभेषजें गर्व;
शर्व स्मरा, तसा मीं तुज; हरितों मद तुझा रणीं सर्व. ८२
शकसिल, तरि, युयुधाना! स्यां धरिला बाण हा, सहा यास;
मज हसविसिल, रडविसिल त्या गोपा आपुल्या सहायास.' ८३
ऐसें वदोनि सात्यकिवरि पौंड्रक जाय, बाण काढून,
सात्यकि म्हणे, "सुखवितों श्वान, तुझें रक्तमांस वाढून. ८४
जगदीशातें निंदिसि, पापा! तुजसारिखा अधम नाहीं.
साधूंच्या, वांछावा, बहु मानावा, तुझा वध, मनाहीं. ८५
येथिल सकाळ कालियशासन केशव तुला लया न्याया,
तूं प्रभुसीं सांगसि, तरि सांगो विधिसीं कुलाल या न्याया.
कैलासाहुनि जरि हरि नाहीं आला, उद्यां तुझा वध मीं
करिन, स्पष्ट जयश्री भगवद्भक्तीं वसे, नसे अधर्मीं. ८७
'मीं वासुदेव' म्हण, जों आला न मुकुंद, आयती च वरी
श्रीकीर्ति नृपा पुण्यें; पापा शोभेल काय ती चवरी?" ८८
ऐसें बहु धिक्कारी, तीव्र शरें पौंड्रका उरीं हाणी,
न्हाणी रक्तें, कोप व्याळासि जसा, तसा तया आणी. ८९
पौंड्रक हि नव शराहीं आधीं ताडी तया, मग दहानीं;
ते करिती सात्यकिच्या धैर्या, यतिच्या जसे न गद, हानी. ९०
एक ललाटीं पौंड्रक सात्यकिच्या बाण शूर तो बुडवी,
उडवी भान, स्वक्षय व्हाया जाणों महाहितें तुडवी. ९१

---

१. भेषज=औषध २. मित्राला (कृष्णाला) ३ मातीचीं भांडीं करणाऱ्या कुंभारानें सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाची बरोबरी करण्याची महत्त्वाकांक्षा धरण्याप्रमाणें च हें तुझें कृत्य आहे, असा भाव.

सूतातें, अश्वांतें, खरतर शर तत्क्षणीं च तो हाणी,
न्हाणी रक्तें, आणी नेत्रांत प्रेक्षकांचिया पाणी. ९२
गर्जे हर्षें पौंड्रक, संपादुनि विजय, संगरीं हरिसा,
परि सावधान सात्यकि झाला त्या शत्रुगर्जनेसरिसा. ९३
सात्यकि गर्जोनि म्हणे, 'दाखिव बळ वासुदेवका[1]! मातें,
जेंवि[2] पिपीलिक, दुर्मतिवेश्येच्या तेंवि सेवका! मातें.' ९४
ऐसें दापुनि अरितें, हरितें चिंतुनि, महोग्र रोपानें
वक्षीं ताडी, पाडी, भ्रमवुनि वमवुनि असृग्[3], कोपानें. ९५
ध्वज तोडुनि, सूतातें अश्वांतें वधुनि, चूर्ण करि चक्रें,
पौंड्रक विरथ विलोकुनि, केलें बहु 'हाय! हाय!' अरिचक्रें.
येतां सुपात्र जैसा केवळ निर्धनें[4] वदान्य नर होतो,
झाला तैसा चि रणीं पौंड्रक भूपाळ, रसिकवर हो! तो. ९७
साधव होवुनि पौंड्रक, सात्यकिवरि विशिख सर्पसे सोडी;
तो युयुधान तयाच्या चापातें उग्र सायकें तोडी ९८
तो वासुदेव टाकी, गरगर फिरवुनि, गदा, तदा तीतें
सव्यकरें सात्यकि धरि; खर शर हाणी तया पदोतीतें[5]. ९९
सात्यकिशर वामकरें पौंड्रक ही अंतरीं[6] धरी, राज्या!
सोडी तो अतिवेगें त्याच्या भेदावया शरीरा ज्या. १००
दशशक्तींहीं ताडी सात्यकितें वासुदेव रोपानें,
तो पीडिला परानें, जेंवि सुगुण कलियुगांत दोषानें. १०१
सात्यकि तया, गदेनें त्या ताडी वासुदेवक हि; राया!
माधवँ[7] म्हणे, 'सुकाठिना सेविल, होवूनि सेवक हिरा, याँ.'

---

१ नीच व क्षुद्र वासुदेवा'—निर्णय० २ अरे दुर्बुद्धिरूप वेश्येच्या सेवका! जेंवि पिपीलिक (मुंगळा) तेंवि मातें (मस्त हो) तू किती हि मातलास तरी एकाद्या मुंगीप्रमाणें तुला कृष्ण चिरडून टाकील ३ रक्त ४ [सर्वस्व दान करून]. ५. पायानें च लढाई करणाऱ्यास ६ अतराळीं. ७ माधव (सात्यकी) म्हणे "हिरा सेवक होऊनि या सुकाठिना सेविल कठिणपणात हिऱ्यानें देखील याचें दास्य केलें पाहिजे"

अन्योन्यासि वधाया ते दोघे सगद[1] रुष्टधी[2] टपतों,
गहनीं जेंवि मृगांचे[3] अत्यंतक्रोध दुष्ट धीट पती. १०३
युयुधान सव्य मंडल, दक्षिण पौंड्रक महागदी चाले,
न्हाले रक्तें, झाले श्रांत न, एक हि न निश्चयीं हाले. १०४
पौंड्रक महागदेनें युयुधानातें स्तनांतरीं ताडी,
युयुधान पौंड्रकातें ताडूनि भुजांतरीं, तळीं पाडी. १०५
उठुनि, ललाटीं ताडी सात्यकितें वासुदेव तो रागें.
सात्यकि हि पौंड्रकातें, एक हि समरीं सरेचिना मागें. १०६
पौंड्रक उग्र गदेतें युयुधानातें वधावया सोडी,
तीतें, उडोनि, झेली तो बळनिधि, वेणुयष्टिसी[4] मोडी. १०७
सहगद कर वामकरें धरुनि, करायासि हानि, करकरुनीं,
माधववक्षीं मारी दक्षकरें मुष्टि हा, निकर करुनीं. १०८
सात्यकिनें त्यजुनि गदा, तो हि उरीं ताडिला स्वदक्षतळें[5];
तद्बाहुयुद्ध वेधी, जेंवि ज्येष्ठांत जीवलक्ष तळें[6]. १०९
सात्यकिपौंड्रक करिती दारुण भुजयुद्ध ते, जसे मल्ल,
प्रेक्षक जन जे, त्यांचे वा! फुल्लाफुल्ल जाहले गल्ल. ११०
‘सात्यकि मरतो,’ म्हणती किति, ‘मानी वासुदेव हा मरतो.’
किति म्हणती, ‘दोघे ही मरतिल; परँ यश[7] काय पामर तो?’
जों पौंड्रक पांच, तया मारी सात्यकि कसूनि मुष्टि दहा.
यादव या, दवडुनि भय, देखति जे, त्यांसि होय तुष्टि दहा.
रामासीं युद्ध करी, अतिदारुण एकलव्य शर सोडी;
त्याचें धनु बळ तोडी, मोटी या संगरीं असे गोडी. ११२

१ गदाधारी. २ कोपलेले. ३. मृगपति=सिंह. ४ वावृच्या काठीसारखी ५. आपल्या उजव्या तळहातानें. ६ ज्येष्ठात (ऐन उन्हाळ्यांत) पाण्याकरितां प्राण्यांचें लक्ष्य जसें एखाद्या पाणी असलेल्या तळ्याकडे लागतें, तसें त्यांच्या बाहुयुद्धानें जीवलक्षास (लाखो लोकांस) आपल्याकडे ओढिलें ७ तो सर्वश्रेष्ठ समरयश.

धनु ताडुनि, दश सूतीं, तीस रथीं, बाण अर्पिले रामें.
ध्वज खंडुनि, कोपविला शत्रु, जसा भूत नृहरिच्या नामें. ११४
तों सज्ज करी दुसरें दृढ दशतालप्रमाण तो धनुतें;
शर हाणितां चि केलें विच्छिन्न वळें समस्तयोधनुतें. ११५
छेदी अरिच्या असितें मग जगदीशाग्रज, क्षमानाथा!
दुसरा हि खड्ग खंडुनि, वळ सर्वांचा हि डोलवी माथा. ११६
शक्ति हि निषादपतिनें पाठविली यदुवरास माराया,
ती धरुनि, तिणें चि वळें तो क्षत केला उरांत, बा राया! ११७
'खरशक्तिविद्ध होवुनि, मूर्छित पडला निषादपाळ कसा?'
म्हणसिल, पुससिल जरि, तरि दारुणनागीविषार्त बाळकसा.
अष्टाशीतिसहस्र क्रोधी परभेकं पन्नगा रामा
वेढिति निषाद राक्षस, जैसे त्या भक्तसन्नगारामा. ११९
नाना शस्त्रें ताडी परबळ रामा विषादरहिता तें,
केला, श्रीस्कंदाच्या, सयश व्हाया विषादर हि, तातें. १२०
परमहळें शत्रु बळें आकर्षुनि, सर्व मारिलीं मुसळें;
करिसील निषादबळें या प्रभुचें, काय वहिचें कुसळें? १२१
मांसें, रक्तें सेवुनि, करिती राक्षसपिशाच नृत्यातें;
गाती बलभद्राच्या, होवुनि अत्यंत तृप्त, कृत्यातें. १२२
केलीं, पसरुनि आस्यें, हास्यें, लास्यें, पिशाचयोषांहीं.
पापिगृहीं विपदांहीं जैसें पावोनि तोष दोषांहीं. १२३
तों एकलव्य, संज्ञा पावोनि, उठे, रणीं उभा राहे,
पाहे स्वनिषादक्षय, बहु शोककोध मानसीं वाहे. १२४
परजी परजीवनलयदक्ष गदा तो तदा महाशत्रु,

१. दहा ताडाच्या झाडाइतकें [ लांब ] २ अठ्ठयायशीं हजार ३ काजळी बेडूक. ४. भक्तरूपी उत्तम वृक्षाच्या उपवनाला. ५ दुःखरहित बळरामाला. ६. विष+आदर=हालाहलाचा सत्कार ( स्वीकार ) ७. भूतस्त्रियांनीं. ८ शुद्धि, भान.

धावुनि, बळभद्राचें सक्षत ताडुनि करी बळें जत्रु[1]. १२५
बळ हि गदेच्या ताडीं, धावोनि, निषादपा, तया पातें[2];
प्रेक्षक न शिवों देती, पावोनि विषाद, पातया पातें[3]. १२६
करिति गदायुद्ध असें बळभद्रनिषादराज, या नाकीं,
पाताळीं हि, बहु भिवुनि, वदले, 'येथें हि आज याना कीं?'
बळदेव, निषादेश्वर, सात्यकि, पौंड्रक नरेंद्र, हे चवघे
करिति गदारण दारुण; त्या काळीं लोक कांपले अवघे. १२८
क्षणदा सरली; भगवान् लोकांचा बंधु[4] जाहला उदित,
पहिल्याहुनि उग्र समर करिती चवघे हि वीर ते मुदित. १२९
बदरीहूनि निघाला, गरुडीं बैसोनि, सर्वशूरवर;
तों यांचे सिंहध्वनि परिसे प्रभु कृष्णनाथ दूरवर. १३०
जगदीश म्हणे, 'होतो संगर; हा सिंहनाद आर्याचा,
हा निश्चित सात्यकिचा; प्राप्त असे समय शेषकार्याचा.'[5] १३१
येवुनि पावे, पाहे प्रभु रणरंगीं बळादि यदुवीर,
निजपांचजन्यनादें दे त्यांतें, दर्शनें हि, मग धीर. १३२
नमिति, स्तविती, धावुनि, मुनि यादव, पाहतां हरि समोर;
कृष्णीं हे बहु, मेघीं सादर, परि नसति यापरिस, मोर. १३३
लोकाचें तम रविच्या, प्रभुच्या भय तेंवि जाय, आगमनीं;
त्या पौंड्रकनरपतिचें आणी अच्युत असह्य आग मनीं. १३४
प्रभु उतरुनि, सत्कारुनि, दे आज्ञा जावयासि पक्षीना;
त्या दारुकयुक्तरथीं बैसे, जो परमदासि रक्षीना. १३५
मग पांचजन्य दरवर हरवर[6]सत्पात्र वाजवी राया!
अत्यद्भुत रव हा बा! ऐकुनि, धरि मेघ लाज वीरा या. १३६
बळसात्यकि च न, नादें नारदपर्वत हि हर्षले खातें[7];

---

१. बाहु आणि मस्तक यांचा संधि–निर्णय० २ तडाख्यानें. ३. पापणी. ४ लोकबंधु (सूर्य) ५. अवतारांतील शिलकी कामगिरीचा. ६. श्रीकृष्ण. ७. आकाशांत.

पौरजनांत चि न, नृपा! कोंदे अत्यंत हर्ष लेखांतें. १३७
प्रभुतें पाहुनि, पौंड्रक, सात्यकितें त्यजुनि, तो महा धीट,
कृष्णाकडे चि जाया, युद्धार्थी वातसा निघे नीट. १३८
जाय प्रभुवरि पौंड्रक जों, तों सात्यकि पुढें उभा राहे,
त्यासि म्हणे, 'पहिला न त्यागावा, धर्म हा असा आहे. १३९
मज आधीं जिंक, बहो मग तूं या वृष्णिनायका रणगा;
करिसि प्रथमातिक्रम अयशस्कर, यासि काय कारण गा!?'
करुनि अवज्ञा, पौंड्रक, जावूं लागे तसा चि हरिवरि तो,
बा राया! ज्या प्रभुचा योगींद्रदुराप मुक्ति अरि वरितो. १४१
सात्यकि तया गदेनें, आधीं निर्भर्त्सना करी, ताडी;
देव म्हणे, 'येवूं दे बा! मायेहूनि बहु बरी ताडी.' १४२
सात्यकिस करी आज्ञा तो, ज्याचे भाट देव; वीरा या
प्रभु गांठि आपणासीं घालाया वाट देववी राया! १४३
प्रभुसि म्हणे तो पौंड्रक, 'कोठें होतासि तूं अरे गोपा!?
हो पात्र, नाम माझें घेवुनि, अपराध करुनियां, कोपा. १४४
तुज मारुनि, आप्त तुझे सर्व हि बुडवावयासि शोकांत,
आलों प्रख्यात यशें व्हाया मीं वासुदेव लोकांत. १४५
स्त्रीघाती, शिशुघाती, रे गोपा! तूं प्रसिद्ध गोघाती,
जी विजयेच्छा धरिली, पापा! करितों चि आजि मोघा ती.
माझें खरें सुदर्शन, माझी कौमोदकी गदा साची,
मीं शार्ङ्गी, स्वामीची सत्या आख्या जगीं, न दासाची. १४७
माझा चि सत्य नंदक खड्ग, तुझा स्पष्ट कपटनंदकसा.
करिसि कुचेष्टा; घेयिल, झांकाया तोंड, न पट नंद कसा? १४८
त्वां स्त्री, पशु शिशु मारुनि, गोपा! जो पोषिला, तया गर्वा
तुजसकट वासुदेव प्रभुवर मीं आजि नाशितों सर्वा. १४९

---

१. देवात २ बोलाव ३ रणांगणीं आलेल्या. ४. पहिल्याचा त्याग.
५. दुराप=मिळण्यास कठिण ६ ताडाचें मद्य

घे शस्त्र, सिद्ध हो, जरि सामर्थ्य असे करावया समर;
माझ्या चक्रें, दुस्तरदोषसमुद्रीं तरावयास, भर.' १५०
शर धरुनि, समक्ष असें तो पौंड्रक वासुदेव वडबडला,
श्वानाच्या सिंह, तसा प्रभु त्याच्या प्रलपितें न गडबडला.१५१
स्मित करुनि श्रीश म्हणे, "प्रभु तूं, प्रभुवदन नावरावयाचें;
कथिलें हि न कोणीं कीं, 'वदसी हें वद न नाव रायाचें'? १५२
'स्त्रीहंता,' 'गोहंता,' 'शिशुहंता,' म्हणसि मज, सुखें म्हण, गा!
धिक्कारितोसि, राज्या! धिक्कारावें जसें जनां भणगा. १५३
जरि वासुदेव चक्री असणें आपण चि काम, हा वा! हो;
मज गोपातें 'मारिन' म्हणसी, तरि उशिर कां महाबाहो!?
जो सत्य गदी, चक्री, शार्ङ्गी, तो वासुदेव राहेल;
साहेल स्फटिक, लटिक काच परीक्षा न, भंग पाहेल. १५५
'आपण सत्य चि' ऐसें वाटे मज, तुज हि; दिव्य हें युद्ध;
क्रुद्ध व्यर्थ न व्हावें; राज्या! उतरेल यांत, जो शुद्ध. १५६
कत्थन काय करिसि? हें करिति अधम न करितां हि कार्यातें;
विक्रम करुनि करावें; जनमत अभिमत नसे चि आर्यातें. १५७
असलिल शक्त, तरि करीं कत्थन, आधीं करूनि, वध माजा;
बडबडसि कां? चढ रथीं, शार्ङ्ग सुदर्शन धरूनि अधमा! जा."
ऐसें म्हणतां, आला माराया तोतया सजुनि; यानें
कुतुकें उत्साह दिला वा राया! तो तयासि जुनियानें. १५९
हाणी एक शर हळु च भगवान् कनकाक्षकाळ वीरा या,
देवर्षिप्रमुखसुकविसुखविस्तारार्थ चाळवी राया!. १६०
हाणी कपटसुदर्शनशार्ङ्गगदापाणि शर दहा राज्या!.
त्या हृदयें त्यांतें घे, श्रीच्या गजराजवरद हारा ज्या. १६१
अतिशीघ्र दारुकाला दारुणतर पचवीस शर मारी,

१ भिकारभाला. २. बडबड, घमेंडीचें भाषण. ३. सामान्य जनाचें मत. ४. पुराणें-पंत. ५. चिडवी, डवची.

एकैका तुरगातें दश दश, तो वासुदेव परमारी. १६२
प्रभुसि विशिखं सत्तर हा मत्त, रहाया स्वनामयश, हाणी.
वाणी म्हणे, 'जयाचा वर्णाया मीं प्रताप न शहाणी.' १६३
चित्तीं प्रभु मानवला धृष्टपणें वासुदेवका राया!
शर लागों दे त्याच्या कीर्त्यर्थें, जरि हि समर्थ वाराया. १६४
तोडी ध्वज, सारथिशिर; मारी च्यारी हि वाहे, बा! हरि तो
शार्ङ्गच्युतबाणांहीं रथ मोडी, देव विश्व जो करितो. १६५
मग किंचित् करि हास्य प्रभु, दावुनि हात हा तया मत्ता,
सत्ता सत्या दावी जो, बा! स्वविरक्ति नष्ट जसा दत्ता. १६६
भग्नरथावरुनि उडे, तो पौंड्रक पुंडरीकनेत्रास
माराया भिरकावी खड्ग, न धरि मृत्युचा मनें त्रास. १६७
त्या खड्गातें शतधा खंडी चंडीपतिप्रिय स्वामी;
तरि हि म्हणे, 'रे गोपा! तुज मारुनि, रक्षितों यशा स्वा मीं.'
प्रेषी पौंड्रक परमप्रभुतें पाडावयासि परिघातें,
त्यातें ही छेदी, जो देता शक्रासि शर्म अरिघातें. १६९
मग तो त्रिशंद्भार प्रखरतर पर स्वचक्र घे राज्या!
कैंचा विवेक, पडला षडरातींचा प्रसिद्ध घेरा ज्या? १७०
गर्जोनि म्हणे पौंड्रक, 'हरितों तव गर्व सर्व, गोपा! हें
आलें रे! तव मस्तक उडवाया, सावधान हो, पाहें.' १७१
ऐसें म्हणोनि, शतगुण फिरवुनि निजचक्र, वीर तो सोडी,
गर्जे हरिसा, परिसा, फार रसीं तोतयाचिया गोडी. १७२
उडुनि रथावरुनि प्रभु पौंड्रकनरराजचक्र तें चुकवी,
सुकवी कळिकाळवदन यन्नाम, स्तविति सर्व ज्या सुकवी. १७३
देव 'अहो धैर्यमहो वीर्यं राज्ञोऽस्य! दुःसहं जगति,'

---

१ बलाढ्य शत्रु २ घोडे ३. पार्वतीपति शंकराचा प्रियकर कृष्ण. ४. तीस भार वजनाचें ५ कृष्ण म्हणाला, "अहो! काय हें या राजाचें धैर्य व वीर्य! हें जगात दुःसह आहे" (पतानी 'राज्ञोस्य' असें लिहिलें आहे)

ऐसें वदला; आम्हीं वर्णावी शक्ति बहु न कां मग ती? १७४
चक्र चुकवितां पौंड्रक भूप झुगारी शिळा अआवरि तो,
सात्विक चि निरभिमान प्रभुपदपद्मांचिया रजा वरितो. १७५
सत्संगतिमातेचा सदनुग्रहरूप पदर ज्यावरि, तो
मोक्षातें ही सोडुनि, या श्रीपतिच्या चि पदरजा वरितो. १७६
कृत्येतें शुद्ध जसा, कृष्ण शिळेतें तसा नृपा! फिरवी,
ऐसा कोण त्रिजगीं, जो अजितप्रभुपुढें प्रभा मिरवी? १७७
यापरि सुचिर क्रीडे, मग भगवान् वासुदेव पर चक्रें
पौंड्रकमस्तक खंडी, जेणें केलीं च भस्म परचक्रें. १७८
त्याचा मस्तक आधीं, मागुनि समराजिरांत[2] काय गळे;
केला मुक्त असा ही; साधूंचे दाटतिल न काय गळे? १७९
भाव परम दृढ ज्याचा, 'मी चक्री, वासुदेव सत्य' असा,
बा! पूतना तरे, मग होयिल भगवत्स्वरूप तो न कसा? १८०
पौंड्रातें उद्धरुनि प्रभु जाय द्वारकेंत, बा राया!
मुदित सुधर्मेंत[3] वसे स्वजनाचा विरहताप वाराया. १८१
राम निषादवरातें धावोनि उरांत शक्तिनें ताडी;
आयुष्य शेष, यास्तव त्यातें काळाकडे न ती धाडी. १८२
तो एकलव्य भव्य स्तव्यगुणा अच्युताग्रजा वक्षीं
उग्र गदेनें ताडी, वीरांच्या ख्याति मेळवी लक्षीं. १८३
राम क्षोभे, शोभे, 'तो भेदो भेकसा,' म्हणे; स्वगदा
उचली दीर्घ भुजाहीं; भी तो त्या परमदाचिया अगदा[4]. १८४
'बळभद्रगदा हरिल स्वप्राणातें,' असें मनीं समजे;
भिउनि, निषादपति पळे; पुडवी केले रणीं बहु श्रम जे. १८५
हरि जेंवि गजामागें, त्याच्या पाठीस सगद बळ लागे,

१. श्रेष्ठ असा २. रणागणीं ३ 'सुधर्मा' हें कृष्णाच्या सभेचें नांव. ४. तो (एकलव्य) त्या शत्रूच्या गर्वाच्या औषधाला म्हणजे शत्रुदर्प नाहींसा करणाऱ्या बळरामाला भी (भ्याला)

देवी वदल्या, 'सखि हो! अयशःपंकें, पळोनि, मळला गे!.'
शिरुनि समुद्रीं, योजन पंच, द्वीपांतरीं दडाला हो!
परते बळभद्र, म्हणे, 'अपकीर्ति प्राप्त या जडाला हो.' १८७
जाय सुधर्मेंत नृपा! राम, पराभवुनि एकलव्यास,
ज्याचा प्रताप पाहे लयदहनाहूनि ऊन न व्यास. १८८
तों शैनेय हि आला, संपादुनि संगरांत विजयाला,
रामाला, कृष्णाला, बहु मानिति सर्व तेंवि निज याला. १८९
त्या दिव्य सभेमध्यें, उद्धव, अक्रूर, उग्रसेन, असे
यादव सर्व मिळाले, जेथें सहराम देवदेव असे. १९०
विप्रादिकांसि वंदुनि भेटे, तें सुख वदेल काय कवी?
नायक विश्वाचा त्या स्वजनासि समस्त वृत्त आयकवी. १९१
"मज सांबें शंकरप्रभु, करुनि कृपा, भेटला, अहो! याचा
प्राप्त प्रसाद झाला, कोणा हि कधीं हि जो न होयाचा. १९२
भक्तीं प्रेम प्रभुचें तें अतुळ अनंत काय सांगावें?
गावे शिवगुण चि, न पर; कां हंस त्यजुनि वायसां गावें?
बुध हो! बहु काय वदों? केलें श्रीशंकरें मम स्तवन;
शोभविलें या प्रभुनें विश्व, वसंतें जसें समस्त वन. १९४
मद्भक्त बहु प्रेमळ बदरींत पिशाच पाहिले, हो! ते
पाठविले स्वर्गातें, भव्य मणि चुकोनि राहिले होते. १९५
करुनि प्रसन्न आलों अतिवत्सल बाप तेंवि शंकर हा,
'शिव, शिव,' म्हणा सुमति हो! नाशिल जें पाप, तें, विशंक रहा."
प्रेमें बहु प्रशंसुनि ते यादव सर्व देवदेवातें,
गेले स्वगृहा, मग जें वैदर्भीगेहवृत्त, सेवा तें. १९७
अंतःपुरांत भेटे वैदर्भीयुक्त सत्यभामेला,
शंभुप्रसाद सांगे, ज्या परिसुनि अरि म्हणोनि 'हा!' मेला.
कृष्ण म्हणे, "पुसुनि तुम्हां मीं गेलों; शंकरें दया केली;

१. मळयाप्रीपेक्षां. २. आप्त. ३ अबेसह. ४ सुंदर रत्नें म्ह० भक्तश्रेष्ठ.

बहु रुचती भक्तांची सत्कृति, अन्या नको तया केली. १९९
झाले अभद्र, न भजुनि, अत्यंत भजोनि शंकरा बरवे,
जो प्रभु म्हणतो, 'रंका! हो रवि; होवूनि रंक, राब रवे!.'[1] २००
दर्शनहर्षे भुलली, सर्वेश मनोरथा परि समजला,[2]
प्रभु गौरविता झाला, देवुनि वर शिखिरथापरिस[3] मजला."
केल्या प्रमुदितहृदया, सांगुनि परम प्रिय, प्रियाअजितें;[4]
अजि! तें सुयश कविजना गाया सप्रेम आपणा सजितें. २०२
भूसुरें[5] सर्व सुखविले नमनें, स्तवनें, सभाजनें,[6] दानें;
कोठें दुःख नुरविलें, इष्ट पुरविलें स्वकीर्तिच्या गानें. २०३

---

# अध्याय बावन्नावा.

जनमेजय भूप म्हणे, 'बा वैशंपायना! कथा आतां
वद हंसडिंभकांची. निववी हरियश चि ऐकतां, गातां.' १
वैशंपायन सांगेः-शाल्वांत 'ब्रह्मदत्त' या नावें
होता राजा, ज्याचें यश शक्राचें तसें चि वानावें. २
त्याच्या दोघी भार्या, त्या अनपत्या, नृपा! सदा खिन्ना,
दिसल्या देहें मात्र, ज्ञानें, शीळें, न त्या सती भिन्ना. ३
मित्रसहाख्य ब्राह्मण योगीश्वर नृपतिचा सखा होता,
तो ही अनपत्य नृपा! बहुमान्य सुहितँ,[7] जसा मखा होता. ४
भार्यांसह आराधी पुत्रार्थ ब्रह्मदत्त भर्गातें,
यमनियम स्वीकारुनि, जिंकुनि सत्वें हृषीकवर्गातें. ५
मित्रसह महामुनि ही वैष्णवसत्रें हरीस आराधी,
पारा धीरजना जो नेता, देवूनि शांतिसारा धी. ६

---

१. हे सूर्या! तू रंक होऊन चाकरी कर. २. माझें मन गोंधळलें. ३ कार्तिकस्वामीपेक्षा. ४. रुक्मिणी व सत्यभामा. ५. ब्राह्मण. ६. पूजेनें. ७. हितकार्‍यां. ८. रमण करणारा. ९. इंद्रियसमूहाला.

स्वप्नीं दर्शन देवुनि, पुत्र नृपा देवदेव दे दोघे,
प्रार्थूनि पांच वर्षें, प्रभुपासुनि एक विप्र ही तो घे. ७
तो ब्रह्मदत्त भूप श्रीरुद्रवरेंकरूनि सुत पाहे,
हंसाख्य ज्येष्ठ, दुजा डिंभकनामा, वरूनि सुतपा, हे. ८
मित्रसह मुनि हि पावे, न चळों देता, सुरूप सुत, पातें,
हरिसा अरि सा दमिता, अमितामळगुण[1], करूनि सुतपा तें.
मुनिचा पुत्र जनार्दन साधु जनार्दनवरें, सुत तिघे ते
झाले सखे, कळांची विद्यांची गुरुमुखें सुतंति[2] घेते. १०
सद्गुण जनार्दन चि, वा! वक्षीं[3] च न लक्ष्म वत्सें, 'मानव' या
म्हणुनि म्हणति जन; नृपसुत जे हा तन्मित्र तत्समानवया[4]. ११
ते नृपनंदन दोघे संवत्सर पंच हिमनगीं तपले,
खपले न निराहार हि, पंचाक्षर मंत्र सर्वदा जपले. १२
झाला प्रसन्न ईश्वर, भेटोनि, म्हणे तयांसि 'वर मागा,'
लज्जित करि देवांच्या ज्याच्या पदपद्मरेणु परमागा[5]. १३
नमुनि प्रांजलि वदले, 'आम्हीं व्हावें अवध्य दनुज्यांस,
दितिज्यांस, अदितिज्यांस हि, राक्षसगंधर्वसर्पमनुज्यांस. १४
जीं पाशुपतप्रमुखें अस्त्रें द्यावीं महेश्वरा! सर्वें,
स्वपरशु हि, सहाय रणीं भूत हि दोघे बळी, तुवां शर्वें. १५
द्यावें अभेद्य कवच हि, अच्छेद्य तसा चि चाप दे हातीं;
इतरांचीं शस्त्रास्त्रें जीं, देवुत या न ताप देहा तीं.' १६
प्रभु 'एवमस्तु'[6] ऐसें बोलुनि, दे एक भृंगिरिटिनामा,
कुंडोदराख्य दुसरा, त्यांच्या पुरवावया रणीं कामा. १७
वर देवुनि वरदेश्वर अंतर्हित होय; सिद्ध ते झाले,
ल्याले प्रसादभूषा, ते डिंभकहंस, निजपुरा आले. १८
वदुनि, निजवृत्त कथिति ते तात ब्रह्मदत्तराज्याला,

१ अत्यंत सद्गुणी २ उत्तम परंपरा. ३. फक्त त्याचें वक्षःस्थळ वत्सांकित नव्हतें
४ त्यांच्या च वयाचा. ५. कल्पवृक्षाला. ६. तथास्तु, ठीक आहे.

तन्मित्रा मित्रसहा, झाला विष्णुप्रसाद बा! ज्याला. १९
सप्रेम भेटले ते श्रीहरिभक्ता जनार्दना मित्रा,
त्या हरिहरभक्तांसीं झाल्या जनमेजया! कथा चित्रा. २०
बहु शांत, दांत, झाला सिद्ध जनार्दन हि विष्णुच्या भजनें;
बहु मित्रसह निवाला सद्पत्यें, तस जन जसा व्यजनें. २१
कृतदार[1] तिघे देती सुख तातांतें, तसें चि मातांतें.
जें हंसडिंभकांसीं कृष्णासीं वैर, परिस आतां तें. २२
मृगयेसि हंसडिंभक सजनार्दन एकदा वनीं गेले;
क्रीडा करूनि पुष्करतीर्थनिकट कटकयुक्त ते ठेले. २३
तेथें कश्यपमुनिकृतवैष्णवसत्रोत्थवेदनादांतें
परिसुनि, जावुनि नमिती सजनार्दन ते मुनींद्रपादांतें. २४
त्या विप्रांहीं त्यांचें केलें, आतिथ्य जें उचित, राया!
कीं, साधु भूतमात्रीं हरि देखति, व्हावया शुचि, तराया. २५
हंस म्हणे, "जन्मप्रद आम्हां जो ब्रह्मदत्त, सन्मुनि हो!
'तो राजसूययाजी,' म्हणतां, 'सुरराज तेंवि जन्मुनि हो.' २६
आम्हीं, जिणुनि नृपांचीं, भव्य करविणार राजसूय, शतें;
अस्मत्प्रसू[2] मिरविती जें, कोणी ही न राजसू यश तें. २७
आम्ही समर्थ, शक्र हि शक्त न आम्हांपुढें रहायास,
झालों अजय्य विश्वीं शंभुवरें, न करितां महायास. २८
घेवूनि अग्निहोत्रें यावें अस्मत्पुरा, अहो! मुनि हो!
व्हावें सुखें सदस्य[3] चि, जो अक्षम, तो श्रमी, न होमुनि, हो."
मुनिवर म्हणति, "बहु बरें, न म्हणे यज्ञास सर्व ही 'नाहीं,'
ऋत्विक् सदस्य व्हावें विद्यासामर्थ्यगर्वहीनाहीं. ३०
येवूं, दीक्षा देवूं," ऐसें बहु गोड बोलिले विप्र,
पुसुनि तयासि, निघाले तेथुनि ते हंसडिंभक क्षिप्र. ३१
ते पुष्करोत्तरतटीं जातां तेथुनि धरावरा[4]! गेले,

---

१. विवाहित. २. आमची माता. ३. सभासद. ४. राजा!

सुयतींवरि मूढ, जसे कनकघटांवरि शरावें, रागेले. ३२
दुर्वासा रुद्रात्मा, त्रिभुवन दृक्पात नाशिते ज्याचे,
हंसे, परमहंस, बहु च्छात्र, ब्रह्मज्ञ, राशि तेजाचे. ३३
ते हंसडिंभक तया म्हणती, "हा कोण भूतसा पापी?
या तीर्थ, तरि म्हणावें कां न 'क्षीर प्रभूत' साप्रा 'पी'? ३४
करिति, गृहाश्रम सोडुनि, अन्याश्रमकल्पना कशाला हे?
नृपयम, यांपासुनि, जो दांभिक, तो अल्प ना कशा लाहे. ३५
या लोकीं, परलोकीं, शर्म न या कुपथकल्पका कांहीं,
याहीं गृहाश्रम, जसा मानावा हंस अल्प काकांहीं." ३६
यतिपति दुर्वासा जो, त्यातें वदले, 'बुडोनि, अन्यास
बुडवाया केला हा मंदा! त्वां प्रकट काय सन्यास? ३७
चुकलास, स्वसुखाला मुकलास, स्पष्ट मूर्ख गमलास,
भ्रमलास, श्रमलास, व्यर्थ कसा दुष्पथांत रमलास? ३८
श्रेष्ठ गृहाश्रम चि धरा, दंडिन, न करील अस्मदाज्ञा, त्या;
समजे विलंघितां हे, दवकीलासी च भस्मदा ज्ञात्या.' ३९
मुनि लंघितां तयांहीं मार्गीं, सन्निधि जसा अनयनाहीं,
चित्तीं म्हणे जनार्दन, 'बहुत असति, परि असा अनय नाहीं.'
भ्याला सविनय, झाला कंपित, कीं तो तपोर्णवीन मुनी
व्हाया प्रसन्न, पोटीं घालाया आगं तें, पदीं नमुनी. ४१
त्यातें दटावुनि म्हणे, "नृप हो! करितां क्षयार्थ अन्याया,
मुख्याश्रम हा, कीं हो! भजति ज्ञाते, त्यजूनि अन्या, या. ४२
बहुधा म्हणणार, तुम्हीं ऐसे अतिमंद मातंगे 'हा!' ची,
ज्ञानाश्रमापुढें रे! वदतां हे काय मात गेहाची? ४३
ज्ञान परम धर्मांचें साधक आहे जगांत, इतरांचें

---

१. मातीचे घट. २. सन्याशाचे भेद आहेत ३. चाबूक, फटके. ४. अग्निज्वाळे-सारखी. ५. द्रव्याचा उत्तम ठेवा, ६. आंधळ्यानीं. ७. तपःसमुद्र ८ अपराध. ९. गृहस्थाश्रमाची.

तुमचें अघसाधक हें शोकार्त करील हृदय पितरांचें. ४५
हा ! हा ! खळसख्यास्तव पडलों हि, पडेन ही, महाविषमीं;
अन्याय कराल असा जरि, तरि सेवीन दहन कीं विष मीं."
ऐसें वदे जनार्दन, कवि हि रडे, बा बुधा ! रसा[1] हि रडे
कीं, लंघिति भगवंता त्यासि, जसे जड सुधारसा हिरडे. ४६
उग्रें एकें नेत्रें दुर्वासा त्या खळांकडे पाहे,
सौम्यें अपरें नेत्रें देखत चि जनार्दनानना राहे. ४७
तो यतिपति अतिकोपन, लोप न व्हाया स्वशुद्धधर्माचा,
शिष्यांसि म्हणे, 'येथुनि शीघ्र निघा, देश हा न शर्माचा.'
वदला जनार्दनातें, 'सत्वर येथूनि तूं हि बा ! निघ रे !,
शांता कुसंग तापद; घन हि घृत ज्वलनसंगमें विघरे.' ४९
त्या दोघां मत्तांतें श्रीदुर्वासा म्हणे, 'अरे खळ हो !
पळ होमा तुमच्या मज न लगे, न क्रोधवह्निचें बळ हो. ५०
ऐसें कोण मजपुढें बोलेल? क्षुद्र हो ! उठा, राजे
ऐसे चि खळ, वचकले न मनीं रामाचिया कुठारा जे. ५१
ब्रह्मण्य कृष्ण भगवान् तुमच्या सत्वर हरील दर्पातें,
लीलेनें चि हरितसे, जैसा विनतातनूज सर्पातें.' ५२
ऐसें वदे, निघे मुनि; घे तत्कौपीन[2] हंस हिसकून,
साहे यतिपति भगवान्, त्यां भस्म करावयास हि सकून. ५३
'हा ! हा !' म्हणत पळाले यति अतिभयविकळकाय तेथून;
ऐसे प्रमत्त जे खळ, घेतिल बा ! म्हणुनि काय ते 'थू' न? ५४
वारुनि म्हणे जनार्दन, "हें साहसकर्म काय रे हंसा !?
क्षोभुनि म्हणेल कीं रे ! वरद हर तुम्हांसि, 'दुष्ट हो ! ध्वंसा.'"
साहे अत्यपराधा, सत्यंपरा धाक देखत्यां[3] झाला;
मुनि मंद मंद ऐसें, क्रोधगरळ गिळुनि, बोलिला त्याला. ५६
'स्वपदाश्रितजनपीडक जे, त्यांतें नेतसे हरि लयाला,

१. पृथ्वी. २. त्याचें वस्त्र. ३. पाहणाऱ्या जनार्दनाला.

हा गर्व सर्वनाशक, शर्वप्रियदेव[1] तो हरिल याला. ५७
न च करिल असें तुमचा बंधु जरासंध, साधु तो व्यक्त,
भक्त ब्रह्मकुळाचा, सज्जनसंरक्षणाचेंहीं सक्त. ५८
त्यजिल यतिद्रोहें तो तुमचें बंधुत्व; जरि न सोडील,
धर्म बुडेल तयाचा; मगधेंद्र जगीं अकीर्ति जोडील. ५९
जा रे! दृष्टिपुढुनि जा, हंसा! कंसारि गर्व नाशील,
ज्या शील त्यजितें, त्या कां न त्रैलोक्यनाथ शासील?' ६०
प्रणता जनार्दनातें मग दुर्वासा म्हणे, 'अगा साधो!
स्वस्ति असो, तुज बाधो न भव, सदा भक्ति विष्णुची साधो.
तुज भगवत्संग घडो, विप्रेंद्रा! दुष्टसंगदोष झडो,
त्रासें अरिवर्ग दडो, साधुत्व तुझ्या गळां सदैव पडो. ६२
जा स्वगृहातें, वत्सा! शुद्ध यशें शात्रवाननें[2] मळिव,
अस्मत्स्मरण असों दे, स्वपित्याला सर्व वृत्त हें कळिव.' ६३
दंड, कमंडलु भंगुनि, मांसें त्यांच्या स्थळांत भाजवुनीं,
अतिमत्त हंसडिंभक गेले, असुरादिकांसि लाजवुनीं. ६४
त्यामागूनि जनार्दन, वंदुनि आत्रेय[3]मुनिवरा, गेला,
साधुसभा पाहुनि खळ, चोर विलोकूनि पुनिव, रागेला. ६५
पंचसहस्र मुनिसह, श्रीदुर्वासा हि हरिपुरा गेला,
तापूनि म्हणे, 'प्रभुवरि हि, केवळ मजवरि च न, रिपु रागेला.
घेववि भग्नकमंडलुदंडादि पदार्थ हरिस दावाया;
कीं, दुःसह साधूंसीं केला स्वीयाहिपरिस दावा या. ६७
एकें चि अहोरात्रें तेथूनि द्वारकेसि[4] तो पावे,
ज्याच्या तेजें शक्रप्रमुखांचे हि प्रताप लोपावे. ६८
स्नान करुनि वापींत, प्रभुच्या द्वारीं मुनींद्र तो पावे,

---

१. शंकराला प्रिय देव जो कृष्ण तो २. शत्रूंचीं तोंडें. ३. अत्रिपुत्र जो दुर्वासा त्याला. ४. द्वारकेला.

[1]ऐसें त्यास कळविलें, जेणें पुरुषार्थ सर्व ओपावे. ६९
यतिवृंदसहित नेला तो दुर्वासा सभेंत, पद नमुनीं;
[2]म्याले यादव म्हणती, 'कां दिसतो अप्रसन्नवदन मुनी?' ७०
स्वकरें आसन मांडुनि, दुर्वासा बसविला रमारंगें;
तो ही सुखासनावरि, जो यतिजन पातला तयासंगें. ७१
पूजुनि म्हणे प्रभु, 'वदा, न कळे मज, कोण हेतु आगमनीं.'
या प्रश्नें बहु आला मुनिच्या पहिला[3] असो[3] नें राग मनीं. ७२
दुर्वासा प्रभुसि म्हणे, "वदसी न कळे असें कसें व्यक्त.
सर्वज्ञ, सर्वसाक्षी तूं, आम्हीं तत्व जाणतों भक्त. ७३
तूं साक्षात् ब्रह्म, मला वंचिसि, कृष्णा! न हें तुला युक्त,
जड अज्ञानापासुनि झाले त्वच्चरणचिंतनें मुक्त. ७४
प्राकृत, अभक्त, नेणति; परि आम्हीं जाणतों तुला पुरतें,
स्फुरतें[4] त्वद्रूपीं जग, गंधर्वांचें जसें नभीं पुर तें. ७५
प्रकट[5] करुनि, नाशाया जाड्या, दुःखा, अघा, वैरा काय,
'न कळे' या त्वच्छब्दें होयिल दुसरा न घावरा काय? ७६
आम्हीं च अभाग्य जगीं, करुण, ज्ञाता हि, न स्मरसि कांहीं;
हें काय बरें, व्हावें विघ्नज्वलनांत भस्म रसिकांहीं? ७७
अति साहस हें, म्हणसी 'न कळे' सकळेश तूं कसें स्पष्ट?
जरि नेणसि, सर्वज्ञा! कृष्णा! तरि परिस, कळवितों कष्ट. ७८
आहेत हंसडिंभक अतिखळ बळमत्त, मत्तपा अरि ते
करिते झाले विघ्न, श्रीशा! मदसिंधु जे कधीं न रिते. ७९
म्हणती गृहाश्रमास[6] चि 'हितकर' ते, यां 'न' मत्त पोर 'हित';
आम्हां 'धर्मविनाशक, दांभिक, जड, दंड्य, सत्तपोरहित.' ८०

१. द्वारपाळानें, पहारेकऱ्यानें. २. श्रीकृष्णानें. ३ हंसडिंभकाचा सुद्धां आला नव्हता इतका ४. आकाशांत ज्याप्रमाणें गंधर्वनगराचा आभास होतो तसा तुझ्या रूपावर च जगदाभास होतो. ५. सुंदर शरीर धारण करून. ६. चतुर्थाश्रमास.

हे भंगिले कमंडलु, केलों मीं नग्न, भग्नदंड, पहा;
मोडावा काय तिहीं मोक्षाश्रमशांतिवाह्निमंडप हा? ८१
हे शालग्रामांचे संपुट, केले पहा कसे तुकडे!
बुडत्याकडे, न कथितां, अघ, अयश, दिल्या न हाक, सेतुकडे.
केले अजय्य वरदें रुद्रें, पाजूनि अमृत साप तसे,
पाप तसे ते चि जगीं, तत्तेजें साधु सर्व तापतसे. ८३
बा! त्यांपुढें टिकाया शक्र हि न समर्थ, काय मग अमर?
न करिल अधीनमृत्यु हि भीष्ममहाराज, बाह्लिक हि समर.८४
सर्वक्षत्रभयंकर मागध ही फार यास भीताहे,
रावणसम तो गमतो सानुज, तव पुण्यकीर्ति सीता हे. ८५
त्यातें वदलों, 'नाशिल कृष्ण तुझा सर्व गर्व हंसा! रे!'
संसारेच्छाशमना! तें सत्य करीं मदुक्त कंसारे!. ८६
जरि हंसडिंभकांचे करिसिल चक्रानळीं न हुत काय,
तरि 'रक्षिसि' हा शब्द व्यर्थ चि होतो, वदों बहुत काय?"
नमुनि श्रीकृष्ण म्हणे, "स्वामी! माझा चि होय हा दोष,
रोष स्वांतीं न धरीं, देयिन, दुष्टांसि दमुनि, मीं तोष. ८८
शक्र, यम, वरुण, धनपति, विधि किंवा त्यांसि हर असो वरद,
पर दक्ष असो वधिन चि; मम शर खर, तक्षकाहिचे न रद.
होयिल सर्वक्षत्रियकाळ मगधपाळ ही जरि सहाय,
तरि हि म्हणाया लाविन बा! विनयानास्पदा अरिस 'हाय!.'
जा, स्वस्थ समाधि धरा, तुमचें याउपरि चित्त साधि न हो,
सद्रक्षण भद्र क्षण न विलवुनि, कीर्तिवित्त साधिन हो!." ९१
दुर्वासा प्रभुसि म्हणे, 'स्वस्ति सदा तुज असो, अगा धात्या!
तूं चि अगाध, न सागर, लाजविसि दयार्णवा! अगाधा त्या.
तूं मीं, मीं तूं, तरि हि प्रार्थितसें बा! तुला अगाधाला,
वदलों कटु, क्षमावें, तुज चि भजुनि जन, न त्या अगा, घाला.'

---

१. सन्यासाश्रम. २. इच्छामरणी. ३ दात ४. विनयरहिताला. ५. कल्याणकर.

कृष्ण म्हणे, "भगवंता! त्वां चि करावि क्षमा, न कोपावें,
ओपावें अभय, अशन व्हावें चि, 'पुरे' म्हणों-नको, पावें." ९४
मुनिवर म्हणे, 'बहु बरें,' प्रभु करवि चतुर्विधान्न, बहु तर्पी,
सर्वांसि मृदु दुकूलें फाडुनि, कौपीन, शाठिका अर्पी. ९५
प्रभुसि पुसुनि, वरकड यति गेले, सन्यासिराज तो राहे,
नारदमुनिसह शुद्धब्रह्मात्मविचार सार बा! पाहे. ९६
त्या काळीं तातातें हंस म्हणे, 'राजसूय तूं यज्ञ
आरंभीं, नृप जिंकुनि, आम्हीं बहु आणितों धनें, रत्नें.' ९७
त्यातें म्हणे जनार्दन, "हंसा! साहस करावया स्वमतें
झालासि सिद्ध, तात हि म्हणतो 'हूं!' परि मला कठिन गमतें.
असतां भीष्म महाबळ भूवरि, बाह्लिक नरेंद्र ही असतां,
असतां यादव बा! दव शत्रुतृणांचा मुकुंद ही वसतां, ९९
'इष्टि' परि 'करिन' म्हणसी, पण कैसा राजसूयसव घडतो?
गुरु राम जिंकिला ज्या वीरवरें, भीष्म काय सवघड तो? १००
वीर्य जरासंधाचें जें समरीं, जाणतोसि हंसा! तें;
बा! बाळ कृष्ण वधिता झाला, केशीं धरूनि, कंसातें. १०१
तूं 'क्रतु करीन' म्हणसी, पण सीरायुध रणीं न आटेल,
फाटेल स्पष्ट हृदय, तो साक्षात् क्रुद्ध काळ वाटेल. १०२
केला विरोध ज्यासीं, तो यतिपति केशवाकडे गेला,
मज वृत्तांत श्रुत हा सद्विप्रें भोजनागतें केला. १०३
क्रतु साधीं, पण आधीं मंत्र करायासि बा! वहा सचिव,
पाया हा या यज्ञप्रासादाचा सख्या! बरा रचिव." १०४
तो हंस म्हणे, "सखया! काय भिववितोसि? भीष्म तो दर्शमी;
लीलेनें चि तयाचें हरिन क्षण ही न लागतां यश मीं. १०५
कृष्ण हि काय मजपुढें? काय हलायुध, जयां सुरा सुरसा?

१. भोजन. २ [रेशमी] वस्त्रें. ३ छाट्या ४ यज्ञ, सव ५. बळराम.
६ जेवावयास आलेल्यानें. ७. वृद्ध ८ ज्याला मद्याची अत्यंत आवड असा.

प्रासवरा मज सात्यकि मायाविवरा मयासुरा सुरसा. १०६
मागध तो धर्मात्मा हा बंधु चि, कार्य आमुचा मख या,
न खयानेस्था दुस्तर सिंधु, सव शिवाश्रिता मला, सखया !.
जा द्वारकेसि, आज्ञा कृष्णास स्पष्ट सांग कीं, 'लवणें
आणूनि, राजसूया ये.' धाडूं आत्मसम दुजा कवण? १०८
माझा शपथ तुज असे, म्हण, सखया ! न करितां, नकारा, 'हूं.'
बळकृष्णांसि म्हणे, 'लवणकर घेवुनियां चला, नका राहूं.'"
झाली जनार्दनाला मान्या आज्ञा तसी च हंसाची,
भगवद्भक्तश्रेष्ठा त्या अक्रूरा जसी च कंसाची. ११०
जाणे, 'आज्ञालंघन सोसिल न क्रूर साप हा;' याला
पुसुनि, प्रेमें प्रभुतें गेला अक्रूरसा पहायाला. १११
बसुनि सदश्वीं, जातां द्वारवतीच्या धरूनि वाटेतें,
निजधन्यत्व तयां जें, या हि, प्रभुतें स्मरूनि, वाटे तें. ११२
खळसंसर्गें होतो पुरुषार्थयशांत फार जरि तोटा
खोटा, तरि तो मानी हंसासीं मित्रभाव हित मोटा. ११३
मिळतां सुदुर्लभ अमृत, तृषित न जायील कां तडक राया !?
बा ! वत्स सोडितां ही, लागे, सुटला हि, तांतड कराया. ११४
हांसे द्वारवतींत द्विज बहुबहु, पाहतां हरि समोर;
नीरद गर्जे, वर्षे, हर्षे, परि बहु न यापरिस मोर. ११५
युयुधान पुढें, पार्श्वीं नारद, बळभद्र ज्याजवळ आहे,
यतिपतिसीं कृतकथ, यदुराजपुरस्कृत, अशा प्रभुंसि पाहे. ११६
स्वमनीं म्हणे जनार्दन, "लाजवितो भास्करासि वरदेहें,
कैसा मीं प्रभुसि म्हणों, 'हंसाला लवणरूप कर दे' हें? ११७
ब्रह्मण्य, सर्वसाक्षी, सदय, मला न च म्हणेल 'अपराधी,'

---

१ मायाव्यात श्रेष्ठ अशा २. विमानात बसलेल्याला ३. मीठ ४ अक्रूराला. ५. बाईट. ६ मेघ ७. केलें आहे भाषण ज्यानें असा–निर्णय० ८. उग्रसेन.

नमुनि, विशंक वदावें, उचिता प्रभुच्यापुढें न अपरा धी." [1] ११८
करुनि विचार दृढ असा, प्रभुसि सुधर्मेंत तो करी नमन,
घालुनि, उडी, म्हणे जो करुणार्णव, 'हृष्ट हो करीनमन.' ११९
मग रामातें वंदी, होय प्रोद्भूतपुलक, [2] राया! तें
प्रेम प्रभुनें चि दिलें, त्याचें अतिधन्य कुल करायातें. १२०
'मीं हंसडिंभकांचा दूत ब्राह्मण जनार्दनाख्य असें,'
कळवी खळवीर्यतिमिरसूरा [3] शूरान्वयोत्तमा [4] सि असें. १२१
देव म्हणे, 'दूतपणें जरि तूं आलासि शिष्ट, रामातें
सांग निरोप, तसा चि प्रकट, अधिष्ठूनि विष्टरा, [5] मातें.' १२२
बसला जनार्दन, तया कुशळ पुसे विश्वगुरु, करी धन्य,
मित्रसहाचें हि; असा न पिता हि असेल; कोण हो! अन्य? १२३
जो ब्रह्मदत्तराजा, जे तत्सुत हंसडिंभक क्षुद्र,
त्यांचें ही कुशळ पुसे, वर देता जाहला जयां रुद्र. १२४
प्रभु मग संदेश [6] पुसे, करि बहु संकोच विप्र सांगाया,
देव म्हणे, 'अभय असे; वद, तूं संकोचलासि कां गा! या?'
प्रार्थुनि जनार्दन द्विज सांगे संदेश अभयवरदासः—
"रुद्राचे ते मागति तुजपासीं लवणरूप कर दास. १२६
तो ब्रह्मदत्तराजा करिताहे राजसूय. जाणावें;
तुज हंसडिंभकांची आज्ञा कीं, 'विपुळ लवण आणावें'." १२७
हास्य करि प्रभु; नारद, दुर्वासा, उग्रसेन, बळभद्र,
अक्रूरोद्धव, सात्यकि म्हणती, 'पावेल कोण खळ भद्र?' १२८
भगवान् म्हणे, 'न झाले मज करिते कवि जगीं कवण करद?
बहु निपुण हंसडिंभक; कां हो! न करितिल हे लवणकरद?'
जगदीशातें जे जड म्हणती कीं, 'लवण आण वाहोन,'
बहु हास्य काय? त्याच्या कदना कवि कवण आण वाहो न?

---

१. दुसरी बुद्धि किंवा कल्पना. २. रोमांचित ३ सुर=सूर्य ४ अन्वय=वंश, कुळ. ५. आसनावर बसून. ६ निरोप.

लाजे जनार्दन, कथुनि तैसा बहु हास्य[1]हेतु संदेश,
होय अधोवदन, म्हणे, 'ते हि तन्मित्र मीं हि मंदेश.' १३१
श्रीकृष्ण म्हणे, "विप्रा! त्या हंसा, डिंभका, असें सांग,
'शार्ङ्गप्रेषित खरतर शर देतिल लवणकर तुम्हां चांग. १३२
अथवा इच्छितसा जें, येतो द्यायासि नंदक, लेहा[2] तें.
चक्र च्छेदिल शिर, जरि याल तुम्हीं जाड्यकंद[3] कलहातें. १३३
योजा प्रयाग, मथुरा कीं समरस्थान तीर्थ पुष्कर, हा
मीं झालों सिद्ध, तुम्हीं व्हा, किंवा मुख करूनि शुष्क रहा.
वरद महेश्वर हि तुम्हां समरीं होयिल सहाय जरि काय,
त्यास हि जिंकुनि, तुमचे शतखंड रणीं करीन तरि काय.' १३५
त्यांपाशीं मित्रत्वें तुजला न च बोलवेल हें, भक्ता!
तुजसह या सात्यकिला पाठवितों, हा असे महावक्ता. १३६
मत्स्नेह असे तुजवरि, तूं ही आहेसि भक्त वरशील[4],
हो मत्कथापर सदा, विजयी होशिल, भवांत तरशील." १३७
सात्यकिस म्हणे प्रभुवर, "घटजमुनि जसा सरस्वदोघांतें[5],
शोषू प्रताप माझा द्रुत, न म्हणो त्या 'परस्व' दोघांतें[6]. १३८
जा करुनि समरनिश्चय, ये सत्वर सत्वरक्षणा, वीरा!
ती राजश्री लाजो, रविस शशिश्री, तसी तुला धीरा!" १३९
प्रभुतें नमुनि, जनार्दनसह सात्यकि वीर शाल्वपुर पावे,
जेणें परभट शस्त्रें, जेंवि तृणांकुर, समूळ खुरपावे. १४०
एकीं तुरगीं बैसुनि सात्यकि असहाय परपुरीं गेला,
हंसा जनार्दनें तो भेटविला, स्थान जो यशें केला. १४१
'हा सात्यकि दक्ष भुज प्रभुचा,' हें विप्र तो तया कळवी;

१ हास्यास्पद, हसण्यास कारण २. पावा (तुम्हास मिळो). ३. मूर्खपणाचे गड्डे ४ उत्तम स्वभाव आहे ज्याचा असा ५ समुद्राच्या ओघाना. ६ माझा प्रताप त्या दोघाना "परस्व" म्ह० "हें परक्याचें द्रव्य आहे, मी कसें घ्यावें" असें न म्हणो.

असती[1] जसी पतीस प्रेरुनि, कुनियति जया गुरुच्छळ वी. १४२
मग तो त्या सद्विप्रें डिंभासीं वृष्णिवीर भेटविला,
क्रोधाग्नि प्रभुलंघनवातें ज्याच्या मनांत पेटविला. १४३
हंस पुसे कृष्णाचें कुशळ, बळाचें, तसें चि अन्याचें;
सांगे सस्मित सात्यकि म्हणुनि तथा सर्वधन्यधन्याचें. १४४
त्यावरि वरदर्पित तो हंस पुसे त्या जनार्दना आर्या,
'त्वां कृष्ण देखिला कीं? सिद्ध करुनि पातलास कीं कार्या?'
विप्र म्हणे, "हंसा! मीं झालों कृतकृत्य कृष्ण पाहून,
प्रभुदर्शनसुख बहु, बा! न गमे बहु मोक्षसुख हि याहून. १४६
दर्शनसुख मीं जाणें; हृदयीं, नयनांत, रेखिला हरि तो;
क्षमापा! बापा! तापा पापा मापाल[2] देखिला हरि तो. १४७
नारदमुनि, दुर्वासा, कृष्णप्रभु चंद्रमा, चकोरा यां[3];
त्रिभुवनपति अतितेजा, त्याला 'कर दे' म्हणों नको राया!.
होसिल दंड्य, हठातें, संपादायासि लवणकर, करुनीं;
काळें बद्ध न केला पाशाहीं तदरि कवण करकरुनीं? १४९
हरिसीं शशसा, क्षम तूं त्या प्रभुसीं न कळहा, निरोपानें
बहु हांसला अजित हरि, करिल तुझी सकळ हानि रोपानें.
दादुनि दुराग्रहातें न मनीं आणून कोंचकी[4] नाशीं;
प्रभुचा प्रसाद हंसा! थोडा जाणूं नको च कीनाशीं[5]." १५१
हंस म्हणे, 'रे ब्राह्मणदायादा[6]! वदसि काय वाचाळा!?
तुज लाविला खरा त्या बहुमायें[7] केशवें चि हा चाळा. १५२

---

१ जसी असती (जारिणी) पतीस प्रेरुनि (हट्ट पुरविण्याच्या कामीं योजून) गुरुच्छळ वी (नवऱ्याला अतिशय त्रास देते) [तसी] कुनियति (दुर्दैव), इ०.
२ रमापति ३. मला ४. कोंचकी=पगडी (यश व संपत्ति) नाश करूं नकोस.
५ यम-**पंत** कीनाशीं (यमाचे ठिकाणीं) प्रभूची कृपा इतकी अमर्याद आहे कीं, तुझ्या अवध्यत्वादि वरांचें यमापुढें कांहीं चालणार नाहीं, तुझ्यापेक्षा त्याच्यावर च प्रभूची कृपा अधिक आहे. ६. भटाच्या पोरा! ७. अत्यंत कपटी अशा.

त्रैलोक्यजया सानुज मीं सिद्ध, शिवप्रसादपात्रास
मज हंसा दाखविसी, गोपास स्तवुनि, काय हा त्रासें? १५३
मज अन्नदा न मानिसि, न गणिसि माझ्या महातपा, पोरा !
मित्र, द्विज, म्हणुनि, तुझ्या चूर्ण करी हा न हात पापोरा.
न करीं स्पर्श कृतघ्ना ! मज शिवपदनखरशशिचकोरा; हूं !
जा, जीवदान दिधलें, ऊठ कसा, मत्पुरीं नको राहूं.' १५५
यापरि सख्यासि विटवुनि, सात्यकिस म्हणे.'कशास आलास?
वद, कां रे ! त्या गोपें कर न दिला? काय मूक झालास?'
युयुधान म्हणे, "हंसा ! जेणें केलीं परानन असितें,
देणार कृष्ण तुजला कर, कवळुनियां करें तया असितें. १५७
धृष्टा ! कृष्णापासुनि वांछिसि, न गणूनि कायहानि, कर?
व्यसनार्णवीं बुडाया, दादुनि करितोसि काय हा निकर? १५८
जगदीश कृष्ण भास्कर, तूं पामर काजवा, खरकेरा या
कर मागसि; काय क्षम खड्गाधिक काज वाखर कराया? १५९
जी वदली 'कर दे,' हें तव जिह्वा सर्वथैव कापावी,
पापा ! वीतविवेका ! साधुसभा दुर्वचें न तापावी. १६०
बलभद्र, बभ्रु, सात्यकि मीं, सारण, निशठ, विपृथु, सारंग,
उत्कल, कृतवर्मा, कवि उद्धव, हरि, सर्व शत्रु सारंग. १६१
हे दश सहाय आम्हीं युद्धांत प्रभुपुढें रहायाचे,
अस्मत्प्रहार दुःसह, अन्यांचे ते सुखें सहायाचे. १६२
पुष्कळ आम्हीं च असों, श्रम नलगे मारितां तुला लेश;
करिसि कराशा प्रभुला ! ब्रह्मादिक काय रे ! कुलालेश? १६३
घालूं गांठि तुम्हांसीं आम्हीं, दंभोळि[11] जेंवि शैलासीं,
शैलासीं व्याघ्र जसे; तुमचा राहेल वरद कैलासीं. १६४
पुष्कर, कीं गोवर्धन, कीं मथुरा, कीं प्रयाग, हूं ! सद्रे !

---

१ भय २. पाप ( दुष्ट )+उरा ( हृदयाला ). ३. काळीं. ४. युद्ध. ५ सूर्यास. ६. खुरपें. ७. अविचाऱ्या ! ८. सिंह. ९. हरिणें. १०. श्रेष्ठ कुमार. ११. वज्र

करणार युद्ध कोठें प्रभुसीं? तूं स्थान शीघ्र तें वद रे!. १६५
तो अधमाधम खालीं पाहवितो यदुपहास वितयातें;
काय तुम्हीं? रे! तेजें लाजवितो यदुप हा सवितेयातें." १६६
ऐसें सात्यकि वदला, रगडूनि समक्ष दर्प साराया;
सानुज हंस खवळला, वळला क्षतपुच्छ सर्पसा, राया!. १६७
हंस म्हणे, 'रे यादवदायादा! वदसि भीड सोडून,
तोडून दूतमस्तक, मद्भुज न मळेल, अयश जोडून. १६८
कोठें रे! स्त्रीहंता? कोठें पीतां सुरा? रिपो! कळतो
कर्में चि गोप, जाणे माया, भीतासुरारि पोकळ तो. १६९
पाशुपत दिलें रुद्रें, आम्हीं केलों अवध्य, गोपा! रे!
आम्हां ती द्वारवती काय? कडे मेरुचे हि सोपारे. १७०
यादव धरितों, करितों दासी तुमच्या स्त्रिया, तया गोपा
कोपानळांत हवितों, त्रिजग हि न पुरेल आमुच्या कोपा. १७१
कातर हा, तर चि पळुनि, करुनि नगर सागरीं, हरि लपाला.
आम्हांपुढें किति तुम्हीं? खर वायु न काय रे! हरिल पाला?
जें अयशस्कर, न करी ज्ञाता, चरितें मळासि धूर्ता, तें.
जा, अभयदान दिधलें, प्रभुनें मारूं नये चि दूतातें. १७३
या सर्व दीर्घनिद्रा पुष्करदेशीं करावया, जड हो!
गोमायुगृध्रवायसभोजन तुमचें रणांगणीं धड हो.' १७४
सात्यकि म्हणे, 'सुजड हो! जातों अजित प्रभूसि आणाया,
खाणायास तुम्हांतें, पुरलें आयुष्य सर्व जाणा या. १७५
निश्चय उद्यां चि तुमच्या अथवा केला वधासि परवांचा.
आतां चि मारितों, परि मीं दूत; तुम्हीं हि वध्य, परं वांचा.'

---

१ यदुपहास (ज्यानें केलेली अथवा ज्याची झालेली निंदा) वितयातें (त्याला प्रसवणारास-आईला व बापाला) खालीं मान घालावयास लावितो, तो अधमाधम होय. २. सवित्यातें—सूर्यास. ३ दारुबाज (बळराम) ४. सोपे ५. भित्रा. ६. शुद्धाचरणानें पाप नाहींसें करणारा. ७. मरण. ८. गोमायु=कोल्हा. ९. सपलें. १०. फक्त.

सात्यकि यापरि तेजें त्या हंसा, डिंभका, अरिस दापी.
जावुनि वृत्त कथी त्या, ज्याचें खळजीवना अरि[1] सदा पी. १७७
प्रभुवरि निघे बळसहित भस्म कराया रणांत अरिसेना,
कीं 'कर घेइन चि' म्हणे हंस, सुहृत्सूक्त[2] किमपि परिसेना. १७८
पावे सरामसात्यकि सहवृष्णिसमूह पुष्करा क्षम हा,
तत्रस्थ ब्राह्मण जे, त्यांतें दे देव पुष्कराक्ष महा. १७९
ते हंसडिंभक हि मग गेले, त्यांच्या महाचमू वश गा,
परमोत्साहवती त्या गणिल्या अक्षौहिणी नृपा ! दश गा !. १८०
रुद्राक्ष भस्म देहीं ज्यांच्या, शिवनाम आननीं पूत,
भूत प्रभुदत्त पुढें, भ्यावे बहु मृत्युचे हि ज्यां दूत. १८१
दानव विचक्रनामा, त्याचे ही असुरवीर बहुलक्ष,
जो पूर्वी शक्रातें जिंकी, करि युद्ध विष्णुसह दक्ष. १८२
द्वारवतीप्रति पावुनि, जो पीडी यादवांसि समरांत,
देवासुरसंग्रामीं जो प्रकटी उग्र तेज अमरांत. १८३
तो हंसडिंभकांच्या साहित्याला[3] सखा स्वयें आला,
ज्याला देवसमूह, व्याघ्रा मृगसा विलोकितां भ्याला; १८४
तैसा चि विचक्राचा अत्यंत सखा हिडिंब या नावें,
ज्याचें उग्रत्व सदा बहु मानुनि, तक्षकें हि वानावें; १८५
ज्या राक्षसनाथाचे, हरिते अरितेज, बहु समर करिते,
अष्टाशीतिसहस्र क्षणदाचर[4], असि, शिला, परिघ धरिते. १८६
गेले ते नृप, जेथें श्रीपुष्कर, पुष्कराक्ष, बा राया !
या दोघांसम कोणी नाहीं च समर्थ जीव ताराया. १८७
पुष्कर, पुष्करनेत्र, स्मरणें तारिति अगा नरवरा ! हे,
साधुसभेत यशांचा यांच्या क्षण ही न[5] गानरव राहे. १८८
बा जनमेजयराया ! श्रीपुष्कर पुष्कराक्ष लोकांत

---

१ सुदर्शनचक्र. २. मित्राचा हितोपदेश ३. मदतीला. ४. रात्रिचर, राक्षस ५. थांबत नाहीं.

तारक सारकविस्तुत वंद्यीं देती पडों न शोकांत. १८९
त्या हंसडिंभकांच्या बळकृष्णांच्या चमू तदा झात्या!
अत्युत्साहें मरती, मारिति, होतां रणा तदाज्ञा, त्या. १९०
सप्ताशीतिसहस्त्र द्विपें[2] हत झाले, रथी रणीं लक्ष,
मध्याह्न होय जों, तों सादी[3] ही तीस कोटि, जे दक्ष. १९१
मोटा झाला संगर, भंग रथी पावले, बहु गळाले,
किति पुष्करांत सिरले, किति हंसाचे भयें भट पळाले. १९२
श्रीकृष्ण विचक्रासीं, करि हंसासीं बळी हळी युद्ध,
युयुधान डिंभकासीं, यश लोकीं मेळवावया शुद्ध. १९३
राक्षस हिडंब यासीं करिती वसुदेव, उग्रसेन. रण,
तेव्हां नारदमुनिला होय श्रीरामलक्ष्मणस्मरण. १९४
ताडी हरि त्रिसप्तति[4] खर शर निकरें[5] विचक्रवक्षातें;
साहे संधानें परम शीघ्र तसें त्या न युद्धदक्षा तें. १९५
एकें चि शरें ताडुनि वक्षःस्थळ, सर्वलोकवीरा या
दानव विचक्रनामा बहु भडभड रक्त ओकवी राया!. १९६
क्षोभे प्रभु, तोडी ध्वज, पाडी हय, सूतमस्तक च्छेदी,
घे दीनत्व न दानव, विरथ हि झाला रणीं न तो खेदी. १९७
असुर रथावरुनि उडी घाली, घेवुनि गदा, तिणें तूर्ण
अत्यंत क्रोधानें त्या रणरंगीं करावया चूर्ण, १९८
ताडी प्रभुसि किरीटीं प्रथम, मग क्षिप्र अरि ललाटांत,
भट समितींत[6], जलधिच्या न तसि मकर केलि करिल लाटांत.
मग सिंहध्वनि करुनि, क्षिप्रतर विचक्र तो सुरद्वेषी
भ्रमवुनि शतगुण, लक्षुनि भगवदुरस्थळ महोपळ[7] प्रेषी. २००
झेलुनि महाशिळेतें, जगदीश तिणें चि दानवा ताडी,
पाडी मूर्छित भूवरि, तद्देहस्मृति दिगंतरीं धाडी. २०१

१. सार=उत्तम २ हत्ती. ३ स्वार. ४ त्र्याहत्तर. ५. बाणांचा मार.
६. युद्धांत. ७. मोठा धोंडा.

संज्ञा पावुनि, दैत्य क्रोधें घे शीघ्र उग्र परिघातें,
लोकत्रयांत अद्भुत संपादायासि कीर्ति हरिघातें. २०२
'या परिघें गोविंदा! गर्व तुझा सर्व आजि मीं हरितों,
करितों गतासु तुजला, विस्मयभीतें रणांगणीं वरितों. २०३
देवासुरसमरीं जो कृतकर्मा वीर, तो चि मीं आहें,
पाहें प्रताप, भुज हे ओळख, परिघप्रहार हा साहें.' २०४
ऐसें वदुनि, विचक्र क्षेपी[1] क्रोधें, शके न परि घाया[2],
केशव खड्गें खंडी, अहिस शिखंडी तसें चि, परिघा या. २०५
मग शतशाख[3] महाशिख[4] तरु टाकी तो विचक्र अरि, त्यातें
खड्गें चि प्रभु तोडी प्रेक्षकशक्रादिधैर्य हरित्यातें. २०६
सुचिर क्रीडा करुनि, प्रभु तो त्या दानवासि माराया
दहनास्त्रमंत्रिताशुग[5] सोडी संगरसवांत, बा राया!. २०७
तो शर असुरशरीरा धावुनि वेगें सखा तसा भेटे;
दहनें तृणराशि जसा, तेंवि विचक्र क्षमावरा! पेटे. २०८
पाहुनि विचक्रगतितें सिरले हतशेष असुर जळधींत,
ते अद्यापि न फिरती; कैसें राहेल धैर्य मळधींत? २०९
बळभद्र दश शराहीं ताडी हंसासि, पांच तों सोडी,
त्यांतें दश बाणाहीं हांसुनि बळदेव अंतरीं तोडी. २१०
राम ललाटीं हंसा नाराचें बा मनुष्यपा! वेधी,
त्याची क्षण मोहातें न धरूं द्याया धनुष्य, पावे धी. २११
मग लब्धसंज्ञ हंस हि शर हाणी, रक्त तो हळी वमला,
ज्या सर्व मुमुक्षु म्हणे, 'भगवंता! तत्व तूं कळींव मला.' २१२
सोडी सप्त सहस्र क्रूराशुग बळ, करी रथा पिहित[8].
जन्हि दुरभिमान घातक, वाटे मत्ता जना तथापि हित. २१३

---

१. फेकी २. जखम करण्यास. ३. शंभर फांद्या असलेल्या ४ मोठ्या शेंड्याचा ५. आशुग=बाण. ६. बाणानें. ७. शुद्धीवर आलेला. ८. झांकून टाकिलेला, आच्छादित

ध्वज तोडुनि, हय मारुनि, हरिसा गर्जोनि, खळविरामातें,[1]
सूतातें वधुनि, रणीं हंस स्वोत्कर्ष कळवि रामातें. २१४
राम रथावरुनि उडी टाकी, घेवुनि महागदा हातें,
जीच्या आंगीं तेज न शत्रुमदाच्या महाग दाहातें.[2] २१५
हंस हि महागदेतें कवळुनि, घाली उडी रथावरुनीं,
करिति गदायुद्ध परम दारुण दोघे हि, न व्यथा वरुनीं. २१६
मुनिसुर नारदशक्रप्रमुख गदायुद्ध अतुळ पाहून
वदले, 'झालें न असें, मग होयिल काय अधिक याहून?' २१७
सात्यकि, डिंभक, दोघे करिति महावीर युद्ध हे तुमुल,
कीं शूरा यश, तैसें वृद्धा हि न परमहर्षहेतु मुल. २१८
सात्यकि दश शर, डिंभक तो पंचसहस्र, संगरीं सोडी;
तोडी माधव; याच्या लागे देवांसि बहु रणीं गोडी. २१९
डिंभक सप्त शरांहीं वेधुनि, वेधी पुन्हां हि लक्षानें,
धनु तोडिलें तयाचें सात्यकिनें परमयुद्धदक्षानें. २२०
अन्य धनुष्यें डिंभक हाणी उग्र क्षुरप्र;[3] तो गमला
काळभुजंग चि डसला, युयुधान क्षतज भडभडां वमला.२२१
तें ही कार्मुक[4] सात्यकि तोडी, डिंभक पुन्हां हि घे चाप,
खर शर मर्मीं हाणी, युयुधानातें असह्य दे ताप. २२२
युयुधान तें हि कार्मुक खंडी, तो घे पुन्हां हि तो धनुतें,
हाणी खर शर, केलें खंडित त्या यादवें सुयोधनुतें. २२३
सात्यकि असीं दशोत्तरशत कोदंडें रणांगणीं खंडी,
गमली माधवकार्मुकवाहिमहाशक्ति ती जशी चंडी. २२४
त्यजुनि धनुष्यें, डिंभक सात्यकि करवाळ[5] संगरीं धरिती,
ते बत्तिस प्रकार भ्रांतोद्भ्रांतादि[6] तेधवां करिती. २२५

१ दुष्टांचा नाश करणारा जो बळराम याला. २. शत्रुमदाच्या दाहातें (गर्वहीसा करण्यास) जीच्या (ज्या गदेच्या) अंगीं तेज महाग न (पुष्कळ होतें). ३. बाणविशेष. ४. धनुष्य. ५. तरवार. ६. पट्टा खेळण्याचे नानाप्रकार

'अर्जुन, सात्यकि, केशव, डिंभक, गुह, शर्व, वीरवर सा हे
प्रख्यात, न प्रतापा यांच्या समरांगणांत पर साहे.' २२६
ऐसें वदले ज्ञाते, सुर, मुनि, गंधर्व, सिद्ध पाहून,
राहून नभीं, त्यांवरि सुरतवपुष्पें प्रभूत वाहून. २२७
करिति स्वधर्म यास्तव रण वसुदेवोग्रसेन हे दशमीं,
त्यांसि हिडिंब म्हणे, 'रे! तुमचें हरितों समग्र ही यश मीं.'
घटकर्ण तसा भीषणकाय खचर खाय वृष्णिसैन्यातें,
देता झाला समरीं वीरांतें तो हिडिंब दैन्यातें. २२९
हिसकुनि घेवुनि, मोडी तो वसुदेवोग्रसेनचापांतें,
वीरांतें कंपप्रद झाला, पक्षींद्र जेवि सापांतें. २३०
वृद्ध भिवूनि पळाले, राया! देवुनि पाठ, रक्षा या,
पसरुनि वदन भयंकर, लागे मागें तयांसि भक्षाया. २३१
'मज खावूं द्या, खावें तुमचें गेहांत न वपु रोगानें.
युद्धीं मेल्या, स्वर्गीं व्हाल सुखी नित्यनैवपुरोगानें.' २३२
ऐसें राक्षस गर्जे, उत्तर देती न वृद्ध खळपा हे.
व्याघ्रोघ्रात हरिणसे दोघे दूरूनि देव बळ पाहे. २३३
ज्यासीं करीत होता संगर, तो हंस कंसकाळाला
देवुनि, धावुनि, गांठी राम हिडिंबा पलाशपाळाला. २३४
'रे! वृद्ध राजसत्तम सोडुनि, मजसीं निशाचरा! भीड.'
राम म्हणे कीर्तिमहाहंसीचा अतिमनोज्ञ जो नीड. २३५
ऐसें ऐकुनि, गांठी त्या रामा वृष्णिसत्तमा, राया!
दृढ मुष्टिनें उरावरि ताडी तो वीर्यमत्त माराया. २३६
राम हि निशाचरातें, सोडुनि कोदंड, मुष्टिनें ताडी,
चिर रण करुनि, तळाहीं वदनीं ताडूनि, भूतळीं पाडी. २३८

१ म्हातारे २ राक्षसास ३. नित्य नवें असें जें आपणापुढें चाललेलें गाणें त्यानें—निर्णय० ४ वाघास ज्याचा वास आला असे. ५. मांसाहारी जे राक्षस त्यांच्या राजाला. ६. सुंदर. ७. घरटें. ८. चपराका मारून.

बाहु धरुनि, उचलुनियां, गरगर फिरवूनि, राम शूरवर
युग्मक्रोश झुगारी, पडुनि, उठुनि पळुनि जाय दूरवर. २३८
हतशेष खचरजन तो जाय, दिगंतासि, अर्क ही अस्ता.
त्रस्तात्मसैन्य घेवुनि हंस हि गोवर्धना महाशस्ता. २३९
तीथें रात्रि क्रमुनि प्रातःकाळीं निघोनियां सबळ
गोवर्धनासि गेला हरि, अरिकरिचा करावया कबळ. २४०
गिरिच्या उत्तरपार्श्वी, यमुनातीरीं, स्थळीं महाशुद्धीं,
त्या हंसडिंभकांतें सर्व हि यदुवीर गांठिती युद्धीं. २४१
शर उग्रसेन हाणी त्या हंसातें त्रिसप्तति क्रोधें,
वसुदेव सप्त, सप्त चि सात्यकि, सर्वं हि मान्य जो योधें. २४२
दश कंक, पंचविंशति अनुजेंयुता त्या सुबाण सारण गा!
उद्धव दश, तीस निशठ, त्या विपृथु अशीति तामसा रणगा.
प्रद्युम्न शर त्रिंशत्, सप्त विशिख सांब, शत्रुवरि वृष्टि
असि करिति, एकषष्टि क्षेपी अत्युग्र शर अनाधृष्टि. २४४
ते वीर हंसडिंभक, एकैकातें दहादहा बाण
हाणुनि, ओकविति रुधिर, विकळ करिति सर्वयादवप्राण.२४५
झाले सिद्ध पळाया यादव, वारुनि तयांसि, बळ हातें,
होय पुढें, हंसासीं, धनु धरुनि, करावयासि कळहातें. २४६
त्या रामावरि डिंभक धांवे, करि हंस विष्णुसीं समर;
गगनीं बसुनि विमानीं, देखति शक्रादि सर्व ही अमर. २४७
प्रभु, हंस, राम, डिंभक, राया! जगदेकवीर हे चवघे,
देव म्हणति, 'सर्वाधिक शस्त्रीं, अस्त्रीं, बळीं, रणीं, अवघे.'
हे भक्त हंसडिंभक, वरदें देवें मनांत आठविले,
त्यांतें कैलासाहुनि भूतप दोघे सहाय पाठविले. २४९
त्या अद्भुत संग्रामीं सर्वांहीं स्वस्वशंख वाजविले,

१ दोन कोस दूर २. अति प्रशस्त अशा. ३. धाकट्या भावासह असलेल्या त्यास ४. ऐशी. ५ श्रेष्ठ पिशाच

ते सकळ रव प्रभुनें निजदरनादेंकरूनि लाजविले. २५०
तों दोघे भूतेश्वर धावुनि, कृष्णासि ताडिती शूळें,
प्रभु काय? काय ते? बा! भंगाचा अमृतरस कसा गूळें? २५१
हसुनि, रथावरुनि उडी टाकी, हरिसा करूनि वेग, हरी;
त्या दोघां भूतांतें क्षिप्र महद्भूत देवदेव धरी. २५२
शतगुण गरगर फिरवुनि उडवि, तयां प्राप्त होय कैलास;
हें काय? कोटियोजन उडविल भगवान् सुमेरुशैलास. २५३
कैलासाचळशिखरीं स्वप्नांत जसे, तसे चि ते पडले,
रडले, प्रेमें, विस्मित होवुनि, भगवत्पदांबुजीं जडले. २५४
भूत उडविले पाहुनि, हंस क्षोभे, म्हणे, 'अरे गोपा!
कां विघ्न राजसूया करुनि, करिसि दीप्त माझिया कोपा? २५५
रे! सावधान हो; दे, प्राणांसि नसावयास हानि, कर;
अथवा दुर्मद जाया, सुविवेक वसावया, सहा निकर. २५६
ईश्वर मी राज्यांचा, जेंवि सुरांचा महायशा शर्व,
गर्व त्वच्चित्तींचा गोपा! आतां चि नाशितों सर्व.' २५७
ऐसें बोलुनि, ओढुनि ताळोपम[1] चाप, हंस नाराचा
सोडुनि, तया ललाटीं वेधी देत्या भवाब्धिपाराच्या. २५८
जगदीश दारुकातें त्या तुमुल रणांत पृष्ठवाह[2] करी;
सात्यकितें निजसारथि, तो हस्ताहीं गुणप्रतोद[3] धरी. २५९
रथरत्न चालवी, तो मंडळ समरांगणांत नव दावी;
मातलिपटुता अधिका याच्या पटुतेपरीस न वदावी. २६०
प्रभु अग्न्यस्त्र स्वशरीं योजी, हंसा परासि माराया;
गर्जोनि म्हणे, 'वारीं, जरि शक्ति तुला असेल वाराया. २६१
हंसा! मजपासुनि तूं कर वांछिसि, करिसि जरि मदें ओंजि,
तरि निजपराक्रमातें दाखीव प्रकट करुनि तूं आजि. २६२

---

१. ताडासारखें २ पाठीराखा ३ लगाम व चाबुक ४. घोड्याची चाल. ५. युद्ध.

तूं वांचसील कैसा? साधुद्वेष्टा मनुष्यपा! मरतो;
विजयार्थ धर्म लंघुनि, गर्वें धरितो धनुष्य पामर तो. २६३
त्वां निंदिला यतीश्वर, बहु गांजुनि, मुख्य धर्म सन्यास,
धन्या सत्सेवेचा, सत्पीडेचा चि काम अभ्यास. २६४
खळशास्ता मीं असतां, तूं कोण ब्राह्मणासि गांजाया?
मत्ता! सत्तापकरा! तुज काळमुखीं विलंब कां जाया?' २६५
ऐसें गर्जुनि सोडी, त्यांतें तो हंस वारुणें वारी,
उडवी प्रभुवर सहसा वातास्त्रें परमदारुणें वारी. २६६
वातास्त्रातें शमवी माहेंद्रेंकरुनि हंस वा राया!
माहेश्वरास्त्र योजी प्रभु, हंस तयासि रौद्र वाराया. २६७
गांधर्व एक, दुसरें राक्षस, पैशाच अस्त्र हें तिसरें,
योजी ब्रह्मास्त्र हि हरि, जें अरिस म्हणे, 'स्वभान ही विसरें.'
कौबेर, आसुर, तिजें याम्य, ब्रह्मास्त्र, च्यार चवघांस
योजूनि हंस वारी, भासे तो अस्त्रजात द्व घांस. २६९
माता जैसी बाळा, रक्षी ज्याची सुकीर्ति संसरणीं,
योजी ब्रह्मशिरोस्त्र प्रभु तो, त्यावरि हि तें चि हंस रणीं. २७०
श्रीयमुनेच्या उदकें आचमन करूनि, देवदेव हरी
श्रीवैष्णवास्त्र योजुनि, शार्ङ्गगुणीं दीप्त दिव्य बाण धरी. २७१
भ्याला तत्काळ चि तो हंस, महारौद्र अस्त्र पाहून,
टाकी उडी, पळे, त्या स्वरथावरि करिल काय राहून? २७२
होय प्राप्त मति कुडी, कीं आवडली सुकीर्तिहूनि कुडी;
टाकुनि तो हंस उडी, दे कालियपन्नगह्रदांत बुडी. २७३
प्रभुवर हि शीघ्र धावुनि, डोहीं घाली उडी स्वयें हंसीं,
मंचावरूनि लोटुनि, पूर्वीं रंगांगणीं जसी कंसीं. २७४
गोवर्धनाद्रिच्या हि, न यमुनेच्या ढांसळी उडी दरडी;
त्या ध्वनिपुढें घनध्वनि खाय, तुरिपुढें जसी उडीद, रडी. २७५

१. वारुणास्त्र. २. अस्त्रसमूह. ३ संसारात. ४. खोटी ५ देह. ६. कणीवाचा खात.

जगदाधार प्रभुनें करितां पादप्रहार साहेल ?
राहेल क्षुद्र कसा ? वज्राहत अद्रि भद्र पाहेल ? २७६
कोणी म्हणति, 'न मेला, गेला तो हंस पळुनि पाताळा,'
कितिं 'भक्षिला फणीनीं,' आला तात्पर्य नाश या ताळा. २७७
यमुनाह्रदांतुनि निघे प्रभुसत्तम निजरथीं पुन्हां बैसे,
नाहीं च सदरिं केले लीलेनें अमित केशवें ऐसे. २७८
यमुनाह्रदांत वधिला हंस श्रीकेशवें, असी वार्ता
क्षिप्र क्षितिवरि फांके; कां केशव निर्वाविना जगा आर्ता ? २७९
मग राजसूय धर्में श्रीकृष्णें प्रथम यज्ञ हा केला;
हंसाच्या कीर्तिस भी हरि[1], हरिच्या जेंवि हरिण हाकेला. २८०
या प्रभुविजयें झाला त्रैलोक्यांत प्रमोद बा राया !
प्रभुचरित गायिलें हें बहु सत्कविनीं तरोनि ताराया. २८१
भ्रात्याचा वध परिसुनि, अरि सुनिपुण ही मनांत गडबडला,
करितां रण रामासीं जो गर्वेकरुनि फार वडबडला. २८२
डिंभक ही रथ सोडुनि, जोडुनि अपयश, निघे, तयामागें
प्रभु रामकृष्ण धांवति, सिंह वधाया गजा जसे रागें. २८३
घालुनि उडी, बुडी दे, शोधी तो फार पाप नर डोहा,
'हाय !' म्हणे. कां साधुद्वेष्टा, पावोनि ताप[2], न रडो हा ? २८४
क्षण उपळ होय, सोडी उसळुनि जैसा अलांबु, डोहातें;
सुर म्हणती, 'जें केलें, सेवू, भ्रमला भला, बुडो, हा तें.' २८५
यमुनातटीं रथस्थ प्रभुतें पाहुनि म्हणे, 'अरे गोपा !
कोठें रे ! मद्भ्राता, ज्याच्या शक्रादि कांपले कोपा ?' २८६
स्मित करुनि श्रीश म्हणे, 'पुससी रे ! काय डिंभका ! मजला ?
यमुनेतें पूस, इला शरणागतकालियाहिंसा भजला.' २८७
डिंभक पुनरपि शोधी, तो धीरेंहित[3] स्वयें विलापातें
करुनि, करी जें कांहीं, आयिक जनमेजया ! इलापा ! तें. २८८

---

१. इद्र. २. भोपळा. ३ अभिष्ट, भावावलेला.

'हा! हंसा! हा! हंसा!' ऐसें बोलोनियां हर्दी रडला,
स्वकरें समूळ जिह्वा उपडुनि, डिंभक मरोनि तो पडला. २८९
झाली ऐसी तद्गति सद्गतिदात्यासमक्ष, हा तातें
'हाय!' म्हणायासि, करी, नरका जायासि, आत्मघातातें. २९०
ऐसे दोघे भ्राते, संपादुनि वरमदें अघा, मेले,
जे उद्वृत्त[1] च्छळितां यतिपतितें, लेश ही न घामेले. २९१
सत्कंटक उन्मूळुनि, होउनि अति सुप्रसन्न, बळसहित
गोवर्धनीं वसे, जो करि साधूंचें, नसोनि अळस, हित. २९२
पूर्वी जेथें केली केलि, प्रेमें तया नगीं राहे,
पाहे निर्झरकंदरवृक्षादि; प्रभुकृपा असी आहे. २९३

---

# अध्याय त्रेपन्नावा.

नंद, यशोदा, यांचा भेटावे रामकृष्ण हा हेत,
आयकिलें कीं, आले गोवर्धनगिरिसमीप आहेत. १
द्याया रामा, कृष्णा, बहु दधि, नवनीत, कृसर[2]पायस, ती
घेवुनि जाय यशोदा बर्हविभूषण[3], यथेष्ट साय, सती. २
नंद, यशोदा, गोपी, गोप, प्रेमें उपायनें वन्यें[4]
देवुनि, भेटति कृष्णा, मानिति पाहोनि लोचनें धन्यें. ३
प्रभु साग्रज होय सुखी, यांतें पाहोनि हा जसा नंद,
आलिंगुनि, नमुनि म्हणे, 'झालों भेटोनि आज सानंद.' ४
नमुनि यशोदेतें तो भेटे सप्रेम राम; कृष्ण, नृपा!
कुरवाळी, घे अंकीं, बहुत इची देवकीपरीस कृपा. ५
नंद यशोदा लागे, जेंवि प्रभु, तेंवि गहिंवरायाला,
कवि 'मातातातांहुनि अतिवत्सळ' म्हणति महिवरा! याला. ६

---

१. दुर्वर्तनी २ तिळांतांदुळांची खीर. ३. मोरपिसाचे शृंगार. ४. रानावनातील नजराणे.

आलिंगनें प्रभूच्या संहृष्टें[1] गोपगोपिकाचित्तें,
बा ! जेंवि लोभिहृदयें विरहोत्तर लब्धें[2] जाहल्या वित्तें. ७
कुशळ पुसे गायींचें, वत्सांचें प्रभु, पदार्थ ते सेवी,
प्रेमें धरि बर्हांगद[3], काढुनि रत्नांगद स्वयें ठेवी. ८
नंद म्हणे, 'पुससी तरि, आहे सर्वत्र कुशळ बा कृष्णा !
बहु दुःख एक हें कीं, तूं न दिससि, दर्शनीं महातृष्णा.' ९
रडुनि यशोदा वदली, "बा ! स्मरण सदा तुजें, नसे विसर;
सोडुनि मानसातें, हंस क्षण ही दुजें न सेवि सर. १०
म्हणत्यें, 'दुःख सराया शंकर, नुति[4] करुनि पाठ, विनवीन,
परि मन वेडें, सोडुनि तुज, न किमपि अन्य आठवि नवीन."
भगवान् म्हणे, 'यशोदे ! माते ! सोडुनि खेद, जा गेहा,
त्वत्पुत्र स्वजनांच्या त्राणीं, न करूनि भेद, जागे हा. १२
तुज जन जे स्मरतील, प्रेमें ते मन्मनांत भरतील,
होतिल मद्भक्त, सुखें माते ! भवसागरासि तरतील. १३
त्वन्नमन, त्वत्कीर्तन, करिते सज्जन, न जे मनीं वक्र,
ते प्रियतर मज होतिल, ओतिल पीयूष तन्मुखीं शक्र.' १४
गाढालिंगनदानें निववि, प्रेषी व्रजासि पितरांतें,
तैसें चि प्रभु सुखवी, अभिमत पुरवुनि, तयां हि इतरांतें. १५
साधु म्हणति, 'पितर क्षण हितरक्षण करितयांसि न विसरती;
मग रीति साधुपतिची बा ! देयिल कोणत्या न कविस रती ?'
हे नंदयशोदांसीं भेटि हरी सर्व दोष देवाची;
व्यास म्हणे, 'तो हि तरे, जन जो श्रोत्यांसि हर्ष दे, वाची.' १७
श्रीगोवर्धनगिरिहुनि निघुनि श्रीकृष्ण पुष्करा गेला,
जो अरिस, जसा जलधिस घटज करायासि शुष्क, रागेला.
मुनि पुष्करतीर्थींचे प्रभुवर्यें नमुनि सुखविले सर्व

---

१ अत्यंत आनंदित. २. सांडून पुन. सापडलेल्या. ३. मोरपिसाचें बाहुभूषण.
४. स्तव. ५. आवड.

पूजुनि ते हि, स्तविती, जो सुरतरुचा उरीं न दे गर्व. १९
ऋषि वदले, "जगदीशा! अत्यद्भुत वीर्य हें[1] तुझें नव न,
भवन श्रीस सुकीर्तिस, तूं चि करिसि आमुचें सदा अवन.
सानुज हंस सुदुर्जय, ऐसा चि डिंभक असुर ही देवा!
हे वासवभयद, इहीं तुज अजितासीं हि लाविला हेवा. २१
होते सहाय लोकप, तरि हरि यांतें कदापि न खपविता,
त्या असुरवधीं धरितें झालें तव मृदुल हे चि नख पविता. २२
हें तप न परमपुरुषा! तुजवांचुनि आमुचें तगायाचें,
तव संस्मरण चि तारक, 'सार' कवि म्हणति 'दुजें न गायाचें.'
अवतरलासि प्रभु तूं, स्थापाया वेदविहितधर्मांतें;
द्याया खलबलदलनें आम्हां स्वपदाश्रितांसि शर्मातें. २४
नमन तुज असो वरदा! बा पुण्यस्मरणकीर्तना[2]! देवा!
विघ्न असे चि निवारुनि, आम्हांपासूनि घे सदा सेवा. २५
वंदन असो तुला बा कृष्णा! तूं साधुकाननवसंत,
पावतिल त्वद्भजनीं निरुपम सुख नित्य का न नव संत?" २६
किति वर्णावें, वदले जें प्रासानंद शुद्धधी ऋषि, तें?
कृषितें[3] घन, सद्रतितें[4] प्रभु, सेविति सुयश कविकुळें तृषितें.
श्रीकृष्ण म्हणे, "मुनि हो! स्वस्थ असा सर्व, चित्त साधि न हो,
तुमचें अभीष्ट जें, तें मीं, लोभी जेंवि वित्त, साधिन, हो!. २८
जे निजधर्मीं सादर, मज बहुमत सर्वकाळ ते जन, हो!.
म्हणतों, 'त्या साधूंतें लंघुनि धृतगर्व काळतेज न हो.' २९
माझें सर्वस्व तुम्हीं, मीं आळस कां करीन भवदवना[5]?
भवदवनाशकघन[6] मीं, हा तुमचा भाव, जेंवि भव दवना. ३०

---

१ वज्राचा कठोरपणा २. पुण्यकारक आहे स्मरण व कीर्तन ज्याचें तो. ३. शेताला. ४. सज्जनप्रेमाला. ५ तुमच्या रक्षणाला. ६ संसाररूपी वणव्याचा नाश करणारा मेघ व असा मी, हा तुमचा भाव ही जोडी, ज्याप्रमाणें शंकर व दवणा ही जोडी आहे त्याप्रमाणें आहे. शंकराला दवणा प्रिय आहे, तसा मला तुमचा भाव प्रिय आहे, तसा भावार्थ.

धर्मस्थापन, सद्वन, दुष्टदमन, हें चि मद्व्रत ग्रंथित;
मीं तुमच्या, प्राणांच्या प्राणी जेंवि व्यथेस्तव व्यथित." ३१
ऐसें देवुनि अभय प्रभु पुष्करतीर्थवासि भव्य जना,
गेला द्वारवतीला, या चि यशा सुकवि भजति, न व्यजना. ३२
श्रीद्वारवतींत जसा देव, तसा चि प्रवेशला हर्ष,
पुष्पांचें, लाजांचें, प्रभुवरि करिती कुमारिका वर्ष. ३३
नरनाविध वाद्यांचा, कोंदुनि गगनोदरीं, सुरव राहे;
जी पूजा या प्रभुची, नाहीं त्या शतमखा सुरवरा हे. ३४
श्रीद्वारकेंत करिता झाला, नांदोनि, नित्य नवल हरी;
नव लीला अवतारीं या जैशा सागरांत नव लहरी. ३५
श्रीभारत भगवद्यश, चिंतुनि हरिचरणसारसां, गावें;
संसारांत तराया श्रीगुरुपरिचरण[२] सार सांगावें. ३६
नित्य श्रवण कराया, बा राया ! सत्सभा रैता[३] गाया,
ऐकोनि सुरभिचा हीं सेवील चि वत्स भारता गा ! या. ३७
वैशंपायन सांगे, 'घडति जयावृत्ति[४] सांग बारा ज्या,
कुळ तारूनि तरेल, त्रिजगीं तो परम धन्य, बा राज्या !.' ३८

---

# अध्याय चौपन्नावा.

जनमजय भूप पुसे, "वैशंपायनमुने ! मला सांगें,
ज्यक्षापासुनि कैसा त्रिपुरवध ? ज्ञानसिंधु तूं आंगें.' १
"श्रवण, मनन आणि निदिध्यासन, हीं तीन अक्षसम[६] ज्याला
दर्शनसाधनविद्वान् जो, म्हणति 'त्र्यक्ष' जाणते त्याला. २
जें स्थूल, सूक्ष्म, कारण, देहत्रय, हें 'पुरत्रय' स्पष्ट;

---

१. प्रख्यात. २ गुरुसेवा. ३ रममाण झालेली. ४ भारताच्या श्रवणपठनावृत्ति-पंत. ५. यथास्थित. ६ मूर्तिमंत, प्रत्यक्ष. ७ नेत्रासारखीं.

याचा उच्छेद कसा शानें, तें कथुनि, तूं हरीं कष्ट." ३
ऐसा या जनमेजयभूपप्रश्नांत गूढ हा भाव,
जाणे वैशंपायन, वक्त्यांचा साधुमान्य जो राव. ४
श्रीव्यासच्छात्र म्हणे, "दैत्यांचें निधन शंकरें केलें,
शूळत्रयेंकरुनि, तें कथितों, जें मन्मनीं सदा ठेलें. ५
'शंकर' म्हणजे बोध; श्रवणमनन तीन साधनें 'शूळ;'
'कामक्रोधादि' असुर, देव 'शमादि,' श्रुती च यां मूळ. ६
जाग्रत्स्वप्नसुषुप्त्यभिमानी विश्व तैजस प्राज्ञ,
याहीं भोग्य 'पुरत्रय' मायागुणरचित, जाणती प्राज्ञ. ७
उठलें तें आकाशीं, म्हणजे जें प्रकट 'कारणीं' झालें,
प्राकार ज्यासि कांचनमय, अन्नमयाकडे चि हें आलें. ८
कीं होय भोगमुक्त्युपयोगी, रमणीय यास्तव स्थूळा
'कांचनमय' म्हणणें, हे व्याख्या सर्वां बुधांसि अनुकूळा. ९
मणिहीं परमविराजित, 'मणि' म्हणजे इंद्रियें असें जाणा,
पिंडाला नगराची शोभा योग्या असेल, ती आणा. १०
कर्मेंकरुनि पुरत्रयसाधित 'यज्ञादिकर्म' जाणावें,
'गंधर्वपुर तसें' तें, म्हणजे 'मिथ्या' असें चि बाणावें. ११
वाहति पुरासि वाजी, म्हणजे ते 'इंद्रियाश्व' समजावें,
या सुरहस्यज्ञानें हृदयगुहेंतील सर्व तम जावें. १२
'त्या अश्वांहीं असुर ग्रासिति अंबर सुवेग ते,' म्हणजे,
'जें ब्रह्म कारण, तया झाकिति कामादि विजयकृतपण जे.

---

१ समूळ नाश. २. [आणि निदिध्यास]. ३. वेद. ४ अशा व्याख्यानास—पंडितांची संमति आहे त्याला. ५. आधार; मूळ ठिकाण. ६. जागृति, स्वप्न व सुषुप्ति या अवस्थांचे अभिमानी प्राज्ञ, विराट् [व] तैजस हे होत. ७. माया (अविद्या)+गुण (सत्व, रज, तम) यांहीं निर्माण झालेले. ८ अन्नमय कोश=स्थूल देह. ९. ऐहिक भोग व पारलौकिक मुक्ति या उभयतांस साधनीभूत होणारे १०. जड देहाला. ११. मान्य, कबूल. १२. शरीराला. १३. जय मिळविण्याविषयीं प्रतिज्ञा करून असलेले.

'समलंकृत कनकप्रभ भवनें त्रिपुरस्थ निर्मिलीं यत्नें,'
म्हणजे, 'मन:प्रवेशस्थानें हीं वर्णिलीं वधूरत्नें. १४
'रम्यें गृहोपरिगृहें,' म्हणजे, 'नाना मनोरथ' व्यक्त
कथिले बहु सुज्ञाहीं, जेथें जन होतसे सदा सक्त. १५
'बहु आयुधें पुरीं त्या,' 'स्रक्, चंदन, कामिनीकटाक्ष, असे
कामाचे उद्दीपक अर्थ,' बुधमनांत भाव हा चि ठसे. १६
ऐशा त्रिपुरांत वसे असुरेश्वर, 'सूर्यनाभ' अध्यक्ष,
तैसा चि 'चंद्रनाभ' हि, यांसि, म्हणति 'चक्षु,' 'मन' असें दक्ष.
अन्य हि बहु दानव त्या त्रिपुरीं 'मदमत्सरादि' ते कथिले,
पथ मोडिले पुरातन यांहीं, प्राणी सुरादि बहु मथिले. १८
त्रिपुरोपद्रुत झाले देवादि समस्त ही स्वसुखहीन.
ब्रह्मयातें दु:ख कथिति. ते गेले ईश्वरा शरण दीन. १९
ईश्वर म्हणे तयांतें, 'रे सुर हो! शंकराविना अन्या
दानव अवध्य जाणा.' कथिली हितहेतुयुक्ति हे धन्या. २०
'शंकर' म्हणजे सुखकर. कथिला प्रणतासि ईश्वरें बोध.
गेले शरण तयातें, तत्वाचा लागले करूं शोध. २१
ते शंकरासि गेले शरण सकळ देव, उग्र तप तपले,
जप लेश हि न विसरले, यमनियमातें सदैव ही जपले. २२
त्या सुरतप:प्रभावें, जे दानवदार, सर्व ही भ्याले;
बहु कामादिपरिग्रह तृष्णादिक, दीन तेधवां झाले. २३
वैराग्य यांत कथिलें, जें पुण्यसुखाधिचें महापर्व,
ते कामकोपतृष्णाहिंसादि, दरिद्र जाहले सर्व. २४
केवळ दर्बळ होतां क्षीण, न उरली च शक्ति, कांहीं च.

१. मन वसण्याचीं (मोहून टाकणारीं) ठिकाणें. २ कांता व कनक. ३ फुलांच्या माळा ४. विषय, पदार्थ. ५ डोळा व मन हीं अनुक्रमें सूर्य व चंद्र यांचीं उत्पत्तिस्थानें होत. ६. नियम; ठराविक मार्ग. ७. त्रिपुरत्रस्त. ८. कामादिकांच्या स्त्रिया तृष्णा, १०. ९. पवित्र सुखाच्या समृद्धीचें.

ते पावले अदर्शन[1], झाले दानव समस्त नाहीं च. २५
ते गुप्त अंतरिक्षीं झाले मायाबळें असुरभूप,
हृदयाकाशीं[2] बसले, होवुनियां लीन वासनारूप. २६
परिपाककाळ[3] येतां योगाचा[4], देवशत्रु बाधाया
बसले जपत सुदारुण मायावी ते स्वकार्य साधाया. २७
ऐसें होतां, गेले सुर शरण हरालयासि, योगाच्या[5]
विजयीं जाल्या असतां क्षीणा त्या वासना कुभोगाच्या. २८
अधिकारी संसारीं होवुनि उद्विग्न, निर्गुण स्थानीं
ज्या प्राप्त होय, हृदयाकाशीं, तेथें चि लागले ध्यानीं. २९
शांत्यादि देव भावें भगवंता ईश्वरीं पदीं नमुनी,
शुद्धब्रह्मविनिश्चय करिती, जरि त्यासि देखती न मुनी. ३०
देव हरासि न पाहुनि, भगवंतातें चि विनविती भावें,
कीं, 'मलिनबुद्धि आम्हीं, स्ववर करायासि सत्य तूं पावें.' ३१
सिद्ध महादेव प्रभु झाला, ते सुर भयांत ताराया,
अभिमुख उपासकांतें होय अविद्याभ्रमासि वाराया. ३२
रुद्रसहित रुद्रांची शोभा न शके वदावया वाणी[6],
शोभति उपासनेनें ध्यातेश्वरसह[7] उपासक प्राणी. ३३
त्रिपुरासीं युद्ध करी त्र्यक्ष, सशर धनु धरूनि अतिसत्व[8],
विद्वान् प्रणवीं[9] योजुनि चित्त, करी कोशभंग[10] हें तत्व. ३४
त्र्यक्षें शरसंधानें दैत्य सकळ भिन्नदेह ते केले,
स्थूळाध्यास[11] उडवितां ध्यानें कामादि नष्टतनु ठेले. ३५
कामादि असुर दिवसीं[12] बोधीं खचले[13], न राहिले कांहीं,

१ नाश २. अंतःकरणरूपी जागेंत ३ परिपक्वता ४ समाधीचा, ध्यानाचा. ५ योगाच्या विजयीं=मनाची स्थिरता करण्याच्या कामीं. ६ सरस्वती. ७ ज्याचें ध्यान करावयाचें त्या ईश्वराशीं एक होऊन ८. महापराक्रमी. ९. ॐकारांत. १० पंचकोशभेद. ११. जड देहाचें मिथ्या भान. १२. उज्ज्वल प्रकाशयुक्त अशा. १३ नष्ट झाले.

झाले शमादि सुर ही मग रात्रिमुखीं लयीं तयीं नाहीं. ३६
रात्रींत प्रबळ असुर होवुनि, देवांसि जिंकिती शूर;
कामादि बळी स्वप्नीं होति शमादिक तयांपुढें चूर. ३७
होय सुषुप्तींत असा विक्षेप[3], असें रहस्य मुनि कळवी,
हा विघ्न योगिहृदया सहसा सावध्यपणांत ही मळवी. ३८
कीं शुक्रें आप्यायित केले ते दैत्य सर्व ही हव्यें,
पाखंडमार्ग सेवुनि, कामादि प्रसरती बळें नव्यें. ३९
दिव्यरथास्थित शंकर गर्जुनि, दैत्यांसि संगरीं दापी,
सूक्ष्म शरीर अधिष्ठुनि, योगी मर्दी, स्मरादि जे पापी. ४०
देवानीं, सिद्धानीं, बहु तो शंकर वृषध्वज स्तविला,
योगजधर्मसमुच्छ्रित म्हणति ‘वृषध्वज’ म्हणोनि या कविला.
असुराहीं नानाविध शस्त्राहीं सरथ पाडिला रुद्र,
योगी सूक्ष्मशरीरीं तो विघ्नें पीडिला, जसा क्षुद्र. ४२
स्तुति होतां, गर्वें जो ‘सुस्थित झालों’ असें मनीं मानी,
त्या योग्यातें सूक्ष्मीं देहीं ही प्राप्त होतसे हानी. ४३
भूमि मधुमती तेथें राहुनि, कामादि सूक्ष्मदेहींच्या
शुभवासना विनाशिति; कलि, अनय, जसे समृद्धि गेहींच्या.
शब्दादि दिव्यविषयप्राप्ति च विक्षेप सांगती सुकवी,
लीन[11] ध्येयेश्वरसह सूक्ष्मवपु हि होय लय असें सुकवी[11]. ४५
शंकर तेव्हां कुंठितगति होय, शकट जसें पथीं भग्न.
कीं, त्या लयांधकारामध्यें योगींद्र जाहला मग्न. ४६

---

१ काळोखाच्या. २. वृत्तिशून्यपणात ३ मनाच्या स्थैर्याचा भग, घोंटाळा, चलबिचल ४ पुष्ट केलेले. ५. नवीन ६ लिंगदेह ७. योगसामर्थ्यामुळें उभा केलेला. ८. निर्भय. ९ विषयसुखोत्सुक असें एक ठिकाण. १०. ज्याप्रमाणें कलि ( कलह ) व अनय ( अनीति ) [ हे ] गेहींच्या ( नांदत्या घरांच्या ) समृद्धि ( सुखसंपत्ति ) [ विनाशितात ]. ११. परमेश्वराशीं ऐक्य पावलेलें सूक्ष्म शरीर सुद्धां त्या खऱ्या स्थितीला सोडील अशा प्रकारें त्यास [ विक्षेप ] चुकवी ( भ्रमवितो ).

ऐसें होतां विघ्न, प्रकटे वृषरूप विष्णु रक्षाया;
कीं, तो शंकर भजला होता श्रितरक्षणैकदक्षा या. ४७
हा धर्म समोमग्ना जीवातें उद्धरावया दक्ष,
पण चि समुद्धरिले स्वाश्रित, पावोनि संकटीं, लक्ष. ४८
चेतोरथ[1] उद्धरिला, तिसऱ्या विषयांत[2] वायुच्या नेला,
हे लिंगभूमि जिंकुनि, योगी धर्माश्रयें पुढें गेला. ४९
भूमि[3] महत्तत्वाख्या, जीमध्यें एक अस्मिता[4] मात्र
प्रत्यय[5]; तत्प्राप्तीतें योगी धर्मे चि जाहला पात्र. ५०
न स्फुरति विषय जेथें, अति शुद्ध त्वंपदार्थ[6] मात्र उरे,
तेथें हि असुर उठले, म्हणताति, प्रकृतिलय जयासि पुरे. ५१
तेव्हां रुद्र धनुर्ष्यी अग्नि स्थापूनि, दिव्य शर जोडी,
त्या दैत्यांच्या तिसऱ्या नगरीं ब्रह्मास्त्रयुक्त मग सोडी. ५२
'अग्नि महावाक्य[8], धनु प्रणव, चिदाभास[9] होय दिव्य शर,
ब्रह्मास्त्र चरमवृत्ति[10] हि, पुर मूळाज्ञान[11],' म्हणति सुज्ञवर. ५३
वीर्यें उग्रें, सुतपें, सत्यें, तो बाण योजिला लक्षीं,
झाला तृतीयनगरीं त्या असुरांच्या शिखी जसा कक्षीं. ५४
'वीर्य' ध्यानासि म्हणति, कीं हें कामादिरिपुमुखें सुकवी;
मनइंद्रियें तयांचें जें एकाग्रत्व, यासि 'तप' सुकवी. ५५
जीवाचा ब्रह्मासीं जो काय अभेद 'सत्य' हें होय;
शर[12] चरमवृत्ति[12]; योद्धा, ध्यानाची ज्यासि लागली सोय[13]. ५६

---

१ चित्तरूपी रथ २. [महत्तत्वाच्या] तिसऱ्या प्रदेशांत. ३. लिंगदेहाच्या अवस्था. ४. "मी आहें" ही भावना. ५. अनुभव. ६. "तत् त्वं असि" या महावाक्यांतील 'त्वं (तूपणा) हा पदार्थ. ७. महापंडित—पंत. पुरे= [राहण्यास] पुरेसा होतो ८. तत्त्वमसि=तें तूं आहेस. सर्वत्र एक च महातत्त्व आहे, द्वैतभाव नाहीं, हें श्रुतीचें महावाक्य. ९ ज्ञानाचा आभास १०. शेवटची वृत्ति—आत्मानंदस्थिति ११. अनादि माया. १२ सहजस्वरूपस्थिति हा च बाण. १३ व्यवस्था

त्या मूळाज्ञानाचा धीवृत्तिसहित निरन्वयोच्छेद
झाला सद्धर्मबळें, या विजयें सर्व संपला खेद. ५७
'जैसा यक्ष तसा बळि' या न्यायें धीमयें पुरें स्पष्ट
झालीं धीनें चि, जसा रज्जूरग, तेंवि सर्वथा नष्ट;
कीं स्पष्ट शब्दमात्रें नगरें शब्दें चि जाहलीं नाहीं.
या नाश्यनाशकांच्या मिथ्यात्वीं भिन्नता नसे कांहीं. ५९
कल्याणकरें जीवें असुरपुरें जाग्रदादि जीं तीन
सद्विद्यास्त्रें केलीं भस्म, असें वर्णिती सुधी जीन. ६०
या त्रिपुरांच्या दाहीं 'सद्धर्म चि' मुख्य कारण स्पष्ट.
स्तुति शंकरादि करिती, 'हा चि महाविष्णु चुकवितो कष्ट.'
कीं साभ्यबुद्धिनें जो विनयें जीवें अनुष्ठिला धर्म.
आश्चर्य, हा अविद्या स्वाश्रय जाळोनि देतसे शर्म ६२
धर्माच्या चि बळानें सद्विद्योत्पत्ति होतसे स्पष्ट;
तेव्हां नुरे अविद्या, जीस्तव बहु जीव पावतो कष्ट. ६३
मग परमानंदाची होय अभिव्यक्ति, यापरि व्यक्त
वदले ज्ञाते श्रीमद्भारततात्पर्य देवगुरुभक्त. ६४
श्रीमत्कृष्णप्रभुच्या श्रीप्रियचरणांबुजद्वयीं सक्तें
श्रीहरिवंशग्रंथ श्रीरामसुतें समर्पिला भक्तें. ६५
श्रीहरिहरभक्तरसिक म्हणति 'यथाबुद्धि पुण्य यश गावें';
यास्तव भक्तमयूरें गाउनि लिहिलें, तयां नमुनि, भावें. ६६

इति श्रीहरिवंशे श्रीरामनंदनमयूरविरचिते त्रिपुरवधः समाप्त.।

१ आत्यंतिक नाश २ बुद्धिरूपी. ३ दोरीचा सर्प, दोरास च सर्परूप मानणें ही स्थिति. ४ जाग्रत, स्वप्न व सुषुप्ति या अवस्था. ५. वृद्ध, अनुभवी ६. भेदरहित बुद्धीनें. ७. साक्षात्कार, प्रत्यक्षपणा. ८ रममाण असावें.

# शुद्धिपत्र—हरिवंश.

| पृष्ठ—पंक्ति | शुद्ध | पृष्ठ—पंक्ति | शुद्ध |
|---|---|---|---|
| २- २ | यथाबुद्धि | ८८-११ | सुर विधितें |
| ९-१२ | कंचुक, | ९३-२६ | [सम्यक=] |
| ९-१७ | ज्याची (?). | ९४-२२ | २. राक्षसनाम (?) |
| १४-२० | सागे | ९८- ९ | भेटाया |
| २८- ८ | सैनयांहीं. | १०१-२१ | भोगवावया |
| २८-१० | सद्गति | १०७-१२ | धरूंन (धरून) |
| ४९-११ | आनकदुंदुभि | ११०-१८ | तारि |
| ५४-११ | भर्ता, | १२४- ७ | मुरलीला; |
| ५७-२८ | सुखी | १२४- ८ | मुरलीला |
| ५८- २ | बभ्रु | १२७- ५ | कलशांहीं |
| ६०- ९ | दिवसकर | १३५- २ | होयाचा |
| ६०-१६ | धेटज | १३९-१९ | नवांबुदश्याम |
| ६१-२६ | एकाकी | १४१-२४ | रात्री |
| ६७- ७ | सरा.' | १६३-११ | राज्यच्युत |
| ६८- ५ | शबरी | १६९- २ | येइल मागध |
| ६९- ९ | उत्पात | १६९-२० | आशीर्वादाहीं |
| ६९-१६ | कंपदा त्यांतें, | १७२-१७ | कीर्ति |
| ७०- ५ | अद्रिचें | १७३- ६ | वाळ—वाळ (?). |
| ७०-१८ | गर्जन तर्जन | १७४-१२ | रामजरासंध |
| ७५-२३ | मयमाया | १७४-२० | असा, मान्यी |
| ८१-११ | जीविता रक्षीं,' | १७४-२१ | गेला |
| ८१-१५ | दैत्य, गरुडास | १७५-१७ | विपत्तिपुढें |

| पृष्ठ–पंक्ति | शुद्ध, |
|---|---|
| १७४-२५ | *पक्षिपति गरुडापुढें. |
| १८१-२४ | यादवबळ गरुडसहित |
| १८३- ४ | कुणिच्या न खोल |
| १८९-२७ | ३. कैशिक राजाच्या |
| १९८-२२ | हर्षराशिंतें. |
| २००-११ | प्रभु |
| २०८-२१ | रमला |
| २१५-२३ | रथचक्राचें |
| २१६- ५ | अशुभावहा ललाटांचे; |
| २१६- ८ | करीसि |
| २२१-१९ | रत्नालंकारांचें |
| २३०- ४ | वृत्रादिकदशगुणें |
| २४२-२४ | सुरतरु, |
| २४८- ५ | विद्ध, |
| २५२- ३ | यत्कथांच्या, चित्त धरुनि सत्पथा, सिरो पार्नी.' |
| २५६-१६ | आजि आर्यंकरीं |
| २६५- ७ | पांडव वारी |
| २६८- ३ | सजन निंदा, |
| २६८-२३ | अनतां, |
| २७२-१५ | श्रीशंकरप्रसादें |
| २७३-११ | मागुनि तो हि, विधि म्हणे, 'ज्याचें पदपद्म सुरज शिर लाहो.' |
| २७३-१३ | चटपुरंगुंडा किचित्रा |

| पृष्ठ–पंक्ति | शुद्ध. |
|---|---|
| २८०- ९ | असुरराज |
| २८५-१२ | वहातो |
| २८६- २ | वृष्णिसुरवधूसुखरम्य-जलधिची |
| २८७- ९ | परा, |
| २९०- २ | अपार्थ |
| २९१- ९ | अनित्यवस्तुचा |
| २९१-१० | नित्यवस्तुचा |
| २९१-१६ | सोडी |
| २९५-१७ | कीर्तिलाभातें? |
| २९८-२४ | यारा या. |
| ३०२-१२ | शांखानगरीं ते नट |
| ३०२-२४ | ६ दैव. |
| ३०८- ७ | मदुपेक्षा |
| ३१७-१८ | परचमूमर्दार्थांतें, |
| ३२०-१० | जीं म्हणति पहात्यातें, 'झालों कृतकृत्य सुप-वर्ण च' वदा. |
| ३२३-१९ | पडले |
| ३२४-१४ | प्रभुवर (?). |
| ३२६-२२ | शुद्धीं पिशाचसे, न क्षमे |
| ३२७-२६ | अगस्त्यमुनि |
| ३३१- ४ | मेरु, प्रमुख |
| ३३४-२१ | आम्हीं |
| ३४०-१० | [illegible] |

| पृष्ठ–पंक्ति | शुद्ध. |
|---|---|
| ३४१-१८ | महावनगुहा, |
| ३४६-१४ | गेली, |
| ३४६-२० | आलीस, |
| ३४६-२१ | स्व-आलींस?' |
| ३४८-१४ | आलिंगी |
| ३५०-१८ | बाण प्राण |
| ३६३-११ | भेदी, |
| ३६७-१६ | पाडुनि |
| ३६९-१४ | बाहु मात्र |
| ३७०-१२ | येथून अध्यायाच्या अखेरपर्यंत आर्यांक चुकले आहेत. |
| ३७३-२७ | ७. अशनकाम=सेवनाची इच्छा. |
| ३७५-२० | जी |
| ३७७- ९ | ऋत्विकपुरोहिताचार्य. |
| ३८६-२२ | पदानता, |
| ३९६- ९ | बंधु अनुह्रादाख्य (?) |
| ३९८-२२ | खलपतितां |
| ३९९-१७ | हयग्रीवासीं, |
| ४०१-१३ | परमर्मभेदिते |
| ४०६- ७ | पावे'...दैत्यातें? |
| ४०७-१४ | हरिमारि |
| ४०७-१६ | अगाधसा, |
| ४१५-२३ | पहा.' |

| पृष्ठ–पंक्ति | शुद्ध |
|---|---|
| ४१६-२४ | १. शत्रूच्या कोयत्यानें. |
| ४२४-१४ | सर्वसभासदकविप्रसर |
| ४२८-११ | दासजीव |
| ४२८-२५ | पुण्यपुंजशैलास. |
| ४३२-१६ | करितो ५६ |
| ४३८- ३ | शुचितमास |
| ४४०-२१ | जगदीशा ज्या, |
| ४४६-२६ | १ शुद्ध. |
| ४५२- ५ | साधुमंडली, |
| ४५२-२५ | ६ रात्री |
| ४५२-२८ | रात्रीं |
| ४५५-१९ | पुण्यें, |
| ४५७- २ | दंपती, |
| ४६५- ६ | देवुनि वर, |
| ४६५- ७ | प्रिया अजितें; |
| ४६८- ८ | नृपयम |
| ४७२- ५ | बुडत्याकडे न, |
| ४७४-२२ | कृतकथ. . ..प्रभुसि |
| ४७६- ३ | ते ही |
| ४७९- ९ | पीता |
| ४८१- २ | वंदी (?). |
| ४८८- ५ | आला, तात्पर्य, |
| ४९३-१७ | पुरत्रय साधित |
| ४९५-१३ | देवहरासि |

REFBK-0001168